# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१५/ २०१६** **दिनांक ३०.११.२०१६**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी १२.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा शनिवार दि.०५.११.२०१६ रोजी शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये दुपारी १२.०० वाजता आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ३९६०/ २०१६, दि.२७.१०.२०१६ अनवये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते. तसेच जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ३९६७/ २०१६, दि.२८.१०.२०१६ नुसार सदरहू सभा काही अपरिहार्य कारणास्तव तहकुब करण्यात येत असून पुढील सभेची तारीख, वेळ व ठिकाण अलाहिदा कळविण्यात येईल. सभेची विषयसुची (अजेंडा) पुर्वीप्रमाणेच राहील, असे सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते.

त्यानंतर तहकुब करण्यात आलेली श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे मा.व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा बुधवार दि.३०.११.२०१६ रोजी शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये दुपारी १२.०० वाजता आयोजित करणेत आलेली आहे. या सभेमध्ये पुर्वीच्या विषयसुची (अजेंडा) बरोबरच पुरवणी विषयांवर चर्चा होईल, असे जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ४४०३/ २०१६, दि.२१.११.२०१६ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार बुधवार दि.३०.११.२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे,अध्यक्ष
०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष
०३. मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य
०४. मा.डॉ.राजेंद्र राजाबली सिंग,सदस्य
०५. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य
०६. मा.सौ. अनिताताई विजयराव जगताप, सदस्य

मा.श्री.बाजीराव शिंदे,
कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.ॲड मोहन मोतीराम जयकर- सदस्य व मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे- सदस्य यांनी ई-मेलद्वारे तसेच मा.प्रताप सखाहारी भोसले- सदस्य यांनी दूरध्वनीद्वारे कळविले

मा.श्री.अमोल गजानन कीर्तिकर- सदस्य यांनी ई-मेलद्वारे पुढीलप्रमाणे कळविले आहे. संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.३०.११.२०१६ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस शिवसेनेचे तीनही (मा.डॉ.मनिषा शामसुंदर कायंदे- सदस्या, मा.श्री.रविंद्र गजानन मिर्लेकर- सदस्य व मा.श्री.अमोल गजानन कीर्तिकर- सदस्य) सदस्य हजर राहणार नाही. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व मा.पर्यावरण मंत्री श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्री महोदयांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती याबाबत अजूनपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीस उपस्थित राहण्यास स्वारस्य नाही.

तसेच मा.श्री.रविंद्र गजानन मिर्लेकर- सदस्य यांनी फॅक्स पत्राद्वारे, संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.३०.११.२०१६ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस शिवसेनेचे तीनही सदस्य हजर राहणार नाही. शिवसेनेला उपाध्यक्ष पद देण्याच्या दृष्टीकोनातून कोणतीही कार्यवाही होत नसल्याने आम्हाला या बैठकीस हजर राहण्यास स्वारस्य नाही, याची कृपया नोंद घ्यावी, असे कळविले आहे. याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक ०९.१०.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.७५५** दिनांक ०९.१०.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या त्यास मान्यता देण्यात आली.

**(१) निर्णय क्र.६९३-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा टिकून राहणेसाठी तेथे योग्य गुणवत्ता धारण करणारा मुख्याध्यापक असावा, असे समितीचे मत झाले, याकरीता

येथील मुख्याध्यापक पद जाहिरात देऊन गुणवत्तेच्या आधारे भरणे शक्य आहे काय, याबाबत मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचा अभिप्राय घेण्यात यावा, तोपर्यंत सदरहू प्रस्ताव स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील मुख्याध्यापक पद पदोन्नतीने भरणेबाबतच्या प्रस्तावामध्ये मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचा अभिप्राय नोंदविण्यात आलेला आहे. याकरीता पुन्हा मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांचा अभिप्राय मागविणे आवश्यक नाही. त्यामुळे सदरहू प्रस्ताव फेरचर्चेसाठी पुढील व्यवस्थापन सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.०२** **दिनांक १०.१०.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या रुग्णालय उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.७५६** दिनांक १०.१०.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या रुग्णालय उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१ **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध ओ.टी. व वॉर्डकरीता सर्जिकल इन्स्टुमेंट खरेदीकामी प्राप्त कमर्शिअल ई-निविदा उघडून मिळणेबाबत.**

दि.२६/०२/२०१३ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र.१३६ अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लागणा-या वार्षिक वस्तु/ साहित्यांची यादी बनवावी त्यासाठी वार्षिक दर मागवावेत (Rate Contract) व त्यासाठी सल्लगार नेमावे असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार दि.०१/०८/२०१३ रोजीचे परिपत्रकान्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध ऑपरेशन थिएटर व वॉर्ड यांना कळवून त्यांचेकडून इस्टुमेंटची मागणी घेण्यात आलेली आहे.

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध ऑपरेशन थिएटर व वॉर्ड विभागात दैनंदिन शस्त्रक्रिया करणेकामी विविध प्रकारच्या इन्स्टुमेंटची आवश्यकता असते व ती वारंवार वापरुन खराब होतात, त्यामुळे त्यांची नेहमी खरेदी करावी लागते. त्यामुळे सर्व ऑपरेशन थिएटर व वॉर्ड विभागांची एकत्रित मागणी घेण्यात आलेली आहे. सदर इन्स्टुमेंट खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले होते. प्राप्त दरपत्रकानुसार सदरचे खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.१,४०,००,६२९/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.१५/०३/२०१४ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय क्र.२०३ अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध ऑपरेशन थिएटर व वॉर्ड विभागाकरीता लागणा-या सर्जिकल इन्स्टुमेंट खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.१,४०,००,६२९/- चे खर्चास मान्यता घेणेकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले आहे.

त्यानुसार जा.क्र.एसएसएस/वशी-विधी/२०७४/२०१४ दि.३०/०७/२०१४ रोजीचे पत्रान्वये मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्यात आला होता. त्यास अनुसरुन सदरचे खरेदीकामी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे सिव्हील अॅप्लीकेशन नं.८७०४/२०१४ दि.२६/०९/२०१४ अन्वये रु.१,४०,००,६२९/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीकामी फ्रिप्रेस जनरल– मुंबई, लाईफ ३६५ इंग्लिश– पुणे, दिव्य मराठी– नाशिक, पुण्यनगरी– औरंगाबाद या वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात येऊन संस्थानचे संकेत स्थळावर देखील जाहिरात व निविदा देण्यात आलेली होती. निविदा विक्रीची मुदत दि.१५/०५/२०१५ ते दि.२५/०५/२०१५ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि२७/०५/२०१५ अखेर ठेवण्यात आलेली होती. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या होत्या-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Visionary Medtech Solutions Pvt.Ltd., Ahmedabad | २७/०५/२०१५ |
| 2 | M/s. PSI Marketing Pvt. Ltd., Nagpur | २९/०५/२०१५ |
| 3 | M/s. Lebson Hebbar Surgical Instruments, Chennai | १५/०६/२०१५ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त ०३ तांत्रिक सिलबंद निविदा मा.वैद्यकीय संचालक यांचे समोर दि०३/०८/२०१५ रोजी समक्ष उघडण्यात आलेल्या आहेत.

सदरहू निविदांचा तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून त्यांच्या कमर्शियल निविदा उघडण्यात आलेल्या नाहीत. कारण रुग्णालयाचे ई.डी.पी. विभागाने दि.१९/०९/२०१५ रोजी Digital Signature Certificate ची मुदत संपुष्टात आल्यामुळे सदर निविदा Open होऊ शकणार नाही असे दि.१०/१०/२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविलेले आहे. त्यामुळे दि२५/११/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीन्वये सदरचे खरेदीकामी पुन्हा दैनिक सामना– औरंगाबाद, गावकरी– नाशिक या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात व निविदा देण्यात आली होती. त्यानुसार निविदा विक्रीची मुदत दि१५/०२/२०१६ ते ०५/०३/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.०८/०३/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन शिर्डी व मुंबई कार्यालय दोन्ही मिळून ०८ निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s.Austin Health Care, Pune | 08/03/2016 |
| 2 | M/s.Hebbar Surgical Instruments, Chennai | 05/03/2016 |
| 3 | M/s.Kanchan Drugs Pvt. Ltd., Pune | 08/03/2016 |
| 4 | M/s.PSI Marketing Pvt. Ltd., Nagpur | 07/03/2016 |
| 5 | M/s.S.B. Surgical, Pune | 08/03/2016 |
| 6 | M/s.South India Surgical Co. Ltd. Chennai | 08/03/2016 |
| 7 | M/s.Visionary Medtech Solutions Pvt. Ltd.,Ahmedabad | 08/03/2016 |
| 8 | M/s.Warden Surgical.Co.Pvt.Ltd., Navi Mumbai | 08/03/2016 |

वरीलप्रमाणे खरेदीकामी जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या ०८ तांत्रिक निविदा दि.१८/०३/२०१६ रोजीचे मा.उपसमिती सभेपुढे उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून प्राप्त निविदाधारकांना Demo देणेकामी दि.१३/०४/२०१६ ते १४/०४/२०१६ रोजी हॉस्पिटलमध्ये (ठिकाण– नविन सर्जिकल आयसीयु) बोलविण्यात आले होते, त्यानुसार दि०७/०४/२०१६ रोजीचे परिपत्रकान्वये संबंधित विभागातील सर्जिकल इन्स्टुमेंटचा वापर करणारे डॉक्टर व संबंधित कर्मचारी यांनी Demo साठी हजर राहून तसेच त्यांनी दिलेल्या Demo बाबतचा अभिप्राय औषध भांडार विभागाकडे देणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु संबंधित विभागाचा अभिप्राय वेळेत प्राप्त न झाल्यामुळे दि२७/०४/२०१६ व दि.१७/०५/२०१६ रोजीचे परिपत्रकान्वये स्मरणपत्र देण्यात आले होते, त्यास अनुसरुन संबंधित वापर करणाऱ्या डॉक्टरांची शिफारस घेण्यात आलेली आहे. त्यांनी शिफारस केलेल्या इन्स्टुमेंटचे निविदाधारकांची नावे खालीलप्रमाणे-

| **Orthopedic O.T.** | **ENT O.T.** | **Neuro O.T.** |
|---|---|---|
| M/s.Austin Health Care, Pune | M/s.Hebbar Surgical Instruments, Chennai | M/s.Austin Health Care, Pune |
| M/s.Hebbar Surgical Instruments, Chennai | M/s.S.B. Surgical, Pune | M/s.Hebbar Surgical Instruments, Chennai |
| M/s.Kanchan Drugs Pvt. Ltd., Pune | M/s.South India Surgical Co. Ltd. Chennai | M/s.S.B. Surgical, Pune |
| M/s.S.B. Surgical, Pune | | M/s.South India Surgical Co. Ltd. Chennai |
| M/s.Visionary Medtech Solutions Pvt. Ltd.,Ahmedabad | | |

उपरोक्तप्रमाणे पात्र असलेल्या ०८ कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर उघडणेत आलेल्या ई-निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत येऊन, त्यामधील पात्र निविदाधारकांच्या दरांमधील निम्नतम दरधारकास कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने संबंधीत साहित्याचा पुरवठा आदेश देण्यात यावा, तसेच ज्या साहित्यासाठी तीनपेक्षा कमी निविदाधारकांनी दर दिलेले आहेत, अशा साहित्यासाठी नव्याने निविदा प्रसिध्द करणेत याव्या व याबाबतचा अहवाल व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०२ **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामधील ऑनलाईन कामांकरीता संगणक व संगणकीय साहित्य खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटल रुग्णालय व श्री साईनाथ रुग्णालय शासनाचे चॅरिटी, जन्म मुत्यु आणि सोनोग्राफी इत्यादी ऑनलाईन कामकाजाकरीता संगणक व संगणकिय साहित्य खरेदी कामी मा.त्रिसदस्यीय समितीचा दि.१६.०२.२०१६ रोजीचा मंजुर निर्णय क्र.१८३ नुसार, याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२,८३,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली आहे. त्याप्रमाणे विविध पुरवठाधारकांकडुन सिलबंद निवीदा मागविणेकामी संस्थानचे वेबसाईटवर माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत दि.२५/०६/२०१६ ते १३/०६/२०१६ अखेर जहिरात प्रसिध्द केली असता, दोनच निवीदा प्राप्त झाल्यामुळे उपरोक्त संदर्भ क्र. २ चे मंजुर टिपणी अन्वये फेर-निवीदा मागविणेत आलेल्या आहेत.

त्यानुसार निवीदा मागविणेकामी संस्थानचे विहित पध्दतीने संस्थानच्या वेबसाईटवर माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत दि.०८/०८/२०१६ ते दि.२०/०८/२०१६ अखेर जाहिरात प्रसिध्द करणेत आली होती. टेंडर भरणेसाठी आवश्यक असाणा-या मुळ कागदपत्रांच्या प्रती व डी.डी. संस्थान कार्यालयात जमा करणेसाठी निवीदाधारकांस दि.२०/०८/२०१६ रोजी अखेर मुदत देणेत आली होती.

त्यानुसार दि.२०/०८/२०१६ अखेर मुदतीत तीन निवीदा प्राप्त झाल्या आहेत. त्यांचा तपशील खालील प्रमाणे -

| अ.नं. | निवीदाधारंकाचे नाव | आवक नंबर व दिनांक | लिफाफा संख्या |
|---|---|---|---|
| ०१. | M/s. MCCANN INFO SOLUTION, Mumbai | आ.क्र. ८८७५ / दि. १९/०८/२०१६ | ०१ |
| ०२. | M/s. Minitek System (India) PVT LTD., Nashik | आ.क्र. २१७० / दि. २०/०८/२०१६ | ०१ |
| ०३. | M/s. DIRECT IT Solution, Pune | आ.क्र.२१६०/२१६१/ दि. २०/०८/२०१६ | ०२ |

उपरोक्तप्रमाणे पात्र असलेल्या ०३ सिलबंद निविदा आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | साहित्याचे नाव | तपशील | मेकॅन इन्फो. सोल्यु, मुंबई | मे.मिनिटेक सिस्टीम प्रा.लि., नाशिक | मे.डायरेक्ट आय.टी. सोल्यु., पुणे |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | संगणकसंच ५ नग | I5 Processor, 4GB Ram, 500GB Hard disk, | **४३,०५०/-** (DELL) | ४०,९६४/- + vat ५,५% (ACER) | ४९,४००/- (LENOVO) |
| ०२. | स्कॅनर प्रिंटर ५ नग | Hp Laser jet M 1005 | १३,७००/- (HP) | १२,९००/- + vat ५,५% (HP) | **१३,१००/-** (HP) |
| ०३. | यु.पी.एस. ५ नग | APC 650 V | ५,३००/- (APC 700V) | ४,२२०/- + vat ५,५% (APC 700V) | **२,२५०/-** (APC 650V) |
| ०४. | लॅन केबल २ बॉक्स | D link/ Molex/ DIGI link | ५,५५०/- (D- Link) | ४,७६१/- + vat ५,५% (D-Link/ Molex/ Oigilinh) | **४,९००/-** (D- Link) |

**यावर सविस्तर चचा्र होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामधील ऑनलाईन कामांकरीता संगणक व संगणकीय साहित्य खरेदीकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामध्ये गडद व अधोरेखीत केलेले एकत्रित निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०३ **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील CVTS O.T. या विभागाकरीता Needle Holder (Curved Golden Handle 10") खरेदी करणेकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडून मिळणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील CVTS O.T. या विभागाने दि.२२/०४/२०१५ (औषध भांडार विभाग प्राप्त दि.१२/०५/२०१५) रोजीचे मागणी पत्रकान्वये ०२ नग Needle Holder (Curved Golden Handle 10") ची मागणी केलेली आहे.

श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी. २ या विभागाने दि.२२/०४/२०१५ रोजीचे मागणी पत्रकान्वये Scanlan कंपनीच्या Needle Holder (Curved Golden Handle 10") ०२ नगांची मागणी केलेली आहे. (औषध भांडार विभाग प्राप्त दि. १२/०५/२०१५) सदर विभागाकडे Needle Holder नसल्यामुळे त्यांनी नवीन मागणी केलेली आहे. कारण सदरचे Needle Holder घेतल्यामुळे ऑपरेशन नंतर करावयाचे Sutures हे लवकर होतील शिवाय सदर Sutures मुळे Tissue Damage होणार नाही, त्यामुळे रुग्ण लवकरात लवकर बरा होण्यास मदत होईल.

यापूर्वी सदर श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी. I या विभागाकरीता मा.त्रिसदस्य समिती सभा दि.०९/१२/२०१४ निर्णय क्र. १०२१ (०८) अन्वये M/s. B. L. Lifescience Pvt. Ltd., New Delhi यांचेकडुन इकडील पत्र क्र.३६३२ दि.२०/०१/२०१५ अन्वये Scanlan कंपनीच्या Needle Holder (Curved Golden Handle 10") ०२ नगांचा प्रती नग रक्कम रु.८१०७०/- या प्रमाणे रक्कम रु.१६२१४०/- इतक्या रक्कमेचा पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. त्यानुसार M/s. B. L. Lifescience Pvt. Ltd., New Delhi यांचेकडून दूरध्वनीद्वारे दराबाबत विचारणा केली असता त्यांनी त्याच मंजूर दराने सदर Needle Holder (Curved Golden Handle 10") देण्यास तयार असल्याचे कळविले होते.

तरी वरीलप्रमाणे सी.व्ही.टी.एस ओ.टी नं. 2 या विभागाकरीता लागणारे Scanlan कंपनीच्या ०२ नग Needle Holder (Curved Golden Handle 10") हे M/s. B. L. Lifescience Pvt. Ltd., New Delhi यांचेकडुन मागील मंजूर दराने करुन घेण्यास व याकामी येणाऱ्या रक्कम रु.१६२१४०/- चे खर्चास मान्यता घेणेकामीचा प्रस्तावास दि. २८/११/२०१५ रोजीचे त्रिसदस्य समितीपुढे निर्णय क्रं.५३९ अन्वये यावर चर्चा होऊन श्री साईबाबा हॉस्पिटलमधील CVTS O.T.या विभागाकरीता Needle Holder (Curved Golden Handle 10") मागील मंजुर दराने खरेदी करणे ऐवजी त्याकामी कोटेशनची मागणी करण्यात यावी असे ठरले. तसेच याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१,६२,१४०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली त्यानुसार इकडील पत्र क्र. ३०६९ दि०३/०२/२०१६ अन्वये ५ अधिकृत विक्रेते/ पुरवठा धारक यांचेकडून दि २०/०२/२०१६ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते.परंतु एकही कोटेशन प्राप्त झालेले नसल्यामुळे पुन्हा इकडील पत्रक्र.९३५ दि. ०४/०८/२०१६ अन्वये एकूण १३ अधिकृत/ पुरवठाधारक यांचेकडून दि.२५/०८/२०१६ अखेर फेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन ०५ सिलबंद कोटेशन मुदतीत प्राप्तझालेले आहे..

त्याचा तपशील खालीलप्रमाणे: -

| Sr.No. | Name of Supplier | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Pranav Medicare, Pune | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.११/०८/२०१६ |
| 2 | M/s.South India Surgical co. Pvt.Ltd., Mumbai | सिलबंद कोटेशन प्राप्त दि. १९/०८/२०१६ |
| 3 | M/s. B L Lifesciences Pvt. Ltd., Delhi | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२४/०८/२०१६ |
| 4 | M/s. Purnima Surgical Enterprises, Nashik | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२२/०८/२०१६ |
| 5 | M/s. PSI Marketing Pvt. Ltd.,Nagpur | सिलबंद कोटेशन प्राप्त दि.२२/०८/२०१६ |

उपरोक्तप्रमाणे पात्र असलेल्या ०३ सिलबंद कोटेशन्स आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर, उपस्थित कोटेशन्सधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| S. no. | Name of Supplier | Qty. | Make / Model | Total Amt.in Rs. | Warranty |
|---|---|---|---|---|---|
| 1 | M/s. Pranav Medicare, Pune | 2 | Om Surgical Curved Holder Handle 10 Inches) | 27000.00 | |
| 2 | M/s. South India Surgical Co.Pvt.Ltd., Mumbai | 2 | Make -Sisco Code No.TNH096 Needle Holder Sratte Valve, Carbon – inlay jaws, gold ring handle, 10"/25.4 cm (CatNo.6006-16) | 9563.00 | 1 Year |
| 3 | M/s. B.L.Lifescience Pvt.Ltd., Delhi | 2 | Make - Scanlan (Cat.No.6006-16 Needle Holder (Curved Golden Handle 10") – Needle Holder Sratte Valve, Carbon – inlay jaws, gold ring handle, 10"/25.4 cm | 228638.00 | 1 Year |
| 4 | M/s. Purnima Surgical Enterprises, Nashik | 2 | B. martin | **9000.00** | 1 Year |
| 5 | M/s. PSI Marketing Pvt.Ltd., Nagpur | 2 | Model CVT731 TI Cardio vascular & Micro Surgery Needle Holders Stratte 23.0cm/9" | 18622.00 | 6 Month |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील CVTS O.T. या विभागाकरीता ०२ नग Needle Holder (Curved Golden Handle 10") खरेदी करणेकामी M/s. Purnima Surgical Enterprises, Nashik यांचे एकत्रित रु.९,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०४ **श्री साईबाबा रुग्णालयातील विविध शस्त्रक्रिया विभागाकरीता Fogger Machine खरेदी करणेकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडून मिळणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील विविध ऑपरेशन थिएटरमध्ये शस्त्रक्रिया झाल्यानंतर निर्जंतुकीकरणासाठी Fogger Machine ची आवश्यक असते. त्यामुळे C.V.T.S O.T.–I, C.V.T.S O.T.–II, Neuro O.T. तसेच Ortho O.T विभागाने Fogger Machine ची मागणी केलेली होती.

तेंव्हा यापूर्वी M/s. Rank Engineering, Chennai यांचे कडून श्री साईनाथ रुग्णालयातील ऑपरेशन थिएटर करीता इकडील पत्र क्र. ७१३६, दि. १०/०२/२०१४ अन्वये प्रती नग रु.२०,०००/- या दराने २ नग Fogger Machine खरेदी करण्यात आलेले होते तेंव्हा सदर Fogger Machine खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Rank Engineering, Chennai यांचेकडुन ई- मेल द्वारे दरपत्रक मागविण्यात आलेले होते त्यानूसार M/s. Rank Engineering, Chennai यांनी त्याच दराने Fogger Machine देण्यास तयार आहेत असे दि.१५/०१/२०१५ चे ई-मेल पत्रान्वये कळविलेले होते, त्यानूसार मा.त्रिसदस्य समिती सभा दि.२४/०६/२०१५ निर्णय क्र.१६२ (२८) अन्वये इकडील पत्र क्र. १०८६ दि. १६/०७/२०१५ अन्वये प्रती नग रु.२०,०००/- या प्रमाणे ०४ नगांचा तसेच दि२२/०८/२०१५ रोजीचे मंजूर टिप्पणीन्वये इकडील पत्र क्र. २२३८ दि. १६/११/२०१४ अन्वये १ नगाचा पुरवठा असा एकूण५ नगांचा पुरवठा आदेश देण्यात्त आलेला होता.

M/s. Rank Engineering, Chennai यांनी दि.२४/११/२०१५ चे ई-मेल द्वारे डॉलरचे दर वाढल्यामुळे मंजूर दराने ते सदर०५ नग Fogger Machine देण्यास तयार नसल्याचे कळविले होते. सदर ई- मेल मध्ये त्यांनी Fogger Machine चे नविन दर प्रती नग रक्कम रु.३९,८५८/- असे कळविले होते. त्यांच्या नविन दरानूसार सदर ०५ नग Fogger Machine खरेदीकामी रक्कम रु.१,९९,२९०/- इतका खर्च येणार होता म्हणजेच सदर Fogger Machine खरेदीकामी रक्कम रु.९९,२९०/- इतका जास्तीचा खर्च येणार आहे.तसेच श्री साईबाबा रुग्णालयतील कॅज्युअल्टी विभागाने दि.२८/१०/२०१५ (औषध भांडार विभाग प्राप्त दि.१०/११/२०१५) चे मागणी पत्रकान्वये १ नग Fogger Machine ची मागणी केलेली आहे. त्यामुळे सदर एक नग Fogger Machine खरेदी करणे गरजेचे होते.त्यानुसार दि. ०२/०२/२०१६ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत ०६ नग Fogger Machine खरेदी करणेस मान्यता मिळाली होती.त्यास अनुसरुन इकडील पत्र क्र. ३३४७, दि. ०५/०३/२०१६ अन्वये एकूण ११ अधिकृत विक्रेते/ पुरवठा धारक यांचेकडून दि १२/०३/२०१६ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते तसेच दुरध्वनीव्दारे अधिकृत विक्रेते/ पुरवठा धारक यांना कोटेशन देणेबाबत तगादा करण्यात येत होता. त्यानुसार ०३ सिलबंद कोटेशन व ई– मेलव्दारे ०२ कोटेशन मुदतीनंतर प्राप्त झाले त्यामुळे पुन्हाइकडील पत्र क्र. ९६७, दि. ०८/०८/२०१६ अन्वये एकूण १५ अधिकृत विक्रेते/ पुरवठा धारक यांचेकडून दि ३०/०८/२०१६ अखेर कोटेशन मागविण्यात आले त्यास अनुसरुन ११ सिलबंद कोटेशन व ०१ कोटेशन ई-मेलव्दारे मुदतीत प्राप्त झाले त्याचा तपशिल खालील प्रमाणे :-

| **Sr.No.** | **Name of Tenderer** | **Received Date** |
|---|---|---|
| 1 | M/s. Rank Engineering, Chennai | सिलबंद कोटेशन दि. २६/०८/२०१६ |
| 2 | M/s. Purnima Surgical Enterprises, Nashik | सिलबंद कोटेशन दि. २५/०८/२०१६ |
| 3 | M/s. Microgen Hygiene Pvt.Ltd.,Mumbai | सिलबंद कोटेशन दि. २६/०८/२०१६ |
| 4 | M/s. Fly-Ban Industries, Pune | सिलबंद कोटेशन दि. ३०/०८/२०१६ |
| 5 | M/s. Arbuda Agrochemicals Pvt. Ltd.,Mumbai | सिलबंद कोटेशन दि. २६/०८/२०१६ |
| 6 | M/s. Anil Enterprises | ई-मेल व्दारे प्राप्त झालेले कोटेशन दि. २७/०८/२०१६ |
| 7 | M/s. Sumeet Enterprises, Pune | सिलबंद कोटेशन दि. २५/०८/२०१६ |
| 8 | M/s. Saikiran Enterprises, Aurangabad | सिलबंद कोटेशन दि. २५/०८/२०१६ |
| 9 | M/s. Bioshields, Pune | सिलबंद कोटेशन दि. २२/०८/२०१६ |
| 10 | M/s. Vardhaman Medical & Gen. Store, Shirdi | सिलबंद कोटेशन दि. ३०/०८/२०१६ |
| 11 | M/s. Farmachem Enterprises, Pune | सिलबंद कोटेशन दि. ३०/०८/२०१६ |
| 12 | M/s. R.S. Enterprises, Parvati | सिलबंद कोटेशन दि. ३०/०८/२०१६ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले सिलबंद कोटेशन्स आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर, उपस्थित कोटेशन्सधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| **Sr. No.** | **Name of Supplier** | **Make / Model** | **Total Amt.in Rs.** | **Warranty** |
|---|---|---|---|---|
| 1 | M/s. Rank Engineering, Chennai | Micro Mist (SS Tank) | 236250.00 | |
| 2 | M/s. Purnima Surgical Enterprises, Nashik | | 166800.00 | |
| 3 | M/s. Microgen Hygiene Pvt.Ltd., Mumbai | Make German CE Approved Model- microfog NEO | **99697.50** | 6 month |
| 4 | M/s. Fly-Ban Industries, Pune | Fly-Ban Make Fogging ULV System | 376614.00 | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 | M/s. Arbuda Argochemicals Pvt. Ltd., Mumbai | ULV Cold Fogging Machine | 90000.00 | |
| 6 | M/s. Anil Enterprises, Delhi | | 102000.00 | |
| 7 | M/s. Sumeet Enterprises, Pune | SS Model With Timer | 163788.72 | |
| 8 | M/s. Saikiran Enterprises, Aurangabad | Stainless Steel With Timer Std.make | 174825.00 | |
| 9 | M/s. Bioshields, Pune | Biostar ULV Fogger (SS Model with Timer) High Density Fogging Machine for sterile areas | 126000.00 | 1 Year |
| | | Electric Timer For Biostar (SS Model) Ele.Timer suitable for Biostar Fogging Machine | 6930.00 | 1 Year |
| 10 | M/s. Vardhaman Medical & Gen.Store, Shirdi | Product Code - Micro Mist Fogger Mfg.by Gouri Eng.Pvt.Ltd. | 271350.00 | 1 Year |
| 11 | M/s. Farmachem Enterprises, Pune | Product Code - Micro Mist Fogger Mfg.by Gouri Eng.Pvt.Ltd. | 257850.00 | 1 Year |
| 12 | M/s. R.S.Enterprises, Parvati, Pune | Product Code - Micro Mist Fogger Mfg.by Gouri Eng.Pvt.Ltd. | 253125.00 | 1 Year |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील विविध शस्त्रक्रिया विभागाकरीता ०६ नग Fogger Machine खरेदी करणेकामी M/s. Arbuda Argochemicals Pvt. Ltd., Mumbai यांचे रु.९०,०००/- मात्र दर निम्नतम आलेले आहेत. परंतु त्यांचेकडील Fogger Machine आपल्या मागणीप्रमाणे नसल्यामुळे, त्यांच्या दरांचा विचार करता येणार नाही, याकरीता प्रस्तावित खरेदीकामी द्वितीय निम्नतम दरधारक M/s. Microgen Hygiene Pvt.Ltd., Mumbai यांचे एकत्रित रु.९९,६९७.५० मात्र स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०५ **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वार्षीक (सन २०१६-१७) या वर्षाकरीता लागणारे औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीस मंजुरी मिळणेबाबत.**

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे दैनंदिन वापरासाठी सन २०१६-१७ या वर्षाकरीता लागणा-या औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब-ब्लड बॅंक केमीकल्स क्ष-किरण, सि.टी.स्कॅन, एम.आर.आय. फिल्म्स, डेंटल मटेरीयल, मलम, आयुर्वेदीक औषधे, कॅथलॅब व कार्डीयाक ओ.टी. मटेरीयल, न्युरो ओ.टी. मटेरीयल, आय लेन्सेस इत्यादी खरेदीकामी दि.०५/०१/२०१६ रोजीचे परिपत्रकान्वये वॉर्ड/ विभाग प्रमुख यांना गतवर्षाची मागणी केलेल्या औषधांची यादी देण्यात आली होती. त्यामध्ये ज्या औषधांची आवश्यकता आहे त्यांची मागणी केलेली आहे. तसेच काही औषधांची मागणी गतवर्षातील खपाचा अनुभव/ शिल्लक असलेला साठा यांचा विचार करता मागणी केलेली नाही तर काही डॉक्टरांनी सुचविल्याप्रमाणे नविन औषधे, साहित्य इत्यादींचा देखील समावेश करण्यात आलेला आहे अशा प्रकारे सर्व औषधांची मागणी कमी जास्त करुन व नविन औषधांचा यादीत समावेश

करुन अंतिम तक्ता तयार करण्यात आला आहे. तो सोबत पाने १ ते १३८ सादर केला आहे, त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशिल | सन २०१६-१७ करीता मागणीप्रमाणे अंदाजे खर्च रु. |
|---|---|---|
| १ | गोळ्या (Tablet) | 24892374.86 |
| २ | इंजेक्शन व आय.व्ही.फ्ल्युड्स | 62732844.86 |
| ३ | लिक्वीड ओरल्स | 3850201.43 |
| ४ | मलम | 1092663.97 |
| ५ | आय, इअर व नोझल ड्राप्स | 2581282.65 |
| ६ | डेंटल मटेरीयल | 578495.19 |
| ७ | क्ष-किरण, सि.टी.स्कॅन, एमआरआय फिल्म्स व इतर साहित्य | 29953251.15 |
| ८ | श्री साईनाथ रुग्णालय – लॅब केमीकल्स | 4824083.13 |
| ९ | श्री साईबाबा हॉस्पिटल – लॅब केमीकल्स | 34058575.97 |
| १० | ब्लड बॅंक केमीकल्स | 10412290.84 |
| ११ | Miscellaneous (इतर किरकाळ साहित्य) | 10460793.01 |
| १२ | ओ.टी. आणि इतर सर्जिकल मटेरीयल | 66287224.05 |
| १३ | कॅथलॅब, कार्डीयाक ओ.टी. व परफ्युजनीस्ट मटेरीयल व सर्जिकल साहित्य | 79678396.25 |
| १४ | डायलेसीस युनीट | 1104779.64 |
| १५ | न्युरो ऑपरेशन थिएटर विभाग सर्जिकल साहित्य | 1913501.74 |
| १६ | आयुर्वेदीक औषधे | 4098675.19 |
| १७ | होमिओपॅथीक औषधे | 74786.25 |
| १८ | कॅटगट अॅन्ड सुचर्स मटेरीयल (श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील सर्व ओ.टी.) | 45505962.72 |
| १९ | On Consignment Basis Items (Stent/ Valve/ Balloon/ Pacemaker/ Devices/ Ortho & Neuro Surgery Items etc.) | 100000000.00 |
| | **एकुण रक्कम रु.-** | **48,41,00,182.90** |
| | **पुर्णांकित एकुण रक्कम रु- .** | **48,41,00,183.00** |

सदरची मागणी तयार करताना पुढील बाबी विचारात घेण्यात आलेल्या आहेत-

०१) दोन्ही रुग्णालयात वाढ झालेली रुग्णांची संख्या, शस्त्रक्रियांची संख्याइत्यादीचा तपशिल पुढीलप्रमाणे-

श्री साईनाथ रुग्णालयातील अंतरुग्ण व बाहयरुग्णांची संख्या-

| अ.नं. | तपशिल | सन 2008 - 2009 (01.04.08 ते 31.03.09) | सन 2009 - 2010 (01.04.09 ते 31.03.10) | सन 2010 - 2011 (01.04.10 ते 31.03.11) | सन 2011 - 2012 (01.04.11 ते 31.03.12) | सन 2012 - 2013 (01.04.12 ते 31.03.13) | सन 2013 - 2014 (01.04.13 ते 31.03.14) | सन 2014 - 2015 (01.04.14 ते 31.03.15) | सन 2015 - 2016 (01.04.15 ते 31.03.16) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | अंतरुग्ण संख्या | 9365 | 11573 | 11639 | 11900 | 15220 | 14075 | 12279 | 8628 |
| ०२ | बाहयरुग्ण संख्या | 240890 | 223844 | 261321 | 260414 | 303668 | 298226 | 297184 | 213134 |

श्री साईबाबा रुग्णालयात कॅथलॅब ऑपरेशन थिएटर, कार्डीयाक ऑपरेशन थिएटर, जनरल ऑपरेशन थिएटर, न्युरो ऑपरेशन थिएटर, आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर तसेच सि.टी.स्कॅन, एमआरआय,२-डी इको, डायलेसीस हे विभाग सुरु होऊन जवळजवळ ९ वर्ष झालेले आहेत. तेथे आतापर्यंत झालेल्या शस्त्रक्रियांचा / तपासण्यांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ. नं. | तपशिल | सन 2008 - 2009 (01.04.08 ते 31.03.09) | सन 2009 - 2010 (01.04.09 ते 31.03.10) | सन 2010 - 2011 (01.04.10 ते 31.03.11) | सन 2011 - 2012 (01.04.11 ते 31.03.12) | सन 2012 - 2013 (01.04.12 ते 31.03.13) | सन 2013 - 2014 (01.04.13 ते 31.03.14) | सन 2014 - 2015 (01.04.14 ते 31.03.15) | सन 2015 - 2016 (01.04.15 ते 31.03.16) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | कॅथलॅब प्रोसीजर | 4616 | 4922 | 5482 | 7332 | 9254 | 9805 | 5915 | 4577 |
| ०२ | ह्दय शस्त्रक्रिया | 721 | 1023 | 1216 | 1491 | 1579 | 1700 | 1716 | 1665 |
| ०३ | ऑप्थॅलमिक शस्त्रक्रिया | 289 | 542 | 699 | श्री साईनाथ रुग्णालयात स्थलांतर | | | | |
| ०४ | आर्थोपेडीक शस्त्रक्रिया | 710 | 728 | 763 | 817 | 925 | 1030 | 936 | 548 |
| ०५ | जनरल शस्त्रक्रिया | 817 | 1535 | 1664 | 2249 | 2221 | 1984 | 1565 | 1036 |
| ०६ | न्युरो शस्त्रक्रिया | 253 | 489 | 571 | 611 | 586 | 337 | 383 | 565 |
| ०७ | युरोलॉजी शस्त्रक्रिया | 328 | 397 | 440 | 548 | 570 | 615 | 643 | 556 |
| ०८ | सि.टी.स्कॅन | 8091 | 8024 | 9995 | 9656 | 9546 | 8780 | 7827 | 7851 |
| ०९ | एम.आर.आय. | 7943 | 8777 | 10060 | 15596 | 13050 | 13317 | 13244 | 12084 |
| १० | 2 - डि इको | 6402 | 6785 | 8793 | 11960 | 14113 | 16591 | 15692 | 14971 |
| ११ | डायलेसीस | 1777 | 1850 | 1960 | 2078 | 2516 | 2337 | 2611 | 2162 |
| १२ | अंतर्रुग्ण संख्या | 11147 | 12689 | 13489 | 15533 | 17266 | 17226 | 12792 | 11033 |
| १३ | बाहयरुग्ण संख्या | 66543 | 73068 | 102478 | 130105 | 147147 | 153034 | 146526 | 127668 |
| | एकुण संख्या | 109890 | 120986 | 150213 | 189153 | 207940 | 226756 | 209850 | 184716 |
| | दर गतवर्षीचे तुलनेत टक्के वारी नुसार दिसणारी वाढ | 20% | 10% | 24% | 26% | 10% | 10% | 9% | 8% |

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत शस्त्रक्रिया करण्यात येत असल्यामुळे रुग्णांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ होऊ शकते.

०२) दि.०१/०४/२०१५ ते दि.३१/०३/२०१६ या कालावधीतील झालेला खप, सध्या औषध भांडारात असलेला औषध साठा, त्याचा होणारा खप तसेच श्री साईबाबा रुग्णालयातील रुग्णांची संख्या देखील दिवसेंदिवस वाढू शकते.

०३) उपरोक्त मागणीमध्ये दोन्ही रुग्णालयासाठी लागणारी इंजेक्शन, टॅबलेट, ऑईन्टमेन्ट, सर्जिकल साहित्य इत्यादीची एकत्रित मागणी केलेली आहे.

०४) मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार संस्थानमध्ये कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेले कर्मचारी व त्यांचेवरील अवलंबित यांचेसाठी विशिष्टरक्कमेपर्यंत उपलब्ध असलेली औषधे व सुविधा देणेबाबत निर्णय झालेला आहे व त्याचीअंमलबजावणी देखील चालु झालेली आहे. त्यामुळे रुग्णांसाठी लागणाया औषधांमध्ये वाढ सुचविण्यात आलेली आहे.

०५) महाराष्ट्र शासनाने दि.१६/११/२०१३ पासुन सुरु केलेल्या राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत दोन्ही रुग्णालयात होणा-या शस्त्रक्रिया कराव्या लागतात व त्यामध्ये रुग्णांना दाखल आहे तोपर्यंत व डिसचार्ज दिल्यानंतर पुढील१० दिवसांची औषधे मोफत दयावयाची आहे त्यामुळे देखील औषधांचे मागणीत खुपच वाढ झालेली आहे. त्यासाठी देखील अंदाजे रुग्णांची संख्या विचारात धरुन अंदाजे औषधे मागणी केलेली आहे. सदर मागणी प्रत्यक्ष आलेल्या रुग्णानुसार कमी जास्त होऊ शकते.

०६) श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा, मायक्रोबायोलॉजी, हिस्टोपॅथोलॉजी इत्यादी विभागासाठी लागणारे केमीकल्स यांचा गतवर्षाचा झालेला खप, राजीव गांधी जीवनदायी योजने अंतर्गत रुग्णांच्या तपासण्या इत्यादी व श्री साईबाबा रुग्णालयात वाढणारी संभाव्य रुग्णांची संख्या यांचा विचार करुन मागणी सुचविलेली आहे.

०७) दोन्ही रुग्णालयामध्ये होणारी विविध प्रकारची शिबीरे, संस्थानतर्फे राबविले जाणारे इतर उपक्रम, महामार्गावरील अपघात इत्यादीमुळे वाढणारी गर्दी व राजीव गांधी योजने अंतर्गत दाखल होणारे वाढत्या रुग्णांची संख्या (उदा.किडनी स्टोन शिबीरे, उत्सव, कार्डीयाक वर्कशॉप, आध्यात्मिक शिबीरे, पालखी सोहळा इत्यादी).

०८) श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालय मिळून १३ ऑपरेशन थिएटर कार्यान्वित आहेत. सदरचे थिएटरमध्ये होणा-या विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया व त्यासाठी लागणारे सर्जिकल साहित्य इत्यादीचा विचार करण्यात आलेला आहे. श्री साईनाथ रुग्णालयात दि.०१/०४/२०१५ ते दि.३१/१२/२०१५ अखेर ५६२६ तर श्री साईबाबा रुग्णालयात दि.०१/०४/२०१५ ते दि.३१/०३/२०१५ या कालावधीत ८९४७ इतक्या शस्त्रक्रिया झालेल्या आहेत.

०९) विविध प्रकारचे स्टेन्ट, व्हाल्व, बलून, पेसमेकर इत्यादी महागडी साहित्य हि On Consignment Basis वर खरेदी करणेबाबत प्रस्तावित केलेले आहे. ती आपण रुग्णांना वापरल्यानंतर पुरवठा धारकांचे बील अदा करत असतो. त्यासाठी दरमहा गतवर्षाचा अनुभव विचारात घेऊन अंदाजे रक्कमेची तरतुद केलेली आहे.

सोबतच्या तक्त्यात औषधांची रक्कम धरतांना गतवर्षातील मंजुर दराने संस्थानने जी औषधे खरेदी केलेले आहे त्या दरावर २० टक्के वाढ करुन केवळ हिशोबासाठी अंदाजे दर धरणेत आलेले आहे. प्रत्यक्षात निविदेमध्ये प्राप्त होणारे दर हे हयापेक्षा वेगळे येण्याची शक्यता आहे. दि.०१/०४/२०१५ ते दि.३१/०३/२०१६ (१२ महिने) या महिन्यांच्या कालावधीमध्ये औषधे खरेदीवर एकुण **रु.१८,४५,२७,६८६/-** इतका खर्च झालेला आहे.

**औषधे त्वरीत उपलब्ध होणेचे दृष्टीने दर वर्षीप्रमाणे खालील कार्यपध्दत अवलंबविण्यात यावी असे नम्र मत आहे-**

०१) औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदीकामी वर्तमान पत्रात ई-निविदेची जाहिरात देण्यात येऊन ई-निविदेव्दारे खरेदी करण्यात यावी.

०२) ई-निविदांची संपुर्ण प्रक्रिया पार पाडणेकामी एक समिती स्थापन करुन सदर समितीने वेळोवेळी केलेली कार्यवाही मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे अंतिम मान्यतेसाठी ठेवता येईल.

०३) औषधे खरेदी करताना विक्रेत्याऐवजी शक्य तेथे नामांकित थेट उत्पादक कंपन्यांना प्रथम प्राधान्य देऊन त्यांचेकडून औषधे घेण्यात यावीत. तसेच नामांकित कंपन्याचे दर स्विकारण्यात यावेत.

०४) ई-निविदा मागवितांना उत्पादक कंपन्यांची अट तशीच ठेवून सर्व उत्पादक कंपन्यांचे अधिकृत वितरक यांचेकडून वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात. तसेच थेट उत्पादक कंपन्यांना ई-मेल व्दारे जाहिरातीबाबत अवगत करणेत येऊन निविदा भरणेबाबत कळविण्यात यावे.

०५) प्रत्येक औषधांसाठी प्राप्त निविदाधारकांनी दिलेल्या कंपन्याचे दर तुलनात्मक दरांसाठी विचारात घेण्यात यावेत व त्यातील नामांकित कंपन्याचे व गतवर्षाचा संबंधित विभागाचा वापरताना आलेला अनुभव अडचणी, मालाचा दर्जा, पुरवठा वेळेवर न करणा-या कंपन्या व अधिकृत विक्रेते यांना शक्यतो टाळून दर स्विकारण्यात यावेत.

०६) ज्या औषधांसाठी/ साहित्यासाठी उत्पादक कंपन्याचे दर येणार नाहीत, त्यासाठी अधिकृत विक्रेत्यांकडून प्राप्त झालेल्या कंपन्यापैकी नामांकित कंपन्याचे दर स्विकारण्यात यावेत.

०७) सर्व प्राप्त ई-निविदा हया मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष उघडून घेण्यात येऊन तांत्रिक बाबींची छाननी करुन तद्नंतर पात्र निविदाधारकांच्या Commercial निविदा Online उघडून खरेदीबाबतची पुढील कार्यवाही करण्यात यावी.

०८) मागणी केलेल्या औषधांच्या साठयापैकी काही औषधांची अतिरीक्त मागणी करावयाची आवश्यकता भासल्यास ती वार्षिक दर करारानुसार वार्षिक दर करार मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात रु.२५,०००/- पर्यंत मा.व्यवस्थापन समितीचे मंजूर दराने खरेदी करावी.

०९) रु.२५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा.कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी/ माहितीस्तव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवता येईल.

१०) सदर खरेदीमध्ये औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदीकामीची स्वतंत्र ई-निविदा तर On Consignment Basis वरील Stent/ Valve/ Balloon/ Pacemaker/ Devices इत्यादी आयटमची स्वतंत्र ई-निविदा करावी लागेल.

<u>**विभागाचा अभिप्राय-**</u> सोबतच्या तक्त्यातील Annual Tender Req. 2016-17 या कॉलममध्ये केलेल्या मागणी नुसार औषधे, केमीकल्स, किरकोळ साहित्य, ऑपरेशन थिएटरसाठीचे सर्जिकल साहित्य इत्यादी खरेदीकामी अंदाजे एकुण रक्कम रु.४८,४१,००,१८३/- इतका खर्च अपेक्षित आहे. गतवर्षाचा अनुभव विचारात घेता प्रत्यक्षात एक वर्षात झालेला खर्च त्यापेक्षा कमी किंवा जास्त होऊ शकतो.

सन २०१३-१४ या वर्षाकरीता आवश्यक असणा-या वार्षिक औषधे खरेदीकामी मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने दि.२५/१०/२०१३ रोजीचे आदेशान्वये सदरचे खरेदीकामी प्राप्त होणा-या निविदांवर अंतीम निर्णय घेणेकरीता सरकारी सहा.वकील श्री.पी.पी.मोरे, जिल्हा शल्यचिकीत्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, वैद्यकिय संचालक, वैद्यकिय अधिक्षक यांची समिती गठीत करुन सदर समितीने औषधे खरेदीची प्रक्रिया पुर्ण करावी असे आदेश पारीत केले होते, त्यानुसार सन २०१३-१४ या वर्षाकरीता लागणारी औषधे खरेदी करण्यात आलेली आहे.

तसेच सन २०१५-१६ या वर्षाकरीता आवश्यक असणा-या वार्षिक औषधे खरेदीकामी मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने दि.१३/०३/२०१५ रोजीचे आदेशान्वये निविदाधारकांकडून निविदा मागवितांना प्रत्येक आयटमची MRP मागवून त्यानंतर खरेदीची कार्यवाही करणेस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सन २०१६-१७ या वर्षाकरीता लागणा-या औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदीकामी ई-निविदांची संपुर्ण प्रक्रिया पार पाडणेकामी एक समिती स्थापन करुन औषधे खरेदी केली गेली तर खरेदी प्रक्रियेमध्ये पारदर्शकता येईल जेणेकरुन संस्थानला त्याचा फायदा होईल असे नम्र मत आहे.

तरी वरीलप्रमाणे औषधे खरेदीकामी येणा-या अंदाजे रु.48,41,00,183.00 (अक्षरी रु. अठ्ठेचाळीस कोटी एकेचाळीस लाख एकशे त्र्याऐंशी मात्र) चे खर्चास, तसेच सदरचे खरेदीकामी ई-निविदांची संपुर्ण प्रक्रिया पार पाडणेकामी एक समिती स्थापन करुन औषधे खरेदीस व औषधे खरेदीची कार्यपध्दत अ.नं. १ ते १० चे प्रस्तावास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव दि.१९/०९/२०१६ रोजीच्या मा.व्यवस्थापन सामितीच्या सभेसमोर मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता, त्यावर निर्णय क्र.६५४ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०१६-१७ या वर्षाकरीता खरेदी करावयाची औषधे व सर्जिकल साहित्यांच्या यादीसह, सदरहू विषय रुग्णालय उपसमिती सभेसमोर सादर करण्यात यावा व उपसमितीच्या अभिप्रायासह प्रस्ताव व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले आहे.

तरी वरील ठरावानुसार उपरोक्त प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वार्षीक (सन २०१६-१७) या वर्षाकरीता लागणारे औषधे व सर्जिकल साहित्य खरेदी करणेकामी प्रस्तावात नमुद केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करणेत येऊन, रुग्णालय उपसमितीने खालीलप्रमाणे शिफारशी केल्या, त्या मान्य करण्यात आल्या.**

**बऱ्याचशा नामांकीत रुग्णालयांमध्ये जनरीक औषधे वापरली जातात. त्यामुळे संस्थान रुग्णालयांकरीता प्राधान्याने जनरीक औषधे खरेदी करावीत. काही जनरीक औषधांचा रुग्णांवर प्रभाव होत नाही, असे डॉक्टर्स सांगतात, अशी औषधे संबंधीत कंपनीकडून बदलून घेण्यात यावी व तरीही तक्रारी आल्यास सदरहू औषध निर्माती कंपनीस काळया यादीत टाकण्यात यावे.**

**औषध खरेदी प्रक्रिया राबविणेपुर्वी कोकीळा बेन हॉस्पिटल, नागपुर, रुबी हॉल क्लिनिक, पुणे, माऊट अबु, राजस्थान अशा नामांकित तसेच राज्य शासन/ भारतीय लष्करांच्या रुग्णालयांमध्ये वापरण्यात येणाऱ्या औषधांची व औषध खरेदी प्रक्रियेची माहिती संकलीत करुन, उपकार्यकारी अधिकारी, मुख्यलेखाधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, रुग्णालय व वैद्यकिय संचालक यांनी औषध खरेदी करणेकामी अटी/ शर्ती निश्चित करुन सभेसमोर प्रस्ताव सादर करावा. तोपर्यंत औषधांअभावी रुग्णांची गैरसोय होऊ नये, याकरीता सध्याचे मंजुर निम्नतम दराने औषधे खरेदी करण्यात यावीत.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०६ **श्री साईनाथ रुग्णालयातील Histo Pathology & Cytology या विभागाकरीता Slide Cabinet Iron (Capacity-25000) खरेदी करणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतूद:- १७ (२)**

**प्रास्ताविक:-** श्री साईनाथ रुग्णालयातील Histo Pathology & Cytology या विभागाने ०१ नग Slide Cabinet Iron (Capacity 25000) ची मागणी केलेली आहे.

Pathology विभागामध्ये Microscope व्दारे रुग्णांच्या रक्त लघवी इ. नमुन्यांचे परिक्षण केले जाते.सदर नमुने काचेच्या Slide वर घेऊन Microscope वर तपासले जातात. तपासणीनंतर Slide काही काळ MLC करीता किंवा रुग्णांच्या पुढील उपचाराच्या Followup करीता व्यवस्थित जतन करुन ठेवणे आवश्यक असते.सदर विभागात सध्या उपलब्ध असलेले ०१ नग Slide Cabinet Iron ची Slide क्षमता ५००० Slide इतकी आहे, परंतु रुग्णांच्यावाढत्या संख्येमुळे त्यांनी २५००० Slide क्षमता असलेल्या ०१ नग Slide Cabinet Iron ची मागणी केली आहे.

**मागणी:-**

१) श्री साईनाथ रुग्णालयातील Histo Pathology & Cytology या विभागांनी ०१ नग Slide Cabinet Iron (Capacity 25000) ची मागणी केलेली आहे.

२) उपरोक्त Slide Cabinet Iron (Capacity– 25000) खरेदीकामी M/s. Metro Steel Mfg.Co. यांनी दि.१५/०८/२०१६ रोजी दिलेल्या कोटेशननुसार अंदाजे रक्कम रु.५८,५००/- (अक्षरी रुपये– अठ्ठावन्न हजार पाचशे मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७- २(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र.भांखस– २०१४/ प्र.क्र.८२/ भाग–३/ उद्योग– ४, दि.३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.३ – रु.५ हजार ते रु.३ लाखापर्यंत असले तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु.३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु.३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** श्री साईनाथ रुग्णालयातील Histo Pathology & Cytology या विभागामध्ये सध्या उपलब्ध असलेले ०१ Slide Cabinet Iron ची Slide क्षमता ५००० Slide इतकी आहे, परंतु रुग्णांच्यावाढत्या संख्येमुळे त्यांनी २५००० Slide क्षमता असलेले नविन ०१ नग Slide Cabinet Iron ची मागणी केली आहे. त्यामुळे त्यांचे मागणीनुसार ०१ नग Slide Cabinet Iron (Capacity – 25000) विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करुन देता येतील, असे नम्र मत आहे.

तरी श्री साईनाथ रुग्णालयातील Histo Pathology & Cytology या विभागाकरिता ०१ नग Slide Cabinet Iron (Capacity– 25000) विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ५८,५००/- (अक्षरी रुपये – अठ्ठावन्न हजार पाचशे मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील Histo Pathology & Cytology या विभागाकरिता ०१ नग Slide Cabinet Iron (Capacity– 25000) विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.५८,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०७ **पॅथोलॉजी विभाग व रक्त पेढीतील विविध प्रकारच्या तपासणी करीता Reagent Rental Basis वर मशिन्स घेणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पीटलमधील पॅथोलॉजी विभागात रुग्णांच्या विविध प्रकारच्या रक्त, लघवी इ. तपासणी करीता विविध कंपन्याचे विविध मशिन्स वापरात आहे. पॅथोलॉजी विभागात वापरले जाणारे मशिन्सची माहीती खालीलप्रमाणे-

| Sr. No | Machine Name | Purchase Cost | Purchase Year | Depreciated Cost |
|---|---|---|---|---|
| 1 | Fully Automatic Clinical Bio- Chemistry Analyzer (Model-Konelab 20i) | 16,50,000.00 | 2005 | 69687.97 |
| | Fully Automatic Clinical Bio- Chemistry Analyzer (Model- Nanolab240) | 10,35,500.00 Under Warranty | 2013 | 436851.60 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | Semi Automatic Clinical Bio- Chemistry Analyzer (Model- Chem 7) | 2,00,000.00 | 2005 | 8447.03 |
| 2 | Blood Gas Analyzer (Model- Cobas b221) | 9,56,250.00 | 2012 | 302563.50 |
| | Blood Gas Analyzer (Model- Medica EasyStat) | 4,70,000.00 | 2008 | 47053.07 |
| 3 | Blood Cell Counter (Model- Erma PCE 210 - 3Part) - 2 Nos | 5,50,000.00<br>3,30,000.00 | 2005<br>2012 | 23229.32<br>104414.10 |
| | Blood Cell Counter (Model- Erma Sysmax XS1000i- 5Part ) | 14,74,375.00 | 2012 | 466504.50 |
| 4 | Electrolyte Analyzer (Model- AVL 9180) | 1,56,000.00 | 2008 | 15617.00 |
| 5 | Immunoassay Analyzer (Model- Vidas PC) | 15,50,000.00 | 2008 | 155175.00 |

वरील मशिन्सवर रुग्णांच्या विविध प्रकारच्या रक्त व लघवी इ. तपासणी करीता लागणारे Reagent/ Chemicals हे मोनोपॉली या प्रकारचे असुन ते पुरवठाधारक कंपनीकडुनच खरेदी केले जातात. तसेच वरील सर्व मशिन्सचे सबंधित कंपनीकडे दुरूस्तीव देखभालीकरीता वार्षीक सर्व्हीस कॉट्रॅक्टकरणेत येत आहे.

त्यामुळे रुग्णांच्या विविध प्रकारच्या रक्त व लघवी इ. तपासणीकरीता प्रती चाचणीस येणारा खर्चात खालील किंमतीचा समावेश होतो.

1. तपासणी करीता लागणारे Reagent / Chemicals किंमत,
2. मशिन्सला नियमित लागणारे Consumable ची किंमत,
3. दुरूस्तीव देखभालीकरीता येणारा खर्च
4. मशिन्सची किंमत

सध्या विविध रुग्णालयांमध्ये उपरोक्त प्रमाणे मशिन्स खरेदी न करता Reagent Rental पध्दतीने मशिन्स वापरले जातात. यामध्ये ज्या पुरवठादार कंपनीशी करार करुन रुग्णांच्या विविध प्रकारच्या रक्त व लघवी इ. तपासणीचे प्रति चाचणी दर निश्चीत करण्यात आले आहेत ती कंपनी रुग्णालयात प्रति दिवशी होणाऱ्या चाचणी नुसार एक किंवा दोन मशिन्स वापरणेकरीता देतात. तसेच त्या मशिन्सचा दुरूस्ती व देखभालीचा खर्च, Reagent/ Chemicals चा पुरवठा आणि Consumables चा पुरवठा त्यांचे खर्चाने करतात. रुग्णालयाला कंपनीस प्रति चाचणी दर निश्चीत केलेप्रमाणे दर महिन्याला संपूर्णमहिन्याच्या कालावधीत केले जाणाऱ्या एकूण चाचणीचे बील अदा करावयाचे असते.

उपरोक्त मशिन्स करीता आजपावेतो वापरणेत येणारे Reagent/ Chemicals खरेदी करणेकरीता व दुरूस्तीव देखभालीकरीता आलेला खर्च आणि Reagent Rental करीता विविध पुरवठाधारकांनी दिलेले दर यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

**A) Auto Blood Gas Analyser**

| Sr. No. | Company Data | Current Load (Samples/day) & Expenses | M/s. Roche Diagnostics, Mumbai | M/s. DHR Holding Pvt. Ltd., Mumbai |
|---|---|---|---|---|
| 1 | Parameters | ABG + Electrolytes + Metabolites + Co-Oximetry | | |
| 2 | Machines Available/ to be provided | Two Machines | Roche Cobas b 221 (6) | Radiometer ABL 800 Basic |
| | Make/Model | Roche Cobas b 221 (6) and Medica Easy Stat | One New Machine will be placed, Maintenance with Spares and consumables will be done by Supplier | One New Machine will be placed, Maintenance with Spares and consumables will be done by Supplier |
| 3 | Monthly Rates/Sample Qty | | Rs. 1,42,500 for 1500 samples/month | Approx. Rs. 174094/- for 1238 samples/month |
| 4 | Rates for additional Samples | | Rs.95/sample | Rs. 125 + 12.5 % Tax = Rs.140.625/Sample |
| 5 | Calculations | | | 1238 x 140.625= |
| | No. of Samples/ month | 1238 | | 174094/- |
| | Samples /day | 41.27 | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6 | Cost/Test in Rs. | 214.91 | 95 | 140.625 |
| 7 | Total Expenses/month | 266054 | 142500 | 1238 x 140.625= 174094 |
| 8 | Total Expenses/ year | 3192648 | 142500 x 12 = 1704000 | 174094 x 12 = 2089125 |
| | | 3192648 | 1704000 | 2089125 |

## B) Blood Cell counter- 3 Part and 5 Part

| Sr. No. | Company Data | Current Load (Samples/day) & Expenses | M/s. AGD Biomedicals Pvt. Ltd. Mumbai | M/s. Yucca Diagnostics, Kolhapur | M/s. Pioneer Enterprisers, Ahmednagar |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Machine provided | Three Machines | | | |
| | Make/Model | Erma PCE-210 (3 Part)- 2 Nos; Sysmax 1000i (5 Part) - 1 no. | Erma PCE-210 (3 Part) | Ycell 2400 plus (60 tests/Hr.) (3 Part) | Make: Nihon Kohden; Model: MEK 7300 (5 Part) |
| 2 | Monthly Rates/Sample Qty | 132273.5 | 72800 for 125 Samples/day | 15 reagent Sets/year= 1.25 Reagent Set/ month =Rs.13450 x 1.25= Rs. 16812.50 (Incl. Probe cleaner & EZ Cleaner) | Min. Reagent Purchase for Rs. 95005 |
| 3 | Rates for additional Samples | 60.87 | 19.40 | 16812.5/2173= Rs.7.73 | 95005/2173= Rs. 43.73 |
| 4 | Calculations | | | 15 Reagent Sets/Year | |
| | Samples/month | 2173 | 3750 | | |
| | Samples/day | 72.43 | 125 | | |
| 5 | Cost/Test in Rs. | 60.87 | 19.40 | 7.73 | 43.73 |
| 6 | Total Expenses/month | 132273.5 | 72800 | 16812.5 | 95005+ Taxes |
| 7 | Total Expenses/year | 1587282 | 873600 | 252187.5 | 1140060 + Taxes |
| | | 1587282 | 873600 | 252188 | 1140060 + Taxes |

## C) Fully Auto Bio-chemistry Analyzer

| | | Shri Saibaba Hospital, Shirdi | Proposal from Various Suppliers | | |
|---|---|---|---|---|---|
| Sr. No | Company Data | Current Load (Samples/day) & Expenses | M/s.Yucca Diagnostics, Kolhapur | M/s.Siddhi Medical Distributors, Aurangabad | M/s. Transasia Biomedicals, Ltd., Mumbai |
| A | Parameters | Bio-Chemistry | | | |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| B | Machine provided | Three Machines | | | | One New Machine will be placed, Maintenance with Spares and consumables will be done by Supplier | | No machine provided | | EM 200 machine will be placed free of cost as long as monthly reagent purchase of Rs.90,000/- is done. | | |
| | Make/Model | Thermo Konelab 20i-1 Nos., Nanolab 240-1No.; Semi auto Erba Chem-7- 1No. | | | | Ylab 420 Fully Auto Analyzer with Laundry System; approx. Cost Rs. 13.5 Lakhs | | Hospital Machine will be used (Trivitron) | | EM 200 (200 tests/Hr.) Approx. cost Rs. 9,00,000/- | | |
| C | Calculations | | | | | 350 Tests /Hr | Open system | | | | | |
| D | Test | Test/ Month | Cost/ Test | Total Exp./ Month | Cost/ml (Thermo/Erba) | Cost/ Test | Cost/ml (Yucca) | Cost/Test | Cost/ ml (Trivitron) | Cost/ Test | Cost/ ml (System Pack/ Erba) | Cost/ Month =L*D |
| 1 | Uric Acid | 92 | 11.41 | 1045.10 | 26.34 | | 15 | | 11 | 5.38 | | 492.81 |
| 2 | Sr.Calcium | 30 | 68.96 | 2096.36 | 32.5 | | | | 10.6 | 4 | | 121.60 |
| 3 | CK-MB | 76 | 104.78 | 7983.87 | 205.31 (Thermo) ; 104.95 (Erba) | | 80 | | | 31.5 | | 2400.30 |
| 4 | Amylase | 9 | 358.80 | 3229.23 | 155 (Thermo); 65.611 (Erba) | | 50 | | 58.88 | 25.55 | | 229.95 |
| 5 | Total Protein | 34 | 42.75 | 1462.09 | 11.66 | | 2.5 | | 2.5 | 0.52 | | 17.78 |
| 6 | CSF Protein | 67 | 30.88 | 2074.95 | 32.5 (Erba) | | 6 | | | | | 0.00 |
| 7 | Glucose | 2477 | 2.71 | 6706.96 | 7.66 (Thermo); 0.77/0.87 (Erba) | | 1 | | 1.288 | 2 | | 4954.00 |
| 8 | Sr.Creatinine | 1717 | 6.77 | 11616.63 | 13.19 | | 3 | | 3.5 | 1.81 | | 3107.41 |
| 9 | Sr.Bilirubin | 1067 | 9.90 | 10556.24 | 29.82/21.21 | | 5 | | 4.1 | 2.74 | | 2922.48 |
| 10 | B. Urea | 1409 | 11.71 | 16501.34 | 19.66 | | 8 | | 9.2 | 4.36 | | 6142.37 |
| 11 | SGOT | 1069 | 8.10 | 8655.78 | 11.16(Erba); 34.37(Erba) | | 8 | | 10.3 | 3.81 | | 4073.65 |
| 12 | SGPT | 1066 | 7.61 | 8106.39 | 11.16(Erba); 34.37(Erba) | | 8 | | 10.3 | 3.81 | | 4059.94 |
| 13 | Sr.Alk. Phosphet | 1066 | 4.86 | 5181.39 | 68.225 (Erba) | | 8 | | 14.26 | 4.42 | | 4710.84 |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 14 | Sr.Chole. | 88 | 23.93 | 2101.49 | 22.29 | | 7 | | 7.3 | 3.52 | | 309.06 |
| 15 | Triglycerides | 86 | 35.39 | 3058.04 | 37.92 | | 20 | | 17.71 | 7.91 | | 683.42 |
| 16 | HDL | 97 | 23.93 | 2321.30 | 129.375 (Erba) | | 55 | | 58 | 34.09 | | 3306.73 |
| 17 | Sr.Albumin | 64 | 18.73 | 1194.93 | 15 (Thermo); 1.44 (Erba) | | 2.5 | | 2.5 | 0.92 | | 58.70 |
| 18 | ADA | 1 | 3768.96 | 3768.96 | 144 | | | | | | | 0.00 |
| 19 | Phosphorous | 5 | 297.98 | 1489.88 | | | 13 | | 7.5 | 3.02 | | 15.10 |
| | | | | | | | | | | XL Multical X6 | | 1900 |
| | | | | | | | | | | Erba Norm X 2 | | 375.83 |
| | | | | | | | | | | Erba Path X 2 | | 413.33 |
| | | | | Cost/ Month | 99150.92 | | | | | Cost/Month | | 40295.29 |
| | | | | Cost/year | 1189811.08 | | | | | Cost/year | | 483543.5 |
| | | | | | | | | | | | | |

उपरोक्त माहीतीवरुन असे दिसून येते की, सध्या रुग्णांच्या विविध तपासणी करणेकरीता विविध मशिन्स खरेदी करून, त्या मशिन्स वापरणे करीता खरेदी करणेत आलेल्या Consumables आणि Reagent चा व मशिन्सचे दुरूस्तीव देखभालीसाठी आजपावेतो झालेला खर्च असा एकत्रित खर्च आणि विविध पुरवठाधारकांनी प्रति महिना किंवा प्रति वर्ष उपरोक्त तक्त्यात दिल्यानुसार प्रति चाचणी तपासणीचे दिलेले दर यांचा तुलनात्मक विचार करता संस्थानने मशिन्स खरेदी करुन देखील सदर मशिन्स वापरणेकरीता झालेला खर्च खुपच जास्त आहे.

उपरोक्त प्रति सॅम्पल/ चाचणी करणेकरीता दिलेले दरांमध्ये पुरवठाधारक आपले मागणी व आवश्यकतेप्रमाणे योग्य ते मशिन पॅथोलॉजी व रक्तपेढी येथे स्वखर्चाने ठेवणार असून मशिन्सचा स्पेअर पार्टस् व कन्झ्युमेबल्ससह दुरूस्तीव देखभाल करणार आहेत.

त्यानुसार सध्या उपलब्ध असलेल्या मशिन्स करीता विविध पुरवठाधारकां बरोबर चर्चा करून प्रति सॅम्पल तपासणीचे दर किंवा त्याकरीता लागणाऱ्या Reagent चे दर निश्चित करता येतील.

तसेच ज्या मशिन्सची खरेदी नजिकच्या कालावधीत झाली असून ते मशिन्स आणखी काही वर्षे वापरता येतील अशा मशिन्सकरीता Reagent Rental पध्दतीने करार करताना त्या मशिन्सच्या पुरवठाधारकां बरोबर चर्चा करून प्रति सॅम्पल/ चाचणी करीता दर आणखी कमी करून घेता येतील.

तसेच ज्या मशिन्सचे वापरायोग्य आयुष्य संपत आले आहे अशा मशिन्सकरीता नवीन Reagent Rental पध्दतीने करार करता येईल, ज्यामध्ये नवीन मशिन्स देखील वापरण्याकरीता मागविता येतील.

Reagent Rental Basis नुसार विविध मशिन्स वापरल्यास खालील प्रमाणे फायदेशीर असेल,

1. Helps acquire the latest technology
2. Helps avoid huge capital investment
3. Reduced costs per test with advanced diagnostic equipment
4. When the contract ends, the equipment can be replaced with a new model
5. Technology can be updated more frequently as there is no huge cost involved
6. The costs of reagents, consumables and service are included in the agreement

त्यामुळे संस्थानच्या दोन्ही रुग्णालयांतील पॅथोलॉजी व रक्तपेढी येथे रुग्णांच्या विविध तपासणी करणेकरीता विविध मशिन्स Reagent Rental पध्दतीने ठेवणे अधिक किफायतशीर व योग्य राहील असे मत आहे.

उपरोक्त Reagent Rental Basis नुसार रुग्णांच्या विविध तपासणी करणेची पध्दत AIIMS (All India Institute of Medical Sciences, Jodhpur), PT. B.D. SHARMA UNIVERSITY OF

HEALTH SCIENCES, ROHTAK आणि HLL Lifecare Limited, Kerala, या सारख्या शासकिय रुग्णालयामध्ये कार्यान्वीत आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रूग्णालयामधील पॅथोलॉजी विभाग आणि श्री साईनाथ रक्तपेढी येथील रुग्णांच्या विविध तपासणी करणे करीता मशिन्स Reagent Rental Basis पध्दतीने वापरणे करीता उपरोक्त प्रस्तावावर योग्य तो आदेश होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रूग्णालयामधील पॅथोलॉजी विभाग आणि श्री साईनाथ रक्तपेढी येथील रुग्णांच्या विविध तपासणी करणेकरीता मशिन्स Reagent Rental Basis पध्दतीने घेणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०८ **सन २०१५-१६ या वार्षिक खरेदी केलेल्या औषधे/ सर्जिकल साहित्याच्या आलेल्या तक्रारीबाबत.**

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड/ विभागासाठी वार्षिक औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीकामी दि.३०/०१/२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय क्र.२६ अन्वये अंदाजे रक्कम रु.५५,७३,३६,३९२/- चे खर्चास मान्यता मिळालेली असून त्यास मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाची सिव्हील ॲप्लीकेशन नंबर ३४९५ दि.१३/०३/२०१५ अन्वये ई-निविदा मागवून खरेदीस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दि.२८/०७/२०१५ व दि.१३/११/२०१५ अन्वये एकुण रक्कम रु.३३,१२,२८,४५५/- इतक्या रक्कमेचे पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत.

परंतु त्यामधील काही औषधे/ सर्जिकल साहित्याची वापर करणारे डॉक्टर यांनी तक्रार केली आहे. तक्रारीची कारणे डी.पी.मध्ये नमुद केलेली असून त्याचा तक्ता सोबत पान नं.१ ते ४ सादर केलेला आहे.

सोबतच्या तक्त्यातील औषधांचे तक्रारीबाबत पुरवठाधारकांनाई-मेल व दुरध्वनीव्दारे सांगण्यात आले होते. त्यानुसार कंपनीचे प्रतिनिधी यांनी शिर्डी येथे येऊन शंका निरसन करण्यासाठी डॉक्टरांना भेटले, परंतु श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील डॉक्टर सदर औषधांना Result मिळत नसल्यामुळे वापरण्यास तयार नाहीत. तसेच श्री साईनाथ रुग्णालयातील Surgical Ward No.1 यांनी दि.२५/०४/२०१६ रोजीचे Drug Complaint Slip व्दारे पुढीलप्रमाणे Recommendation दिलेले आहे- “Kindly refuse all type of Jackson Products” त्यामुळे रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून तक्रार असलेल्या मटेरीयलकरीता ज्यांनी वार्षिक औषधे खरेदीमध्ये ई-निविदा भरलेली होती, त्याचा तुलनात्मक तक्ता वापरणा-या डॉक्टरांना मिटींगमध्ये समक्ष बोलवून त्यांना जी औषधे/ सर्जिकल साहित्य पाहीजे आहेत ते खरेदी करुन देण्यात यावीत जेणेकरुन रुग्णांना मटेरीयल वापरण्यात येऊन रुग्णांची गैरसोय दुर होईल

सोबतच्या तक्त्यातील तक्रार असलेले कंपनीचे मटेरीयल पुढील सन २०१६-१७ या वार्षिक औषधे खरेदी करताना विचारात घेण्यात येऊ नयेत. जेणेकरुन रुग्णांना चांगल्या प्रकारचे मटेरीयल मिळू शकेल.

तरी तक्रार आलेल्या औषधांच्या बदल्यात तुलनात्मक तक्त्यातील दुसऱ्या कंपनीचे औषधे घेण्यास व तक्रार आलेल्या औषधांच्या कंपन्यांना या वर्षात न घेण्याच्या प्रस्तावावर पुढील निर्णय होणेकामी सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१५-१६ या वार्षिक खरेदी केलेल्या ज्या कंपनीच्या औषधे/ सर्जिकल साहित्याबाबत तक्रारी आलेल्या आहेत, त्यांना त्याबाबत लेखी स्वरुपात कळविणेत यावे, व सदरहू कंपनीचा संस्थान खरेदी प्रक्रियेमध्ये काळया यादीत समावेश करणेसाठीच्या पत्राचा मसुदा समिती सदस्य ॲडमोहन जयकर यांचेकडून मंजुर करुन घेण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०९ **शिर्डी पोलीस स्टेशन गु.र.नं.६४/२०१६ भा.द.वि.क. ४०८, ४०९ या गुन्हयाबाबत स्थानिक गुन्हे शाखा, अहमदनगर यांचे मार्फत सुरु असलेल्या तपासाकामी संस्थानचे वतीने माहिती व कायदेशीर कागदपत्रे पुरविणेकामी ॲडव्हाकेटची नेमणुक करणेसंदर्भात प्रस्ताव हॉस्पिटल उपसमितीचे सभेत फेर-विचारार्थ सादर करणेबाबत.**

संस्थान रुग्णालयातील निलंबित कार्डीओलॉजिस्ट डॉक्टर्स डॉ.हरिष बजाज व डॉ.गौरव वर्मा यांचे वर संस्थानच्या वतीने शिर्डी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ६४/२०१६ प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. सदर गुन्ह्याचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, अहमदनगर यांचेमार्फत सध्या सुरु आहे सदर गुन्ह्याचे

तपासाकामी स्थानिक गुन्हे शाखा, अहमदनगर यांना संस्थानच्या वतीने कायदेशीर बाबी, कागदपत्रे, माहिती व तपासाचे दृष्टीने इतर पूर्तता करणे तसेच संस्थानची बाजू मांडणेकामी याच केस संदर्भात कामगार विभागामार्फत सुरु असलेल्या चौकशीमध्ये संस्थानचे वतीने सादरकर्ते अधिकारी म्हंणून कामकाज पाहत असलेले ॲड.श्री.सी.जे. बोरुडे, अहमदनगर यांची नेमणूक करणेस व त्यांना सदरचे कामकाजासाठी प्रत्येक तारखेला एकत्रित रु.३५००/- मात्र मानधन अदा करणेकास तत्कालीन त्रिसदस्य समितीची चक्रीय पध्दतीने मान्यता मिळालेली होती.

कामगार विभागामर्फत दोन्ही डॉक्टरांच्या गैरवर्तनाबाबत खाते चौकशी अधिकारी श्री. जे. एल. देशपांडे सेवा निवृत्तन्यायाधीश यांचेमार्फत खाते चौकशी चालू असून यातील सादरकर्ते अधिकारी म्हणून ॲड. श्री. सी. जे. बोरुडे यांना प्रत्येक तारखेस सर्व समावेशक खर्चापोटी रु. ५०००/- मानधन अदा करण्यात येत आहे.

त्यानुसार संस्थानच्यावतीने वरील स्थानिका गुन्हे शाखा यांचेमाफ्रत चालू असलेल्या चौकशीचे कामासंबंधात तत्कालीन मा.त्रिसदस्यीय समितीने चक्रीय पध्दतीने दिलेल्या मान्यतेने जा. क्र. एसएसएस/एसएसबीएच/१४५/२०१६, दि. ०६/०८/२०१६ रोजींच्या आदेशान्वये ॲड.सी.जे. बोरुडे यांची नेमणूक व प्रत्येक तारखेस रु.३५००/- मानधन अदा करणेबाबतचा आदेश पारीत करण्यात आलेला होतो. याबाबत दि. १६/०८/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थान समितीचे सभेत उपरोक्त चक्रीय पध्दतीने मिळालेल्या मान्यतेची नोंद इतिवृत्तात घेणेसाठी विषय ठेवण्यात आला होता. सदर सभेत या विषयाबाबत पुढीलप्रमाणे निर्णय झाला. " यावर सविस्तर चर्चा होऊन शिर्डी पोलीस स्टेशन गु.र.नं.६४/२०१६ भा.द.वि.क.४०८, ४०९ या गुन्हयाबाबत स्थानिक गुन्हे शाखा, अहमदनगर यांचेमार्फत सुरु असलेल्या तपासाकामी संस्थानचे वतीने माहिती व कायदेशीर कागदपत्रे पुरविणेकामी ॲडव्होकेटची नेमणूक करणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास तत्कालीन त्रीसदस्य समिती अध्यक्ष व सदस्य यांची चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली होती. परंतु तरीही सदरहू प्रस्ताव फेरविचारार्थ हॉस्पिटल उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा," असा निर्णय झालेला आहे.

तरी मा.व्यवस्थापन समितीचे दि. १६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णयानुसार सदर प्रस्ताव हॉस्पिटल उपसमितीचे सभेपुढे फेर विचारार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखा, अहमदनगर यांचे मार्फत सुरु असलेल्या तपासाकामी संस्थानचे वतीने माहिती व कायदेशीर कागदपत्रे पुरविणेकामी ॲडव्हाकेटची नेमणुक करणेस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**१०. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लागणारी औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीकामी प्राप्त दरपत्रक उघडून निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे दैनंदिन वापरासाठी सन २०१५–१६ या वर्षाकरिता लागणा-या औषधे, सर्जिकल साहित्य खरेदीकामी दि.३०/०१/२०१५ रोजीचे मा. त्रि सदस्य समिती सभा निर्णय क्र.२६ अन्वये एकूण रुक्कम रु.५५७३३६३९२/- इतक्या रक्कमेस मान्यता मिळालेली होती तसेच सदर प्रस्तावास मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची सिव्हिल ॲप्लीकेशन नंबर ३४९५ दि.१३/०३/२०१५ अन्वये ई निविदा मागवून खरेदीस मान्यता मिळालेली होती

त्यानूसार वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात येऊन विहीत पध्दतीने (Part – A) करीता पहिल्या टप्प्यात एकूण 1238 आयटमकरिता एकूण रक्कम रु.१६७५७२९४७.४४ च्या व (Part – B) On Consignment Basis करिता प्राप्त दरानुसार अंदाजे रु४०५१४२८७/- इतका खर्च अपेक्षित धरुन दि.२८/०७/२०१५ रोजी एकूण रु. २०८०८७२३४.४४ इतक्या रक्कमेचा पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

त्यांनतर प्रायोगक तत्वाचा वापर करण्यात येऊन व DMER चे कार्यपध्दतीनुसार दुसऱ्या टप्प्यात एकूण Part A ८२० आयटमसाठी करिता एकूण रक्कम रु.१६३६५५५०८.२७ तसेच Part B करिता १ आयटमकरीता प्राप्त दराने अंदाजे रु.३,२८,८६०/- इतका खर्च अपेक्षित धरुन रु.दि.१३/११/२०१५ रोजी एकूण रु.१६६६८४३६८.२७ इतक्या रक्कमेचा पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

तर उर्वरीत औषधे, सर्जिकल साहित्य तसेच On Consignment Basis वरील साहित्यामध्ये काही औषधांकरीता निविदाधारकांनी दर दिलेले नव्हते तर काही ठिकाणी डॉक्टरांनी फेर निविदा काढण्याची शिफारस केलेली असल्यामुळे एकूण ५२२ औषधे सर्जिकल साहित्यासाठी फेर निविदा काढण्याची शिफारस केलेली आहे. त्यासाठी अंदाजे रक्कम रु.३६८६६३८२/- इतका खर्च येणार आहे.

तेंव्हा वरीलप्रमाणे (Part – A) मध्ये ५०३ औषधे, सर्जिकल साहित्यासाठी तर (Part – B) मध्ये १९ On Consignment Basis वरील साहित्या करिता वर्तमान पत्रात जाहिरात देऊन फेर ई निविदा मागविण्यात आलेल्या होत्या.

उपरोक्तप्रमाणे PART "A" खरेदीकामी १८ निविदाधारकांनी दिलेल्या १८ तांत्रीक सिलबंद निविदाव PART "B" खरेदीकामी ८ निविदाधारकांनी दिलेल्या ८ तांत्रीक सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या होत्या. सदर २६ तांत्रीक सिलबंद निविदा दि.१४/०४/२०१६ रोजी समक्ष उघडण्यात आलेल्या असून PART "A" खरेदीकामी पात्र असलेल्या १५ ऑनलाईन कमर्शियल निविदा व PART "B" करीता पात्र असलेल्या ७ ऑनलाईन कमर्शियल निविदा अशा एकुण २२ ऑनलाईन कमर्शियल ई-निविदा दि.१५/०७/२०१६ रोजी समक्ष उघडण्यात आलेल्या आहेत.

PART "A" खरेदीमध्ये एकूण ५०३ आयटम पैकी ३५१ आयटम करीता एकही निविदा धारकाचे दर प्राप्त झालेले नाही, ९९ आयटम करीता एका निविदा धारकाचे दर प्राप्त झालेले आहे, २८ आयटम करीता दोन निविदा धारकाचे दर प्राप्त झालेले आहे तर २५ आयटम करीता तीन किंवा तीन पेक्षा जास्त निविदा धारकाचे दर प्राप्त झालेले आहेत परंतू त्यामध्ये M/s. Austin Healthcare, Pune व M/s. Kabra Medicals, Jalgaon यांनी Make व Brand Name दिलेले नाहीत.

PART "B" खरेदीमध्ये एकूण १९ आयटम पैकी ०६ आयटम करीता एकही निविदा धारकाचे दर प्राप्त झालेले नाही, ०५ आयटम करीता एका किंवा दोन निविदा धारकाचे दर प्राप्त झालेले आहे तर ५ आयटम करीता M/s. Boston Scientific India Pvt.Ltd.,Gurgaon यांचेच दर प्राप्त झालेले आहेत.

सदर फेर निविदेमध्ये सर्व औषधे/ सर्जिकल साहित्याकरीता दर प्राप्त न झाल्यामुळे तसेच सन २०१६-२०१७ या वर्षातील वार्षिक औषधे/ सर्जिकल साहित्य उपलब्ध होण्यास तीन ते चार महिन्याचा कालावधी लागणार असल्यामुळे व रुग्णालयात सदर औषधे/ सर्जिकल साहित्याची तातडीची गरज पाहता सध्या आवश्यक असणा-या सोबतच्या यादीतील ७३ औषधे/ सर्जिकल साहित्याकरीता शासन निर्णय "शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्रभांखस– २०१४/ प्र.क्र.८२/ भाग– ३/ उद्योग– ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ परिच्छेद ३.२.३ अन्वये उपरोक्त खरेदी ही रु. ५०००/- ते रु. ३०००००/- पर्यंत असलेली वस्तू कोटेशन (दरपत्रक) मागवून खरेदी करता येईल." या नुसार सोबतच्या यादीतील ७३ औषधे/ सर्जिकल साहित्याकरीता रक्कम रु.३०००००/- पर्यंत स्वतंत्र कोटेशन (दरपत्रक) मागवून आवश्यकतेनुसार दोन टप्यात खरेदी करता येतील.

तरी सोबतच्या यादीतील ७३ औषधे/ सर्जिकल साहित्य विहीत पध्दतीने कोटेशन (दरपत्रक) मागवून खरेदी करणेस तसेच सदरहू अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांना ई मेल द्वारे कोटेशन देणेबाबत अवगत करणेस दि.११/०८/२०१६ रोजीचे मंजूर टिप्पणीन्वये मान्यता मिळालेली होती.

त्यानूसार इकडील पत्र क्र. १३०३ दि.२०/०९/२०१६ अन्वये ५९ अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांचेकडून दि. २८/०९/२०१६ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते, तसेच सदर कोटेशन देणेबाबत ४०० अधिकृत विक्रेते/ पुरवठा धारकांना दि.२३/०९/२०१६ रोजी ई–मेलद्वारे कोटेशन देणेबाबत सूचित करण्यात आले होते.

त्यास अनूसरुन एकूण ७३ औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदीकामी काही ठिकाणी स्वतंत्र व काही एकत्रित कोटेशन प्राप्त झालेले आहेत. त्यातील काही कोटेशन वरती ते कशाकरीता आहे याचा उल्लेख नसल्यामुळे प्राप्त सर्व कोटेशन विचारात घ्यावे जेणेकरुन तुलनात्मक तक्ता तयार करण्याच्या दृष्टीने फायदा होऊ शकेल असे नम्र मत आहे.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली सिलबंद कोटेशन्स आजचे रुग्णालय उपसमिती सभेसमोर, उपस्थित कोटेशनधारकांसमक्ष उघडणेत आले. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Name of Item | Qty. | Make | Brand Name | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| **1** | **CHLORHEXIDEN MOUTH WASH 50ML** | **500** | | | |
| 1 | Shree Jhalani Agencies, Ahmednagar | 500 | Anglofrench | Fresh 24 | 7125.00 |
| 2 | Trimurti Agencies, Nashik | 500 | GER | | 9575.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | Gayatri Medical Agency, Aurangabad | 500 | Torque Pharma | Sensosil | 11000.00 |
| 4 | Hem Agencies, Kopargaon | 500 | Leeford | Geofresh | 13356.00 |
| 5 | Anant Agencies, Kolhapur | 500 | Vishal | Plakil | 14000.00 |
| 6 | Sai Agency, Kopargaon | 500 | Leeford | Geofresh | 16006.00 |
| 7 | Shrinath Medicos, Kopargaon | 500 | Leeford | Geofresh | 16536.00 |
| 8 | Kabra Medical , Jalgaon | 500 | | | 18240.00 |
| 9 | Sanjay Agencies, Ahmednagarr | 500 | Dales | Hexidale | 18705.00 |
| 10 | Shree Shubham Distributors, Jalgaon | 500 | | Cholrhexidine Mouth Wash | 21375.00 |
| 11 | Aum Enterprises, Akola | 500 | Dr.Morepen | | 22500.00 |
| 12 | Hem Agencies, Kopargaon | 500 | Abbott | Orahex Plus | 23712.20 |
| 13 | Sai Agency, Kopargaon | 500 | Abbott | Orahex Plus | 24507.20 |
| 14 | Shrinath Medicos, Kopargaon | 500 | Abbott | Orahex Plus | 24692.70 |
| 15 | Kabra Medical , Jalgaon | 500 | | | 38445.00 |
| 16 | Prasad Medicos, Jalgaon | 500 | | | 40750.00 |
| 17 | Kabra Medical , Jalgaon | 500 | | | 43500.00 |
| 18 | Shree Shubham Distributors, Jalgaon | 500 | | Norhexidine Mouth Wash | 49500.00 |
| 19 | Shree Shubham Distributors, Jalgaon | 500 | | Cholrhexidine Mouth Wash BP | 52312.50 |
| 20 | Shree Shubham Distributors, Jalgaon | 500 | | Cholrhexidine + Citrinide | 84375.00 |
| 21 | Anant Agencies, Kolhapur | 500 | Vishal | Plakil | 95000.00 |
| **2** | **DISPERSIBLE GLASS (SMALL SIZE)** | **200** | | | |
| **3** | **AMALGAM POWDER** | **10** | | | |
| 1 | Anant Agencies, Kolhapur | 10 | DPI | Silver Alloy Fine Gram 30 gm | 17500.00 |
| 2 | Anant Agencies, Kolhapur | 10 | Dentsply | Silver Alloy 30gm (Dispersalloy) | 22000.00 |
| **4** | **MIRACLE MIX** | **5** | | | |
| 1 | Anant Agencies, Kolhapur | 5 | DPI | | 8700.00 |
| 2 | Mahalaxmi Care & Cure, Kolhapur | 5 | DPI | | 9200.00 |
| 3 | Anant Agencies, Kolhapur | 5 | GC Guji | | 20000.00 |
| 4 | Mahalaxmi Care & Cure, Kolhapur | 5 | GC Guji | | 20500.00 |
| 5 | Om sai Agencies, Kolhapur | 5 | GC Guji | | 21000.00 |
| **5** | **CROWN CUTTING BURRS SET (1SET = 14 PICES)** | **5** | | | |
| 1 | Anant Agencies, Kolhapur | 5 | Pivo | | 7700.00 |
| 2 | Mahalaxmi Care & Cure, Kolhapur | 5 | Pivo | | 10000.00 |
| 3 | Mahalaxmi Care & Cure, Kolhapur | 5 | Dentsply | | 25000.00 |
| 4 | Omsai Agencies, Kolhapur | 5 | Dentsply | | 25125.00 |
| **6** | **CLEANING AND LUBRICATION SPRAY (PAN = AIR SPRAY)** | **3** | | | |
| 1 | Anant Agencies, Kolhapur | 3 | Anant | | 1200.00 |
| 2 | Critical Care System, Pune | 3 | B.Braun | | 23835.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | Seva Medical Equipment Pvt.Ltd., Pune | 3 | B.Braun | | 26901.00 |
| 4 | Medevice Healthcare LLP, Pune | 3 | B.Braun | | 25536.00 |
| **7** | **INJ. HYOSCINE N-BUTYLBROMIDE 20 MG/ML** | **500** | | | |
| 1 | Kabra Medical, Jalgaon | 500 | | | 4475.00 |
| 2 | Hem Agencies, Kopargaon | 500 | Bohringer | Buscogast | 4478.50 |
| 3 | Sai Agency, Kopargaon | 500 | Bohringer | Buscogast | 4664.00 |
| 4 | Shrinath Medicos, Kopargaon | 500 | Bohringer | Buscogast | 4770.00 |
| **8** | **INJ. SODIUM CHLORIDE 5.00GM + SODIUM ACETATE 0.10GM + POTTASIUM CHLORIDE 0.15GM + DISODIUM HYDROGEN PHOSPHATE 0.13GM (PACKING IN 500ML) TYPE -3** | **500** | | | |
| 1 | Namoh Agencies, Ahmednagar | 500 | Nirlife | Nilyte M | 12500.00 |
| 2 | Chatrapati Agencies & Pharmaceutical Distributors, Ahmednagar | 500 | | | 13250.00 |
| 3 | Saikrishna Agency & Pharmaceutical, Ahmednagar | 500 | Nirlife | Nilyte M | 13750.00 |
| **9** | **INJ. METHYLERGONOVINE MALEATE 0.2MG/ML** | **300** | | | |
| 1 | Gayatri Medical Agency, Aurangabad | 300 | Biochem | Methyler 2ml | 2325.00 |
| 2 | Kabra Medical, Jalgaon | 300 | | | 2970.00 |
| 3 | Prasad Medicos, Jalgaon | 300 | | 1 ml | 3300.00 |
| 4 | Kanchan Drugs, Pune | 300 | Neon | Mem | 3624.00 |
| 5 | Shree Shubham Distributors, Jalgaon | 300 | | | 4050.00 |
| **10** | **INJ ANTI SNAKE VENOM VIAL 10 ML** | **500** | | | |
| 1 | Sanjay Agencies, Ahmendagar | 500 | Bharat Serum | Anti Snake | 254500.00 |
| 2 | Ashoka Distributors, Nashik | 500 | Bharat Serum | ASV 10ml | 262350.00 |
| 3 | Hauncare Surgical & Pharma, Nashik | 500 | Bharat Serum | ASV 10ml | 270125.00 |
| 4 | Gayatri Medical Agency, Aurangabad | 500 | Bharat Serum | ASV 10ml | 275000.00 |
| 5 | Indrayani Enterprises, Ahmednagar | 500 | | ASV 10ml | 278000.00 |
| 6 | Shri Mauli Agnecy, Ahmednagar | 500 | | | 282500.00 |
| 7 | Landge Agencies, Ahmednagar | 500 | | | 284000.00 |
| **11** | **INJ HYALURONIDASE-1500 I.U. AMP 2ML** | **500** | | | |
| 1 | Kabra Medical, Jalgaon | 500 | | | 34925.00 |
| 2 | Prasad Medicos, Jalgaon | 500 | | | 36500.00 |
| 3 | Shreya Enterprises, Ahmednagar | 500 | Entod | Entodase | 38500.00 |
| 4 | Shree Shubham Distributors, Jalgaon | 500 | | | 42187.50 |
| 5 | Karwa Agencies, Sangamner | 500 | Shreya Life Science | Hynidase | 46150.00 |
| 6 | Shravan Medisales Pvt.Ltd., Pune | 500 | Shreya Life Science | Hynidase | 46160.00 |
| **12** | **INJ BUPIVACAINE 5 % HEAVY AMP 4ML (ONLY NEON MAKE)** | **500** | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Kanchan Drugs, Pune | 500 | Neon | Anawin Heavy 4ml | 8015.00 |
| 2 | Huancare Surgical & Pharma, Nashik | 500 | Neon | Anawin Heavy 4ml | 10250.00 |
| 3 | Gayatri Medical Agency, Aurangabad | 500 | Neon | Anawin Heavy 5% 4ml | 10275.00 |
| 4 | Hem Agencies, Kopargaon | 500 | Themies | Bupicaine Heavy 4ml | 10335.00 |
| 5 | Shrinath Medicos, Kopargaon | 500 | Themies | Bupicaine Heavy 4ml | 11130.00 |
| 6 | Kabra Medical, Jalgaon | 500 | Neon | | 11175.00 |
| 7 | Sai Agency, Kopargaon | 500 | Themies | Bupicaine Heavy 4ml | 11395.00 |
| **13** | **INJ.MYOPYROLATE 5ML AMP (ONLY NEON MAKE)** | **500** | | | |
| 1 | Kanchan Drugs, Pune | 500 | Neon | Myopyrolate 5ml | 15000.00 |
| 2 | Ashoka Distributors, Nashik | 500 | Neon | Myopyrolate 5ml | 19950.0000 |
| 3 | Huancare Surgical & Pharma, Nashik | 500 | Neon | Myopyrolate | 21075.0000 |
| 4 | Kabra Medical, Jalgaon | 500 | Neon | Myopyrolate | 26645.0000 |
| | | | | | |
| **14** | **N.S. VIAFLEX 500ML** | **500** | | | |
| 1 | Kabra Medical, Jalgaon | 500 | | | 18925.00 |
| 2 | Prasad Medicos, Jalgaon | 500 | | | 20000.00 |
| 3 | Shree Shubham Distributors, Jalgaon | 500 | | | 21737.50 |
| | | 500 | | | |
| **15** | **INJ METOPROLOL 50MG/5ML AMP** | **500** | | | |
| 1 | Rudrakha Pharma, Nashik | 500 | Cipla | Metolor | 5000.00 |
| 2 | Kabra Medical, Jalgaon | 500 | | | 19900.00 |
| **16** | **RCM ANEROBIC MEDIUM (CODE NO.M149 ) 1 X 500 GM** | **10** | | | |
| 1 | Universal Chemical, Nashik | 10 | Himedia | Cook Meat Medium | 38870.00 |
| 2 | Dodal Enterprises, Aurangabad | 10 | Himedia | Himedia | 38873.80 |
| 3 | Glasschem Instrument, Aurangabad | 10 | Himedia | | 40020.00 |
| 4 | Kalash Enterprises, Aurangabad | 10 | Himedia | | 40770.00 |
| **17** | **MACCONKEY AGAR (CODE NO.M008 ) 1 X 500 GM** | **5** | | | |
| 1 | Universal Chemical, Nashik | 5 | Himedia | | 13845.00 |
| 2 | Dodal Enterprises, Aurangabad | 5 | Himedia | Himedia | 13847.00 |
| 3 | Glasschem Instrument, Aurangabad | 5 | Himedia | | 14250.00 |
| 4 | Kalash Enterprises, Aurangabad | 5 | Himedia | | 14520.00 |
| **18** | **BLOOD CULTURE BOTTLES ADULT** | **100** | | | |
| 1 | Universal Chemical, Nashik | 100 | Micromaster | Om or Hartleysbroth | 11000.00 |
| **19** | **BLOOD CULTURE BOTTLES PED.** | **100** | | | |
| 1 | Universal Chemical, Nashik | 100 | Micromaster | Bhl or Hartleysbroth | 9000.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **20** | **MULLER HINTON AGAR (CODE NO.M0184 ) 1 X 500 GM** | **5** | | | |
| 1 | Universal Chemical, Nashik | 5 | Himedia | MH Agar | 17900.00 |
| 2 | Glasschem Instrument, Aurangabad | 5 | Himedia | | 18425.00 |
| 3 | Kalash Enterprises, Aurangabad | 5 | Himedia | | 18725.00 |
| 4 | Dodal Enterprises, Aurangabad | 5 | Himedia | Himedia | 20321.61 |
| **21** | **ANTIBIOTIC MULTI DISC (PASTURE) GRAM POSITIVE A & B & C 1X10** | **20** | | | |
| 1 | Universal Chemical, Nashik | 20 | Dynamicro | Gram Positive | 4400.00 |
| **22** | **ANTIBIOTIC MULTI DISC (PASTURE) GRAM NEGATIVE 1X10** | **20** | | | |
| 1 | Universal Chemical, Nashik | 20 | Dynamicro | Gram Negative | 4400.00 |
| **23** | **ANTIBIOTIC MULTI DISC (PASTURE) URINARY TRACT INFECTION 1X10** | **20** | | | |
| 1 | Universal Chemical, Nashik | 20 | Dynamicro | UTI Disk | 4400.00 |
| **24** | **ETHYLENE OXIDE CARTRIDGES (ETO CARTIDGE)** | **500** | | | |
| 1 | Mega Industries, Ahmedabad | 500 | | | 36750.00 |
| 2 | Mega Industries, Ahmedabad | 500 | | | 76125.00 |
| 3 | Jay Industries, Ahmedabad | 500 | | | 93450.00 |
| 4 | Pernix Biotech, Ahmedabad | 500 | | | 102375.00 |
| 5 | Mega Industries, Ahmedabad | 500 | | | 141750.00 |
| 6 | Pernix Biotech, Ahmedabad | 500 | | | 162750.00 |
| 7 | Kaustubh Enterprises, Mumbai | 500 | Rujikon | Rujikon | 187500.00 |
| 8 | Mega Industries, Ahmedabad | 500 | | | 204750.00 |
| **25** | **E.C.G.ROLL FLAT (FOR BPL MODEL - MULTI CHANNEL 8408 FLAT PEPAR ONLY) (1 ROLL = 200 PAPERS)** | **500** | | | |
| 1 | Gandhi Enterprises, Ahmednagar | 500 | BPL | BPL | 129000.00 |
| 2 | Saitrons Medical Equipment, Loni | 500 | | | 130000.00 |
| 3 | Ashoka Distributors, Nashik | 500 | Engent Graphic Pvt.Ltd | ECG Roll | 133000.00 |
| 4 | Pamtrons Biomedical Equipment, Mumbai | 500 | | | 140000.00 |
| 5 | Neha Enterprises, Pune | 500 | Arun Technical Paper | | 145000.00 |
| 6 | Hospimake Enterprises, Ahmednagar | 500 | BPL | | 145000.00 |
| 7 | Kailas Enterprises, Nashik | 500 | | | 150000.00 |
| 8 | Shri Sai Surgical, Nashik | 500 | | | 162500.00 |
| 9 | Saitech Medicare System, Pune | 500 | India | Cardiobeat | 165000.00 |
| 10 | Vactech Surgical Equipment, Nashik | 500 | | | 175000.00 |
| **26** | **E.C.G.ROLL FLAT (FOR SCHILLER MODEL AT-1) (1 ROLL = 200 PAPERS)** | **50** | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Ashoka Distributor, Nashik | 50 | Engat Graphics Pvt Ltd | ECG Roll | 7250.0000 |
| 2 | Hospimake Enterprises, Kolhar | 50 | | | 9500.0000 |
| 3 | Saitech Medicare System, Pune | 50 | India | Cardio Bets | 12000.0000 |
| 4 | kailash Enterprises, Nashik | 50 | | | 12500.0000 |
| 5 | Vactech Surgical Equipments, Nashik | 50 | | | 14000.0000 |
| 6 | Shree Sai Surgical, Nashik | 50 | | | 15500.0000 |
| 7 | Saitrons Medical Equipments, Loni | 50 | | | 25000.0000 |
| 8 | Neha Enterprises, Pune | 50 | | | 30000.0000 |
| 9 | Pamtrons Biomedical Equipments, Mumbai | 50 | | | 32500.0000 |
| **27** | **E.C.G.ROLL FLAT (FOR SCHILLER MODEL AT-2 / AT-2 PLUS) (SHEET PACK 242)** | **20** | | | |
| 1 | Ashoka Distributor, Nashik | 20 | Engent Grafics Pvt Ltd | ECG Roll Flat | 8220.0000 |
| 2 | Saitech Medicare System, Pune | 20 | India | Cardio Bets | 9600.0000 |
| 3 | kailash Enterprises, Nashik | 20 | | | 13600.0000 |
| 4 | Saitrons Medical Equipments, Loni | 20 | | | 14000.0000 |
| 5 | Vactech Surgical Equipments, Nashik | 20 | | | 14400.0000 |
| 6 | Shree Sai Surgical, Nashik | 20 | | | 15000.0000 |
| 7 | Pamtrons Biomedical Equipments, Mumbai | 20 | | | 16000.0000 |
| 8 | Neha Enterprises, Pune | 20 | | | 17000.0000 |
| **28** | **COMPACT DISK WITH COVER** | **5000** | | | |
| 1 | Trimurti Agencies, Nashik | 5000 | Sony | | 78250.0000 |
| 2 | Chopada Agencies, Nashik | 5000 | Sony | | 81250.0000 |
| 3 | Rudraksha Pharma, Nashik | 5000 | Sony | | 84750.0000 |
| **29** | **STEEL BATTERY CELL HYPER (PENCIL)** | **500** | | | |
| 1 | Hem Agencies, Kopargaon | 500 | Nippo | Cell pencil | 3813.7500 |
| 2 | Trimurti Agencies, Nashik | 500 | Nipro | | 4625.0000 |
| 3 | Rudraksha Pharma, Nashik | 500 | Nipro | | 4775.0000 |
| 4 | Chopada Agencies, Nashik | 500 | Nipro | | 4775.0000 |
| 5 | Sai Agencies, Kopargaon | 500 | Nippo | Pencil | 4948.6000 |
| 6 | Hem Agencies, Kopargaon | 500 | Nippo | | 4971.3000 |
| 7 | Shrinath Medicos, Kopargaon | 500 | Nippo | Cell pencil | 5232.3500 |
| 8 | Sai Agencies, Kopargaon | 500 | Nippo | Pencil | 6106.3000 |
| 9 | Shrinath Medicos, Kopargaon | 500 | Nippo | Cell pencil | 6248.1500 |
| **30** | **STEEL BATTERY CELL HYPER (MEDIUM)** | **300** | | | |
| 1 | Trimurti Agencies, Nashik | 300 | Panas | | 4530.0000 |
| 2 | Rudraksha Pharma, Nashik | 300 | Panas | | 4650.0000 |
| 3 | Chopada Agencies, Nashik | 300 | Panas | | 4650.0000 |
| 4 | Hem Agencies, Kopargaon | 300 | Nippo | Cell Medium | 5107.5000 |
| 5 | Sai Agencies, Kopargaon | 300 | Nippo | Cell Medium | 5788.5000 |
| 6 | Shrinath Medicos, Kopargaon | 300 | Nippo | Cell Medium | 5958.7500 |
| **31** | **WASHING POWDER PACKING IN KG** | **500** | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Hem Agencies, Kopargaon | 500 | Gopi | Gopi Det. Pow. | 24970.0000 |
| 2 | Sai Agencies, Kopargaon | 500 | Gopi | Gopi Det. Pow. | 25594.2500 |
| 3 | Shrinath Medicos, Kopargaon | 500 | Gopi | Gopi Det. Pow. | 26218.5000 |
| 4 | Aum Enterprises, Akola | 500 | Any Standred Make | | 60000.0000 |
| **32** | **SOAP 125GM** | **500** | | | |
| 1 | Hem Agencies, Kopargaon | 500 | | Santoor | 12263.6500 |
| 2 | Sai Agencies, Kopargaon | 500 | | Santoor | 12405.5500 |
| 3 | Shrinath Medicos, Kopargaon | 500 | | Santoor | 12547.4250 |
| 4 | Aum Enterprises, Akola | 500 | Any Standred Make | | 17500.0000 |
| **33** | **CERVIPRIME 0.5MG (DINOPROSTONE) GEL** | **300** | | | |
| 1 | Kanchan Drugs Pvt. Ltd., Pune | 300 | Neon | Dinost | 42930.0000 |
| 2 | Ashoka Distributor, Nashik | 300 | Bharat Serums | Primigyn Gel | 54696.0000 |
| 3 | Hunacare Surgical & Pharma, Nashik | 300 | Bharat Serums | Primigyn Gel | 56550.0000 |
| 5 | Kabra Medical, Jalgaon | 300 | | | 59970.0000 |
| 6 | Hem Agencies, Kopargaon | 300 | BH Serum | Primygyn Gel | 60454.9800 |
| 4 | Sai Agencies, Kopargaon | 300 | BH Serum | Primygyn Gel | 61249.9800 |
| 7 | Shrinath Medicos, Kopargaon | 300 | BH Serum | Primygyn Gel | 61329.4800 |
| 8 | Prasad Medicos, Jalgaon | 300 | | Dinoprostone Gel | 66000.0000 |
| 9 | Shree Shubham Distributors, Jalgaon | 300 | | | 70875.0000 |
| **34** | **FRAMYCETIN OINTMENT 100GM** | **300** | | | |
| 1 | Gayatri Medical Agencies, Aurangabad | 300 | Universal | Sofraxin | 2100.0000 |
| 2 | Sanjay Agencies,Ahmednagar | 300 | Sanofi Aventies | Soframycin | 23169.0000 |
| 3 | Kabra Medical, Jalgaon | 300 | | | 23940.0000 |
| 4 | Shree Shubham Distributors, Jalgaon | 300 | | | 31387.5000 |
| 5 | Prasad Medicos, Jalgaon | 300 | | | 36000.0000 |
| 6 | Aum Enterprises, Akola | 300 | Any Standred Make | | 48000.0000 |
| **35** | **DICLOFENAC GEL 30GM** | **4000** | | | |
| 1 | Kabra Medical, Jalgaon | 4000 | | | 27960.0000 |
| 2 | Shree Jhalani Agencies, Ahmednagar | 4000 | Zenith | Dicloz | 30000.0000 |
| 3 | Trimurti Agencies, Nashik | 4000 | Lab | | 34840.0000 |
| 4 | Shree Shubham Distributors, Jalgaon | 4000 | | | 36000.0000 |
| 5 | Ashoka Distributor, Nashik | 4000 | Intas | 3 D Gel | 43240.0000 |
| 6 | Manik Moti Pharma, Kopargaon | 4000 | Abbott | Diclofam Gel | 43884.0000 |
| 7 | Hem Agencies, Kopargaon | 4000 | sun ph | fenac Gel | 44096.0000 |
| 8 | Trimurti Agencies, Nashik | 4000 | Uni | | 46160.0000 |
| 9 | Prasad Medicos, Jalgaon | 4000 | | | 48000.0000 |
| 10 | Hunacare Surgical & Pharma, Nashik | 4000 | Intas | 3 D Gel | 55000.0000 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 11 | Gayatri Medical Agencies, Aurangabad | 4000 | Indolab | Indopar | 57000.0000 |
| 12 | Sai Agencies, Kopargaon | 4000 | sun ph | fenac Gel | 55756.0000 |
| 13 | Shrinath Medicos, Kopargaon | 4000 | sun ph | fenac Gel | 57240.0000 |
| 14 | Aum Enterprises, Akola | 4000 | Laborate | Diclolav | 64000.0000 |
| 15 | Kanchan Drugs Pvt. Ltd., Pune | 4000 | Neon | ofinac plus | 66000.0000 |
| 16 | Excel Life Care, Nashik | 4000 | Emcure | Diclomove | 80000.0000 |
| 17 | Shiv Pharmacuticals & Surgicals, Jamkhed | 4000 | Leeford Pvt Ltd, | Quick Relief Gel | 82680.0000 |
| 18 | Yamuna Medical & General Stores, Ahmednagar | 4000 | Rouzel Pharma Pvt. Ltd., | Ronac Gel | 95400.0000 |
| 19 | Hem Agencies, Kopargaon | 4000 | Gereenla | Grelax Gel | 96354.0000 |
| 20 | Sai Agencies, Kopargaon | 4000 | Green LA | Grelax Gel | 106954.0000 |
| 21 | Shrinath Medicos, Kopargaon | 4000 | Gerrn LA | Grelax Gel | 108014.0000 |
| 22 | Yamuna Medical & General Stores, Ahmednagar | 4000 | Psychoetis ( A Division of Bioved Life Sciences) | Dejoint Forte Hot Gel | 115400.0000 |
| 23 | Sanjay Agencies, Ahmednagar | 4000 | Dales | D.D. Gel | 130600.0000 |
| 24 | Mauli Pharma & Surgical Distri. Kopargaon | 4000 | Lyst | Wego Gel | 131440.0000 |
| 25 | Hem Agencies, Kopargaon | 4000 | sun ph | voltira Gel | 240178.8000 |
| 26 | Sai Agencies, Kopargaon | 4000 | sun ph | voltira Gel | 248446.8000 |
| 27 | Shrinath Medicos, Kopargaon | 4000 | sun ph | voltira Gel | 252686.8000 |
| **36** | **PIROXICAM GEL 0.5%W 30 GM** | **4000** | | | |
| 1 | Trimurti Agencies, Nashik | 4000 | Uni | | 37400.0000 |
| 2 | Kabra Medicals Jalgaon | 4000 | | | 39800.0000 |
| 3 | Shree Jhalani Agencies, Ahmednagar | 4000 | Zenith | Pirizen | 50000.0000 |
| 4 | Prasad Medicos, Jalgaon | 4000 | | | 54000.0000 |
| 5 | Shree Shubham Distributors, Jalgaon | 4000 | | | 54000.0000 |
| 6 | Gayatri Medical Agencies, Aurangabad | 4000 | Cipla | Pirox | 76000.0000 |
| 7 | Rudraksha Pharma, Nashik | 4000 | Cipla | pirox Gel | 77760.0000 |
| 8 | Ashoka Distributor, Nashik | 4000 | Cipla | Pirox Gel | 82680.0000 |
| 9 | Hunacare Surgical & Pharma, Nashik | 4000 | Cipla | Pirox Gel | 91400.0000 |
| 10 | Aum Enterprises, Akola | 4000 | Anustel | | 180000.0000 |
| 11 | Sanjay Agencies, Ahmednagar | 4000 | Pfizer | Dolonex Gel | 231800.0000 |
| 12 | Hem Agencies, Kopargaon | 4000 | Pfizer | Dolonex Gel | 233793.6000 |
| 13 | Sai Agencies, Kopargaon | 4000 | Pfizer | Dolonex Gel | 243333.6000 |
| 14 | Shrinath Medicos, Kopargaon | 4000 | Pfizer | Dolonex Gel | 246513.6000 |
| **37** | **OINT. BECTODINE 125GM** | **500** | | | |
| 1 | Hem Agencies, Kopargaon | 500 | Sun Ph | Bectosefe | 27666.0000 |
| 2 | Kabra Medicals Jalgaon | 500 | | | 28450.0000 |
| 3 | Sai Agencies, Kopargaon | 500 | Sun Ph | Bectosefe | 29256.0000 |
| 4 | Shrinath Medicos, Kopargaon | 500 | Sun Ph | Bectosefe | 29786.0000 |
| 5 | Shree Jhalani Agencies, Ahmednagar | 500 | Zenith | Poviz | 30000.0000 |
| 6 | Kanchan Drugs Pvt LTd., Pune | 500 | Neon | Povid | 32875.0000 |
| 7 | Shree Shubham Distributors, Jalgaon | 500 | | | 33187.5000 |
| 8 | Gayatri Medical Agencies, Aurangabad | 500 | Cipla | Cipladine | 34250.0000 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 9 | Ashoka Distributor, Nashik | 500 | Cipla | Cipladine | 36050.0000 |
| 10 | Hunacare Surgical & Pharma, Nashik | 500 | Cipla | Cipladine | 37935.0000 |
| 11 | Prasad Medicos, Jalgaon | 500 | | | 45000.0000 |
| 12 | Aum Enterprises, Akola | 500 | | Wokadin Oint. | #VALUE! |
| **38** | **NEOSPERIN POWDER** | **500** | | | |
| 1 | Trimurti Agencies, Nashik | 500 | med | Medosprin | 9575.0000 |
| 2 | Ashoka Distributor, Nashik | 500 | Intas | intsporin powder | 10550.0000 |
| 3 | Gayatri Medical Agencies, Aurangabad | 500 | Intas | intsporin powder | 12000.0000 |
| 4 | Hunacare Surgical & Pharma, Nashik | 500 | Intas | intsporin powder | 12425.0000 |
| 5 | Shree Jhalani Agencies, Ahmednagar | 500 | Medley | Medosprin | 12500.0000 |
| 6 | Kabra Medicals Jalgaon | 500 | | Nebasulf Powder | 20950.0000 |
| 7 | Prasad Medicos, Jalgaon | 500 | | Nebasulf Powder | 22000.0000 |
| 8 | Shree Shubham Distributors, Jalgaon | 500 | | Nebasulf Powder | 24187.5000 |
| **39** | **MIOSOL PF SOLUTION** | **500** | | | |
| 1 | Ophtho Equip Inc. Ahmedanad | 500 | | | 17500.0000 |
| 2 | Ophtho Equip Inc. Ahmedanad | 500 | | | 32500.0000 |
| 3 | Kabra Medicals Jalgaon | 500 | | | 49000.0000 |
| 4 | Prasad Medicos, Jalgaon | 500 | | | 61500.0000 |
| 5 | Shree Shubham Distributors, Jalgaon | 500 | | | 61875.0000 |
| **40** | **LIQ.CHLORHEXIDINE GLUCONATE SOLUTION IP + CETRIMIDE IP (PACKING IN 1 LIT JAR)** | **500** | | | |
| 1 | Kabra Medicals Jalgaon | 500 | | | 23400.0000 |
| 2 | Varad Enterprises, Nashik | 500 | Sovergine Remedies Pvt. Ltd. | S - Lor | 24000.0000 |
| 3 | Prasad Medicos, Jalgaon | 500 | | | 26000.0000 |
| 4 | Trimurti Agencies, Nashik | 500 | Cadila | 1 Ltr | 26500.0000 |
| 5 | Shree Jhalani Agencies, Ahmednagar | 500 | Cadila | Stralon | 27000.0000 |
| 6 | Varad Enterprises, Nashik | 500 | Cadila | Starlon | 28000.0000 |
| 7 | Gayatri Medical Agencies, Aurangabad | 500 | Wokhardt | Wolon | 31000.0000 |
| 8 | Manik Moti Pharma, Kopargaon | 500 | Elder | Liq. Quadlon 1 Ltr | 37789.0000 |
| 9 | Trimurti Agencies, Nashik | 500 | Mil Lab | 1 Ltr | 41975.0000 |
| 10 | Mil Laboratories, Mumbai | 500 | Mil | Termilon Antiseptic | 42000.0000 |
| **41** | **0.002% W/V PROPYLGALLATE AS STABILISER (SOLVENT ETHER) (PACKING IN 500ML)** | **100** | | | |
| 1 | Kabra Medicals Jalgaon | 100 | | Solvent Ether | 15400.0000 |
| 2 | Shree Subham Distributors, Jalgaon | 100 | | Solvent Ether | 16875.0000 |
| 3 | Prasad Medicos, Jalgaon | 100 | | Solvent Ether | 22000.0000 |
| **42** | **FORMALIN 5 LIT JAR** | **200** | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Shree Jhalani Agencies, Ahmednagar | 200 | J.P. | Formalin | 27000.0000 |
| 2 | Sagar Surgical, Ahmednagar | 200 | Any | | 27560.0000 |
| 3 | Trimurti Agencies, Nashik | 200 | vishal | | 31600.0000 |
| 4 | Gayatri Medical Agencies, Aurangabad | 200 | Shree Chem | Formalin Sol. | 31600.0000 |
| 5 | Chopada Agencies, Nashik | 200 | VIS | | 31900.0000 |
| 6 | Rudraksha Pharma, Nashik | 200 | Vish | | 32000.0000 |
| 7 | Hem Agencies, Kopargaon | 200 | S K Ent. | Formaline 10% | 33708.0000 |
| 8 | Sai Agencies, Kopargaon | 200 | S K Ent. | Formalin 10% | 36888.0000 |
| 9 | Shrinath Medicos, Kopargaon | 200 | SK Ent | Formaline 10% | 39008.0000 |
| 10 | Shiv Pharmacuticals & Surgicals, Jamkhed | 200 | Svas Enterprises 1 | Formaline | 40000.0000 |
| 11 | Kabra Medicals Jalgaon | 200 | | | 51800.0000 |
| 12 | Hem Agencies, Kopargaon | 200 | SK Ent | Formalin 47 % | 61904.0000 |
| 13 | Prasad Medicos, Jalgaon | 200 | | | |
| 14 | Sai Agencies, Kopargaon | 200 | S K Ent. | Formalin 5 Ltrs 47% | 67204.0000 |
| 15 | Shrinath Medicos, Kopargaon | 200 | SK Ent | Formaline 47% | 69324.0000 |
| 16 | Shree Shubhum Distributors, Jalgaon | 200 | | | 72000.0000 |
| 17 | Dodal Enterprises, Aurangabad | 200 | Thermo Fisher Scientific | Qualigen | 245920.0000 |
| 18 | Glasschem Instruments, Aurangabad | 200 | Thermo Fisher Scientific | Qualigen | 253000.0000 |
| 19 | Kalash Enterprises, Aurangabaad | 200 | Thermo Fisher Scientific | Qualigen | 258000.0000 |
| **43** | **DISP. SYRINGE 50ML (LUER LOCK) WITH NEEDLE** | **3000** | | | |
| 1 | Shiv Pharmacuticals & Surgicals, Jamkhed | 3000 | HMD | Dispovan 50ml | 46110.0000 |
| 2 | Ashoka Distributor, Nashik | 3000 | HMD | Dispovan | 50550.0000 |
| 3 | Varad Enterprises, Nashik | 600 | HMD | Unolock | 10506.0000 |
| 4 | Hunacare Surgical & Pharma, Nashik | 3000 | HMD | Dispovan | 54750.0000 |
| 5 | Kabra Medicals Jalgaon | 3000 | | | 86400.0000 |
| 6 | Aum Enterprises, Akola | 3000 | BD. | | 90000.0000 |
| 7 | Prasad Medicos, Jalgaon | 3000 | | | 96000.0000 |
| 8 | Sagar Surgical, Ahmednagar | 3000 | BD. | | 98739.0000 |
| 9 | Kanchan Drugs PVT Ltd,Pune | 3000 | BD. | BD | 100170.0000 |
| 10 | Shree Shubhum Distributors, Jalgaon | 3000 | | | 101250.0000 |
| **44** | **INTRANUEL 16G** | **600** | | | |
| 1 | Kanchan Drugs PVT Ltd,Pune | 600 | Vygon Intranule | Intranule 16 G | 222000.0000 |
| 2 | Surgilink, Shrirampur | 600 | Vygon Intranule | | 238800.0000 |
| 3 | Yoga Enterprises, Pune | 600 | Vygon Intranule | | 252600.0000 |
| 4 | Medevice Healthcare LLP, Pune | 600 | Vygon Intranule | | 254400.0000 |
| 5 | Infix, Ahmednagar | 600 | Vygon Intranule | | 259200.0000 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 6 | Critical Care System, Pune | 600 | | | 270000.0000 |
| 7 | Seva Medical Equipment, Pune | 600 | Vygon Intranule | | 381600.0000 |
| **45** | **DISPO. AND NON-VENTED MASK (SMALL, MEDIUM, LARGE SIZE) (NIV) EACH - 7** | **21** | | | |
| 1 | Kanchan Drugs PVT Ltd,Pune | 21 | Respironics | Respironics full Face Mask | 44100.0000 |
| 2 | C.Natvarlal & Company, Mumbai | 21 | Resmed India Pvt. Ltd., Australia | Resmed | 45286.5000 |
| 3 | Surgilink, Shrirampur | 21 | Fisher & Paykel | | 48300.0000 |
| 4 | Infix, Ahmednagar | 21 | Fisher & Paykel | | 50820.0000 |
| 5 | Yoga Enterprises, Pune | 21 | Fisher & Paykel | | 51660.0000 |
| **46** | **CRESENT KNIFE 3.1** | **1500** | | | |
| 1 | Shravan Medisales Pvt Ltd, Pune | 1500 | Optiedge | SMPL | 44250.0000 |
| 2 | Ophtho Equip. Inc., Ahmedabad | 1500 | Omni | | 47250.0000 |
| 3 | Medevice Healthcare LLP, Pune | 1500 | Uniedge | | 970500.0000 |
| 4 | Seva Medical Equipment, Pune | 1500 | | | 1072500.0000 |
| 5 | Critical Care System, Pune | 1500 | | | 1149000.0000 |
| **47** | **KERATOME 2.8 BLADE** | **1500** | | | |
| 1 | Shravan Medisales Pvt Ltd, Pune | 1500 | Optiedge | SMPL | 44250.0000 |
| 2 | Ophtho Equip. Inc., Ahmedabad | 1500 | Omni | | 47250.0000 |
| **48** | **LANCE TIP 15**$^{0}$C (CORONARY BLADE) | **1500** | | | |
| 1 | Shravan Medisales Pvt Ltd, Pune | 1500 | Optiedge | SMPL | 44250.0000 |
| 2 | Ophtho Equip. Inc., Ahmedabad | 1500 | Omni | | 47250.0000 |
| **49** | **DISP. SPINAL NEEDLE NO.23,25,27 (EACH -300) (ONLY BD MAKE)** | **900** | | | |
| 1 | Medi Tech Devices PVt. Ltd., Pune | 900 | Meditech Devices | | 25200.0000 |
| 2 | Shiv Pharmacuticals & Surgicals, Jamkhed | 900 | Top Pvt Ltd | Spinal Needle | 38160.0000 |
| 3 | Varad Enterprises, Nashik | 900 | BD. | Spinal Needle | 39141.0000 |
| 4 | Kanchan Drugs PVT Ltd,Pune | 900 | BD. | BD Spinal Needle | 40500.0000 |
| 5 | Sagar Surgical, Ahmednagar | 900 | BD. | No. 23,25,27 | 41260.5000 |
| 6 | Kabra Medicals Jalgaon | 900 | | | 42210.0000 |
| 7 | Gayatri Medical Agencies, Aurangabad | 900 | BD. | Spinal Needle | 42300.0000 |
| 8 | Ashoka Distributor, Nashik | 900 | BD. | BD Spinal Needle | 42453.0000 |
| 9 | Prasad Medicos, Jalgaon | 900 | | | 44100.0000 |
| 10 | Hunacare Surgical & Pharma, Nashik | 900 | BD. | BD Spinal Needle | 44325.0000 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 11 | Shree Subham Distributors, Jalgaon | 900 | | | 48600.0000 |
| 12 | Aum Enterprises, Akola | 900 | BD. | No. 23,25,27 | 58500.0000 |
| **50** | **D.J. STENT 3$^1/_2$,4$^1/_2$,4X20,4X16** (EACH 10) | **40** | | | |
| 1 | Medi Tech Devices PVt. Ltd., Pune | 40 | Meditech Devices | | 6000.0000 |
| 2 | Gayatri Medical Agencies, Aurangabad | 40 | Biorad Medisys | D J Stent | 6400.0000 |
| 3 | Kanchan Drugs PVT Ltd,Pune | 40 | Surgimedik | | 8480.0000 |
| **51** | **JUMBO BANDAGE 8"** | **100** | | | |
| 1 | Varad Enterprises,Nashik | 100 | Vishnudarshan | | 16700.0000 |
| 2 | Varad Enterprises,Nashik | 100 | Vishnudarshan | | 23800.0000 |
| 3 | Ashoka Distributors,Nashik | 100 | Disha | Roller Bandage | 28800.0000 |
| 4 | Huancare Surgical & Pharma, Nashik | 100 | Disha | Roller Bandage | 31000.0000 |
| **52** | **DISP. MONOPOLAR CAUTRY CABLE** | **50** | | | |
| 1 | Saitrons,Loni | 50 | Imported | | 25000.0000 |
| 2 | Pamtrons Biomedical Equipments,Mumbai. | 50 | | | 26000.0000 |
| 3 | Neha Enterprises, Pune | 50 | | | 27500.0000 |
| 4 | Hospimake Enterprises,Kolhar Bk. | 50 | Shelya | | 43750.0000 |
| 5 | Medi-tech Devices Pvt.Ltd,Pune | 50 | Meditech | | 45000.0000 |
| **53** | **SUCTION TUBE GREEN** | **400** | | | |
| 1 | Ashoka Distributors,Nashik | 400 | Romson | Suction Catheter | 2964.0000 |
| **54** | **ETHICON CUTTING NO.5** | **5** | | | |
| 1 | Surgilink ,Shrirampur | 5 | Ethilon | NW 3316 | 11675.0000 |
| 2 | Infix Implants & Allied, Ahmednagar | 5 | Ethilon | NW 3316 | 12050.0000 |
| 3 | Yoga Enterprises,Pune | 5 | Ethilon | NW 3316 | 12450.0000 |
| **55** | **ETHICON CUTTING NO.6** | **5** | | | |
| 1 | Surgilink ,Shrirampur | 5 | Ethilon | NW 3320 | 21215.0000 |
| 2 | Infix Implants & Allied,Pune | 5 | Ethilon | NW 3320 | 21800.0000 |
| 3 | Yoga Enterprises,Pune | 5 | Ethilon | NW 3320 | 22050.0000 |
| **56** | **ETHICON CUTTING NO.7** | **5** | | | |
| **57** | **SYR.CHOLECALCI FEROL** | **6000** | | | |
| 1 | Trimurti Agencies, Nashik | 6000 | Nec | Healthcal -D3 | 27900.0000 |
| 2 | Rudraksh Pharma, Nashik | 6000 | Nec | Calitas | 31500.0000 |
| 3 | Chopada Agencies, Nashik | 6000 | | | 37500.0000 |
| 4 | Kabra Medical Jalgaon | 6000 | | | 45480.0000 |
| 5 | Shree Shubham Distributors,Jalgaon | 6000 | | | 48000.0000 |
| 6 | Prasad Medicos,Jalgaon | 6000 | | | 59400.0000 |
| **58** | **SYR. AMOXICILINE 125MG + CLAVULANIC ACID 31.5MG PER 5ML, 30ML BOTTLE** | **4000** | | | |
| 1 | Gayatri Medical Agencies,Aurangabad | 4000 | Laborate | Duo clav | 87600.0000 |
| 2 | Kabra Medical Jalgaon | 4000 | | | 87600.0000 |
| 3 | Ashoka Distributors,Nashik | 4000 | KMN Pharma | Moxyrin-CV | 91160.0000 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | Trimurti Agencies,Nashik | 4000 | Intas | Megamentin DUO | 91960.0000 |
| 5 | Huancare Surgical & Pharma,Nashik | 4000 | KMN Pharma | Moxyrin-CV | 101680.0000 |
| 6 | Shree Shubham Distributors, Jalgaon | 4000 | | | 103500.0000 |
| 7 | Prasad Medicos, Jalgaon | 4000 | | | 116000.0000 |
| 8 | Shiv Pharmaceuticals & Surgicals,Jamkhed | 4000 | Cipla | Novaclav Dry | 128960.0000 |
| 9 | Sanjay Agencies, Ahmednagar | 4000 | Alkem | Clavam dry syp | 141760.0000 |
| 10 | Rudraksh Pharma,Nashik | 4000 | Alkem | Clavam dry syp | 144000.0000 |
| 11 | Karwa Agencies, Sangamner | 4000 | Alkem | Clavam dry syp | 153040.0000 |
| 12 | Excel Life care, Nashik | 4000 | Emcure | Utimox Clav - Ds Sus 30 ml | 158000.0000 |
| 13 | AUM Enterprises, Akola | 4000 | Laborate | Duo clav | 180000.0000 |
| **59** | **IPRATROPIUM BROMID + LEVOSALPUTAMOLRESPULES 2.5 ML** | **600** | | | |
| 1 | Sanjay Agencies, Ahmednagar | 600 | Cipla | Duolin | 4644.0000 |
| 2 | Rudraksh Pharma,Nashik | 600 | Cipla | Duolin | 5160.0000 |
| 3 | Gaytri Medical Agencies, Aurangabad | 600 | German Remedis | Combimist L | 6000.0000 |
| **60** | **SYR DEXTROMETHORPHAN HBR, PHENYLEPHRIN HCL & CHLORPHENIRAMINE MALEATE - PACKING 100ML** | **2000** | | | |
| 1 | Kabra Medical Jalgaon | 2000 | | | 24780.0000 |
| 2 | Shree Shubham Distributors,Jalgaon | 2000 | | | 26000.0000 |
| 3 | Prasad Medicos,Jalgaon | 2000 | | | 28000.0000 |
| 4 | Medigold Life Sciences Pvt.Ltd,Kopargaon | 2000 | DM Pharma | Koughex-D syp | 34400.0000 |
| 5 | Siddheshwar Agencies, Kopargaon | 2000 | DM Pharma | Koughex-D syp | 35000.0000 |
| 6 | Shree Jhalani Agencies,Ahmednagar | 2000 | Troikaa | Troycof D forte | 35500.0000 |
| 7 | Manik-Moti Pharma,Kopargaon | 2000 | Savill | Ascovill DX | 39983.2000 |
| 8 | Ashoka Distributors,Nashik | 2000 | Intas | Kuff-D | 42200.0000 |
| 9 | Gayatri Medical Agencies,Aurangabad | 2000 | Alkem | Ultas Dan | 47200.0000 |
| 10 | Huancare Surgical,Nashik | 2000 | Intas | Kuff-D | 49100.0000 |
| 11 | AUM Enterprises, Akola | 2000 | Laborate | | 90000.0000 |
| 12 | Sanjay Agencies, Ahmednagar | 2000 | Alkem | Xpect-D | 91580.0000 |
| 13 | Shrinath Medicos,Kopargaon | 2000 | Abbott | Deletus D | 113588.0000 |
| 14 | Hem Agencies,Kopargaon | 2000 | Abbott | Deletus D | 115739.2000 |
| 15 | Sai Agencies,Kopargaon | 2000 | Abbott | Deletus D | 119449.2000 |
| **61** | **TAB. METOPROLOL SUCCINTATE 25 MG** | **80000** | | | |
| 1 | Shree Jhalani Agencies, Ahmednagar | 80000 | Elixer | Metolix | 38400.0000 |
| 2 | Snehal Pharma & Surgical, Nagapur | 80000 | SPSPL | Snemet 25 | 38400.0000 |
| 3 | Trimurti Agencies,Nashik | 80000 | Elder | Metoder 25mg | 42400.0000 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | Rudraksh Pharma, Nashik | 80000 | Elder | Metoder 25mg | 43200.0000 |
| 5 | Gayatri Medical Agencies,Aurangabad | 80000 | Biochem | Metol XL 25mg | 68000.0000 |
| 6 | Kabra Medical Jalgaon | 80000 | | | 78400.0000 |
| 7 | Ashoka Distributors, Nashik | 80000 | Elder | Metoder 25mg | 89600.0000 |
| 8 | Shree Shubham Distributors, Jalgaon | 80000 | | | 117000.0000 |
| 9 | Prasad Medicos,Jalgaon | 80000 | | | 120000.0000 |
| 10 | Huancare Surgical & Pharma, Nasik | 80000 | Elder | Metoder 25mg | 148000.0000 |
| 11 | HEM Agencies, Kopargaon | 80000 | Abbott | Supermet XL 25mg | 200208.0000 |
| 12 | Sai Agencies,Kopargaon | 80000 | Abbott | Supermet XL 25mg | 221408.0000 |
| 13 | Shrinath Medicos,Kopargaon | 80000 | Abbott | Supermet XL 25mg | 229040.0000 |
| 14 | Sanjay Agencies,A.nagar | 80000 | Lupin | Starpress-XL 25mg | 256000.0000 |
| **62** | **TAB.ORCIPRENALLINE SULPHATE 10 MG** | **5000** | | | |
| 1 | Rudraksh Pharma, Nashik | 5000 | Garman Remedies | Orcibest | 29900.0000 |
| 2 | Chopada Agencies, Nashik | 5000 | Zyduss | Allupent | 31000.0000 |
| 3 | Trimurti Agencies,Nashik | 5000 | Garman Remedies | Orcibest | 31750.0000 |
| **63** | **TAB PARACETAMOL 500MG + PHENYLAPHERINE HYDROCHLORIDE + CETRIZIN HYDROCHLORIDE** | **2E+05** | | | |
| 1 | Kabra Medical Jalgaon | 200000 | | | 77600.0000 |
| 2 | Trimurti Agencies, Nashik | 200000 | Trioka | Terixine Forte Tablets | 84000.0000 |
| 3 | Shree Jhalani Agencies,Ahmednagar | 200000 | Troikaa | Terixine Forte Tablets | 94000.0000 |
| 4 | Ashoka Distributors, Nashik | 200000 | KNM Pharma | Snifee Cold Tab | 96000.0000 |
| 5 | Manik-Moti Pharma,Kopargaon | 200000 | solvis | Flu Relif Ft. | 170720.0000 |
| 6 | Prasad Medicos, Jalgaon | 200000 | | | 180000.0000 |
| 7 | Huancare Surgical & Pharma,Nasik | 200000 | KNM Pharma | Snifee Cold Tab | 190000.0000 |
| 8 | Shree Shubham Distributors,Jalgaon | 200000 | | | 225000.0000 |
| 9 | Mauli Pharma & Surgical Distributors, Kopargaon | 200000 | Lyst | Lycorest | 289580.0000 |
| 10 | AUM Enterprises, Akola | 200000 | Std. | | 300000.0000 |
| **64** | **TAB. NORFLOXICIN 400MG + TINIDAZOLE 600MG** | **50000** | | | |
| 1 | Kabra Medical Jalgaon | 50000 | | | 99500.0000 |
| 2 | Trimurti Agencies,Nashik | 50000 | Trioka | nortikka | 105000.0000 |
| 3 | Manik-Moti Pharma,Kopargaon | 50000 | Laborate | NDS-N Flox TZ | 114265.0000 |
| 4 | Shree Jhalani Agencies, Ahmednagar | 50000 | Trioka | nortikka | 118000.0000 |
| 5 | Shree Shubham Distributors, Jalgaon | 50000 | | | 118125.0000 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 6 | Shiv Pharmaceuticals & Surgicals, Ahmednagar | 50000 | Alkem Pvt.Ltd. | Norflokem-TZ | 119250.0000 |
| 7 | Ashoka Distributors,Nashik | 50000 | Danis | Nor-TZ | 119500.0000 |
| 8 | Gayatri Medical Agencies,Aurangabad | 50000 | Laborate | N Flox TZ | 119500.0000 |
| 9 | prasad medico, Jalgaon | 50000 | | | 125000.0000 |
| 10 | Hem Agencies, Kopargaon | 50000 | Mankind | Norday TZ | 133560.0000 |
| 11 | Huancare Surgical & Pharma,Nasik | 50000 | Danis | Tab. NOR-TZ | 149000.0000 |
| 12 | Aum Enterprises, Akola | 50000 | Laborate | NDS N Flox TZ | 200000.0000 |
| 13 | Sai Agencies Kopargaon | 50000 | Mankind | Norday TZ | 213060.0000 |
| 14 | Sanjay Agencies,A.Nagar | 50000 | Cipla | Norflox-TZ | 215000.0000 |
| 15 | Shrinath Medicos Kopargaon | 50000 | Mankind | Norday TZ | 239560.0000 |
| **65** | **TAB CIPROFLOXICIN 500MG + TINIDAZOLE 600MG** | **50000** | | | |
| 1 | Kabra Medicals, Jalgaon | 50000 | | | 129000.0000 |
| 2 | Ashoka Distributors,Nashik | 50000 | KNM Pharma | Ciparin TZ | 130000.0000 |
| 3 | Prasad Medicos, Jalgaon | 50000 | | | 140000.0000 |
| 4 | Huancare Surgical & Pharma,Nashik | 50000 | KNM Pharma | Ciparin TZ | 147500.0000 |
| 5 | Manik-Moti Pharma,Kopargaon | 50000 | Laborate | Cip TZ | 147760.0000 |
| 6 | Shiv Pharmacuticals & Surgicals, Jamkhed | 50000 | Alembic Pvt. Ltd. | Ciprowin- TZ | 148300.0000 |
| 7 | Gayatri Medical Agencies,Aurangabad | 50000 | Laborate | Gpilox TZ | 149000.0000 |
| 8 | Shree Shubham Distributors,Jalgaon | 50000 | | | 151875.0000 |
| 9 | Hem Agencies, Kopargaon | 50000 | Abbott | Floxip Tz | 152640.0000 |
| 10 | Sai Agencies, Kopargaon | 50000 | Abbott | Floxip Tz | 218890.0000 |
| 11 | AUM Enterprises, Akola | 50000 | Std. | | 225000.0000 |
| 12 | Shrinath Medicos Kopargaon | 50000 | Abbott | Floxip Tz | 232140.0000 |
| 13 | Sanjay Agencies, Ahmednagar | 50000 | Cipla | Cpilox TZ | 350000.0000 |
| **66** | **TAB DICYCLOMINE 20 Mg + PARACTEMOL 500 Mg** | **2E+05** | | | |
| 1 | Kabra Medicals, Jalgaon | 150000 | | | 52350.0000 |
| 2 | Trimurti Agencies, Nashik | 150000 | Trioka | Clopar | 58500.0000 |
| 3 | Ashoka Distributors,Nashik | 150000 | Vintochem | Cyclovee Plus | 58500.0000 |
| 4 | Gayatri Medical Agencies, Aurangabad | 150000 | St. michine | Cyclomin | 64500.0000 |
| 5 | Shree Jhalani Agencies,Ahmednagar | 150000 | Trioka | Clopar | 64500.0000 |
| 6 | Manik-Moti Pharma,Kopargaon | 150000 | Elder | Eldospas | 69480.0000 |
| 7 | Huancare Surgical & Pharma,Nashik | 150000 | Vintochem | Cyclovee Plus | 94500.0000 |
| 8 | Shiv Pharmacuticals & Surgicals, Jamkhed | 150000 | Alkem Pvt.Ltd. | Almefkem | 101700.0000 |
| 9 | Aum Enterprises,Akola | 150000 | Std. | | 105000.0000 |
| 10 | Prasad Medicos, Jalgaon | 150000 | | | 165000.0000 |
| 11 | Shree Shubham Distributors, Jalgaon | 150000 | | | 168750.0000 |
| 12 | Hem Agencies, Kopargaon | 150000 | Svizera | Dysmen Tab | 358035.0000 |
| 13 | Sai Agencies Kopargaon | 150000 | Svizera | Dysmen Tab | 397785.0000 |
| 14 | Shrinath Medicos Kopargaon | 150000 | Svizera | Dysmen Tab | 437535.0000 |
| **67** | **TAB NORFLOXICIN 400 Mg** | **50000** | | | |
| 1 | Kabra Medical Jalgaon | 50000 | | | 64500.0000 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | Ashoka Distributors,Nashik | 50000 | Century | Nor-400 mg | 70000.0000 |
| 3 | Shiv Pharmacuticals & Surgicals, Jamkhed | 50000 | Laborate | Nor-400gm | 76000.0000 |
| 4 | Shree Jhalani Agencies,Ahmednagar | 50000 | Ridley | Ridnor | 76000.0000 |
| 5 | Trimurti Agencies,Nashik | 50000 | Alkem | Norflokem | 79500.0000 |
| 6 | Huancare Surgical & Pharma,Nasik | 50000 | Century | Nor-400gm | 83000.0000 |
| 7 | Gayatri Medical Agencies,Aurangabad | 50000 | Laborate | N Flox | 89000.0000 |
| 8 | Prasad Medicos, Jalgaon | 50000 | | | 92500.0000 |
| 9 | Shree Shubham Distributors,Jalgaon | 50000 | | | 112500.0000 |
| 10 | Hem Agencies, Kopargaon | 50000 | mankind | NORDAY-TZ | 133560.0000 |
| 11 | Sanjay Agencies,A.nagar | 50000 | Cipla | Norflox 400mg | 195000.0000 |
| **68** | **TAB ASPIRIN 150MG, ATORAVASTINE 10MG, CLOPIDOGRAL 75MG** | **40000** | | | |
| 1 | Ashoka Distributors, Nashik | 40000 | Mankind | Lipkind Plus Tab | 118000.0000 |
| 2 | Huancare Surgical & Pharma,Nasik | 40000 | Mankind | Lipikind Plus | 126000.0000 |
| 3 | Rudraksh Pharma,Nashik | 40000 | Sun | Aztogold | 168000.0000 |
| 4 | Trimurti Agencies,Nashik | 40000 | USV | Ecosprin Gold 10 mg | 178000.0000 |
| 5 | Chopada Agencies, Nashik | 40000 | Torrent | Deplatt CV 10 mg | 187200.0000 |
| 6 | Sanjay agencies,A.nagar | 40000 | USV | Ecosprin Gold 10 Ft. | 198000.0000 |
| **69** | **TAB ASPIRIN 150MG, ATORAVASTINE 20MG, CLOPIDOGRAL 75MG** | **30000** | | | |
| 1 | Rudraksh Pharma, Nashik | 30000 | Sun Ph | Aztogold 20 | 170100.0000 |
| 2 | Chopada Agencies, Nashik | 30000 | Torrent | Deplatt CV 20 mg | 179400.0000 |
| 3 | Trimurti Agencies, Nashik | 30000 | USV | Ecosprin Gold 20 | 183000.0000 |
| **70** | **TAB MICRONIZED FLAVONOIDS 500MG** | **10000** | | | |
| **71** | **TAB DRIED ALUM. HYDROX GEL 300MG + MAG. ALUM. SILICATE 500MG + MAG. HYDROX 25MG + METHYL POLYSILOX 10MG** | **1E+05** | | | |
| 1 | Kabra Medical Jalgaon | 100000 | | | 39000.0000 |
| 2 | Prasad Medicos, Jalgaon | 100000 | | | 45000.0000 |
| 3 | Hem Agencies, Kopargaon | 100000 | Pfizer | Gellusil Mps Tab | 81190.0000 |
| 4 | Sai Agencies Kopargaon | 100000 | Pfizer | Gellusil MPS | 88610.0000 |
| 5 | Shrinath Medicos Kopargaon | 100000 | Pfizer | Gellusil Mps Tab | 93910.0000 |
| 6 | Shree Shubham Distributors,Jalgaon | 100000 | | | 105000.0000 |
| 7 | AUM Enterprises, Akola | 100000 | Cipla | | 118120.0000 |
| **72** | **TAB IBUPROFEN 400mg + PARACETAMOL 325mg** | **3E+05** | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Kabra Medical Jalgaon | 300000 | | | 177000.0000 |
| 2 | Shree Jhalani Agencies,A.nagar | 300000 | Suprex | C-Flam Plus | 189000.0000 |
| 3 | Trimurti Agencies, Nashik | 300000 | CAD | Answell Tab | 204000.0000 |
| 4 | Sanjay agencies,A.nagar | 300000 | Maxkos | Ibumax-P | 210000.0000 |
| 5 | Manik-Moti Pharma,Kopargaon | 300000 | Abbott | Maxofen Plus | 212100.0000 |
| 6 | Shiv Pharmacuticals & Surgicals, Jamkhed | 300000 | Sun Ph | Brustan Tab | 213000.0000 |
| 7 | Ashoka Distributor, Nashik | 300000 | Alkem | Flexib | 225000.0000 |
| 8 | Hem Agencies, Kopargaon | 300000 | Abbott | Maxepen Plus | 238500.0000 |
| 9 | AUM Enterprises, Akola | 300000 | Laborate | Bruce | 240000.0000 |
| 10 | Gayatri Medical Agencies,Aurangabad | 300000 | Laborate | Pruce | 243000.0000 |
| 11 | Huancare Surgical & Pharma,Nasik | 300000 | Alkem Pvt.Ltd. | Flexib | 246000.0000 |
| 12 | Hem Agencies, Kopargaon | 300000 | Sun PH | Brustan Tab | 250410.0000 |
| 13 | Sai Agencies Kopargaon | 300000 | Abbott | Maxofen Plus | 260760.0000 |
| 14 | Sai Agencies Kopargaon | 300000 | Sun Ph | Brustan Tab | 275850.0000 |
| 15 | Shrinath Medicos, Kopargon | 300000 | Abbott | Maxepen Plus | 276660.0000 |
| 16 | Shrinath Medicos, Kopargon | 300000 | Sun PH | Brustan Tab | 291765.0000 |
| 17 | Shree Shubham Distributors,Jalgaon | 300000 | | | 337500.0000 |
| 18 | Prasad Medicos,Jalgaon | 300000 | | | 360000.0000 |
| **73** | **STERILE DISPO. SYRING STELLAINT DUAL HEADED ONLY CONSIST OF 200ML 2 SYRING WITH T CONNECTOR & PRIME TUBE & ONE QUICK FILL TUBE - SDS-CTP-QFT** | **10** | | | |
| 1 | Anita Medical Systems PVT.LTD , Mumbai | 10 | | | 10600.0000 |
| 2 | Sagar Surgical & Medical Services, Nashik | 10 | | | 11130.0000 |
| 3 | Jinu Graphics,Mumbai | 10 | | | 13052.5000 |
| **74** | **Potassium Permegnate** | **200** | | | |
| 1 | Kabra Medical, Jalgaon | | | | 0.0000 |
| 2 | Shree Shubham Distributors,Jalgaon | | | | 0.0000 |
| 3 | Prasad Medicos, Jalgaon | | | | 0.0000 |
| 4 | Trimurti Agencies,Nashik | | Vishal | | 0.0000 |
| 5 | Chopada Agencies, Nashik | | Vishal | | 0.0000 |
| 6 | Rudraksh Pharma,Nashik | | Vishal | | 0.0000 |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता आवश्यक असणारी औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीकामी उपरोक्तप्रमाणे उघडणेत आलेल्या कोटेशन्समधील मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत येऊन् मागणीप्रमाणे असलेल्या औषधे/ सर्जिकल साहित्यासाठी निम्नतम दर स्विकारणेत येऊन, कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच ज्या औषधे/ सर्जिकल साहित्यासाठी दर प्राप्त झालेले नाहीत अथवा तीनपेक्षा कमी कोटेशन्स प्राप्त झालेले आहेत असे औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदीकामी नव्याने जाहिरात प्रसिध्द करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**११. श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय विभागाकरीता अत्याधुनिक संगणकीकृत साहित्य संस्थानचे विहीत पध्दतीने खरेदी करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

संस्थानचे अद्ययावत सुपर स्पेशालिटी श्री साईबाबा हॉस्पिटल कार्यान्वित होणेपूर्वी मे.अलाईड डिजीटल सर्व्हिसेस लि. यांचेकडून दि ०९/०२/२००६ रोजीचे कार्यादेशानूसार संगणक संच, सर्व्हर, प्रिंटर्स, ॲन्टीव्हायरस तसेच इतर अनुषांगीक तांत्रिक साहीत्य व M/s Sofscript System and Services Ltd, Mumbai यांचे कडून HMIS संगणकीय प्रणाली खरेदी करणेत आलेले आहे.

सदर संगणकीय प्रणाली सन २००७ मध्ये बिलिंग, मेडिकल स्टोअर, फायनान्स, रीसेप्शन, लॅब इ. विभागात कार्यान्वित करण्यात आलेली आहे. परंतु, सदरच्या कार्यान्वित असणाऱ्या संगणकीय प्रणाली मध्ये अडी-अडचणी निर्माण झाल्याने संबंधित कंपनीस सदर अडचणींचे निवारण करणेकामी मा व्यवस्थापन समितीचे दि. ३१/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र._____ अन्वये AMC देणेबाबतची कार्यवाही सूरू आहे.

सद्यस्थितीत मे.अलाईड डिजीटल सर्व्हिसेस लि. यांचेकडून खरेदी करणेत आलेले सर्व संगणक संच, प्रिंटर्स, सर्व्हर, ॲन्टीव्हायरस, यु.पी.एस., नेटवर्क स्विचेस इ. तांत्रिक साहीत्य वापरुन तांत्रिकदृष्ट्या कालबाह्य झालेली आहे. सदरहू कारणास्तव संदर्भ क्र.०१ अन्वये श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालये अत्याधुनिक संगणकीकृत साहीत्य खरेदी करणेकामी मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.२७.१०.२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेतील निर्णय क्र.४०६ नूसार "श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालये अत्याधुनिक संगणकीकृत करणेकामी प्रस्तावात नमूद केलले संगणकीय साहित्य खरेदी करावयाचे आहे परंतु या साहित्यांची कशी, कोठे, किती व कशासाठी आवश्यकता आहे, याचा उल्लेख दिसून येत नाही. करिता या सर्व बाबी माहिती तंत्रज्ञान विभागाकडून तपासून घेण्यात याव्यात व त्यांच्या अभिप्रायासह सदरहू प्रस्ताव फेरसादर करण्यात यावा" असे ठरले.

उपरोक्त मा.त्रिसदस्यीय समितीचे निर्णयानुसार, संदर्भ क्र.०३ अन्वये माहिती तंत्रज्ञान विभागाकडून अभिप्राय घेतला असता त्यांनी त्यांचा अभिप्राय खालीलप्रमाणे कळविला आहे.

1) As per Industry Standards, Firstly Software Should be selected/finalized, which will enable to indentify the operating systems & Licenses of application software required and then accordingly suitable hardware compatible with software shall be procured.

2) Secondly the software vendor can suggest the appropriate capacity of the Server & Computer nodes, Networking and Bandwidth requirement as per the software requirement in details taking into consideration for future up-gradation.

3) Also the networking requirement (Number of total nodes to be connected) & On-line UPS power distribution requirement should be taken into consideration.

उपरोक्त नमुद मुद्देनिहाय माहिती तंत्रज्ञान विभागाचे अभिप्रायानुसार, संदर्भ क्र.०४ ने सदरचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समिति पुढे फेरसादर करण्यात आला आहे. त्यावर दि. १६.०२.२०१६ रोजीच्या मा. व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्रमांक १८२ अन्वये "श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे दैनंदिन कामकाज सुरळीत चालावे याकरीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे अत्याधुनिक संगणक, हार्डवेअर साहीत्य, नेटवर्कींग RF साहीत्य, अत्याधुनिक संगणकीय साहीत्य तसेच अत्याधुनिक HMIS, PACS System, ॲन्टीव्हायरस प्रणाली इत्यादी खरेदी करणेकामी विहीत पद्धतीने ई– निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु. ३,५०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता घेणेसाठी संस्थान वकिलामार्फत मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये अर्ज दाखल करणेत यावा व मा खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले."

त्यानुसार संदर्भ क्र ०६ चे पत्रान्वये संस्थान वकिलामार्फत मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये अर्ज दाखल करणेबाबत विधी विभागास कळविण्यात आले आहे. तथापी, संदर्भ क्र. ७ चे पत्रान्वये विधी विभागामार्फत मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेणेकामी दाखल केलेले सिव्हील अर्ज मागे घेण्यात आलेले असल्याचे कळविले आहे. त्यानुसार संबंधित विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे तातडीने दोन दिवसांचे आत सादर करणेबाबतची कार्यवाही करणेबाबत सुचित करणेत आलेले आहे.

उपरोक्त विषयांकीत प्रस्तावाबाबत यापुर्वी निश्चित केलेप्रमाणे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता खालील परिशिष्ट "अ" नुसार संगणक व संगणकीय साहित्य सद्यस्थितीत, परिशिष्ट "ब" नुसार दोन्ही रुग्णालयाचे आवश्यकतेनुसार खरेदी करावयाची संगणक संच, प्रिंटर्स, सर्व्हर, यु.पी.एस., नेटवर्क स्विचेस, इ., परिशिष्ट "क" नुसार संगणक प्रणाली, PACS, ॲन्टीव्हायरस इ. तसेच इतर अनुषांघीक तांत्रिक साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे.

**परिशिष्ट "अ"**

| तपशिल | एकुण संख्या | सध्या कार्यान्वीत | पुर्ण बंद पडलेले | बंद पडणेच्या स्थितीत |
|---|---|---|---|---|
| संगणक | १५१ | ७५ | ७६ | ४० |
| प्रिन्टर्स | १०३ | ५८ | ४५ | ३० |
| युपीएस | १३७ | ४० | ९७ | २० |
| स्विचेस | १८ | १६ | ०२ | १२ |
| सर्व्हर | ०४ | ०२ | ०२ | ०२ |
| लॅपटॉप | ०१ | ०१ | ०० | ०१ |

**परिशिष्ट "ब"**

| तपशिल | संगणक | प्रिन्टर्स | युपीएस | स्विचेस | सर्व्हर | लॅपटॉप | टॅब |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण | १६० | १४० | १८० | २० | ७ | १० | ०५ |

उपरोक्त नमुद **परिशिष्ट "ब"** हार्डवेअर व नेटवर्क करीता अंदाजे रक्कम **रु. १,६७,३५,०००/-** मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

**परिशिष्ट "क"**

| तपशिल | |
|---|---|
| संगणकीय प्रणाली | श्री साईबाबा व श्रीसाईनाथ रुग्णालयाकरिता अत्याधुनिक प्रणाली (HMIS), PACS System प्रणाली, Marathi Font प्रणाली व अॅन्टी व्हायरस व इतर सॉफ्टवेअर. |

उपरोक्त नमुद परिशिष्ट "क" संगणकीय प्रणाली (HMIS) करीता अंदाजे रक्कम रु. ४५,००,०००/- मात्र, खर्च PACS System करीता अंदाजे रक्कम रु. ६०,००,०००/- मात्र, इतर सॉफ्टवेअर प्रणाली करीता अंदाजे रक्कम रु.७७,६५,०००/- मात्र, तसेच FMS (Facility Management Service) करीता १,२५,००,०००/- मात्र असे परिशिष्ट "क" करीता एकुण रक्कम रु.३,०७,६५,०००/- इतका खर्च अपेक्षीत आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता, सद्यस्थितीत दाखविलेला हार्डवेअर, सॉफ्टवेअर, नेटवर्क व इतर संगणकीय तांत्रिक साहित्यांचा एकूण नमुद खर्च हा अंदाजे प्रस्तवित केलेला आहे. श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता संगणकीय कार्यप्रणाली निश्चित झालेनंतर सॉफ्टवेअर पुरवठाधारक व संस्थानचे तांत्रिक सल्लागार यांचे अभिप्रायानुसार संगणक व संगणकीय साहीत्याचे Specification नुसार खरेदीबाबतची कार्यवाही संस्थानचे विहीत पद्धतीने करणे यथावह ठरेल, असे इकडील विभागाचे नम्र मत आहे.

तरी, उपरोक्त विषयांकीत प्रकरणी श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयांकरीता दि. ३१/१२/२०१५ रोजीचे प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे (HMIS), PACS System प्रणाली, Marathi Font प्रणाली व अॅन्टीव्हायरस व इतर सॉफ्टवेअर, तसेच संगणक, प्रिंटर्स, युपीएस, स्विचेस, सर्व्हर, लॅपटॉप, टॅब, इ. साहीत्य खरेदीसाठी अंदाजे रक्कम रु. ३,५०,००,०००/- (तीन कोटी पन्नास लाख रु. मात्र) तसेच माहिती तंत्रज्ञान विभागातील साईटेक प्रकल्पाच्या धर्तीवर FMS (Facility Management Service) द्वारे पुढील पाच वर्षासाठी तांत्रिक मनुष्यबळकरीता अंदाजे रक्कम रु. १,२५,००,०००/- (एक कोटी पंचविस लाख रु. मात्र), असे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता एकुण रु.४,७५,००,०००/- (अक्षरी- चार कोटी पंच्च्याहत्तर लाख रु. मात्र) मात्रचे खर्चास तसेच सदरची कार्यवाही संस्थानचे विहित पद्धतीने ई- निविदा प्रक्रियेद्वारे व तांत्रिक सल्लागार श्री.विजय नायडू सर यांचे मार्गदर्शनानुसार व अभिप्रायानुसारसदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये चर्चा होऊन, निर्णय होणेसूतव सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाचे अवलोकन केले असता, त्यामध्ये प्रिंटर्सची संख्या जास्त दिसून येते. प्रिंटर्सची संख्या कमी करणेसाठी रुग्णांचे शक्य तेवढे रिपोर्टस् इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांद्वारे रुग्णांना देणेची व्यवस्था करावी व रुग्णालयामधील प्रत्येक विभागासाठी आवश्यकतेनुसार एकाच प्रिंटरचा समावेशक करणेत येऊन नवीन अंदाजपत्रक तयार करणेत यावे. तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता विकसीत करावयाच्या संगणकीय प्रणालीचे स्वरुप व हार्डवेअर कसे असावे हे निश्चित करणेसाठी रुग्णालयाच्या संबंधीत अधिकाऱ्यांनी इतर ठिकाणच्या मोठया रुग्णालयांमधील संगणकीय प्रणालीची पहाणी करुन फेरप्रस्ताव सादर करावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**१२. श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाकरीता Multiparameter Monitor खरेदीकामी चौथ्यांदा फेर ई-निविदा मागविणेबाबत.**

श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाने दि.१३/०८/२०१३ रोजीचे मागणीपत्रान्वये (औषध भांडार विभाग प्राप्त दि. २४/१०/२०१३) एक नग Multiparameter Monitor ची मागणी केलेली आहे. सध्या जनरल ऑपरेशन थिएटर विभागामध्ये गायनिक, जनरल व आर्थोपेडिक या तीन विभागाच्या शस्त्रक्रिया होतात. त्यापैकी जनरल व गायनिक शस्त्रक्रियेनंतर पेशंट रिकव्हरीसाठी दोन Multiparameter Monitor आहेत. परंतु आर्थोपेडिक शस्त्रक्रियेनंतर रुग्णांना रिकव्हरीसाठी सध्या Monitor नाहीत. त्यामुळे त्यांनी नवीन एक नगाची मागणी केलेली आहे. सदरहू एक नग Multiparameter Monitor खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.३,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. एक रुग्ण शस्त्रक्रिया झाल्यानंतर तो काही तास डॉक्टरांच्या निगराणीखाली (Under Observation) ठेवावा लागतो. तीन शस्त्रक्रिया विभाग आहेत व तीन ऑपरेशन झाल्यानंतर तीन रुग्ण एकाच वेळेस येतात. परंतु Monitor ची संख्या दोनच आहे, त्यामुळे अजुन एक मॉनिटर घेणे गरजेचे आहे.

दि.25/09/2014 रोजीचे मा.त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र.867 अन्वये ०१ नग Multiparameter Monitor विहित पद्धतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.३,५०,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात आपला वार्ताहर मुंबई पुढारी – पुणे, दिव्य मराठी - नाशिक, जयहिंद मास्क कम्यूनिकेशन – अहमदाबाद, हितवाद – नागपूर या वर्तमान पत्रात देण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरात व निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण १०४ पुरवठाधारक यांना ईमेलद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. तसेच निविदा विक्रीची मुदत दि.०२/०२/२०१५ ते १८/०२/२०१५ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२०/०२/२०१५ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन ०१ निविदा प्राप्त झालेली आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Austin Health Care, Pune | 19/02/2015 |

उपरोक्तप्रमाणे खरेदीकामी एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे तसेच खरेदीकामी कमीत-कमी तीन निविदा आवश्यक असल्यामुळे सदरचे खरेदीकामी दि.२६/०३/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीन्वये पुन्हा वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दुस-यांदा फेर ई-निविदा मागविण्यात आलेल्या असून निविदा विक्रीची मुदत दि.०५/१०/२०१५ ते २४/१०/२०१५ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२६/१०/२०१५ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन ०१ निविदा प्राप्त झालेली आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Austin Health Care, Pune | 27/10/2015 |

उपरोक्तप्रमाणे खरेदीकामी जाहिरातीस अनुसरुन एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे दि.२४/११/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीन्वये पुन्हा वर्तमान पत्रात जाहिरात देऊन तिस-यांदा फेर ई-निविदा मागविण्यात आलेल्या असून निविदा विक्रीची मुदत दि.१५/०२/२०१६ ते ०५/०३/२०१६ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.०८/०३/२०१६ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Austin Health Care, Pune | 08/03/2016 |
| 2 | M/s. Shree Enterprises, Nagpur | 08/03/2016 |
| 3 | M/s. Excel Corporation, Nashik | 08/03/2016 |

वरीलप्रमाणे खरेदीकामी तिस-यांदा वर्तमान पत्रात दिलेल्या जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद तांत्रिक निविदा दि.१८/०३/२०१६ रोजीचे मा.उपसमिती सभेपुढे उघडण्यात आलेल्या असून तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येऊन सदर तांत्रिक तुलनात्मक तक्त्यावर वापर करणा-या डॉक्टरांची

शिफारस घेण्यात आलेली असून श्री साईनाथ रुग्णालयाचे जनरल ऑपरेशन थिएटरमधील जनरल सर्जन डॉ.राम नाईक यांनी सदर Multiparatmeter Monitor हा Philips कंपनीचाच पाहीजे असे सांगितले आहे, परंतु तांत्रिक तुलनात्मक तक्त्यात तीनही निविदाधारकांनी Philips कंपनीचे Specification दिलेले नाही, त्यामुळे डॉक्टरांचे मागणीनुसार Philips कंपनीचे Multiparatmeter Monitor खरेदीकामी चौथ्यांदा फेर ई-निविदा मागवाव्या लागणार आहेत.

तरी श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर या विभागासाठी फक्त Philips कंपनीचेच Multiparatmeter Monitor खरेदीकामी चौथ्यांदा फेर ई-निविदा मागविण्यास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, Philips कंपनीचा Multiparatmeter Monitor खरेदी करणेऐवजी त्या तपशीलाचा दुस-या कंपनीचा Multiparatmeter Monitor खरेदी करणेत यावा. तसेच याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**१३. श्री साईनाथ रुग्णालयातील Surgical ward No.2 या विभागाकरीता Multiparameter Monitor खरेदी करणेबाबत.**

श्री साईनाथ रुग्णालयातील Surgical ward No. 2 या विभागाने दि.१०/०६/२०१६ रोजीचे मागणी पत्रकान्वये (औषध भांडार विभाग मागणी प्राप्त दि.२९/०६/२०१६) Multiparameter Monitor दोन नगाची मागणी केलेली आहे.

सदर विभागामध्ये शस्त्रक्रिया झालेले पेशंट ॲडमिट असतात. ऑपरेशननंतर पेशंटचे E.C.G., SPO2, Heart rate, Blood Pressure चे नियमीत निरीक्षण करण्यासाठी Multiparameter Monitor वापरण्यात येतात. सध्या Surgical ward No. 2 या विभागात ०१ Micromon कंपनीचा Monitor असून तो व्यवस्थित कार्यान्वित आहे. परंतु सध्याअसलेल्या मॉनीटरवर रुग्णांचे फक्त E.C.G. दिसतो. SPO2, Heart rate, Blood Pressure इ.पॅरामीटर दिसत नाही त्यामुळे Surgical ward No. 2 या विभागाने दोन नविन Multiparameter Monitor ची मागणी केलेली आहे.

**<u>मागणी</u>–** १) श्री साईनाथ रुग्णालयातील Surgical ward No. 2 या विभागाने दि.१०/०६/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये (औषध भांडार विभाग मागणी प्राप्त दि.२९/०६/२०१६) मागणी केलेली आहे.

२) उपरोक्त विभागासाठी दोन नग Multiparameter Monitor खरेदीकामी M/s. Wipro यांनी दि. १५/०४/२०१६ रोजी दिलेल्या कोटेशननुसार अंदाजे प्रती नग रक्कम रु.२,१९,०००/- याप्रमाणे ०२ नगासाठी रक्कम रु.४,३८,०००/- (अक्षरी रुपये चार लाख अडतीस हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस– २०१४/ प्र.क्र.८२/ भाग– ३/ उद्योग– ४, दि.३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.– नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रु.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवर खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

**<u>विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत</u>:-** श्री साईनाथ रुग्णालयातील Surgical ward No. 2 या विभागामध्ये शस्त्रक्रिया झालेले पेशंट ॲडमिट असतात. ऑपरेशननंतर पेशंटचे E.C.G., SPO2, Heart rate, Blood Pressure चे नियमीत निरीक्षण करण्यासाठी Multiparameter Monitor वापरण्यात येतात. सध्या Surgical ward No. 2 विभागात असलेल्या मशिनवर रुग्णांचे फक्त E.C.G. दिसतो. SPO2,Heart rate, Blood Pressure इ.पॅरामीटर दिसत नाही. त्यामुळे त्यांचे मागणीनुसार ०२ नग Multiparameter Monitor विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करुन देता येतील.असे नम्र मत आहे.

तरी श्री साईनाथ रुग्णालयातील Surgical ward No.2 या विभागाकरीता दोन नग Multiparameter Monitor विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.४,३८,०००/- (अक्षरी रुपये चार लाख अडतीस हजार मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील Surgical ward No.2 या विभागाकरीता ०२ नग Multiparameter Monitor विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात यावी. परंतु सदरहू खरेदीकामीच्या जाहिरात प्रसिध्दीमध्ये फक्त तपशील देण्यात यावा, विशिष्ट एका कंपनीच्या नावाचा उल्लेख करण्यात येऊ नये, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**१४. श्री साईबाबा रुग्णालयातील CRU-I या विभागाकरीता Multiparameter Monitor खरेदी करणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण**

**प्रास्ताविक:-** श्री साईबाबा रुग्णालयातील CRU- I या विभागाने मागणीपत्रकान्वये Multiparameter Monitor दोन नगाची मागणी केलेली आहे.

सदर विभागामध्ये हृदय शस्त्रक्रिया झालेले पेशंट ॲडमिट असतात. ऑपरेशननंतर पेशंटचे E.C.G.,SPO2,Heart rate, Blood Pressure चे नियमीत निरीक्षण करण्यासाठी Multiparameter Monitor वापरण्यात येतात. सध्या CRU- I विभागात २० Multiparameter Monitor असून सर्व मॉनीटर व्यवस्थित कार्यान्वित आहेत, परंतु रुग्णांचे संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्यामुळे CRU- I या विभागामध्ये दोन नविन Bed वाढवल्यामुळे सदर विभागाने दोन नविन Multiparameter Monitor ची मागणी केलेली आहे.

**<u>मागणी –</u>**

१) श्री साईबाबा रुग्णालयातील CRU- I या विभागाने ०२ नगाची मागणी केलेली आहे.

२) उपरोक्त विभागासाठी दोन नग Multiparameter Monitor खरेदीकामी M/s. Wipro यांनी दि. २३/०४/२०१६ रोजी दिलेल्या कोटेशननुसार अंदाजे प्रती नग रक्कम रु.५,३०,०००/- याप्रमाणे ०२ नगासाठी रक्कम रु.१०,६०,०००/- (अक्षरी रुपये दहा लाख साठ हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस– २०१४/ प्र.क्र.८२/ भाग– ३/ उद्योग– ४, दि.३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.– नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रु.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवर खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु.३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु.३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे

**<u>विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत</u>:-** श्री साईबाबा रुग्णालयातील CRU- I या विभागामध्ये ॲडमिट पेशंटचे E.C.G., SPO2, Heart rate, Blood pressure चे नियमीत निरीक्षण करण्यासाठी Multiparameter Monitor वापरण्यात येतात तसेच दोन नविन Bed वाढवल्यामुळे सदर विभागाने दोन नविन Multiparameter Monitor ची मागणी केलेली आहे.त्यामुळे त्यांचे मागणीनुसार ०२ नग Multiparameter Monitor विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करुन देता येतील असे नम्र मत आहे.

तरी श्री साईबाबा रुग्णालयातील CRU I या विभागाकरीता दोन नग Multiparameter Monitor विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु. रु.१०,६०,०००/- (अक्षरी रुपये दहा लाख साठ हजार मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील CRU-I या विभागाकरीता ०२ नग Multiparameter Monitor विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात यावी. परंतु सदरहू खरेदीकामीच्या जाहिरात प्रसिध्दीमध्ये फक्त तपशील देण्यात यावा, विशिष्ट एका कंपनीच्या नावाचा उल्लेख करण्यात येऊ नये, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**१५. श्री साईबाबा रुग्णालयातील CRU-I या विभागातील Ventilator मशीनसाठी Humidifire खरेदी करणेबाबत.**

**<u>अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२)</u>**

**<u>प्रास्ताविक:-</u>** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील C.R.U. I या विभागाने मागणीपत्रकान्वये Ventilator मशीनसाठी ०१ नग Humidifire ची मागणी केलेली आहे.

C.R.U. I विभागामध्ये सध्या असलेले ०१ Ventilator मशीन सन २००६ मध्ये खरेदी करण्यात आलेले असून सदर मशिनचा उपयोग ह्दयाच्या शस्त्रक्रिया झालेल्या रूग्णांना कृत्रिम श्वासोच्छवास देण्याकरीता केला जातो.कृत्रिम श्वासोच्छवास देताना मशीन व्दारे पुरविली जाणारी हवा कोरडी असते त्यामुळे जास्त काळ Ventilator जोडल्यामुळे रूग्णांचे श्वासनलीकेस ईजा पोहचू शकते,त्याकरीता सध्या हवा ओलसर करुन वापरणेकामी Consumable प्रकारचे Humidifier वापरले जाते. सदरचे Humidifier हे एका पेशंटला एकच वापरले जाते,त्याची अंदाजे किंमत प्रती नग रु. १००/- इतकी आहे.अशा Consumable प्रकारचे Humidifier वापरण्याएवजी जर कायमस्वरुपी वापरण्यायोग्य Humidifier घेतले तर प्रत्येक वेळेस स्वच्छ करुन रुग्णास वापरता येईल व प्रती रुग्ण खर्चही कमी येईल तसेच कायमस्वरूपी विभागात उपलब्ध राहील. त्यामुळे C.R.U. I या विभागाने Ventilator मशीनसाठी Humidifire ची मागणी केलेली आहे.

**<u>मागणी –</u>**

१) श्री साईबाबा हॉस्पिटलमधील C.R.U. I विभागाने मागणीपत्रकान्वये ०१ नग Humidifire ची मागणी केलेली आहे.

२) सदर विभागासाठी ०१ Humidifier नग खरेदीकामी M/s. Maquet Gentinge Group यांनी दि.२९/०७/२०१६ रोजी दिलेल्या कोटेशननुसार अंदाजे रू १,८२,७८३.२५(अक्षरी रू. एक लाख ब्याएंशी हजार सातशे त्र्याएंशी मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस– २०१४/ प्र.क्र.८२/ भाग – ३ / उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.३ – रु. ५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु. ३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु. ३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी **DGS & D** कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील C.R.U. I विभागामध्ये ह्दयाच्या शस्त्रक्रिया झालेल्या रूग्णांना कृत्रिम श्वासोच्छवास देण्याकरीता Ventilator जोडल्यामुळे रूग्णांचे श्वासनलीकेस ईजा पोहचू शकते,त्याकरीता सदर हवा ओलसर करून एकदा वापरणे योग्य Consumable प्रकारचे Humidifier वापरले जाते. त्याचे ०१ नगाची अंदाजे किंमत रू.१००/- इतकी आहे.अशा Consumable प्रकारचे Humidifier वापरण्याएवजी जर कायमस्वरुपी वापरण्यायोग्य Humidifier घेतले तर प्रत्येक वेळेस स्वच्छ करून रुग्णास वापरता येईल तसेच प्रति रूग्ण खर्च देखील येणार नाही व कायमस्वरुपी

विभागात उपलब्ध राहील.त्यामुळे त्यांचे मागणीनुसार ०१ नग Humidifier विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करुन देता येईल असे नम्र मत आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील C.R.U.I विभागाकरीता Ventilator मशीनसाठी ०१ नग Humidifier विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. १,८२,७८३.२५ (अक्षरी रू. एक लाख ब्याएंशी हजार सातशे त्र्याएंशी मात्र) चे खर्चास मान्यता घेणेकामीच्या प्रस्तावास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील C.R.U.I विभागातील Ventilator मशीनसाठी ०१ नग Humidifier विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात यावी. परंतु सदरहू खरेदीकामीच्या जाहिरात प्रसिध्दीमध्ये फक्त तपशील देण्यात यावा, विशिष्ट एका कंपनीच्या नावाचा उल्लेख करण्यात येऊ नये, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**१६. श्री साईबाबा रुग्णालयातील Casualty विभागाकरीता Ventilator (Servo-1) खरेदी करणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण**

**प्रास्ताविक:-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील Casualty या विभागाने दि.१७/०५/२०१६ (औषध भांडार विभाग प्राप्त दि.०७/०६/२०१६) रोजीचे मागणीपत्रकान्वये ०१ नग Ventilator Machine ची मागणी केलेली आहे.

Casualty विभागामध्ये सध्या ०१ Ventilator मशीन असून ते सन २००६ मध्ये खरेदी करण्यात आले आहे, तर ०१ Ventilator ICCU या विभागाकडून मागविण्यात येऊन वापरण्यात येत आहे.सदर मशिनचा उपयोग अत्यवस्थ रूग्णांना कृत्रिम श्वासोच्छवास देण्याकरीता केला जातो.उपरोक्त विभागामध्ये यापूर्वी ०६ कॉट उपलब्ध होते परंतु दिवसेंदिवस रुग्णांची संख्यावाढत असल्यामुळे त्यांनी आणखी ०३ कॉट वाढवले आहे त्यामुळे, त्यांनी नवीन ०१ नग Ventilator ची मागणी केलेली आहे.

**मागणी –**

१) श्री साईबाबा हॉस्पिटलमधील Casualty विभागाने दि.१७/०५/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये (औषध भांडार विभाग प्राप्त दि.०७/०६/२०१६) मागणी केलेली आहे.

२) सदर विभागासाठी०१ नग Ventilator खरेदीकामी M/s. Maquet Getinge Group यांनी दि. २७/०७/२०१६ रोजी दिलेल्या कोटेशननुसार अंदाजे रू.१८,८१,१५७/- (अक्षरी रू. अठरा लाख एक्याऐंशी हजार एकशे सत्तावन्न मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस– २०१४ /प्र.क्र. ८२/ भाग– ३/ उद्योग– ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२. – नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रु.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवर खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत**:- श्री साईबाबा हॉस्पिटलमधील Casualty विभागामध्ये यापूर्वी ०६ कॉट उपलब्ध होते परंतु दिवसेंदिवस रुग्णांची संख्यावाढत असल्यामुळे त्यांनी आणखी ०३ कॉट वाढवले आहे त्यामुळे त्यांनी नवीन ०१ नग Ventilator ची मागणी केलेली आहे.त्यामुळे त्यांचे मागणीनुसार ०१ नग Ventilator विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करून देण्यास हरकत नाही, असे नम्र मत आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील Casualty विभागाकरीता ०१ नग Ventilator विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. १८,८१,१५७/- (अक्षरी रू. अठरा लाख एक्याऐंशी हजार एकशे सत्तावन्न मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील Casualty विभागाकरीता Ventilator (Servo-1) विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात यावी. परंतु सदरहू खरेदीकामीच्या जाहिरात प्रसिध्दीमध्ये फक्त तपशील देण्यात यावा, विशिष्ट एका कंपनीच्या नावाचा उल्लेख करण्यात येऊ नये, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**१७. सन २०१५-१६ मधील औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीकामी पुरवठा आदेश देण्यात आलेल्या M/s Surya Surgi Pharma, Nashik यांची सुरक्षा रक्कम कमी करणेबाबत.**

सन २०१५– १६ मधील औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीकामी M/s. Surya Surgi Pharma, Nashik यांना इकडील पत्र क्र.२२१० दि. १३/११/२०१५ अन्वये रु.481250/- इतक्या रक्कमेचा पुरवठा आदेश देण्यात आलेला होता.

सदर पुरवठा आदेशात ५% सुरक्षा रक्कम रु. २४९१३/- इतकी होती. सदर पुरवठा आदेशात Tab. Alpha Ketoanalogue, Inj Esmolol 100 Mg /10 Ml Amp व Inj Midazolam 1mg/ 5 Ml Vial करीता पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. त्याचा तपशील खालीलप्रमाणे –

| अ.नं. | तपशील | पुरवठा आदेशातील मागणी | लागणारी नग संख्या |
|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** |
| 1 | Tab. Alpha Ketoanalogue | 20000 | 1000 |
| 2 | Inj Esmolol 100 Mg /10 Ml Amp | 500 | 100 |
| 3 | Inj Midazolam 1mg/ 5 Ml Vial | 8000 | 3000 |

परंतु, तक्त्यातील रकाना नं ४ मध्ये नमूद केलेले नग संख्या घेतल्यास आपणास वर्षभर पुरु शकेल त्यांची वार्षिक सुरक्षा रक्कम रु.२४९१३/- इतकी होते परंतु प्रत्यक्षात लागणारी नग संख्या स्विकारल्यास त्यांची सुरक्षा रक्कम ही रु.१७८१९/- इतकी होईल.

त्यामुळे M/s.Surya Surgi Pharma, Nashik यांचेकडून Tab. Alpha Ketoanalogue, Inj Esmolol 100 Mg /10 Ml Amp व Inj Midazolam 1mg/ 5 Ml Vial हे उपरोक्त तक्त्यातील रकाना नं ४ मध्ये नमूद केलेले नग संख्या घेण्यास व त्यांचे वार्षिक सुरक्षा रक्कम रु.२४९१३/- ऐवजी रु.१७८१९/- इतकी घेण्यास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**१८. श्री साईनाथ रक्तपेढी विभागाकरीता जुने Platelet Agitator & Incubator Machine Buyback (परत) करुन नविन Platelet Agitator & Incubator Machine खरेदी करणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण**

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :- नवीन प्रस्ताव**

**प्रास्ताविक:-** श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाने मागणीपत्रकान्वये ०१ नग Platelet Agitator & Incubator Machine ची मागणी केलेली आहे.

सध्या श्री साईनाथ रक्तपेढी विभागात ०२ मशिन असून त्यापैकी एक मशिन हे सन १९९९ मध्ये रक्कम रू. ७३,७२०/- इतक्या रकमेत खरेदी केलेले आहे.सदरचे मशिन खरेदी केल्यापासून व्यवस्थित चालत होते परंतु सदर मशीन हे जुने झालेले असल्यामुळे वारंवार बंद पडत आहे काही रुग्णांना संपूर्ण रक्तातील फक्त Platelet या प्रकारच्या घटकाची आवश्यकता असते त्यावेळी उपलब्ध रक्त साठ्यातून Platelet हा घटक आवश्यकतेनुसार वेगळा करून Platelet Agitator या मशीनमध्ये २२°C तापमानाला साठविले जातात. त्यामुळे श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाने जुने ०१ मशीन बायबॅक करुन ०१ नग नविन Platelet Agitator & Incubator Machine ची मागणी केलेली आहे. सदरहु मशिनपैकी सन १९९९ मध्ये खरेदी केलेल्या मशीनची दि. ३१/०३/२०१६ अखेर घसारा किंमत रू.४१५.०० इतकी आहे.

**मागणी –**

१) श्री साईबाबा रुग्णालयातील श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाने मागणीपत्रकान्वये ०१ नग Platelet Agitator & Incubator Machine ची मागणी केलेली आहे.

२) उपरोक्त विभागासाठी नविन Platelet Agitator & Incubator Machine खरेदीकामी M/s. Remi Healthcare यांनी दि.२१/०७/२०१६ रोजी दिलेल्या कोटेशननुसार अंदाजे रक्कम रु.२,५३,१२५/- (अक्षरी रुपये दोन लाख त्रेपन्न हजार एकशे पंचवीस मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस– २०१४/ प्र.क्र.८२/ भाग– ३/ उद्योग– ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.३ – रु. ५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु.३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु.३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

३) सदरहु मशिनपैकी सन १९९९ मध्ये खरेदी केलेल्या मशीनची ३१/०३/२०१६ अखेर घसारा किंमत रू.४१५.०० इतकी आहे सदरची किंमत ही ५०,०००/- पेक्षा कमी असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४, मधील कलम नं १७ (४) अन्वये सदरचे खरेदीपुर्वी शासनाची मान्यता घ्यावी लागणार नाही.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** श्री साईनाथ रक्तपेढी विभागात असलेले Platelet Agitator & Incubator Machine जुने झाल्यामुळे वारंवार नादुरुस्तहोत आहे.त्यामुळे श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाने जुने ०१ मशीन बायबॅक करुन ०१ नग नविन Platelet Agitator & Incubator Machine ची मागणी केलेली आहे. त्यामुळे त्यांना नवीन मशिन विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करून देण्यास हरकत नाही असे नम्र मत आहे.

तरी श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाकरीता ०१ नग Platelet Agitator & Incubator Machine विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२,५३,१२५/- (अक्षरी रुपये दोन लाख त्रेपन्न हजार एकशे पंचवीस मात्र) चे खर्चास व जुने एक मशिन Buyback करणेस मान्यता घेणेकामीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवण्यास मान्यता असावी, ही विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रक्तपेढी या विभागाकरीता ०१ नग Platelet Agitator & Incubator Machine विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात यावी. तसेच जुने ०१ नग मशिन Buyback न करता त्याची ई-लिलावाद्वारे विक्री करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१९. **श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता Fully Automatic Bio-Chemistry Analyser Machine खरेदी करुन जुने Konelab मशिन Buyback करणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण**

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :- नवीन प्रस्ताव**

**प्रास्ताविक:-** श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागाने Fully Automatic Bio-Chemistry Analyser Machine ची मागणी केलेली आहे.

प्रयोगशाळा विभागामध्ये सध्या असलेले Nanolab व konelab हे दोन मशिन २००५ मध्ये रक्कम रू. १६,५०,०००/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आलेले होते.सदर मशिनवर दुरुस्ती व देखभालीचा खर्च ३१/३/२०१६ पर्यंत ८,०९,८३८/- इतका झालेला आहे. त्यापैकी Konelab हे मशिन बायोमेडीकल या विभागाने बायबॅक करणेस शिफारस केली आहे.सदरचे मशीनवर रक्त व लघवीच्या विविध तपासण्या केल्या जातात. उपरोक्त मशिनचा वापर हा १० वर्षापेक्षा जास्त झालेला असल्यामुळे नेहमी नादुरूस्तहोत आहे. परंतु रुग्णांच्या

संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे, त्यामुळे सदर विभागाने नविन Fully Automatic Bio-Chemistry Analyser Machine ची मागणी केली आहे. तसेच बायोमेडीकल इंजिनीयरींग विभागाने Konelab हे मशिन Buyback करून नवीन मशिन खरेदी करणेबाबत शिफारस केलेली आहे. सदर जुन्या मशीनची दि. ३१/०३/२०१६ अखेर घसारा किम्मत रू. ८१,३०२.४८ इतकी आहे.

**मागणी–**

१) श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागाने ०१ नगाची मागणी केलेली आहे.

२) उपरोक्त नवीन Fully Automatic Bio-Chemistry Analyser Machine खरेदीकामी M/s. Beckman Coulter India Pvt.Ltd. यांनी दि. ११/०८/२०१६ रोजी दिलेल्या कोटेशननुसार अंदाजे रक्कम रु.३७,८०,०००/- (अक्षरी रुपये सदतीस लाख ऐंशी हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२. – नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रु.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवर खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

३) जुन्या Fully Automatic Bio-Chemistry Analyser Machine (Konelab) ची घसारा वजा जाता दि.३१/०३/२०१६ अखेर किंमत रु ८१,३०२.४८ इतकी येत आहे. सदरची रक्कम ही रु.५०,०००/- पेक्षा जास्त असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४, मधील कलम नं. १७ (४) अन्वये सदरचे खरेदीपूर्वी शासनाची पूर्वमान्यता घ्यावी लागणार आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** प्रयोगशाळा विभागामध्ये सध्या असलेले Nanolab व konelab हया दोन मशिन पैकी Konelab ह्या मशिनचा वापर हा १० वर्षापेक्षा जास्त झालेला असल्यामुळे नेहमी नादुरूस्त होत आहे,त्यामुळे सदर विभागाने नविन Fully Automatic Bio-Chemistry Analyser Machine ची मागणी केली आहे.तसेच बायोमेडीकल इंजिनियरींग य विभागाने देखील Konelab मशिन Buyback करणेस शिफारस केली आहे. सदर जुन्या मशीनची दि. ३१/०३/२०१६ अखेर घसारा किम्मत रू. ८१,३०२.४८ इतकी आहे. त्यामुळे आपणास खरेदीपुर्वी शासनाची मान्यता घ्यावी लागणार आहे.तरी त्यांच्या मागणीनुसार ०१ नग Fully Automatic Bio-Chemistry Analyser Machine विहित पध्दतीने खरेदी करुन देण्यास हरकत नाही असे नम्र मत आहे.

तरी श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता एक Fully Automatic Bio-Chemistry Analyser Machine विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. रक्कम रु.३७,८०,०००/- (अक्षरी रुपये सदतीस लाख ऐंशी हजार मात्र) चे खर्चाच्या प्रस्तावास तसेच जूने मशिन Buyback करणेकामी महाराष्ट्र शासनाचे विधी व न्यायविभागाची मान्यता घेणेकामीच्या प्रस्तावास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता एक Fully Automatic Bio-Chemistry Analyser Machine विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात यावी. तसेच जुने मशिन Buyback न करता त्याची ई-लिलावाद्वारे विक्री करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२०. **श्री साईबाबा रुग्णालयातील Dialysis Unit या विभागाकरीता जुने Dialysis Machine Buyback (परत) करुन नविन Dialysis Machine खरेदी करणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण**

**प्रास्ताविक:-** श्री साईबाबा रुग्णालयातील Dialysis Unit या विभागाने दि.१६/०५/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये (औषध भांडार विभाग मागणी प्राप्त दि.०४/०६/२०१६) ०४ नग Dialysis Machine ची मागणी केलेली आहे.

सध्या डायलेसीस विभागात ४ मशिन हे Nipro कंपनीचे असुन त्यापैकी ०२ मशीन सन २००४ मध्ये रक्कम रू.१२,५०,०००/-, ०१ मशीन सन २००८ मध्ये रक्कम रू.५,००,०००/-इतक्या रकमेत खरेदी केलेले असून ०१ मशीन सन २००९ मध्ये रक्कम रू.४,९५,०००/- इतक्या देणगी स्वरुपात प्राप्त झालेले आहे. Dialysis Machine चा उपयोग मुत्रपिंड खराब झालेल्यारूग्णांच्या रक्तशुध्दीकरणासाठी होतो. सदरचे मशीन हे खरेदी केल्यापासून कार्यान्वित असल्यामुळे सध्या ते व्यवस्थित काम देत नाही. दिवसेंदिवस रुग्णांची संख्या सतत वाढतच आहे, त्यामुळे तेथील ४ मशिनवर कामाचा बोजा वाढतच आहे. मागील वर्षात २४०० रुग्णांचे डायलेसिस झालेले आहे. एका मशिनवर दरवर्षी सरासरी ५०० रुग्णांचे डायलेसिस होते.. रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे मशिनवर येणारा कामाचा ताण इ. चा विचार करता ते कोणत्याही क्षणी बंद पडू शकते, त्यामुळे Dialysis Unit या विभागाने जुने ०२ मशीन बायबॅक करुन ०४ नग नविन Dialysis Machine ची मागणी केलेली आहे. सदरहु मशिनपैकी सन २००४ मध्ये खरेदी केलेल्या दोन्ही मशीनची ३१/०३/२०१६ अखेर घसारा किंमत रू.३९,५९५/- इतकी आहे.

**मागणी –**

१) श्री साईबाबा रुग्णालयातील Dialysis Unit या विभागाने दि.१६/०५/२०१६ रोजीचे मागणी पत्रकान्वये (औषध भांडार विभाग मागणी प्राप्त दि.०४/०६/२०१६) मागणी केलेली आहे.

२) उपरोक्त विभागासाठी नविन Dialysis Machine खरेदीकामी M/s. Nipro Medical (India) Pvt.Ltd. यांनी दि.१२/०५/२०१६ रोजी दिलेल्या कोटेशननुसार प्रती नग अंदाजे रु. ७,००,०००/- (अक्षरी रुपये सात लाख मात्र) याप्रमाणे ०४ नगासाठी रक्कम रू. २८,००,०००/-(अक्षरी रुपये अठ्ठावीस लाख मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२. – नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रु.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवर खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

३) सदरहु मशिनपैकी सन २००४ मध्ये खरेदी केलेल्या दोन्ही मशीनची ३१/०३/२०१६ अखेर घसारा किंमत रू.३९,५९५/- इतकी आहे.सदरची किंमत ही ५०,०००/- पेक्षा कमी असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४, मधील कलम नं १७ (४) अन्वये सदरचे खरेदीपुर्वी शासनाची मान्यता घ्यावी लागणार नाही.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** सध्या डायलेसीस विभागात ४ मशिन उपलब्ध आहे. Dialysis Machine चा उपयोग मुत्रपिंड खराब झालेल्यारूग्णांच्या रक्तशुध्दीकरणासाठी होतो. सदरचे मशीन हे सतत १० वर्षापासून कार्यान्वित असल्यामुळे सध्या ते व्यवस्थित काम देत नाही. दिवसेंदिवस रुग्णांची संख्या सतत वाढतच आहे, त्यामुळे तेथील ४ मशिनवर कामाचा बोजा वाढतच आहे. मागील वर्षात २४०० रुग्णांचे डायलेसिस झालेले आहे. एका मशिनवर दरवर्षी सरासरी ५०० रुग्णांचे डायलेसिस होते. रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे मशिनवर येणारा कामचा ताण इ. चा विचार करता ते कोणत्याही क्षणी बंद पडू शकते, त्यामुळे Dialysis Unit या विभागाने जुने ०२ मशीन बायबॅक करुन ०४ नग नविन Dialysis Machine ची मागणी केलेली आहे. त्यामुळे त्यांचे

मागणीनुसार ०४ नग Dialysis Machine विहित पध्दतीने ई –निविदा मागवून खरेदी करुन देता येतील असे नम्र मत आहे.

तरी श्री साईबाबा रुग्णालयातील Dialysis Unit या विभागाकरीता ०४ नग Dialysis Machine विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. २८,००,०००/-(अक्षरी रुपये अठ्ठावीस लाख मात्र) चे खर्चास व जुने दोन मशिन Buyback करण्याच्या प्रस्तावास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील Dialysis Unit या विभागाकरीता ०४ नग Dialysis Machine विहित पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात यावी. तसेच जुने मशिन Buyback न करता त्याची ई-लिलावाद्वारे विक्री करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**२१. श्री साईबाबा रुग्णालयातील FSW या विभागाकरीता जुने ECG Machine Buyback (परत) करुन नविन ECG Machine खरेदी करणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण**

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :- नवीन प्रस्ताव**

**प्रास्ताविक:-** श्री साईबाबा रुग्णालयातील FSW या विभागाने दि.३०/०५/२०१६ रोजीचे मागणी पत्रकान्वये (औषध भांडार विभाग मागणी प्राप्त दि.०७/०६/२०१६) ०१ नग ECG Machine ची मागणी केलेली आहे.

सदर विभागामध्ये सध्या असलेले ECG Machine हे सन २००८ मध्ये M/s Schiller Health Care, India या कंपनीकडून खरेदी केलेले आहे. सदर विभागात २० ते २५ रूग्ण ॲडमीट असतात त्यांचे ECG करणे आवश्यक असते. सध्या असलेल्या ECG मशीनची Plastic External Body तुटलेली असून सध्या कंपनीकडे उपलब्ध नाही त्यामुळे सदर मशीनवर रूग्णांचे ECG करता येत नाही तसेच रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे मशिनवर येणारा कामाचा ताण इ.चा विचार करता ते कोणत्याही क्षणी बंद पडू शकते, त्यामुळे FSW या विभागाने ०१ नविन ECG Machine ची मागणी केलेली आहे तसेच जुने मशीन Buyback करावयाचे असून सदर जुन्यामशीनची दि. ३१/०३/२०१६ अखेर घसारा किंमत रू. ८०००/-इतकी आहे.
उपरोक्त विभागासाठी ०१ नग ECG Machine खरेदीकामी अंदाजे रु.१,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

**<u>मागणी–</u>** श्री साईबाबा रुग्णालयातील FSW या विभागाने दि.३०/०५/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये (औषध भांडार विभाग मागणी प्राप्त दि.०७/०६/२०१६) मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस– २०१४/ प्र.क्र.८२/ भाग–३/ उद्योग– ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.३ – रु. ५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु.३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु.३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

३) जुन्या मशीनची दि. ३१/०३/२०१६ अखेर घसारा किंमत रू. ८०००/-इतकी आहे. सदरची किंमत ही रु. ५०,०००/- पेक्षा कमी असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४, मधील कलम नं १७ (४) अन्वये सदरचे खरेदीपुर्वी शासनाची मान्यता घ्यावी लागणार नाही.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** श्री साईबाबा रुग्णालयातील विभागातील FSW विभागात सध्या असलेल्या ECG मशीनची Plastic External Body तुटलेली असून सध्याकंपनीकडे उपलब्ध नाही त्यामुळे मशीनवर रूग्णांचे ECG करता येत नाही तसेच रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे मशिनवर येणारा कामाचा ताण इ. चा

विचार करता ते कोणत्याही क्षणी बंद पडू शकते, त्यामुळे त्यांना नवीन मशिन विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदी करून देण्यास हरकत नाही असे नम्र मत आहे.

तरी श्री साईबाबा रुग्णालयातील FSW या विभागाकरीता जुने ECG मशीन Buyback करून नविन ०१ नग ECG Machine विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु.१,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख मात्र) चे खर्चास मान्यता घेणेकामीचा प्रस्तावास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील FSW या विभागाकरीता जुने ECG मशीन Buyback करून नविन ०१ नग ECG Machine विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात यावी. तसेच जुने मशिन Buyback न करता त्याची ई-लिलावाद्वारे विक्री करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**२२. श्री साईबाबा रुग्णालयातील ICCU या विभागाकरीता 10 KVA UPS खरेदी करुन जुना 10 KVA UPS परत (Buyback) करणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण**

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :- नवीन प्रस्ताव**

**प्रास्ताविक:-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील ICCU या विभागाने दि.२५/०५/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये 10 KVA UPS Single Phase - १ नगाची मागणी केलेली आहे.

ICCU विभागामध्ये सध्या एक 10 KVA UPS उपलब्ध असून तो सन २००६ मध्ये रक्कम रु.८३,९८०/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आलेला आहे.सदर UPS चा उपयोग ICCU मध्ये रुग्णांवर उपचार चालू असताना विद्युत पुरवठा अचानक बंद झाला तर मशिनरी बंद पडू नये म्हणून केला जातो. सदरहू UPS हा मागील १० वर्षापासुन व्यवस्थित काम करीत आहे, पण लाईट गेल्यास सदर UPS Back up देत नाही. ICCU विभागात अत्यंत गंभीर आजाराचे पेशंट Admit असतात त्यांच्यावर उपचार चालु असताना लाईट गेल्यावर UPS जर चालु झाला नाही तर पेशंटवर उपचार करण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात, त्यामुळे त्यांनी नविन एक 10 KVA UPS ची मागणी केलेली आहे. तसेच बायोमेडीकल विभागाने जुना UPS बायबॅक करुन नविन 10 KVA UPS खरेदी करणेबाबत शिफारस केलेली आहे.

मागणी–

१) श्री साईबाबा हॉस्पिटलमधील ICCU या विभागाने दि.२५/०५/२०१६ रोजीचे मागणीपत्रकान्वये (औषध भांडार विभाग प्राप्त दि.०२/०६/२०१६) मागणी केलेली आहे.

२) नविन UPS खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.९०,०००/- (अक्षरी रक्कम नव्वद हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच जुन्या UPS ची दि.३१/०३/२०१६ अखेर घसारा किंमत रु.३५४७.१६ इतकी आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस– २०१४/ प्र.क्र.८२/ भाग– ३/ उद्योग– ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.३ – रु. ५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु. ३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु. ३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

३) जुन्या 10 KVA UPS ची घसारा वजा जाता दि.३१/०३/२०१६ अखेर किंमत रु. रु.३५४७.१६ इतकी होत आहे. सदरची रक्कम ही रु.५०,०००/- पेक्षा कमी असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४, मधील कलम नं १७ (४) अन्वये सदरचे खरेदीपूर्वी शासनाची पूर्वमान्यता घ्यावी लागणार नाही.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत :-**

ICCU विभागामध्ये सध्या एक 10 KVA UPS उपलब्ध असून तो सन २००६ मध्ये खरेदी करण्यात आलेला असून फार जुना झालेला आहे त्यामुळे तो वारंवार बंद पडत असल्यामुळे सदरहू UPS बायबॅक करुन नविन 10 KVA UPS खरेदी करण्यास हरकत नाही असे मत आहे. तसेच जुन्या मशिनची दि.३१/०३/२०१६ अखेर घसारा किंमत रु.३५४७.१६ इतकी आहे. सदरची रक्कम ही रु.५०,०००/- पेक्षा कमी असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४, मधील कलम नं १७ (४) अन्वये सदरचे खरेदीपूर्वी शासनाची पूर्वमान्यता व मा.उच्च न्यायालयाची मान्यता घ्यावी लागणार नाही त्यामुळे जुना 10 KVA UPS Buyback करून नवीन खरेदी करण्यास हरकत नाही असे नम्र मत आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील ICCU विभागाकरीता जुना UPS परत (Buyback) करुन एक नवीन 10 KVA UPS विहित पध्दतीने कोटेशन मागवून मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.९०,०००/- (अक्षरी रक्कम नव्वद हजार मात्र) चे खर्चास मान्यता घेणेकामीचा प्रस्तावास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील ICCU विभागाकरीता नवीन 10 KVA UPS विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात यावी. तसेच जुना UPS, Buyback न करता त्याची ई-लिलावाद्वारे विक्री करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**२३. श्री. धनंजय पांडूरंग केकडे सोलापुर यांचे वैद्यकीय आर्थिक अनुदान मागणी अर्जाबाबत**

श्री.धनंजय पांडुरंग केकडे सोलापूर यांनी त्यांची पत्नी सौ.संध्या धनंजय केकडे, यांचे वैद्यकिय उपचारासाठी आर्थिक अनुदान मिळणेबाबत विनंती अर्ज केलेला असुन सदरचा अर्ज दि०७/०९/२०१६ रोजी ईकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सौ.केकडे ह्या कॅन्सर विकाराने आजारी असुन ते Onco-Life Cancer Center Pvt. Ltd., सातारा या रुग्णालयात उपचार घेत आहेत.

श्री साईबाबा संस्थानमार्फत गरीब व गरजु रुग्णांना त्यांचे वैद्यकिय उपचाराकरीता रुग्ण उपचार घेत असलेल्या रुग्णालयाचे नावे आर्थिक अनुदान देण्यात येते. वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावली प्रमाणे जे रुग्णालय नियमात बसत असतील त्यांची स्वतंत्र यादी तयार केलेली आहे. त्या यादीतीलच रुग्णालयांना रुग्णांचे नावे नियमावली प्रमाणे अनुदान दिले जाते.

करीता वरील रुग्ण सौ.केकडे यांनी सादर केलेले Onco-Life Cancer Center Pvt. Ltd., सातारा हे रुग्णालय वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावलीप्रमाणे तयार केलेली रुग्णालयाच्या यादीत बसत नसल्याने, सदर रुग्णास अनुदान देता येत नाही.

तसेच दि.०७/०९/२०१६ रोजी त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रात पुढील प्रमाणे अपुर्तता आहे

१) रुग्णालय प्रमाणपत्रावर उपचाराचा कालावधी सादर केलेला नाही.
२) रेशनकार्डची प्रमाणीत केलेली झेरॉक्स प्रत जोडलेली नाही.
३) उत्पन्नाबाबतचे प्रतिज्ञापत्र नाही.
४) उत्पन्नाचे प्रमाणपत्र नाही.
५) रुग्णालय प्रमाणपत्रावर सदर रुग्ण राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचा लाभार्थी नाही असा स्पष्ट उल्लेख केलेला नाही.

सादर केलेले Onco-Life Cancer Center Pvt. Ltd., सातारा हे रुग्णालय वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावलीप्रमाणे तयार केलेली रुग्णालयाच्या यादीत बसत नसल्याने, अनुदान देता येत नाही. याबाबत रुग्णास दि.०५/१०/२०१६ रोजी जा.नं.एसएसएस/ एसएसएच/ अनुदान/ १४२४/ २०१६ या पत्रानुसार कळविले आहे. तसेच अपुर्ण पेपर बाबत सर्व माहिती त्यांना दिलेली आहे.

संस्थानचे वैदयकिय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार मान्यता प्राप्त यादीत सदरचे रुग्णालय बसत नसल्याने श्री.केकडे यांना संस्थान मार्फत वैदयकिय आर्थिक अनुदान देणे अशक्य आहे.

श्री.केकडे यांना आर्थिक मदत मंजुर करणेकामी सदरचा अर्ज माव्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणे बाबत मा.कार्यकारी अधिकारी सो. यांची दि. ०९/१०/२०१६ रोजी ची मंजूर टिपणी.

तरी श्री.धनंजय पांडुरंग केकडे सोलापूर यांचे वैदयकिय आर्थिक अनुदान मागणी अर्जाबाबत चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.धनंजय पांडुरंग केकडे, सोलापूर यांना त्यांचे पत्नीचे उपचाराकरीता सहानुभूतीचे दृष्टीने एक विशेष बाब म्हणून संस्थानमार्फत रु.२५,०००/- मात्र वैदयकिय आर्थिक अनुदान देण्यात यावे.**

**तसेच ज्या रुग्णांना संस्थानमार्फत वैदयकिय आर्थिक अनुदान देणेत येते, त्या अनुदानाच्या वापराबाबतचे संबंधीत रुग्णालयाकडून तपशील मागविणेत यावा व अनुदानाबाबत रुग्णांचा अभिप्राय घेण्यात यावा. अनुदान मागणीसाठी ज्या रुग्णालयातील रुग्णांचे जास्त अर्ज असतील अशा, रुग्णालयास अचानक भेटी देण्यात येऊन, प्रत्यक्ष पहाणी करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षक)

---

**२४. महाराष्ट्रातील ग्रामीण, दुर्गम भागातील गरीब, गरजु रुग्णांना तात्काळ वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देणेसाठी ५०० रुग्णवाहीकांचा प्रकल्प राबविणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन अधिनियम-२००४ तरतुद-**

१) महाराष्ट्र शासन अधिनियम-२००४ मधील १७ (२-ण) मध्ये मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला अपत्ती मध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

२) महाराष्ट्र शासन अधिनियम-२००४ मधील १७ (४) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये विहित केलेले पन्नास हजार रुपयापेक्षा अधिक किंमतीचे कोणतेही जडजवाहीर दागिणे व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पुर्वमंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडुन विकण्यात येणार नाही तारण म्हणुन ठेवता येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रमीत करता येणार नाही.

३) महाराष्ट्र शासन अधिनियम-२००४ मधील २१ (१क) (२)मध्ये पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहिली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरण योग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापराता व खर्च करता येईल.-

(एक) राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेला एखादी नोंदणीकृत सावर्जनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर-वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखाभाल करुन घेणेसाठी छाननी समितीचे मान्यतेने अर्थसाहय्य देण्याची तरतुद आहे.

**प्रास्तविक-** श्री साईबाबांनी त्यांच्या हयाती मध्ये स्वत:च्या हाताने अनेक रुग्णांची सेवा सुश्रुषा करुन त्यांच्या व्याधी ब-या केलेल्या आहेत. श्री साईबाबांनी केलेले हे रुग्णसेवेचे कार्य श्री साईबाबा संस्थानने अविरतपणे पुढे सुरु ठेवलेले आहे. आजमितीस शिर्डीमध्ये संस्थान मार्फत श्री साईबाबा व श्रीसाईनाथ या दोन रुग्णालयामार्फत ही सेवा अल्पदरात उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

श्री साईबाबांचे हे रुग्णसेवेचे कार्य पुढे अशेच चालु ठेवुन त्यांची व्याप्ती वाढविण्याकरीता मा. व्यवस्थापन समितीने दि.३१/०८/२०१६ रोजीचे सभेतील विषय क्र.२३ निर्णय नं.६३७ (१८) अन्वये, "*राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील अधिकाधिक रुग्णांपर्यंत तातडीने वैद्यकीय सेवा पोहचविणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व दानशुर साईभक्त यांचे संयुक्त विद्यमाने राज्यातील विविध भागातील स्वयंसेवी संस्थांना रुग्णवाहीका उपलब्ध करुन देण्याचा उपक्रम सुरु करण्याचा व्यवस्थापन समितीचा मानस आहे. सदरचा उपक्रम सुरु करण्यासाठी ५०० रुग्णवाहीका (Ambulance) खरेदी कराव्या लागतील. या रुग्णवाहीकांच्या खरेदीसाठी रुग्णवाहीका प्रकल्प राबविणा-या स्वयंसेवी संस्थांनी त्यासाठीची २५ टक्के रक्कम भरावी व उर्वीरत ७५ टक्के रक्कम दानशुर देणगीदार साईभक्ताच्या देणगीमधुन उपलब्ध करावयाची आहे. याकरीता या उपक्रमासाठी देणगीदार साईभक्त आपल्या आई-वडीलांच्या स्मृतीपित्यर्थ अथवा इतर कार्यानिमित्त देणगी देऊ शकतात. अशा प्रकारे देणगीदारांना आवाहान करण्यात यावे. या सर्व रुग्णवाहीका साई ॲम्बुलन्स या नावाने महाराष्ट्रभर चालतील व त्यांचे संचालन स्वयंसेवी संस्थामार्फत होईल अशा प्रकारे कार्यवाही करण्यात यावी*" असा निर्णय घेतलेला आहे.

श्री साईभक्तांकडून देणगीरक्कम स्विकारणे करीता प्रथम कोणत्या प्रकारच्या रुग्णवाहीका द्यावयाच्या आहेत? हे निश्चित होणे आवश्यक आहे. सध्या बाजारात उपलब्ध असलेले लहान आकाराच्या रुग्णवाहीकाची माहिती खालील प्रमाणे आहे.

**रुग्णवाहीका प्रकार -**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **०१)** | **पेट्रोल -** | **अंदाजे किंमत (विम्यासह)** | **७५%** | **२५%** |
| | ०१) मारुती व्हॅन (ओमनी) | ३,१५,०००/- | २,३६,३५०/- | ७८,७५०/- |
| | ०२) मारुती इको | ४,१५,०००/- | ३,११,२५० | १,०३,७५०/- |
| **०२)** | **डिझेल -** | | | |
| | ०१) टाटा सुमो | ५,५०,०००/- | ४,१२,५००/- | १,३७,५००/- |
| | ०२) टाटा विंगर | ८,१०,०००/- | ६,०७,५००/- | २,०२,५००/- |
| | ०३) तवेरा | ७,४०,०००/- | ५,५५,०००/- | १,८५,०००/- |
| | ०४) ट्रक्स (फोर्स कं.) | ७,००,०००/- | ५,२५,०००/- | १,७५,०००/- |
| | ०५) बोलेरो (महिंद्रा कं.) | ५,८४,०००/- | ४,३८,०००/- | १,४६,०००/- |

वर नमुद केलेप्रमाणे ५०० रुग्णवाहीका खरेदी करणेसाठी बाजारामध्ये विविध प्रकार उपलब्ध आहेत. परंतू सर्व दृष्टीने योग्य अशा एकाच कंपनीच्या रुग्णवाहीका ई-निविदेद्वारे खरेदी कराव्या लागतील. त्यासाठी रुग्णवाहीकेची कंपनी व प्रकार (मॉडेल) निश्चित होणे आवश्यक आहे.

मा.व्यवस्थापन समितीने दि.३१/०८/२०१६ रोजीचे सभेतील विषय क्र.२३ निर्णय नं.६३७ (१८) अन्वये ५०० रुग्णवाहीका खरेदी करुन त्या महाराष्ट्रातील ग्रामीण व दुर्गम भागातील गरीब व गरजु रुग्णांच्या सेवेसाठी सुरु करणे करीता त्याठिकाणी काम करणा-या स्वयंमसेवी संस्थेकडून निर्णयात ठरले प्रमाणे त्यांचेकडून २५ टक्के रक्कम जमा करुन घेवुन त्यांचेशी विहीत पध्दतीने करारनामा करुन त्यांना त्या संस्थानचे अटी-शर्तीवर रुग्ण सेवेकरीता देता येतील.

तसेच या प्रकल्पात देणगी देवुन जे साईभक्त सामील होतील त्यांचेसाठी संस्थान नियमावली असणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे संस्थान, श्री साईभक्त व स्वयंसेवी संस्थायांचेसाठी खालील प्रमाणे नियमावली तयार करण्यात आलेली आहे. नियमावलीत नमुद केले प्रमाणे रुग्णवाहीका प्रकल्पाशी संबंधीत असलेले विभाग व त्यांनी करावयाची कामे या बाबत अलाहीदा आदेश/ परिपत्रक काढुन विभागवार कामे सोपविले जातील.

**अ) संस्थानसाठीची नियमावली**

१) देणगीदार साईभक्ताकडुन रु.२,२५,०००/- व सेवाभावी संस्थेकडून रु.७५,०००/- अगर ॲम्बुलन्सच्या किंमतीच्या एकुण ७५ % साईभक्ताने व उर्वरित २५% सेवाभावी संस्थेची राहील.

२) ॲम्बुलन्स सेवाभावी संस्थेस ५ वर्षाचे मुदती करीता चालविण्यास देण्यात येईल.

३) सेवाभावी संस्थेची नियमाप्रमाणे आवश्यकती कागदपत्रे तपासुन एका संस्थेस फक्त एक रुग्णवाहीका या प्रकल्पाअंतर्गत देण्यात येईल.

४) रुग्णवाहीकेची खरेदी ई-निविदाद्वारे मोठ्याप्रमाणात वर्तमानपत्रात जाहीरात देऊन करणेत येईल.

५) ॲम्बुलन्सची नोंदणी व पहिल्या वर्षीचा विमा ॲम्बुलन्स हस्तांतरीत करतेवेळेस संस्थानमार्फत संस्थानच्या नावावर करण्यात येईल.

६) संस्थानच्या वाहन विभागाने ॲम्बुलन्स प्रकल्पातील ॲम्बुलन्स खरेदी पर्यंतची कार्यवाही करावयाची आहे. त्यापुढील संपुर्ण कार्यवाही नियमावलीप्रमाणे संस्थानचे रुग्णालय अनुदान विभागामार्फत केली जाईल. त्यामध्ये प्रतीवर्षी रुग्णवाहीकेची विमा नुतणीकरणाची प्रत सदर सेवाभावी संस्थेकडून प्रात करुन घेणे सर्व ॲम्बुलन्सचा हिशोब ठेवणे. त्यांच्या नोंदी अद्यायावत करणे. ॲम्बुलन्सची तपासणी करुन लॉगबुक पाहणे व तत्संबंधीत सर्व कामे रुग्णालय विभाग पाहील.

७) ॲम्बुलन्सचे ५ वर्ष पुर्ण झालेनंतर त्या रुग्णालय विभागाने संबंधीत सेवाभावी संस्थेकडून जमा करुन घेवुन संस्थानचे वाहन विभागात जमा करावयात.

८) संस्थानने संबंधीत सेवाभावी संस्थेकडून ॲम्बुलन्सचा वापर व परत संस्थानकडे जमा करणे इत्यादी गोष्टीचा नमुण्यात ठरवुन दिल्याप्रमाणे करारनामा करणे आवश्यक आहे.

९) ॲम्बुलन्स प्रकल्पासाठी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार या प्रकल्पासाठी व त्याप्रमाणे कार्यवाही करणेस महाराष्ट्र शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. मान्यता मिळालेनंतर संपुर्ण कागदपत्रांची पुर्तता झालेनंतरच वाहन विभागामार्फत ईनिविदेद्वारे खरेदी प्रक्रीया राबविणे.

१०) जे देणगीदार साईभक्ताचे संपुर्ण ॲम्बुलन्सच्या ७५ टक्के देतील त्यांना ५ वर्षे प्रत्येकी वर्षी १ वेळेस दर्शन, आरती त्यांच्या कुटूंबास देण्याची सोय करणे.

११) जे साईभक्त एका ॲम्बुलन्सच्या पुर्ण किमतीच्या ७५ टक्के रक्कम देणगी म्हणुन देतील त्या साईभक्तांनी दिलेली १/ २ नांवे एका ॲम्बुलन्सवर संस्थानने ठरवुन दिलेल्या नमुन्यात व आकारात मराठी/ इंग्रजी मधुन प्रदर्शित करणे

१२) मा.व्यवस्थापन समितीने ठरविले प्रमाणे सदर साई ॲम्बुलन्स हा प्रकल्प ५०० रुग्णवाहीके करीता मर्यादीत असुन महाराष्ट्रातील सर्व तालुक्यात तसेच प्राध्यान्याने आदिवासी, दुर्गम भागात रुग्णाचे सेवेसाठी सदर प्रकल्प सेवाभावी संस्थेमार्फत राबविण्यात येईल.

**ब) सदर प्रकल्पासाठी देणगी देणारे साईभक्तांसाठी नियमावली.**

१) देणगीदार साईभक्तांना देणगी देणेसाठी कमीत कमी व जास्तीत जास्त रक्कमेची अट राहणार नाही. ते स्वच्छेने या प्रकल्पातील रुग्णवाहीकेसाठी देवु शकतील.

२) जे साईभक्त एका ॲम्बुलन्सच्या पुर्ण किमतीच्या ७५ टक्के रक्कम देणगी म्हणुन देतील त्या साईभक्तांनी दिलेले १/ २ नांवे एका ॲम्बुलन्सवर संस्थानने ठरवुन दिलेल्या नमुन्यात व आकारात मराठी / इंग्रजी मधुन प्रदर्शित केले जातील

३) साईभक्तांना त्यांनी दिलेल्या रक्कमेची देणगी पावती त्वरीत देता येईल.

४) जे साईभक्त किमान २५ हजाराची देणगी देतील त्यांना सध्याचे संस्थान नियमाप्रमाणे एक वेळेस दर्शन / आरतीची सोय करता येईल.

५) जे देणगीदार साईभक्ताचे संपुर्ण ॲम्बुलन्सच्या ७५ टक्के रक्कम देतील त्यांना ५ वर्षे प्रत्येकी वर्षी १ वेळेस दर्शन व आरती त्यांच्या कुटुबास देण्याची सोय करण्यात येईल.

६) देणगीदार साईभक्तांचे या प्रकल्पातील कोणत्याही रुग्णवाहीकेवर प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष नियंत्रण अगर मालकी राहणार नाही.

**क) स्वयंसेवी संस्थेकरीता नियमावली-**

१) स्वयंसेवी संस्था म्हणून रोटरी क्लब, लायन्स क्लब व नोंदणीकृत सेवाभावी संस्था यांचा समावेश राहील.

२) ज्या स्वयंसेवी संस्थाया प्रकल्पात समाविष्ट होवु शकतात त्यांना या प्रकल्पातील जास्तीत जास्त एक ॲम्बुलन्स रुग्णसेवे करीता मिळु शकेल.

३) सेवाभावी संस्था मा.धर्मदाय आयुक्त यांचेकडे नोंदणीकृत असावी.

४) सदर संस्थेची नोंदणीकृत दाखला किमान ३ वर्षपुर्वीचा असावा.

५) सेवाभावी संस्थेतील लेखापरिक्षण नियमित (प्रतिवर्षी) होणे आवश्यक असुन मागील ३ वर्षाचे ताळेबंद जोडणे आवश्यक राहील.

६) सेवाभावी संस्थेची आर्थिक वार्षिक उलाढाल (टर्नओव्हर) रु.दहा लाख असावा.

७) सेवाभावी संस्थेवर कोणतेही गैरव्यवहारातील आरोप/ गुन्हे नसावेत.

८) सेवाभावी संस्थेवरील अध्यक्ष व इतर पदाधिकारी सामाजीक कार्याशी संबंधीत असावेत.

९) या प्रकल्पाकरीता संस्थानने ठरवुन दिलेली इतर कागदपत्रे तपासणीनंतर व सेवाभावी संस्थेकडुन २५ टक्के रक्कम भरलेनंतर त्या संस्थेचा या प्रकल्पात समावेश करण्यात येईल.

१०) स्वयंसेवी संस्थेला सदर रुग्णवाहीका ही रुग्णांना सेवा देणेकरीता वापरावी लागेल. त्यात कोणत्याही प्रकारची अवैध्य प्रवासी वाहतुक करता येणार नाही, असे अढळुन आल्यास त्यावर गुन्हा नोंदविण्याचे व रुग्णवाहीका परत घेण्याचे संपुर्ण हक्कसंस्थानला राहतील.

११) स्वयंसेवी संस्थेला रुग्णाकडून सदर रुग्णवाहीका वापरासाठी घ्यावयाचा सेवाआकार प्रति कि.मी. संस्थान निश्चित करुन दिलेल्या दरानेच आकारणी करावी लागेल.

१२) स्वयंसेवी संस्थेला प्रथम वर्षानंतरचा विमा नुतणीकरण स्वखर्चाने करावे लागेल. विमा नुतनीकरण केलेनंतर त्याची प्रत १० दिवसाचे आत संस्थानचे रुग्णालय अनुदान विभागाकडे जमा करण्याची जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील.

१३) सदर रुग्णवाहीकेचा PUC, फिटणेस व टॅक्स माफी इत्यादी कामे वेळेत नुतनीकरण करणे संस्थेवर बंधनकारक राहील व या संबंधीत पुर्तता केलेबाबतची प्रतसंस्थानकडे वेळीच सादर करावी लागतील.

१४) स्वयंसेवी संस्थेला संस्थान सोबत स्वतंत्र करारनामा करुन द्यावा लागेल.

१५) काही कायदेशिरबाब उदभवल्यास त्याकरीता न्यायालयीन कार्यक्षेत्र राहाता, कोपरगांव कोर्टाचे न्याय कक्षेत राहील.

तरी साई रुग्णवाहीका प्रकल्प राबविणेसाठी रुग्णवाहीकेची कंपनी व प्रकार (मॉडेल) निश्चित होणे, देणगी रक्कम स्विकारणेची कार्यवाही निश्चित होणे, उपरोक्त नमुद केलेप्रमाणे नियमावलीस मान्यता मिळणे, मान्यतेनंतर सदर प्रस्ताव महाराष्ट्र शासनाचे मान्यतेस पाठविणे, शासन मान्यता मिळालेनंतर विहीत पध्दतीने ई-निविदा राबवुन रुग्णवाहीका खरेदी करणे, तत्संबंधीत करावयाची कार्यवाहीसाठी सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्रातील ग्रामीण, दुर्गम भागातील गरीब, गरजु रुग्णांना तात्काळ वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देणेसाठी ५०० रुग्णवाहीकांचा प्रकल्प राबविणेबाबतच्या प्रस्तावित नियमावलीचे अवलोकन करणेत येऊन, या नियमालीस व सदरहू प्रकल्प राबविणेसाठी महाराष्ट्र शासनाची परवानगी घेणेसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यात यावी.**

**तसेच शहरी भागामध्ये वापरण्यात येणाऱ्या साई रुग्णवाहीका तयार करणेकामी मारुती इको व ग्रामीण, पहाडी भागामध्ये वापरण्यात येणाऱ्या साई रुग्णवाहीका तयार करणेकामी टाटा सुमो अथवा महिंद्रा बोलेरो या कंपन्यांची वाहने खरेदी करणेत यावी. यासाठी सदरहू कंपन्यांबरोबर समिती सदस्य मा.श्री.प्रताप भोसले यांनी दरांबाबत चर्चा करावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

२५ **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.टी.स्कॅन (64 Slice) व एम.आर.आय. मशिनचे मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत प्रस्ताव फेर सादर.**

श्री साईबाबा हॉस्पिटलचे रेडीओलॉजी विभागात मे.सिमेन्स लि. मुंबई या कंपनीचे Somatom Sensation 64 CT Scanner हे मशीन संदर्भ क्र.1 अन्वये एकुण रू.3,98,37,835/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले असुन सदर मशिन करीता कंपनीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि.16/07/2006 रोजी पूर्ण झालेला आहे. सदर मशीन खरेदी करतेवेळी मा.व्यवस्थापन समितीच्या दि.13/03/2004 च्या सभेतील निर्णय क्र.95 अन्वये पुढील कालावधीतील सि.टी. स्कॅन मशिनसह खरेदी करण्यात आलेल्या सर्व ॲक्सेसरीजसह यांचे दुरुस्ती व देखभालीकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट CMC (Comprehensive Maintenance Contract) करणेबाबत निर्णय झालेला आहे. त्यानुसार कंपनीस देण्यात आलेल्या दि. 15/03/2005 च्या पुरवठा आदेशातील अ.क्र.15 अन्वये-

Comprehensive Maintenance Contract (CMC) price for the second year is Rs. 30 Lacs. For subsequent years the escalation of 5% will be applicable. The service tax will be extra.

The CMC includes even the Tube of the CT. Under this contract all parts & labor will be given free of cost. Payment for CMC to be done at start of each year after the demand of company.

तसेच मे. सिमेन्स लि. मुंबई, यांचेकडून Magnetom Avanto हे एम. आर. आय. मशीन एकुण रू. 5,05,00,000/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले आहे. सदरचे मशिन दि.1/06/07 रोजी कार्यान्वित करण्यात आलेले आहे. कंपनीने मशीनकरीता दिलेला दोन वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. 31/05/2009 रोजी संपला आहे.

सदर मशीन खरेदी करतेवेळी झालेला ठराव, कंपनीसोबत करण्यात आलेले ॲग्रीमेंट आणि कंपनीस दिलेल्या पुरवठा आदेशातील अटीनुसार पुढील कालावधीतील दुरुस्ती व देखभालीकरीता वार्षिक CMC (Comprehensive Maintenance Contract) करणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

'मशिनचा वॉरंटी कालावधी दोन वर्षाचा असून तो संपुष्टात आल्यानंतर कंपनीकडे CMC कॉम्प्रेहेन्सीव मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करण्यात यावे. तसेच याकामी कंपनीस पहिल्या वर्षी 20 लाख रूपये व त्यानंतर पुढील

प्रत्येक वर्षास 20 लाख अधिक 5 टक्के याप्रमाणे दरवर्षी 5 टक्के वाढ करून सदर CMC साठी आगाऊ रक्कम देण्यात यावी आणि सर्व्हीस टॅक्स वेगळा देण्यात यावा असे ठरले आहे.'

वरील अटीनुसार आजपावेतो मे.सिमेन्स हेल्थकेअर मुंबई यांचेकडे दरवर्षी सदर दोन्ही मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट दरवर्षी करणेत आले आहे.

यावर्षी सी.टी. स्कॅन मशिनचे दि.17/07/2016 ते दि.16/07/2017 या एक वर्षाच्या व एम. आर. आय. मशीनचे दि.01/06/2016 ते दि.31/05/2017 या कालावधीसाठी कॉम्प्रेहेन्सीव मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी मा.व्य.समितीच्या दि.09/10/2016 च्या सभेतील आयत्या वेळेच्या विषया नुसार मान्यता मिळाली आहे.

मे. सिमेन्स ली. मुंबई यांनी सी.टी. स्कॅन मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी एकुण रु.55,26,498/- (पुर्णांकित एकुण अक्षरी रु. पंचावन्न लाख सव्वीस हजार चारशे अठयान्नव मात्र) इतक्या रक्कमेची आणि एम.आर.आय. मशीनचे कॉम्प्रेहेन्सीव मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी सर्व करांसहीत एकुण रु.32,36,332/- (अक्षरी रु.बत्तीस लाख छत्तीस हजार तीनशे बत्तीस मात्र) इतक्या रक्कमेचा CMC करीता करारनामा पाठविला आहे.

तरी उपरोक्त दोन्ही मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी कंपनी प्रतिनिधीशी प्रत्यक्ष चर्चा करून दर निश्चित करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास तसेच CMC चे एकुण रकमेपैकी 50% रक्कम सहा महिन्यांनंतर व उर्वरीत 50 % रक्कम वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधी पुर्ण झालेनंतर अदा करणेस मान्यता असावी.

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.टी.स्कॅन (64 Slice) व एम.आर.आय. मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टच्या दराबाबत चर्चा करणेसाठी मे.सिमेन्स ली. मुंबई या कंपनीचे प्रतिनिधी श्री.सचिन कुलकर्णी, सर्व्हिस इंजिनियर हे उपस्थित होते. समितीने त्यांचेबरोबर प्रस्तावित मशिनच्या कॉम्प्रेहेन्सीव मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टच्या दराबरोबरच नवीन मशिन्स खरेदीच्या दरावरही चर्चा करणेत आली. परंतु कंपनीचे प्रतिनिधींनी नवीन मशिन्सच्या दराबाबत चर्चा करणेचे अधिकार नाही, असे सभेस सांगितले.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.टी.स्कॅन (64 Slice) व एम.आर.आय. मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचे दर व नवीन मशिन्स खरेदीचा दर यावर चर्चा करणेसाठी मे.सिमेन्स ली. मुंबई या कंपनीच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांना सभेसमोर बोलविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

२६ **मा.विश्वस्तांच्या सूचनांबाबत**

**आजचे रुग्णालय उपसमिती सभेमध्ये मा.सदस्यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडल्या, त्या मान्य करण्यात आल्या.**

(१) केंद्र शासनाच्या कंपनीज् ॲक्ट- २०१४ नुसार कंपन्यांना त्यांच्या निव्वळ वार्षिक उत्पन्नातून सामाजिक दायित्वासाठी २% रक्कम खर्च करण्याचे बंधन आहे. सदरहू २% रक्कम, कंपन्या रुग्णालयाकडील मशिनरी अथवा संस्थानमधील महत्वाचे उपक्रम यासाठी देऊ शकतील. यासाठी रुग्णालय व संस्थानकडील जनसंपर्क अधिकारी यांनी संस्थान स्तरावरुन संपर्क करुन कंपन्यांना तसे आवाहन करावे तसेच यासाठी संस्थान संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी. (जनसंपर्क अधिकारी, रुग्णालय व संस्थान/ माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.०३** **दिनांक १८.१०.२०१६ रोजी शिर्डी येथे जागतिक साईमंदिर परिषदेचा आढावा घेणेसाठी झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.७५७** सभेच्या सुरुवातीस कार्यकारी अधिकारी यांनी जागतिक साई मंदिर विश्वस्त परिषदेबाबत प्रास्तविक केले. या कार्यक्रमासाठी जगभरातील सुमारे १५०० रजिष्टर्ड साईमंदिरांचे पत्ते व मेल-आयडी मिळविणेत येऊन, सर्वांना या कार्यक्रमाच्या स्वरुपाचा ई-मेल केलेला आहे. १५०० निमंत्रण पत्रिकांची छपाई करणेत आलेली असून सर्व निमंत्रण पत्रिका पोष्टाद्वारे मान्यवरांना पाठविण्यात आलेल्या आहे व अजुनही काही साई मंदिरांचे पत्ते मिळत असून त्यांनाही या कार्यक्रमाचे निमंत्रण देण्याचे काम सुरु आहे. निमंत्रण पाठविण्यात आलेल्या सर्व साईमंदिरांना दिनांक १० नोव्हेंबर २०१६ पर्यंत संस्थानकडे नाव नोंदणी करणेबाबत कळविले आहे, तसेच यानिमित्ताने संस्थानच्या कोणकोणत्या विभागाने काय-काय कामे करावयाची आहेत, याचीही माहिती सभेस दिली.

यानंतर पुढीलप्रमाणे चर्चा झाली. जागतिक साई मंदिर विश्वस्त परिषदेसाठी जगभरातून येणाऱ्या सर्व मंदिरांच्या विश्वस्तांचे स्वागत करणेसाठी स्वतंत्र स्वागत कक्ष उभारणेत येऊन, तेथे जबाबदार अधिकाऱ्याची नियुक्ती करणेत यावी. या विश्वस्तांना मार्गदर्शन करणे तसेच संस्थानचे वेगवेगळे प्रकल्प दाखविणेकामी ज्युनियर कॉलेज व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील विद्यार्थ्यांना कार्यक्रमाबाबतचे व विश्वस्तांना कसे मार्गदर्शन करावयाचे याचे प्रशिक्षण देण्यात येऊन, त्यांची स्वयंसेवक म्हणून नेमणूक करणेत यावी व त्यांचेवर शिक्षकांनी सुपरविजन करावे. या स्वयंसेवकांनी विश्वस्तांना स्वागतकक्षापासून निवासव्यवस्था, स्टेज, भोजनव्यवस्था व समाधी मंदिर, प्रसादालय, संस्थान निवासस्थाने इ. बाबतची माहिती द्यावी व प्रत्यक्ष दाखवावे. तसेच जी ठिकाणे दाखवावयाची आहेत, अशा ठिकाणी साधारणत: ८X१२ साईजचे माहितीचे बॅनर लावण्यात यावेत.

संस्थानमधील विविध प्रकल्प तसेच साई समाधी शताब्दीबाबत माहितीपुस्तिका तयार करणेत यावी व कार्यक्रमासाठी येणाऱ्या विश्वस्तांना स्वागतकक्षावर सदरहू माहिती पुस्तिका देण्यात यावी. कार्यक्रमाच्या ठिकाणी स्टेजवर मोजक्याच मान्यवरांची बैठक व्यवस्था करावी, त्यासाठी खुर्च्यांवर मान्यवरांची नावे टाकण्यात यावी. अनेक ठिकाणी श्री साईबाबांची मोठ-मोठी मंदिरे आहेत, परंतु मुख्य समाधी मंदिर शिर्डीमध्येच आहे, याबाबतचा उल्लेख भाषणामध्ये करणेत यावा, अशीही चर्चा करणेत आली. तसेच कार्यक्रमाचे हिंदी/ इंग्रजी भाषेमधून सुत्रसंचालन करणेसाठी व्यावसायिक सुत्रसंचालकांची नेमणूक करणेत यावी व पत्रकार/मिडीया यांना बोलविणेत येऊन, त्यांची स्वतंत्र बैठक व्यवस्था करणेत यावी.

या कार्यक्रमासाठी देश-विदेशामधून मान्यवर व मंदिर विश्वस्त येणार असल्याने त्यांच्या चहा, पाणी, नाष्टा व जेवणाची व्यवस्था करणेसाठी स्वतंत्र मंडप उभारणेत यावा. या मंडपामधील व्यवस्था बाहेरील केटरर्समार्फत करणेत यावी, त्यासाठी केटरर्सला नाष्टा/ जेवणाचे पुढील मेनू ठरवून द्यावेत.

नाष्टा- इडली सांबर, मेंदू वडा, चटणी, शिरा, उपमा व एक प्रसादाचा लाडू तसेच चहा, फिल्टर कॉफी, दुध इ.

दुपारचे जेवण- मटर पनीर, बटाटा चटणी, पुरी, चपाती, वरण-भात, मसाले भात, व्हेज पुलाव, सिताफळ रबडी, जिलेबी, पापड, चटणी, लोणचे इ.

दुपारी४ वाजता- चहा, फिल्टर कॉफी, दुध, बिस्कीटे इ.

रात्रीचे जेवण- श्री साईप्रसादाल व्हीआयपी मध्ये.

रात्री भजनसंध्येसाठी साईभक्त तसेच पॉप सिंगर सुखविंदर सिंग यांना आमंत्रित करणेत यावे. ते येऊ शकत नसतील तर अनुप जलोटा, अनुराधा पौडवाल अथवा सुरेश वाडकर यांना बोलविणेत यावे.

सदरहू कार्यक्रम नियोजनबध्द व व्यवस्थितपणे पार पाडणेसाठी तसेच कर्मचारी/ स्वयंसेवक व कार्यक्रमासाठी येणारे विश्वस्त यांचेशी संपर्क/ मार्गदर्शन करणेसाठी व्यवस्थापन समिती सदस्यांच्या मार्गदर्शनाखाली खालीलप्रमाणे पोटसमित्या स्थापन करणेत आल्या. या पोटसमितीमधील सदस्यांनी संस्थान अधिकारी/ कर्मचारी व स्वयंसेवक यांना वेळोवेळी मार्गदर्शन करावे.

| पोटसमीतीचे नाव | कामाचे थोडक्यात स्वरुप | समिती सदस्याचे नाव |
|---|---|---|
| स्वागत समिती | येणाऱ्या मंदिर विश्वस्तांचे स्वागत करणे व कार्यक्रमाबाबत मार्गदर्शन करणे. | समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य |
| भोजन समिती | येणाऱ्या विश्वस्तांची अगोदरच्या दिवशी व कार्यक्रमाच्या दिवशी चहा, नाष्टा, जेवणाची व्यवस्था करणे, त्याचे नियोजन करणे व नियंत्रण ठेवणे. | मा.श्री.चंद्रशेखर कदम, मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे, मा.श्री.प्रताप भोसले, मा.श्री.बिपीनदादा कोल्हे |
| निवास समिती | येणाऱ्या विश्वस्तांची व मान्यवरांची निवासव्यवस्था करणे. | मा.श्री.चंद्रशेखर कदम, मा.श्री.सचिन तांबे |
| स्टेज समिती | स्टेजवरील मान्यवरांची/ येणाऱ्या विश्वस्तांची बैठक तसेच इतर अनुषंगीक व्यवस्था करणे व नियंत्रण ठेवणे. | मा.श्री.चंद्रशेखर कदम, मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे मा.श्री.बिपीनदादा कोल्हे मा.श्री.सचिन तांबे, |
| वाहन (यातायात) समिती | जगभरातून येणाऱ्या मंदिर विश्वस्तांना दर्शनासाठी तसेच संस्थानचे इतर प्रकल्प पहाणेसाठी वाहन व्यवस्था करणे व नियंत्रण ठेवणे. | मा.श्री.बिपीनदादा कोल्हे व उपकार्यकारी अधिकारी |

| | | |
|---|---|---|
| संरक्षण समिती | कार्यक्रमाच्या ठिकाणी सर्वव प्रकारची सुरक्षा व्यवस्था करणे व नियंत्रण ठेवणे. | मा.श्री.सचिन तांबे, मा.श्री.बिपीनदादा कोल्हे |
| तांत्रिक समिती | कार्यक्रमाच्या ठिकाणी Sound Systeem, Wifi, Lighting, Led Display यांची व्यवस्था करणे व नियंत्रण ठेवणे. | मा.श्री.प्रताप भोसले, मा.श्री.बिपीनदादा कोल्हे |

यानंतर पुढीलप्रमाणे कार्यक्रमाची रुपरेषा ठरविणेत आली.

जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषदेसाठी येणाऱ्या मान्यवरांना/ मंदिर विश्वस्तांना स्वागतकक्षावर माहिती पुस्तिका व प्रवेश पत्रिका देण्यात येईल. त्यानंतर कार्यक्रमाच्या हॉलमध्ये प्रवेश करतेवेळी तुतारी वाजविणेत येईल, कार्यक्रम सुरु होईपर्यंत हॉलमध्ये सनई वादन व गीत गायण होईल, कार्यक्रमाचे प्रास्तविक मा.अध्यक्ष महोदय करतील व उपस्थितांचे स्वागत मा.उपाध्यक्ष करतील. त्यामध्ये साई समाधी शताब्दी बद्दल माहिती व आपला उद्देश सांगण्यात येईल. तसेच समाधी शताब्दी निमित्ताने संपुर्ण भारतामधून काढावयाच्या रथाचे नियोजनाचा समावेश असेल. याचवेळी पहिले सत्र संपेल व स्नेहभोजन होईल.

स्नेहभोजनानंतर दुसऱ्या सत्रास सुरुवात होईल. त्यामध्ये आलेल्या मान्यवरांचे/ मंदिर विश्वस्तांचे मनोगत व साई समाधी शताब्दी निमित्त सुचना घेण्यात येईल, त्यासाठी त्यांना २-३ मिनिट वेळ देण्यात येईल. यानंतर दुसरे सत्र व कार्यक्रमाची सांगता होईल.

रात्रीचे भोजन श्री साईप्रसादालयामध्ये ठेवण्यात येईल, या निमित्ताने जगभरातून येणाऱ्या मान्यवरांना प्रसादालयाची माहितीही मिळेल. तसेच रात्री कार्यक्रमाच्या ठिकाणी विशाल साईभजन संध्याचे आयोजन करण्यात येईल व यासाठी नामांकित हिंदी/ मराठी गायकांना बोलविणेत येईल.

उपरोक्तप्रमाणे चर्चा करणेत येऊन, सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथे होणाऱ्या जागतिक साईमंदिर परिषदेचा आढावा घेणेसाठी झालेल्या उपरोक्त उपसमिती सभेच्या इतिवृत्ताचे अवलोकन करणेत येऊन, त्यानुशंगाने खालीलप्रमाणे सुचना करणेत आल्या.**

**उपरोक्त नियुक्त करणेत आलेल्या पोटसमित्या मधील भोजन व स्टेज समिती मध्ये मा.ॲड मोहन जयकर सो. यांचा तसेच संरक्षण व तांत्रिक समितीमध्ये मा.डॉ.राजेंद्र सिंग यांचा समावेश करणेत यावा. तथा भोजन व वाहन समितीमध्ये मा.सौ.अनिताताई जगताप यांचा समावेश करणेत यावा.**

**सदरहू चर्चासत्र कार्यक्रमासाठी समिती सदस्यांच्या अधिपत्याखाली बनविणेत आलेल्या समित्यांवर नेमणूक केलेबाबतची माहिती सदस्यांना कळविणेत यावी व कार्यक्रमाची रुपरेषा मिनीट-टू-मिनीट बनविणेत यावी.**

**चर्चासत्रामध्ये येणाऱ्या मंदिर प्रतिनिधींना संस्थान वाहनांद्वारे आपले प्रकल्प दाखवावेत. ज्यांना भाषण करावयाचे आहे, त्यांना भाषणासाठीचा विषय समजून सांगणेत यावा व त्याची एक प्रत आपल्याकडे घेण्यात यावी. समाधी शताब्दी महोत्सवामध्ये विविध शासकीय अधिकाऱ्यांचे सहकार्य घ्यावे लागणार आहे, यासाठी त्यांना महोत्सवाचे स्वरुप समजण्यासाठी या संबंधीत शासकीय अधिकारी व पालकमंत्री यांनाही कार्यक्रमाचे आमंत्रण देण्यात यावे. तसेच येणाऱ्या प्रिन्ट/ डिजीटल मिडीया प्रतिनिधींची स्वतंत्र बैठक व्यवस्था करणेत यावी व कार्यक्रमाचे फोटो संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावेत.** (कार्यवाही- शताब्दी कक्ष/ जनसंपर्क अधिकारी/ कनिष्ठ महाविद्यालय)

---

**विषय नं.०४ श्री शनि-महादेव-गणपती व श्री मारुती मंदिरामध्ये दररोज नैवेद्य दखविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-

| अ.क्र | कलम/तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकल/ उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १(झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल, व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व सर्व गोष्टी करील. |
| ०२ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १(ख) | रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे. |
| ०३ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

**प्रस्तावना-** श्रींचे समाधी मंदिरामध्ये काकड आरती पासुन ते शेजारती पर्यंत होणाऱ्या सर्व आरतीचे अगोदर/ नंतर नैवेद्य दाखविण्याची प्रथा पुर्वीपासुन आहे त्यामध्ये लोण्याचा नैवेद्य, न्याहारी, पुर्ण जेवणाचा, पिठल-भाकरी, शिराप्रसाद, तीर्थप्रसाद असे विविध प्रकारचे नैवेद्य श्रींचे समाधी मंदिरात दाखविण्यात येतात. त्याचप्रमाणे श्रींचे द्वारकामाईमध्ये सकाळी न्याहारीचा, सायंकाळी धुपारतीनंतर पिठलभाकरीचा नैवेद्य दाखविण्यात येतो. तसेच श्रीगुरुस्थान, श्रीदत्त मंदिर या मंदिरांमध्येही दुपारी पुर्ण नैवेद्य दखविण्याची पुर्वीपासुन प्रथा आहे. याव्यतिरीक्त सणाचे दिवशी सणाचे वैशिष्ट्याप्रमाणे व उपलब्धतेप्रमाणे गोड पदार्थ व इतर पदार्थ नैवेद्यकोठीमध्ये तयार करण्यात येतात. तसेच दिवाळीचे वेळीफराळाचे पदार्थ करण्यात येतात. त्याचा नैवेद्य श्रींना दाखविण्यात येतो. त्यानंतर नैवेद्य प्रसाद सर्व साईभक्तांना मिळावा यासाठी नैवेद्य दाखविल्यानंतर सर्व ताटे एकत्रीत करुन प्रसादालयाचे जेवणामध्ये मिसळण्यात येते.

**प्रस्ताव-** साईनिवास अतिथीगृह येथे दि.१९/०९/२०१६रोजी मा.अध्यक्ष महोदय, मा.उपाध्याक्ष व मा.विश्वस्त, मा.का.अ व मा.उपका.अ यांचे उपस्थीतीमध्ये झालेल्या चर्चेमध्ये शिर्डीचे ग्रामदैवत श्रीगणपती, श्रीमहादेव, श्रीशनि मंदिर व श्रीदक्षिणमुखी हनुमान मंदि याठिकाणी मंदिर विभागामार्फत दैनंदिन नैवेद्य दाखविणेबाबतची चर्चा होऊन कार्यवाही करणेत यावी अशी सुचना केलेली आहे

**विभागाचा अभिप्राय-** श्रीसाईबाबा मंदिर परिसरातील श्रीगणपती, श्रीमहादेव, श्रीशनि व श्रीमारुती असे ग्रामदैवतांची मंदिरे पुर्वीपासुन आहेततया मंदिरांचा संस्थानमार्फत पुर्वी जिर्णोद्धार करण्यात आलेला आहे संस्थान दैनंदिन या मंदिरांमध्ये देखरेखस्नान, पूजा-अर्चा व साफसफाई करणेत येते. परंतु, त्याठिकाणी कोणताही नैवेद्य या पुर्वीपासून दाखविण्यात येत नाही शास्त्राधाराप्रमाणे कोणत्याही देवतेचे पूजन अर्चनआरती व नैवेद्य होणे गरजेचे असते. त्याचप्रमाणे मा.अध्यक्ष महोदय यांनी नैवेद्य दाखविणेबाबत सूचना केल्या आहेत त्यानुसार खालीलप्रमाणे नियोजन करणेस मान्यता असावी, ही विनंती.

१. दररोज सकाळी ११.३० चे दरम्यान श्रीदत्त मंदिराप्रमाणे श्रीगणपती मंदिर, श्रीशनि मंदिर, श्रीमहादेव मंदिर व श्रीमारुती मंदिर असे चारही मंदिरांमध्ये संस्थानतर्फे श्रीदत्त मंदिरातील नैवेद्याचे पदार्थाप्रमाणे नैवेद्य दाखविणेस मान्यता असावी, ही विनंती.

२. तसेच नैवेद्य तयार करण्याकरिता अतिरीक्त स्त्री कर्मचारी लागणार आहे. तरी त्याकामी एक कायम कर्मचारी स्त्री मदतनीस नेमणेबाबत सामान्य प्रशासन विभागास (वशी-०१)आदेश होणेस विनंती आहे तरी सदरच्या प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.७५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे इतर मंदिरांप्रमाणेचश्री शनि-महादेव-गणपती व श्री मारुती मंदिरामध्ये दररोज नैवेद्य दखविणेस मान्यता देण्यात आली. परंतु त्याकामी अतिरिक्त कर्मचारी न देता, मंदिर विभागाकडील आहे त्याच कर्मचाऱ्यांकडून सदरहू काम करुन घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**विषय नं.०५** **मंदिर परिसरात दररोज धार्मिक कार्यक्रम (साईभजन संख्या/ किर्तन, प्रवचन) आयोजित करणेसाठी माहे नोव्हेंबर, २०१६ मधील खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.अध्यक्ष महोदय यांनी साईभक्तांना दर्शनाव्यतिरिक्त इतर वेळेमध्ये मंदिर परिसरात दररोज धार्मिक कार्यक्रम किर्तन, प्रवचन इत्यादी आयोजित करुन तो कार्यक्रम अगोदरच वेबसाईटवर प्रसिध्द करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. मा.अध्यक्ष महोदय यांचे निर्देशानुसार त्याबाबतची व्यवस्था सुरु करणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/०९/२०१६ चे सभेत आयत्या वेळचा विषय नं.१५, निर्णय क्र.६७२ नुसार खालीलप्रमाणे ठराव संमत झाला आहे- प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे, मंदिर परिसरामध्ये दररोज धार्मिक कार्यक्रमाचे (साईभजन संध्या/ किर्तन व प्रवचन) आयोजन करणे व तसे संस्थानचे संकेस्थळावर प्रसिध्द करणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. मंदिर परिसरामध्ये दररोज धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करणेचे काम मंदिर विभागाने आहे त्याच कर्मचा-यांकडून करुन घ्यावे व श्री.सुधांशु प्र लोकेगांवकर, संगीत व कला मार्गदर्शक यांनी त्यांचे काम संभाळून याकामी मंदिर विभागाने सुचविलेले काम करावे त्यासाठी श्री.लोकेगांवकर यांना वेगळा भत्ता देण्यात यावा, असे ठरले. तसेच सदरहू ठिकाणी सादर होणारे कार्यक्रम श्रीसाईबाबांच्या विचारांशी सुसंगत असावेत, आक्षेपाहर्य नसावेत, याकरीता कार्यक्रम सादर करणा-या कलाकारांना तसे कळविणेत यावे, अशा सुचना दिल्या.

**प्रस्ताव-** सदर निर्णयानुसार माहे-ऑक्टोबर-२०१६ पासुन दररोज दुपारी४ ते सायं.६ असे ०२ तास (धुपारतीचे नियोजनानुसार त्या अगोदर) व सायं.७.३० ते रात्रौ १०.०० असे २.३० तास समाधी मंदिराचे

उत्तरेकडील सारंजम बाग याठिकाणी धार्मिक कार्यक्रम (साईभजन संध्या/ किर्तन व प्रवचन) असे विविध प्रकारचे कार्यक्रम सुरु करण्यात आलेले आहेत. त्याकामी विविध कलाकारांना दुरध्वनी, ई-मेल व पत्राव्दारे त्यांची उपलब्ध तारीख, वेळ व मानधन इत्यादी माहिती घेण्यात आली आहे व त्यानुसार यादी माहे-नोव्हेंबर-२०१६ची यादी तयार करणेत आलेली आहे. परंतु, त्यामध्ये काही उर्वरित दिवसांकरीता कार्यक्रमाबाबतही विचारणा करण्यात येत आहे. तरी प्राप्त झालेल्या माहितीनुसार कलाकारांचे मानधन व उर्वरित दिवसांकरीता लागणारे मानधन इ. कामी माहे- नोव्हेंबर- २०१६ करीता अंदाजे खर्च रक्कम रु.४,७५,०००/- (रुपये चार लाख पंचाहात्तर हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

**विभागचा अभिप्राय-** तरी माहे नोव्हेंबर, २०१६ साईभजन संध्या/ किर्तन व प्रवचन असे विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित करणेकामी आलेल्या कालकारांचे मानधन आदा करणेकामी माहे-नोव्हेंबर-२०१६ करीता अंदाजे रु.४,७५,०००/- (रुपये चार लाख पंचाहात्तर हजार मात्र) खर्च अपेक्षीत आहे. तरी दैनंदिन होणाऱ्या कलाकार हजेरीच्या कार्यक्रमाकरीता निमंत्रीत केलेल्या कलाकारांना सदर खर्चाची रक्कम लेखाशाखेतुन घेऊन आदा करणेकामी सदर विषय मा.व्यवस्थापन समितीची मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.७५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदरहू कार्यक्रमांचे व कार्यक्रम पहाण्यासाठी असलेल्या उपस्थितीचे फोटो सर्व सदस्यांना ई- मेलद्वारे पाठविणेत यावे व संस्थानचे अधिकृत संकेस्थळावर प्रसिध्द करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मंदिर विभाग/ ध्वनिक्षेपण विभागप्रमुख)

---

**विषय नं.०६** **श्री साईनाथ स्तवनमंजीरी- तेलगू प्रकाशित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ स्तवनमंजीरी- तेलगू प्रकाशित करणे बाबत श्रीमती टि.शैलेजा, हैद्राबाद यांचे आवक क्र.१२४६८ दि.०६.१०.२०१६ अन्वये पत्र संस्थानला मिळालेले आहे. श्री साईनाथ स्तवनमंजीरी मराठीचा तेलगू भाषेत भाष्यनुवाद केलेला आहे सदर पुस्तक संस्थानव्दारे प्रकाशित करणेस विनंती केलेली आहे.

श्रीमती. टि. शैलेजा, हैद्राबाद यांचे मातृसाई- तेलगू व श्री साईनाथ सगुणोपासना तेलगू आरती (पॉकेट साईज) पुस्तके संस्थानव्दारे प्रकाशित करण्यात आलेले आहे.

संस्थानमार्फत श्री साईनाथ स्तवनमंजीरी मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती, कन्नड, तेलगू व पंजाबी भाषेत उपलब्ध आहेत. श्री साईनाथ स्तवनमंजीरी- तेलगू भाषेत श्रीमती मनी अम्मा, हैद्राबाद यांनी अनुवादीत संस्थान प्रकाशित असेलेले श्री साईनाथ स्तवनमंजीरी-तेलगू भाषेतील मूळ पद्यात्मक पुस्तीकेचा गद्य-भाष्यानुवादाचे पुस्तक मागील ०७ वर्षापासून प्रकाशित करुन पुस्तकालयात विक्री करण्यात येते व त्यास तेलगू भाषिक साईभक्तांचा प्रतिसादही चांगला आहे.

श्रीमती. टि. शैलेजा, हैद्राबाद यांनी ई मेल पत्र पाठवून श्री साईनाथ स्तवनमंजीरीचा तेलगू भाषेत उच्चार/ वाचन (Script) करणेकामी प्रकाशित करावी अशी विनंती केलेली आहे. सदर ई मेल पत्र वगळता अनुवादकांनी कोणतीही Soft/Hard कॉपी प्रकाशने विभागाकडे दिलेली नाही त्यामुळे सदर पुस्तकांची नमुनाबरहुकूम तपासणी झालेली नाही संस्थानमार्फत पुस्तके प्रकाशित करणेपूर्वी मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या लेटरहेडवर प्रमाणपत्रानुसार अनुवाद बरोबर आहे अशा आशयाचे पत्र सोबत जोडून मा.व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने प्रकाशित करण्याची पध्दत आहे.

श्रीमती टि.शैलेजा, हैद्राबाद यांच्याकडील नमुना पुस्तक, सी.डी. (Soft/Hard) व अनुवाद बरोबर असल्याचे मान्यताप्राप्त विद्यापीठाचे प्रमाणपत्र घेऊन संस्थानव्दारे श्री साईनाथ स्तवनमंजीरी- तेलगू भाषेत प्रकाशित करणेस परवानगी देता येईल, असे नम्र मत आहे.

सदर विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती टि.शैलेजा, हैद्राबाद यांनी श्री साईनाथ स्तवनमंजीरी मराठीचा तेलगू भाषेत केलेला भाष्यनुवाद संस्थानमार्फत प्रकाशित करणेपुर्वी त्यांचेकडील पुस्तक, सी.डी. (Soft/Hard) व तेलगू भाषेत केलेला अनुवाद हा बरोबर असल्याचे मान्यताप्राप्त विद्यापीठाचे प्रमाणपत्र सादर करणेबाबत कळविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.०७** **श्री साईबाबा संस्थानतर्फे मान्यवरांना श्री साई दैनंदिनी- २०१७ व दिनदर्शिका सन- २०१७ विनामुल्य भेट देणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र१४ कलम नं. १७ (ठ) मध्ये खालील प्रमाणेतरतुद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार – प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

श्री साईबाबांचा प्रचार व प्रसार म्हणून इतर प्रकाशनाखेरीज दरवर्षी संस्थान मार्फत श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका प्रकाशित केली जाते. दरवर्षी मा.अध्यक्ष महोदय, मा.उपाध्यक्ष महोदय, मा.विश्वस्त, मा.कार्यकारी अधिकारी, मा.उपकार्यकारी अधिकारी व सर्व प्रशासकीय अधिकारी यांना संस्थानच्या वतीने श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका विनामूल्य भेट म्हणून दिल्या जातात व त्याची रक्कम प्रकाशने विभाग खाते (Publication Expenses) खर्ची टाकली जाते.

सन २०१७ च्या दैनंदिनी व दिनदर्शिका संस्थानतर्फे विनामूल्य भेट देणेकामी खालील प्रमाणे सादर करीत आहे.

| अ.नं | तपशिल | श्री साई दैनंदिनी २०१७<br>रु.७०/-<br>नग संख्या | दिनदर्शिका (१ पाने) २०१७<br>रु.२०/-<br>नग संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | मा.अध्यक्ष महोदय, मा.व्यवस्थापन समिती | १०० | १०० |
| ०२ | मा.उपाध्यक्ष महोदय, मा.व्यवस्थापन समिती | १०० | १०० |
| ०३ | मा.सदस्य, मा.व्यवस्थापन समिती | १००० | १००० |
| ०५ | मा.कार्यकारी अधिकारी,<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी | १०० | १०० |
| ०६ | मा.उपकार्यकारी अधिकारी,<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी | १०० | १०० |
| ०७ | सर्व प्रशासकीय अधिकारी<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी<br>(प्रत्येकी २५नग X ०५ प्रमाणे) | १२५ | १२५ |
| | **एकुण नग** | **१५२५** | **१५२५** |
| | **एकुण किंमत** | **१,०६,७५०/-** | **३०,५००/-** |

श्री साई दैनंदिनी मोफत वाटप किंमत रु ०१,०६,७५०/- + श्री साई दिनदर्शिका मोफत वाटप किंमत रु. ३०,५००/- एकूण रुपये. ०१,३७,२५०/- (अक्षरी रुपये. एक लाख सदोतीस हजार दोनशे पत्रास मात्र.)

संस्थानतर्फे वेळोवेळो प्रकाशने/फोटो/सीडी उपलब्धतेप्रमाणे सप्रेम भेट देण्याची प्रथा आहे. सदर पध्दतीस मा.व्यवस्थापन समितीची दि.१२.०६.२०११ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.४२९ नुसार स्थायी मान्यता मिळालेली होती.

माणे श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका सन २०१७ विनामूल्य भेट देणेकामी मा.व्यवस्थापन सभेपुढे विषय निर्णयार्थ सादर

**निर्णय क्र.७६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.०८** **मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.८७ व ८८ मधील सैनिकी खात्यास लिजवर दिलेल्या जागेत बांधण्यात आलेल्या सैनिक आरामगृह यावर एक मजला बांधकामासाठी परवानगीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७(समितीची कर्तव्ये व अधिकार) चे पोटकलम (२) चा खंड (ट) विकास करण्याच्या व विश्वस्तव्यव्थेच्या योजना राबविणेच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवसथेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादित करीत किंवा खरेदी करील.

**प्रस्ताव-** मौजे निमगाव-को-हाळे येथील गट नं.८७ व ८८ मधील सैनिकी खात्यास लिजवर दिलेल्या जागेत बांधण्यात आलेल्या सैनिक आरामगृह यावर एक मजला बांधकामासाठी परवानगी मिळणेबाबत प्रोजेक्ट मॅनेजर,सैनिक आरामगृह,शिर्डी यांचे दि.१९ जूलै २०१६ व दि.१८ ऑगस्ट २०१६ चे पत्र.

**प्रस्तावना -** मौजे निमगाव-को-हाळे येथील संस्थान मालकीच्या गट नं.८७ मधील ०.३६ आर व गट नं.८८ मधील ०.२४ आर असे एकूण ०.६० आर क्षेत्र मा.जनरल ऑफीसर कमांडींग,महाराष्ट्र व गोवा क्षेत्र

(संयुक्त खाते) यांना सैनिकांसाठी व भुतपूर्व सैनिकांसाठी अतिथीगृह बांधणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१/०३/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२६४ अन्वये ३० वर्षे मुदतीच्या करारावर दरमहा रु.५०१/- मात्र भाडेपट्टयाने देण्यात आलेली आहे.

ऑफीसर इनचार्ज, सैनिक आरामगृह, शिर्डी यांनी दि.०२/१२/२०१४ रोजीचे पत्रान्वये सैनिकी आरामगृहातील खोल्यांची संख्या अपुरी पडत असल्याने त्यावर एक मजला बांधकामासाठी परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे. सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे विचारार्थ सादर करणेत आला. त्यावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८/०२/२०१५ रोजी झालेल्या सभेत निर्णय क्रं.५४ प्रमाणे मा.उच्च न्यायालय,मुंबई,खंडपीठ,औरंगाबाद यांनी सिव्हील ॲप्लिकेशन नं.१२०५६/२०१२, पीआयएल नं.१८/२०११ मध्ये दि.१६/१०/२०१२ रोजी प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे समितीला दिलेल्या आदेशानुसार मौजे निमगाव-को-हाळे येथील गट नं.८७ व ८८ मधील सैनिकी खात्यास दिलेल्या जागेत बांधण्यात आलेल्या सैनिक आरामगृह यावर एक मजला बांधकामासाठी परवानगी देणेचा प्रस्ताव अमान्य करणेत आलेला आहे.त्याप्रमाणे सदरचा झालेला निर्णय श्री.अजय डोभळ,ऑफीसर इनचार्ज, सैनिक आरामगृह,शिर्डी यांना इकडील जा.नं.एसएसएस/ मालमत्ता/ ८५/ २०१५ दि.०६/०४/२०१५ अन्वये सैनिक आरामगृह इमारतीवर एक मजला बांधकाम करणेसाठी परवानगी देता येत नाही,असे बाबत कळविणेत आलेले आहे.

प्रोजेक्ट मॅनेजर, सैनिक आरामगृह,शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.नं.१३६२५/एडीबी/शिर्डी दि.१९ जूलै २०१६ अन्वये मा.चेअरमन,श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट,शिर्डी यांना उद्देशून व दि.१८ ऑगस्ट २०१६ चे मा.कार्यकारी अधिकारी,श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट,शिर्डी यांना उद्देशून इकडेस पत्र सादर केलेले आहेत

त्यांचे अवलोकन करता त्यात त्यांनी मौजे निमगाव-को-हाळे येथील संस्थान मालकीची जमीन गट नं.८७ व ८८ पैकी ०.६० आर क्षेत्र साईबाबांच्या दर्शनासाठी येणारे सैनिक व त्यांचे कुटूंबिय यांना थांबण्यासाठी गेस्ट हाऊस बांधण्याकरीता सैनिक आरामगृहासाठी जनरल ऑफीसर कमांडींग,महाराष्ट्र, गुजरात व गोवा एरीया,हेडक्वॉर्टर कुलाबा,मुंबई यांचेसाठी वार्षिक भाडे रु.५०१/- प्रमाणे ३० वर्षांच्या मुदतीचे लिज डिड दि.१०/०३/२००८ रोजी करुन देण्यात आलेले आहे. सदर क्षेत्रात उक्त विभागाने सन २००९-१० मध्ये सैनिक आरामगृहाचे बांधकाम केलेले असून सद्यस्थितीत त्यात अ) ४ डिलक्स रुम ऑफीसर्स व त्यांचे कुटूंबियांसाठी ब) ३ डिलक्स रुम ज्युनियर कमिशन ऑफीसर्स व त्यांचे कुटूंबियांसाठी क) २ डॉरमेटरीज इतर रॅंकच्या सैनिकांसाठी व त्यांचे कुटूंबियांसाठी अशा सुविधा आहेत. सदृयस्थितीत साईबाबांच्या दर्शनासाठी येणा-या सैनिक भक्तांच्या संख्येत वाढ झाली असून उक्त सैनिक आरामगृह हे त्यांना सुविधा पुरविण्यास कमी पडत आहे. त्यासाठी सध्याच्या सैनिक आरामगृहाच्या पहील्या मजल्यावर बांधकाम करणेस परवानगी मिळावी, तसेच सैनिक आरामगृहाचे सांडपाण्याची पाईपलाईनद्वारे शहराच्या पाईपलाईनला जोडून विल्हेवाट लावणेस व नगरपंचायतीच्या पाईपलाईनमधून सैनिक आरामगृहासाठी पाण्याचे कनेक्शन घेणेस परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

अर्जासोबत प्रोजेक्ट मॅनेजर यांनी मौजे निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील गट नं.८७ व ८८ मधील क्षेत्रापैकी ६२६ चौ.मीटरवर सैनिक आरामगृह इमारतीचे पहील्या मजल्यासाठी रहिवास प्रयोजनार्थ बांधकामासाठी मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचेकडून प्राप्त करुन घेतलेले परवानगी आदेश क्रं.कावि/ बांप/ ५४/२०१६ दि.१६/०७/२०१६ ची प्रत जोडलेली आहे.

**इकडील विभागाचा अभिप्राय-** सैनिक आरामगृहाच्या व्यवस्थापनाने उक्त बांधकामासाठी मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचेकडून वरीलप्रमाणे बांधकाम परवानगीचे आदेश प्राप्तकरुन घेतलेले असलेने त्यात नमूद केलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून सदरच्या सैनिक आरामगृहाच्या पहील्या मजल्यावरील बांधकामास परवानगी देता येईल.

तरी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगाव कोऱ्हाळे येथील गट नं.८७ व ८८ मधील सैनिकी खात्यास लिजवर दिलेल्या जागेतील सैनिक आरामगृह यावर एक मजला बांधकाम करणेसाठी मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी नमूद केलेल्या अटी/ शर्तीस अधीन राहून त्यांना परवानगी देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.०९** **श्री साईबाबा संस्थान परिसरामध्ये महानंदाचे चार दुग्ध पदार्थ विक्री केंद्र उभारणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४ मधील कलम १७(३) विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही.

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान परिसरात महानंदचे चार दुग्धपदार्थ विक्री केंद्र उभारणेबाबत.

प्रस्तावना- मा.उपव्यवस्थापक (पणन दुगधशाळा), महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्या मुंबई यांनी त्यांचेकडील दि.२१/१२/२०१५ रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबांच्या परिसरातील भाविकांना महानंद दूधशाळेच्या दर्जेदार उत्पादनाचा स्वाद घेता यावा याकरीता श्री साईबाबांच्या परिसरामध्ये गर्दीच्या ठिकाणी सुयोग्य स्थळी चार महानंद दुग्धपदार्थ विक्रीचे स्टॉल उभारणेकामी परवानगी मिळणेबाबत विनंती केली होती.

तथापि मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांनी सिव्हील ॲप्लिकेशन नं.१२०५६/२०१२ पीआयएल नं.१८/२०११ मध्ये दि.१६/१०/२०१२ रोजी समितीला खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

(6) We direct that, without prior permission of this court, the committee-

(a) shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the respondent No.2-trust;

(b) shall not enter into an agreement, contract for purchase of any immovable property on behalf of the Respondent No.2-trust:

(c) shall not take any major financial decision of whatsoever nature;"

वरील आदेशाचा विचार करता महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्या मुंबई यांनी मागणी केल्याप्रमाणे संस्थानचे परिसरात स्टॉल उभारण्यास परवानगी देता येत नसलेबाबत इकडील दि.०४/०१/२०१६ रोजीच्या मंजूर टिपणीप्रमाणे जाक्रं.एसएसएस/ मालमत्ता/ ५८२३/ २०१५ दि.२०/०१/२०१६ अन्वये मा.उपव्यवस्थापक, पणन दुग्धपदार्थ, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्या मुंबई यांना कळविणेत आले

तद्नंतर मा.उपव्यवस्थापक, महानंद दुग्धशाळा यांनी त्यांचेकडील दि.२५/०२/२०१६ रोजीच्या पत्रान्वये पुनश्च अपंग साधना संघ संचलित बृहन्महाराष्ट्र अपंग विकास संघटना यांनी शिर्डी संस्थान परिसरामध्ये महानंद दुग्ध पदार्थ श्री साईबाबा भक्तजनांना उपलब्ध होण्यासाठी श्री साईबाबा मंदिर परिसरात स्टॉल उभारण्याची मागणी केली असल्याने मंदिर परिसरात स्टॉल उभारण्याकरीता जागा मंजूर करावी म्हणून विनंती केली त्यास अनुसरुन इकडील दि.०४/०३/२०१६ रोजीच्या मंजूर टिपणीप्रमाणे महानंद दुग्धशाळेस जा.क्रं.एसएसएस/ मालमत्ता/ ६९०५/ २०१६ दि.१५/०३/२०१६ अन्वये पुनश्च उपरोक्तप्रमाणे संस्थान परिसरात महानंद दुग्धपदार्थ विक्रीचे स्टॉल उभारणेबाबत परवानगी देता येत नसलेबाबत कळविणेत आले.

प्रस्तुतकामी मा.कार्यकारी संचालक,अपंग साधना संघ संचलित बृहन्महाराष्ट्र अपंग विकास संघटना, मुंबई यांनी त्यांचेकडील दि.१५/०२/२०१६ रोजीचे पत्रान्वये पुनश्च चार महानंद दुग्धजन्य पदार्थ विक्री केंद्र संस्थानचे परिसरात उभारणी करणेकामी परवानगी मिळणेसाठी पत्र सादर केले.त्या अनुषंगाने इकडील दि.१७/०३/२०१६ रोजीच्या टिपणीअन्वये दुग्धशाळेच्या मागणीप्रमाणे साईबाबा मंदिर परिसरात संरक्षणाच्या दृष्टीकोनातून स्टॉल उभारणीसाठी परवानगी देता येणार नाही. मात्र अपंगांच्या संस्थेस एक विशेष बाब म्हणून साईआश्रम-१ परिसरात व द्वारावती इमारतीचे परिसरात प्रत्येकी एक असे दोन स्टॉल १०X१५ आकाराचे उभारणेकामी

मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेकामी प्रस्ताव सादर करणेत आला. त्यावर दि.०६/०५/२०१६ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विषय नं.२४ निर्णय क्रं.२८८ प्रमाणे खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

"महाराष्ट्र राज्य सहकारी दुध महासंघ मर्या मुंबई (महानंद) यांना श्री साईबाबा संस्थान परिसरामध्ये दुग्ध पदार्थ विक्री केंद्र उभारणेकामी जागा/गाळा देणेबाबतचा निर्णय धोरणात्मक स्वरुपाचा असल्यामुळे त्यावर प्रदिर्घ चर्चा होणे अपेक्षित आहे,असे समितीचे मत झाले आहे. सबब सदरहू विषय तूर्त स्थगित ठेवणेत यावा,"असे ठरले.

मा.प्रा.सौ.देवयानी सुहास फरांदे विधानसभा सदस्य,नाशिक यांनी त्यांचेकडील उपरोक्त संदर्भांकित पत्रान्वये उक्त अपंग साधना संघ संचलित बृहन्महाराष्ट्र अपंग विकास संघटनेला शिर्डीमध्ये महानंद डेअरीचे चार स्टॉल उभारणेसाठी जागा उपलब्ध करुन दिल्यास अपंगांना रोजगार उपलब्ध होईल. त्या दृष्टीने सहकार्य करावे, असेबाबत नमूद केलेले आहे.

विभागाचा अभिप्राय- प्रस्तुतकामी मा.त्रिसदस्यीय समितीच्या दि.०६/०५/२०१६ रोजीच्या निर्णय क्रं.२८८ प्रमाणे झालेल्या निर्णयानुसार साईबाबा संस्थान परिसरामध्ये दुग्धपदार्थ विक्री केंद्र उभारणेकामी जागा/ गाळा देणेबाबतचा निर्णय धोरणात्मक स्वरुपाचा असल्यामुळे त्यावर प्रदिर्घ चर्चा होणेकामी प्रस्तुतचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून मंदिर परिसरामधील विविध स्टॉल्स/ गाळे परिसराच्या बाहेर स्थलांतरीत करण्यात आलेले आहेत. त्यामुळे श्री साईबाबा संस्थान परिसरामध्ये महानंदाचे चार दुग्ध पदार्थ विक्री केंद्र यांना श्री साईबाबा संस्थान परिसरामध्ये जागा उपलब्ध करुन देणे उचित होणार नाही. तसेच महानंदाचे विक्री केंद्र उभारणेस परवानगी दिल्यास इतर संस्थाही जागेची मागणी करतील. सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.१०** **प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई यांना भाडेपट्टयाने देणेत आलेल्या जागेस मुदतवाढ न देता जागा खाली करुन घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव-** प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया,मुंबई यांना भाडेपट्टयाने देणेत आलेल्या जागेस मुदतवाढ न देता जागा खाली करुन घेणेबाबत.

**प्रस्तावना-** प्रसार भारती, (भारतीय प्रसारण निगम) आकाशवाणी तथा दुरदर्शन मुंबई यांनी दि.२१/०४/२००३ रोजीचे पत्रान्वये शिर्डी येथे दुरदर्शन लघु प्रसारण केंद्र उभारणेसाठी संस्थानकडे मासिक भाडे तत्वावर ४००० चौ.फुट मोकळी जागा व ९०० चौ.फुट बांधीव जागा अशी एकुण ४९०० स्क्वे.फुट जागा मिळणेस विनंती केलेली होती. सदर प्रस्तावाबाबत मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.११/०५/२००३ रोजीचे सभेत ठराव क्र.२०७ अन्वये मा.धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांची पुर्व मान्यता घेवून जागा भाडे तत्वावर देण्यात यावी ठरले. सदर ठरावास अनुसरुन दि.०९/०६/२००३ रोजीचे पत्रान्वये मा.धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया यांना संस्थानची जागा भाडे तत्वावर देणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा.धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी दि१०/०७/२००३ रोजीचे आदेशाने प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया,मुंबई यांना Low Power T.V.Center, शिर्डी येथे उभारणेसाठी संस्थानचे अर्जात नमुद केलेप्रमाणे जागा भाडयाने देणेस परवानगी दिलेली आहे.

प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, यांनी दि.०६/०८/२००३ रोजीचे पत्राने (१) पी.डब्ल्यु.डी. यांचेकडून निश्चित झालेले भाडे देण्यात येईल (२) कमीत कमी १५ वर्षासाठी जागा दयावी लागेल (३) करारनामा ३ वर्ष किंवा ५ वर्षासाठी करण्यात यावा. त्यानंतर नुतनीकरण करण्यात यावे असा राहील,असे इकडील कार्यालयास कळविलेले आहे. प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया,यांचे उपरोक्त पत्राबाबत मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.०५/१०/२००३ रोजीचे सभेत विषय सादर करुन निर्णय क्र.४७३ अन्वये प्रसार भारती यांना १५ वर्षासाठी जागा भाडयाने देणेबाबतचा प्रस्ताव मंजुर झालेला आहे त्यानुसार प्रसार भारती यांना दि.२२/०८/२००६ पासून सनं.१४८ धर्मशाळा सध्या साईनाथ रुग्णालय येथील ४००० चौ.फुट मोकळी जागा व ९०० चौ.फुट बांधीव जागा अशी एकुण ४९०० स्क्वे.फुट संस्थानची जागा व रुम वापरास देण्यात आलेली आहे.

संस्थानला सन २००४ मध्ये नवीन अधिनियम लागू झालेला आहे. त्यामध्ये कलम २४(१) ची तरतुद खालीलप्रमाणे आहे.

Where the erstwhile public trust by the name of “Shirdi Sansthan of Shree Sai Baba” at Shirdi, District Ahmednagar or any trustee thereof was, immediately before the appointed day, party to any legal proceedings with respect to any property, rights, liabilities or obligations since vested in the reconstituted Trust under section 3 by the name of “the Shree Saibaba Sansthan Trust, (Shirdi)”, the said reconstituted Trust or its

Committee, shall be deemed to have been substituted for the erstwhile public trust or its trustees, as a party to those proceedings, or added to as a party thereto, as the case may be, and the proceedings shall continue accordingly,

तसेच या अधिनियमामध्ये संस्थान मिळकतीबाबत खालीलप्रमाणे तरतुद आहे.

17(3) No immovable property vested in the Trust shall be leased for more than a year, or mortgaged, slod or otherwise alienated by the committee, expect with the previous sanction in writing of the State Government.

यापुर्वी ठरावाप्रमाणे १५ वर्षासाठी (३-३ वर्षाचे टप्प्याने) लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर जागा दिली आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियमातील कलम १७(३) च्या तरतुदीप्रमाणे फक्त १ वर्ष कालावधीसाठी संस्थान मिळकत Lease वर देता येते. मा.त्रिसदस्य समितीचे दि.०८/१०/२०१३ रोजीचे सभेतील विषय नं.६२ निर्णय क्र.७६२ व पी.आय.एल.१८/२०११ मधील सिव्हील अॅप्लीकेशन नं.३६८६/२०१४ अन्वये मा.उच्च न्यायालयाने दि.०२/०५/२०१४ रोजीचे खालीलप्रमाणे आदेशान्वये जागा वापरास देणेबाबत परवानगी दिलेली आहे.

By application (No.3686/2014), the Committee has urged for permission to execute agreement of leave and licence in favour of Union Bank of India and State Bank of India for the purpose of installation of ATM machines and providing a space for a Bank on year to year basis and for providing facility of broadcasting of various religious programmes of Shri Sai Baba on leave and licence upon execution of leave and licence agreement and for providing facility of Hot Water, Cold Drinks and General Stores and for that purpose grant necessary permission.

Considering day today management needs and urgency in the matter, we allow the Committee to take such decisions.

Application (No.3686/2014) allowed accordingly.

मा.उच्च न्यायालयाचे उपरोक्त परवानगीने तसेच दि.२७/०७/२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र.२१९ अन्वये प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया,मुंबई यांना दि२१/०८/२०१५ ते दि.२०/०८/२०१६ अखेर १२ महिने कालावधीसाठी इकडील जा.क्र.एसएसएस/ मालमत्ता/२९७६/२०१५ दि.२६/०८/२०१५ अन्वये मुदतवाढीचा आदेश देण्यात आलेला असून त्याची मुदत दि.२०/०८/२०१६ रोजी संपुष्टात येत आहे.

मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०५/१०/२००३ रोजीचे सभेतील निर्णयानुसार प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांना प्रस्तुत मिळकत १५ वर्षासाठी लिज डिडवर देणेस मान्यता आहे.
संस्थानचे मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.११/०५/२००३ व दि.०५/१०/२००३ चे सभेतील निर्णयानुसार व मा.उच्च न्यायालयाचे दि.०२/०५/२०१४ रोजीचे आदेशान्वये प्रस्तुत मिळकत प्रसार भारती यांना वापरास दिलेली आहे. जागेचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रमाणपत्रानुसार घेणेचे ठरलेले आहे व प्रत्येक ३ वर्षाने मासिक परवाना फी मध्ये १० टक्के वाढ करुन खालीलप्रमाणे आकारणी केलेली आहे.

१) पहिल्या टप्प्यातील ३ वर्षाचे दि.२१/०८/२००३ ते दि.२०/०८/२००६ अखेर रुपये ३३२५/- मासिक भाडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांनी संस्थानला दिलेले आहे.

२) दुस-या टप्प्यातील तीन वर्षाचे दि.२१/०८/२००६ ते दि.२०/०८/२००९ अखेर रु.३३२५/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.३६५७-५० मासिक भाडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांनी संस्थानला दिलेले आहे.

३) तिस-या टप्प्यातील तीन वर्षाचे दि.२१/०८/२००९ ते दि.२०/०८/२०१२ अखेर रु.३६५७-५० मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.४०२४/- मासिक भाडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांनी संस्थानला दिलेले आहे.

४) चौथ्या टप्प्यातील तीन वर्षाचे दि.२१/०८/२०१२ ते दि.२०/०८/२०१५ अखेर रु.४०२४/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.४४२७/- मासिक भाडे प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांनी संस्थानला दिलेले आहे.

५) पाचव्या टप्प्यातील तीन वर्षाचे कालावधीसाठी म्हणजेच दि.२१/०८/२०१५ ते दि.२०/०८/२०१८ अखेर रु.४४२७/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच रु.४८७०/- मासिक भाडे आकारण्यात आले असून प्रसार भारती यांनी माहे जून२०१६ अखेरचे भाडे संस्थानकडे जमा केलेले आहे.

प्रसार भारती, भारतीय प्रसारण निगम, लघु प्रक्षेपण केंद्र, शिर्डी यांनी दि.०४/०७/२०१६ रोजीचे पत्रान्वये लिज डीड पुढील दि.२१/०८/२०१६ ते दि.२०/०८/२०१७ अखेर मुदतवाढ मिळणेस विनंती केलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय-** प्रसार भारतीस वापरास दिलेल्या इमारतीलगत श्री साईबाबा संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालय असून सध्यस्थितीत दिवसेंदिवस गोरगरीब व गरजू रुग्णांमध्ये मोठया प्रमाणात वाढ होत आहे. त्यामुळे साईनाथ रुग्णालयाची जागा अत्यंत तोकडी पडत असल्याने गोरगरीब व गरजू रुग्णांना आवश्यक त्या सुविधा पुरविता येत नाहीत त्यासाठी सदर रुग्णालयाचे विस्तारीकरण करणे क्रमप्राप्त झालेले आहे. तसेच प्रसार भारती ब्रॉडकॉस्टींग कॉर्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांचेद्वारे कार्यान्वित असलेले दूरदर्शन लघुप्रसारण केंद्राचा पूर्वी नागरीकांना उपयुक्त होते. तथापि आता अद्ययावत तंत्रज्ञानामुळे सर्वत्र डिस्क व केबलद्वारे दूरदर्शन प्रसारण होत असल्याने सदरचे दूरदर्शन लघुप्रक्षेपण केंद्राची कार्यपध्दती ही कालबाहय झालेली आहे. म्हणजेच त्याची उपयुक्तता कमी झालेली आहे. अशा परिस्थितीत सदरच्या लघुप्रक्षेपण केंद्रासाठी प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कॉर्पोरेशन ऑफ इंडीया यांना पुढील कालावधीसाठी जागा वापरास मुदतवाढ देण्याची आवश्यकता नाही. तेंव्हा त्यांचेकडून उपरोक्त जागा खाली करुन घेणेकामी त्यांना यापूर्वी त्यांचेसोबत दि.०३/०९/२०१५ रोजी केलेल्या भाडेपट्टा करारनाम्यातील कलम १४ मधील तरतुदीप्रमाणे (The Prasar Bharati or Licensor shall be entitled to terminate the agreement at any time by giving one month's previous notice in writing of its intention to do so.) एक महीना मुदतीची पूर्वसूचना(नोटीस) देवून जागा खाली करुन घेता येईल.

उपरोक्त प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार व प्रसार व्हावा या दृष्टीने प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई यांना भाडेपट्टयाने जागा देणेत आलेली होती. परंतु त्यांचेमार्फत आजतागायत श्रींच्या शिकवणूकचा प्रचार व प्रसार करणेत आलेला दिसून येत नाही व श्री साईनाथ रुग्णालय विस्तारीकरणासाठी सदरहू जागेची आवश्यकता आहे. तसेच केंद्र शासनाने टी.व्ही. संचासाठी सर्व ठिकाणी सेटअप बॉक्स वापरणेची सक्ती केलेली असल्यामुळे प्रसाद भारती लघुप्रक्षेपण केंद्राची कार्यपध्दती ही कालबाहय झालेली आहे. या सर्व बाबींचा विचार करता, प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई यांना सदरहू जागा खाली करुन देणेबाबत लेखी पत्र देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.११** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे साईउद्यान इमारतीतील शिर्डी पोस्ट ऑफीसचे वापरात असलेल्या जागेस मुदतवाढ देणे, करारनामा करुन घेणे व थकीत भाडे वसूल करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(२) (झ) प्रमाणे सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करणेच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमूद आहे

**प्रस्ताव–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे साईउद्यान इमारतीतील शिर्डी पोस्ट ऑफीसचे वापरात असलेल्या जागेस मुदतवाढ देणे,करारनामा करुन घेणे व थकीत भाडे वसूल करणेबाबत.

**प्रस्तावना–** मा.अधिक्षक, डाकघर, श्रीरामपूर यांना संस्थान मालकीचे साईउद्यान इमारतीतील शिर्डी पोस्ट ऑफीसकरीता खालील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे करारनामा करणेत येवून जागा वापरास दिलेली आहे.

| अ.नं. | मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेचा दिनांक व ठराव | करारनामा केलेचा कालावधी |
|---|---|---|
| १ | दि.१३/१२/२००३ निर्णय क्रं.५९० | दि.१८/१२/२००३ ते दि.१७/११/२००४ |
| २ | दि.२७/१२/२००४ निर्णय क्रं.१६६ | दि.१८/११/२००४ ते दि.१७/१०/२००५ |
| ३ | दि.१४/१२/२००५ निर्णय क्रं.७७० | दि.१८/१०/२००५ ते दि.१७/१०/२०१० |
| ४ | दि.२६/०३/२०११ निर्णय क्रं.२३९ | दि.१८/१०/२०१० ते दि.१६/१०/२०११ |
| ५ | दि.२४/०९/२०११ निर्णय क्रं.७३४ | दि.१७/१०/२०११ ते दि.१६/१०/२०१२ |

| | | |
|---|---|---|
| ६ | दि.२६/०२/२०१३ निर्णय क्र.१७९, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांचा सिव्हील ॲप्लिकेशन नं.९४२२/ २०१३ मधील दि.१३/०८/२०१३ रोजीचा आदेश | दि.१७/१०/२०१२ ते दि.१६/१०/२०१३ |
| ७ | दि.०५/०६/२०१४ निर्णय क्र.४३२, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांचा सिव्हील ॲप्लिकेशन नं.१०४२९/ २०१४ मधील दि.२२/१२/२०१४ रोजीचा आदेश | दि.१७/१०/२०१३ ते दि.१६/१०/२०१४ |

अधिक्षक, डाकघर, श्रीरामपूर यांना इकडील जानं.एसएसएस/ मालमत्ता/ २४०३/२०१५ दि.३०/०७/२०१५ अन्वये शिर्डी पोस्ट ऑफीसकरीता वापरासाठी दिलेल्या जागेची मुदत दि.१६/१०/२०१४ रोजी संपुष्टात आलेली असल्याने पुढील कालावधीसाठी जागा वापरासाठी पाहीजे असल्यास रु.१२३८५/- दरमहा व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर दि.१७/१०/२०१४ ते दि.१६/१०/२०१५ व दि.१७/१०/२०१५ ते दि.१६/१०/२०१६ या कालावधीसाठी मुदतवाढ मिळणेबाबतचा प्रस्ताव तातडीने इकडील कार्यालयास सादर करणेबाबत कळविणेत आलेले आहे व तद्नंतर त्यांचेशी वेळोवेळी पत्रव्यवहाराद्वारे व दूरध्वनीद्वारे संपर्क करणेत आलेला आहे. तथापि त्यांचेकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने संस्थान पॅनलवरील वकीलामार्फत कायदेशीर कार्यवाही करणेकामी संस्थानचे विधी विभागास कळविणेत आले व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

पोस्ट ऑफीसला उक्त जागा दि.१७/१०/२०१२ ते दि.१६/१०/२०१३ व दि.१७/१०/२०१३ ते दि.१६/१०/२०१४ पर्यंत असे एकूण २४ महीनेपर्यंत दरमहा रु.७,०००/- प्रमाणे आकारण्यात आलेले असून त्याची एकूण रक्कम रु.१,६८,०००/- इतकी होत असून त्यापैकी त्यांनी रु.१,६४,५१६/- इतकी रक्कम संस्थानचे लेखाशाखेकडे जमा केलेली असलेचे दि.२७/०६/२०१६ रोजी लेखाशाखेकडे समक्ष चौकशी केली असता त्यांनी कळविले आहे. उर्वरीत रक्कम रु.३,४८४/- त्यांचेकडून दि.१७/१०/२०१४ अखेर येणे बाकी आहे. तद्नंतरचा पोस्ट ऑफीसने करारनामा केलेला नाही अथवा भाडे रक्कमही अदा केलेली नाही.

पोस्ट ऑफीसने FRAC प्रमाणे सूचविलेले भाडे दरमहा रु१२,३८५/- इतके देण्याचे निश्चित केल्यास दि.१७/१०/२०१४ ते दि.१६/१०/२०१५ पर्यंत १२ महीने व दि.१७/१०/२०१५ ते दि.१६/१०/२०१६ असे १२ महीने म्हणजेच एकूण २४ महीन्यांची रक्कम रु.२,९७,२४०/- व त्यापूर्वीची राहीलेली रक्कम रु,३,४८४/- अशी एकूण रक्कम रु,३,००,७२४/- इतकी पोस्ट ऑफीसकडून येणे बाकी होईल.

तथापि FRAC प्रमाणे सूचविलेले भाडे देण्याचे अधिकार त्यांचे स्थानिक कार्यालयास नाहीत म्हणून त्यासाठी सदर भाडेवाढीचे प्रकरण त्यांचे वरिष्ठ कार्यालय,पुणे विभाग यांचेकडेस मंजूरीकामी पाठविले असलेबाबत त्यांनी दि.११/०१/२०१६ रोजीचे पत्रान्वये कळविलेले आहे. मात्र तद्नंतर करारनामा करुन देणेबाबत अथवा भाडयाची रक्कम अदा करणेबाबत त्यांनी काही एक कार्यवाही केलेली नसलेने पोस्ट विभागाविरुध्द दावा दाखल करणे व तद्नुषंगाने होणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/०९/२०१६ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र.६५० प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय करणेत आला.

यावर सविस्तर चर्चा होवून श्री साईबाबा संस्थान मालकीच्या साईउद्यान इमारतीतील शिर्डी पोस्ट ऑफीसचे वापरात असलेल्या जागेबाबत पोस्ट ऑफीसविरुध्द कायदेशीररित्या दावा दाखल करणेऐवजी सदरहू प्रकरण सामंजस्याने मिटविण्यात यावे,असे समितीचे मत झाले. याकरीता पोस्ट ऑफीसच्या जबाबदार अधिकाऱ्यांना स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी बोलविणेत यावे, असे ठरले.

तथापि तत्पूर्वी त्यांनी इकडील पत्र क्र.एसएसएसटी/मालमत्ता/३१४०/२०१६ दि.१७/०९/२०१६ च्या पत्राच्या अनुषंगाने अधिक्षक, डाकघर, श्रीरामपूर विभाग यांनी त्यांचेकडील पत्र क्र.-D-47/Bldg/Shirdi/ FRAC/ Minutes/ 16-17 Dtd 29/09/2016 अन्वये त्यांचे पुणे येथील वरिष्ठ कार्यालयाने उक्त जागेचे भाडे दि.१७/१०/२०१४ पासून रु१२,३८५/- दरमहा भाडे अदा करणेबाबत मान्यता दिलेली आहे. तरी दि.१७/१०/२०१४ ते दि.१६/१०/२०१५ व दि.१७/१०/२०१५ ते दि.१६/१०/२०१६ या कालावधीचा लिव्ह ॲण्ड लायसन्स डिड करुन घेणेत यावा, असेबाबत कळविलेले आहे.

तसेच इकडील पत्र क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/३४०४/२०१६ दि.३०/०९/२०१६ चे पत्रास अनुसरुन त्यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.डी-४७/इमारत/शिर्डी/भाडे/करारनामा/१६-१७ दि.०१/१०/२०१६ रोजीच्या पत्रान्वये संस्थान मालकीच्या पोस्ट ऑफीससाठी वापरास दिलेल्या जागेत दि.१७/१०/२०१६ ते दि.१६/१०/२०१७ या कालावधीकरीता मासिक भाडे रु.१२,३८५/- आकारुन मुदतवाढ मिळणेस व नियमाप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेबाबत विनंती केलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय–** १) पोस्ट कार्यालयाकडून दि.१७/१०/२०१४ ते दि.१६/१०/२०१५ व दि.१७/१०/२०१५ ते दि.१६/१०/२०१६ या कालावधीसाठी करारनामे करुन घेता येतील व दि.१६/१०/२०१६ पावेतोची पोस्ट कार्यालयाकडे थकीत असलेली रक्कम रु,३,००,७२४/- इतकी संस्थानकडे जमा करणेबाबत त्यांना कळविता येईल.

२) पोस्ट कार्यालयास संस्थान मालकीची नगरपंचायत मिळकत नं.५०४ पैकी साईउद्यान इमारतीमध्ये २ हॉल (१५९९.४१ स्क्वे.फूट) इतकी जागा वापरणेस दि.१७/१०/२०१६ ते दि.१६/१०/२०१७ या कालावधीसाठी दरमहा रक्कम रु.१२,३८५/- इतके भाडे व मीटर रिडींगप्रमाणे आकार वेगळा आकारुन लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर मुदतवाढ देता येईल.

उपरोक्त प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे साईउद्यान इमारतीतील शिर्डी पोस्ट ऑफीसचे वापरात असलेल्या जागेस मुदतवाढ देणे, करारनामा करुन घेणे व थकीत भाडे वसूल करणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.१२** **मालमत्ता विभागाकडील कंत्राटी सल्लागार यांचे मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(झ) सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील.

**प्रस्ताव–** मालमत्ता विभागाकडील कंत्राटी सल्लागार श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांचे मुदतवाढीबाबत

**प्रस्तावना–** संस्थानकडील चल-अचल मालमत्तेसाठी स्वतंत्र मालमत्ता विभाग (Estate Department) निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव विधी विभागामार्फत मा.त्रिसदस्य समितीचे सभेपूढे सादर करणेत आला होता. त्यावर मा.त्रिसदस्य समितीचे दि.०६/११/२०१४ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रं.९८६ नुसार व दि.१९/११/२०१४ रोजीचे आदेशान्वये संस्थान आस्थापनेवर मालमत्ता विभाग नव्याने कार्यान्वित करणेत आलेला आहे.

मालमत्ता विभागाकडे सध्यस्थितीत खालीलप्रमाणे कामकाज सुरु आहे

१. मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडील भूसंपादनाबाबतची प्रकरणे
२. संस्थानला जमीन देणगी म्हणून स्विकारणेबाबतची प्रकरणे.
३. संस्थानसाठी आरक्षित असलेल्या जमिनी खरेदी करणे तसेच संस्थानकडे जमीनी खरेदी देणेबाबतचे आलेल्या प्रस्तावाप्रमाणे कार्यवाही करणे.
४. खरेदी केलेल्या जमीनींच्या नोंदी महसूल दप्तरी अद्ययावत करुन घेणे.
५. विविध न्यायालयात सुरु असलेल्या केसेस बाबत आवश्यक ती कार्यवाही करणे.
६. संस्थानचे मालमत्तेबाबतचे स्थानिक शासकिय कर भरणे.
७. संस्थानच्या जमीनींची मोजणी करुन घेऊन हद्दी निश्चित करणे.
८. संस्थानने भाडेतत्वावर दिलेल्या मिळकतीचे करारनामे करुन घेणे.
९. संस्थानचे स्थावर मालमत्तेबाबत योग्य नियोजन करणे, देखभाल करणे, वेळोवेळी मिळकतींना भेटी देणे, त्याबाबत असलेल्या अडचणी दुर करणे

सदर कामकाजासाठी सल्लागार म्हणून श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांची कंत्राटी पध्दतीने मासिक रु.१२,०००/- एकत्रित मानधनावर दि.२६/१०/२०१५ पासून इकडील दि.१०/१०/२०१५ रोजीच्या मंजूर कार्यालयीन टिपणीप्रमाणे प्रचलित पध्दतीने कामगार विभागामार्फत दि.१९/१०/२०१५ ते दि.१८/१०/२०१६ या एक वर्षाच्या कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली आहे.

तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीच्या सभेतील विषय क्रं.३१ निर्णय क्रं.५४० अन्वये श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे, कं.सल्लागार, मालमत्ता विभाग (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांना रु.१५,०००/- मात्र दरमहा एकत्रित मानधन देण्यात यावे, असा निर्णय झालेला आहे.

**विभागाचा अभिप्राय-** श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे, कं.सल्लागार (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांची नेमणूकीची मुदत दि१८/१०/२०१६ अखेर संपत आहे. त्यांच्या सेवेची संस्थानला उपरोक्त कामकाजासाठी तसेच सन २०१८ हे बाबांचे महाशताब्दी वर्ष असल्याने कामाच्या वाढत्या व्यापाच्या दृष्टीने यापूढेही त्यांच्या सेवेची आवश्यकता आहे. तरी दि.१९/१०/२०१६ ते दि.१८/१०/२०१७ या एक वर्षाचे कालावधीसाठी त्यांची प्रचलित पध्दतीने कामगार विभागामार्फत कर्मचारी ठेकेदाराकडून एकत्रित मासिक मानधन तत्वावर दरमहा रु.१५,०००/- इतके वेतनावर कंत्राटी कर्मचारी म्हणून मुदतवाढ देण्याच्या निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.७६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग यांचे अभिप्रायाचा विचार करता, श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे, कंत्राटी सल्लागार (सेवानिवृत्त नायब तहसिलदार) यांच्या नेमणूकीची मुदत संपुष्टात येत असलेच्या तारखेपासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी मासिक रु१५,०००/- मात्र एकत्रित मानधनावर मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आली. परंतु तत्पुर्वी श्री.कृष्णा विश्वनाथ वालझाडे, कंत्राटी सल्लागार, मालमत्ता विभाग यांनी मागील वर्षी केलेल्या कामाचा अहवाल सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.१३** **बांधकाम प्रगती अहवाल ब तक्त्यानुसार अंतीम बीले आदा करणेबाबत.**

बांधकाम प्रगती अहवालामधील कामे पुर्ण झालेली असल्यामुळे अंतीम बीले अदा करणेविषयीचा तक्ता ब च्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आलेल्या होत्या.

**निर्णय क्र.७६७** **बांधकाम प्रगती अहवालामधील ब तक्तयाचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली.**

**तसेच चालू असलेल्या बांधकामांच्या प्रगतीचा अ तक्ता प्रत्येक महिन्याला समितीसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१४** **श्री साईगार्डन प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यातील सिव्हील कामासाठी ई-निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१)च्या खंड (ड) अन्वये श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे अशी तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय –**

१) मा.व्यवस्थापन समितीचेदि.२४/०७/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४९६ अन्वये मे. के. आर. आर. इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि., हैद्राबाद यांना कार्यदेश देणेस मान्यता देण्यात आली.

२) मा. त्रिसदस्य समितीचे दि.०६/०४/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३५५ अन्वये सदरचे काम पूर्ण करणेस ठेकेदार असमर्थ ठरल्याने मे. के. आर. आर. इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि., हैद्राबाद यांना ठेकेदार टर्मिनेट करणेत यावे असे ठरले.

**प्रस्तावना-** समाधी मंदिरातून दर्शन घेऊन बाहेर पडणाऱ्या भक्तांची मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर गर्दी असते. शिर्डी मध्ये समाधी मंदिरात दर्शन केल्यानंतर साईभक्तांसाठी दुसरे आकर्षण केंद्र नसल्याने सर्व भक्त समाधी मंदिर परिसरात गर्दी करतात. त्यामुळे दिवसेंदिवस वाढणाऱ्या गर्दीचे नियोजन होणेकामी तसेच साईभक्तांना श्री साईबाबांच्या जीवन चरित्राची माहिती होणेकरीता संस्थान मालकीचे निमगांव को-हाळे येथील गट नं. १९८,१९९,२०० व २०१ मध्ये साई गार्डन प्रकल्प उभारणेचे ठरले आहे. त्यानुसार लेजर शो करीता आवश्यक असणारे वॉटर बॉडी, प्रेक्षागृह व इतर अनुषंगीक सोयी सुविधा(कार्यालय नियंत्रणकक्ष, प्रसाधनगृहे, संरक्षक भिंत आदी) चे बांधकाम करणेचे काम ठेकेदार मे. के. आर. आर. इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि., हैद्राबाद यांना देणेत आले होते.

सदरचे काम करणेस ठेकेदार असमर्थ ठरल्याने त्यांना मा. त्रिसदस्य समितीचे दि.०६/०४/२०१२ रोजीचे सभेतील नि. क्र. ३५५ अन्वये टर्मिनेट करणेत यावे असे ठरले. त्यानुसार आर्कीटेक्ट्यांचेमार्फत दि.०१/०६/२०१२ रोजीचे पत्राने ठेकेदार यांना टर्मीनेशन नोटीस देणेत आलेली आहे. दि.०४/०६/२०१३ रोजीचे पत्राने ठेकेदार मे. के. आर. आर. इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि., हैद्राबाद यांना उर्वरीत दंडाची रक्कम रु.२,११,०५,७४८/- मात्र संस्थानकडे जमा करणे व निविदा शर्तीनुसार दंडात्मक कार्यवाही करणेबाबत आर्किटेक्ट यांचेमार्फत कळविणेत आले. त्यानंतर विधी विभागामार्फत ॲड.एस.डी. कुलकर्णी, कोपरगांव यांचे सल्ल्याने दि.०३/१२/२०१३ व

दि.२८/०३/२०१४ रोजी ठेकेदार यांना नोटीस पाठविणेत आली आहे.विधी विभागामार्फत ठेकेदार यांचे विरूध्द दावा दाखल करणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

साईगार्डन प्रकल्पातंर्गतची उर्वरीत सिव्हील कामे करणेसाठी आर्कीटेक्ट माथूर अॅण्ड काप्रे असो. नवी दिल्ली यांनी जिल्हा दरसूची सन-२०१५-१६ नुसार रक्कम रू.४७,१५,६१,७६९/- मात्रचे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. मा. त्रिसदस्य समितीचे दि.३०/११/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र ८८४ नुसार याकामाकरीता फेर निविदा मागविणेसाठी मा. उच्च न्यायालयात सिव्हील अर्ज दाखल करण्यात यावा असे ठरले आहे. त्यानुसार संस्थानमार्फत अॅड. संजय चौकीदार यांनी मा उच्च न्यायालयात सिव्हील अर्ज क्र. ३३५४७ दि.०५/१२/२०१३ नुसार दाखल केला आहे.

आता मा.व्यवस्थापन समितीची नियुक्ती झालेली असल्याने संस्थानचे विधी विभागामार्फत विषयांकीत कामासाठी मा. उच्च न्यायालयाचे मान्यतेस्तव दाखल केलेला सिव्हील अर्ज मागे घेणेत आला आहे.

मा. त्रिसदस्य समितीचे दि.१५/०३/२०१४ रोजीचे सभेतील नि.क्र.१८२ अन्वये मे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचे बिल अदा करणेकामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्चन्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले आहे. त्यानुसार संस्थानचे वकील श्री. संजय चौकीदार यांनी CAST/ ८७०८/ २०१४ दि.२५/०७/२०१४ अन्वये मा. मुंबई उच्चन्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात सिव्हिल अॅप्लिकेशन दाखल केले आहे.

यावर मा.उच्च न्यायालयात दि.२४/०६/२०१६ रोजी सुनावणी होऊन, खालीलप्रमाणे आदेश केले आहेत.

1. *The present civil application is filed seeking permission to make payment of US$ 15,40,000/- in favour of Laser Vision Mega Media Limited, Hongkong or alternatively provide guidance to the committee as to the course of action to be adopted in respect of either continuation of the contract or termination thereof.*
2. *It is submitted by Mr.Choukidar, the learned counsel that, up till date an amount of Rs.10,72,00,000/- is paid to the Laser Vision Company towards the part work done. The said company claims to have done work up to 8 stages and according to the applicant payment is made up to 6 stages. It is submitted that, the contractor to whom the civil work was allotted has left the work and action is taken against him.*
3. *According to the applicant, the remaining quantum of the work as per contract with M/s. Laser Vision would be approximately to the tune of Rs. 22,00,00,000/-*
4. *It is stated that, the completion of laser work will be of no use until the civil work is also done.*
5. *The viability of the said project will have to be considered i.e. about the condition of the project. It would be appropriate if the expert committee gives its opinion about the viability of the project.*
6. *We had asked the learned A. G. P. to give the names of the experts. The learned A. G. P. has provided the names of the persons from the Information and Technology Department, Maharashtra State.*
7. *Considering the above, we appoint the committee of the said persons to consider the nature of the project, its viability and give its recommendation as to whether it would be beneficial to proceed with the project and if yes, the manner in which the same is to be proceeded with. The Applicant / Sansthan shall co-operate with the said committee and provide all the details as would be asked by the said committee. The committee shall expeditiously take up the said matter and give his report on priority basis. The names provided by the learned A. G. P. are as under-*

*1. Shri M. Sankaranarayanan, Director (IT)*
*2. Shri MukeshSomkuwar, Section Officer (Technical)*
*3. Shri AshwinGayatri, Head SEMT*

*4. Shri Manish Anawadia, Sr. Consultant, SEMT*

*5. Shri MithleshBolawat, Consultant, SEMT*

*8. The learned A. G. P. shall communicate this order to the members of the said committee. Place the matter after four (4) weeks.*

वरीलप्रमाणे नेमण्यात आलेल्या तज्ञ समितीपूढे दि.०३/०८/२०१६ रोजीचे बैठकीत प्रकल्पाच्या संबंधी सर्व माहिती व कागदपत्रे सादर करण्यात आलेले आहे. यासमितीने दि.०७/१०/२०१६ रोजी मा. उच्च न्यायालयात प्राथमीक अहवाल सादर केला असून त्यात समितीचे रचनेमध्ये बदल करुन सदर समितीमध्ये स्थापत्य अभियांत्रीकी, विद्युत अभियांत्रीकी आणि लेजर मल्टीमिडिया इ. शाखेशी सबंधीत तज्ञांचा समावेश करणेची विनंती करण्यात आली आहे.

दि.०१/१०/२०१६ रोजी झालेले मा. उपसमितीचे सभेत विषयांकीत कामाबाबत चर्चा झाली असून, सदर चर्चेमध्ये लेजर शो प्रकल्प कार्यान्वीत करणेसाठी आवश्यक असणारे सिव्हील कामाकरीता तातडीने निविदा प्रक्रीया राबविणेबाबत चर्चा झाली. यावेळीमा. विश्वस्त श्री.प्रतापराव भोसले यांनी पुढीलप्रमाणे सुचना केल्या आहेत,"लेजर व्हिजन यांना देण्यात आलेले लेजर शोचे काम सिव्हील वर्क पूर्ण न झाल्याने थांबलेले आहे. संपूर्ण सिव्हील वर्कचे काम पूर्णकरण्यास बराच अवधी लागेल तुर्त लेजर व्हिजनसाठी आवश्यक असणारे पॉन्डचे (Pond) काम पूर्ण करुन घेतले तर लेजर व्हिजन यांना पुढील काम सुरु करणेबाबत सूचना करता येईल याकामासाठी संस्थानने लेजर व्हिजन यांना सुमारे US$21,45,000 अदा केलेले आहे. त्यामुळे पॉन्डचे काम खात्यामार्फत करण्यात यावे अशी त्यांनी सूचना केली आहे"

कामासाठी येणारे खर्चाचा तपशिल आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असोशिएटस्, नवी दिल्ली यांचेकडून मागविणेत आला असून, आर्किटेक्ट यांनी दि.०५/१०/२०१६ रोजीचे पत्राने लेजर व्हिजन यांना त्यांचे काम सुरु करणेसाठी खालीलप्रमाणे आवश्यक सिव्हील वर्कची कामे करावी लागतील. सदरहू कामासाठी रु.७४,८७,४५५/- लक्ष मात्र खर्च येणार असलेबाबत कळविले आहे. तसेच आर्किटेक्ट यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय कळविला आहे.

"1. *The works that can be taken up before the award of main civil works to facilitate and shortcharge the time required for the works of M/s Laservision are just a few namely:*

*a) Pond floor tiling*

*b) Pond wall tiling*

*c) Projector Huts &*

*d) Fogger cum Speaker Hut*

*2. The above works will cost approximately Rs 75 Lakhs Only*

*3. The above works when completed do not serve any purpose for the works of M/s Laservision, since M/s Laservision cannot carryout any of their works in the absence of main civil works. As the entire electrical and electromechanical connections and equipment, as well as the Central Control room, are located in the main building.*

*4. The current status of the project is as under:*

*a) The Civil works are completely halted at site and unless and until a new contract is in place the works cannot resume.*

*b) The works of M/s Laservision are entirely dependent upon completion of the Civil works. Due to the status of the Civil works being incomplete and stalled, the works of Laservision going ahead is of no use to the project.*

*c) The stages completed by Laservision as per Annexure B of the contract are 1 through 7.*

*d) The payment against these stages 5 & 6 become due and payable. Certification of the design phase drawings and specifications at this stage is of no use to the project, Sansthan or to Laservision since nothing further can be done. Although it would complete the stages 5 & 6 for them and the payment falls due.*

*e) Stage 8 is the stage for "Visual Production" i.e. of material to be projected /screened on the water screens. Laservision has not started anything knowing fully well the situation of the Civil Works.*

*f) Stage 9 is the stage for purchase of Equipment. This stage cannot be initiated by Laservision at all since within three months they will have to bring the entire equipment for installation at site. The installation cannot take place.*

*g) As per the time schedule Annexure 'F' the time required from Stage 9 (Equipment purchase order) to stage 13 (practical completion) is only 26 weeks which includes delivery, installation, testing & commissioning of all equipment. Infact the visual production (stage 8) can move simultaneously upon restarting of the works.*

*h) The appropriate stage for commencing the works of M/s Laservision would be approximately when the RCC Structural works of the main seating complex are completed. The civil contractor will take almost 6 months beyond the completed RCC structure to complete the building works with all flooring finishing, plumbing, electricals etc. Therefore there will be ample time for M/s Laservision to complete their works in that period.*

*The works of M/s Laservision are governed by the contract dated 12th May 2011 they have with the Sansthan. They may not start any of their works unless the conditions or obligations on part of the Sansthan are met with.*

*Therefore, taking up small works which seem to be helping M/s Laservision to advance their works are actually insignificant as far as M/s Laservision is concerned and it is not advisable to take up such works."*

**प्रस्ताव:** लेजर व्हिजन यांचे काम पूर्ण करणेसाठी आवश्यक सिव्हील वर्कचे काम हाती घेणेसाठी खालील बाबी विचारात घ्यावा लागतील.

लेजर शो साठी आवश्यक मशिनरी प्लंबिंग वर्क,इलेक्ट्रीकल वर्क, प्रोजेक्टर रुम इत्यादी कामे पुर्ण करण्यासाठी आवश्यक असलेली सिव्हिल वर्क पहिल्या टप्प्यात पुर्ण करता येईल. याकामी आर्किटेक्ट माथुर ॲण्ड कापरे यांनी रु. ७४,८७,४५५/- मात्र इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक सादर केले आहे. त्यानुसार ई-निविदा मागवुन कार्यवाही करता येईल.

यापुर्वी सिव्हील वर्कचे कामात मुख्य इमारतीचे बेसमेंटरीता ४३,४६०चौ.फुट क्षेत्रफळाचे व २० फुट खोल खड्याचे खोदकाम पूर्ण झालेले आहे. पॉन्ड पासून ५० फुट अंतरावर सदरचे खड्डे खोदण्यात आलेले आहे. त्यामुळे लेजर शो चालू केल्यास प्रेषकांना बसण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नाही. याकरीता ५००० व्यक्तींची आसन व्यवस्था असलेले स्टेडीयमचे काम पुर्ण होण्याचे दृष्टीने Precast and Prestressed Concrete Structures, Fabricated Steel Structure या सारख्या तंत्रज्ञानाचा अथवा तत्सम तंत्रज्ञानाचा आभ्यास करुन प्रस्तावित बांधकाम करता येईल. अथवा तंज्ञाचे मार्गदर्शन घेऊन आसन व्यवस्था नव्याने डिझाईन करुन व्यवहार्य असल्यास त्यानुसार प्रस्तावित करता येईल.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६३७ (३) अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

*"आजचे सभेत मे. लेजर व्हिजन लि., हॉगकॉग यांचे प्रतिनिधी उपस्थित होते,त्यांनी श्री साईबाबा मल्टीमिडीया थीम पार्क प्रकल्पाचे समितीसमोर सादरीकरण केले.समितीने त्यांचेबरोबर लेजर शो च्या सादरीकरणाबाबत चर्चा केली असता, सिव्हील वर्कचे काम अपुर्ण असल्यामुळे मे लेजर व्हिजन लि., हॉगकॉग यांना पुढील काम करता येणे शक्य नाही, असे समितीचे निदर्शनास आले. समितीने सदरहु प्रकल्पावर किती /काय काम केले आहे व त्यांना आतापर्यंत किती रक्कम देणेत आलेली आहे तसेच करारनाम्यानुसार सध्या किती रक्कम दयावयाची आहे याची माहिती घेतली.*

*यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार याकामी तज्ञांची चौकशी समिती तयार केलेली आहे हि तज्ञ समिती मा. उच्च न्यायालयामध्ये आपला अहवाल सादर करणार असुन त्यानंतर मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले."*

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६३७ (३) मध्ये ठरलेप्रामाणे मा.उच्च न्यायालयाच्या आदेश प्राप्त झाल्यानंतर सदरहू विषय चर्चेसाठी ठेवण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१५** **श्री साईबाबांचे प्रथम आगमनस्थान, नामाधिकरण स्थान, श्री खंडोबा देवस्थान, शिर्डी या मंदिराचा जिणोध्दार श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळयाच्या निमित्ताने होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री मार्तंड म्हाळसापती महाराज ट्रस्ट, (ई२३४) चे आओ साई श्री खंडोबा मंदिर यांनी संस्थानाचे मा.अध्यक्ष सो. व मा.कार्यकारी अधिकारी सो. यांना दि.३०/०८/२०१६ व दि.०१/०९/२०१६ रोजी अग्रेषीत केलेल्या पत्रात खालील मुद्दे नमूद केलेआहेत.

श्री खंडोबा मंदिर देवस्थान हे प्राचीन असुन त्याचा श्री साईबाबा शताब्दी समाधीनिमित्त जिर्णोध्दार होणे हे श्री साईभक्त व श्री खंडोबा भक्त यांचे दृष्टीने योग्य आहे. आलेला प्रत्येक भक्त श्रीखंडोबाचे दर्शन घेण्यासाठी येतच असतो. या दृष्टीने या जिर्णोध्दारकामी श्री साईबाबा संस्थानने पुढाकार घ्यावा.

या ट्रस्टच्या माध्यमातून शिर्डी-वावी हायवेवर सुमारे अडीच एकर जागेत पालखी निवारा/पालखी थांबा कार्यान्वित असुन त्याचाही उपयोग श्री साईभक्त फायदा घेत असतात. या ठिकाणी सुलभ शौचालयाची व्यवस्था केली आहे. लवकरच येथे अन्नदान धर्मादाय सत्र चालविले जाणार आहे.

या पालखी निवारा थांब्याचा शुभारंभ आपलेच माध्यमातून व्हावा. या ठिकाणी श्री साईबाबा संस्थानचा माहिती केंद्राचाही वापर केला जाणार आहे. याकामी आपण पुढाकार घेवून भक्तांमार्फत याकामी श्री मार्तंड म्हाळसापती महाराज ट्रस्टने श्री खंडोबा देवस्थान शिर्डी ने भक्तांसाठी साई मनोहर सांस्कृतिक भवन या नावाने सर्व सुविधा असलेला एक मोठा हॉल बांधलेला आहे तसेच एका गो-शाळेची निर्मितीही केली आहे. याकामी विश्वस्त मंडळाने आमचे ट्रस्टला भविष्यातील कार्यवाहीसाठी अवश्य मिटींगसाठी उपस्थिती ठेवावे, अशी विनंती केली आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७६९** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, अध्यक्ष, श्री मार्तंड म्हाळसापती महाराज ट्रस्ट, शिर्डी यांना पुढील सभेसमोर चर्चेसाठी बोलविणेत यावे. तोपर्यंत सदरहू विषय स्थगित ठेवणेत यावा.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१६** **साईआश्रम भक्तनिवास येथे मेन्टेनन्स कामासाठी रंग मटेरियल खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम (१) च्या खंड (त्र) अन्वये, "भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे'' अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना:** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे संयुक्त विद्यमाने साई आश्रम या भक्तनिवास प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण होऊनसदर प्रकल्प दि.११/०४/२०१३ पासून साई भक्तांकरीता खुला करण्यात आलेला आहे. शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेमार्फत प्रकल्पातील इमारतीचे बांधकाम देणगीदाखल करणेत आले आहे. सदर इमारतीचे बांधकामाकरीता त्यांचेमार्फत ठेकेदार पार्श्वनाथ डेव्हलपर्स, दिल्ली यांची नियुक्ती करणेत आली होती. ठेकेदार यांचा या कामाचा दोषदायीत्व कालावधी दि.३१/०३/२०१४ रोजी संपुष्टात आलेला आहे. सदरचा दोषदायीत्व कालावधी संपुष्टात आलेपासून सदर प्रकल्पाचे व इमारतींचे मेन्टेनन्स संस्थानमार्फत करण्यात येत आहे. साई आश्रम भक्तनिवास येथे एकूण १५३६ रूम्स आहे. त्यामध्ये सततच्या वापराने रंगकामाचे मेन्टेनन्स निघत असते. भक्तांना तातडीने सेवा-सुविधा पुरविणेकामी सदर कामे तातडीने करणे गरजेचे आहे.

**प्रस्ताव:** उपरोक्तप्रमाणे मेन्टेनन्सकामी आवश्यक रंग मटेरिअल व त्यासाठीचे खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Details of Material | Qty. | Unit | Approx. Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01) | Luster Paint (Asian, Nerolac) - Oil base (White) (20 Lit. X 45 Buckets). | 45 | Buckets | 4300/- | 1,93,500/-. |
| 02) | Wall Care Putty (Asian, Nerolac, JK, Birla White - Fine) (40 Kg. X 20 Bags). | 20 | Bags | 900/-. | 18,000/-. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 03) | Acrylic Oil Bound Distemper (Asian Tractor (Red Bucket), Nerolac Beauty) (White) (20kg X 20 Buckets). | 20 | Buckets | 1200/-. | 24,000/-. |
| 04) | Oil Paint- (Asian-Apcolite, Nerolac- Synthetic Enamel Highgloss) (White) (20 Lit. X 5 Buckets). | 100 | Lit. | 215/-. | 21500/-. |
| 05) | Oil Paint- (Asian-Apcolite, Nerolac- Synthetic Enamel Highgloss) (Golden Brown) (20 Lit. X 3 Buckets). | 60 | Lit. | 225/-. | 13,500/-. |
| 06) | Turpentine. | 100 | Lit. | 90/-. | 9000/-. |
| | **Total Amount :** | | | | **2,79,500/-.** |

साई आश्रम भक्तनिवास येथील मेन्टेनन्स करणेकामी आवश्यक उपरोक्त रंग मटेरिअल खरेदी करणेकामी एकूण रु.२,७९,५००/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. तरी याकामी येणारे खर्चास व सदरचे मटेरिअल विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस मान्यता मिळणेसाठी सदरहु प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साई आश्रम भक्तनिवास येथील मेन्टेनन्सकामी आवश्यक असलेले रंग मटेरिअल विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१७** **प्रसाद लाडू निर्मितीसाठी स्वतंत्र फुड प्रोसेसिंग युनिट उभारणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम– २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" व खंड (घ) अन्वये "भक्तांना जेवण देणे आणि अन्नछत्र चालविणे" अशी तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/०२/२०१२ रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्र.१७२ संमत झालेला आहे.

*" यावर सविस्तर चर्चा होऊन प्रसाद लाडू निर्मिती व्यवस्थेसाठी मौजे निमगांव – को-हाळे गट नं.२१८ मधील १ हेक्टर क्षेत्र निश्चीत करण्यात यावे तसेच या कामासाठी श्री. पुष्कर कानविंदे, द ऑडीग्रुप, पुणे यांची आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करुन त्यांचे मार्फत नियोजित प्रकल्पाचे संकल्पन करण्यात यावे असे ठरले."*

**प्रस्तावना:-** दि.१९/०९/२०१६ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांनी घेतलेल्या खातेप्रमुखांचे बैठकीत श्री साईप्रसादालयाचे लगत असलेल्या मौजे निमगांव– को-हाळे येथील गट नं.८७, ८८ पैकी मधील जागेत स्वतंत्र प्रसाद लाडू निर्मिती युनिट प्रस्तावीत करावे अशी सुचना दिली आहे. मौजे निमगांव– को-हाळे येथील गट नं. ८७, ८८ पैकी मध्ये संस्थानचे एकूण ३ हेक्टर क्षेत्र आहे. त्यापैकी सध्या उपलब्ध वापरयोग्य क्षेत्राचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **जागेचा तपशिल** | **क्षेत्र (हेक्टर–आर)** |
|---|---|---|
| ०१ | महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांना वापरास दिलेले क्षेत्र (एकूण ५२ आर क्षेत्रापैकी निव्वळ क्षेत्र) | ०-२२.१८ |
| ०२ | सैनिक आराम गृहासाठी भाडेपट्याने वापरावयास दिलेली जागा. | ०-६० |
| ०३ | जलसंपदा विभागाचे कार्यालय व कर्मचारी निवासस्थानचे बांधकामासाठी प्रस्तावीत जागा. | ०-४० |
| ०४ | प्रस्तावित ओपन स्पेस | ०-१९.६५ |
| ०५ | प्रस्तावित ४५ मिटर रुंदीच्या रस्त्यात जाणारे क्षेत्र | ०-५५.२३ |
| ०६ | प्रस्तावीत २४ मिटर रुंदीच्या रस्त्यात जाणारे क्षेत्र | ०-१२.६६ |
| ०७ | १२ मिटर रुंदीचा अंतर्गत रस्त्याचे क्षेत्र | ०-३५.६३ |
| ०८ | खडीकरण केलेले वाहनतळ ( सध्या उपलब्ध वापरयोग्य क्षेत्र) | ०-५४.६५ |
| | **गट नं. ८७, ८८ एकूण क्षेत्र** | **३-००** |

उपरोक्त पैकी जलसंपदा विभागाचे नियोजीत कार्यालय व कर्मचारी निवासस्थानांचे बांधकामासाठी दि.२१-०६-२०१३ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्र.४५६ संमत करणेत आलेला आहे.

*"यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू प्रकल्पाचे ठेकेदार KRR Infra Project Pvt. Ltd., Hyderabad यांची संस्थानकडे जमा असलेली रु.१०,०२,१८०/- मात्र सिक्युरिटी डिपॉझिट रक्कम जप्त करणेस मान्यता देण्यात आली.*

*तसेच जलसंपदा विभागासंबंधित सुधारीत एस्टीमेट विधी व न्याय विभागाकडे मान्यतेसाठी पाठविणेत आलेले आहे. त्यास विधी व न्याय विभागाची मान्यता येई पर्यंत सदरहू विषय स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले."*

वर नमूद तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे ५४.६५ आर इतके वापरयोग्य क्षेत्र शिल्लक असून सध्या त्याचा वाहनतळ म्हणून वापर करण्यात येत आहे. सदर ठिकाणी सन २००९ मध्ये रु.२५,८९,७४८/- मात्र खर्च करुन संस्थानतर्फे वाहनतळासाठी खडीकरणाचे काम करणेत आलेले आहे. तसेच या ठिकाणी प्रसादालय कर्मचा-यांचे वाहने पार्किंग करणेसाठी पार्किंग शेड उभारणे कामी कार्यादेश देण्यात आलेला असून सदरचे काम ठेकेदारामार्फत सध्या सुरु करणेत आलेले आहे सदर ठिकाणी प्रसाद लाडू निर्मिती युनिटचे बांधकाम करावयाचे झाल्यास वर नमूद खडीकरणाचे भांडवली मुल्यसंस्थानचे लेख्यांवरुन कमी करावे लागेल.

सन २०१७ – १८ मध्ये श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. सध्या नविन प्रसादालय येथे लाडू निर्मिती करणेत येते. यापुर्वी मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील वर नमूद निर्णयाप्रमाणे मौजे निमगांव को-हाळे गट नं.२१८ मधील जागेत लाडू निर्मिती व्यवस्थेचे बांधकाम करणेसाठी सदरहू जागा ग्रीनझोन मधून वगळून येलोझोन मध्येकरण्याचा प्रस्ताव राज्य शासनाचे नगर विकास विभागाकडे सादर केलेला असून तो अदयाप शासन स्तरावर मान्यतेच्या प्रतिक्षेत आहे. त्यामुळे सदर ठिकाणी बांधकामास सदयस्थितीत परवानगी मिळणार नाही.

मौजे निमगांव को-हाळे गट नं.८७, ८८ मधील वर नमूद केलेप्रमाणे उपलब्ध वापर योग्य क्षेत्र ५४.६५ आर हे ४५ मिटर रुंदीचे प्रादेशिक विकास योजना रस्त्यासन्मुख असल्याने विद्यमान विकास नियंत्रण नियमावलीनुसार विकास योजना रस्त्यापासून विहीत अंतरावर नियोजीत बांधकाम करावे लागेल याबाबत नगररचना, अहमदनगर कार्यालयातील नगररचनाकार व सहाय्यक नगररचनाकार यांचेशी चर्चा करणेत आली. त्यांनी सदर रस्ता अस्तीत्वात नसल्याने त्यापासून किमान ६ मीटर अंतरावर बांधकाम करता येईल. तथापी त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेमार्फत सदर विकास योजना रस्त्याचे आखणीनुसार त्यांचे विभागाद्वारे रस्ता विकसीत करणेचा प्रस्ताव अथवा योजना नसलेबाबत दाखला प्राप्त करणेत यावा असे सांगितले. त्यासाठी आर्किटेक्ट यांचेमार्फत या प्रकल्पासाठी लाडू विभाग यांचे गरजेनुसार नियोजित बांधकाम क्षेत्र निश्चीत करुन त्यानुसार रेखांकन तयार करता येईल.

तरी लाडू प्रसाद निर्मितीसाठी स्वतंत्र फुड प्रोसेसिंग युनिट बांधकाम करणेसाठी आर्किटेक्ट नेमणूकीकरीता वर्तमानपत्रातील जाहीर सूचनेद्वारे आर्किटेक्चरल सल्लागारांकडून ई – निविदा मागविणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.७७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, लाडू प्रसाद निर्मितीकामी स्वतंत्र फुड प्रोसेसिंग युनिटचे बांधकाम करणेसाठी आर्किटेक्ट नेमणूकीकरीता वर्तमानपत्रातील जाहीर सूचनेद्वारे आर्किटेक्चरल सल्लागारांकडून ई- निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१८** **शिर्डी विकास योजना, प्रा.वि.यो.शिर्डी (सु.) बाबत.**

**प्रस्ताव-** नगररचना अधिकारी, शिर्डी विकास योजना (सुधारीत) तथा प्र.सहायक संचालक, नगररचना अहमदनगर यांनी दि.१०/१२/२०१५ व दि.२९/१२/२०१५ रोजीचे पत्रान्वये खालील प्रमाणे कळविले आहे.

"...शिर्डी नगरपंचायतीने उक्त अधिनियमाचे कलम ३८ सह कलम २३(१) अन्वये तिच्या क्षेत्राधिकारातील प्रदेशासाठी सुधारीत विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहिर केला आहे. शिर्डी नगरपंचायतीने सदर विकास योजना तयार करण्यासाठी खाली सही करणार यांची नियुक्तीदि.१५/०७/२०१५ च्या आदेशाने केलेली आहे. ....

... शिर्डी क्षेत्राच्या विकास योजनेमध्ये आपल्या विभागास जागेची आवश्यकता असल्यास आपल्या विभागाची पुढील २० वर्षात होणारी वाढ विचारात घेवून आवश्यक क्षेत्र सर्व्हे नंबर इत्यादिंसह प्रस्ताव नकाशांसह

या कार्यालयास पाठवावा. नमूद करण्यात येते की, आपल्या विनंतीनुसार विकास योजनेत सार्वजनिक प्रयोजनांसाठी नामोनिर्दिष्ट केलेली जागा मंजूर झालेली विकासयोजना अंमलात आल्याचे तारखेपासुन १० वर्षाचे आत संपादन करणेची संपुर्ण जबाबदारी आपणावर राहील तसेच अशा आशयाचे रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर बंधपत्र करून देणे आवश्यक राहील. ”

वरीलप्रमाणेचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि.३१/०८/२०१६ रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावामध्ये पूर्वीचे आरक्षणासह खलील नमूद नवीन आरक्षण प्रस्तवित करणेबाबत प्रस्ताव सादर करणेत आला होता.

| अ.क्र. | आरक्षणाचा हेतू | क्षेत्र | अपेक्षित अंतर / परिसर |
|---|---|---|---|
| १ | श्री साईदर्शनासाठी वेगवेगळया भागातून पायी येणारे साईभक्तांचे निवास व इतर अनुषंगिक व्यवस्था करणेकामी पालखीग्राम साठी क्षेत्र आरक्षित करणे. | ५.०० हेक्टर | शिर्डी – समाधी मंदिरापासून अंदाजे १ कि.मी. अंतरापर्यंत |
| २ | वाहनतळांसाठी ठराविक अंतरावर वेगवेगळया ठिकाणी क्षेत्र आरक्षित करणे. तसेच मल्टीलेव्हल पार्कीगसाठी वेगवेगळया ठिकाणी क्षेत्र आरक्षित करणे. | प्रत्येकी २.०० हेक्टर | शिर्डी – समाधी मंदिरापासून अंदाजे १ कि.मी. अंतरापर्यंत पाच ठिकाणी रस्त्यालगत |
| ३ | सध्या होणारी गर्दी, त्यामुळे येणाऱ्या अडचणी तसेच सुरक्षेच्य दृष्टीने गुरुस्थान, द्वारकामाई, श्री समाधी मंदीर व चावडी या मंदिरांचे सुलभ दर्शनासाठी एकत्रित दर्शन रांगेचे नियोजनासाठी तसेच रथपालखी मिरवणूकीचे गर्दीचे नियोजनासाठी दक्षिणेकडील बाजूस अतिरिक्त जागा उपलब्ध करणेसाठी क्षेत्र आरक्षित करणे. | - | शिर्डी – समाधी मंदिर दक्षिण बाजू. |
| ४ | मंदिर परिसरालगत संभाव्य दुर्घटना टाळणे व गर्दीसाठी (Refuge area) अतिरिक्त जागा उपलब्ध करणे. | - | शिर्डी – समाधी मंदिर परिसरालगत |
| ५ | सर्व्हे नं.५४/५५ मधील आरक्षित क्षेत्राचा संस्थानचे विविध उपक्रमांसाठी भूसंपादन असा हेतू बदल कर | - | - |
| ६ | शिर्डी परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी गार्डनसाठी क्षेत्र आरक्षित करणे. | प्रत्येकी २.०० हेक्टर | शिर्डी- समाधी मंदिरापासून अंदाजे २ कि. मी. अंतरापर्यंत |
| ७ | शिर्डी परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी भक्तनिवाससाठी क्षेत्र आरक्षित करणे. | प्रत्येकी २.०० हेक्टर | शिर्डी- समाधी मंदिरापासून अंदाजे २ कि. मी. अंतरापर्यंत |
| ८ | शिर्डी परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी संस्थानचे बससेवेचे बस थांब्यासाठी क्षेत्र आरक्षित करणे. | प्रत्येकी ५.०० आर | शिर्डी- समाधी मंदिरापासून अंदाजे २ कि. मी. अंतरापर्यंत पाच ठिकाणी |
| ९ | माहिती व सुविधा केंद्रासाठी शिर्डी शहराचे चारही बाजूने मुख्य रस्त्यालगत क्षेत्र आरक्षित करणे. | प्रत्येकी ५.०० आर | शिर्डी- समाधी मंदिरापासून अंदाजे २ कि. मी. अंतरापर्यंत पाच ठिकाणी |
| १० | प्राथमिक व माध्यमिक शाळांसाठी शहरात किमान दोन ठिकाणी क्षेत्र आरक्षित करणे. | प्रत्येकी २.०० हेक्टर | शिर्डी- समाधी मंदिरापासून अंदाजे २ कि. मी. अंतरापर्यंत |
| ११ | संस्थानचे प्रस्तावीत पाणीपुरवठा, वितरणव्यवस्था, शुद्धीकरण यंत्रणा घनकचरा व्यवस्थापन वॉटर रिसायक्लींग इत्यादी साठी क्षेत्र आरक्षित करणे. | प्रत्येकी २.०० हेक्टर | शिर्डी – समाधी मंदिरापासून अंदाजे २ कि.मी. अंतरापर्यंत दोन ठिकाणी |
| १२ | संस्थानमार्फत खरेदी करणेत आलेल्या क्षेत्रांचे संस्थानचे विविध उपक्रमांसाठी आरक्षण करणे व झोनबदल करणे. | - | - |

उपरोक्त प्रस्तावावर निर्णय क्र.५८८ खालील प्रमाणे संमत करणेत आला आहे

“.. शिर्डी विकास योजना, प्रादेशिक विकास योजना (सुधारीत) बाबतच्या उपरोक्त प्रस्तावामधील आरक्षणाचे समितीने अवलोकन केले व आरक्षण आणि भू-संपादन याबाबतची माहिती घेतली तसेच कायदेविषयक बाबी समजून घेतल्या.

यावर सविस्तर चर्चा होऊन, पुर्वीचे आरक्षणांसह उपरोक्त नमूद नवीन क्षेत्रांसाठी संस्थान करीता आरक्षण प्रस्तावीत करणेबाबत नगररचना अधिकारी, शिर्डी विकास योजना (सुधारीत) तथा प्र.सहायक संचालक, नगररचना, अहमदनगर यांना यांना कळविणेस मान्यता देण्यात आली."

मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१/०८/२०१६ चे निर्णयानुसार पूर्वीचे आरक्षणांसह नवीन क्षेत्रांसाठी संस्थान करीता आरक्षण प्रस्तावित करणेबाबत नगररचना अधिकारी, शिर्डी विकास योजना (सुधारीत), शिर्डी तथा, प्र. सहाय्यक संचालक, नगररचना आणि मुल्य निर्धारण विभाग, अहमदनगर यांना इकडील जा. नं. ३०११/२०१६ दि.१२/०९/२०१६ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे. त्यावर सहाय्यक संचालक, नगर रचना, अहमदनगर यांनी त्यांचेकडील दि.२०/०९/२०१६ (प्राप्त दि.२८/०९/२०१६) रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

".. प्रारुप सुधारीत विकास योजनेत काही आरक्षणे प्रस्तावित करुन त्यासाठी संस्थानला समुचित प्राधिकरण म्हणून दर्शविल्यास सदरची विकास योजना (सुधारीत) मंजूर होऊन अमंलात आल्याचे दिनांकापासून १० वर्षाचे आत सदरची जागा संपादन करण्याची जबाबदारी आपली राहील. तसेच विहीत नमून्यातील प्रतिज्ञापत्र सोबत जोडली असून रु१००/- च्या स्टॅम्प पेपरवर असे प्रतिज्ञापत्र तयार करुन ते आपल्या स्वाक्षरीसह या कार्यालयास पाठविण्याची विनंती आहे. जेणेकरुन या कार्यालयास संस्थानसाठी जागा आरक्षीत करणे बाबत पुढील योग्यती कार्यवाही करण्यात येईल."

सहाय्यक संचालक, नगर रचना, अहमदनगर यांनी खालील मसुद्यानुसारचे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे.

" -------------------------शहरातील आमची, नोंदणी क्र.------------------------------- दिनांक ------------------असलेली ---------------------ही संस्था, पंजीकृत असूनसंस्थेची उद्दीष्टे खालील प्रमाणे आहेत.

१) ------------------------------------------

२) -------------------------------------------

३) ----------------------------------------

सदरहू संस्थेस वरील सार्वजनिक उद्दिष्टपुर्तीसाठी इमारत बांधण्यासाठी -----------------शहरात जागा उपलब्ध नाही / असलेली भू. क्र. ------------------मधील ---------चौ. मी. / हे. ------------जागा अपुरी आहे. संस्थेस वरील उद्दीष्टांच्या अनुषंगाने--------------चटई क्षेत्राची आवश्यकता आहे. हे चटई क्षेत्र ---------------------------------या उपयोगाकरीता वापरण्याचा प्रस्ताव आहे. संस्थेकडे ------- निधी, जमीन खरेदी व बांधकामासाठी उपलब्ध आहे. अधीक आवश्यक निधी संस्था --------------ची उपाय-योजना करता उभा करील.

तेव्हा सदरहू संस्थेसाठी -------------शहराच्या विकास योजनेमध्ये भू.क्र.------------मधील ----------------चौ. मी. / हे.-----------जागा संस्थेच्या नावे आरक्षित करावी. जागेचा नकाशा जोडलेला आहे.

---------------विकास योजना शासनाने मंजूर केल्यापासून दहा वर्षाच्या कालावधीत जागा संपादन करणे आवश्यक आहे. याबाबत सदरहू संस्थेस जाणीव असून यासाठी संस्था-------- या वर्षाच्या अंदाजपत्रकात आवश्यक ती आर्थिक तरतूद करणार आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या क्र.४९ खालील तरतुदीनुसार जागेच्यामालकाने दिलेली खरेदी सुचना यथास्थिती शासन वा संचालक, नगर रचना , यांनी कायम केल्यास संस्थेसाठी आरक्षित जमीन एका वर्षाच्या आत संपादन करण्यासाठी आवश्यक तो आर्थिक निधी त्वरीत उपलब्ध करण्यात येईल, अशी ही संस्था हमी देते.

सही

कार्यकारी अधिकारी, मा. अध्यक्ष, मा. सदस्य,

तरी वर नमूद केलेनुसार प्रारुप सुधारीत विकास योजनेत वर नमूद तक्त्यातील काही आरक्षणे प्रस्तावित करणेसाठी सहाय्यक संचालक, नगर रचना, अहमदनगर यांना वरीलप्रमाणेचे प्रतिज्ञापत्र रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर करुन देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७७२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१९** **श्री साईप्रसादालय येथील बायोगॅस प्लॅन्ट व बुंदी किचनचे पत्राशेड परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद:** अधिनियमाचे कलम-२१ (१) मधिल पोटकलम (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** श्री साईप्रसादालयात फुड वेस्टेज समस्या दूर करणेकरीता इमारतीच्याउत्तर बाजूस पाच मे.टन क्षमतेचा बायोगॅस प्लॅण्ट कार्यान्वित करणेत आलेला आहे. सदर प्रकल्पाच्या डायजेस्टर टाकीच्या बाजुने व इतर ठिकाणी पावसाचे पाणी साचलयाने "चिखल तयार होतो तसेच सदरचा प्रकल्प बघणेकरीता मा. विश्वस्त, शासकीय अधिकारी इतर प्रमुख मान्यवर येत असतात. याकरीता मेकॅनिकल विभागाने उपरोक्त विषयांकीत ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणेबाबत इकडील विभागास कळविले आहे. तसेच प्रसादालयाच्या मागील बाजूस बुंदी पत्राशेड मधे साईभक्तांना दर्शन रांगेत देण्यात येणारी बुंदी तयार करण्यात येते. सदर पत्राशेड समोरील काही भागात पेव्हींग ब्लॉक बसविणे आवश्यक आहे. याबाबत लाडू व बर्फी प्रसाद निमिर्ती विभागाने त्यांचे दि.०३/०९/२०१६ रोजीचे पत्राने कळविले .

**प्रस्ताव-** बायोगॅस प्लान्ट भोवती व बुंदी निर्मिती शेड भोवतीचे ३४६ चौ.मी. जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणे प्रस्तावीत आहे. याकामी सन २०१५-२०१६ च्या जिल्हा दरसुची नुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| **अ.नं.** | **कामाचा तपशिल** | **परिमाण** | **एकक** | **दर** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | मजुरांच्या मार्फत खोदकाम करणे | १५२.०४ | घन मिटर | ११५/- | १७,४८४.६० |
| ०२ | मुरुम भराई करणे | ५१.८३ | घन मिटर | ३२०/- | १६,५८५.६० |
| ०३ | डबर सोलींगकरणे | ६९.११ | घन मिटर | ३९०/- | २६,९५२.२९ |
| ०४ | ६० एम एम जाड पेव्हींग ब्लॉक, ३०० kg/sq cm strength | ३४५.५५ | चौ.मी. | ६१०.०० | २,१०,७८५.५० |
| | एकूण रक्कम रुपये | | | | २,७१,८०७.९९ |
| | **पुर्णांकीत एकूण रक्कम** | | | | **२,७१,८०८.००** |

तरी सदरहुकामी येणा-या अपेक्षीत खर्चास व याकामी विहित पध्दतीने निविदा मागविणेस मान्यतेस्तव सदरहू प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर होणेस विनंती

**निर्णय क्र.७७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालय येथील बायोगॅस प्लॅन्ट व बुंदी किचनचे पत्राशेड परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणेसाठी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२०** **नियोजित बांधकामासाठी संस्थानकरीता विभागांतर्गत ठेकेदार नोंदणी सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.विश्वस्त श्री.प्रताप भोसले यांनी त्यांचे दि.१४/०९/२०१६ रोजीचे शिर्डी भेटी दरम्यान इकडील विभागास खालिलप्रमाणे सूचना मौखिक स्वरूपात दिलेल्या आहेत.

संस्थानमार्फत वेळोवेळी हाती घेण्यात येणा-या बांधकामांसाठी अवलंबिण्यात येणा-या निविदा प्रक्रियेमध्ये नामांकित व चांगल्या क्षमतेच्या ठेकेदारांनी सहभागी व्हावे व पर्यायाने संस्थानची बांधकामे वेगाने व दर्जेदार स्वरुपात पूर्ण व्हावीत याकरीता ठेकेदारांनी शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केलेल्या नोंदणीवर संस्थानने विसंबून राहू नये त्याऐवजी संस्थानव्दारे स्वतःची ठेकेदार नोंदणी पध्दती सुरु करणेत यावी. त्यासाठी जाहिर सूचना प्रसिध्दकरुन प्रामुख्याने खालील कागदपत्रे ठेकेदार यांचेकडून मागविण्यात यावीत.

Legal Part- 1) The bidder should attach the copies of Pan card, Vat/Tan registration, Service Tax registration.

2) The bidder should attach the copy Tax clearance certificate from Income tax department.

Technical Part- 1) List of Technical staff The Engineering staff shall be degree or diploma holder with Sufficient experience.

2) Work done certificate shall be attached having value of work done.

Resources Part- 1) List of Plant, Equipment and Machinery.

2) Available Infrastructure such as RMC Plant, Concrete Pump, Single bag Mixer, JCB, Shuttering Material, Props, Weigh batcher etc.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था(शिर्डी) अधिनियम, २००४ अन्वये संस्थानची विश्वस्तव्यवस्था पुनर्गठीत करण्यात आलेली असल्याने, यापुर्वी मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. १००१ अन्वये संस्थानमार्फत खरेदी करण्यात येणा-या विविध माल, सेवा व इतर अनुषंगिक कामे यासाठी शासनाची नियमावली व निर्णयानुसार निविदा नियमावली लागू करणेस मान्यता देणेत आलेली आहे. तथापी महाराष्ट्र शासनाचे कार्यालयीन खरेदीसाठीच्या नियमपुस्तिकेची व्याप्ती सेवा किंवा स्थापत्य कामे यांना लागू नाही.

सध्या मध्यम/मोठया स्वरुपांचे बांधकाम प्रकल्पांसाठी सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे किमान पात्रता निकष ठेवण्यात येतात.

सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा अन्य शासकीय विभाग यांचेकडील योग्य त्या श्रेणीतील नोंदणी प्रमाणपत्र पॅनकार्ड, व्हॅट रजिष्ट्रेशन कामाचे अंदाजपत्रकीय रकमेच्या ०१ टक्का बयाणा रक्कम राष्ट्रीयीकृत बॅंकेच्यडिमांड ड्राफ्टव्दारे मा. कार्यकारी अधिकारी यांचे नावाने सादर करणे.

निविदा सादरकर्ते यांनी मागील ०५ वर्षात अंदाजपत्रकीय रकमेच्या किमती इतके ०१ अथवा अंदाजपत्रकीय रकमेच्या निम्म्या रकमेची ०२ कामे केलेली आवश्यक आहे.

मागील ०३ आर्थिक वर्षाची सरासरी उलाढाल ही कामाच्या अंदाजपत्रकीय रकमेच्या दुप्पट असणे आवश्यक आहे. त्या संदर्भात ऑडीटेड बॅलन्सशीट जोडणे.

ठेकेदार यांची कामाच्या अंदाजपत्रकीय रकमेच्या ७५ टक्के रकमे इतकी पत बॅंकेत असणे आवश्यक आहे. त्यासंदर्भात बॅंकेचे पत्र जोडणे

ठेकेदार यांची बिडींग कॅपीसिटी ही कामाच्या अंदाजपत्रकीय रकमे इतकी अथवा त्यापेक्षा आधिक असणे.

ठेकेदार यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या यंत्रसामुग्रीची यादीजोडणे.

ठेकेदार यांनी तांत्रीक व कुशल/अकुशल मनुष्यबळ यादी जोडणे.

ठेकेदार यांना कुठलेही शासकिय /निमशासकिय विभाग यांनी काळया यादीत सामाविष्ट केले नसलेबाबत हमीपत्र जोडणे.

ठेकेदार यांनी अर्बीट्रेशन / लिटीगेशन रेकॉर्ड जोडणे.

ठेकेदार यांचेकडे पीएफ नोंदणी क्रमांक असणे आवश्यक आहे.

तसेच छोट्या स्वरुपाच्या बांधकामासाठी सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे किमान पात्रता निकष ठेवण्यात येतात.

सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा अन्य शासकीय विभाग यांचेकडील योग्य त्या श्रेणीतील नोंदणी प्रमाणपत्र.

पॅनकार्ड, व्हॅट रजिष्ट्रेशन कामाचे अंदाजपत्रकीय रकमेच्या ०१ टक्का बयाणा रक्कम राष्ट्रीयकृत बॅंकेच्याडिमांड ड्राफ्टव्दारे मा. कार्यकारी अधिकारी यांचे नावाने सादर करणे अथवा सदर रक्कम संस्थानचे लेखाशाखा विभागात भरुन त्याची पावती जोडणे.

निविदा सादरकर्ते यांनी मागील ०३ वर्षात अंदाजपत्रकीय रकमेच्या ७५% किमतीचे ०१ अथवा सदर रकमेच्या निम्म्या रकमेची ०२ कामे केलेली आवश्यक आहे.

ठेकेदार यांना कुठलेही शासकिय /निमशासकिय विभाग यांनी काळया यादीत सामाविष्ट केले नसलेबाबत हमीपत्र जोडणे.

ठेकेदार यांचेकडे पीएफ नोंदणी क्रमांक असणेआवश्यक आहे.

संस्थानचे मोठ्या, मध्यम व छोटया स्वरुपाच्या बांधकामाचे निविदाकारांसाठी सर्वसाधारणपणे वरीलप्रमाणे पूर्वपात्रता निकष ठेवण्यात येतात. त्यावरुन असे दिसून येईल की सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा अन्य शासकिय विभाग यांचेकडील योग्य त्या श्रेणीतील नोंदणी प्रमाणपत्र हा केवळ एकच निकष न लावता

निविदाकार यांनी केलेली कामे, त्यांची उलाढाल असे इतरही निकष ठेवण्यात येतात. तथापी संस्थानची स्वतंत्र नोंदणी पध्दती विभागातंर्गत सुरु करावयाची झाल्यास त्याकरीता राज्य शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निरनिराळया वर्गवारीत ठेकेदार नोंदणी करणेसाठी असलेले निकष, आवश्यक कागदपत्रे, नियमावली यांची माहिती घेऊन त्यानुसार संस्थानकरीता आवश्यक प्रक्रिया विकसीत करता येईल.

**प्रस्ताव**: तरी मा. विश्वस्त श्री. प्रताप भोसले यांनी वरीलप्रमाणे दिलेल्या सूचनांचे अंमलबजावणीसाठी प्रथम मा. व्यवस्थापन समितीचा धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे. त्यानंतर सविस्तर नियमावली तयार करुन मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने वर्तमानपत्रात जाहिर सूचना प्रसिध्द करुन ठेकेदारांकडून नोंदणीकरीता अर्ज मागविता येतील. त्यासाठी ठेकेदारांना ऑनलाईन अर्ज भरण्याची व्यवस्था संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संकेतस्थळावर उपलब्ध करता येईल. तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) ही विश्वस्तव्यवस्था महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियमाव्दारे पुनर्गठीत केलेली असल्याने सदर प्रक्रिया राबविणेपुर्वी महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचे मार्गदर्शन घेणे उचित होईल असे मत आहे.

**निर्णय क्र.७७४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या नियोजित बांधकामांसाठी विभागांतर्गत ठेकेदार नोंदणी प्रक्रिया राबविणेकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२१** **श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये प्राचार्य कार्यालयात ॲल्युमिनीअम पार्टीशन कॅबीन तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाचे कलम-२१ (१) मधिल पोटकलम (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा इंग्लिश मिडीअम स्कूलमधील कार्यालयात प्राचार्य व मुख्यध्यापीका यांची एकत्रीत बसण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. प्राचार्य व मुख्यध्यापिका यांचेकरीता स्वतंत्र कॅबीन ॲल्युमिनीअम पार्टीशनमध्ये तयार करुन मिळणेबाबत प्राचार्य यांनी कळविले आहे. त्यानुसार प्रत्यक्ष पहाणी करुन मोजमापे घेण्यात आली आहे.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा इंग्लिश मेडीअम स्कूल कार्यालयात प्राचार्य यांचेकरीता ॲल्युमिनीअम कॅबीन बनविणेकामी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षीत आहे.

| Sr. No. | Description | Qty./Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01. | Providing & fixing in position colour anodized extruded Aluminum Partition having frame made out of aluminium extruded tubular section of size 65mm x 40mm with 12mm thick three layered flat pressed teak wood particle board bonded with BWP type exterior grade phenol formaldehyde synthetic resin conforming to IS 12823-1990, laminated on both sides, Novateak or equivalent, laminated 5 mm thk. selected quality float glass panels fixed with aluminium glazing clips 12mm x 12mm (conical) rubber cushioning to glass as per approved detailed drawing etc. complete. (Sample to be got approved from Engineer before use). Spec. No.: As directed by Engineer-in-charge.<br>Size: i) 14'-6"x9'-9", ii) 19'x6"x11'-9".<br>Alluminium Section Make: Jindal.<br>Glass : Saint Gobain, Modi. | 30.67 Sqm<br><br>(330 Sq.ft) | 2516/- | 77,166/-. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 02 | Providing and fixing in position single shuttered extruded colour anodized door of overall size 2.10m x 0.9m or as specified with aluminium door frame of colour anodized section 101.60 x 44.75mm, 3.18mm thk. & shutter comprising of colour anodized section having bottom and lock rail of size 150mm x 44.45mm, 2.9mm thk, top rails 47.62mm x 44.45mm, 3.18mm thk., vertical styles 47.62mm x 44.45mm, 3.00mm thk. and glass panes 5mm thk. for the fanlight portion and 12mm thk. both side laminated phenol bonded particle board panels for shutter, tubular door closer of heavy duty having ISI mark heavy duty concealed lock, necessary glazing clips, pvc gasket, tower bolts etc. complete. as per detailed design and drawing or as directed by Engineer-in-charge including all material, labour and equipment etc. complete<br>Glass: Saint Gobain, Modi.<br>Lock: ISI Make.<br>Alluminium Section Make: Jindal.<br>Size : 2.1 x 0.9 m x 2 Nos. | 3.78 Sqm | 5458/- | 20,631/-. |
| 03. | Providing and fixing in position colour anodized alluminium extruded section two track sliding window upto 1.2m ht. outer frame made from colour anodized section of overall size 62mm x 45mm, bottom section with or without drain, track section weighing 0.90 kg. per mtr. and top and side sections weighing 0.838 kg. per mtr. with shutter or sections made of 19mm x 40mm size having avg. wt. of 0.6 kg. per mtr. (or as required size with change in proportionate wt.) with 5mm thk. selected quality plain glass sheet fixed with new neoprene gasket shutters to be provided with nylon encased stainless rollers, necessary locks and handles etc. complete. (As per drawing). Addl. Item Spec. No.: As directed by Engineer-in-charge.<br>Size: 2’-6”x1’-6” x 1No.<br>Glass: Saint Gobain, Modi.<br>Lock: ISI Make. Alluminium Section Make: Jindal. | 0.35 Sqm<br><br>(3.75 Sq.ft) | 4401/- | 1540/-. |
| | **Total Amount** | | | **99,337/-.** |

तरी याकामी स्थानिक ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागवून सदरहू काम करणेस व याकामी येणाऱ्या उपरोक्त अपेक्षीत खर्चास मान्यता मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये प्राचार्य कार्यालयात ॲल्युमिनीअम पार्टीशन कॅबीन तयार करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२२** **संस्थान कर्मचाऱ्यांना साईभक्तांशी करावयाचा संवाद, वर्तणुक व इतर बाबींचे प्रशिक्षण आयोजित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** मा.त्रिसदस्य समितीचे दि.१०/११/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५१८ मा.विश्वस्तांच्या सुचनांमध्ये संस्थान कायम कर्मचा-यांमधील ब-याचशा कर्मचा-यांना ते करत असलेल्या कामाचे स्वरुप समजत नसल्याचे निदर्शनात आले असून कर्मचा-यांनी नम्रतेने, आदरपुर्वक व सेवाभाव वृत्तीने काम करावे, याकरीता कर्मचा-यांच्या कामाच्या स्वरुपाचे प्रशिक्षण देण्यासाठी कार्यशाळा आयोजित करणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत याव. असे निर्देश देणेत आलेले होते.

त्यानुसार मा.अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर जिल्हा प्रशिक्षण प्रबोधिनी, अहमदनगर यांचेकडून दि.२९ मार्च, २०१६ रोजीचे पत्राने संस्थानचे अंदाजे २००० कर्मचा-यांकरीता साईभक्तांशी करावयाचा संवाद, वर्तणूक व इतर अनुषंगीक बाबींचे प्रशिक्षण आयोजित करणेबाबत सविस्तर प्रस्ताव मागविणेत आलेला होता. जिल्हा प्रशिक्षण प्रबोधिनी यांनी दि.१६/०५/२०१६ रोजीचे पत्राने सशुल्क प्रस्ताव कळविला असून, त्यामध्ये सदरचे प्रशिक्षण वर्ग ०४ कर्मचा-यांकरीता आयोजित करण्यात येणार असून, सदरचे ०२ दिवसीय अनिवासी प्रशिक्षण शिबीर शिर्डी येथे आयोजीत करणेसाठी (ज्या मध्ये संस्थानने प्रशिक्षक, प्रशिक्षणार्थीकरिता चहा, भोजन, निवास, सर्व सोयी असलेला प्रशिक्षण हॉल, प्रोजेक्टर, संगणक, साऊंड सिस्टीम इ.सोई सुविधा उपलब्ध करुन देणेचे अटीवर) प्रती प्रशिक्षणार्थी प्रती दिन रु.४००/- प्रमाणे शुल्कआकरणेत येईल. तसेच जिल्हा प्रशिक्षण प्रबोधीनी मार्फत आत्मा मालीक संस्थान, कोकमठाण, ता.कोपरगांव या ठिकाणी प्रशिक्षण आयोजीत करण्यात येतात. तेथे प्रशिक्षण आयोजीत करावयाचे असल्यास प्रति प्रशिक्षणार्थी प्रती दिन रु.१०००/- (निवासी) व रु.७५०/- (अनिवासी) शुल्क आकारुन प्रशिक्षण आयोजीत करता येईल, असे कळविले होते.

**(ब)** त्यास अनुसरुन, कामानिमित्त ज्या विभागातील कर्मचा-यांचा साईभक्तांशी थेट संबंध येतो असे मंदिर विभाग, जनसंपर्क कार्यालय आणि संरक्षण विभागातील वर्ग ०४ कर्मचारी तसेच पुजारी अशा अंदाजे २०८ कायम कर्मचा-यांसाठी जिल्हा प्रशिक्षण प्रबोधीनी, अहमदनगर यांचेमार्फत त्यांनी कळविले प्रमाणे प्रशिक्षणार्थीकरीता चहा,भोजन निवास, सर्व सोयी असलेला प्रशिक्षण हॉल, प्रोजेक्टर, संगणक साऊंड सिस्टीम इ.सोई सुविधा संस्थानमार्फत उपलब्ध करुन देऊन शिर्डी येथे प्रशिक्षण आयोजीत करता येईल, असे स्पष्ट मत नोंदवून प्रस्ताव मान्यतेसाठी मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करणेत आलेला होता. त्यावर मा.त्रिसदस्य समितीचे दि.१४/०७/२०१६ मध्ये निर्णय क्र.४२६ अन्वये '<u>जिल्हा प्रशिक्षण प्रबोधीनी अहमदनगर मार्फत आत्मा मालीक संस्थान कोकमठाण ता.कोपरगांव या ठिकाणी संस्थानचे मंदिर विभाग,संरक्षण विभाग, व जनसंपर्क कार्यालयातील वर्ग ०४ कर्मचारी व पुजारी अशा एकुण २०८ कायम कर्मचा-यांना साईभक्तांशी करावयाचा संवाद, वर्तणूक व इतर बाबींचे ०२ दिवसीय अनिवासी प्रशिक्षण देण्यात यावे असे ठरले, तसेच प्रस्तावात नमूद केलेनुसार सदरहू प्रशिक्षण देणेकामी प्रति प्रशिक्षणार्थी प्रति दिन (अनिवासी) रु.७५०/- मात्र याप्रमाणे येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.</u> असा निर्णय संमत झालेला आहे.

**क)** मा. त्रिसदस्य समितीचे उपरोक्त संमत निर्णयानुसार प्रशिक्षणाच्या तारखा निश्चीत करणेसाठी जिल्हा प्रशिक्षण प्रबोधीनी, अहमदनगर यांना द्यावयाचे पत्र व टिपणी मान्यतेसाठी सादर करणेत आलेली होती. त्यावर मा.कार्यकारी अधिकारी महोदयानी शिरडी संस्थानकडे सर्व सोई-सुविधा उपलब्ध असतांना देखील सदरचे प्रशिक्षण आत्मा मालीक संस्थान, कोकमठाण येथे आयोजीत करणे योग्य होणार नाही. त्याऐवजी सदरचे प्रशिक्षण शिर्डी येथे आयोजीत करुन त्यास प्रती प्रशिक्षणार्थी प्रति दिवस रु.७५०/- ऐवजी केवळ रु.४००/- खर्च येणार आहे. सबब, सदर बाब सध्याचे व्यवस्थापनाचे निदर्शनास आणून देऊन कार्यवाही करणे उचित होईल. असे तोंडी निर्देश दिलेले आहेत.

**ड)** त्यास अनुसरुन जिल्हा प्रशिक्षण प्रबोधीनी, अहमदनगर यांचेकडील दि.१६/०५/२०१६ रोजीचे प्रस्तावानुसार, प्रशिक्षणासाठी येणा-या प्रशिक्षकांची निवासव्यवस्था, चहा, भोजन व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करुन तसेच प्रशिक्षणार्थीचा दोन वेळेचा चहा व माध्यान्ह भोजन, प्रशिक्षणासाठी प्रोजेक्टर, संगणक, साऊंड सिस्टीम व इतर अनुषंगीक बाबी संस्थानमार्फत उपलब्ध करुन देऊन प्रसादालय इमारतीमधील आय.टी.विभागाचे शेजारील हॉलमध्ये मंदिर विभाग, जनसंपर्क कार्यालय आणि संरक्षण विभागातील वर्ग ०४ कर्मचारी तसेच पुजारी अशा एकुण अंदाजे २०८ कायम कर्मचा-यांसाठी ०२ दिवसीय अनिवासी प्रशिक्षण शिबीर आयोजीत करणेस व त्याप्रमाणे प्रती प्रशिक्षणार्थी प्रती दिन रु.४००/- प्रमाणे शुल्क अदा करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.७७६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान कर्मचाऱ्यांना जिल्हा प्रशिक्षण प्रबोधीनी, अहमदनगर यांचेकडून साईभक्तांशी करावयाचा संवाद, वर्तणुक व इतर बाबींचे प्रशिक्षण देणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.२३** **श्री.प्रशांत प्रभाकर सोनवणे, तात्पुरते निदेशक यांचे सेवेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचालित श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये ऑगस्ट २००८ च्या प्रशैक्षणिक सत्रापासून केंद्र शासनाच्या डायरेक्टोरेट जनरल ऑफ एम्प्लॉयमेंट ऑफ ट्रेनिंग(DGET) यांच्या संलग्नतेने त्यांच्या क्राफ्टसमन ट्रेनिंग स्किम(CTS) मधील एक वर्ष कालावधीचा क्राफ्टसमन फुड प्रॉडक्शन (व्हेजीटेरियन) हा व्यवसाय अभ्यासक्रम (ट्रेड कोर्स) सुरु करण्यात आला. यामध्ये सन २००९-१० ते २०१३-१४ पर्यंतच्या सत्रामध्ये पाच तुकड्यांचे प्रशिक्षण पुर्ण झाले आहे मात्र ऑगस्ट २०१४-१५ या सत्रापासून DGET यांनी सदरचा अभ्यासक्रम क्राफ्टसमन ट्रेनिंग स्किम मधून वगळला आहे त्यामुळे ऑगस्ट २०१४ सत्रामध्ये प्रशिक्षणार्थ्यांना सदर ट्रेडसाठी प्रवेश दिलेला नाही.

**(ब)** सदर ट्रेडसाठी निदेशक भरतीकामी संस्थेतील सर्व ट्रेडच्या निदेशक पदांची मागसवर्ग आरक्षण स्थिती ठरवून सुरुवातीला जानेवारी२००८ मध्ये अनुसुचित जमाती(S.T.) प्रवर्गामधून व नंतर ऑक्टोबर २००९ मध्ये विशेष मागसवर्ग (S.B.C.) प्रवर्गातील उमेदवारांसाठी पद भरतीच्या जाहिराती देण्यात आल्या. दोन्ही वेळी त्या त्या प्रवर्गातून उमेदवारांचे अर्ज प्राप्त न झाल्याने माव्यवस्थापन समितीचे मान्यतेने प्राप्त झालेल्या इतर अर्जामधून इतर मागसवर्ग (O.B.C.) प्रवर्गातील उमेदवार श्री.प्रशांत प्रभाकर सोनवणे यांना नियुक्ती देण्यात आली. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

१. जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३५२८/२००८ दि.१५.०९.२००८ नुसार दि.०१ ऑगस्ट, २००८ ते जुलै, २००९ पर्यंत एका प्रशैक्षणिक वर्षासाठी रु.७,५००/- दरमहा संकलीत मानधनावर तात्पुरती नियुक्ती देण्यात आली

२. जा.नं.एसएसएस/वशी-०१/३७१४/२००९ दि.२०.१०.२००९ नुसार दि.०९.०९.२००९ पासून ते सदर पदावर मुलाखतीद्वारे उमेदवार नियुक्त करेपर्यंत अशी रु.७,५००/- दरमहा संकलीत मानधनावर तात्पुरती नियुक्ती देण्यात आली

३. जा.नं.एसएसएस/आयटीआय/आस्था/३१/२७६/२०११ दि.०८ एप्रिल, २०११ नुसार दि.०१.०४.२०११ पासून त्यांच्या रु.७,५००/- दरमहा मानधनात वाढ करुन रु.१२,०००/- दरमहा करण्यात आले आहे.

श्री सोनवणे यांना अन्य मागासवर्गाचे आरक्षीत पदावर तात्पुरती नियुक्ती दिली असल्याने त्यांना त्या पदासाठीच नियम वेतनश्रेणी लागू न करता एकत्रित मानधनावर तात्पुरती नियुक्ती करण्यात आलेली आहे

उपरोक्त परिच्छेद (अ) मध्ये नमुद केलेप्रमाणे क्राफ्टसमन फुड प्रॉडक्शन (व्हेजीटेरियन) हा व्यवसाय अभ्यासक्रम (ट्रेड कोर्स) ऑगस्ट २०१४-१५ या सत्रापासून DGET यांनी क्राफ्टसमन ट्रेनिंग स्किम मधून वगळला आहे. त्यामुळे ऑगस्ट २०१४ सत्रामध्ये प्रशिक्षणार्थ्यांना सदर ट्रेडसाठी प्रवेश दिलेला नाही, त्यामुळे सद्यस्थितीत या ट्रेडसाठी नियुक्त असलेले निदेशक पद(श्री.प्रशांत प्र. सोनवणे) संस्थेमध्ये अतिरिक्त ठरत आहे.

**(क)** औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या दि.१०.०४.२०१५ च्या मंजुर टिपणीनुसार श्रीप्रशांत प्रभाकर सोनवणे यांचे सेवेबाबत कामगार विभागामार्फत संस्थानचे कायदेशीर सल्लागार ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांना जा.क्र.एसएसएस/ वशी-७ए/ १८९७/ २०१५ दि.०४.०७.२०१५ अन्वये पत्र देऊन त्यांचा कायदेशीर अभिप्राय मागविण्यात आला होता. त्यांनी त्यांचेकडील डिसेंबर-२०१५ चे (आवक क्रमांक १८१३६/दि.१० डिसेंबर, २०१५) पत्रान्वये पुढीलप्रमाणे कायदेशीर अभिप्राय दिलेला आहे

It is not in dispute that the trade hold by Shri Sonawane is deleted by the Centeral Government and naturally he become a surplus employee. After referring to aforesaid appointment, it is not in dispute that the appointment of Shri Sonawane was for a temporary period and as against the reserve category. He has also accepeted all those terms and conditions at the time of his appointment. According to me, when the post itself is abolished and Shri Sonawane is found to be surplus, then in my opinion, his services can be terminated by the management after giving one month calendar notice or paying wages

in lieu thereof. I am adding my emphasize on rule no.28 of M.E.P.S.Rules, 1981 which categorically provides the services of temporary employee other than on probation may be terminated by the management at any time without assigning any reason after giving one calendar month notice or by paying one month salary in lieu of notice. The Sansthan is at liberty to explore the possibilities to accommodate him in any other department, if Shri Sonawane consents for the same. But, it appears that the instructor is ultimately a teacher imparting knowledge to the students and we may not be in a position to accommodate him in other departments of our Sansthan.

**(ड)** उपरोक्त "अ" "ब" व "क" चे अवलोकन करता

०१. ॲड.अशोकराव पाटील, अहमदनगर यांचे अभिप्रायानुसार श्रीप्रशांत प्रभाकर सोनवणे, निदेशक यांना एक महिना मुदतीची पूर्वनोटीस अथवा एक महिन्याचे मानधन(नोटीस पे) देऊन संस्थान सेवेतून कमी करणे

**किंवा**

०२. श्री.प्रशांत प्रभाकर सोनवणे, निदेशक यांची शैक्षणिक पात्रता, एच.एस.सी., हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड कॅटरिंग टेकनॉलॉजी (बी.एच.एम.सी.टी.) अशी असून, त्यांना निदेशक पदासह हॉटेल मॅनेजमेंट व हाऊस किपींगचाही अनुभव असल्याचे त्यांचे मुळ नोकरी अर्जावरुन(दि.२५.०१.२००८) दिसून येते. ॲड. अशोकराव पाटील, अहमदनगर यांनी त्यांच्या अभिप्रायामध्ये असे ही नमुद केले आहे की, श्री.सोनवणे यांची समंती असल्यास त्यांना संस्थानच्या इतर विभागात समावून घेता येईल या अभिप्रायाचा विचार करता श्री.प्रशांत प्रभाकर सोनवणे यांनी संस्थानमध्ये केलेली ०७ वर्षाची (सन २००८ पासून आजपावेतो) सेवा लक्षात घेता, मानवतेच्या दृष्टीकोनातून त्यांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार प्रसादालय विभागाकडील रसोडा (अन्नपदार्थ तयार करणे/शिजवणे इ.कामकाज जेथे चालते तेथे) अथवा निवासस्थाने विभागाकडील स्वच्छता व इतर अनुषंगिक कामकाजाचे देखरेख करणे, नियंत्रण करणे ही कामे तुर्त आहे त्याच अटी शर्ती व वेतनावर सोपविणे

सदरबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेत प्रस्ताव सादर केला असता, मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२.०२.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.०८ “श्री प्रशांत प्रभाकर सोनवणे यांनी संस्थानमध्ये केलेल्या विनातक्रार ०७ वर्षांच्या सेवेचा विचार करता, त्यांचे गोपनीय अहवाल पाहून त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार प्रसादालय विभागाकडे रसोडा (अन्नपदार्थ तयार करणे/शिजवणे इ.कामकाज जेथे चालते तेथे देखरेख करणे, नियंत्रण करणे इ.) अथवा निवासस्थान विभागाकडील स्वच्छता व इतर अनुषंगिक कामकाजाचे देखरेख करणे, नियंत्रण करणे या कामांसाठी तुर्त आहे त्याच अटी / शर्ती व वेतनावर नेमणूक करणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी” असे ठरले. त्यानुसार संस्थानचे विधी विभागामार्फत मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन (क्र.१२३१२/२०१६) दाखल करण्यात आले.

**(इ)** मात्र दरम्यानचे काळात वरिष्ठांचे निर्देशानुसार जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३८३५/२०१५ दि.०९ जानेवारी, २०१६ चे आदेशान्वये श्री.प्रशांत प्रभाकर सोनवणे यांचेकडे १. द्वारावती भक्तनिवास २. साईआश्रम भक्तनिवास ३. साई धर्मशाळा ४. साईप्रसाद निवाससस्थान व ५. साईबाबा भक्तनिवासस्थान या पाचही निवासस्थान विभागाकडील स्वच्छते विषयक (हाऊसकिपींग) व इतर अनुषंगिक कामकाजाचे दैनंदिन निरिक्षण, पर्यवेक्षण व देखरेख करणेचे कामकाज, पुढील निर्णय होईपावेतो त्यांचे मुळ आदेशातील अटी व शर्ती चे अधीन राहुन आहे त्याच वेतनावर (प्रतिमाह रु.१२,०००/- एकत्रित मानधनावर) दि.११.०१.२०१६ पासून सोपविण्यात आलेले आहे.

**(ई)** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०८.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.५६६ अन्वये मा.उच्च न्यायालयात दाखल केलेले सिव्हील अर्ज मागे (Withdraw) घेणेबाबत निर्णय झालेला आहे. त्यानुसार विधी विभागामार्फत श्री.प्रशांत प्रभाकर सोनवणे, निदेशक यांचे सेवेबाबतचे सिव्हील ॲप्लीकेशन क्र.१२३१२/२०१६ हे दि.०८.०९.२०१६ रोजी मा.न्यायालयातून मागे (Withdraw) घेण्यात आलेले आहे.

तरी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०८.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.५६६ अन्वये मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबद येथून सिव्हील ॲप्लीकेशन मागे (Withdraw) घेण्यात आलेले असल्याने, मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२.०२.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.०८ मध्ये नमुद केलेप्रमाणे श्री प्रशांत प्रभाकर सोनवणे यांनी संस्थानमध्ये केलेल्या विनातक्रार ०७ वर्षांच्या सेवेचा विचार करता, त्यांचे गोपनीय अहवाल पाहून त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार प्रसादालय विभागाकडे रसोडा

(अन्नपदार्थ तयार करणे/ शिजवणे इ.कामकाज जेथे चालते तेथे देखरेख करणे, नियंत्रण करणे इ.) अथवा निवासस्थान विभागाकडील स्वच्छता व इतर अनुषंगिक कामकाजाचे देखरेख करणे, नियंत्रण करणे या कामांसाठी तुर्त आहे त्याच अटी/ शर्ती व वेतनावर नेमणूक करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.७७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.प्रशांत प्रभाकर सोनवणे, निदेशक यांची झालेली सेवा व गोपनीय अहवाल याचा विचार करता, त्यांना मानवतेच्या दृष्टीकोनातून त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार प्रसादालय विभागाकडे आहे त्याच अटी/ शर्ती व वेतनावर नेमणूक देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.२४** **ॲड बी.वाय.काळवाघे, कोपरगाव खाते चौकशी अधिकारी यांचे मानधन वाढीबाबत.**

**प्रस्ताव-** ॲड. श्री.बी.वाय.काळवाघे, कोपरगाव, यांची संस्थान कर्मचा-यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत त्यांना देणेत आलेल्या आरोपपत्रातील आरोपांची खाते चौकशी करणेकामी जा.नं. एसएसएस/ वशी/ ४७०६/ १९९२ दि. १६.०५.१९९२ चे आदेशान्वये दरमहा रु.१०००/- मात्र मानधनावर "खाते चौकशी अधिकारी" म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे.

त्यानंतर ॲड.श्री.बी.वाय.काळवाघे यांना जा.नं.एसएसएस/ वशी-७ए/ ४६४५/ १९९८ रोजीचे आदेशान्वये दि. ०१-०१-१९९८ पासुन दरमहा रु.२०००/- मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०१/०३-०७-२००४ रोजी सभेतील निर्णय क्र. ३६० नुसार दि. ३०-०७-२००४ चे आदेशान्वये दि.०१-०७-२००४ पासुन दरमहा रु.३०००/- तर मा.व्यवस्थापन समितीचे दि. १९-०९-२००९ रोजी सभेतील निर्णय क्र.७९१ नुसार जा.नं. एसएसएस/ वशी-७ए/ ३७७९/२००९ दि.२९-१०-२००९ चे आदेशान्वये दि.१-१०-२००९ पासुन दरमहा रु. ५०००/- मानधन देणेत येत आहे.

ॲड. काळवाघे, खाते चौकशी अधिकारी हे त्यांचा वकीली व्यवसाय पाहून संस्थानचे महिन्यातील १२ ते १६ दिवस काम करीत आहेत. सध्या त्यांचेमार्फत संस्थानमध्ये ०८ खाते चौकशी सुरु असून ०३ प्रस्तावित आहेत.

आता ॲड.श्री.बी.वाय. काळवाघे, कोपरगाव यांनी त्यांचे संदर्भ क्र.०१ चे अर्जान्वये चौकशी अधिकारी मानधन वाढवून महिना रु. १५०००/- मिळणेबाबत विनंती केली आहे. त्यांत त्यांनी "मी आपले संस्थानमध्ये खाते चौकशी अधिकारी म्हणून काम करतो. मला दर महिना रु.५०००/- मिळते. महिन्यातील बहुतेक वेळ संस्थान कामासाठी देतो. मी कोपरगावांहुन शिर्डी येथे माझे खर्चाने येतो. मला मिळणारे मानधन फारच कमी आहे. मला मिळणा-या मानधनातुन इन्कम टॅक्स कपात, प्रवास खर्च वजा जाता फारच थोडी रक्कम मला मिळते. विनंती की, मानधन वाढवून दर महिना रु. १५,०००/- मिळावे वाढीव मानधन माहे २०१६ पासून मिळावे" असे नमूद केले आहे.

तसेच संदर्भ क्र. ०२ चे अर्जान्वये खाते चौकशी कामकाज संगणकमुद्रित होणेबाबत विनंती केली आहे त्यांत त्यांनी "हल्ली मी खाते चौकशी कामकाज इतिवृत्त माझे हस्ताक्षरात करतो. अहवाल मुद्रित होतो. कोर्ट कचरी, सरकारी– निमसरकारी कामकाज संगणकावर मुद्रित होते संस्थानचेही कामकाज संगणकावर मुद्रित होते दोषी कर्मचारी अपीलात, उच्च न्यायालयापर्यंत जावू शकतो. अशा प्रसंगी खाते चौकशी कामकाज संगणकात मुद्रित होणे आवश्यक व जरुरीचे आहे. मुद्रण सर्वांकरीता सोयीचे आहे. तरी खाते चौकशी कामकाज हस्ताक्षराऐवजी संगणकावर मुद्रित व्हावे ही विनंती असे नमुद केले आहे"

ॲड.काळवाघे, खाते चौकशी अधिकारी यांना दयावयाचे मानधनाबाबत संस्थानचे कायदेशिर सल्लागार यांचा दि. ३०/०७/२०१६ रोजीचे टिपणीन्वये जा.नं.एसएसएस/वशी -७ए/२६४५ /२०१६ दि.२७-८-२०१६ चे पत्रान्वये सल्ला घेतला असता त्यांनी त्यांनी "खातेचौकशी अधिकारी यांना दयावयाचे मानधनाबाबत संस्थानचे व्यवस्थापनाने निर्णय घ्यावा " असा अभिप्राय दिलेला आहे.

महाराष्ट्र शासनाकडील विभागीय चौकशीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी कंत्राटी पध्दतीने नेमण्यात येणा-या सेवानिवृत्त चौकशी अधिकारी व सेवानिवृत्त सादरकर्ता अधिकारी यांना वाढीव मानधन देण्याबाबत शासन निर्णय क्रमांक– एसपीओ– २८०४/ प्र.क्र. ११/ २००४/११-अ, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२, दि.१७ डिसेंबर, २००५ नुसार खालील प्रमाणे मानधन देणेबाबत निर्णय झालेला आहे.

| अ.नं | चौकशी अधिकारी (मानधन ) | सादरकर्ता अधिकारी (मानधन) | विभागीय चौकशी प्रकरणात गुंतलेल्या अपचा-यांची संख्या. |
|---|---|---|---|
| ०१ | रु.५०००/- | रु.२५००/- | एक अपचारी |
| ०२ | रु. ८०००/- | रु.४०००/- | एकापेक्षा अधिक अपचारी |

२. तसेच वरिलप्रमाणे नेमण्यात येणाऱ्या चौकशी अधिकाऱ्यास त्यांच्या कामात मदत करण्यासाठी एक लघुलेखक व एक लिपीक यांची शासकीय कार्यालयातील सेवानिवृत्तझालेल्या कर्मचा-यांमधुनअथवा खाजगी व्यक्तीमधून सेवा उपलब्धकरुन घेता येईल. या सेवेपोटी प्रत्येक प्रकरणी लघुलेखकास रु.२०००/- व लिपीकास रु.१५००/- एवढे सुधारीत मानधन मोबदला म्हणून मंजुर करण्याचा देखील शासनाने निर्णय घेतला आहे.

तरी ॲड.श्री.बी.वाय. काळवाघे, कोपरगाव यांचे दि.२०.०२.२०१६ रोजीचे अर्जान्वये दरमहा रु.१५०००/- मानधन मिळावे तसेच खातेचौकशीचे कामकाज हस्ताक्षरऐवजी संगणकावर मुद्रित होण्याची व्यवस्था करुन मिळणेबाबतचे अर्जावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७७८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, खाते चौकशी अधिकारी ॲड बी.वाय.काळवाघे, कोपरगाव यांचे वयोमान जास्त झालेले असल्यामुळे त्यांचेकडून खाते चौकशीचे कामकाज अपेक्षीत गतीने पुर्ण होत नाही, याकरीता नवीन खाते चौकशी अधिकाऱ्याची नेमणूक करणेसाठी विहीत पध्दतीने जाहिरात प्रसिध्द करणेत यावी. तसेच संस्थान पॅनेलवर असणाऱ्या वकीलांनाही विचारणा करण्यात यावी व त्यानंतर आलेल्या अर्जानुसार खातेचौकशी अधिकारी नेमणूकीबाबत सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं.२५** **रुफ टॉप सोलर पी.व्ही. सिस्टीम उभारणे तसेच अपारंपारीक ऊर्जा अंतर्गत संस्थानकरिता ८ मेगावॅट क्षमतेची सोलर पी.व्ही. सिस्टीम करीता कन्सल्टंट नेमणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**०१). रुफ टॉप सोलर पी.व्ही.सिस्टिम**

याकरीता मा.त्रीसदस्य समितीचे दि.१६-०४-२०१५ चे सभेतील विषय क्र.११ नुसार खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

केंद्र शासनाचे नवीन व नविकरणीय ऊर्जा मंत्रालय, नवि दिल्ली यांचेमार्फत शिर्डी संस्थान व शिर्डी नगरपंचायतीची संयुक्तीक सौर शहरीकरण प्रकल्प विकसित करणेकरीता सोलर सिटी म्हणून निवड झालेली आहे या प्रकल्पाकरीता मेडाचे व केंद्र सरकारचे पॅनलवर असलेले मे.दाराशॉं अँड कं.प्रा.लि., मुंबई यांची शिर्डी नगरपंचायत मार्फत नेमणुक करण्यात आलेली असून त्यांची फी ही केंद्र सरकारच्या मिळालेल्या अनुदानतून शिर्डी नगरपंचायतमार्फत आदा केली जाते.

प्रकल्पाचे सल्लागार मे.दाराशॉं अँड कं.प्रा.लि., मुंबई यांनी प्रकल्प अहवाल (Detailed Project Report) तयार केलेला असून हा प्रकल्प अहवाल संस्थानकडे शिर्डी नगरपंचायतीकडून प्राप्त झाल्यानंतर संस्थानमार्फत सदरील प्रकल्प अहवाल महाराष्ट्र शासनाची सहकारी संस्था महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, पुणे यांचेकडे दिनांक०४-०३-२०१५ रोजी तपासणीकरीता सादर करण्यात आलेला आहे. याकामी केंद्र सरकारचे कन्सल्टंट पॅनेल मधील अधिकृत प्रकल्प सल्लागार मे.दाराशॉं अँड कं.प्रा.लि., मुंबई यांना शिर्डी सौर शहरीकरण प्रकल्पासाठी शिर्डी नगरपंचायतीने नेमलेले आहे.

महाराष्ट्र ऊर्जा अभिकरण, पुणे यांनी हा प्रकल्प अहवाल(DPR) तपासला असून हा प्रकल्प अहवाल योग्य असल्याचे लेखी कळविले आहे.

(अ). सौर शहरीकरण प्रकल्प योजने अंतर्गत संस्थानचे विविध इमारतींवरील टेरेसवर सौर उष्णजल व सौर विद्युत सयंत्रे आस्थापित करुन यंत्रणेची उभारणी केली जाणार आहे त्यापासून संस्थानला गरम पाणी व २२५ केडब्ल्यु इतकी वीज मिळणार आहे. सदरील सौर शक्तीवर आस्थापित करण्यात येणा-या यंत्रणेचे आयुष्य साधारण १५ वर्षे इतके असणार आहे.

सौर ऊर्जेव्दारे एकुण २२५ के.डब्ल्यु इतकी वीज निर्माण होणार असल्याने सदरील वीजेचा ८ तास वापर गृहीत धरल्यास एका दिवसात १८०० युनिट वापर होऊन दिवसास रु.१६,२००/- व एका महिन्याला (३०दिवसात)अंदाजे रक्कम रु.४,८६,०००/- इतकी वीजेच्या बीलात बचत होऊ शकणार आहे. वार्षिक (३६५ दिवसात) रु.५९,१३,०००/- इतकी बचत होऊ शकते.

(ब). याव्यतिरिक्त स्टाफ क्वॅार्टरकडे सौर उष्णजल सयंत्र उभारणे प्रस्तावित असून ६६ क्वॉटर्स (साईनगर परीसर) + २४ क्वॉटर्स (५०० रुम) + ९६ क्वॉटर्स (नविन सेवाधाम) अशा एकुण १८६ क्वॉटर्सकरीता ही सिस्टीम बसविण्यात येणार असून प्रत्येक क्वार्टरमागे १८६ X २ = ३७२ युनिटस् रोज वाचणार असून याकामी रु.३,३४८/- प्रति दिवशी बचत होऊ शकते. वार्षिक १२,२२,०२०/- इतकी बचत होऊन (अ) रु. ५९,१३,०००/- + (ब) रु. १२,२२,०००/- मिळून रु. ७१,३५,०२०/- इतक्या रकमेची बचत होऊन या प्रकल्पाचे रकमेची ३ वर्षात पुर्ण परतफेड मिळू शकते

सौर शहरीकरण प्रकल्पाअंतर्गत आस्थापित करावयाच्या सर्व एकत्रित यंत्रणेचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव व ठिकाण | क्षमता | कामाची एकुण किंमत | संस्थानने खर्च करावयाची रक्कम (70%) | केंद्र सरकारमार्फत मिळणारी रक्कम (30%) |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | ४५ के.डब्ल्यु सौर विद्युत यंत्रण, ठिकाण :- औद्योगिक प्रशिक्षण इमारत टेरेस | ४५ KW | रु. ४५,००,०००/- | रु. ३१,५०,०००/- | रु. १३,५०,०००/- |
| ०२) | ९० के.डब्ल्यु सौर विद्युत यंत्रण, ठिकाण:- इंग्लिश मेडीअम स्कुल इमारत टेरेस | ९० KW | रु. ९०,००,०००/- | रु. ६३,००,०००/- | रु. २७,००,०००/- |
| ०३) | २० के.डब्ल्यु सौर विद्युत यंत्रण, ठिकाण:- श्री साईबाबा हॉस्पीटल इमारत टेरेस | २० KW | रु. २०,००,०००/- | रु. १४,००,०००/- | रु. ०६,००,०००/- |
| ०४) | २० के.डब्ल्यु सौर विद्युत यंत्रण, ठिकाण:- श्री साईबाबा हॉस्पीटल इमारत टेरेस | २० KW | रु. २०,००,०००/- | रु. १४,००,०००/- | रु. ०६,००,०००/- |
| ०५) | ५० के.डब्ल्यु सौर विद्युत यंत्रण, ठिकाण:- श्री साईनाथ हॉस्पीटल (कॅन्टीन) इमारत टेरेस | ५० KW | रु. ५०,००,०००/- | रु. ३५,००,०००/- | रु. १५,००,०००/- |
| ०६) | सौर उष्णजल यंत्रणा, कॅपॅसिटी:-३०,०००लिटर्स/ दिवस, ठिकाण:- संस्थान कर्मचारी वसाहती | ३००००लिटर्स / Day | रु. ५२,५०,०००/- | रु. ३६,७५,०००/- | रु. १५,७५,०००/- |
| | | एकुण :- | रु.२,७७,५०,०००/- | रु. १,९४,२५,०००/- | रु. ८३,२५,०००/- |

उपरोक्तप्रमाणे सौर शहरीकरण प्रकल्पाअंतर्गत आस्थापित करावयाच्या सौर यंत्रणा उभारणी करणेकामी अंदाजे एकुण रक्कम रु.२,७७,५०,०००/-इतका खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी संस्थानला ७०% म्हणजे रक्कम रु.१,९४,२५,०००/- इतकी रक्कम खर्च करावी लागणार आहे. व ३०% रक्कम रु.८३,२५,०००/- इतकी केन्द्र सरकार मार्फत सबसीडी मिळणार आहे.

विद्युत विभागामार्फत सादर करण्यात आलेल्या उपरोक्त प्रस्तावावर या सभेत चर्चा होऊन निर्णय क्र.११४ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, सौर शहरीकरण प्रकल्पांतर्गत आस्थापित करावयाच्या सौर यंत्रणा उभारणी करण्याचा प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असा निर्णय झाला होता. त्यानुसार हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आलेला आहे.

उपरोक्तप्रमाणे विद्युत विभागामार्फत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावातील यंत्रणेपैकी अ.क्र.०६ सौर उष्णजल यंत्रणा,कॅपॅसिटी ३०,००० लिटर्स/ दिवस ही यंत्रणा उभारणीची कार्यवाही मेकॅनिकल विभागामार्फत करणेत येत असून ती अंतिम टप्प्यात आहेत्यामुळे सदरच्या अ.क्र.६ सौर उष्णजल यंत्रणेची रक्कम वजा जाता उर्वरीत सौर यंत्रणा उभारणी करणेकामी अंदाजे एकुण रक्कम रु२,२५,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी संस्थानला ७०% म्हणजे रक्कम रु.१,५७,५०,०००/- इतकी रक्कम खर्च करावी लागणार आहे व ३० % रक्कम रु.६७,५०,०००/- इतकी केंद्र सरकार मार्फत सबसीडी मिळणार आहे.

**०२). ८ मेगावॅट सोलर पी.व्ही.सिस्टिम**

दिनांक ०७-०८-२०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेमध्ये मा.विश्वस्तांनी केलेल्या सुचनेनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीमार्फत अपारंपारीक ऊर्जा निर्मिती अंतर्गत सोलर ऊर्जा यांच्या निर्मितीला प्राधान्य देण्याचे ठरविण्यात आलेले आहे

माणसाच्या दैनंदिन जीवनात वीजेचा वापर दिवसेंदिवस वाढत आहे. नैसर्गिक स्त्रोताच्या माध्यमातून जसे जल, वायु, कोळसा यांच्या अपु-या साठयामुळे वीज निर्मितीसाठी अपारंपारीक पर्याय शोधण्याची व विकसित करण्याची गरज बनली आहे. सध्या संपुर्ण भारतात वीजेची कमतरता जाणवत असून या वीज टंचाईवर मात करणेसाठी एक प्रयत्न म्हणून केंद्र शासनाच्या अपारंपारिक ऊर्जा मंत्रालयामार्फत अपारंपारिक ऊर्जा निर्मिती अंतर्गत पवन ऊर्जा, सोलर ऊर्जा यांच्या निर्मितीला प्राधान्य दिलेले आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनानेही अपारंपारिक ऊर्जा निर्मितीस प्राधान्य देण्याचे धोरण अवलंबिले आहे. त्या अंतर्गत नविन व नवीकरणीय उर्जा स्त्रोत (अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत) यापासून वीजनिर्मितीच्या पारेषन संलग्न प्रकल्पांसाठी एकत्रित धोरण-२०१५ च्या अंतर्गत ७५०० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीचे उद्दीष्ट निश्चित केलेले आहे.

शासकीय धोरणास प्रतिसाद म्हणुन श्री साईबाबा संस्थानमार्फत सन २००७ मध्ये भोयरे पठार ता.अहमदनगर येथे २.५ मेगावॅट क्षमतेच्या पवनचक्की प्रकल्पाची उभारणी करण्यात आलेली आहे. सदरचा पवनचक्की प्रकल्प उभारण्याचे वेळी संस्थानची वीजेची गरज सरासरी ४० लाख युनिट प्रती वर्ष इतकी होती. त्यानुसार त्यावेळी मेडा, पुणे यांचे सल्ल्यानुसार २ X १.२५ मेगावॅट क्षमतेचा रु. १५ कोटी ४० लाख मात्र इतक्या एकुण खर्चाचा पवनचक्की प्रकल्प उभारण्यात आलेला होता.

यातुन वार्षिक सरासरी ४५ लाख युनिट वीज निर्मिती होते. संस्थानमार्फत उभारण्यात आलेल्या पवनचक्की प्रकल्पातुन ऑगस्ट-२००७ ते जुलै-२०१६ पर्यंत ४,२२,२९,४९५ वीजेच्या युनिटची निर्मिती झालेली आहे. ही निर्मित झालेली वीज ही महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीस पुरविण्यात येत असून त्यापासुन संस्थानला जुलै-२०१६ पर्यंत रु.१७,२५,९४,४३६/- (रु.सतरा कोटी पंचवीस लाख चौ-यान्नव हजार चारशे छत्तीस मात्र ) इतके उत्पन्न मिळालेले आहे.

सन २००७ पर्यंत संस्थानची वीजेची गरज वार्षिक ४० लाख युनिट होती. परंतू त्यानंतर संस्थानमार्फत व्दारावती भक्तनिवास ही ३१६ रुम असलेली इमारत साईभक्तांकरीता सुरु करण्यात आलेली आहे. या ३१२६ रुम पैकी ८० रुम वातानुकुलीत करण्यात आलेल्या आहेत. तसेच साई आश्रम भक्तनिवास भाग-०१ येथे १५३६ रुम असलेल्या १२ इमारती साईभक्तांकरीता सुरु करण्यात आलेल्या असून या१२ इमारतीं पैकी ३ इमारतीमध्ये एकुण ३८४ रुम वातानुकुलीत करण्यात आलेल्या आहेत.

तसेच साईधर्मशाळा येथे १९६ हॉल असलेल्या ०६ इमारतीही साईभक्तांकरीता सुरु करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे आता संस्थानची वीजेची गरज वार्षिक ९६ लाख युनिटपर्यंत वाढलेली असून भविष्यात वाढणारी दर्शनरांग प्रकल्प, साईगार्डन, नविन इमारती विचारात घेता वार्षिक १२५ लाख युनिटची आवश्यकता राहील. सन-२००६ साली वीजेच्या युनिटचा दर सरासरी रु.४.५० प्रति युनिट इतका होता. तो आता सन-२०१६ साली रु. १२.५० प्रति युनिट (ही वाढ २७७ % इतकी आहे) इतका झाला असुन भविष्यात तो अजूनही वाढण्याची शक्यता आहे.

संस्थानला दरवर्षी सरासरी रु.१२ कोटीपेक्षा जास्त वीजबील येत आहे. या वीजबीलाला पर्याय म्हणून अपारंपारिक ऊर्जेव्दारे वीज निर्मिती करुन स्वयंभू होणे गरजेचे आहे.

जगातील शास्त्रज्ञ जगातील पारंपारीक इंधन संपुष्टात येत असताना पर्यायी ऊर्जेवर भर देत आहेत. यावरुन सौर ऊर्जेच्या वापराचे महत्व लक्षात येऊन त्याचा वापर वाढविणे किती महत्वाचे आहे हे आपल्या लक्षात येते. म्हणुन सौर ऊर्जेचा वापर करुन वीज टंचाईवर मात करणेकरीता संस्थानमार्फत सोलर पीव्ही.सिस्टीमचा वीज निर्मिती प्रकल्प राबविणे गरजेचे आहे. सोलर पी.व्ही.सिस्टीमच्या यंत्रणेव्दारे दरवर्षी प्रति मेगावॅट क्षमतेव्दारे १६ लाख युनिटसची वीज निर्मिती होते. त्यामुळे संस्थानच्या वीजेची गरज लक्षता घेता १२५ लाख युनिटसची वीज निर्मितीकरीता ८ मेगावॅट क्षमतेच्या सोलर पी.व्ही.सिस्टीमची उभारणी करणेकरीता विद्युत विभागामार्फत दि.१९-०८-२०१६ रोजीच्या टिपणी अन्वये मा.व्यवस्थापन समितीपुढे प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

या प्रस्तावात सदरच्या प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासनाची संस्था महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), पुणे यांचे मार्गदर्शन घ्यावे लागणार असल्याचे नमूद करण्यात आलेले होते. कारण केन्द्र सरकारकडे या प्रकल्पाची नोंद करणे, शक्य असल्यास किंवा लागू असल्यास या प्रकल्पास केन्द्र सरकारकडून सबसिडी मिळविणे, याशिवाय याकामी सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारण्यासाठी प्रस्ताव तयार करणे, निविदा मसूदा तयार करणे, प्राप्त निविदांची छाननी करुन संस्थानला अहवाल सादर करणे, सोलर पी.व्ही.सिस्टीम प्रकल्पा उभारणी चालू असताना किंवा आस्थापित केल्यानंतर वेळोवेळी पाहणी करुन संस्थानला अहवाल सादर करणे, निर्मित झालेली वीज महाराष्ट्र राज्य वीज वितरण / पारेषण कंपनीस पुरविणेसाठी महाराष्ट्र शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र देणे

ही सर्व कामे महाऊर्जामार्फत केली जातात. तसेच या प्रकल्पाकरीता महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महा ऊर्जा), पुणे यांची सल्लागार फी (शुल्क) किती असणार आहे. तसेच प्रकल्पाबाबत सध्या शासकीय धोरण काय आहे ? तसेच प्रकल्प कसा असावा याबाबत माहिती घेणेसाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महा ऊर्जा), पुणे यांना पत्राव्दारे लेखी विचारणा करणेबाबत मान्यता मिळणेस सदरच्या प्रस्तावात विनंती करण्यात आलेली होती.

मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ३१-०८-२०१६ चे सभेतील विषय क्र.२१ निर्णय क्र.६०२ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, अपारंपारिक उर्जा अंतर्गत संस्थानकरीता८ मेगावॅट क्षमतेची सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणेकामी महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा), पुणे यांचेबरोबर पत्रव्यवहार करणेत येऊन, त्याचा सर्वांगिण अहवाल समितीसमोर सादर करणेत यावा, असे ठरले होते.

त्यानुसार अपारंपारिक उर्जा अंतर्गत संस्थानकरीता ८ मेगावॅट क्षमतेची सोलर पी.व्ही.सिस्टीम उभारणेकामी महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा), पुणे यांना जा.नं.एसएसएस / विद्युत/ ३१३४/ २०१६ दि.१७-०९-२०१६ रोजी पत्र पाठविण्यात आलेले होते. सदर पत्रामध्ये महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा), पुणे यांचेकडून खालील मुद्दयांवर मार्गदर्शन मागविण्यात आलेले होते.

०१). प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करणे.

०२). प्रकल्प चालू होईपर्यंत वेळोवेळी घ्याव्या लागणाऱ्या निर्णयासाठी मार्गदर्शन करणे.

०३). प्रकल्प चालू झाल्यानंतर पुढील देखभालदुरुस्ती कॉन्ट्रॅक्ट ॲग्रीमेंट ड्राफ्ट तयार करणे.

०४). प्रकल्प उभारणी पासून ते पुर्ण होईपर्यंत सुपरव्हिजन व कन्सल्टंसी करणे.

०५). सोलर पी.व्ही.सिस्टीम प्रकल्पास लागू असलेले महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचे सर्व निर्णय, जसे वीजदर व तत्संबंधी बाबी, ऊर्जा खरेदी करार किंवा ओपन ॲसेसव्दारे स्वत: करीता वीज वापरणे व बँकींग, व्हिलींग, पारेषण व वितरण हानी आणि तत्संबंधी बाबी.

०६). प्रोसेसिंग चार्जेस वगैरे यासाठी महाउर्जाची फी (शुल्क) किती असणार आहे ?

महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा), पुणे यांना उपरोक्तप्रमाणे पाठविण्यात आलेल्या पत्रावर त्यांचे प्रकल्प व्यवस्थापक यांचा दिनांक २३-०९-२०१६ रोजी ई-मेल प्राप्त झालेला असून त्यामध्ये त्यांनी सोलर पी.व्ही.सिस्टीमबाबत महाराष्ट्र शासनाचे सध्याचे धारेणाबाबत खालीलप्रमाणे कळविले आहे.

०१). प्रकल्प विकासकाने पारेषण जोडणीच्या शिफारशीसाठी विहित नमुन्यातील अर्ज महाऊर्जाकडे सादर करणे आवश्यक राहील.त्यामध्ये अन्य बाबींसह प्रकल्पाची क्षमता, प्रकल्पाच्या जागेचा तपशिल,महापारेषण / महावितरण कंपनीच्या जवळच्या उपकेंद्राचे नाव इ. बाबींचा समावेश असेल.

०२). सदर अर्जाची प्राथमिक छाननी करुन महाऊर्जाकडून तांत्रिक योग्यता अहवालासाठी महापारेषण / महावितरण कंपनीस व अर्जदारास कळविण्यात येईल. महापारेषण / महावितरण कंपनीने त्याआधारे योग्यता अहवाल तयार करुन महाऊर्जाकडे त्याची प्रत पाठविणे आहे.

०३). हमी शुल्क (पारेषण जोड महापारेषण / महावितरण) :- प्रकल्पामधून निर्माण होणारी वीज महापारेषण/ महावितरण कंपनीच्या वीज उपकेंद्रास मुदतीत वहन करुन देण्यासाठी विकासकास इतर शुल्का व्यतिरिक्त हमी शुल्क (परतावा / महावितरण) म्हणून रुपये १ लाख प्रति मेगवॅाट याप्रमाणे होणाऱ्या रकमेचा धनाकर्ष महापारेषण/ महावितरण कंपनीकडे सादर करावा लागेल. सदर धनाकर्ष महापारेषणासाठी " महापारेषण" या नावे आणि महावितरणासाठी " महावितरण" या नावे मुंबई येथे देय असावा.

०४). प्रकल्प विकासकाने सौरऊर्जा प्रकल्पासाठी उभारण्यात येणाऱ्या संकोषण केंद्रामध्ये (Pooling Station) उपलब्धता आधारित दर प्रणाली साठी लागणारे मीटर (ABT Meter with Tele communication facility) बसविणे आवश्यक आहे. तसेच वीज निर्मितीची माहिती रिअल टाइम व्हिजिबिलिटी RTU-DC, V-SAT मार्फत राज्य भार पारेषण केंद्राला (SLDC) उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

०५). सौर ऊर्जा प्रकल्पाची नोंदणी :- सदर धारेणांतर्गत सौर ऊर्जेपासून वीजनिर्मिती करणाऱ्या प्रकल्पाची नोंदणी महाऊर्जाकडे करणे बंधनकारक राहील. सौर ऊर्जा प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या वीजेची विक्री ज्या मार्गाने करण्यात येणार आहे त्याची माहिती नोंदणी अर्जात नमूद करणे आवश्यक राहील. त्यानुसार सौर ऊर्जा प्रकल्पाची नोंदणी करण्यात येईल.

०६). प्रकल्प विकासक/ प्रकल्पधारक यांना शासकीय पडीक जमिनीवर प्रकल्प विकसित करावयाचा असल्यास त्यांना संबंधित जिल्हाधिकाऱ्याकडून त्यांच्या प्रकल्पाची नोंदणी महाऊर्जाकडे केल्यानंतर जमीन उपलब्ध करुन देण्यात येईल याबाबतचे जिल्हाधिका-यांकडील पत्र महाऊर्जाकडे सादर करावे लागेल.

०७). प्रकल्प नोंदणी शुल्क:- महाऊर्जाकडे प्रकल्प नोंदणीसाठी प्रकल्प विकासक / प्रकल्पधारकास नोंदणी शुल्क रु. ५० हजार प्रति मेगावॅट याप्रमाणे धनाकर्षाव्दारे जमा करावे. सदर धनाकर्ष "महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण" पुणे यांच्या नावे देय असावा

०८). प्रकल्प विकासक / प्रकल्पधारक यांनी सौर ऊर्जा प्रकल्प नोंदणी पत्राच्या विहित मुदतीत म्हणजे अठरा महिन्याच्या कालावधीत कार्यान्वित करणे बंधनकारक राहील. त्याबाबत हमी शुल्क म्हणून रु ३ लाख प्रति मेगावॅट या रकमेची बँक गॅरंटी (राष्ट्रीयकृत बँकेची) प्रकल्प नोंदणीसाठी महाऊर्जाकडे सादर करावी.

०९). सौर ऊर्जेपासून वीज निर्मिती प्रकल्पासाठी प्रकल्प विकासक / प्रकल्पधारक यांच्याकडून प्रकल्प नोंदणीसाठी आवश्यक ती कागदपत्रे व शुल्क यासह प्रस्ताव प्राप्त झाल्यावर प्रस्तावाची छाननी महाऊर्जा कार्यालयाकडून करण्यात येईल. सर्व आवश्यक कागदपत्रे व शुल्कासह प्रस्ताव परिपूर्ण असल्यास मा.अध्यक्ष, महाऊर्जा यांच्या मान्यतेने महाऊर्जा कार्यालयाकडून प्रकल्पाची नोंदणी करण्यात येईल. सदर नोंदणीपत्राची मुदत १८ महिन्यांची राहील.

१०). प्रकल्प विकासक/ प्रकल्पधारक यांचेकडून सदर प्रकल्प अठरा महिन्याच्या कालावधीत कार्यान्वित झाल्यानंतर व कार्यान्वित झाल्याबाबतचा महावितरणचा अहवाल महाऊर्जा कार्यालयास सादर केल्यानंतरच महाऊर्जाकडून प्रकल्प विकासक/ प्रकल्पधारकास हमीशुल्कांतर्गत घेतलेली बँक गॅरंटी परत केली जाईल.

११). महाऊर्जाकडे नोंदणी करण्यात येणा-या सौर ऊर्जा प्रकल्पांना नवीन व नवीकरणीस ऊर्जेपासून वीज निर्मिती प्रकल्पांसाठीचे-२०१५ च्या धारेणांतर्गत देय असणा-या सोयी सवलती व सूट लागू राहतील संबंधित प्रकल्पाच्या नोंदणीपत्रात याबाबत उल्लेख करण्यात येईल

१२). सौर ऊर्जा प्रकल्पांचा वीज खरेदी करार करण्यासाठी किंवा खुला प्रवेश मंजूर करण्यासाठी किंवा नित्य नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्राव्दारे वीज विक्री मंजूर करण्यासाठी महाऊर्जाकडे नोंदणी करणे बंधनकारक राहील. सदर धारेणांतर्गत निश्चित केलेल्या ७५०० मेगावॅट क्षमतेच्या उद्दीष्टांपर्यंत प्रकल्प नोंदणी मर्यादित ठेवण्यात येईल.

१३). वीज खरेदी करार/ खुला प्रवेश, महावितरण/ महापारेषण कंपनीबरोबर झाल्यानंतर प्रकल्पधारकास त्याची प्रत महाऊर्जा कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

१४). प्रकल्प नोंदणी झाल्यानंतर प्रकल्प धारकास नोंदणीपत्रात काही बदल उदा. प्रकल्पाच्या नावात बदल, प्रकल्पाच्या क्षमतेत बदल इत्यादि करावयाचे झाल्यास त्यासाठी स्वतंत्र अर्ज महाऊर्जाकडे करावा लागेल. याकरिता प्रकल्प धारकाने रु.२५,०००/- प्रति प्रकल्प प्रमाणे प्रक्रिया शुल्क महाऊर्जाकडे धनाकर्षाव्दारे जमा करावे लागेल.

उपरोक्तप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा), पुणे यांचेकडून अहवाल प्राप्त झालेला असून सदर अहवाला सोबत त्यांनी सोलर पीव्ही.सिस्टिम प्रकल्पाचे कन्सल्टंट म्हणुन काम करणाऱ्या महाऊर्जाचे अधिकृत पॅनलवरील एजन्सीची पुढीलप्रमाणे यादी कळविलेली आहे

०१). मे.टीयुव्ही एसयुडी साऊथएशिया प्रा.लिमिटेड, पुणे
०२). मे.एचआयक्यु पॉवर असोसिएटस प्रा.लिमिटेड, चेन्नई
०३). मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेसलिमिटेड, पुणे
०४). मे.एएक्सवायकेएनओ कॅपिटल सर्व्हिसेस प्रा.लिमिटेड, नागपूर
०५). मे. इमरजेन्ट व्हेनचर इंडिया प्रा.लिमिटेड, गुडगाव, हरयाणा

उपरोक्तप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा), पुणे यांनी सोलर पी.व्ही.सिस्टिम प्रकल्पाचे कन्सल्टंट म्हणुन नेमणूक केलेल्या महाऊर्जाचे अधिकृत पॅनलवरील पाच एजन्सीपैकी एका एजन्सीची संस्थानचे ०८ मेगावॅट क्षमतेच्या सोलर पी.व्ही.सिस्टिम प्रकल्पाकरीता कन्सल्टंट म्हणून नेमणूक करावी लागणार आहे. उपरोक्तप्रमाणे एका एजन्सीची नेमणूक केल्यानंतर त्याच्याकडून सदरच्या कामाचा प्रोजेक्ट रिपोर्ट व टेंडर तयार झाल्यानंतर तसेच प्रोजेक्टकरीता आवश्यक असणा-या शासकीय मंजु-या तसेच कागदपत्र महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा), पुणे यांचेकडे सादर करावे लागणार आहे यानंतर टेंडर बोलविणेकामी पुढील प्रक्रिया करावी लागणार आहे.

उपरोक्तप्रमाणे (०१). रुफ टॉप सोलर पी.व्ही.सिस्टिम उभारणी करीता तसेच (०२).०८ मेगावॅट क्षमतेच्या सोलर पी.व्ही.सिस्टिम प्रकल्पाकरीता महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा), पुणे यांचे अधिकृत पॅनलवरील पाच कन्सल्टंटपैकी एका कन्सल्टंटची निवड करणेकामी त्यांचेशी पत्रव्यवहार करुन त्यांचेकडून या कामाकरीता दरपत्रक मागविणेस मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.७७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमधील पुर्वीच्या सोलर प्रकल्पाचे सल्लागार मे.मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हीसेस लिमिटेड, पुणे यांचेकडून रुफ टॉप सोलर पी.व्ही.सिस्टिम उभारणी तसेच ०८ मेगावॅट क्षमतेच्या सोलर पी.व्ही.सिस्टिम प्रकल्पाकरीता कन्सल्टंटची नेमणूक करणेकामी व्यवहार्यता अहवाल (Figibility Report) मागविणेत यावा व त्यानंतर आवश्यकतेनुसार महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा), पुणे यांचे अधिकृत पॅनलवरील पाच कन्सल्टंटकडून दरपत्रक मागविणेस यावे, असे ठरले.**

**तसेच महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा), पुणे यांचे अधिकृत पॅनलवरील पाच कन्सल्टंट यांना दि.०१.१२.२०१६ रोजी सादरीकरणासाठी बोलाविणेत यावे, अशा सुचना दिल्या.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.२६** **साईभक्तांना निवेदने व माहिती पाठविणेसाठी करावयाचे Bulk Email बाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** कलम २१ (१) ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**प्रास्ताविक:-** श्री साईबाबांचे समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.३० ऑक्टोबर, २०१८ या कालावधीमध्ये संस्थानमार्फत भव्य-दिव्य स्वरुपात साजरे करण्यात येणार आहे. या कालावधीत साजरे होणा-या कार्यक्रमांबाबत तसेच संस्थानमार्फत साईभक्तांसाठी राबविण्यात येणा-या विविध उपक्रमांबाबत निवेदने व अद्यावत माहिती साईभक्तांना ई-मेल द्वारे कळविण्यात यावी, असे निर्देश मा.अध्यक्ष महोदय यांनी दिलेले आहेत. सद्यस्थितीत साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करणेत आलेल्या कार्यप्रणालीमार्फत साधारणपणे १५ लाख साईभक्तांचे Email ID व मोबाईल नंबर इकडील विभागाकडे उपलब्ध आहेत. साईभक्तांनी ऑनलाईन सर्विसेस या कार्यप्रणालीत, रजिस्ट्रेशन केल्यानंतर तसेच विविध सुविधांचा लाभ घेतल्यानंतर, त्यांचे मोबाईलवर SMS पाठविण्याची सुविधा सदरचे कार्यप्रणालीमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

मा.अध्यक्ष महोदय यांनी दिलेल्या निर्देशान्वये, साईभक्तांना ई-मेल पाठविणेकामी या क्षेत्रात कार्यरत असलेल्या विविध पुरवठाधारकांशी संपर्क केला असता, दि.१२, १३ व १८/१०/२०१६ रोजीचे ई-मेलद्वारे खालीलप्रमाणे दर कळविणेत आले आहे.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नाव | देऊ केलेले दर | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | Netcore Solution, Mumbai | प्रति ४ ई-मेल करीता ०.०७ पैसे + टॅक्स | सदरचे दर हे त्यांनी १०० KB Data साठी असून पुढील प्रत्येक ई-मेलसाठी ०.०१ पैसा प्रतिमेल अतिरीक्त दर द्यावे लागतील, असे नमुद केले आहे. |
| ०२ | Pinnacle Teleservices Pvt. Ltd | प्रति ई-मेलसाठी ०.०७ पैसे + टॅक्स | सदरचे दर हे Without Attachment चे आहेत. |
| ०३ | R.A.N.India Pvt.Ltd | प्रति ई-मेलसाठी १.७० पैसे + टॅक्स | |
| ०४ | Naxe Technologies | प्रति ई-मेलसाठी ०.००६ पैसे + टॅक्स | दुरध्वनीद्वारे सर्व मेल सिंगल क्लिकवर पाठविणेबाबत साशंकता व्यक्त केलेली आहे. |

उपरोक्त तक्त्याप्रमाणे पुरवठाधारकांनी दर देतांना वेगवेगळया तांत्रिक बाबींचा उदा. Without Attachment, ठराविक मर्यादेच्या पुढे अतिरीक्त दर, सिंगल क्लिकवर ई-मेल पाठविणेबाबत साशंकता इ. चा उल्लेख केलेला आहे. आपले आवश्यकतेप्रमाणे एकाचवेळी उपलब्ध असलेल्या ई-मेल आयडीवर ई-मेल पाठविणे व अनुषांगिक रिपोर्ट इ उपलब्ध होणे गरजेचे आहे. प्राप्त झालेल्या दरांनुसार संस्थानकडे उपलब्ध असलेल्या साधारणपणे १५ लाख Email ID वर एकावेळी Email पाठविणेकामी येणा-या अंदाजे खर्चाचा विचार करता सदरकामी संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार निविदा प्रक्रीया राबवून निम्नत्तम दर असलेले पुरवठाधारकाची पुढील ३ वर्षाकरीता नेमणूक करता येईल. निविदेमध्ये आवश्यकतेनुसार सर्व तांत्रिक बाबींचा उदा. Attachment (Up to 2 MB), सिंगल क्लिकवर ई-मेल पाठविणे, अनुषंगिक रिपोर्ट उपलब्धकरुन देणे इ. समावेश करुन सर्व पुरवठाधारकांकडून प्रति ई-मेलचे दर एकाच धर्तीवर मागविता येतील, असे नम्र मत आहे.

**मागणी:-** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे वेळोवेळी साईभक्तांना निवेदने व माहिती Bulk Email द्वारे पाठविणेकामी संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार निविदा प्रक्रीया राबवून पुढील ३ वर्षाकरीता निम्नत्तम दर असलेले पुरवठाधारकाची नेमणूक करणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** तांत्रिक, आर्थिक, प्रशासकीय

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे वेळोवेळी साईभक्तांना निवेदने व माहिती Bulk Email द्वारे पाठविणेकामी संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार निविदा प्रक्रीया राबवून पुढील ३ वर्षाकरीता निम्नत्तम दर असलेले पुरवठाधारकाची नेमणूक करणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

निर्णय क्र.७८० **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांना वेळोवेळी निवेदने व इतर माहिती १ वर्ष कालावधीसाठी Bulk Email द्वारे पाठविणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

**परंतु त्यापुर्वी Bulk Email बाबतचे सादरीकरण करणेसाठी नामांकित कंपन्यांना दि.०१.१२.२०१६ रोजी बोलाविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

विषय नं.२७ **संस्थानच्या विविध विभागांसाठी बसविण्यात आलेल्या यूपीएस बॅटऱ्यांचे वार्षिक दरपत्रकाबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतूद:-** कलम १७ (१) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७.११.२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७९९

**प्रास्ताविक:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७.११.२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७९९ नुसार साईटेक प्रकल्पाचे उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली असून, सदर कार्यवाहीसाठी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. करारनाम्यातील अटी शर्तीनुसार संस्थानचे सर्व विभागांमध्ये संगणक व युपीएस बसविण्यात आलेले आहेत. त्यातील कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी दिलेले युपीएस व्यतिरिक्त कॅंटीन विभाग, जनसंपर्क विभाग, साईप्रसाद निवाससस्थान विभाग, साईआश्रम विभाग, साई धर्मशाळा कार्यालय, साई कॉम्प्लेक्स देणगी व पुस्तक विक्री काऊंटर येथे संस्थानचे खालीलप्रमाणे युपीएस वापरात आहेत.

| अ.नं. | कंपनीचे नाव | बॅटरी क्षमता | युपीएस संख्या | बॅटरी संख्या | बॅटरीचे प्रतिनग अंदाजे दर |
|---|---|---|---|---|---|
| 01 | **EXIDE LIMINIOUS QUANTA SFSONIC** | 100 AH | 02 | 60 | 9,000/- |
| 02 | | 65 AH | 10 | 65 | 7,000/- |
| 03 | | 42 AH | 03 | 77 | 4,500/- |
| 04 | | 26 AH | 11 | 85 | 3,000/- |
| 05 | | 18 AH | 08 | 160 | 3,000/- |
| 06 | | 12 AH | 50 | 50 | 1,000/- |
| | | **एकूण संख्या** | **84** | **497** | |

साईटेक प्रकल्पातील सर्व साहित्याचे वार्षिक दुरुस्ती व देखभाल करण्याकरीता निविदा प्रक्रीयेची कार्यवाही सुरू आहे. सदर प्रक्रीयेमध्ये युपीएस बॅट-यांचा उल्लेख केलेला नाही. कारण सदरच्या बॅट-या आवश्यक तेव्हा खरेदी करुन दिल्यास संस्थानचा आर्थिक फायदा होईल. उपरोक्त नमुद ठिकाणचे युपीएससाठी वापरण्यात येणा-या बॅट-यांचे वार्षीक दरकरार करता येईल. संस्थानचे प्रचलित पद्धतीने ई-निविदा मागवून दरनिश्चीती करता येईल व आवश्यक तेव्हा सदरच्या बॅट-या खरेदी करता येतील.

**मागणी:-** प्रास्ताविकेत नमुद ठिकाणचे युपीएससाठी वापरण्यात येणा-या बॅट-यांचे वार्षीक दरकरार करणे कामी व आवश्यक तेव्हा सदरच्या बॅट-या खरेदी करणेकामी संस्थानचे प्रचलित पद्धतीने ई-निविदा मागवून दरनिश्चीती करणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करता येईल.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** तांत्रीक/प्रशासकीय/आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** प्रास्ताविकेत नमुद ठिकाणचे युपीएससाठी वापरण्यात येणा-या बॅट-यांचे वार्षीक दरकरार करणेकामी व आवश्यक तेव्हा सदरच्या बॅट-या खरेदी करणेकामी संस्थानचे प्रचलित पद्धतीने ई-निविदा मागवून दरनिश्चीती करणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.७८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थानच्या विविध विभागांसाठी आवश्यक असलेल्या बॅटऱ्या वेळोवेळी खरेदी करणेकामी वार्षिक दर घेणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.२८** **सन २०१५-१६ या आर्थिक वर्षातील श्री साई प्रसादालयामधील धान्य, कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद:-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नूसार भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

**प्रस्ताविक:-** श्री साई प्रसादालयामध्ये दरारोज ४०००० ते ४५००० हजार साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेत असून ऊत्सव कालावधीमध्ये ही संख्या वाढून ७५००० ते ८०००० पर्यंत जाते. तसेच दररोज सुमारे ९००० अन्नपाकीटांची विक्री होत आहे. त्याकामी लागणारा किराणा माल धान्य- कडधान्य डाळी इत्यादी साफ केल्यानंतर वापरासाठी देण्यात येतात. सदर माल मशिनव्दारे व मनुष्यबळाकरवी साफ करण्यात येतो. गहू व हरबरादाळ स्वच्छ करुन दळण्यात येत असून दळल्यानंतर काही प्रमाणात घट येते. त्याचप्रमाणे दळणकांडन व साफ केल्यानंतर काही प्रमाणात कचरा, खडे, मातेरे निघते. वातावरणात वेळोवेळी होणा-या बदलामुळेही वजनात घट येते. या सर्व कारणामुळे व प्रक्रिया करतांना किराणा मालामध्येघट-तूट येत असते.

मा.व्यवस्थापन समिती दि. २८/०६/२००८ चे सभेतील निर्णय क्र. ५६० अन्वये सन २००७-२००८ या वर्षात आलेली प्रत्यक्ष घट-तूट खर्ची टाकणेत आलेली आहे. मात्र सदर घट-तूटीस मान्यता देतांना मा.श्री.अभय शास्त्री, मा. श्री.ए.जी.लोंगाणी, अंतर्गतलेखापरिक्षक व मुख्य लेखाधिकारी यांनी पुढील कालावधीसाठी खालीलप्रमाणे सुचना (नियमावली) सुचविलेली होती. त्यास मा.व्यवस्थापन समिती दि.२८/०६/२००८ चे सभेतील निर्णय क्र.५६० नूसार मान्यता मिळालेली आहे.

१. २००७-२००८ मध्ये प्रसादालयात प्रत्यक्ष आलेली घट-तूट इतर देवस्थान व संस्था यांचेकडील प्रचलित घट-तूटीचे प्रमाण पाहता आपलेकडील आलेली सरासरी घट-तूट योग्य असून इतरांचे तुलनेने कमी असलेले दर सहा महिन्यानंतर प्रस्तावित प्रमाणानुसार घट-तूट नांवे टाकणेत यावी

२. दर सहा महीण्यानंतर प्रत्यक्ष मालाचा साठा व रजिष्टरप्रमाणे दिसणारा मालाचा साठा याची पडताळणी करावी.

दर सहा महिन्यानंतर प्रत्यक्ष शिल्लक माल व रजिस्टरप्रमाणे दिसणारा साठा याची तपासणी केल्यानंतर तपासणी अंती आलेली घट-तूट प्रस्तावित सरासरी पेक्षा कमी आढळल्यास त्याबाबतचा वस्तुनिष्ठ अहवाल मा. व्यवस्थापन समिती समोर अवलोकनार्थ सादर करावा.मात्र प्रस्तावित सरासरी पेक्षा आलेली घट-तुट जादा असेल तर त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी.

उपरोक्त नियमावलीनुसार दरवर्षी प्रसादालयातील आर्थिक वर्षामध्ये एकुण खर्ची पडलेल्या किराणा मालात प्रत्यक्ष आलेल्या घट- तुटीस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात आलेली आहे.

मागणी :- सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षामध्ये दर सहा महिन्यानंतर प्रत्यक्ष शिल्लक किराणा मालाचा साठा व रजिष्टरप्रमाणे खर्ची पडलेला किराणा माल याची तपासणी करण्यात आली आहे. खालील घट-तुटीचे अवलोकन करता प्रत्यक्ष आलेली घट-तुट ही मान्य असलेल्या घट-तुटीचे प्रमाणापेक्षा कमी आलेली आहे. त्यामुळे सदरील घट-तुट नांवे टाकण्याच्या नियमावली क्र.०३ नुसार घट-तुटीचा वस्तुनिष्ठ अहवाल मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे अवलोकनार्थ सादर करावा लागणार आहे.

सन २०१५-२०१६ मध्ये धान्य-कडधान्य व किराणा मालामध्ये आलेल्या घट-तुटीचा तपशिल.

| अ.नं. | मालाचा तपशिल | दि.०१/०४/२०१५ ते दि. ३१/०३/२०१६ अखेर प्रत्यक्ष खर्च झालेला माल | दि.०१/०४/२०१५ ते दि. ३१/०३/२०१६ अखेर प्रत्यक्ष आलेली घट-तुट | घट-तुटीचे प्रमाण | मान्य झालेल्या घट-तुटीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | | किलो/ग्रॅम | किलो/ग्रॅम | किलो/ग्रॅम | किलो/ग्रॅम |
| १. | गहु | ७२००५६.००० | १९२८६.००० | २.६७८ | ३.००० |
| २. | तांदुळ | ८१६६७७.८०० | ४७४५.००० | ०.५८१ | १.००० |
| ३. | तुरडाळ | १३३७०८.००० | १०१६.००० | ०.७६० | १.००० |
| ४. | हरबरा दाळ | ५६२९८.००० | ६९५.००० | १.२३५ | २.००० |
| ५. | मुगदाळ | १७१२०.५०० | १२२.००० | ०.७१३ | १.००० |
| ६. | गुळ | २९८५७.५०० | १९८.००० | ०.६६३ | १.००० |
| ७. | रवा | ६१९७४.००० | ३१५.००० | ०.५०८ | १.००० |
| ८. | शेंगदाणे | ४२३८८.५०० | २९६.००० | ०.६९८ | १.००० |
| ९. | मिरची | १५६३४.५०० | ५१४.०० | ३.२८८ | ४.००० |
| १०. | हळद | १०४९२.६०० | ३५४.००० | ३.३७४ | ४.००० |
| ११. | मोहरी | ५०७६.४०० | ७८.५०० | १.५४६ | २.००० |
| १२. | जिरे | ६१०३.४०० | ८७.००० | १.४२५ | २.००० |
| १३. | मसाला | २९७९.२५० | ४८.५०० | १.६२८ | २.२५० |
| १४. | धने पावडर | १४८६९.००० | ३२७.००० | २.१९९ | २.५०० |
| १५. | खोबरेवाटी | १५१८२.००० | १३२.००० | ०.८६९ | १.००० |
| १६. | हरबरा | ८१५३६.००० | ६४८.००० | ०.७९५ | १.००० |
| १७. | वाटाणा | ६०२५६.००० | ५३८.००० | ०.८९३ | १.००० |
| १८. | मुग | ७४०२३.००० | ६२८.००० | ०.८४८ | १.००० |
| १९. | मठ | ९९२६०.००० | ७९९.००० | ०.८०५ | १.००० |
| २०. | मेथी | ३१६.६५० | ३.८५० | १.२१६ | २.२५० |
| २१. | सुंठ | २३८.२०० | ११.५०० | ४.८२८ | ५.२५० |
| २२. | मैदा | ४७८३८.००० | १४९.००० | ०.३११ | ०.५०० |
| २३. | भगर | ५६२.००० | ९.७५० | १.७३५ | २.००० |
| २४. | साबुदाणा | २६०८२.००० | २८८.००० | १.१०४ | १.२५० |
| २५. | कच्चे पोहे | ९२६.५०० | ६.५०० | ०.७०२ | १.००० |
| २६. | भाजके पोहे | १५९६.००० | ४८.००० | ३.००८ | ४.००० |
| २७. | डाळया | २६४.१०० | २.९०० | १.०९८ | १.२५० |
| २८. | चवळी | ६६६०.००० | ४०.००० | ०.६०१ | १.००० |
| २९. | काबुली चना | ६०४०.००० | ४२.००० | ०.६९५ | १.००० |

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान- आर्थिक

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- तरी उपरोक्त प्रमाणे २०१५-२०१६ या आर्थिक वर्षामध्ये झालेल्या घट-तुटीच्या अहवालास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये साई प्रसादालयामधील धान्य, कडधान्य व किराणा माल यांचे झालेल्या घट-तुटीचे अवलोकन करण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात आली. तसेच यापुढे घट-तुटीचा प्रस्ताव टक्केवारीसह सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

**विषय नं.२९** **५० ग्रॅम सुटी बुंदी पाकिटांचे बीलाबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार श्रीं चे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना बाबांचा प्रसाद मिळावा या हेतूने मंदिर दर्शन रांगेत १०० ग्रॅम वजनाचे सुटी बुंदीचे पाकीट मोफत वाटप करण्यात येत आहे. सदरची कार्यवाही दिनांक ०१/१०/२०१४ पासून चालू करण्यात आलेली आहे.

लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामार्फत मोतीचुर लाडू, सुटी बुंदी तसेच बर्फी निर्मिती करण्यात येत आहे. याकरीता सन २०१६-१७ (कालावधी ०१/०६/२०१६ ते ३१/०५/२०१७) करीता संदर्भ क्र.०२ अन्वये दि यशोधरा महिला सहकारी उत्पादक संस्था, नासिक यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**परीशिष्ट अ – हाताने तयार करणे/पॅकींग करणे**

| **अ.नं** | **तपशील** | **दर (सर्व करासहीत)** |
|---|---|---|
| १. | मोतीचूर लाडू **हाताने** तयार करुन पॅकींग करणे (१००० नग लाडूस) | **रु. २२०/-** (१००० नग लाडुस) |
| २. | सुटी बुंदी तयार करुन **हाताने** पॅकींग करणे. (१०० ग्रॅम वजनाचे पाकीट) | **रु. २२०/-** (५०० नग बुंदी पाकीटास) |
| ३. | बर्फी तयार करणे (०१ क्विंटल साखरेची) | रु. १८५/- (प्रती क्विंटल) |

**परीशिष्ट ब – मशिनव्दारे पाकीटे पॅकींग करणे**

| **अ.नं** | **तपशील** | **दर (सर्व करासहीत)** |
|---|---|---|
| १. | मोतीचूर लाडू तयार करुन **मशिनव्दारे** पॅकींग करणे (१००० नग लाडुस) | **रु. १९५/-** (१००० नग लाडुस) |
| २. | सुटी बुंदी तयार करुन **मशिनव्दारे** पॅकींग करणे. (१०० ग्रॅम वजनाचे पाकीट) | **रु. १८५/-** (५०० नग बुंदी पाकीटास) |

उपरोक्त कार्यादेशातील परीशिष्ट ' अ ' नुसार ठेकेदारास सुटी बुंदी तयार करुन हाताने पॅकींग करणे याकामासाठी १०० ग्रॅम वजनाचे ०१ पाकीट याप्रमाणे ५०० पाकीटास रु. २२०/- इतक्या मंजुर दराने दरमहा बुंदी निर्मितीचे बील आदा करण्यात येत आहे.

माहे जुलै २०१६ या महिन्याचे १०० ग्रॅम वजनाच्या सुटी बुंदीचे१५० पाकीटे याप्रमाणे ०१ कॅरेटचा हिशोब गृहीत धरला आहे. एक कॅरेटकरीता ठेकेदार कामगारांना रु.१२/- याप्रमाणे पॅकींग दर देत होते. एकुण ०३ कॅरेट+ ५० पाकीटे (१५०X०३+५०=५००) पॅकींग केल्यास ५०० पाकीटांची पॅकींग होते त्यानुसार ठेकेदारामार्फत कर्मचा-यांना ५०० पाकीटे (१५०X०३+५०=५००) पॅकींग करणेकामी रु. १२X०३ = ३६/- + ०४/- = ४०/- इतका मजुरी दर होतो.

परंतु आता संदर्भ क्र ०३ अन्वये, मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१/०८/२०१६ चे सभेतील निर्णय क्र. ६०९ नुसार 'मंदिर दर्शन रांगेत साईभक्तांना १०० ग्रॅम वजनाचे सुटी बुंदीचे पाकीटांऐवजी५० ग्रॅम वजनाचे सुटी बुंदीचे पाकीटे मोफत वाटप करण्यात यावीत' असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार सदरची कार्यवाही दिनांक ०३/०९/२०१६ पासून सुरु करण्यात आलेली आहे.

त्यासअनुसरुन संदर्भ क्र४ अन्वये लाडू/बुंदी निर्मिती ठेकेदार दि यशोधरा महिला सहकारी उत्पादक संस्था, नासिक यांनी दिनांक २७/०९/२०१६ रोजीचे पत्रान्वये, ५० ग्रॅमच्या सुटी बुंदी पॅकींसाठी प्रती ५०० पाकीटास रुपये २२०/- दर मिळावा अशी मागणी केली आहे.

कार्यादेशानुसार ठेकेदारांस१०० ग्रॅम वजनाची सुटी बुंदी पॅकींग करणेकरीता रुपये२२०/- दर मंजुर करणेत आलेला आहे. परंतु आता मा.व्य. स. चे निर्णयानुसार साईभक्तांना दर्शन रांगेत५० ग्रॅम वजनाची सुटी बुंदी प्रसाद म्हणुन वाटप करावी असे ठरलेले असल्यामुळे १०० ग्रॅम सुटी बुंदी ऐवजी५० ग्रॅम वजनाचे बुंदी पाकीट पॅकींग करण्यात येत आहे. त्यामुळे पाकीटांची संख्यादुप्पट होणार आहे, मात्र बुंदी तयार करणेसाठी वापरात येणारे मटेरीयलचे प्रमाण पुर्वीचेच राहणार आहे त्यामध्ये कोणताही बदल होणार नाही. म्हणजेच पॅकींग पाकीटांची संख्या दुप्पट होणार आहे.

ठेकेदाराच्या मागणीनुसार५० ग्रॅमचे एक पाकीट येणेप्रमाणे ५०० पाकीटास रु.२२० इतका दर दिल्यास १००० पाकीटे पॅकींग करणेसाठी **रु. २२० + २२०= ४४०/-** इतकी रक्कम ठेकेदारास देय्य होणार आहे. दैनंदिन ३५००० ते ४०००० पाकीटे पॅकींग केली जात असल्याने संस्थानचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होणार आहे.

त्याकरीता मटेरीयल तयार करणेची मजुरी पुर्वी दिलेल्या कार्यादेशात नमुद असल्याने केवळ पॅकींग करण्याच्या मजुरीत वाढ करणे उचित होईल, त्यासाठी ५० ग्रॅम वजनाची सुटी बुंदीचे १००० नग पाकीटांसाठी बिल अदा करावयाचे झाल्यास रु. २२०+४०= २६०/- इतके अदा करता येईल त्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

सोबत- ठेकेदार यांचेकडील पॅकींग दराबाबत दरपत्रक –

निर्णय क्र.७८३ **यावर सविस्तर चचा्र होऊन, साईभक्तांना श्रींचे दर्शन झाल्यावर देण्यात येणारी बुंदीप्रसाद पाकिटे बनविणेकामी संबंधीत ठेकेदारास १००० नग पाकिटांसाठी रु.२६०/- मात्र दर देणेस मान्यता देण्यात आली.**

**याचवेळी अशीही चर्चा आली की, बुंदी प्रसाद पाकिटासोबत एक उदीचे पाकिटही साईभक्तांना उपलब्ध करुन देण्यात यावे, त्यामुळे उदी काऊंटरवरील गर्दी कमी होईल व भक्तांनाही परत रांगेत उभा राहण्याची आवश्यकता राहणार नाही. तसेच बुंदी पाकिटाऐवजी ५० ग्रॅम वजनाचा एक लाडू असलेले पाकिट साईभक्तांना उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव समिती समोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग/ प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**विषय नं.३०** **मोतीचुर लाडू प्रसाद पाकीट किंमत वाढीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद- २१(१) (घ)** - सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियममधील २१ (१घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे.

**प्रास्ताविक-** श्रीं चे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना संस्थानतर्फे श्रीं चा प्रसाद मिळावा या हेतूने मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१३ रोजीचे सभेतील विषय क्र.०८ व निर्णय क्र.५३७ नुसार लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामार्फत मोतीचूर लाडू, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद निर्मिती करण्यात येत आहे. मोतीचूर लाडू व सुटी बुंदी प्रसाद निर्मितीसाठी लागणारे किराणा मटेरियल (हरबरा दाळ, गावरान तुप, साखर, काजू पाकळी, खिसमिस, हिरवी विलायची जिलेबी रंग) इ. संस्थानचे मध्यवर्ती खरेदी विभागामार्फत खरेदी करण्यात येते. दैनंदिन गरजेनुसार मध्यवर्ती भांडारकडे मागणीपत्र देऊन त्यांचेकडुन सदरचे मटेरियल घेऊन लाडू व बुंदी प्रसाद निर्मितीचे काम करण्यात येत आहे.

**सन २०१५ -१६ मधील मोतीचुर लाडु बाबत तपशिल-**

| | | |
|---|---|---|
| १ | दिवसाला सरासरी मोतीचुर लाडु विक्री | २०००० ते २५००० पाकीटे |
| २ | वार्षिक मोतीचुर लाडु विक्री | ७९,५९,८०० पाकीटे |
| ३ | लाडु निर्मितीत आर्थिक भार (तोटा) | रु.५९,८८,३४९.०० |

**सन २०१५-१६ करीता किराणा मालाचे मंजुर दर खालीलप्रमाणे होते.**

| तपशिल | साखर | हरभरा दाळ | गावरान तुप | काजु पाकळी | खिसमिस | हिरवी विलायची | जिलेबी रंग | पेपर पिशवी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दर | २७.२१ | ५५.१७ | ३१९.०० | ५४४.०० | १९५.०० | ८४०.०० | १४९.९९ | १३८.८० |

०३ नग लाडु पाकीटाची विक्री किंमत रु.२०.०० इतकी असुन, ०१ नग मोतीचुर लाडु पाकीट तयार करणेसाठी किराणा मटेरीयल व मजुरी मिळुन सरासरी रु २१/- इतका खर्च आलेला आहे. सन २०१५-१६ मध्ये मोतीचुर लाडु बनविणेकामी खालील नमुद महिन्यांमध्ये एकुण रक्कम रुपये **रु.५९,८८,३४९.००** इतका तोटा झाला आहे. सदरची रक्कम लेखाशाखेमार्फत अन्नदान खाती खर्ची टाकण्यात आलेली आहे.

**मोतीचुर लाडु पाकीटांची संख्याव आर्थिक भार (तोटा) खालीलप्रमाणे–**

| अ.नं. | सन २०१५-१६ महिना | एका लाडू पाकीटास आलेला खर्च | एका लाडू पाकीटाची विक्री किंमत. | पाकीटे व झालेला तोटा | एकुण तोटा (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे २०१५ | २०.९४ | २०.०० | ५२३५०० X ००.९४ | ४,९२,०९०.०० |
| २ | जुन २०१५ | २०.९१ | २०.०० | ६१८४०० X ००.९१ | ५,६२,७४४.०० |
| ३ | जुलै २०१५ | २१.२४ | २०.०० | ७०१२०० X ०१.२४ | ८,६९,४८८.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | ऑगस्ट २०१५ | २२.५३ | २०.०० | ७०२५०० X ०२.५३ | १७,७७,३२५.०० |
| ५ | ऑक्टोबर २०१५ | २०.६१ | २०.०० | ६२५००० X ००.६१ | ३,८१,२५०.०० |
| ६ | नोव्हेंबर २०१५ | २०.८५ | २०.०० | ६३०४०० X ००.८५ | ५,३५,८४०.०० |
| ७ | जानेवारी २०१६ | २०.७३ | २०.०० | ८२५९०० X ००.७३ | ६,०२,९०७.०० |
| ८ | मार्च २०१६ | २१.१५ | २०.०० | ६६६७०० X ०१.१५ | ७,६६,७०५.०० |
| | | | | **एकुण** | **५९,८८,३४९.००** |

**सन २०१५-१६ चे तुलनेत सन २०१६-१७ करीता किराणा मालाचे दर खालीलप्रमाणे आहेत-**

| तपशिल | साखर | हरभरा दाळ | गावरान तुप | काजु पाकळी | खिसमिस | हिरवी विलायची | जिलेबी रंग | पेपर पिशवी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दर | ३९.०१ | ७६.०० | ३५४.०० | ६९३.०० | १६३.०० | ९५०.०० | १४३.०० | १२९.०० |

**सन २०१६-१७ मधील लाडु प्रसाद पाकीटांची संख्याव आर्थिक भार (तोटा) –**

| अ.नं. | महिना (सन २०१६-१७) | एका लाडू पाकीटास आलेला खर्च | एका लाडू पाकीटाची विक्री किंमत. | पाकीटे व झालेला तोटा | एकुण तोटा (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे २०१६ | २०.२५ | २०.०० | ७०११०० X ००.२५ | १,७५,२७५.०० |
| २ | जुन २०१६ | २४.३९ | २०.०० | ६७७००० X ०४.३९ | २९,७२,०३०.०० |
| ३ | जुलै २०१६ | २४.७८ | २०.०० | ७५८४०० X ०४.७८ | ३६,२५,१५२.०० |
| ४ | ऑगस्ट २०१६ | २४.३० | २०.०० | ७४८४०० X ०४.३० | ३२,१८,१२०.०० |
| | | | | **एकुण** | **९९,९०,५७७.००** |

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय-** चालु आर्थिक वर्षात (सन २०१६-१७) किराणा मालाच्या दरांमध्ये वाढ झाल्याने सुधारीत दराने किराणा माल खरेदी करणेत येत आहे त्यानुसार मोतीचुर लाडुचे उत्पन्न करणेसाठी येणा-या खर्चात वाढ होणे अनिवार्य आहे. त्यातुन मोतीचुर लाडुची विक्रीकरुन येणा-या तोट्याची रक्कमही वाढणार आहे.

तरी संस्थानचा मोतीचुर लाडु प्रसाद विक्रीतुन होणारा तोटा कमी करणेसाठी खालील पर्याय आहेत.

१. सध्या विक्री करण्यात येत असलेल्या ०३ नग लाडु पाकीटांची विक्री किंमत वाढविणे, ती किती वाढवावी?

२. ०३ नग लाडु पाकीटाऐवजी ०२ नगाचे लाडु पाकीटे विक्रीसाठी ठेवणे.

याबाबत मोतीचुर लाडु प्रसाद पाकीटाची किंमत वाढवावी किंवा ०३ नग लाडु ऐवजी ०२ नगाचे पाकीट विक्रीसाठी ठेवावे अगर कसे? याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे निणयार्थ सादर.

**निर्णय क्र.७८४** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, सध्या लाडूप्रसाद पाकिटे विक्रीसाठी एकाच ठिकाणी काऊंटर्स आहेत व एका साईभक्तांस फक्त २ लाडूप्रसाद पाकिटे देण्यात येतात, लाडूप्रसाद पाकिटे विक्री केंद्रावर साईभक्तांची प्रचंड प्रमाणात गर्दी होत असते. या ठिकाणी लाडूप्रसाद पाकिटे मिळणेसाठी भक्तांची गैरसोय होऊ नये याकरीता संस्थानच्या इतर ठिकाणी (जसे- प्रसादालय व निवासस्थाने) लाडूप्रसाद विक्री केंद्र सुरु करणेत यावीत व साईभक्त मागणी करतील तेवढी लाडू प्रसाद पाकिटे त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावीत. याचबरोबर लाडूप्रसाद पाकिटांचा गैरवापर होऊ नये, याकरीता लाडू प्रसाद पाकिटाची किंमत दि.०१ जानेवारी, २०१७ पासुन रु.२५/- मात्र करणेत यावी.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग/ प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**विषय नं.३१** **साईआश्रम भक्तनिवासकडील लॉण्ड्री कामाच्या कार्यादेशाबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१४-१५ या आर्थिक एक वर्षासाठी साईभक्तांचे वापरासाठी असलेले बेडशीट, उशी कव्हर धुणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे चादर धूणे या कामाचा कालावधी दि३१/०३/२०१५ अखेर संपुष्टात येत असल्याने, सन २०१५-१६ साठीची नवीन ई-निविदा प्रक्रिया खालीलप्रमाणे सुरु करणेत आली

१) संबंधीत लॉण्ड्री ठेकेदार यांनी दि.४/१२/२०१४ रोजी सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या तीन वर्षासाठी आहे त्याच मागील वर्षाचे दरात काम करणेस तयार असलेबाबत विनंती अर्ज केला.

२) त्यानुसार दि.१२/१२/२०१४ रोजी सन २०१५-१६ मधील माहे एप्रिल व मे २०१५ या दोन महिन्यासाठी मुदतवाढ देणेकामीचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणेत आला. त्यावर,

३) तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी चर्चा करावी असे निर्देश दिले. त्यानुसार दि.२४/१२/२०१४ रोजी चर्चा केली असता, त्यांनी ई-निविदा काढणे व मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेऊन, ई-निविदा प्रक्रिया करावी. तसेच प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत संबंधीत ठेकेदारास दरमहा मुदतवाढ देण्यात यावी असे आदेश केले. त्यानुसार नविन प्रस्ताव सादर करावा.

४) त्याप्रमाणे सन २०१५-१६ या आर्थिक एक वर्षासाठी रक्कम रु.५६ लाख या खर्चास व ई-निविदा मागविणेसाठी मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेणेकामीचा प्रस्ताव मा.त्रीसदस्य व्यवस्थापन मंडळामध्ये सादर करणेकामी दि.२७/१२/२०१४ रोजी प्रशासकीय मान्यता घेऊन, यावर निर्णय होणेकामी सदर विषय दि.०७/०१/२०१५ रोजी सभा कामकाज विभागाकडे देण्यात आला.

५) त्यावर दि.३०/०१/२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.०८ अन्वये मान्यता मिळाल्यानंतर निर्णयाची प्रत या विभागाला दि.२४/०२/२०१५ रोजी प्राप्त झाली.

६) विधी विभागामार्फत दि.२५/०२/२०१५ रोजी मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ कडे सिव्हील ॲप्लीकेशन सादर करणेबाबत पत्र देण्यात आले.

७) विधी विभागाकडून सदरचा अर्ज तपासणी कामी दि.१०/०४/२०१५ रोजी या विभागाकडे पाठविल्यानंतर, ते दि.१४/०४/२०१५ रोजी तपासून विधी विभागाकडे परत सादर करण्यात आला.

८) दरम्यानच्या काळात मा.उच्च न्यायालयाची मान्यता अजून पर्यंत प्राप्त न झाल्याने ती मान्यता लवकर मिळणेकामी विधी विभागाला दि.२२/०६/२०१५ रोजी स्मरण पत्र देण्यात आले.

९) त्यावर विधी विभागाने देखील संबंधीत वकीलास दि२५/०६/२०१५ रोजी ई-मेलव्दारे या अर्जावर सदरचा विषय तातडीने बोर्डावर घेऊन कोर्टाचा निर्णय होणेबाबत कळविले.

१०) त्यावर दि.०३/०७/२०१५ रोजी मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळाली त्याची प्रत या विभागाला दि.०७/०७/२०१५ रोजी प्राप्त झाली.

११) दि.०७/०७/२०१५ रोजी मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळाल्यानंतर ई-निविदा प्रक्रिया सूरु होणे महत्वाचे होते. परंतू ती प्रक्रिया दि०१/०९/२०१५ या तारखेपासून सूरु करणेत आलीहा जो कालावधी गेला त्या कालावधीमध्ये सिंहस्थ कुंभमेळाचे नियोजन करणेत गेले. तसेच कार्यालयीन कामासाठी आवश्यक ते कर्मचारी नसल्याने ही ई-निविदा प्रक्रिया सुरु करणेस विलंब झाला. त्या विलंबानंतर या कामाची ईनिविदा सुरु झाल्यानंतर ती दोन वेळेस राबवावी लागलेली आहे. त्याचा सविस्तर तपशील पुढील प्रमाणे.

**अ)** सन २०१५-१६ साठी ई-निविदा प्रक्रिया करणे व त्याकामाचे शेड्युल मान्य करुन घेणेकामी प्रस्ताव सादर करुन त्यास दि.०१/०९/२०१५ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली. मान्यतेनुसार,

१) दि.३०/०९/२०१५ रोजी समाचार या दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेत आली.
२) ई-निविदा अपलोड करणेची अंतीम दि.१९/१०/२०१५ ठेवण्यात आली.
३) प्राप्त तांत्रिक बीड दि.२८/१०/२०१५ रोजी उघडणेत येतील असे जाहिरातीत प्रसिध्द करणेत आले.
४) यानुसार या प्रक्रियेमध्ये फक्त दोनच ई-निविदा प्राप्त झाल्या.
५) शासनाचे नियमाप्रमाणे किमान तीन निविदा असणे आवश्यक असल्याने,
६) या पहिल्या ई-निविदा मागविणे कामी एकूण ३३ दिवसाचा कालावधी लागला.
७) दुसऱ्या वेळेची फेर ई-निविदा सूचना जाहिरात देणे व दुसरी फेर ईनिविदा मागविणेकामी दि.२४/१०/१५ रोजी प्रशासकीय प्रस्ताव ठेवणेत आला त्यास दि.९/११/१५ रोजी मान्यता मिळाली.

**ब) सन २०१५-१६ साठीची दुसरी फेर ई-निविदा जाहिरात देणे व फेर ई-निविदा मागविणेकामी-**

१) दि.२८/११/२०१५ रोजी दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेत आली.
२) ई-निविदा अपलोड करणेची अंतीम दि.१५/१२/२०१५ ठेवण्यात आली
३) प्राप्त तांत्रिक बीड दि.२३/१२/२०१५ रोजी उघडणेत येतील, असे जाहिरात प्रसिध्द करणेत आले.
४) या प्रक्रियेमध्ये चार निविदा प्राप्त झाल्या.
५) त्यांचे तांत्रिक बीड(Technical bid) उघडणेकामी दि.२२/१२/१५ रोजी प्रशासकीय मान्यता घेणेत आली
६) त्यानुसार दि.२५/१२/२०१५ रोजी तांत्रिक बीड(Technical bid)उघडणेत आले.
७) या दुसऱ्या वेळेच्या ई-निविदा मागविणे कामी एकूण २८ दिवसाचा कालावधी लागला.

८) त्यातील चारही निविदाधारकांचे वाणिज्यिक बीड(प्राइज बीड) उघडणे कामी दि.१३/०१/२०१६ रोजीचे प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळाली.

९) दि.०४/०२/२०१६ रोजीचे मा.उप समिती सभे पुढे सभा कामकाज विभागामार्फत सदरचा विषय सादर करुन वाणिज्यिक बीड(प्राइज बीड) उघडणेत आले.

१०) या मा.उप समिती सभेमध्ये यावर सविस्तर चर्चा होऊन " सन २०१५-१६ या वर्षासाठी बेडशीट, उशी कव्हर धुणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, चादर धुणे तसेच साईभक्तांचे कपडे शुल्क आकारुन धुणे/इस्त्री करुन देणे या कामांसाठी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा. असा निर्णय झाला.

११) यानंतर दि.१६/०२/२०१६ रोजीचे मा.त्रीसदस्य व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.७७ अन्वये " **उपरोक्त अशी या मा.उप समितीची शिफारस मान्य करण्यात आली."**

**क)** सदर ई-निविदा प्रक्रिया सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठीची होती परंतू या वर्षातील ११ महिने मा.उच्च न्यायालयाची मान्यता व दोन वेळेच्या ई-निविदा प्रक्रियेत गेल्याने,

दि.०१/०३/२०१६ ते दि.२८/०२/२०१७ या पुढील एका वर्षाच्या कालावधीसाठी सदर कामाकरीता कार्यादेश देणेबाबतचा प्रस्ताव दि.२७/०२/२०१६ रोजी सादर करणेत येऊन, त्यास प्रशासकीय मान्यतानंतर कार्यादेश देण्यात आले.

**प्रस्तावः-**सन २०१५-१६ या वर्षामध्ये कामाची निकड व साईभक्तांना निवासा संदर्भात पुरविण्यात येणा-या सुख-सुविधा अत्यंत उपयोगी व संवेदनशील असल्याने हि सुविधा पुढे कार्यान्वित राहण्यासाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल २०१५ ते माहे फेब्रुवारी २०१६ या ११ महिन्यासाठी दि.३०/०१/२०१५ रोजीचे मा.त्रीसदस्य व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.०८ नुसार दरमहा संबंधीत ठेकेदारांना कार्यादेश देऊन काम करुन घेतलेले आहे

त्यानंतर ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन दि.१६/०२/२०१६ रोजीचे मा.त्रीसदस्य व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.७७ अन्वये व दि.२७/०२/२०१६ रोजीचे प्रशासकीय मान्यतेनुसार संबंधीत१)मे.साईश्रध्दा लॉण्ड्री ॲण्ड सर्व्हिसेस, सावळीविहीर प्रोप्रा.विजय अशोक चव्हाण यांना जा.नं.एसएसएस/वशी-साईआश्रम भक्तनिवास/ ६७१३/२०१६ दि.०५/०३/२०१६ २)मे.साईराज लॉण्ड्री सर्व्हिसेस, सावळीविहीर प्रोपा.अमोल जमधडे यांना जा.नं.एसएसएस/वशी-साईआश्रम भक्तनिवास/६७१४/२०१६ दि.०५/०३/२०१६ ने या दोन ठेकेदारांना कार्यादेश पारीत करुन, लॉण्ड्रीची कामे करुन घेण्यात येत आहे.

कार्यादेशानुसार संबंधीत दोन लॉण्ड्रीधारकांपैकी एक लॉण्ड्री धारकाने माहे मार्च /एप्रिल २०१६ चे बील माहे जूलै २०१६ मध्ये सादर केल्यानंतर ते बील लेखाशाखा विभागाने अदा केलेले आहे.

त्यानंतर माहे मे/जून २०१६ चे बील दि.२८/०७/२०१६ रोजी पुढील कार्यवाहीसाठी लेखाशाखा विभागाकडे सादर केल्यानंतर त्यावर लेखाशाखा विभागाने मा.व्यवस्थान मंडळाच्या ठरावात दि.०१/०३/२०१६ ते दि.२८/०२/२०१७ या कालावधीचा उल्लेख नसल्याने याबाबतचा उल्लेख निर्णयात होणेकामी मा.व्यवस्थापन मंडळात निर्णय दुरुस्तकरुन, बीले फेर प्रस्तावित करावीत असे निर्देश दिलेले आहे.

त्यामुळे मे.साईश्रध्दा लॉण्ड्री ॲण्ड सर्व्हिसेस,सावळीविहीर यांचे माहे मे २०१६ ते माहे ऑगस्ट २०१६ अखेर रु.४,६९,०९६/- व दुसरे ठेकेदार मेसाईराज लॉण्ड्री सर्व्हिसेस,सावळीविहीर यांचे माहे मार्च २०१६ ते ऑगस्ट २०१६ अखेर रु.१,४७,९९०/- ची बीले संबंधीत ठेकेदारांकडून येणे बाकी असून सदरच्या रक्कमा लेखाशाखा विभागामार्फत अदा करावयाचे बाकी आहे. तथापी, दोन्ही ठेकेदार कार्यादेशानुसार ते आजतागायत काम करुन देत आहेत.

माहे सप्टेंबर २०१६ अखेर सदर कामाचा कालावधी ७ महिनेने पूर्ण झालेले असून या कामाचे फक्त ५ महिने बाकी आहेत.

तथापि, या विषयी मा.उपकार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी व मुख्यलेखाधिकारी यांनी एकत्रित चर्चा करुन सध्याला लॉण्ड्री कामाचे बाजार भाव पाहून जर संस्थान ज्या दरात काम करुन घेत आहे त्यापेक्षा बाजार भावाचे दर कमी असल्यास नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविता येईल.

**किंवा**

दिलेल्या कार्यादेशातील दरापेक्षा बाजार भावाचे दर जास्त असल्यास, दिलेल्या कार्यादेशास कार्योत्तर मान्यता घेणेबाबत मा.व्यवस्थापन मंडळात विषय सादर करुन निर्णय घेता येईल.

उपरोक्त निर्देशानुसार दि.१६/०९/२०१६ रोजी शिर्डी परिसरातील लॉण्ड्री धारकांकडे संस्थान प्रतिनिधीला समक्ष पाठवून सर्व करासह दराबाबत चौकशी केली असता सध्याचे बाजार भावाचे दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.नं. | लॉण्ड्री कपड्यांचा तपशील | मे.गजानन ड्रायक्लिनर्स, गणेशनगर | मे.साई वे लॉण्ड्री, कोकमठाण | **संस्थानचे ई-निविदेव्दारे प्राप्त झालेले सर्व करासह सध्याचे दर** |
|---|---|---|---|---|
| १ | बेडशीट | रु.४.०० प्रति नग | रु.१२.०० प्रति नग | **रु.३.४२ प्रति नग** |
| २ | उशी कव्हर | रु.२.७५ प्रति नग | रु.७.०० प्रति नग | **रु.२.०१ प्रति नग** |
| ३ | चादर | रु.१०.०० प्रति नग | रु.२०.०० प्रति नग | **रु.७.९८ प्रति नग** |
| ४ | टॉवेल | रु.३.२५ प्रति नग | रु.१०.०० प्रति नग | **रु.२.५८ प्रति नग** |

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्रायः-** उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसून येते की, संस्थानकडे ई-निविदेव्दारे प्राप्त झालेले दर हे आजच्या बाजार भावापेक्षा कमी आहे. तसेच सदर कामाचे ५ महिने शिल्लक राहिलेले आहेत. त्यामुळे सन २०१५-१६ वर्षासाठी मिळालेल्या मान्यतेनुसार, निर्णय क्र.७७ ला अधिन राहून, माहे मार्च-२०१६ ते माहे फेब्रुवारी-२०१७ अशा एक वर्ष कालावधीसाठी दिलेल्या कार्यादेशास मा.व्यवस्थापन मंडळाची कार्योत्तर मान्यता मिळणेकामी सदरचा विषय निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७८५** **यावर सविसतर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

**याचवेळी अशीही चर्चा करणेत आली की, संस्थानच्या सर्व विभागांसाठी एकत्रित लॉण्ड्री युनिट तयार करणेसाठी सर्वसमावेशक प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. त्यामध्ये संस्थानमार्फत प्रस्तावित कपडे धुणेसाठी किती खर्च येईल व आऊटसोर्स पध्दतीने किती खर्च येईल, याबाबतच्या तुलनात्मक तक्त्याचा समावेश करणेत यावा. तसेच श्री क्षेत्र शेगाव येथील लॉण्ड्रीच्या कार्यपध्दतीविषयी माहिती घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**विषय नं.३२** **औषध फवारणी संबंधीतठेकेदार मे.जी.टी. पेस्ट कंट्रोल प्रा.लि., पुणे यांचेवर कारवाई करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमः-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४:- २१ (१) (ग) "भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धर्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे" व (२) पोट-कलम (१) (ख) "भक्तांना राहण्याकरिता व वापर करण्याकरिता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे."

**प्रस्ताविकः-** मे.जी.टी.पेस्ट कंट्रोल प्रा.लि, पुणे यांना किटकनाशक औषध फवारणीचे काम दि.०१/०४/२०१३ ते दि.३१/०३/२०१७ या तीन वर्षाच्या कालावधीसाठी जा.नं.एसएसएस/ वशी-साईआश्रम भक्तनिवास/ ११८९/ २०१४ दि.०९/०६/२०१४ रोजीचे कार्यादेशाने देण्यात आलेले असून, मा.व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयानुसार दरवर्षी नव्याने करारनामा करुन घेण्यात येत आहे.

सन २०१६-१७ या वर्षाचा करारनामा मे.जी.टी.पेस्ट कंट्रोल प्रा.लि,पुणे यांचेशी दि१८/०७/२०१६ रोजी करण्यात आलेला आहे.

सदर मे.जी.टी.पेस्ट कंट्रोल.प्रा.लि., पुणे यांचेकडून प्रत्येक दोन महिन्याच्या अंतराने विभागातील सर्व निवासी खोल्यामध्ये औषध फवारणी करुन घेतली जाते या दरम्यानच्या कालावधीत ढेकूण/झुरळे आढळून आल्यास, करारनाम्यातील अट क्र.११ "पेस्ट कंट्रोल केल्यानंतर किटकांचा नाश झालेला नाही अगर जिवंत असल्याचे दिसून आल्यास पार्टी नं.२ यांना स्वखर्चाने पुनश्चः तक्रार निवारण होईपर्यंत फवारणी करुन द्यावी लागेल." अशी अट देण्यात आलेली आहे.

त्यानुसार संबंधीत एजन्सीकडून औषध फवारणी केलेनंतर देखील खोल्यांमध्ये ढेकूण/झुरळे आढळून आल्याने वेळोवेळी संबंधीत एजन्सीकडून माहे एप्रिल २०१६ पासून ते माहे ऑगस्ट २०१६ अखेर पर्यंत १६७१ खोल्यांमध्ये विनाशुल्क औषध फवारणी करुन घेण्यात आलेली आहे. औषध फवारणी करुन देखील खोल्यांमध्ये ढेकूण व झुरळे आढळून येत असलेबाबत दि२५/०८/२०१६ रोजी कार्यालयीन टिपणी ठेवण्यात आली. त्यावर मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांनी "संबंधीत ठेकेदार यांचेवर निविदेतील अटी शर्तीनुसार कारवाई प्रस्तावित करावी." असे निर्देश दिले.

तसेच J व K इमारतीमध्ये दि.३०/०८/२०१६ रोजी औषध फवारणी करणेत आली होती तरीही खोल्यामध्ये ढेकूण व झुरळे आढळून आल्याने दि.०२/०९/२०१६ रोजी सदर इमारतीमधील काही खोल्यांचा पंचनामा करुन दि.०५/०९/२०१६ रोजी कार्यालयीन टिपणी प्रशासनाच्या अवलोकनार्थ सादर करणेत आली असता, त्यावर मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांनी "सदर ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करुन ब्लॅक लीस्ट करणे." असे निर्देश दिले आहे.

सदर ठेकेदार मे.जी.टी.पेस्ट कंट्रोल.प्रा.लि,पुणे यांचेवर कारवाई करण्यासंबंधीच्या करारनाम्यातील अटी/ शर्ती खालील प्रमाणे.

१) करारनाम्यातील अट क्र.४ "पार्टी नं.२, मे.जी.टी.पेस्ट कंट्रोल प्रा.लि. पुणे हे पेस्ट कंट्रोल, रोडेंट कंट्रोल व फॉगिंग ट्रिटमेंन्टचे काम ठरलेल्या वेळेत करत नसेल, कामात चालढकल करत असेल, अथवा समाधानकारक काम करत नसेल तर संस्थान कोणतीही पुर्व सूचना न देता प्रस्तुत कामाचा करार रद्द करेल."

२) अट क्र.१२ "पेस्ट कंट्रोल व रोडेंट कंट्रोलचा काहीच परीणाम होत नाही असे आढळून आल्यास, पार्टी नं.२ यांना देण्यात आलेली वर्क ऑर्डर कुठलीही पूर्व सूचना न देता रद्द करुन पार्टी नं.१ कडे जमा असलेली पार्टी नं.२ यांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल."

३) अट क्र.३३ "उपरोक्त अटी-शर्ती पैकी एक किंवा अनेक कोणत्याही अटी-शर्तीचा भंग झाल्यास पार्टी नं.२ यांनी भरलेली सुरक्षा अनामत रक्कम पार्टी नं१ यांचेकडे जमा होणेस पात्र राहील. पार्टी नं.१ यांची झालेली नुकसान भरपाई पार्टी नं.२ यांचेकडुन वसूल करणेत येईल"

४) अट क्र.३४ " उपरोक्त अटी-शर्ती पैकी एक किंवा अनेक किंवा कोणत्याही अटी-शर्तीत बदल करणे, सुधारणा करणे व जादा अटी-शर्ती विहीत करणे याचा अधिकार पार्टी नं.१ चे व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे."

सदर कंपनीने केलेले काम समाधानकारक नसल्याने त्यांची बीले अदा करावयाचे बाकी आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं. | बीलाचा तपशील | दिनांक | बील नंबर | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| ०१. | माहे जून/ जूलै २०१६ महिन्यातील औषध फवारणीचे बील | दि.१२/०८/२०१६ | ३६१ | ५९,८०५/- |
| ०२. | परिसरातील केलेले धुरीकरण (Fogging Treatment) चे बील | दि.१९/०८/२०१६ | ३६२ | २,४९४/- |
| ०३. | माहे ऑगस्ट/ सप्टेंबर २०१६ महिन्यातील औषध फवारणीचे बील | दि.०५/१०/२०१६ | ३८६ | ५९,८०५/- |
| | | | एकूण | १,२२,१०४/- |

**मागणी:-** संदर्भ क्र.२ व ३ चे निर्देशास अनुसरुन प्रस्तावनेत नमुद केलेल्या अटी/शर्तीनुसार मे.जी.टी.पेस्ट कंट्रोल.प्रा.लि,पुणे यांचे कॉन्ट्रक्ट रद्द करणेसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी लागेल.

अ) करारनाम्यातील अट क्र.१२ व ३३ नुसार मे.जी.टी.पेस्ट कंट्रोल.प्रा.लि,पुणे यांचे काम रद्द करुन संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम रु.२५,००० + अदा केलेल्या बीलातून कपात केलेली ५ % रक्कम रु.३६,४०३/- अशी संस्थान खाती जमा असलेली एकूण रक्कम रु.६१,४०३/- तसेच प्रलंबीत असलेल्या बीलांच्या रक्कम रु.१,२२,१०४/- वर कपात करणेत येणारी ५ % सुरक्षा अनामत रक्कम रु.६,१०५/- अशी एकूण रक्कम रु.६७,५०८/- (अक्षरी रु.सदुसष्ट हजार पाचशे आठ मात्र) दंडात्मक कारवाई म्हणून लेखाशाखामार्फत जप्त करता येईल. व उर्वरित बीलाची रक्कम त्यांना अदा करता येईल.

ब) मे.जी.टी.पेस्ट कंट्रोल.प्रा.लि,पुणे यांचे काम रद्द केल्यास पर्यायी मे.स्टर्लिंग पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस प्रा.लि,मुंबई हे निम्नतम दरधारक असून ते सध्या संस्थानच्या साई धर्मशाळा विभागात किटकनाशक औषध फवारणीचे काम करत आहेत. त्यांनी साईआश्रम भक्तनिवास या विभागात किटकनाशक औषध फवारणीचे काम त्याच अटी/शर्तीनुसार करण्यास तयार असलेबाबत संमती पत्र दिले आहे.

क) मे.जी.टी. पेस्ट कंट्रोल.प्रा.लि.पुणे यांचे कॉन्ट्रॅक्ट रद्द केल्यामुळे नवीन कॉन्ट्रॅक्टरची नेमणूक करण्यासाठी ई-निविदा मागवाव्या लागतील. त्याकामी पुढील दि.०१/०४/२०१७ ते दि.३१/०३/२०१८ अखेर १२ महिन्यासाठी मागील वर्षाची मंजूर रक्कम रु.४,२२,०७४/- या रक्कमेवर १० % वाढ गृहित धरुन रु.४,६४,२८१/- इतका खर्च आपेक्षीत आहे.

तसेच ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन नवीन ठेकेदाराची नेमणूक होईपर्यंत किटकनाशक औषध फवारणीचे काम मे.स्टर्लिंग पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस प्रा.लि,मुंबई यांचेकडून करुन घेता येईल, यासाठी प्रती औषध फवारणीसाठी रु.३६,७२२/- एवढा खर्च येईल,

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान:-** करारनाम्यातील अटी/शर्तीनुसार व मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार कार्यवाही करता येईल.

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय:-** १) करारनाम्यातील अटी/शर्ती अ.नं.०४ नुसार मे.जी.टी.पेस्ट कंट्रोल.प्रा.लि,पुणे यांचे काम समाधानकारक नसल्याने, त्यांना दिलेला कार्यादेश कोणतीही पूर्व सूचना न देता करार रद्द करणेस,

२) मे.जी.टी.पेस्ट कंट्रोल.प्रा.लि,पुणे यांचे काम समाधानकारक नसल्याने यापुढील तीन वर्षे कालावधीसाठी संस्थानच्या निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेऊ नये. याकरीता त्यांचे नांव काळ्या यादीत टाकणेस,

३) अटी/शर्ती अ.नं.१२ नुसार, सदरील कामापोटी ठेवण्यात आलेली सुरक्षा अनामत रक्कम रु.२५,०००/- तसेच अटी/शर्ती अ.नं.३३ नुसार, त्यांचे काम समाधानकारक नसल्याने, यापूर्वी त्यांना देण्यात आलेल्या देयकामधून कपात करुन संस्थानकडे जमा असलेली रक्कम रु.३६,४०३/- व त्यांचे प्रलंबीत बीलातून५ % सुरक्षा अनामत रक्कम रु.६,१०५/- अशी एकूण रक्कम रु.६७,५०८/-(अक्षरी रु.सदुसष्टहजार पाचशे आठ मात्र) दंडात्मक कारवाई म्हणून लेखाशाखामार्फत जप्त करणेस व उर्वरित बीलाची रक्कम त्यांना अदा करणेस.

४) प्रस्तावातील 'क' मध्ये नमुद केल्या प्रमाणे नव्याने जनसंपर्क कार्यालयामार्फत जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस, व ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन नवीन ठेकेदाराची नेमणूक होईपर्यंतमे.स्टर्लिंग पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस प्रा.लि, मुंबई या ठेकेदाराकडून काम करुन घेणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेस, अशा उपरोक्त १ ते ४ बाबींवर मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेकामी सदरचा विषय निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.७८६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवासकडील औषध फवारणी कामाचे ठेकेदार मे.जी.टी. पेस्ट कंट्रोल प्रा.लि., पुणे यांचे काम समाधानकारक नसल्यामुळे त्यांच्या बीलाची व अनामत रक्कम जप्त करणेत येऊन, त्यांचा काळया यादीत समावेश करणेस मान्यता देण्यात आली. तसेच याकामी नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**विषय नं.३३** **शिर्डी विमानतळाकरीता नेमणुक झालेल्या अधिकाऱ्यांना या विभागात सहा खोल्या सहा महिन्यासाठी अत्यल्प शुल्क आकारुन उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४:- २१ (१) (ग) "भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धर्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे" व (२) पोट-कलम (१) (ख) " भक्तांना राहण्याकरिता व वापर करण्याकरिता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे."

**मा.व्यवस्थापन समिती ठराव:-** निरंक.

**प्रस्ताविक:-** श्री.विश्वास पाटील, उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी.लि यांनी दि.३०/०८/२०१६ रोजी आस्थापना विभागाकडे पत्राव्दारे नोव्हेंबर २०१६ पासून शिर्डी विमानतळ कार्यान्वीत होणार असून सदरचे विमानतळाकडे नियुक्तहोणा-या अधिका-यांची सध्या शिर्डी विमानतळ येथे राहण्याची सोय नाही. सबब सदर अधिका-यांची संस्थान निवासस्थानामध्ये सहा महिन्यासाठी अत्यल्प शुल्क आकारुन राहणेची सोय होणेबाबत विनंती केली आहे.

संदर्भ क्र.३ नुसार आस्थापना विभागाने म्हटले आहे दि.२४/०९/२०१६ रोजी श्री.आर.पी.हजारे, एअरपोर्ट डायरेक्टर, शिर्डी विमानतळ यांचेशी समक्ष चर्चा झालेली असून संस्थान कर्मचायांसाठी असलेले निवासस्थाने मा.विधी व न्याय विभागाचे मान्यतेशिवाय इतर शासकीय अधिकारी/कर्मचा-यांना उपलब्ध करुन देणेबाबत मा.शासनाने सक्त मनाई केलेली आहे. तसेच सध्या कुठलेही संस्थान निवासस्थान रिक्त नाही. सबब आपले विनंती नुसार अधिकारी/कर्मचा-यांसाठी ६ निवासस्थाने उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही. असे कळविणेत आलेले आहे.

त्यानंतर श्री.हजारे यांनी काही महिन्यांसाठी नियुक्त होणा-या अधिका-यांचे राहणेसाठी अत्यल्प शुल्क आकारुन साईआश्रम भक्तनिवासस्थान येथे खोल्या उपलब्ध करुन दिलेस स्विकारणार असल्याची तयारी दर्शविलेली आहे.

**मागणी:-** साईआश्रम भक्तनिवास विभागात एकूण १५३६ खोल्या असून, एका रुमची भक्त निवास क्षमता ३ + २ आहे. एका खोलीमधील कॉट संख्या ३ असून, २४ तासांकरीता विना वातानुकूलीत रुमचे दर रु.२००/- व वातानुकूलीत रुमचे दर रु५००/- तसेच जादा व्यक्तीसाठी प्रती गादी रु.५०/- सेवा आकार आकारण्यात येते. या विभागाकडील एकूण खोल्यांपैकी ७५ % खोल्या ऑनलाईन आरक्षण सुविधा आहे.

या विभागात गर्दीचा अंदाज घेऊन भक्तांना निवासासाठी कमीत कमी २४ तास व जास्तीत जास्त ४८ तासांसाठी रुम दिली जाते. तसेच मागणीनुसार एक किंवा दोन दिवसांसाठी मुदतवाढ अशी चार दिवसांसाठी निवासव्यवस्था करणेत येते. तसेच संस्थान एक तीर्थक्षेत्र असल्याने श्रींच्या दर्शनासाठी आलेल्या साईभक्तांना सेवा सुविधा पुरविणे हे संस्थानचे प्रमुख उदिष्ट आहे. इतर खाजगी किंवा शासकीय कर्मचा-यांसाठी जास्त कालावधीसाठी खोल्या उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही.

महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी श्री.आर.पी.हजारे,एअरपोर्ट डायरेक्टर, यांनी शिर्डी विमानतळ येथे रुजू होणा-या ०२ अधिकारी, ०२ पर्यवेक्षक, ०२ तृतीयश्रेणी कर्मचा-यांसाठी अत्यल्प शुल्क आकारुन एकूण ०६

निवासस्थाने सहा महिन्यासाठी करणेची मागणी केली आहे. यापूर्वी अशा प्रकारे या विभागामध्ये शासकीय कर्मचा-यांस रुम उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. तशी तरतुद संस्थानच्या अधिनियमात नमूद नाही.

जर सदर अर्जदाराची निवासव्यवस्था केली तर इतर शासकीय विभागांकडूनही शासकीय कर्मचाऱ्यांचे निवास व्यवस्था होणेबाबत मागणी येऊ शकते.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान:-** मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार कार्यवाही करता येईल.

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय:-** १) साईआश्रम भक्तनिवास हे साईभक्तांचे निवासासाठी बांधण्यात आलेले असून, रुमचा सेवा आकाराचा दर अत्यल्प असल्याने साईभक्तांची रुम मागणीप्रमाण जास्त आहे त्यामुळे विभागामध्ये २४ तास रुम वाटपाचे काम चालू असते. त्यामुळे अशा प्रकारे जास्त कालावधीसाठी रुम दिल्यास गर्दीच्या कालावधीत साईभक्तांची गैरसोय होऊ शकते.

२) श्री साईबाबा देवस्थान हे आंतरराष्ट्रीय देवस्थानामध्ये गणले जात असल्याने देश भरातून अनेक साईभक्त रुमची मागणी करत असतात. जर संबंधीत अर्जदार यांना अशा प्रकारे जास्त कालावधीसाठी रुम उपलब्ध करुन दिल्यास इतर साईभक्त व त्यांचा समूह तसेच शासकीय इतर योजनांमधील कर्मचारी/अधिकारी रुमची मागणी करतील.

३) या विभागामध्ये यापूर्वी अशा प्रकारे कोणत्याही शासकीय उपक्रमांसाठी/कामकाजासाठी येणा-या कर्मचा-यांसाठी निवासव्यवस्था करणेत आलेली नाही, तसेच याबाबतची तरतुद संस्थानच्या अधिनियमामध्ये नाही.

साईभक्तांची निवासव्यवस्था व्हावी या उद्देशाने हा विभाग कार्यन्वीत करणेत आलेला असून, साईभक्तांसाठी २४ तासांकरीता अल्प दरात वीना वातानूकूलीत रुमसाठी रु.२००/- व वातानूकूलीत रुमसाठी रु.५००/- सेवा आकार आकारण्यात येत असून जास्तीत जास्त चार दिवसांसाठी रुम दिली जाते. त्यामुळे सदर अर्जदारास या विभागात निवासव्यवस्था करणे शक्य नाही.

सदरची बाब धोरणात्मक असल्याने सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभे समोर निणर्यास्तव सादर.

**निर्णय क्र.७८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी विमानतळाकरीता नेमणुक झालेल्या अधिकाऱ्यांना सहा महिने कालावधीसाठी संस्थान नियमानुसार शुल्क आकारणेत येऊन, साईआश्रम भक्तनिवास या ठिकाणी निवासासाठी सहा खोल्या उपलब्ध करुन देण्यात याव्या, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**विषय नं.३४** **शिर्डी विमानतळाकरीता नेमणूक झालेल्या अधिकाऱ्यांना संस्थान निवासस्थान तसेच सुरक्षेसाठी नेमणुक होणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांच्या निवासासाठी सशुल्क आकारुन साईधर्मशाळा येथे हॉल मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** अधिनियम १७ (२)(ण) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

**व्यवस्थापन समितीचा ठराव:-** निरंक

**प्रस्ताविक:-** श्री.आर.पी.हजारे एअरपोर्ट डायरेक्टर, शिर्डी विमानतळ यांचेकडील दि.२४/०९/२०१६ रोजीचे पत्र. " एक हॉल विमानतळाच्या सुरक्षेसाठीनेमणुक होणाऱ्या सुरक्षा कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी किमान ४० लोक राहु शकतील एवढया क्षमतेचा संस्थानच्या धर्मशाळेमध्ये देण्यात यावा. त्यामध्ये राहणा-या सुरक्षा कर्मचाऱ्यांची संपुर्ण माहिती संस्थानला वेळे वेळी देण्यात येईल. **अर्ज असे.**

दि.३०/०९/२०१६ रोजीचे आस्थापना विभागाकडील मंजुर टिपणीने "शिर्डी विमानतळाच्या सुरक्षतेसाठी नेमणुक होणाऱ्या सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या निवासासाठी साईधर्मशाळा येथील सशुल्क हॉल उपलब्ध करुन देणेबाबतचा विषय ज्या त्या विभागांकडे वर्ग करुन याबाबतचा सविस्तर प्रस्ताव संबंधीत विभागाकडुन मा व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी सादर करणेस मान्यता असावी. मान्यता घेणेकामी कळविण्यात आलेले आहे.

**मागणी–** विमानतळाच्या सुरक्षेसाठी नेमणुक होणाऱ्या सुरक्षा कर्मचाऱ्यांची निवासव्यवस्था साईधर्मशाळे ऐवजी साईउद्यान इमारतीमध्ये करण्यात यावी.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-**

१) दि.१६/०८/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.५३५ अन्वये, साईमंदिर सुरक्षाकामी नियुक्तकेलेल्या पोलीस कर्मचा-यांची मंदिरा जवळ असलेल्यासाईउद्यान या इमारतीमध्ये यापुढे कायमस्वरुपी मोफत निवासव्यवस्था करणेत यावी असे ठरले असुन त्यानुसार कार्यवाही चालु आहे

२) त्या अनुषंगाने जानं. एसएसएस/ वशी साप्रशा/ आस्था/ २६१९/ २०१६ दि.१३/१०/२०१६ रोजीचे तसा आदेशान्वये पारीत करण्यात आलेला आहे.

३) विमानतळाच्या सुरक्षेसाठी नेमणुक होणाऱ्या सुरक्षा कर्मचा-यांना राहण्यासाठी एक हॉल किमान ४० लोक राहु शकतील एवढया क्षमतेचा संस्थानच्या धर्मशाळेमध्ये देणेबाबत मागणी केली आहे. परंतु एका हॉलमध्ये साधारणपणे २० साई भक्तांची निवासव्यवस्था करण्यात येते. त्यानुसार साई धर्मशाळा मध्ये त्यांना २ हॉल द्यावे लागतील. तसेच यापुर्वी साई धर्मशाळा येथे शासकीय कर्मचारी यांची निवासव्यवस्था सशुल्क करण्यात आलेली नाही. अशाप्रकारे निवासव्यवस्था केल्यास त्याबाबत अनेक अडचणी येण्याची शक्यता आहे.

उदा. संबंधीताना भाडे पावती देणे, करारनामा करुन घेणे इ. तसेच आता जर अशी निवासव्यवस्था केली तर इतर शासकीय विभागांकडुनही निवासासाठी मागणी होईल, त्यावेळी त्यांना आपणास नकार देता येणार नाही. याबाबत धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

तसेच साई धर्मशाळा हि इमारत साईभक्तांचे निवासासाठी बांधण्यात आलेली असुन गर्दीच्या काळात संपुर्ण इमारती भरतात जर उपरोक्त सुरक्षा कर्मचाऱ्यांना २ हॉल उपलब्ध करुन दिल्यास साईभक्तांची गैरसोय होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

४) तसेच पोलीस कर्मचारी हे साई मंदिर सुरक्षाकामी नेमण्यात आले असल्याने त्यांची निवासव्यवस्था संस्थान मार्फत मोफत करण्यात येत आहेत. परंतु विमानसुरक्षा रक्षक कर्मचारी हे संस्थान कामासाठी नियुक्त नसल्याने त्यांची निवासव्यवस्था करणे बंधनकारक नाही असे नम्र मत आहे

५) दि.१६/०८/२०१६ चे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे साईधर्मशाळा येथील मंदिर सुरक्षाकामी आलेले पोलीस कर्मचारी यांना साईप्रसाद निवासस्थान विभागातील साईउद्यान येथे हॉल देऊन व्यवस्था करणेबाबतची कार्यवाही चालु आहे

६) साईउद्यान कडील सेवाआकार खालील प्रमाणे -

| **अ.नं.** | **तपशिल** | **एक हॉलसाठी सेवाआकार रुपये** |
|---|---|---|
| १ | एका दिवसाकरीता | ४००/- |
| २ | एक महीन्याकरीता | १२,०००/- |

त्याच धर्तीवर विमानतळ सुरक्षा कामी नेमणुक होणाऱ्या पोलीस कर्मचारी यांना साईधर्मशाळा ऐवजी साईउद्यान येथे उपरोक्त दर्शविलेल्या तक्त्यानुसार दरमहा रु.१२,०००/-(अक्षरी बारा हजार मात्र) शुल्क आकारुन सहा महिने कालावधीसाठी हॉल उपलब्ध करुन देणेबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७८८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी विमानतळावरील सुरक्षेसाठी नेमणुक होणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांची तात्पुरते ११ महिने कालावधीसाठी साईउद्यान येथे संस्थान नियमानुसार शुल्क आरणेत येऊन, निवासव्यवस्था करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम धर्मशाळा/ प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान)

---

**विषय नं.३५** **वॉटर फ्लो मिटर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

| अ.नं. | कलम/ तरतुद क्र. | कलम/ तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्र. | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |

**प्रस्तावना**:- सद्यस्थितीत संस्थानकरीता शिर्डी संस्थान, कनकुरी व पिंपळवाडी या संयुक्तपाणी पुरवठा योजनेच्या मौजे कनकुरी हद्दीतील पाणी साठवण तलावातुन पाणी पुरवठा करण्यात येत आहे. सन १९९५ पासून सदरची पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करणेत आलेली आहे. या ठिकाणी पाणी साठविणेसाठी तीन साठवण तलावांची निर्मिती करण्यात आलेली असून, त्यांची साठवण क्षमता ३३२ एम.एल. इतकी आहे. सदर साठवण तलावात जलसंपदा (पाटबंधारे) विभागाकडून गोदावरी/दारणा नदी, गोदावरी उजवा तट कालवा याव्दारे शासन मंजुरीनुसार पाणी पुरवठा आवर्तन देण्यात येत आहे. जलसंपदा विभाग नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडुन ५३.३२०५ एम.सी.एफ.टी वार्षिक पाणीवापर साठा मंजूर आहे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व महाराष्ट्र शासन नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचे दरम्यान पाणी वापर करारनामा करण्यात येतो. याबाबत दि.०१/११/२०१५ ते दि.३१/१०/२०२१ या कालावधील करारनामा करण्यात आलेला आहे.

**प्रस्ताव**:- जलसंपदा (पाटबंधारे) विभागाकडुन पुरविण्यात येणा-या पाण्याचे मोजमाप करणेकरीता शासन नियमानुसार व करारनाम्यातील अटीप्रमाणे पाणी मापक यंत्र बसविणे बंधनकारक असलेने, पाणी मापक यंत्र बसविणेची कार्यवाही करणेबाबत गोदावरी उजवा तट कालवा, उपविभाग, राहाता यांचे दि.१६/०७/२०१६ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

**तसेच,** श्री साईप्रसादालय विभागाकडुन जा.नं.एसएसएस/ वशी-प्रसादा/ ११०/ २०१६, दि.२३/०९/२०१६ रोजीचे पत्रान्वये आय.एस.ओ. ऑडिट तपासणी अहवाल व आढळलेल्या उणीवाबाबत श्री साईप्रसादालयाकरीता दैनंदिन वापरासाठी खर्च होणाऱ्या पाण्यावर नियंत्रणाकरीता फ्लो मिटर बसविणेबाबत इकडील विभागास कळविण्यात आलेले आहे.

याकरीता विविध सप्लायर्स यांचेकडे दुरध्वनीवरुन संपर्क साधून माहिती घेतली असता, त्यांनी खालीलप्रमाणे खर्च कळविलेला आहे.

| अ.नं. | खरेदी करावयाच्या वॉटर फ्लो मिटरचा तपशिल | आवश्यकता | अंदाजे दर प्रती नग | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | अल्ट्रासोनिक ओपन चॅनल टाईप वॉटर फ्लो मिटर.<br>स्ट्रीम इक्विपमेंट प्रा.लि.<br>(कनकुरी साठवण तलाव येथील वापराकरीता) | ०१ | रु.१,९०,०००/- | १,९०,०००.०० |
| ०२ | इलेक्ट्रोमॅग्नेटिक वॉटर फ्लो मिटर.<br>स्ट्रीम इक्विपमेंट प्रा.लि.<br>(श्रीसाईप्रसादालय येथील वापराकरीता) | ०१ | रु.१,००,०००/- | १,००,०००.०० |
| | | | **एकुण रक्कम-** | **२,९०,०००.००** |

**विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय:-** याकामी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ नुसार वरील नमुद तरतुदीस अनुसरुन मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेतल्यानंतर वरील तपशिलानुसार नमुद वॉटर फ्लो मिटर कोटेशन मागवून खरेदी करता येतील असे मत आहे.

तरी वरीलप्रमाणे नमुद वॉटर फ्लो मिटर खरेदी करणेसाठी अंदाजे रु.२,९०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी सदरहू वॉटर फ्लो मिटर कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु.२,९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या ठिकाणी वॉटर फ्लो मिटर खरेदी करुन बसविणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.३६ पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लिचींग पावडर, फेरीक अॅलम, क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

| अ.नं. | कलम/ तरतुद क्र. | कलम/ तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्र. | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थाच्या विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |

**प्रस्तावना:-** सद्यस्थितीत संस्थानकरीता शिर्डी संस्थान, कनकुरी व पिंपळवाडी या संयुक्तपाणी पुरवठा योजनेच्या मौजे कनकुरी हद्दीतील पाणी साठवण तलावातुन पाणी पुरवठा करण्यात येत आहे. सन १९९५ पासून सदरची पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करणेत आलेली आहे. या ठिकाणी पाणी साठविणेसाठी तीन साठवण तलावांची निर्मिती करण्यात आलेली असून, त्यांची साठवण क्षमता ३३२ एम.एल. इतकी आहे. सदर साठवण तलावात जलसंपदा (पाटबंधारे) विभागाकडून गोदावरी/दारणा नदी, गोदावरी उजवा तट कालवा याव्दारे शासन मंजुरीनुसार पाणी पुरवठा आवर्तन देण्यात येत आहे.

संस्थानचे मौजे कनकुरी येथे साठवण तलावालगत जलशुध्दीकरण केंद्र असून, पाणी शुध्दीकरणांसाठी कनकुरी साठवण तलाव येथे पाणी शुध्दीकरण करणेसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर (विक्रम ब्रॅन्ड, ग्रासिम मेक, डी.सी.एच. (डी.एस.सी.एल), आय.एस.आय. मार्क, ३४ % क्लोरीन उपलब्ध), फेरीक अॅलम १६ % अॅलोमिना फेरीक उपलब्ध व क्लोरीन गॅस सिलेंडर (१०० किलो वजन) यांची दैनंदिन आवश्यकता भासते.

मागील वर्षी पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक अॅलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार निविदा, ई-निविदा मागवून खरेदी करण्यात आलेली आहे. पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक अॅलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेसाठीची ई-निविदा व निविदा प्रक्रिया पुर्ण झालेनंतर निम्नतम दरधारकांना माहे फेब्रुवारी, मार्च-२०१६ मध्ये पुरवठा आदेश देण्यात आलेने, संबंधीतांना पुरवठा आदेश देतेवेळी मार्च२०१६ पर्यंत कालावधी गृहीत न धरता माहे डिसेंबर-२०१६ पर्यंत कालावधी गृहीत धरणेत येवून पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार संबंधीत पुरवठाधारकांकडुन पाणी शुध्दीकरण मटेरियलची खरेदी करण्यात येत आहेत. पुरवठाधारकांची माल पुरविण्याचा कालावधी माहे डिसेंबर २०१६ असून त्यानंतर पुढील१२ (बारा) महिन्यांचे कालावधीसाठी नव्याने खरेदी प्रक्रिया राबवावी लागणार आहे.

**प्रस्ताव:-** पुढील १२ (बारा) महिन्यांचे कालावधीसाठी पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक अॅलम, क्लोरीन गॅस सिलेंडर इ. मटेरियलचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.नं. | खरेदी करावयाच्या साहित्याचा तपशिल | आवश्यकता | अंदाजे दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | ब्लीचिंग पावडर (विक्रम (ग्रासिम) ब्रॅंड डी.सी.एच. (डी.एस.सी.एल), आय.एस.आय. मार्क, ३४ % क्लोरीन उपलब्ध) | ३५ मे.टन | रु.१७,५००/- प्रती मे.टन (व्हॅटसह) | ६,१२,५००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०२ | फेरीक ॲलम (१६ % ॲलोमिना फेरीक उपलब्ध) | ६० मे.टन | रु.७,०००/- प्रती मे.टन (व्हॅटसह) | ४,२०,०००.०० |
| ०३ | क्लोरीन गॅस सिलेंडर (१०० किलो वजन) | ४० सिलेंडर | रु.४,६००/- प्रती सिलेंडर (व्हॅटसह) | १,८४,०००.०० |
| | | | **एकुण रक्कम-** | **१२,१६,५००.००** |

**विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय:-** याकामी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ नुसार वरील नमुद तरतुदीस अनुसरुन माव्यवस्थापन समितीची मान्यता घेतल्यानंतर खरेदी विभागामार्फत पुढील १२ (बारा) महिन्यांचे कालावधीसाठी पाणी शुध्दीकरणांसाठी आवश्यक ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम, क्लोरीन गॅस सिलेंडर इ. खरेदी करणेसाठी ई-निविदा प्रक्रिया राबवून मटेरियल खरेदी करता येईल असे मत आहे.

तरी वरीलप्रमाणे नमुद मटेरियल खरेदी करणेसाठी अंदाजे रु.१२,१६,५००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी सदरचे मटेरियल विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु.१२,१६,५००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, पाणी शुध्दीकरणांसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आवश्यक असलेली ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.३७** **व्दारावती भकतनिवास इमारत कारंजाकरीता आवश्यक इले.मोटार व इतर साहित्य खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

| अ.नं. | कलम/ तरतुद क्र. | कलम/ तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्र. | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |

**प्रस्तावना:-** उपरोक्त विषयांकित संदर्भान्वये बगीचा विभागाकडील जा.नं.एसएसएसटी/वशी-बगीचा/ ९७/ २०१६, दि.०४/१०/२०१६ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झालेले आहे. सदरचे पत्रात त्यांनी व्दारावती भक्तनिवास इमारतीचे समोरील बागेत असणा-या कारंजासाठी पाणी पुरवठा विभागामार्फत नविन इले.मोटार खरेदी करुन मिळणेबाबत मागणी केलेली आहे.

सदरचा कारंजा संस्थानचे बगीचा विभागाकडे वर्ग असून कारंजाची एकुण किंमत रु२,११,०५०/- (इले.मोटारसह) नमुद करण्यात आलेली आहे. सदरच्या कारंजाकरीता यापुर्वी बगीचा विभागाकडुन बसविण्यात आलेली इले. मोटार दुरुस्तकरणेबाबत इकडील विभागास कळविण्यात आलेले होते.

**प्रस्ताव:-** याबाबत पाणी पुरवठा विभागाकडुन प्रत्यक्ष पाहणी केली असता, सदरची इले. मोटार जास्त दिवस कार्यान्वित राहू शकणार नाही. सदरची इले. मोटार तात्पुरत्या स्वरुपात दुरुस्तकरणेत आलेली आहे. परंतू सदरची इले.मोटार कोणत्याही क्षणी नादुरुस्त होण्याची शक्यता आहे. याकरीता आवश्यक इले. मोटार सद्यस्थितीत पाणी पुरवठा विभागाकडे उपलब्ध नसल्याने ती नव्याने खरेदी करावी लागेल. सदरची इले. मोटार खरेदी करुन पाणी पुरवठा विभागाकडुन बसवून देता येईल. सदरचा कारंजा बगीचा विभागाकडे वर्ग करणेत आलेला असल्याने मोटारीची नोंद बगीचा विभागाचे डेडस्टॉकला घेता येईल.

खरेदी करावयाच्या आवश्यक साहित्याचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.नं. | साहित्य तपशिल | कंपनी | आवश्यकता | अंदाजे दर रु. | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | **१० एच.पी. पाणबुडी इलेक्ट्रिक मोटार.** १५ मिटर हेड, कनेक्शन- ४" X ४" | टेक्स्मो/ अॅक्वॉटेक्स | ०१ नग. | ४५,०००.०० | ४५,०००.०० |
| ०२ | स्टार डेल्टा स्टार्टर. | LTLK | ०१ नग. | १०,०००.०० | १०,०००.०० |
| | | | | **अंदाजे एकुण रक्कम रुपये-** | **५५,०००.००** |

**विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय:-** याकामी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील वरील नमुद केलेल्या तरतुदीनुसार, मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेतल्यानंतर सदरचे काम करता येईल असे मत आहे.

तरी वरील नमुद साहित्य खरेदी करणेसाठी अंदाजे रु. ५५,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी सदरचे साहित्य विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु.५५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.७९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती भक्तनिवास इमारतीसमोरील कारंजाकरीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आवश्यक असलेली इले.मोटार तसेच इतर साहित्य खरेदीकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.३८** **माहे डिसेंबर- २०१५ ते फेब्रुवारी- २०१६ जमा- खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** लेखाशाखा विभागामार्फत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडून खर्च होणा-या रकमांचा एकत्रित जमा– खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा व खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा. व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येत असतो.

त्या अनुषंगाने माहे डिसेंबर-२०१५ ते फेब्रुवारी-२०१६ या कालावधीतील मासिक जमा खर्चाचे तक्ते तयार करण्यात आले असून ते मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर नोंद घेणेसाठी सादर करण्यात येत आहे.

माहे डिसेंबर -२०१५ ते फेब्रुवारी -२०१६ जमा खर्चाचा तपशील खालील प्रमाणे –

| **महिना** | **जमा** | **खर्च** |
|---|---|---|
| डिसेंबर -१५ | ४६,९२,८४,३७३/- | १४,९३,४१,३११/- |
| जानेवारी -१६ | ४८,१३,९९,६९९/- | १७,७८,२३,५०८/- |
| फेब्रुवारी – १६ | ३८,२४,५३,७३१/- | १५,९४,०७,२३०/- |

तरी माहे डिसेंबर -२०१५ ते फेब्रुवारी-२०१६ या कालावधीतील मासिक जमा खर्चाचे तक्ते मा. व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.७९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे डिसेंबर- २०१५ ते फेब्रुवारी- २०१६ या जमा- खर्च तक्त्याचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली व यापुढे दरमहा जमा आणि खर्च विवरणासहीत सादर करणेत यावे, अशा सुचना दिल्या.**

**तसेच साईभक्तांच्या माहितीसाठी दररोज प्राप्त होणारी देणगी डिस्प्लेवर दाखविण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.३९** **लेखापरिक्षण समिती (Audit Committee) गठीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमध्ये दैनंदिन कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत चालला असुन, आर्थिक व्यवहारात व त्या अनुशंगीक कामकाजातही मोठया प्रमाणात वाढ होत आहे. तसेच केंद्र व राज्य शासनाकडुन विविध आर्थिक बाबीं विषयक, आयकर, सेवाकर, व्हॅट, जी.एस.टी. वगैरे सारखे कायदे पारित होतात. या कायद्यातील नव-नविन तरतुदींचा प्रभाव दैनंदिन आर्थिक कामकाजात पडत असतो, या सर्व बाबी वेळेत पुर्ण होणे गरजेचे असुन, वैधानिक लेखापरिक्षणामध्ये आक्षेपांचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने व आर्थिक व्यवहारांत पारदर्शकता येऊन वेळीच सुधारणा करुन तत्काळ कार्यवाही करण्यासाठी व अंतर्गत नियंत्रण सक्षम राहण्यासाठी दरवर्षी संस्थानकडून पुर्व लेखापरीक्षक, अंतर्गत लेखापरिक्षक व करसल्लागार यांच्या नेमणुका एकत्रित मानधनावर करण्यात येतात.

त्याअनुशंगाने, उपरोक्त संदर्भान्वये दि.०१.१०.२०१६ रोजी झालेल्या मा.उपसमितीच्या सभेमध्ये सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल व ताळेबंद चर्चेसाठी ठेवण्यात आला होता. या चर्चेसाठी सन २०१५-१६ चे शासन नियुक्त वैधानिक लेखापरिक्षक यांना बोलाविण्यात आले होते. चर्चे दरम्यान सदर सभेत वैधानिक लेखापरिक्षक यांनी सुचना मांडली की, संस्थानचा आर्थिक व्यवहारा संबधीचा व्याप मोठा असुन त्यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत चाललेली आहे. त्यावर योग्य नियंत्रण राहणे गरजेचे असल्याने, तसेच त्यामध्ये जास्तीत जास्त पारदर्शकता येण्यासाठी संस्थान नियुक्त सर्व लेखापरिक्षकांमध्ये व कर सल्लागार या सर्वांमध्ये समन्वय राहण्यासाठी, तसेच लेखापरिक्षण करताना आढळलेल्या त्रुटींची वेळेत पुर्तता होणेसाठी, संस्थानने एक लेखापरिक्षण समिती गठीत करण्यात यावी. या समितीची दर तीन महीन्याला सभा घेऊन लेखापरिक्षणाच्या कामाचा आढावा घेण्यात यावा. या समितीमध्ये पुढीलप्रमाणे सदस्य असावेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.कार्यकारी अधिकारी | ६. शासन नियुक्त वैधानिक लेखापरिक्षक |
| २. | मा.उप-कार्यकारी अधिकारी | ७. संस्थान नियुक्त सर्व अंतर्गत लेखापरिक्षक |
| ३. | मुख्यलेखाधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी | ८. संस्थान नियुक्त सर्व पुर्व लेखापरिक्षक |
| ४. | सर्व प्रशासकीय अधिकारी | ९. संस्थान नियुक्त कर सल्लागार |
| ५. | सर्व विभागप्रमुख | १०. संस्थानचे स्वतंत्र प्रकल्पांसाठी नियुक्त केलेले लेखापरिक्षक |

उपरोक्त प्रमाणे लेखापरिक्षण समिती गठित करण्यात येऊन, या समितीच्या प्रत्येक तिमाहीस कमीत कमी १ या प्रमाणे वर्षातुन कीमान ४ सभा होणे आवश्यक आहे. या सभेत घेण्यात आलेले निर्णय, चर्चा इ.चे इतिवृत्त संस्थानचे अंतर्गत लेखापरिक्षण विभागाने तयार करुन ते सर्व सदस्यांना व सर्व विभागांना देण्यात यावे. सभेमध्ये केल्या गेलेल्या सुचना व घेण्यात आलेले निर्णयांची सर्व विभागांनी काटेकोरपणे नोंद घेऊन कामकाज करावे. जेणेकरुन संस्थानचे आर्थिक व्यवहार व आर्थिक व्यवहारांशी संबधीत कार्यप्रणाली यावर प्रभावी नियंत्रण राहील.

तरी उपरोक्त प्रमाणे लेखापरिक्षण समिती स्थापन करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे लेखापरिक्षण समितीचे (Audit Committee) गठण व कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.४०** **सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाकरीता परकीय चलन, मुंबई कार्यालय व संस्थानचे विविध माहिती व सुविधा केंद्रांचे अंतर्गत लेखापरिक्षकांचे (Internal Auditor) मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानच्या दैनंदिन कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे, त्या अनुषंगाने आर्थिक व्यवहारात व कामकाजातही मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. तसेच आर्थिक व्यवहार व त्या संबधीत बाबीं संदर्भात केंद्र व राज्य शासनाकडून विविध अर्थविषयक कायदे पारित करणेत येत असतात. या अर्थविषयक कायद्यातील नव-नवीन तरतुदींचा प्रभाव कार्यालयीन दैनंदिन आर्थिक कामकाजात पडत असल्याने वैधानिक लेखापरिक्षणा अहवालामध्ये आक्षेपांचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने व आर्थिक व्यवहारांत पारदर्शकता येऊन वेळीच त्याच्यात सुधारणा करुन तात्काळ कार्यवाही करण्यासाठी व अंतर्गत नियंत्रण सक्षम राहण्याच्या दृष्टीने संस्थान मार्फत दरवर्षी पुर्व लेखापरिक्षक, अंतर्गत लेखापरिक्षक, कर सल्लागार, वार्षिक आयकर विवरण व छानणी सल्लागार यांच्या नेमणुका करण्यात येत असतात. त्याअनुषंगाने संस्थानचे परकीय चलन, मुंबई कार्यालय तसेच संस्थानचे विविध माहिती व सुविधा केंद्राचे (सिकंदराबाद, चेन्नई, बँगलोर इ.) अंतर्गत लेखापरिक्षकांचे नेमणुकांची मुदत पुर्ण झालेली असल्याने पुढील कालावधी करीता त्यांना मुदतवाढ तथा नेमणुक आदेश देणे आवश्यक आहे.

उपरोक्त विवेचना प्रमाणे संस्थानचे परकीय चलनाचे व्यवहार, मुंबई कार्यालय, तसेच विविध माहिती व सुविधा केंद्राचे अंतर्गत लेखापरिक्षक म्हणुन मागिल वर्षाचे लेखापरिक्षक यांना सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी मुदतवाढ तथा नेमणुक आदेश देता येईल

**प्रस्ताव-**

१. संस्थानच्या परकिय चलनाच्या लेखापरिक्षणासाठी नियुक्त करण्यात आलेले मेएन.पी.रेडीज ॲण्ड कं.चार्टर्ड अकौटंट, मुंबई हे सन २००५-०६ पासुन ते आज पर्यंत म्हणजे मागील साधारणतः १० वर्षापासुन परकिय चलनाचे लेखापरिक्षणाचे कामकाज करत आहेत. याबाबत स्वतंत्र रिपोर्ट FCRA दिल्ली येथे सादर करावा लागतो. तसेच परकीय चलनाबाबत शासनाने केलेल्या पत्र व्यवहारासंबधी त्यांची नेहमीच मदत घ्यावी लागत असते.

तसेच संस्थानच्या मुंबई कार्यालयामध्ये चालणाऱ्या आर्थिक व्यवहारावर नियंत्रण ठेवणेकामी उपरोक्त संस्थेकडून लेखा परिक्षणाचे कामकाज केले जाते. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरीता मुंबई कार्यालयासाठी तसेच संस्थानचे परकिय चलनाचे व्यवहार, या कामी मे.एन.पी.रेडीज ॲण्ड कं.चार्टर्ड अकौटंट, मुंबई यांची अंतर्गत लेखापरिक्षक म्हणुन प्रत्यक्ष खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या अटीवर नेमणुक करण्यात आलेली होती. याकामी प्रत्यक्ष खर्चाची प्रतिपूर्ती म्हणुन जास्तीतजास्त रू.२५,०००/- (अक्षरी रक्कम रूपये पंचवीस हजार मात्र) इतके त्यांना मानधन आदा करण्यात आलेले आहे. त्यांचे काम अत्यंत समाधानकारक आहे.

२. भक्तांचे सुविधेसाठी संस्थानमार्फत सिकंदराबाद चेन्नई व बॅंगलोर याठिकाणी माहिती व सुविधा केंद्र सुरु करण्यात आलेले आहेत. माहिती व सुविधा केंद्राचे लेखापरिक्षक म्हणुन मेअमोल सी.दातार ॲन्ड असोसिएट्स, पुणे यांची सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी रुपये ५०,०००/-+सेवाकर (अक्षरी रुपये पन्नास हजार मात्र) वार्षिक इतक्या मानधनावर नेमणुक करण्यात आली होती. त्यांनी त्यानुसार संस्थानचे सर्व माहिती व सुविधा केंद्रांचे लेखापरिक्षण पुर्ण केले असुन त्याबाबतचा लेखापरिक्षण अहवाल वेळोवेळी मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचेकडे सादर करण्यात आलेला आहे. या तीनही माहिती व सुविधा केंद्राच्या ठिकाणी जावुन प्रत्यक्ष लेखापरिक्षणाचे कामकाज करावे लागते. त्यांचे काम समाधानकारक आहे.

उपरोक्त मुदतवाढ दिल्यानंतर त्यांचेकडून एप्रिल २०१६ ते आजपर्यंत या कालावधीचे लेखापरिक्षणाचे कामकाज पुर्ण करुन घेण्यात येईल.

तरी उपरोक्त नमुद केलेप्रमाणे परकीय चलन व मुंबई कार्यालयासाठी मे.एन.पी.रेडीज ॲण्ड कं.चार्टर्ड अकौटंट, मुंबई यांना व सिकंदराबाद चेन्नई व बंगलोर येथील माहिती व सुविधा केंद्रासाठी मेअमोल सी.दातार ॲन्ड असोसिएट्स, पुणे यांना सन२०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी पुर्वीच्याच अटीशर्ती व मानधनावर मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.७९४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे परकीय चलन व मुंबई कार्यालयासाठी मे.एन.पी.रेडीज.ॲण्ड कं.चार्टर्ड अकौटंट, मुंबई यांची तसेच सिकंदराबाद चेन्नई व बंगलोर येथील माहिती सुविधा केंद्रासाठी मे.अमोल सी.दातार ॲन्ड असोसिएट्स, पुणे या अंतर्गत लेखापरिक्षकांना सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी पुर्वीच्याच अटी/शर्ती व मानधनावर मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी विहीत पध्दतीने अंतर्गत लेखापरिक्षांची नेमणूक कणेबाबतची कार्यवाही सुरु करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

विषय नं.४१ **संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणाऱ्या सोने-चादी वस्तु अलंकाराची तसेच मौल्यवान खडे (Precious Stone) मुल्यांकनकारांच्या मुदतवाढीबाबत.**

प्रस्ताव- **(अ) प्रस्तावना–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मधील, समितीची कर्तव्ये व अधिकार या शीर्षाखालील कलम १७ (२) (झ) मध्ये, "..सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील, अशा सर्व गोष्टी करील." असे नमुद केलेले आहे.

**(अ-१)** संस्थानला दक्षिणापेटीमध्ये व लेखाशाखेत समक्ष देणगी स्वरुपात येणाऱ्या सोने-चांदीच्या वस्तु, अलंकार/ मौल्यवान खडे (Precious Stone) यांची कस लावून तपासणी करून बाजारभावाने किंमत निश्चित करणेकामी तत्कालीन मा.त्रिसदस्यीय समितीचे दिनांक ०९ ऑक्टोबर, २०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ९०५ अन्वये, विहीत पध्दतीने वर्तमानपत्रात जाहिरात देवून, खाली नमूद केलेल्या अ.नं. ०१ व ०२या शासन मान्यताप्राप्त मुल्यांकनकारांचीदि.०१ एप्रिल, २०१५ ते दि.३१ मार्च, २०१६ अखेर (एक वर्ष) कालावधीकरीता नेमणूक करण्यात आली होती.

| अ.नं. | मौल्यवान खडे मुल्यांकनकाराचे नांव | मानधन | मुदतवाढीबाबत शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | सोनी शिवलाल ब्रदर्स ज्वेलर्स, मुंबई | रू.७५/- प्रतिखडा + सेवाकर | काम समाधानकारक आहे, तसेच मुदतवाढीबाबत संमतीपत्र आलेले आहे. |
| ०२ | श्री नरेश एन.मेहता व श्री. प्रदिपकुमार जे.जवेरी, मुंबई | रू.७५/- प्रतिखडा + सेवाकर | काम समाधानकारक आहे, तसेच मुदतवाढीबाबत संमतीपत्र आलेले आहे. |

१. उपरोक्त खडे मुल्यांकनकारांची नेमणूक वर्तमानपत्रांमध्ये विहित पध्दतीने जाहिरात देवून तत्कालीन मा.त्रिसदस्यीय समितीचे मान्यतेने करणेत आलेली आहे / होती.

२. उपरोक्त मुल्यांकनकारांनी त्यांचे नेमणुकीचे कालावधीत,सन २०१४-१५ या आर्थिक वर्षातील (दि. ०१ जून, २०१४ ते दि.३१ मार्च, २०१५) या कालावधीतील प्राप्त २०९वस्तू/खडे स्वच्छ करणे, पॉलीशींग, तपासणी, पॅकींग,फोटोग्राफी, व प्रमाणपत्रे तसेच मुल्यांकनाचे काम पूर्ण केलेले असून त्यापोटी त्यांना प्रत्येकी रुपये १७,८७०/- मात्र असे एकूण रू.३५,७४०/- मात्र आदा करणेत आलेले आहेत.

३ तसेच, उपरोक्त मुल्यांकनकारांनी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षातील ( दि. ०१ एप्रिल, २०१५ ते दि.३१ मार्च, २०१६) याकालावधीतील प्राप्त २२३वस्तू/खडे स्वच्छ करणे, पॉलीशींग, तपासणी, पॅकींग,फोटोग्राफी, व प्रमाणपत्रे तसेच मुल्यांकनाचे काम पूर्ण केलेले असून त्यापोटी त्यांना प्रत्येकी रुपये १९,२३४/- मात्र असे एकूण रू.३८,४६८/- मात्र आदा करणेत आलेले आहेत.

आता, उपरोक्त मुल्यांकनकारांची नेमणुकीची मुदत दिनांक ३१ मार्च, २०१६ अखेर संपुष्टात आल्याने, विषयांकित कामकाजासाठी सदरचे मुल्यांकनकारांनी सन २०१६-१७ या पुढील वर्षाकरीता आहे त्याच अटी-शर्ती वर ते पुढे कामकाज करण्यास तयार असून मुदतवाढ मिळावी म्हणून विनंती अर्ज दिलेले आहेत.

**(अ-२)** दरम्यानच्या कालावधीमध्ये, साई गोल्ड ॲण्ड स्टुडेड ज्वेलरी, बंगलोर या संस्थेचे प्रोप्रायटर श्री. शैलेशकुमार पटेल यांनी त्यांचे दिनांक २४ ऑगष्ट, २०१६ रोजीचे ई-मेल पत्राव्दारे असे कळविले आहे की,

" .. .. त्यांचे मालकीची Sai Gold & Studded Jewellery, Malleswaram, Bangalore ही सन २००३ मध्ये स्थापन झालेली संस्था असून, या संस्थेमार्फत सोने-चांदी, हिरे व जडजवाहिर इत्यादीची निर्मिती व विक्री करणेत येते. या क्षेत्रात त्यांचा २५ वर्षांचा अनुभव असून त्यांचेकडेस हिरे-जडजवाहिरचे तपासणीसाठी/ चाचणीसाठी आवश्यक असणारे सर्वप्रकारचे यांत्रिक साहित्य उपलब्ध आहे. याकामी ते **विनामुल्य** सेवा देणेस तयार आहेत."

श्री.शैलेशकुमार पटेल, प्रोप्रायटर, साई गोल्ड ॲण्ड स्टुडेड ज्वेलरी, बंगलोर यांनी त्यांचे उपरोक्त पत्रासोबत, व्हॅट रजिष्ट्रेशन सर्टिफीकेट व सीएसटी परिशिष्टाची छायांकित प्रत जोडली आहे.

थोडक्यात, श्री. शैलेशकुमार पटेल, बंगलोर यांनी संस्थानकडून कोणतेही शुल्क न घेतां, सोने-चांदीच्या वस्तु, अलंकार/ मौल्यवान खडे, हिरे-मोती यांची कस लावून तपासणी करुन बाजारभावाने किंमती निश्चित करुन देणेकामी सहकार्य करणेची तयारी दर्शविलेली आहे. परंतु मुल्यांकनासाठी बंगलोरहून शिर्डी येथे ते स्वःखर्चाने येणे-जाणेस तयार आहेत किंवा कसे याबाबत त्यांनी काही ही नमूद केलेले नाही.

तथापी, याबाबत असे नमूद करावेसे वाटते की, लेखाशाखेत दैनंदिन समक्ष देणगीव्दारे प्राप्त होणारे सोन्या-चांदीचे अलंकार तसेच आठवडयातून दोन वेळेस होणारे दक्षिणा पेटी मोजणीचे वेळेस प्राप्त होणारे सोन्या-चांदीचे अलंकार/ मौल्यवान खडे आदिंचे मुल्यांकनाबाबत समक्ष कार्यस्थळावर येऊन तपासणी करणे अपेक्षित आहे. याबाबत, श्री. पटेल यांचेशी दूरध्वनीवरुन चर्चा केली असतां, दैनंदिन तसेच प्रत्येक दक्षिणापेटी मोजणी वेळेस सोने-चांदीचे मुल्यांकनाकामी हजर राहणे शक्य नसल्याचे सांगितले आहे.

परंतु, साई गोल्ड ॲण्ड स्टुडेडज्वेलरी, बंगलोर या संस्थेकडून संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, शासनमान्यता मुल्यांकनकार प्रमाणपत्र आदि आवश्यक कागदपत्रे प्राप्त झाल्यास मौल्यवान खडयांचे मुल्यांकनाचे कामासाठी त्यांचे प्रस्तावाचा उपरोक्त प्रस्तावासोबत विचार करतां येईल. मौल्यवान खडयांचे मुल्यांकन करण्यासाठी कमीत कमी दोन मुल्यांकनकार असावेत व त्यांच्याकडूनच मुल्यांकन करुन घ्यावे, असे संस्थानचे वैधानिक लेखापरीक्षकांनी त्यांच्या ऑडिट रिपोर्टमध्ये नमुद केलेले आहे.

**प्रस्ताव-** वर नमुद केलेल्या परिच्छेद अ मधील प्रस्तावनेस अनुसरुन, सोने-चांदीच्या वस्तु, अलंकार/ मौल्यवान खडे (Precious Stone) यांची कस लावून तपासणी करून बाजारभावाने किंमत निश्चित करणेकामी, उपरोक्त वर नमुद केलेले तक्त्यातील शासनमान्यता प्राप्त मुल्यांकनकार,(अ.नं.०१) मे.सोनी शिवलाल ब्रदर्स ज्वेलर्स, मुंबई, व (अ.नं.०२) श्री. नरेश एन.मेहता व श्री. प्रदिपकुमार जे. जवेरी, मुंबई यांचे कामकाज अत्यंत

समाधानकारक असून, ते सेवाभावी स्वरुपात सेवा देत असल्याने, तसेच ते घेत असलेले मानधन तुलनेने अत्यंत अल्प असल्याने, त्यांची पुर्वीच्याच अटी-शर्ती वर तसेचयामध्ये खडे स्वच्छ करणे, पॉलीशींग, तपासणी, पॅकींग, फोटोग्राफी, व प्रमाणपत्रे तसेच मुल्यांकन इ चा समावेश करण्यात येऊन, प्रति खडा तपासणी रु.७५/- + सेवाकर या मानधनावर एक वर्षासाठी (सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता) मुदतवाढ देणेत यावी.

सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.७९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणाऱ्या सोने-चांदीच्या वस्तु, अलंकार व मौल्यवान खडे (Precious Stone) यांची कस लावून तपासणी करून बाजारभावाने किंमत निश्चित करणेकामी शासनमान्यता प्राप्त मुल्यांकनकार मे.सोनी शिवलाल ब्रदर्स ज्वेलर्स, मुंबई, श्री.नरेश एन.मेहता व श्री. प्रदिपकुमार जे. जवेरी, मुंबई यांना सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी पुर्वीच्याच अटी/ शर्ती तसेच मानधनावर मुदतवाढ देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.४२** **दक्षिणा पेटयांमधील नोटा मोजणीकामी सध्या असलेल्या Multy Currency Desktop Banknote Counter/ Sorter Mode- seetech ST-350 मशिन्सबाबत.**

**प्रस्ताव-** दक्षिणा पेटीतील नोटा मोजणीकामी सध्या Multy currency desktop bank note counter/sorter model-seetech 350 (3+1 Pockets) या तीन मशिनचा वापर करण्यात येत आहे. सदरच्या मशिन कोरस इंडीया लि. पुणे यांचेकडून दि. १६/५/२०१३ रोजी दोन व दि. २७/१/२०१४ रोजी एक प्रति नग रु. ८,००,०००/- याप्रमाणे घेण्यात आलेल्या आहेत. व त्यांचेकडून वार्षिक सर्व्हिसिंग A.M.C व्दारे करुन घेण्यात येत आहे.

सदर मशिनव्दारे नोटा मोजल्या जात आहेत महिन्यातून साधारणतः ८ ते १० काऊंटींग होत असतात. दक्षिणापेटया मध्ये निघणा-या नोटा मोठया प्रमाणात असतात, त्यामुळे सततच्या वापरामुळे त्यांचेवर ताण पडून त्यांचे स्पेअरपार्ट खराब होऊन त्या नादुरुस्तहोत आहेत. सदर मशिनचा होणारा वापर व वेळोवेळी होणारी त्यांची दुरुस्ती यामुळे दक्षिणापेटी नोटा मोजणीकामी व्यत्यय येत असून, उशीर होतो. मशिनमध्ये अचूक मोजणी होणे देखील आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने मे कोरस इंडिया लि. पुणे यांचे प्रतिनिधी श्री आनंद जगताप व त्यांच्या सहका-यांनी सध्या वापरात असलेल्या Multy Currency Desktop Banknote Counter/Sorter Model- Seetech ST-350 या तीनही मशिनची पाहणी करुन त्याचे स्पेअरपार्ट बदलून तीनही मशिनची पुनर्रबांधणी करावी लागेल, असे सांगितले. त्यानुसार त्यांनी दि. २१/४/२०१६ रोजी खालीलप्रमाणे बदलाव्या लागणा-या स्पेअरपार्टची यादी खर्चासह ई-मेलव्दारे दिलेली होती. त्याकामी स्पेअरपार्टची अंदाजे किंमत ४,१०,०००+ १४.५०% टॅक्स असे एकूण ४,६९,४५०/- इतका खर्च कळविलेला होता.

त्याकामी येणा-या खर्चासाठी दि. १४ जून, २०१६ रोजी झालेल्या मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन, दक्षिणा पेटयांमधील नोटा मोजणीकामी असलेल्या Multy currency desktop bank note counter/sorter model-seetech ST-350 मशिन्सचे प्रस्तावात नमुद केलेले स्पेअरपार्ट कोरस इंडिया लि. पुणे यांचेकडून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रु.४,५४,५६५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. परंतु तत्पुर्वी प्रस्तावित मशिन्स बायबॅक करता येतील का, त्यासाठी किती खर्च येईल याचाही सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

त्यास अनुसरुन मे.कोरस इंडिया लि.पुणे यांना जाक्रं.एसएसएस/लेखा/मनिऑर्डर /२३९६/ २०१६, दि. ११ ऑगस्ट, २०१६ रोजी पत्र देण्यात आले होते. त्यास अनुसरुन त्यांनी दि. २९/८/२०१६ चे पत्रान्व्दारे सदर मशिन्स बायबॅक केल्यास प्रति मशिन रु.५०,०००/-मात्र याप्रमाणे ते घेण्यास तयार आहेत. अगर मशिन्सचे सुचित केलेल स्पेअरपार्ट बदलल्यास त्याचे आर्युमान साधारणपणे ३ वर्षापर्यंत वाढु शकेल, असे त्यांनी कळविलेले आहे.

सदर कंपनीने बायबॅक साठीची किंमत कमी कळविलेली असल्याने तुर्त सदर मशिन बायबॅक न करता निर्णय क्रं. ३५९ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार पुर्नबांधणी करुन घेऊन त्यांचा वापर करता येईल असे मत आहे. तसेच नविन मशिन खरेदीबाबतचा स्वतंत्र प्रस्ताव अलाहीदा मा. व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे सादर करता येईल.

तरी दि.१४ जून, २०१६ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.३५९ अन्वये मान्यता देण्यात आलेल्या खर्चामध्ये सदर मशिन्सचे स्पेअरपार्ट बदलुन घेऊन, त्यांची पुर्नबांधणी करुन त्या वापरात आणाव्यात, याबाबतचे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.७९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दक्षिणा पेटयांमधील नोटा मोजणीकामीच्या प्रस्तावात नमुद केलेल्या नादुरुस्त मशिन्स स्पेअरपार्ट बदलून दुरुस्त करुन घेण्यात याव्या, असे ठरले. तसेच याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.४३** **श्री साईभक्तांच्या चोरीला जाणाऱ्या सामानाचा विमा उतरविणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी येथे श्री साईबाबांच्या दर्शनासाठी प्रत्येक दिवशी सरासरी ४० हजार साईभक्त येत असतात. या भक्तांना राहण्यासाठी संस्थानने साईआश्रम नं १, साईआश्रम नं २, व्दारावती, भक्तनिवासस्थान, साईप्रसादनिवासस्थान, वगैरे ठिकाणी निवासस्थाने उपलब्ध करुन दिलेली आहेत.

संस्थानच्या सर्व निवासस्थानावर भक्तांची मोठया प्रमाणात वर्दळ असते. या वर्दळीचा काही समाजकंटक गैरफायदा घेवून भक्तांचे सामान, दागिने व पैसे त्यांच्या खोलीमधून अगर परिसरामधून लुटण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चाललेले आहे. याच प्रमाणे श्री साईभक्त श्री बाबांच्या दर्शनासाठी दर्शन रांगेमध्ये उभे असताना तेथून तसेच व्दारकामाई व मंदिरपरीसर येथूनही भक्तांचे पाकिटमार व दागिने अथवा किंमती सामान चोरीला जाण्याच्या घटना वारंवार घडू लागल्या आहेत. भक्तांना पाकीटमार झाल्यावर पैसे अभावी अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. संस्थान त्यांना किमान परत घरी पोहचावे म्हणून परतीचा प्रवास व सोबत चहा नाष्टयासाठी काही पैसे असे मिळून मदत करत असते परंतू या सर्व घटनेमुळे श्री साईभक्तांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

संस्थानने असे प्रकार घडू नयेत म्हणून साध्या वेशामध्ये दक्षता पथक नेमले आहे. तसेच सुरक्षा कर्मचाऱ्यांनाही सक्त ताकिद देवून अशा अपराधी लोकांना पकडण्याचे आदेश दिले आहेत. परंतू असे अपराध वेगवेगळया मार्गाने घडतच असल्याने त्यावर उपाययोजना म्हणून भक्तांच्या चोरी गेलेल्या सामान, दागिने व पैसे यावर विमा उतरविणे योग्य राहील.

भक्तांचे चोरी गेलेले सामान, दागिने व पैसे यावर पुढीलप्रमाणे विमा उतरविण्याचे प्रयोजन आहे.

१) प्रत्येक दिवशी जास्तीत जास्त २५ साईभक्तांना त्यांचे चोरी गेलेले सामान, दागिने अगर पैसे यावर विमा संरक्षण मिळू शकेल.

२) चोरी गेलेल्या सामान, दागिने अथवा पैसेचे प्रत्येक भक्ताचे जास्तीत जास्त प्रति व्यक्ती रुपये २५,०००/- राहील.

३) भक्ताचे चोरी गेलेले सामान, दागिने अथवा पैसे याची प्रथम नोंद संस्थानच्या सुरक्षा कार्यालयात चोरी गेलेल्या किंमतीसह २४ तासाच्या आत होणे आवश्यक आहे.

४) संरक्षण कार्यालयाने भक्तांचे आलेली तक्रार रकमेसह नोंदवल्यानंतर त्यांना शिर्डी पोलीस स्टेशनमध्ये जावून रितसर तक्रार नोंदवणे आवश्यक आहे.

५) श्री साईभक्ताने त्याच्या चोरी गेलेल्या ऐवजाबाबतच्या किंमतीसह शिर्डी पोलीस स्टेशनमध्ये रितसर तक्रार नोंदवून ती संस्थानच्या सुरक्षा कार्यालयात आणून द्यावी

६) संस्थानच्या सुरक्षा कार्यालयाने विमा कंपनीचा फॉर्म सदर भक्ताकडून भरून घेवून त्यावर स्वाक्षऱ्या, पुर्ण पत्ता, मोबाईल नंबर व सोबत पोलिस स्टेशनची मुळ तक्रारीची प्रत जोडून संपुर्ण पुर्तता करुन घ्यावी.

७) भक्तास विमा कंपनीकडून त्यांची चोरीला गेलेल्या ऐवजाची प्रत्यक्ष रक्कम किंवा जास्तीत जास्त रुपये २५,०००/- पर्यंत यापैकी जी कमी असेल ती रक्कम देण्यात येईल. याबाबत भक्तांस स्पष्ट पुर्व कल्पना देवून त्यांना सदर रक्कम संस्थानच्या लेखाशाखेमार्फत देण्यात येईल असे सांगावे.

८) भक्तास परतीच्या प्रवासासाठी काही मदत आवश्यक असल्यास सध्याच्या नियमाप्रमाणे त्यांना ती त्वरीत सुरक्षा कार्यालयाने देण्यात यावी. देण्यात आलेली रक्कम मंजूर झालेल्या विमा रकमेतून वजा करून प्रत्येक आठवडयाला जमा झालेल्या विम्याचे फॉर्म लेखाशाखेकडे पाठविणेत यावेत.

९) लेखाशाखेने संरक्षण कार्यालयामधून आलेले विमा फॉर्म सर्व कागदपत्रांसह संस्थानच्या सही शिक्यानिशी संबंधीत विमा कंपनीकडे पाठवून ते मंजूर करुन घेण्याचा पाठपुरावा करावा.

१०) संबंधित विमा कंपनीकडे पाठविलेल्यारकमेतून भक्तास पुर्वी काही रक्कम संस्थानने आदा केली असेल तर ती रक्कम वजा करुन उर्वरीत रकमेचा चेक/ डी.डी/ आर.टी.जी.एस व्दारे त्यांना त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी याबाबत सदर भक्तांस त्यांनी दिलेल्या ई-मेल अथवा एसएमएस व्दारे अवगत करावे.

उपरोक्तप्रमाणे श्री साईभक्तास त्याच्या चोरी गेलेले सामान, दागिने अथवा रोख रक्कम याबाबत रुपये २५,०००/- पर्यंत संरक्षण दिल्यास सदर भक्ताचा मानसिक तनाव काही अंशी कमी होण्यास मदत होईल. राष्ट्रीयीकृत कंपनीकडून याबाबत बंद पाकिटामध्ये दरपत्रके मागविता येतील. त्यात त्यांना प्रत्येक दिवशी २५ साईभक्त व एका भक्तास जास्तात जास्त रुपये २५,०००/- तसेच एकूण वार्षिक विमा मर्यादा रुपये २ कोटी अशी ठेवून विमा पॉलिसी फक्त राष्ट्रीयीकृत कंपनीकडून घेण्याच्या कार्यवाहीसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी.

सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.७९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईभक्तांच्या चोरीला जाणाऱ्या सामानाचा विमा उतरविणेसाठी राष्ट्रीयीकृत विमा कंपनींच्या प्रतिनिधींना सभेसमोर चर्चेस बोलविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.४४** **उरी हल्ल्यातील सीमेवरील जवानांना आर्थिक मदत मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** भारत देश सध्या आतंकवादी हल्ल्यांचा सामना करीत आहे. उत्तर सीमा कायम धगधगतच असते, अशातच दि.१८/०९/२०१६ रोजी पहाटेच्या वेळी भारत पाक सीमेलगद असलेल्या ऊरी लष्करी तळावर आतंकवाद्यांनी अचानक हल्ला केला व त्यात १९ जवान हुतात्मे झाले. आज आपण देशात सुरक्षित आहोत याचे श्रेय सीमेवर लढणा-या जवानांना आहे. त्यांच्या त्यागाबद्दल कृतज्ञता म्हणून त्यांच्या कुटूंबीयांची जबाबदारी आपल्यावरच आहे. अशा भारतमातेच्या वीर सुपुत्रांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी यांचे मार्फत ५० लाख ते १ कोटी पर्यंत मदत करणेबाबत मा. विश्वस्त श्री मोहन जयकर यांनी कळविले आहे.

**<u>अर्थ साहाय्यसाठी अधिनियमातील तरतुद-</u>**

**१)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) **"मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतुद आहे.**

**वैयक्तीक आर्थिक मदत देणेबाबत अधिनियमात स्पष्ट तरतुद नाही.** तथापि मागील व्यवस्थापनाच्या काळात सन २००६ ते २००९ मध्ये खालील वैयक्तीक प्रस्तावांना शासन मान्यतेने अनुदान देण्यात आलेले आहे. १) कु. शितल महाजन , पुणे यांना पॅराशुट जम्पसाठी रु. १० लाख.

२) श्री आप्पासाहेब ढुस, राहूरी यांना स्काय ड्रायव्हिंग खेळाचे साहित्य खरेदीसाठी रु. ७.५लाख.

३) चि. शार्दूल व शाल्मली गागरे, राहूरी या भावंडाना बुद्धीबळ खेळाचे प्रशिक्षणासाठी रु ६ लाख.

उपरोक्त वैयक्तीक प्रस्तावांना अनुदान देणेबाबत"विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांनी कलम१७ (२) (ण) मधील तरतुदीअन्वये एक विशेष बाब म्हणून मान्यता दिलेली होती." शासनाचे मान्यतेनंतर संबंधीतांना आर्थिक मदत देण्यात आलेली आहे.

**<u>विभागाचा अभिप्राय</u>:-** तरी राष्ट्रीय हितासाठी, विशेषबाब म्हणून त्यांना अनुदान द्यावयाचे असल्यास मा. व्यवस्थापन समितीसमोर विषय ठेवता येईल, त्यानंतर छाननी समिती, विधी व न्याय विभाग यांची मान्यते उरी हल्ल्यातील सैनिकांच्या कुटूंबीयांना मदत देणेकामी पुढील कार्यवाही करता येईल

**निर्णय क्र.७९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जवानांसाठी सशस्त्र ध्वजदिन निधी अंतर्गत श्री साईबाबा संस्थानमार्फत प्रत्येक वर्षी निधी दिला जातो, यामुळे वेगळी आर्थिक मदत देणे उचित होणार नाही, असे समितीचे मत झाले. सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.४५** **सिंडीकेट बँक, शाखा शिर्डी येथे संस्थानचे बचत खाते उघडणे व त्यांचेकडून संस्थानला सेवा घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** सिंडिकेट बॅंकशाखा शिर्डी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे बचत खाते त्यांचे बॅंकेत उघडणे तसेच संस्थानचे आर्थिक व्यवहाराच्या अनुषंगाने इतर सर्व बॅंक संदर्भतील सेवा त्यांचे बॅंकेमार्फत सुरु करणेबाबत त्यांनी विनंती केलेली आहे.

त्यास अनुसरुन सदर बॅंकेस दि.२० ऑगस्ट २०१६ रोजीच्या पत्रान्वये संस्थानला आवश्यक असणा-या बॅंक विषयक सेवा विनामुल्या पुरविणेबाबत कळविले होते. त्यानुसार त्यांनी संस्थानला आवश्यक असणा-या सेवा विनामुल्यदेणेबाबत संमती दर्शविली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४ मधील कलम २० अन्वये संस्थानची रक्कम फक्त राष्ट्रीयकृत बॅंकेतच ठेवण्याचे बंधन आहे आणि सिंडिकेट बॅंक ही राष्ट्रीयकृत बॅंक आहे

सध्या संस्थानचे १६ राष्ट्रीयकृत बॅंका मिळुन एकुण ३० बचत खाते आहेत. या १६ राष्ट्रीयकृत बॅंका संस्थानला विना तक्रार सेवा पुरवित आहेत तसेच संस्थानच्या मुदत ठेवीच्या गुंतवणूकी करीता या राष्ट्रीयकृत बॅंकाकडून व्याज दर मागविले जातात. सिंडिकेट बॅंकेत संस्थानचे बचत खाते उघडल्यानंतर त्यांचेकडुनही व्याजदर प्राप्त होतील एकूणच व्याजदरासाठी स्पर्धा वाढेल व त्याचा संस्थानला निश्चितच फायदा होईल.

तरी सिंडिकेट बॅंक, शिर्डी शाखेत संस्थानच्या नावाने बचत खाते उघडणेस व त्यांचेकडून इतर बॅंकाप्रमाणे संस्थानला आर्थिक व्यवहाराच्या अनुषंगिक सर्व सेवा-सुविधा घेणेबाबतचे निर्णयार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.७९९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सिंडिकेट बॅंक, शिर्डी शाखेत संस्थानच्या नावाने बचत खाते उघडणेस व त्यांचेकडून इतर बॅंकाप्रमाणे संस्थानला आर्थिक व्यवहाराच्या अनुषंगिक सर्व सेवा-सुविधा घेणेस मान्यता देण्यात आली.**

**याचवेळी अशीही चर्चा करणेत आली की, संस्थानचे बचत खाते असलेल्या बॅंकेत संस्थानमार्फत मोठया रकमा ठेवल्या जातात. परंतु सदरहू बॅंका संस्थानला व्यवस्थित सहकार्य करत नाहीत, याकरीता यापुढे बॅंकांकडून व्याजदर घेण्यासाठी आयोजित करण्यात येत असलेल्या बैठकीस स्थानिक सदस्यांना आमंत्रित करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

विषय नं.४६ **मा.त्रीसदस्य समितीचे दि.०६.०५.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२८२ रद्द करुन, शिर्डी बसस्थानक भक्तनिवास येथे सोलर हॉट वॉटर यंत्रणा तसेच लिफ्ट यंत्रणा बसविणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेसाठी फेर प्रस्ताव सादर.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद :-** कलम 14(2) (घ) भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे किवा उपाययोजना हाती घेणे.

**प्रस्तावना:-** शिर्डी बसस्थानक भक्तनिवास येथे सोलर हॉट वॉटर यंत्रणा तसेच लिफ्ट यंत्रणा बसविणेकामी येणा-या अंदाजे रुपये 56,53,000/- मात्रचे खर्चास तसेच सयंत्र आस्थापित करणेसाठी ई-निविदा मागविणेस मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक 06/05/2016 रोजी सभेत सदरचा विषय सादर करण्यात आलेला होता. हा प्रस्ताव व त्यावर झालेला निर्णय पुढिलप्रमाणे-

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे माध्यमातून शिर्डी येथे अद्ययावत सेवा सुविधायुक्त असे बसस्थानक व त्यावरील भक्तनिवासाचे बांधकाम चालू असून सध्या हा प्रकल्प पुर्णत्वास येत आहे. या इमारतीमध्ये तीन मजले असून, संस्थानला स्वखर्चात बांधून वापरण्यात येणारे क्षेत्र पुढीलप्रमाणे आहे:

| अ.नं. | मजला | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| 1. | तळ | जोता क्षेत्रफळ 122 चौ.मी. ज्यामध्ये माहिती केद्र, इतर सुविधा व दुकान यांचा समावेश आहे |
| 2. | पहिला | साईभक्तांसाठी डॉमेटरी जोता क्षेत्रफळ 1216 चौरस मीटर |
| 3. | दुसरा | साईभक्तांसाठी डॉमेंटरी जोता क्षेत्रफळ 1216 चौरस मीटर |

वरीलप्रमाणे संसथानला वापरणेस मिळणारे एकूण क्षेत्रफळ 2,554 चौ. मीटर आहे. सदर इमारतीमध्ये पहिला व दुसरा मजला संस्थानला मिळणार असून, तिसरा मजला महामंडळास वाहक/चालक विश्रांतीगृह व अधिकारी विश्रांतीगृह यांच्यासाठी वापरण्यात येणार आहे.

संस्थानला मिळणा-या पहिल्या व दुसऱ्या मजल्यावरील खोल्यांची संख्या व त्यात साईभक्तांसाठी निवासव्यवस्था संख्या खालीलप्रमाणे आहे:

| अ.नं. | तपशील | पहिला मजला | दुसरा मजला | निवासव्यवस्था होणा-या साईभक्तांची एकूण संख्या |
|---|---|---|---|---|
| 1. | मोठे हॉल | 5 | 5 | |
| | निवासव्यवस्था होणा-या भक्तांची संख्या | 100 | 100 | 200 |
| 2. | लहान हॉल | 3 | 3 | |
| | निवासव्यवस्था होणा-या भक्तांची संख्या | 30 | 30 | 60 |
| 3. | सिंगल रुम | 6 | 6 | |
| | निवासव्यवस्था होणा-या भक्तांची संख्या | 30 | 30 | 60 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4. | डबल रुम | 1 | 1 | |
| | निवासव्यवस्था होणा-या भक्तांची संख्या | 10 | 10 | 20 |
| **एकूण साईभक्तांसाठी निवासाची व्यवस्था :** | | | | **340** |

उपरोक्तप्रमाणे पहिल्या व दुस-या मजला मिळून 10 मोठे हॉल, 6 लहान हॉल, 12 सिंगल रुम, 2 डबल रुम असून, सर्व रुम/ हॉल मिळून एकूण 340 साईभक्तांची राहण्याची सोय होणार आहे. या साईभक्तांना स्नानाकरीता गरम पाणी मिळावे याकरीता सोलर हॉट वॉटर सिस्टम यंत्रणा बसविणे आवश्यक आहे. तसेच या इमारतीमध्ये पहिल्या व दुस-या मजल्यावर साईभक्तांसाठी निवासाची व्यवस्था केलेली असल्यामुळे, साईभक्तांना तळमजल्यावरुन वरील मजल्यावर जाणेकरीता लिफ्टची सोय करणे आवश्यक आहे.

वरील दोन्ही प्रकल्पाकरीता संस्थानचे आर्किटेक्ट श्री काबरे चौधरी आर्किटेक, नाशिक यांनी तयार केलेल्या आराखडयानुसार खालीलप्रमाणे अंदजित खर्च येईल :

शिर्डी बसस्थानक भक्तनिवास येथील साईभक्तांना सोलर हॉट वॉटर व लिफ्टची सुविधा देणेसाठी येणा-या अपेक्षित खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :

| **अ.नं.** | **तपशील** | **अंदाजे किंमत रुपये** |
|---|---|---|
| 1. | Supply, Installation, Testing & Commissioning of Solar Water Heating Systems Capacity 14000 Ltrs. at Shirdi Bus Stand Bhaktaniwas | 26,53,000/- |
| 2. | Supply, Installation & Commissioning of 2 Nos. Automatic Electrically Operated Lift for Shirdi Bus Stand. | 30,00,000/- |
| | **Total :** | **56,53,000/-** |

उपरोक्तप्रमाणे शिर्डी बसस्थानक भक्तनिवास येथे 14,000 लिटर क्षमतेची सोलर वॉटर हिटींग सिस्टीम तसेच एक लिफ्ट 10 प्रवासी व एक लिफ्ट 8 प्रवासी वाहतुक क्षमता असलेली अशी एकूण दोन लिफ्ट बसविणेकामी अंदाजे रक्कम रुपये 56,33,000/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. याकामी येणा-या खर्चास मा. त्रिसदस्यीय समितीची तसेच सदर खर्च मेजर फायनान्सशिअल असलेने, त्यास संस्थान वकीलामार्फत मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे अर्ज दाखल करुन मान्यता घ्यावी लागणार आहे.

संस्थानचे सर्व भक्तनिवासस्थान येथे निवास करणा-या साईभक्तांना स्नानाकरीता गरम पाण्याची तसेच खालील मजल्यावरुन वरील मजल्यावर जाणे-येणेसाठी लिफ्टची सोय / सुविधा उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. त्याचप्रमाणे शिर्डी बसस्थानक भक्तनिवास येथील साईभक्तांनाकरीता गरम पाणी तसेच लिफ्टची सुविधा करणे आवश्यक आहे. तसेच शिर्डी येथील नियोजित बसस्थानक व भक्तनिवास इमारत संस्थान निधीतून विकसित करणे कामासाठी संस्थान व रा.प. महामंडळ यांचे दरम्यान करावयाच्या करारनाम्यातील मुददा क्र. 19 मध्ये "श्री साई संस्थान यांना टेरेसवर सौरउर्जा संयंत्राची उभारणी करणे शिर्डी नगरपंचायत यांनी दिलेल्या बांधकाम परवानगीमधील अट क्र. 20 नुसार बंधनकारक राहील" असे नमूद आहे.

उपरोक्तप्रमाणे शिर्डी बसस्थानक भक्तनिवास येथील साईभक्तांना सोलर हॉट वॉटर व लिफ्टची सुविधा उपलब्ध करुन देणेकामी येणा-या खर्चास व ई-निविदा मागविणेकामी वर्तमान पत्रात जाहीरता देऊन तसेच संस्थानच्या वेबसाईटवर जाहीरात अपलोड करुन ई निविदा मागविणेकरीता प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीची सभेपुढे सादर करणेत आलेला होता. त्यावर दिनांक 6.5.2016 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 282 अन्वये झालेला निर्णय खालीलप्रमाणे :

यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी बसस्थानक भक्तनिवास येथे सोलर हॉट वॉटर यंत्रणा तसेच लिफ्ट यंत्रणा बसविणेकामी विहीत पद्धतीने पुढिल कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रुपये 56,53,000/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आलेली आली.

तसेच याकामी येणा-या खर्चास संस्थान वकीलामार्फत अर्ज करण्यात येऊन मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घेणेत यावी व मा. खंडपीठाच्या आदेशानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावे असे ठरले.

उपरोक्त मा.त्रिसदस्यीय समितचे निर्णयानुसार संस्थान वकिलामार्फत मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे मान्यतेकरीता अर्ज दाखल करण्यात आला होता. परंतु विधी व न्याय विभाग महाराष्ट्र

शासन, मंत्रालय मुंबई – 400032 यांचे दिनांक 28 जुलै 2016 रोजीचे अधिसुचनेनुसार श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीचे गठण करणेत आलेले आहे. त्यानुसार दिनांक 31 जुलै 2016 रोजी नवनियुक्त समितीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार स्विकारलेला असून कामकाज सुरु केलेले असल्याने मेजर फायन्सशिअल खर्चास मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेणेची आवश्यकता नाही. त्यामुळे दिनांक 06/05/2016 रोजीचे मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेतील निर्णय क्र. 282 अन्वये झालेला निर्णय रद्द करणेस व शिर्डी बसस्थानक भक्तनिवास येथे सोलर हॉट वॉटर यंत्रणा तसेच लिफ्ट यंत्रणा बसविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये 56,53,000/- मात्रचे खर्चास मान्यतेकरीता फेर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी बसस्थानक भक्तनिवास येथे सोलर हॉट वॉटर यंत्रणा तसेच लिफ्ट यंत्रणा बसविणेकामी येणाऱ्या खर्चास मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेणेबाबत यापुर्वी झालेला निर्णय रद्द करणेत आला व शिर्डी बसस्थानक भक्तनिवास येथे सोलर हॉट वॉटर यंत्रणा तसेच लिफ्ट यंत्रणा बसविणेस नव्याने मान्यता देण्यात आली. परंतु याकामी येणारी अंदाजित रक्कम खुपच जास्त असल्याचे निदर्शनास येत आहे. याकरीता ई-निविदा प्रसिध्द करतेवेळेस या रकमेपेक्षा २०% रक्कम कमी दर्शविण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.४७** **मा.त्रीसदस्य समितीचे दि.१४.०६.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३५१ रद्द करुन, श्री साई प्रसादालयाचे किचनसाठी अद्ययावत मशिनरी खरेदी करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेसाठी फेर प्रस्ताव सादर.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतूद:** अधिनियम कलम 21(1) (घ)– भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

श्री साई प्रसादालयातील किचन व्यवस्था अद्ययावत करणेसाठी उपरोक्त नविन मशीनरी खरेदी करणेकामी करावयाच्या कार्यवाहीबाबत व त्याकामी येणा-या अंदाजे रुपये 2,68,00,000/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत आला होता. हा प्रस्ताव व त्यावर झालेला निर्णय पुढिलप्रमाणे :

श्री साईं चे दर्शनासाठी येणारे भक्तांना प्रसाद भोजनाची व्यवस्था चांगल्या प्रकारे व्हावी, यासाठी श्री साईबाबा संस्थानने जानेवारी 2009 मध्ये श्री साई प्रसादालयाचे नविन इमारतीची उभारणी केली आहे. या ठिकाणी एकाच वेळेस सुमारे 4,000 साईभक्तांना प्रसाद भोजन घेण्याची क्षमता असलेली आसन व्यवस्था, अद्ययावत किचन, ऑनलाईन चक्की युनिट, उप-भांडार कार्यान्वित करण्यात आलेले आहे. श्री साईबाबा संस्थानने प्रसाद भोजन तयार करणेसाठी जी मशीनरीची उभारणी केलेली आहे, त्यापेक्षा अद्ययावत दर्जाची मशीनरी श्री गजानन महाराज संस्थान, शेगाव यांनी नव्याने उभारणी केलेल्या त्यांचे किचनमध्ये केलेली आहे. अशी माहिती मिळाल्याने, श्री गजानन महाराज संस्थान, शेगांवचे प्रसादालय, तेथे नव्याने उभारणी केलेल्या किचनमध्ये कार्यान्वित असलेल्या अद्ययावत मशीनरींची व तदसंबंधीत कार्यपध्दतीची समक्ष जावुन माहिती घेऊन, तेथील सुधारित यंत्रणेचा श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय किचनमध्ये उपयोग करुन घेता येईल किंवा कसे? याबाबत मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांचे समवेत मा. उप-कार्यकारी अधिकारी व सबंधीत अधिकारी यांची संयुक्तिकरित्याचर्चा झाली व या चर्चेत ठरलेप्रमाणे दिनांक 20/02/2016 रोजी संस्थानचे उप-कार्यकारी अधिकारी श्री आप्पासाहेब शिंदे साहेब, प्रसादालय विभागाचे प्रशासकीय अधिकारी, श्री उत्तमराव गोंदकर, मेकॅनिकल विभागाचे प्रमुख श्री अतुल वाघ तसेच आय.टी.आय. निदेशक श्री प्रशांत सोनवणे यांनी सुयुक्त विद्यमान श्री गजानन महाराज संस्थान शेगाव येथे जाऊन, त्यांनी उभारणी केलेल्या नविन प्रसादालय किचनची समक्ष पहाणी केलेली आहे.

शिर्डी येथे परत आल्यानंतर मा.उप-कार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, (प्रसादालय विभाग), प्रसादायल अधिक्षक, मेकॅनिकल विभाग प्रमुख व सबंधीत कर्मचारी यांनी संयुक्तिकरित्यदिनांक 23/02/2016 रोजी संस्थानचे प्रसादालय विभागाची पहाणी केली, त्यानुसार दोन्ही ठिकाणच्या मशीनरींचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| अ.नं. | मशीनचा तपशील | श्री साईबाबा संस्थान, शिर्डी | | श्री गजानन महाराज संस्थान, शेगांव | |
|---|---|---|---|---|---|
| | | क्षमता | संख्या | क्षमता | संख्या |
| 1. | आटा मळणी मशीन (नाष्टा पाकीटासह) | 80 किलो | 5 | 100 किलो | 3 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2. | चपाती मशीन | तासी 3000 चपाती | 1 | तासी 40,000 चपाती | 1 |
| | चपाती मशीन | -- | -- | तासी 10,000 चपाती | 3 |
| 3 | राईस वॉशर मशीन | 100 किलो 10 मिनीटांत | 1 | 80 किलो 10 मिनिटात | 1 |
| 4 | स्टीम कुकर – भाताकरीता | 50 किलो | 8 | 100 किलो | 4 |
| | स्टीम कुकर – दाळीकरीता | -- | -- | 300 किलो | 1 |
| | स्टीम कुकर – उसळकरीता | -- | -- | 200 किलो | 1 |
| | स्टीम कुकर – फळभाजीकरीता | -- | -- | 400 किलो | 1 |
| 5 | थर्मिक फ्ल्युड | 2,00,000 किलो कॅलरी | 1 | 6,00,000 किलो कॅलरी | 1 |
| 6 | व्हेज वाशर (भाज्या धुणे) | 100 किलो 10 मिनिटांत | 1 | 100 किलो 10 मिनिटात | 1 |
| 7 | पोटॅटो पिलर (बटाटा साल काढणे) | 30 किलो 3 मिनिटांत | 1 | 20 किलो 5 मिनिटात | 1 |
| 8 | बुंदी/लाडू पॅकींग मशीन | तासी 2400 पाकीटे | 3 | तासी 1800 ते 2000 पाकिटे | 3 |
| 9 | कोल्ड स्टोअरेज | 2.5 टन | 1 | 3 टन | 1 |
| 10. | स्टीम बॉयलर | तासी 850 किलो | 1 | 1500 किलो | 2 |
| | स्टीम बॉयलर | तासी 450 किलो | 1 | -- | -- |
| 11. | ऑन लाईन चक्की युनिट | तासी 250 किलो | 1 | 400 किलो तासी | 1 |
| 12. | राईस डिस्टोनर मशीन | -- | -- | तासी 1000 किलो | 1 |
| 13. | मसाला ग्राईडर (पल्वरायझर) | तासी 200 किलो | 2 | 200 किलो तासी | 1 |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा संस्थान, शिर्डी व गजानन महाराज संस्थान, शेगांव यांच्यातील मशीनरींचा तुलनात्मक तपशील असून, यातील चांगल्या क्षमतेच्या काही मशीनरी गजानन महाराज संस्थान, शेगाव यांचेकडे आहेत.

श्री गजानन महाराज संस्थान, शेगांवचे किचनप्रमाणे श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय क्षमता वाढविणेसाठी खालीलप्रमाणे बदल करणे आवश्यक आहे :

**(अ) नविन मशीनरी खरेदी करणे**

1. **चपाती मशीन खरेदी –** श्री साईबाबा संस्थानकडे साईभकतांना चपाती उपलब्ध करुन देणेकरीता तासी 3000 चपाती क्षमतेचे एक चपाती मशीन कार्यान्वित आहे. तसेच सकाळी 7 ते 9.30 या दरम्यान नाष्टा पाकीटात देणेकरीता पुरी तयार करणेत येते तसेच प्रसादालयात भक्तांचे प्रसाद भोजनाकरीता पुरी व मॅन्युअली (हाताने) चपाती बनविण्यात येते. मॅनयुअली चपाती व पुरी बनविणेसाठी गॅस भट्टीचा वापर करणेत येतो. गॅस भट्टीव्दारे पुरी तळणेसाठी तेल खर्च अधिक होतो. तसेच गॅसचाही मोठ्या प्रमाणात वापर होतो. या सर्व खर्चात बचत होणेसाठी तासी 10,000 क्षमतेचे चार चपाती मशीन खरेदी करणे आवश्यक आहे. मशीनव्दारे पुरेसे प्रमाणात चपाती उपलब्ध झाल्यास पु-या तयार करण्याची गरज भासणार नाही. परिणामी त्यामुळे भक्तांचे पुरीबाबत येणारी तक्रारही थांबेल

2. **स्टीम कुकर्स खरेदी करणे –** सध्या कडधान्य व फळभाजी शिजविणेसाठी मोठ्या पातेल्यांचा वापर करणेत येत आहे. त्याऐवजी डाळ, कडधान्य व फळभाजी शिजविणेकामी प्रत्येकी 300 किलो क्षमतेची स्टीम कुकर्स खरेदी केल्यास गॅस खर्चात बचत होईल.

3. **थर्मिक फ्ल्युड यंत्रणा वाढविणे –** सध्या संस्थानकडे 200000 Kg. cal/hr क्षमतेची थर्मिक फ्ल्युड यंत्रणेचा बुंदी किचनमध्येबुंदी तळणेसाठी वापर होत आहे तुप व गॅस खर्चात बचत होणेसाठी 6,00,000 Kg. cal/hr क्षमतेची नविन यंत्रणा खरेदी करणे आवश्यक आहे.

4. **ऑनलाईन चक्की युनिट खरेदी करणे –** संस्थानकडे सध्या तासी 250 किलो क्षमतेचे ऑनलाईन चक्की युनिट असून ते सन 2008 मध्ये खरेदी केलेले आहे. मात्र सदरच्या युनिटला सन 2000 पुर्वी खरेदी

केलेल्या गिरणी बसविण्यात आलेल्या आहेत. सततचे वापराने त्याचे मेन्टेनंन्स खर्चात वाढ होत आहे. त्यामुळे सदरचे युनिट बदलून त्याठिकाणी वाढीव क्षमतेचे अत्याधुनिक चक्की युनिटची उभारणी करणे आवश्यक आहे.

5. **मसाला ग्राईडर खरेदी करणे–** सध्याचे मशीन सन 2003 साली खरेदी केलेले असून, ते एम.एस. मटेरिअलमध्ये आहे. त्याऐवजी नविन टेक्नॉलॉजीयुक्त स्टेनलेस स्टीलमध्ये मशीन खरेदी करणे आवश्यक आहे.

6. **भाजीपाला कटींग मशीन खरेदी करणे-** सध्या वापरात असलेले मशीन सन 2010 साली खरेदी केलले असून एकच मशिन असल्याने सततचे वापराने त्याचा मेन्टेनंन्स वाढलेला आहे. सदरचे मशीनऐवजी नविन दोन भाजी कटींग मशीन खरेदी करणे आवश्यक आहे.

7. **डिश वॉशर मशीन दुरुस्ती करणे–** सध्या प्रसादालयात तासी 2200 क्षमतेचे जर्मनी मेड हॉबर्ट कंपनीचे दोन मशील 8 जानेवारी 2009 पासून अविरत कार्यान्वित आहेत. सदरच्या मशिनकरीता स्टीम पुरवावी लागते. त्यामुळे काही स्पेअरपार्ट खराब झालेले असून सदरचे स्पेअरपार्ट नविन टाकून मशिन्स दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच डिश वॉशर मशिनमधून धुतलेली डिश पुर्णपणे ड्राय होत नसून मशिनला स्वतंत्र ड्रायर यंत्रणा बसविणे आवश्यक आहे जेणेकरुन भक्तांना प्रसाद भोजन देतांना ताट ओले राहणार नाही. तसेच मुख्य प्रसादालयाप्रमाणे साई आश्रम भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवास व साईनाथ रुग्णालय या ठिकाणी साईभक्तांची प्रसाद भोजनाची व्यवस्था केलेली आहे. त्याठिकाणी मॅन्युअली (हाताने) ताटे धुतली जात असल्याने, सदर ठिकाणी ताटे धुणेकरीता 700 ते 800 डिश प्रती तास क्षमतेचे प्रत्येकी 1 याप्रमाणे 3 डिश वॉशर मशीन खरेदी करणे आवश्यक आहे.

8. **किचनमधील व लाडू किचनमधील एक्झॉस्ट यंत्रणा बदलणे–** श्री साई प्रसादालयाततील किचनमधील एक्झॉस्ट यंत्रणा 8 जानेवारी 2009 पासून कार्यान्वित करण्यात आलेली आहे. त्याची कार्यक्षमता कमी झालेली असल्याने, ती यंत्रणा वारंवार बंद पडत आहे तसेच ड्क्ट ठिकठिकाणी चिरलेमुळे त्याचे व्हायब्रेशनचा आवाज जास्त येत आहे. यासाठी ती बायबॅक करुन नविन अद्ययावत यंत्रणा खरेदी करणे आवश्यक आहे.

9. **स्टीम बॉयलर नविन खरेदी करणे –** सध्या साई प्रसादालयाकडे 850 kg/hr व 450/hr क्षमतेचे दोन बॉयलर वापरात आहेत. डाळ, कडधान्य व फळभाजी कुकर्स खरेदी केलेस सध्याची बॉयलर क्षमता अपुरी पडेल, त्यामुळे 450 kg/hr क्षमतेचा स्टीम बॉयलर बायबॅक देवुन त्याऐवजी नविन 1000 kg/hr क्षमतेचा नविन बॉयलर खरेदी करणे आवश्यक आहे.

10. **राईस डिस्टोनर मशीन खरेदी करणे –** सध्या साई प्रसादालयाकडे तांदुळ मॅन्युअली निवडला जातो. सदरचे काम कमी मनुष्यबळात व जलदगतीने होणेकरीता किमान तासी 1000 kg क्षमतेचे राईस डिस्टोनर मशीन खरेदी करणे आवश्यक आहे.

**(ब) नाष्टा पाकिटे किचन हलविणे–** सध्या नाष्टा पाकीटे किचन प्रसादालय इमारतीमधील किचनचे तळमजल्यावरील वायव्य कोप-यात आहे. चपाती मशीन खरेदी केल्यास सदरचे किचन सध्याचे चपाती / पुरी किचनमध्ये पहिल्या माळयावर स्थलांतरीत करता येईल. तसेच पाकीटे पॅक करणेसाठी आय.टी. विभागाचे शेजारील हॉलमधील रिकाम्या हॉलमध्ये अर्ध्या जागेचा वापर करता येईल.

(क) **किचनमध्ये अंतर्गत बदल करणे –** तळमजल्यावरील किचनमध्ये नाष्टा पाकीट विभाग स्थलांतरीत केलेनंतर सदरची जागा रिकामी होईल, त्यामुळे सध्याचे किचन अंतर्गत रचनेत बदल करावा लागेल व त्या प्रमाणे नविन एक्झॉस्ट सिस्टीम डक्टीग करावी लागेल.

(ड) **इतर आवश्यक सुधारणा करणे -** सध्या मुख्य प्रसादालयाप्रमाणेच प्रसादालयाबाहेर साईआश्रम भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवास (500 रुम), साईनाथ रुग्णालय हया ठिकाणी साईभक्तांचे प्रसाद भोजनाची व्यवस्था केलेली आहे. त्यासाठी मुख्य किचनमध्ये प्रसाद भोजन बनवून संस्थान वाहनातून वरील सर्व ठिकाणी पोहच करण्यात येत आहेत. सदर प्रसाद भोजन वाहतुकीकरीता सध्या भाजी दाळ करीता कॅन, भाताकरीता व चपाती/पुरीकरीता क्रेटर्स वापरणेत येत आहे. त्याऐवजी प्रसाद भोजन वाहतुकीकरीता शेगांव संस्थानप्रमाणे बंदीस्त वाहनांचा वापर करता येईल तसेच भाजी दाळ, भात वाहतुकीकरीता गोल आकाराचे कडया असलेले योग्य त्या साईजचे एस.एस. भांडे तयार करुन घेता येईल.

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालयातील मशीनरी अद्ययावत करणेसाठी सदरची मशीनरी खरेदीसाठी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षित आहे :

| अ.नं. | खरेदी करावयाच्या मशीनरींचा तपशील | क्षमता | खरेदी करावयाचे नग | प्रत्येकी अंदाजे दर (रुपये) | अपेक्षित अंदाजे रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| 1. | चपाती मशीन | तासी 10,000 चपाती | 4 | 25,00,000/- | 1,00,00,000/- |
| 2. | स्टीम कुकर्स (दाळ, कडधान्ये आणि फळभाजीकरीता) | 300 किलो | 3 | 3,00,000/- | 9,00,000/- |
| 3. | थर्मिक फ्ल्युड यंत्रणा | 600000 किलो कॅलरी | 1 | 40,00,000/- | 40,00,000/- |
| 4. | ऑनलाईन चक्की युनिट | तासी 400 किलो | 1 | 20,00,000/- | 20,00,000/- |
| 5. | मसाला ग्राईंडर– स्टेनलेस स्टीलचे | तासी 200 किलो | 1 | 2,00,000/- | 2,00,000/- |
| 6. | भाजीपाला कटींग मशीन खरेदी | तासी 800 किलो | 2 | 1,50,000/- | 3,00,000/- |
| 7. | ग्लास वॉशर मशीन | तासी 2000 ग्लास | 1 | 10,00,000/- | 10,00,000/- |
| 8. | डिश वॉशर मशीन (साईआश्रम, साईबाबा भक्तनिवासस्थान, 200 रुम्स येथील प्रसाद भोजनकक्षाकरीता) | तासी 700 डिश | 3 | 18,00,000/- | 54,00,000/- |
| 9. | स्टीम बॉयलर | तासी 1000 किलो | 1 | 25,00,000/- | 25,00,000/- |
| 10. | राईस डिस्टोनर मशीन | तासी 1000 किलो | 1 | 2,00,000/- | 2,00,000/- |
| 11. | मटेरिअल हॅन्डलींग हॅन्ड ऑपरेटर ट्रॉली | 2500 किलो | 6 | 50,000/- | 3,00,000/- |
| | | | | **एकूण खर्च रुपये :** | **2,68,00,000/-** |

(नवीन वायुविजन यंत्रणा बसविणेकामी स्वतंत्र प्रस्ताव सादर करणेत येईल.)

वरीलप्रमाणे साई प्रसादालयातील किचन मशीनरी अद्ययावत करणेकामी अंदाजे रुपये 2,68,00,000/- (अक्षरी रुपये दोन कोटी, अडुसष्ट लक्ष) मात्रचा खर्च अपेक्षित असलेने सदरच्या खर्चास मान्यतेकरीता प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सादर करणेत आलेला होता. यावर दिनांक 14.6.2016 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं. 351 अन्वये खालील निर्णय झालेला आहे. "सदरहू विषयावर चर्चा सुरु असतांना दरम्यानचे कालावधीमध्ये दानशूर साईभक्त संस्थानला ०२ नग चपाती मशिन देणगी दाखल देणेस इच्छुक असलेची माहीती कार्यकारी अधिकारी यांनी सभेस दिली. यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गजानन महाराज संस्थान, शेगाव यांचेप्रमाणे संस्थानचे प्रसादालय किचनसाठी प्रस्तावात नमुद केलेल्या तक्तामधील 02 नग चपाती मशिन वगळून उर्वरीत सर्व अद्यायावत मशिनरी विहीत पद्धतीने ई निविदा मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रक्कम रु. 2,18,00,000/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली. तसेच याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाच्या आदेशानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी, असे ठरले"

उपरोक्त निर्णयानुसार मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठात सिव्हिल अर्ज दाखल करणेकरीता अर्जाचा मसुदा तयार करणेकामी विधी विभागामार्फत जा. क्रं. एसएसएस/वशि/विधी/1990/2016 दिनांक 22.7.2016 अन्वये मा. ॲड. श्री चौकीदार साहेब यांना कळविणेत आले होते. त्यानुसार मसुदा तयार करणेची कार्यवाही चालु केली.

**मागणी–** विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई- 400032 यांचे दिनांक 28 जुलै 2016 रोजीचे अधिसुचनेनुसार श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीचे गठण करणेत आलेले आहे. त्यानुसार दिनांक 31 जुलै 2016 रोजी नवनियुक्त समितीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार स्विकारलेला असून कामकाज सुरु केलेले असल्यामे मेजर फायनसशिअल खर्चास मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेणेची आवश्यकता नाही. त्यामुळे दिनांक 14/07/2016 रोजीचे मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेतील निर्णय क्र. 351 अन्वये झालेला निर्णय रद्द करुन, श्री साई प्रसादालयातील किचन व्यवस्था अदययावत करणेसाठी उपरोक्त प्रस्तावात नमूद असलेल्या चपाती मशीनपैकी देणगी मिळणा-या दोन नग चपाती मशीन वगळून, उर्वरित मशीनरी विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये 2,18,00,000/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी फेर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयाचे किचनसाठी अद्ययावत मशिनरी खरेदी करणेसाठी येणाऱ्या खर्चास मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेणेबाबत यापुर्वी झालेला निर्णय रद्द करणेत आला व श्री साई प्रसादालयाचे किचनसाठी चपाती मशिन वगळता इतर अद्ययावत मशिनरी खरेदी करणेस तत्वत: मान्यता देण्यात आली. परंतु याकामी श्री क्षेत्र शेगाव येथील प्रसादालयाच्या किचनमधील मशिनरी व त्यांची किंमत यांची लेखी स्वरुपात माहिती घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.४८** **चपाती मशिन टेक्नीशियनची निवासव्यवस्था विनामुल्य होणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्त श्री शैलेश पटेल, बंगलोर यांनी दिनांक१०.१०.२०१६ रोजी श्री साईप्रसादालयात साईभक्तांना प्रसाद भोजनात चपाती मिळणेकामी तासी २० हजार क्षमतेचे (सेहगल एक्सपोर्ट, पटीयाला, पंजाब या कंपनीचे) चपाती मशिन देणगी स्वरुपात दिलेले आहे. श्री साईप्रसादालयात सदरचे मशिन कार्यान्वित केलेनंतर मनुष्य बळाद्वारे तयार करणेत येणा-या पुरी बंद करणेत आलेली आहे सदर मशिन ऑपरेटींग तसेच मेंटनंन्स करणेकरीता संस्थान कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. याकरीता एक टेक्नीशियन यांना तीन महिनेकरीता शिर्डी येथे थांबविणेबाबत कंपनीचे मालक श्री सेहगल यांना विनंती केली असता त्यांनी एक टेक्नीशियन तीन महिने कालावधीकरीता शिर्डी येथे ठेवणेस सहमती दर्शविली आहे. मात्र सदर टेक्नीशियनची निवास व भोजनाची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करणेस विनंती केलेली आहे

श्री सहगल यांचे विनंती नुसार सदर टेक्नीशियन करता श्री साईप्रसाद निवासस्थान येथे एक साधी रुम व श्री साईप्रसादालयात दोन्ही वेळेचे जेवनाची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करता येईल. सदरचा कालावधी जास्त असलेने याकामी मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी श्री साईप्रसादालयातील चपाती मशिनच्या टेक्नीशियन करीता तीन महिनेकरीता (दिनांक १३.१०.२०१६ ते १२.०१.२०१७) तसेच भविष्यात मशिन दुरुस्तीकरीता टेक्नीशियन जेव्हा जेव्ही शिर्डी येथे येतील त्यावेळी एक साधी रुम व श्री साईप्रसादालयात जेवनाची व्यवस्था विनामुल्य होणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर

**निर्णय क्र.८०२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयामध्ये देणगी स्वरुपात मिळालेल्या चपाती मशिनचे टेक्नीशियन सदरहू मशिनच्या देखभाल व दुरुस्तीकरीता ज्या-ज्या वेळी शिर्डी येथे येतील त्या-त्या वेळेस त्यांची निवास (एक साधी खोली) व भोजन व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.४९** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या ठिकाणी फुलांची सजावट करणेबाबत.**

**निर्णय क्र.८०३** उपरोक्त विषयाची तातडी विचारात घेता, दरम्यानचे कालावधीमध्ये स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी घेण्यात आलेला होता. त्यामुळे सदरहू विषय रद्द करणेत आला. (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.५०** **पाच प्रवासी बसेसचा टॅक्स भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** वाहन विभागाकडील प्रवासी बस क्र. एमएच-१७-एजी-९७४७, एजी-९७४८, एजी-९७४९, एजी-९७५० व एजी-९७५१ या पाच बसेसचा वापर साईआश्रम व भक्तनिवासस्थान येथे निवास करणा-या साईभक्तांना मंदीर परिसर व प्रसादालय येथे घेवुन जाणे व घेवुन येणे कामी होत आहे सदर पाच बसेसच्या टॅक्सची मुदत दि.३१/१२/२०१७ रोजी संपुष्टात येत असलेने उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर यांनीएटी फॉर्मवरपुढील सहा महिन्याचा म्हणजे दि.०१/०१/२०१७ ते दि.३०/०६/२०१७ अखेर या कालावधी करीता खालील तपशिला प्रमाणे रक्कम भरणेचे कळविले आहे.

| अ.नं. | बस क्रमांक | वाहन प्रकार | आसन क्षमता | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| ०१ | एमएच-१७-एजी-९७४७ | प्रवासी बस | ३१+१+१ सिटर | १७,०५०.०० |
| ०२ | एमएच-१७-एजी-९७४८ | प्रवासी बस | ३१+१+१ सिटर | १७,०५०.०० |
| ०३ | एमएच-१७-एजी-९७४९ | प्रवासी बस | ३१+१+१ सिटर | १७,०५०.०० |
| ०४ | एमएच-१७-एजी-९७५० | प्रवासी बस | ३१+१+१ सिटर | १७,०५०.०० |
| ०५ | एमएच-१७-एजी-९७५१ | प्रवासी बस | ३१+१+१ सिटर | १७,०५०.०० |
| | | | **एकुण रक्कम(रु.)** | **८५,२५०.००** |

उपरोक्त प्रमाणे पाचप्रवासीबसेस वाहनांचा आर.टी.ओ. कार्यालयात वार्षिक टॅक्स भरणे कामी रु.८५,२५०/- (अक्षरी रक्कम रु. पंच्याऐंशी हजार दोनशे पन्नास) मात्र खर्च येणार आहे. सदर खर्च मोटारकार कर व भाडे या अंदाजपत्रकातुन करता येईल. सदर टॅक्सची रक्कम आर.टी.ओ. कार्यालयात उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, श्रीरामपुर यांचे नांवे अॅडव्हान्स डी.डी. द्वारेआदा करावी लागणार आहे.

तरी प्रवासी बस क्र. एमएच-१७-एजी-९७४७, एजी-९७४८, एजी-९७४९, एजी-९७५० व एजी-९७५१ या पाच बसेसचा सहा महिन्याचा (दि.०१/०१/२०१७ ते दि.३०/०६/२०१७ अखेर) टॅक्सची रक्कम रु.८५,२५०/- (अक्षरी रक्कम रु. पंच्याऐंशी हजार दोनशे पन्नास) मात्र उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर येथे भरणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या पाच बसेसचा सहा महिने कालावधीमधील (दि.०१/०१/२०१७ ते दि.३०/०६/२०१७ अखेर) टॅक्सची रु.८५,२५०/- मात्र रक्कम उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर येथे भरणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**विषय नं.५१** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागात न होणाऱ्या तपासण्या Outsourcing पध्दतीने करणेकामी कोटेशन मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा या विभागात दैनंदिन रुग्णांच्या विविध प्रकारच्या रक्त व लघवीच्या तपासण्या केल्या जातात. परंतु, सर्वच्या– सर्व तपासण्या दोन्ही रुग्णालयातील लॅबमध्ये काही तांत्रिक कारणास्तव होऊ शकत नाहीत किंवा कोणत्याही एका लॅबमध्ये त्या होत नाहीत, त्यामुळे त्या बाहेरील लॅबमध्ये कराव्या लागतात. अशा तपासण्याचा खर्च जास्त असून त्याची क्वचित प्रमाणातच मागणी असते. त्यामुळे अशा तपासण्या रुग्णालयात आर्थिक व तांत्रिकदृष्ट्या करणे शक्य नसते. त्यामुळे अशा तपासण्या Outsource पध्दतीने करणे आवश्यक आहे.

सध्या बाहेरील लॅबमध्ये करण्यात येणा-या तपासण्यामध्ये Quality Report तसेच दरामध्ये सवलत मिळणेकामी रुग्णालयाच्या जवळपास असणा-या Certified/ Accreditated प्राप्त लॅब धारकाचे दरांचे तसेच त्यांचे लॅबची सर्व माहिती मागवून प्राप्त दर व माहितीनुसार त्या लॅबची निवड करुन त्यांचे कडून रुग्णांच्या तपासण्या करण्यात येतील, त्यामुळे रुग्णांची होणारी गैरसोय टाळता येऊन त्यांना दरामध्ये सुध्दा सवलत मिळेल. सदर बाबींचा विचार करता आपण कायम कर्मचा-यांना वैद्यकीय बील परतावा देत असल्याने त्याकामी संस्थानचा फायदा होणार आहे, तसेच ससून हॉस्पिटल पुणे यांचेशी संपर्क साधून त्याबाबत माहिती घेतली असता त्यांचेकडेही ज्या Test त्यांच्या हॉस्पिटलमध्ये होत नाही. त्याची जाहिरातीव्दारे कोटेशन मागवून निम्नतम दर धारकास कार्यादेश देण्यात आलेले आहे.

त्यामुळे दोन्ही रुग्णालयांमध्ये न होणा-या तपासण्याकामी Outsourcing पध्दतीने NABL मान्यता प्राप्त लॅबधारकांचे दर व त्यांची सर्व माहिती मागविण्याचा प्रस्ताव दि.१६/०२/२०१६ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता, त्यावर निर्णय क्र.१८० अन्वये विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबवून दर मागविणेस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार उपरोक्तकामी वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आलेली असून संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात व निविदा देण्यात आलेली आहे, तसेच निविदा विक्रीची मुदत दि.१०/०९/२०१६ ते २३/०९/२०१६ पर्यंत ठेवण्यात येऊन निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि०३/१०/२०१६ अखेर ठेवण्यात आलेली आहे. सदरचे कामी दि.१०/०९/२०१६ पर्यंत वर्तमान पत्रात जाहिरात येण्यास पाहिजे होती, परंतु वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द झालेली नाही, त्यामुळे सदरकामी दि.१३/०९/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि.२३/०९/२०१६ पासुन पुढे दि.३०/०९/२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तथापि ब-याचशा निविदाधारकांनी Online ई-निविदा भरताना BOQ मध्ये दर भरल्यानंतर एकुण रक्कमेमध्ये बदल होत आहे, त्यामुळे निविदा भरताना अडचणी येत आहेत, असे दुरध्वनीवरुन कळविलेले आहे. तसेच श्री.एस. व्ही. गमे, प्रशासकीय अधिकारी यांची Digital Signature खराब झालेली आहे असे हॉस्पिटलचे ई.डी.पी.विभागामार्फत सांगण्यात आलेले आहे. त्यामुळे सदरचे खरेदीकामी काढण्यात आलेली ई-निविदा रद्द करुन कोटेशन मागवून तपासण्याचे दर निश्चित करावे लागणार आहे.

तरी श्री साईबाबा व श्री साईनाथ या दोन्ही रुग्णालयांमध्ये न होणा-या तपासण्याकामी Outsourcing पध्दतीने NABL मान्यता प्राप्त लॅबधारकांचे दर व त्यांची सर्व माहिती मागविणेकामी कोटेशन मागविण्याचे प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८०५** **यावर सविस्तर चचा्र होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ या दोन्ही रुग्णालयांमध्ये न होणाऱ्या तपासण्या Outsourcing पध्दतीने करुन घेणेकामी NABL मान्यता प्राप्त लॅबधारकांची सर्व माहिती घेऊन, विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५२** **डॉ.मयुर म्हात्रे, न्युरो सर्जन यांचेबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ.मयुर म्हात्रे, न्युरो सर्जन सध्या श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये मोफत सेवा देण्यासाठी Alternate रविवारी येत आहे. यापुर्वी ते पुर्णवेळ न्यूो सर्जन होते, त्यांनी पुर्णवेळ पदाचा राजीनामा दिलेला होता. दि.१९.०९.२०१६ रोजीच्या सकाळ या वृत्तपत्रात "मोफत सेवा देणा-या डॉक्टरांना मनस्ताप, शिर्डी संस्थान रुग्णालय प्रशासनाचे दुर्लक्ष सुविधा नसलेल्या खोलीत तपासणी'' या शिर्षकाखाली बातमी प्रसिदध झालेली आहे. सोबत बातमीचे कात्रण परिशिष्ट **'(A)'** म्हणुन जोडलेले आहेत.

सदर बातमीचे अवलोकन केले असता व दि.१८/०९/२०१६ रोजी ऑनडयुटी असलेले अपघात विभागातील डॉ.सचिन बगाडे, डॉ. कुणाल दळे तसेच अधिसेविका कार्यालयातील मॉर्निग सुपर श्रीमती लिलि जॉह्नन्स, (सिस्टर इनचार्ज) यांनी सदर दिवशीच्या घटनेबाबतचा लेखी स्वरुपात अहवाल सादर केलेले असुन त्यावरुन सदर प्रकरणाबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे दिसुन येते.

अपघात विभागातील डॉ.सचिन बगाडे व डॉ.कुणाल दळे यांचे दि.२६/०९/२०१६ रोजीच्या अहवालात म्हंटले आहे कि "रविवार दि.१८/०९/२०१६ रोजी सकाळी अंदाजे १०.३० वा.डॉ.म्हात्रे अपघात विभागात आले व त्यांनी ब्रदर्सना व डॉकटरांना अपघात विभागाची डॉक्टर्स रुम उघडुन दया, असे सांगितले, त्यानंतर थोडया वेळाने श्री कुलकर्णी नामक इसम आमच्याकडे मोबाईल घेऊन आले व आम्हाला भोसले साहेबांचा फोन आहे. तुम्ही फोनवर बोला असे सांगितले. आम्ही त्यावेळी पेशंट बघत असताना तो फोन रिसीव्ह केला. मा.श्री भोसले साहेबांनी आमहाला तात्काळ डॉ.म्हात्रे सरांसाठी ओपीडी रुम उघडुन देण्यास सांगितले. फोन संपल्यानंतर कुलकर्णी नामक इसम आम्हाला चढे आवाजात अरेरावी करु लागले. तुम्हाला त्यांना रुम दयायला काय झाले? तुम्ही डॉक्टरांना (डॉ. म्हात्रे) यांना अशी वागणुक देता का? असे म्हणाले. आम्ही दोघांनी त्यांना अतिशय शांतपणे तात्काळ ओपीडी रुम उघडुन देण्याचे मान्य केले. ओपीडी नं. ०३ उघडुन दिल्यानंतर डॉ. म्हात्रे म्हणाले मला ओपीडी रुम नको, मला न्युरो ओटी उघडुन पाहिजे. आम्ही अपघात विभागातील मामांना तात्काळ न्युरो ओटी उघडण्यास सांगितले .न्युरो ओटी उघडल्यानंतर त्यांनी ओटी मध्ये सी.टी. व एमआरआय फिल्म बघता येणार नाही म्हणुन मला परत ओपीडी नं ०३ उघडुन दया असे सांगितले नंतर त्यांना ओपीडी नं ०३ उघडुन देण्यात आली व त्यांनी तेथे पेशंट तपासले . डॉ म्हात्रे यांनी रुम उघडुन देण्याच्या काळात संस्थान विषयी व वैदयकिय संचालक विषयी रुग्ण व रुग्णांच्या नातेवाईकांना मी तेथे फ्रि सेवा देत असुन सुदधा मलाओपीडी रुम का मिळत नाही, अशी विचारणा केली " असे म्हंटलेले आहे. सदर डॉक्टरांचा अहवाल सोबत परिशिष्ट (B) म्हणुन जोडलेला आहे.

तसेच अधिसेविका कार्यालयातील मॉर्निग सुपर श्रीमती लिलि जॉन्सयांनीही दि.२६.०९.२०१६ रोजीचे अहवालानुसार डॉ.म्हात्रे यांचे म्हणण्यानुसार ओपीडी रुम उघडुन दिली होती व बिलींगमधुन केसपेपर देण्यास सांगितले होते. त्यांचे स्टेटमेंट सोबत परिशिष्ट (C) म्हणुन जोडलेले आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता दि.१८/०९/२०१६ रोजी रविवार असल्याने डॉ.म्हात्रे यांना अपघात विभागात ऑनडयुटी असलेल्या अपघात वैदयकिय अधिकारी यांनी डॉ.म्हात्रे सरांचे म्हणण्यानुसार जी प्रथम त्यांना पाहिजे होती ती अपघात विभागाचे शेजारील डॉक्टर्स रुम त्यांना उघडुन दिली होती, तसेच न्युरो ओटी मधील रुम त्यांना पाहिजे असतांना ती उघडून देण्यात आली होती. तेथे एक्स रे View Box नसल्यामुळे त्यांचे म्हणण्यानुसार ओपीडी नं ०३ ही उघडुन देण्यात आली होती. यावरुनच डॉ म्हात्रे यांना ओपीडी देण्याचे नाकारलेले नव्हते. याबाबत संबंधितांना डॉ म्हात्रे यांनी गैरसमज करुन दिलेला असावा.

डॉ. मयुर म्हात्रे यांनी दि.१०.०८.२०१६ रोजीचे अर्जान्वये Alternate रविवारी रुग्णालयात ऑपरेशन थीएटर चालु करणेस व शस्त्र क्रिया करणेबाबत अर्ज केला होता. मात्र सर्व बाबींचा विचार करता रविवारी असलेल्या अडचणी बाबत डॉ म्हात्रे यांना समजावुन सांगण्यात येवुन त्यांना दि.१९.०८.२०१६ रोजीच्या पत्रान्वये ''रविवारी आठवडा सुटटी असल्याने रूग्णालयातील ऑपरेशन थीएटर बंद असतात, आठवडयातुन

रविवारी ओटी चे फुमिगेशन करण्यात येत असते. तसेच या दिवशी भुलतज्ञ ही उपलब्ध नसतात, इमर्जन्सी डॉक्टरही उपलब्ध होत नाही, इतर विभागही रविवारी बंद असतात, यामुळे शस्त्रक्रियेसाठी आवश्यक सर्व बाबींची पुर्तता करणे अडचणीचे आहे, फक्त आपणास रविवारी ओपीडी पाहता येता येईल, तसेच उपरोक्त बाबींचा विचार करता रविवार सोडुन सोमवार ते शनिवार यामध्ये असलेल्या दिवशी आपणास न्युरो युनिटमधील शस्त्रक्रिया करता येईल , असे त्यांना कळविण्यात आलेले होते. सदर पत्र सोबत परिशिष्ट (D) म्हणुन जोडलेले आहे.

मात्र ते दुरध्वनीवरुन रविवारीच ओ.टी. पाहिजे असलेबाबत वैदयकिय संचालक यांचेशी हटट धरत होते.

डॉ.संतोष सुरवसे भुलतज्ञ यांनी दि२३.०९.२०१६ रोजीच्या अर्जान्वये नमुद केले आहे की,रविवार दि.०४.०९.२०१६ रोजी इमर्जन्सी डयुटीवर होतो,त्या दिवशी साधारण सकाळी ०९.३० वा चे दरम्यान डॉ म्हात्रे यांचा फोन आला की,आपल्याला एक स्पाइन सर्जरी करावयाची आहे, डॉ संतोष सुरवसे यांनी होकार दिल्यानं त्यानंतर १० ते १५ मिनीटांनी डॉ सुरवसे रुग्णालयात आले, तोपर्यंत संबंधित रुग्ण ऑपरेशन थीएटर मध्ये आलेला होता,ते बाहेर होते,थोडया वेळात डॉ.म्हात्रे आले आणि त्यांनी केस कॅन्सल केली म्हणुन सांगितले त्यानंतर केस कॅन्सल केल्याचे विचारले असता ते म्हणाले आता मुड नाही म्हणुन ऑपरेशन कॅन्सल झाले, तसेच याबाबत डॉ.सुरवसे यांनी याच अर्जात डॉ म्हात्रे यांचेबाबत नमुद केलेले असुन त्यांचा अर्ज सोबत परिशिष्ट (E) जोडलेला आहे.

सदर रुग्णाचे ऑपरेशन मुड नाही म्हणुन अचानक अचानक रदद केल्यामुळे रुग्णांचे नातेवाईक नाराज झाले व त्यांचे मनात रुग्णालयाविषयी गैरसमज निर्माण झाले असावेत.

तसेच डॉ.म्हात्रे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये पुर्णवेळ कार्यरत असताना त्यांचेबाबत येथील सिस्टर इनचार्ज व स्टाफ नर्स यांचे डॉ. म्हात्रे यांचे वागणुक, वर्तणाबाबत तक्रार अर्ज दिलेले आहेत.ते खालीलप्रमाणे.

(अ) न्युरो ओटी मधील सिस्टर इनचार्ज सौ सुचिता मुठाळ व इतर०७ स्टाफ यांनी दि.१८.०७.२०१४ रोजीचे अर्जात दि.१४.०७.२०१४ रोजी सिस्टर इनचार्ज सौ.मुठाळ सुटटी होती,दि.१५.०७.२०१४ रोजी मी डयुटीवर आल्यानंतर डॉक्टर्स रुममधील कपाटाच्या एका काचेचे तुकडे तुकडे झालेले आढळले,सर्व स्टाफ वार्डबॉय आया यांना विचारल्यानंतर असे समजले की, डॉ मयुर म्हात्रे यांनी स्टाफ नर्स दिपाली झाल्टे यांना हॅमर मागितला, तीने विचारले असता मला पाहिजे असे सांगण्यात आले, त्यानंतर थोडयावेळाने डॉक्टर्स रुममधील कपाटाची काच फुटल्याचा आवाज आला व सर्व काचा जमिनीवर आढळल्या, त्यानंतर दि.१५.०७.२०१४ रोजी केस संपल्यानंतर डॉ. मयुर म्हात्रे यांनी मला सांगितले की, मी काच फोडली आहे, व ती मी भरुन देईल, अशा तक्रार अर्ज सादर असुन त्याची प्रत सोबत परिशिष्ट (F) म्हणुन जोडली आहे.

(ब) दि.०६.०५.२०१५ रोजीच्या तक्रार अर्जान्वये आयसीसीयु मधिल स्टाफ नर्स सौ विदया भोसले व इतर ०५ स्टाफ नर्स यांनी म्हंटले आहे कि,'' पेशंट पोपटराव भालके, वय 28 वर्ष शिर्डी हा पेशंट आपल्याकडे दि.२२.०४.२०१५ रोजी जनरल वार्ड मध्ये अॅडमिट होता. त्यांचे Laminoctomy हे ऑपरेशन गोवा येथे एक महिन्यापुर्वी झाले होते. त्यांनतर दि. २६.०४.२०१५ रोजी रुग्ण आयसीसीयु मध्ये हलविणयात आले,त्यावेळेस त्यांला श्वास घेण्यासाठी त्रास होत होता. दि.०२.०५.२०१५रोजी रा ०८.३० वा डॉ.म्हात्रे सर राऊंडला आले. आम्ही कामात असताना सरांनी आम्हाला भालके पेशंटजवळ बोलविण्यात आले, त्यावेळी तेथे ऑन डयटी आरएमओ ही उपस्थित होते. पेशंटच्या उपचारा संबंधी आमच्यावर चुकीचे अवास्तव आरोप करुन आम्हाला धमकावण्यात आले उदा. (नोकरीतुन काढुन टाकेल,रेजिस्ट्रेशन काढुन टाकेल) अशा प्रकारे आरडाओरड करुन आमच्या कामात अडथळा आणला. त्यानंतर पेशंटच्या नातेवाईकांना बोलावुन आयसीसीयु मधील स्टाफचे काय करायचे ते करुन टाका. याप्रमाणे दमदाटी सुरू केली, तसेच गावातील प्रतिष्टीत राजकीय लोकांना (श्री कैलास बापु कोते व श्री विजयभाऊ कोते) यांना बोलावुन आमच्यापेशंटकडे लक्ष दया व त्या गोष्टी सोडुन दया, आमची कोणाविषयी काही तक्रार नाही असे सांगुन देखील डॉ म्हात्रे सरांनी त्यांची दमदाटी चालु ठेवली. आम्ही पुर्ण डयुटी प्रचंड मानसिक दडपणाखाली केली दुसऱ्या दिवशी दि.०३.०५.२०१५ सकाळी ०८.०० वाजता आल्यावर डॉ. म्हात्रे सरांनी त्याचप्रमाणे अगोदरच्याच सारखे दमदाटी शब्दप्रयोग करुन आयसीसीयु मधील कामात अडथळा निर्माण करुन शांततेचा भंग केला. तसेच आम्हा सर्वास अतिशय अश्लिल भाषेत लज्जा उत्पन्न होईल या प्रकारे शब्द प्रयोग केला, त्यांनी बोलले वाक्य all ICCU Staff Should be F*****D. डॉक्टरांनी अश्लिल श्ब्द प्रयोग करते वेळेस रात्र पाळीचे डॉक्टर व दिवस पाळीचे डॉक्टर उपस्थित होते. त्या दिवसापासुन ते आतापर्यंत दि.०७.०५.२०१५ पर्यंत आम्ही प्रचंड मानसिक दडपणा खाली असुन त्या संबंधात उचित

कार्यवाही करण्यात यावी'' असा तक्रार अर्ज केला असुन त्याची प्रत सोबत परिशिष्ट (G) म्हणुन जोडली आहे.

(क) तसेच वरील दि. ०६.०५.२०१५ रोजीचा सदर तक्रार अर्ज मागे घेण्यासाठी दि.११.०५.२०१५ रोजीच्या अर्जात ''सदर डॉ. म्हात्रे यांनी परत असे वागणुक देऊ नये,अर्वाच्च ,अशोभनीय ,असंस्कृतीक शब्दांचा वापर आयसीसीयु मध्ये करु नये, व स्त्री जातीची त्यांनी नेहमी इज्जत करावी. तसेच अजुन असे निदर्शनास आले आहे कि, पेशंटच्या नातेवाईकांना चिथावणी पुर्वक वाक्यप्रयोग करुन डॉक्टर ,सिस्टर ,स्टाफ यांना संगळयाना मारा, पोलीस स्टेशनला कंपलेट करा व अजुन असे निर्दशनास आले की, आयसीसीयु च्या स्टाफला सिस्टर , डॉक्टर, आया व मामा वर मला विश्वास नाही,त्यामुळे तुम्हीयेथेच बसुन रहा,पुढे डॉक्टर म्हात्रे सर असे चिथावणी खोर भाषा, अंगावर धावुन येत नातेवाईकांना बसवुन ठेवणे या गोष्टीकरणार नाही व आम्हांला अर्वाच्य भाषेत बोलणार नाही व ती न करण्याचे आम्हाला लेखी देत असतील तरच हे आमचे पत्र मागे घेण्याचे मान्य करण्यात यावे. महत्वाचे स्त्रिया बददल आदर,आईवडील बददल आदर या सगळया गोष्टी साईबाबांनी शिकवणीत सांगितले आहे,त्यामुळेच रुग्ण सेवा चांगली घडत असते, पुढे मागे आम्ही अशी आशा करतो की, खास करुन Ladies स्टाफला घाणरडे उदगार, घाणेरडी भाषा यांचा प्रयोग करणार नाही असे त्यांचे लेखी निवेदन घ्यावे. पुढे भविष्यात अतिदक्षता विभागात काम करताना हया भालके पेशंट संबंधातील गोष्टीवरुन पुढे आम्हाला डॉक्टर म्हात्रे सर यांच्याकडुन बदला म्हणुन त्रास दिला जाणार नाही याची डॉ.म्हात्रे सर यांनी हमी दयावी सबब आम्ही पहिले दिलेले पत्र दि.०७/०५/२०१५ वरील अटीला मान्य राहुन मागे घेण्यात येईल.'' असा अर्ज दिला असुन त्याची प्रत सोबत परिशिष्ट (H) म्हणुन जोडली आहे.

(ड) सौ.पी.एस.देव. सिस्टर इन्चार्ज व इतर ०४ स्टाफ नर्स यांनी दि.०६/०५/२०१५ रोजीच्या तक्रार अर्जात म्हंटले आहे कि.'' फिमेल जनरल वार्ड मध्ये स्टाफ नर्स म्हणुन काम करतो.दि ०९.०४.२०१५ रोजी सकाळी ०८ ते ०२ या वेळेत ०९.०० वाजेच्या दरम्यान डॉ.म्हात्रे वार्ड मध्ये राउंडसाठी आले. त्यांच्या एका पेशंटला Fever होता, Fever check करण्यात आला होता, पेशंटला मेडिसीन ही दिले होते, Cold Sponging हि चालु होते. परंतु त्यांनी मला Inform केले नाही म्हणुन पुर्ण वार्ड०१ ते ०२ तास डोक्यावर घेतला, सर्व पेशंट व नातेवाईकांसमोर मनाला येईल ते बोलले, फुकट का पेमेंट लेते हो सिर्फ चाय पिणे के लिए आते है, खाली बैठने के लिए इधर आते हो,नक्की आरजीएनएम शिकुन आल्या का, कि वशिल्याच्या भरल्या ,ज्यांनी तुम्हांला कामाला लावले त्यांना घेवुन या माझयासमोर देखो आज तुम्हारा क्या हाल करता हु, तुम्हारे बजह मेरा पेशंट Bad हो गया, आज तुम रहोगे,या मै रहुँगा असे म्हणुन दात खात हाताच्या मुठया पकडून आज तुम्हेनही छोडूंगा, असे न एकण्यासारखे व अंगाला व अंगाला काटा येण्यासारखे सर्व पेशंट व नातेवाईकांसमोर बोलत होते नंतर त्या पेशंट च्या नातेवाईकांना बोलावून मैने तो ऑपरेशन अच्छा किया था, इन लागों के बजहसे तुम्हारा पेशंट Bad हो गया, असे म्हणुन सर्व नातेवाईकांसमोर स्टाफची व हॉस्पिटलची बदनामी करण्याचा प्रयत्न केला'' असा तक्रार अर्ज केलेला असुन त्यांची प्रत सोबत परिशिष्ट (I) म्हणुन जोडली आहे.

डॉ.मयुर म्हात्रे यांना अडचणीमुळे रविवारी ओटी देता येत नसल्याचे कळविल्याने त्यांनी दि.१८.०९.२०१६ रोजी जाणिवपुर्वक रुग्ण व नातेवाईकाचा गैरसमज करुन दिलेला दिसुन येतो. डॉ म्हात्रे यांना त्यांच्या म्हणण्यानुसार सीएमओ यांनी त्यांचे काम केले होते. त्यांना जेथे कॅबीन पाहिजे त्या उघडुन दिल्या मग गैरसमज करुन देण्याची त्यांची काहीच गरज नव्हती. तसेच डॉ. म्हात्रे यापुर्वीही ऑपरेशन झालेल्या रुग्णांच्या Post Operative केसेस पाहण्यास तयार नव्हते, त्यामुळे डॉ. टिंगरे हे सुदधा पहायला तयार होत नसत,रुग्णाला काहि झाल्यास प्रशासनावर व नर्सिंग वर दोष देत असतात. त्यांना सोमवार ते शनिवार मध्ये कोणत्याही दिवशी शस्त्राक्रिया करणेचे सांगण्यात आले असता तरीही ते त्यांचे मर्जीनुसार वागत आहे. तसेच अडचणी स्विकारुन रविवारी चालु केल्यास इतरही डॉक्टर त्यांचे सोईनुसार रविवारी ओटी मागतील.

डॉ. म्हात्रे यांच्या खोडसाळपणामुळे वृत्तपत्रात बातमी प्रसिदध करुन संस्थान व रुग्णालयाची बदनामी केलेली आहे. डॉ म्हात्रे यांची वागणुक, कामकाजात अडथळे निर्माण करणे व इत्यादीमुळे त्यांचा इतर डॉक्टर व कर्मचा-यांवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यांचेमुळे संस्थान व रुग्णालयाचे नावलौकीकास बाधा निर्माण होऊन पुढेही रुग्णालयाबाबत अडचणी निर्माण करु शकतात. सध्या डॉ टिंगरे व्हिजीटींग न्युरो सर्जन असुन ते पुर्णवेळ सारखी सेवा देत आहेत तसेच दि.१९.०९.२०१६ रोजीच्या मा.व्य.स.सभेतील निर्णयानुसार आणखी एक डॉ. गोडगे, न्युरो सर्जन म्हणुन पुर्णवेळ स्वरुपात हजर होणार आहे.

तरी डॉ.म्हात्रे यांचे वर्तन, वरिष्ठांचे आदेशाचे पालन न करणे, त्यांचे बाबत डॉक्टर, सिस्टर इनचार्ज, स्टाफ नर्स यांचे असलेले गंभीर स्वरुपाची तक्रार, त्यांचा पुर्व इतिहास, संस्थान व रूग्णालय प्रशासनाची मुददामहुन गैरसमज करणे, इत्यादी बाबींचा विचार करता तसेच भविष्यात त्यांचेमुळे रुग्णालयात अडचणी निर्माण होवु नये म्हणुन डॉ.म्हात्रे यांची सध्याची मोफत सेवेची व्हिजीट बंद करणेबाबत सदरचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे डॉ.म्हात्रे यांचे गैरवर्तन, वरिष्ठांचे आदेशाचे पालन न करणे, त्यांचे बाबत डॉक्टर, सिस्टर इनचार्ज, स्टाफ नर्स यांच्याकडून आलेल्या गंभीर स्वरुपाच्या तक्रारी, त्यांचा पुर्व इतिहास, संस्थान व रुग्णालय प्रशासनाविषयी गैरसमज निर्माण करणे, इत्यादी बाबींचा विचार करता तसेच त्यांचेमुळे भविष्यात रुग्णालयात अडचणी निर्माण होवु नये याकरीता डॉ.मयुर म्हात्रे, न्युरो सर्जन (व्हिजीटींग) यांची सध्याची मोफत सेवेची व्हिजीट बंद करणेत यावी, असे ठरले.**

**तसेच रुग्णालयाकडील ज्या डॉक्टर्स/ कर्मचाऱ्यांची खाते चौकशी चालू आहेत, त्या लवकरात-लवकर पुर्ण कराव्यात, अशा सुचना देण्यात आल्या.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५३** **डॉ.शामकुवर, आरएमओ व इतर ३ आरएमओ तसेच वैद्यकिय अधिकारी (त्वचारोग) यांना हजर तारखेपासून वेतनश्रेणी लागु करण्यात आली असल्याने फरक आदा करणेपुर्वी शासनाचे विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. त्रिसदस्य समितीचे दि. ०६/११/२०१४ निर्णय क्र. ९६८ तसेच दि. २९/०२/२०१६ रोजीचे निर्णय क्र. १८५ नुसार अनुक्रमे डॉ सुभाष श्रीराम शामकुवर आरएमओ व इतर ३ आरएमओ तसेच डॉ. कांबळे यांना हजर तारखेपासून वेतनश्रेणी लागू करणेबाबत निर्णय झालेला आहे सदर निर्णयानुसार त्यांना साधारणतः रक्कम रु. २७,४५,०००/- चे आसपास फरक अदा करावा लागणार आहे.

संबंधीत डॉक्टरांची नावे, हजर तारीख व दिलेले सुरवातीचे मानधन खालीलप्रमाणे आहे

| अ नं | डॉक्टरांचे नाव | कामावर हजर तारीख | कामावर हजर होतेवेळी दिलेले मानधन |
|---|---|---|---|
| १ | डॉ सुर्यकांत पाटील<br>आरएमओ, बीटीओ | ०७/१०/२००५<br>०१/०९/२००८ | १७००० |
| २ | डॉ सुभाष शामकुवर, आरएमओ | १७/१०/२००५ | १७००० |
| ३ | डॉ उल्हास पवार, आरएमओ | ०१/०६/२००६ | १७००० |
| ४ | डॉ दिपक कांदळकर, आरएमओ | ०७/०९/२००६ | १७००० |
| ५ | डॉ दादासाहेब कांबळे<br>वैद्यकीय अधिकारी (त्वचारोग) | १४/१०/२००५ | २१००० |

सदरहु विषयाचा पूर्व इतिहास व वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलची स्थापना सन २००५ मध्ये झालेली आहे त्यावेळी हॉस्पिटलसाठी आकृतीबंध मंजुर नसल्यमे वैद्यकीय अधिकारी, टेक्निशियन, स्टाफनर्स, मॅनेजर्स इत्यम्दी पदांवर तात्पुत्या स्वरूपात मानधनावर भरती करणेत आली होती.

उपरोक्त कर्मचापनवस्थारोजीचे व्य २००५/११/०५ .व दियांना ठराविक मानधन देणेबाबतचा प्रस्ता- समिती सभेत सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र. ६६७ अन्वये कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळालेनंतर संबंधितांच्याहजर तारखेपासून वेतनश्रेणीवर नेमणूका देण्यस व देय होणार फरकाची रक्कम आदा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे जा.नं.एसएसएस/वशी१/७५/२००५ दि. ०७/०१/२००६ अन्वये आदेश पारीत करणेत आलेला होता.

तथापि, रुग्णालयाचे आकृतीबंधास शासनाची सन २००७ व २००९ साली मान्यता मिळाली असल्याकारणाने श्री साईबाबा संस्थानकडून दि. ०५/११/२००५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ६६७ ची अंमलबजावणी त्यावेळी करणेत आलेली नाही.

डॉ. दादासाहेब कांबळे यांनी मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन ८९११/२०१३ दाखल केले होते त्यावर मा. उच्च न्यायालयाने दि. १९/०३/२०१४ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिले होते.

In that view of the matter, writ petition is disposed off with direction to respondent to decide the representations dated 09.09.2012 and 23.02.2013 made by the petitioner, if already not decided, as expeditiously as possible, however, within two months from today.

मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार डॉ.कांबळे यांचे वेतनश्रेणीबाबत निर्णय घेणेसाठी दि.०३/०८/२०१४ रोजीचे मा त्रिसदस्य समितीचे सभेत खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करणेत आला होता.

दि.१३/०६/२००७ रोजीच्या मंजूर आकृतीबंधात त्वचारोग तज्ञ पदास मंजुरी नसलेने डॉ कांबळे यांची नेमणूक मानधनावर केलेली होती. ती त्यांनी त्यावेळेस स्विकारलेलीआहे दि ०७/०८/२००९ रोजीच्या आकृतीबंधात पदाचा समावेश असल्याने त्यांना दि. ०१/०४/२०१० पासून वेतनश्रेणी देणेत आलेली आहे त्यांचे मागणीप्रमाणे त्यांना सुरवातीचे नेमणूकीपासून वेतनश्रेणी व वार्षिक वेतनवाढ देता येणार नाही

यावर मा त्रिसदस्य समितीचे दि. ०३/०८/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६५१ खालीलप्रमाणे झाला होता.

डॉ.दादासाहेब लुमा कांबळे असो कन्सल्टंट (त्वचारोग) श्री साईनाथ रूग्णालय यांनी दि. ०९/०९/२०१२ व दि. २३/०२/२०१३ रोजीच्या अर्जान्वये त्यांच्या नेमणूकीचे सुरवातीपासून वार्षिक वेतनवाढ व वेतनश्रेणी मिळणेबाबत केलेली विनंती अमान्य करणेत आली.

अशाचप्रकारे डॉ.सुभाष श्रीराम शामकुवर, आरएमओ व इतर ३ यांनी रुजू झालेल्या तारखेपासून वेतनश्रेणी लागु करणेबाबत मुंबई उच्चन्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन दाखल केले होते त्यावर मा. उच्च न्यायालयाने दि. ३०/०६/२०१४ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिला होता.

Respondent No 2 shall decide the representation given by the petitioners with regard to pay scale, expeditiously and on its own merits, within a period of 4 months from today.

मा.न्यायालयाच्या आदेशानुसार सदरच्या विषयावर निर्णय घेणेसाठी दि. ०६/११/२०१४ रोजीचे मा त्रिसदस्य समितीचे सभेत खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करणेत आला होता.

महाराष्ट्र शासनाची आकृतीबंधास मंजुरी नसल्याने अर्जदार यांना वेतनश्रेणीत पगार न देता सुरवातीस मानधन अदा करणेत आलेले आहे. ते आदेश त्यांनी विनातक्रार स्विकारलेले आहेत. शासनाची आकृतीबंधास मान्यता आल्यानंतर मा व्यवस्थापनाचे निर्णयानंतर अर्जदार यांना वेतनश्रेणीमध्येवेतन अदा करणेत आलेले आहे. त्यानंतर प्रत्येक वर्षी अर्जदारांस वार्षिक वेतनवाढी अदा करणेत आलेल्या आहेत. आकृतीबंधास शासनाची मान्यता नसलेने अर्जदारांना सुरवातीचे रूजू तारखेपासून वेतनश्रेणीमध्येवेतन देता येणार नाही अर्जदारांवर कुठल्याही प्रकारचा अन्याय झालेला नाही तसेच अशाच प्रकारे डॉ दादासाहेब लुमा कांबळे यांनी विनंतीअर्ज व रिट पिटीशन नं ८९११/२०१३ दाखल केले होते. मा त्रिसदस्य समितीने दि. ०३/०८/२१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६५१ अन्वये त्यांची मागणी अमान्य करणेत आलेली आहे.

उपरोक्त प्रस्तावावर निर्णय क्र ९६८ खालीलप्रमाणे झाला होता.

"प्रस्तावात नमुद केलेल्या श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलकडील ४ आरएमओ यांना त्यांचे हजर तारखेपासून वेतनश्रेणी लागू करणेत यावी असे ठरले".

तथापि, रुग्णालयाचे आकृतीबंधास शासनाची सन २००७ मध्ये मान्यता मिळालेली असतानासुद्धा उपरोक्त निर्णय झालेला आहे असे दिसते.

समान मागण्या व समान मुद्दा असताना एका प्रकरणात विनंती अमान्य करण्यात आली तर दुसऱ्या प्रकरणात विनंती मान्य करण्यात आल्याने डॉ. कांबळे यांनी पुनःश्च मा. उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र. १०७०८/२०१४ दाखल केले होते. सदर पिटीशनमध्ये मा. त्रिसदस्य समितीचे दि. ०३/०८/२०१४ रोजीचे निर्णय क्र. ६५१ नुसार संस्थानने प्रतिज्ञापत्र दाखल केले होते. त्यामुळे दि. ०६/११/२०१४ च्या सभेतील निर्णय क्र. ९६८ ची अंमलबजावणी स्थगित केली होती.

त्यानंतर डॉ. कांबळे यांनी पुन्हाविनंती अर्ज सादर केल्याने तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी यांनी दि. १०/०२/२०१५ रोजी खालीलप्रमाणे निर्देश दिले होते.

"वेतनश्रेणी अस्तित्वात आल्यापासुनच सर्वांना लागु करण्यात आली आहे. अस्तित्वात नसलेली वेतनश्रेणी पुर्वलक्षी प्रभावाने लागु करण्याचा प्रश्न उद्भवत नाही अन्य डॉक्टरांना देखील याच नियमाने वेतनश्रेणी लागु करण्यात आली असल्याने यामध्ये कोणतीही विसंगती नाही. सदरची बाब न्यायालयाच्या सविनय निदर्शनास आणण्यात यावी, व्यवस्थापन समितीला सध्या तसदी देण्याची आवश्यकता नाही."

दि. ०६/११/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ९६८ ची अंमलबजावणी न करणेत आल्याने डॉ. शामकुवर व इतर ०३ यांनी पुन्हा मा. अध्यक्ष साहेब यांचेकडे निर्णयाची अंमलबजावणी करणेसाठी विनंती अर्ज केला होता. सदरहू अर्जावर निर्णय घेणेसाठी मा. अध्यक्ष साहेब यांनी याबाबतचा प्रस्ताव त्रिसदस्य समितीसमोर सादर करणेबाबत निर्देश दिल्याने दि. ०६/११/२०१४ रोजीचे सभेमध्ये निर्णय क्र. ९६८ निरस्त करणेबाबत दि. ११/१०/२०१५ व दि. १८/१२/२०१५ रोजी टिपण्या सादर करणेत आल्या होत्या. त्यानंतर मात्र मा. उपकार्यकारी

अधिकारी व मा. कार्यकारी अधिकारी यांनी दि. ०५/११/२००५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ६६७ ला अनुसरुन काढणेत आलेला आदेश क्र. जा.नं.एसएसएस/ वशी०१/७५/२००५ दि. ०७/०१/२००६ ची अंमलबजावणी करणेबाबत समक्ष निर्देश दिले. सदर निर्देशास अनुसरुन, दि. ०६/०१/२०१६ रोजीचे मंजूर टिपणीनुसार दि. ०६/०१/०१६ रोजी डॉ. शामकुवर व इतर ३ यांना हजर तारखेपासुन वेतनश्रेणी लागु करणेबाबतचा आदेश पारित करणेत आलेला आहे. त्याचप्रमाणे डॉ. कांबळे यांनाही दि २९/०२/२०१६ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र. १८५ नुसार दि. १४/१०/२००५ पासून सन २००९ चे मंजुर आकृतीबंधात वैद्यकीय अधिकारी (त्वचारोग) पदासाठी असलेली मंजूर वेतनश्रेणी दि २५/०४/२०१६ च्या आदेशान्वये लागु करणेत आलेली आहे.

डॉ.कांबळे यांनी माउच्च न्यायालयात दाखल केलेल्या रीट पिटीशन क्र. १०७०८/२०१४ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. ११/०४/२०१६ रोजी डॉ.कांबळे यांना ८ आठवड्याच्या आत म्हणजेच दि. ०६/०६/२०१६ पर्यंत त्यांना मॉनेटरी बेनिफिट्स (Monetary Benefits) देण्यात यावे असे निर्देश दिले आहेत. त्याप्रमाणे डॉ. कांबळे यांना दि २५/०४/२०१६ च्या आदेशान्वये वेतनश्रेणी लागु करुन व एप्रिल २०१६ चे पगारपत्रकापासून सुधारित वेतन अदा करणेत येत आहे. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाचे आदेशाचे पालन केलेले आहे असे नम्र मत आहे.

तथापि, रूग्णालयाचे आकृतीबंधास शासनाची सन २००७ व २००९ साली मान्यता मिळाली असल्याकारणाने दि. ०५/११/२००५ रोजी त्यावेळच्या मा. व्यवस्थापन समितीने घेतलेला निर्णय क्र. ६६७ योग्य आहे किंवा कसे याबाबत संभ्रमावस्था असल्याकारणाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेसाठी सन २००४ साली लागु झालेल्या अधिनियमातील खालील तरतुदींचा तसेच संस्थानचे मंजूर २००७ व २००९ सालचे मंजूर आकृतीबंधातील अटी-शर्तीचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

**अधिनियमातील तरतुद नं. २८/१–** कार्यकारी अधिकारी किंवा समिती यांच्या कोणत्याही कार्यवाहीचे किंवा निर्णयाचे किंवा आदेशाचे अभिलेख हे, अशा कार्यवाहीचा कायदेशीरपणा किंवा त्याखाली दिलेल्या निर्णयाचा अथवा आदेशाचा बिनचुकपणा, कायदेशीरपणा किंवा औचित्य याबाबत स्वतःची खात्री करुन घेण्याच्या दृष्टीने मागवून घेणे व त्यांची तपासणी करणे आवश्यक व इष्ट आहे, असे राज्य शासनास वाटल्यास, त्यास तसेच करता येईल आणि कोणत्याही बाबतीत असा कोणताही निर्णय किंवा आदेश यात फेरबदल, विलोपन किंवा प्रत्यांवर्तन केले पाहिजे किंवा तो फेरविचारार्थ पाठविला पाहिजे, असे राज्य शासनास आढळून आले तर, राज्य शासनास त्याप्रमाणे आदेश काढता येईल.

**अधिनियमातील तरतुद नं. २८/२–** जेव्हा एखाद्या प्रकरणी पोटकलम (1) खाली राज्य शासनाने कार्यकारी अधिका-यांच्या किंवा समितीच्या कोणत्याही कार्यवाहीचा किंवा निर्णयाचा किंवा आदेशाचा अभिलेख मागवला असेल तेव्हा, राज्य शासनास, त्या संबंधात पोटकलम (1) खाली असलेल्या आपल्या अधिकारांचा वापर करण्याचा येईपर्यंत, कार्यकारी अधिका-यांच्या किंवा समितीच्या अशा कोणत्याही निर्णयाची किंवा आदेशाची अंमलबजावणी स्थगित करता येईल.

परंतु, संबंधित पक्षकारांना स्पष्टीकरण देण्याची संधी देण्यात आल्याशिवाय, राज्य शासन, पोटकलम (१) अन्वये कोणताही आदेश देणार नाही.

**अधिनियमातील तरतुद नं. ३०/१–** समितीचा कोणताही ठराव, निर्णय अथवा आदेशांची अंमलबजावणी किंवा समितीकडून किंवा समितीच्या वतीने करण्यात यावयाची असेल किंवा करण्यात येत असेल, अशी कोणतीही कृती जनहिताच्या विरोधात व या अधिनियमाद्वारे वा अधिनियमान्वये किंवा त्या-त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याअन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचे उल्लंघन करणारी किंवा त्या अधिकारांपेक्षा अधिक अधिकार वापरुन करण्यात येणारी कृती आहे अथवा त्यामुळे व्यवस्थापन निधीचा दुरुपयोग वा गैरवापर होण्याची किंवा अपव्यवय होण्याची शक्यता आहे, असे राज्य शासनाचे मत असेल तर, त्यास, लेखी आदेशाद्वारे, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा एका किंवा अनेक कालावधींसाठी, अशा ठरावाची वा आदेशाची अंमलबजावणी तहकूब करता येईल किंवा अशी कोणतीही कृती प्रतिषिध्द करता येईल अशा आदेशाची एक प्रत राज्य शासनाकडून समितीला आणि कार्यकारी अधिका-याला तात्काळ पाठविण्यात येईल.

श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाकडील आकृतीबंध २००७ व २००९ साली मंजुर झाला असल्याकारणाने अर्जदार डॉक्टरांना हजर तारखेपासून वेतनश्रेणी द्यावी किंवा कसे व फरकद्यावा किंवा कसे याबाबत वेतन पडताळणी विभाग, नाशिक यांचेकडे संस्थानमार्फत विचारणा केली असता त्यांनीही “जर आकृतीबंध २००७ व २००९ मध्ये मंजूर झालेला असेल तर आकृतीबंध मंजूर झालेल्यादिनांकापासून पदांचे मंजुरीप्रमाणे डॉक्टर्स यांना फरक देणे योग्यहोईल” असे सुचविले आहे.

सबब, उपरोक्त अधिनियमातील तरतुदी, सन २००७ व २००९ च्या मंजूर आकृतीबंधातील अटीशर्ती व वेतन पडताळणी विभाग, नाशिक यांचे अभिप्राय तसेच मा. मुख्यलेखाधिकारी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १३ (५) मधील तरतुदीनुसार आकृतीबंध मंजूर होईपर्यंत कोणत्याही अधिकारी / कर्मचा-यांची नेमणूक करता येत नाही याचाच अर्थ आकृतीबंध मंजुरीच्यादिनांकापासून किवा तदनंतर नियमित नेमणूक करता येतील त्यामुळे नियमित वेतनश्रेणी सुद्धा त्याच दिनांकापासून देय होईल असे दिलेले अभिप्राय विचारात घेता, विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेणेस तसेच अर्जदारांनी याकामी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट पिटीशन मध्ये दिलेल्या आदेशाबाबत वस्तुस्थिती मांडण्यासाठी म्हणणे दाखल करणेस मान्यता असावी.

मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.८०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या अटी/शर्ती व अभिप्रायांचा विचार करता डॉ.शामकुवर, आरएमओ व इतर ३ आरएमओ तसेच वैद्यकिय अधिकारी (त्वचारोग) यांना आकृतीबंध मंजुर झालेल्या तारखेपासून वेतनश्रेणी लागु करण्यात यावी, असे समितीचे मत झाले. याबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेण्यात येऊन मा.उच्च न्यायालयामध्ये वस्तुस्थिती मांडण्यात यावी.**

**तसेच डॉ.शामकुवर यांना स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी बोलविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५४** **श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस.ओ.टी.१ करीता नविन Shadowless Lamp खरेदीकामी तसेच जुना Shadowless Lamp Buyback करणेकामी M/s Esbee Dynamded Pvt. Ltd., Mumbai यांना दिलेला पुरवठा आदेश रद्द करुन फेर-निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी.- १ मध्ये शस्त्रक्रिया करणेकामी ०१ नग Shadowless Lamp (LED) आहे. सदर Shadowless Lamp हा सन २००५ मध्ये रु.२०,४२,४७०/- इतक्या रक्कमेत खरेदी केलेला आहे. सध्या सदर Shadowless Lamp हा व्यवस्थित चालत नाही. मागील एक वर्षात सी.व्ही.टी.एस. ओ.टी. -१ मध्ये एकूण ८७६ शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. त्यामुळे सदर Shadowless Lamp वर कामाचा अतिरिक्त भार पडल्यामुळे सदर Shadowless Lamp ची प्रखरता कमी झालेली आहे व त्याच्या दुरुस्तीचा खर्च हा फार जास्त आहे. त्यामुळे Shadowless Lamp परत (Buyback) करणे योग्य राहील अशी शिफारस बायोमेडीकल विभागाने त्यांचे मागणी पत्रकावर केलेली आहे. जुने Shadowless Lamp ची घसारा वजा जाता दि.३१/०३/२०१३ अखेर येणारी किंमत रु.३,०१,५०४/- इतकी आहे. तर सदर ०१ नग Shadowless Lamp खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.९,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.०८/०१/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र. १४ अन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी. -१ करीता Shadowless Lamp खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु.९,००,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे, तसेच श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस.ओ.टी.१ विभागातील जुना Shadowless Lamp Buyback करणेचा प्रस्ताव रदद् करणेत येऊन, सदरचा Shadowless Lamp इतर ऑपरेशन थिएटरमध्ये वापरण्यात यावा, असे ठरले.

त्यानुसार सदरचे खरेदीस जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेकामी सदरची जाहिरात प्रहार-मुंबई, संध्यानंद-पुणे या वर्तमान पत्रात तसेच संस्थानच्या संकेत स्थळावर वरीलप्रमाणे जाहिरातव निविदा देण्यात आली होती. तसेच एकूण २१ उत्पादक कंपन्या/ पुरवठाधारक यांना इकडील पत्र क्र७५८१दि.०४/०३/२०१४ अन्वये जाहिराती बाबत अवगत करणेकामी पत्र पाठविण्यात आले होते. निविदा विक्रीची मुदत दि.०५/०३/२०१४ ते १८/०३/२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि२०/०३/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन मुंबई येथील कार्यालयात०५ निविदा प्राप्त झालेल्या होत्या, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| Sr.No. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 1. | M/s. Unimmedss, Kolkata | 19/03/2014 |
| 2. | M/s. Matrix Medical Pvt. Ltd., Thane (W) | 20/03/2014 |
| 3. | M/s. Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai | 20/03/2014 |
| 4. | M/s. Sairam Biomedics, Mumbai | 20/03/2014 |
| 5. | M/s. Maquet Medical India Pvt.Ltd., Mumbai. | 20/03/2014 |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या ०५ सिलबंद निविदा दि.२३/०५/२०१४ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे उघडण्यात येऊन, निविदा धारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले होते.

| **Sr. No.** | **Description** | **Rate Per in Rs.** | **AMC** | **CMC** | **Rate After Negotiation** | **AMC** | **CMC** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **M/s. Unimmedss, Kolkata** (Model- Alfa 5 + Alfa 5 + Alfa 3) Warranty- 2 Year | 891000.00 | N.Q | | Absent | | |
| 2 | **M/s. Matrix Medical Pvt. Ltd., Thane (W)** (Model- Prism Luminox) Warranty- 1Year | 701250.00 | after warranty 2nd Year 2% 3rd Year 2.25% 4th Year 2.50% 5th Year 3% 6th Year 3.50% 7th Year 3.75% | after warranty 2nd Year 4% 3rd Year 4.5% 4th Year 4.75% 5th Year 5% 6th Year 5.50% 7th Year 5.75% | 600000.00 | after warranty 2nd Year 2% 3rd Year 2.25% 4th Year 2.50% 5th Year 3% 6th Year 3.50% 7th Year 3.75% | after warranty 2nd Year 4% 3rd Year 4.5% 4th Year 4.75% 5th Year 5% 6th Year 5.50% 7th Year 5.75% |
| 3 | **M/s. Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai** (Model- sim LED 7000+ 7000+ 4500) Warranty-2 Year | Euro 22270 @ Rs.86=1915220 + C.D. 12%= 229826 + Clearance Charges 25000 Total Rs. 21700046 | 2% + 5% Esclations | 7% + 3% Esclations | Euro 20478 @ Rs.85=1740630 + C.D. 11.7%= 203653 Total Rs. 1944283 | 2% | 6% |
| | sim LED 5000+5000+5000 offer given during the negotiation Warranty-2 Year | Euro 22270 @ Rs.86=1915220 + C.D. 12%= 229826 + Clearance Charges 25000 Total Rs. 21700046 | 2% | 7% | Euro 20478 @ Rs.85=1740630 + C.D. 11.7%= 203653 Total Rs. 1944283 | | |
| | sim LED 5000+5000+4500 offer given during the negotiation Warranty-2 Year | Euro 20270 @ Rs.86=1743220 + C.D. 12%= 209186 + Clearance Charges 2% = 25000 Total Rs. 1977406 | 2% | 7% | Euro 17838 @ Rs.85=1516230 + C.D. 11.7%= 177398 Total Rs. 1693628 | | |
| | SD Camera | | | | Euro 4130 @ Rs.85=351050 + C.D. 11.7%= 41073 Total Rs.392123 | 2% | 6% |
| | HD Camera | | | | Euro 5694 @ Rs.85=483990 + C.D. 11.7%= 56627 Total Rs.540617 | 2% | 6% |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | **M/s. Sairam Biomedics, Mumbai**<br>1) Surgirise SASX2ST+ X2ST+X1 Warranty-2 Year<br>2) Surgirise SASX2ST+X2ST +X2ST | Euro 18320 | N.Q | | Euro 16488 @ Rs.84=1384992 + C.D. 33%= 457047+Clearance Charges 2% =27699 Total Rs. 1869738 | 2% | 5% |
| | 3) Surgirise SASX2MT+X2MT+X2MT<br><br>Video Camera SD Sony Zoom 36+control box | 20098 Euro | | | Euro 16000 @ Rs.84=1344000 + C.D. 33%= 443520+Clearance Charges 2% =26880 Total Rs. 1814400 R/O Rs. 1800000 | 2% | 3% |
| | | 20688 Euro | | | Not Negotiated | | |
| | Monitor 19" | 1500 Euro | | | Euro 1500 @ Rs.84=126000 + C.D. 33%= 41580+Clearance Charges 2% =2520 Total Rs. 170100 | 2% | 3% |
| | | 4000 Euro | | | Euro 4000 @ Rs.84=336000 + C.D. 33%= 110880+Clearance Charges 2% =6720 Total Rs. 453600 | 2% | 3% |
| | | 2000 Euro | | | Euro 2000 @ Rs.84=168000 + C.D. 33%= 55440+Clearance Charges 2% =3360 Total Rs. 226800 | 2% | 3% |
| 5 | **M/s. Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai**<br>1) HLED 533SD Warranty-1Year | Rs. 2500000 | N.Q | | Rs. 2000000 | 2 % + Service Tax | 6 % + Service Tax + Vat |
| | 2) Volista 644 STD | Rs. 2500000 | | | Rs. 2100000 | 2 % + Service Tax | 6 % + Service Tax + Vat |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त निविदा धाराकांनी M/s. Unimmedss, Kolkata व M/s. Matrix Medical Pvt. Ltd., Thane (W) या दोघांनी भारतीय बनावटीच्या टेबलचे दर दिलेले आहेत, तर उर्वरीत ०३ निविदा धाराकांनी Imported कंपनीचे दर दिलेले आहे. सदरचा Lamp हा कार्डीयाक ऑपरेशन थिएटर या महत्वाच्या शस्त्रक्रिया विभागासाठी खरेदी करावयाचा आहे. यापूवी येथे Imported कंपनीचा लाईट वापरत आहे. त्यामुळे ज्या 03 निविदा धाराकांनी Imported कंपनीचे दर दिलेले आहे त्या तिघांचा तांत्रिक बाबींचा विचार करता M/s. Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai यांचे मॉडेल (Sim LED 7000+ 7000+ 4500) तांत्रिक दृष्ट्या योग्य असून त्यांनी वॉरंटी ०३ वर्षाचा दिलेला आहे. त्यामुळे M/s. Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai यांचे एकूण रक्कम रु. १९,४४,२८३/- मात्र निम्नतम दर स्विकारण्यात येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा.

तसेच सदरचे पेमेंट LOC द्वारे अदा करण्यात येऊन Custom Duty मध्ये सूट मिळणेकामी वित्त विभागाकडून केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात यावा. केंद्र शासनाकडून Custom Duty मध्ये सूट न मिळाल्यास सदरची रक्कम रु.२,०३,६५३/- मात्र संस्थानमार्फत अदा करण्यात यावी. तत्पूर्वी उपरोक्तकामी येणा-या खर्चास संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाची तान्यता घेण्यात यावी, असे ठरले होते.

त्यानूसार संस्थानचे विधी विभागामार्फत मा. मुंबई उच्चन्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामी प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. सदर Shadowless Lamp हा M/s. Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून खरेदीकामी येणाऱ्या जास्तीचा खर्चास सिव्हील ॲप्लीकेशन नं ६८४६ दि.१७/०७/२०१५ अन्वये मान्यता मिळलेली आहे. दि.२०/०१/२०१६ रोजी वापर करणारे डॉक्टर विद्युत कुमार सिन्हा व बायोमेडीकल इंजिनिअर व परचेस मॅनेजर यांनी नाशिक येथील अपोलो हॉस्पिटलमध्ये जाऊन सदर Shadowless Lamp चा demo बघीतला असता सदर Shadowless Lamp बाबत डॉक्टर विद्युत कुमार सिन्हा यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

सदर Shadowless Lamp चा Light पुरेसा नसून त्याची तीव्रता देखील आपण वापरत असलेल्या सी.व्ही.टी.एस. ओ.टी. नं २ च्या Light पेक्षा कमी आहे. सदर हॉस्पिटलमध्ये काम करणारे डॉ. अभय वालिया यांना देखील विचारले असता त्यांचे मते शिर्डी येथील सी.व्ही.टी.एस.ओ.टी. नं २ मध्ये वापरत असलेल्या Light पेक्षा याचा Light व तीव्रता फारच कमी आहे. त्यामुळे M/s. Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai यांच्या Shadowless Lamp बद्दल डॉ. सिन्हा हे समाधानकारक नाही. त्यामुळे उपरोक्त Shadowless Lamp खरेदीकामी पुन्हा ई-निविदा मागवाव्या लागणार आहे.

डॉक्टरांचे मागणीप्रमाणे खरेदी करावयाचे Shadowless Lamp खरेदीकामी मे.मॅक्वेट मेडीकल इंडीया प्रा.लि., मुंबई यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दर मागविणेत आले होते. त्यानुसार त्यांनी दि.३१/०८/२०१६ रोजीचे ई-मेल व्दारे उपरोक्त Shadowless Lamp खरेदीकामी रक्कम रु.३४,६५,०००/- इतके अंदाजे दर कळविलेले आहे.

तरी श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी.-१ करीता Shadowless Lamp खरेदीकामी व जूना Shadowless Lamp परत Buyback करणेकामी M/s. Esbee Dynamed Pvt. Ltd., Mumbai यांना दिलेला पुरवठा आदेश रद्द करुन नविन एक Shadowless Lamp खरेदीकामी विहित पद्धतीने फेर ई-निविदा मागविण्यास तसेच सदरचे खरेदीकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.३४,६५,०००/- (अक्षरी रु.चौतीस लाख पासष्ट हजार मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८०८** **यावर सविस्तर चचा्र होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस.ओ.टी.१ मधील जुना Shadowless Lamp Buyback न करता त्याचा वापर श्री साईनाथ रुग्णालयामध्ये करणेत यावा, यासाठी M/s Esbee Dynamded Pvt. Ltd., Mumbai यांना दिलेला पुरवठा आदेश रद्द करणेत येऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस.ओ.टी.१ विभागाकरीता नवीन Shadowless Lamp खरेदी करणेकामी नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी.**

**तसेच तांत्रिक निविदा उघडतेवेळी संबंधीत डॉक्टरांमसक्ष विविध कंपन्यांकडील Shadowless Lamp चा डेमो दाखविण्यात येऊन, खरेदी करावयाचा नमुना अंतीम करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.५५** **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डेंटल या विभागाकरिता डेंटल मटेरियल खरेदीकामी कोटेशन मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये दंत विभाग स्वंतत्र भाग असून त्यात रुग्णांची तपासणी केल्यानंतर त्यांना आवश्यक असलेले दाताची कवळी व इतर दंत विषयक अथवा दंत सौदर्य वर्धक साहित्याची योग्य ती मोजमापे घेवुन त्यानुसार प्रचलित दराने योग्य ती फी रुगणामार्फत हॉस्पिटलमध्ये भरणा केल्यानंतर सदर साधने लॅब मधुन बनवुन घेवुन,ती संबंधीत रुग्णास देण्यात येतात.

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डेंटल या विभागाकरिता कृत्रिम दंत साहित्याची आवश्यकता असते. सदर मटेरियलसाठी ई – निविदा काढण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार दि. ०९/१२/२०१४ रोजीचे मा. उपसमिती सभेपुढे ठेवण्यात आला होता, यावर सविस्तर चर्चा होऊन श्री साईबाबा हॉस्पिटलमधील दंत विभागाकरिता आवश्यक असलेले साहित्य बाहेरील लॅबमधूनबनवून घेणेकामी वर्तमानपत्रामध्येजाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, विहित पध्दतीने निविदा मागविणेस व या कामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ३,०२,८००/- इतक्या खर्चास मान्यता देण्यात यावी अशी शिफारस मान्य करण्यात आली होती.त्यानुसार ई-निविदा काढण्यात आल्या होत्या. पहिल्या, दुस-या व तिस-या ई-निविदेस अनुसरुन एकुण ०३ निविदा न आल्यामुळे चौथ्यांदा ई-निविदा काढण्यात येत होत्या.परंतु Dental विभागात सदर मटेरियलची तातडीने आवश्यकता असल्यामुळे मागणीमधील नगसंख्या Detal विभागाचे डॉक्टरांनी कमी करुन दिलेली आहे.नगसंख्या कमी होवुन खर्चाची रक्कम रु.३,००,०००/- पेक्षा कमी येत असल्यामुळे हयाकामी कोटेशन मागविण्यात येईल.

सदरच्या डेंटल मटेरियलचा तपशिल खालील प्रमाणे **:-**

| **Sr. No.** | **Treatment Procedure** | **App. Rate Per Procedure** | **App. Procedure done per year** | **App. Procedure Total Amt. in Rs.** |
|---|---|---|---|---|
| **Ceramic Work** | | | | |
| 1) | Full ceramic Fuse to Metal Per Unit with Die Cutting & Ditching | 400.00 | 305 | 122000.00 |
| 2) | Half Ceramic(Facing) Fuse to Metal / Unit | 350.00 | 10 | 3500.00 |
| 3) | Ceramic Free Metal per Unit | 120.00 | 15 | 1800.00 |
| **Metal Work** | | | | |
| 4) | White Metal with Acrylic Facing per Unit | 120.00 | 5 | 600.00 |
| 5) | White Metal Without Facing / Unit | 100.00 | 100 | 10000.00 |
| 6) | J. Gold (Gold Techincal Alloy) Without Acrylic Facing per Unit | 75.00 | 10 | 750.00 |
| **Acrylic Work** | | | | |
| 7) | Acrylic J. C. Per Unit | 45.00 | 10 | 450.00 |
| 8) | C.D. In Fiber Glass With Normal Teeth Set Upto Polish | 450.00 | 8 | 3600.00 |
| 9) | C.D. In Lucitone With Kulzer Teet Set Upto Polish | 750.00 | 5 | 3750.00 |
| 10) | C.D. In High Impact (Meleodent, Germany) With Kulzer Teeth Se | 750.00 | 5 | 3750.00 |
| 11) | Additional if Required Extra Imprted Teeth Set Will Be Charged | 250.00 | 5 | 1250.00 |
| 12) | R.P.D. Upto 3 Teeth | 150.00 | 11 | 1650.00 |
| 13) | Additional Per Teeth | 10.00 | 10 | 100.00 |
| 14) | Each Clasp | 450.00 | 5 | 2250.00 |
| 15) | More Than 8 Teeth Will be Considered C.D. Charge | 250.00 | 5 | 1250.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 16) | Additional Palatal/ Lingual Bar Each | 50.00 | 10 | 500.00 |
| 17) | Speacial Tray in Shelac Base Plate U/L | 75.00 | 15 | 1125.00 |
| 18) | Speacial Tray in Formatry Material U/L | 75.00 | 15 | 1125.00 |
| 19) | Record Base in Shelac With Wax Rim U/L | 150.00 | 5 | 750.00 |
| 20) | Obaturator | 220.00 | 5 | 1100.00 |
| **New Aditional Procedure** | | | | |
| 21) | Ceramic Crown by CAD / CAM | | | |
| | 5 years Warranty | 900.00 | 10 | 9000.00 |
| 22) | Impant Prosthesis Per Unit | | | |
| | PFM | 1000.00 | 10 | 10000.00 |
| | Metal Free | 4000.00 | 5 | 20000.00 |
| 23) | Flexible RPD | 4000.00 | 5 | 20000.00 |
| 24) | Flexible CD | 3500.00 | 5 | 17500.00 |
| | **Total Amt. in Rs.** | | | **237800.00** |

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ अन्वये परिच्छेद ३.२.३ – रु. ५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असले तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे. एका आर्थिक वर्षात एकाच वस्तूच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु. ३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु. ३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत**:- श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डेंटल या विभागाकरिता कृत्रिम दंत साहित्याची आवश्यकता आहे. सदर मटेरियलसाठी ई– निविदा काढण्यात आलेल्या होत्या. त्याकामी ०१ निविदा प्राप्त झाली होती. परंतु, खरेदी प्रक्रियेमध्ये कोणत्याही वस्तूची खरेदी करतांना कमीत – कमी ०३ निविदांची आवश्यकता असते.

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डेंटल या विभागाने मागणी केलेली डेंटल साहित्याची संख्या डॉक्टरांना विचारुन कमी करण्यात आली आहे. त्यामुळे कमी केलेल्या डेंटल साहित्यांची किंमती ही तीन लाखापेक्षा कमी येत असल्यामुळे डेंटल साहित्य हे कोटेशन मागवून खरेदी करावी लागणार आहे. त्यामुळे नवीन कृत्रिम दंत साहित्याची कोटेशन मागवून खरेदी करता येईल.

शासनाचे नवीन खरेदी कार्यपध्दतीची नियमावलीनुसार उपरोक्त कृत्रिम दंत साहित्याची विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या रु. २,३७,८००/- मात्रचे खर्चाचे प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डेंटल विभागाकरिता विहीत पध्दतीने कोटेशन मागवून डेंटल मटेरियल खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामधील डेंटल विभाग एकत्र करणेबाबतचा प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**<u>यानंतर पुरवणी विषयांवर चर्चा करणेत आली.</u>**

**पुरवणी**

**विषय नं.०१** **संस्थानचे आरोग्य विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना त्यांचे पाल्यांचा शैक्षणिक शुल्काचा परतावा देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.कोर्ट रिसिव्हर यांचे काळापासून सस्थान आस्थापनेवरील केवळ स्थायी पदावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना त्यांच्या पाल्यांचा शैक्षणिक शुल्काचा परतावा आदा केला जात आहे. सदर शैक्षणिक शुल्क परतावा देणेकामी तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.२१/०४/१९९६ चे सभेतील निर्णय क्र.८९ (०१) अन्वये, मार्गदर्शक तत्वे-तथा-नियमावली ठरविण्यात आलेली आहे. या नियमावलीनुसार प्रत्येक वर्षी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने व मा.व्यवस्थापन समितीने मंजुर केलेल्या मार्गदर्शक तत्वे–तथा-नियमावलीस अधीन राहुन स्थायी कर्मचा-यांना त्यांचे पाल्यांचा शैक्षणिक शुल्काचा परतावा दिला जात आहे. त्यास महाराष्ट्र शासनाने पारित केलेल्या अधिनियमानुसार मा.विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि.१६ जुलै, २००९ रोजीचे पत्राने सदर योजना मा.व्यवस्थापन मंडळाचे सन १९९६ चे सभेतील निर्णयाप्रमाणे संस्थान कर्मचा-यांना लागू आहे, त्याच धर्तीवर ती यापुढे प्रचलित पद्धतीने चालु राहील अशी मंजुरी दिलेली आहे

मा.श्री.विजयकुमार, सदस्य, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे अध्यक्षतेखाली शिर्डी स्थित संस्थान कार्यालयात संस्थानचे आरोग्य विभागाकडील कायम व कंत्राटी कर्मचा-यांना संस्थानमार्फत उपलब्ध करुन देण्यात येत असलेल्या सोई-सुविधा व इतर अनुषंगिक बाबींबाबत बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये श्री.विजयकुमार यांनी श्री साईबाबा संस्थानचे कायम कर्मचा-यांना त्यांच्या पाल्यांचा देण्यात येत असलेल्या शैक्षणिक शुल्काचा परतावा सवलत, संस्थानचे आरोग्य विभागाकडे कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना देखील लागू करणेत यावी, असे निर्देश दिलेले होते.

मा.विजयकुमार, यांचे निर्देशानुसार याबाबत सविस्तर प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे दि.२८.१२.२०१५ रोजीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर करणेत आलेला होता. तथापि मा.त्रिसदस्य समितीचे सभेमध्ये सदरचा प्रस्ताव अमान्य करणेत आलेला असून, सदरहु विषय माहितीसाठी मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करणेत यावा, असे ठरलेले होते. त्यानुसार जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/७९४/२०१६ दि.२३ मे, २०१६ रोजीचे पत्रान्वये सदरची माहिती मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय यांना कळविण्यात आलेली होती.

क्रमांक सासंकि-२०१६/७७७/प्र.क्र.१०४/का.१६, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि.१६ जुलै, २०१६ रोजीचे पत्रान्वये "श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.२८.१२.२०१५ रोजीच्या बैठकीमधील निर्णय क्र.६२१ नुसार आपण संदर्भ क्र.१ येथील पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने विभागाद्वारे शासन मान्यतेस्तव सादर करण्यात आलेल्या प्रकरणी "शिक्षणासारखी मुलभूत बाब असल्याने फेरविचार करुन सादर करावे" असे आदेश मा.मुख्यमंत्री महोदय यांनी दिले आहेत, यासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, उपरोक्त शासन आदेश विचारात घेऊन प्रस्ताव फेर सादर करण्यात यावा" असे कळविलेले आहे.

सदरबाबत इकडील कार्यालयाकडून दि.०१.०८.२०१६ रोजी अवलोकनार्थ टिपणी सादर केली असता, त्यावर आरोग्य विभागातील कंत्राटी कर्मचा-यांबरोबरच संस्थानमधील सर्व कंत्राटी कर्मचा-यांच्या पाल्यांना शैक्षणिक शुल्क परतावा देणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत यावा असे निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार संस्थानमधील एकुण कंत्राटी कर्मचारी यांची माहिती कामगार विभागाकडून संकलित केली असता आज अखेर संस्थानमध्ये विविध विभागात एकुण २७३६ कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत.

स्थायी कर्मचा-यांच्या (२११७) पाल्यांचा शैक्षणिक फी परतावा करणेकामी सन २०१६-१७ करिता अंदाजे रु.७१,११,५५०/- (अक्षरी रुपये एकाहत्तर लाख अकराहजार पाचशे पन्नास) मात्र खर्च अपेक्षित आहे. जर कंत्राटी कर्मचा-यांच्या पाल्यांना शैक्षणिक फी परतावा करावयाचा झाल्यास कर्मचारी संख्या (२७३६) विचारात घेता त्यांचेकरिता अंदाजे रु.८०,००,०००/- (अक्षरी रुपये ऐंशीलाख) मात्र वार्षिक खर्च अपेक्षित आहे. सबब संस्थानचे स्थायी कर्मचा-यांप्रमाणेच जर कंत्राटी कर्मचारी यांचे पाल्यांना शैक्षणिक फी परतावा करणेकामी अंदाजे रु.८०,००,०००/- (अक्षरी रुपये ऐंशी लाख) मात्र अतिरिक्त वार्षिक खर्च अपेक्षित आहे. तसेच सदरचा खर्च प्रतिवर्षी २० ते ३० टक्क्यांनी वाढत जाईल.

तरी संस्थानचे स्थायी कर्मचा-यांप्रमाणे कंत्राटी कर्मचारी यांचे पाल्यांना शैक्षणिक फी परतावा करणेबाबतचा विषय धोरणात्मक असल्याने सदर प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मानवतेच्या दृष्टीकोनातून कायम कर्मचाऱ्यांप्रमाणेच श्री साईबाबा संस्थानमध्ये कार्यरत असणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचा शैक्षणिक फी परतावा अदा करणेस मान्यता देण्यात आली. तसेच सदरहू शैक्षणिक फी परतावा देणेकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे प्रस्ताव पाठविणेत यावा, परंतु यामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांचा संस्थानवर कोणताही दावा राहणार नाही, असे लेखी स्वरुपात घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**पुरवणी**

**विषय नं.०२** **सहा.आचारी व प्रोग्रामिंग ॲण्ड आय.टी. सुपरवायझर या पदांबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासनाने दि.०७/०८/२००९ रोजी आकृतीबंधास मान्यता दिलेली आहे. सदर आकृतीबंधात सहा.आचारी व प्रोग्रॅमिंग ॲण्ड आय.टी.सुपरवायझर हे पदनाम समाविष्ट नाही. तथापी सदर पदावर १-१ कर्मचाऱ्याची नेमणूक करणेत आलेली आहे सदरचे पद प्रत्यक्षात प्रसादालय व माहिती तंत्रज्ञान विभागाचे आस्थापनेवर भरलेले असल्याने बिंदूनामावली तपासणी करतांना सदर पदाची मंजूरीची आवश्यकता आहे, असे उपरोक्त संदर्भ क्र.०१ चे पत्रान्वये मागासवर्ग कक्ष यांनी कळविले आहे.

शासन निर्णय क्र.सासंकि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा, मंत्रालय, मुंबई-३२ दि.०७/०८/२००९ नुसार शासनाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या आस्थापनेवरील पदांचे आकृतीबंधास मान्यता दिलेली आहे. त्यातील माहिती तंत्रज्ञान विभाग व प्रसादालय विभागाचे आकृतीबंधाची प्रत सोबत जोडली आहे. त्यात सहा.आचारी व प्रोग्रॅमिंग ॲण्ड आय.टी.सुपरवायझर या पदांचा समावेश नाही

**(१)** सहा.आचारी या पदावर श्री.धन्नाराम आण्णाराम पुरोहीत हे दिनांक ०३/०५/१९८९ पासून संस्थान सेवेत कार्यरत आहेत. त्यांना यापुर्वी सेवांतर्गत आश्वसित प्रगती योजनेअंतर्गत वरिष्ठ पदाचा लाभ देण्यात आलेला आहे. सध्यस्थितीत त्यांना ५२००-२०२०० अधिक ग्रेड पे २१०० याप्रमाणे वेतन देण्यात येत आहे.

आकृतीबंधानुसार प्रसादालय विभागाचे आस्थापनेवर आचारी वेतनबॅण्ड ४४४०-७४४० अधिक ग्रेड पे १६०० मध्ये एकूण स्थायी पदसंख्या १० मंजुर आहेत त्यापैकी ०३ पदे भरलेली असून ०७ पदे रिक्त आहेत. मंजुर आकृतीबंधात सहा.आचारी हे पदनाम मंजुर नसल्याने या पदाची बिंदु नामावली तयार करणेस अडचणी येत आहेत. श्री.धन्नाराम आण्णाराम पुरोहित हे दि.०३/०५/१९८९ पासून सहा.आचारी या पदावर काम करत आहेत. मंजुर आकृतीबंधातील आचारी या पदाची वेतनश्रेणी पेक्षा जास्तवेतन त्यांना सध्यस्थितीत मिळत आहे. त्यांचे पदनाम सहा.आचारी ऐवजी आचारी असे केल्यास संस्थानवर कोणताही आर्थिक भार पडणार नाही.

**(२)** तसेच प्रोग्रॅमिंग ॲण्ड आय.टी.सुपरवायझर या पदावर श्री.राहुल वामन गलांडे हे दिनांक २७/१२/२००१ पासून कार्यरत आहेत. त्यांना यापुर्वी सेवांतर्गत आश्वसित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे. त्यानुसार त्यांना सध्यस्थितीत वेतनबॅण्ड ९३००-३४८०० अधिक ग्रेड पे ४६०० याप्रमाणे वेतन देण्यात येत आहे. श्री.राहुल वामन गलांडे यांनी B.E.(Electronics), D.E.C., M.C.P.Brain Banch Certified अशी शैक्षणिक पात्रता धारण केलेली आहे.

सध्यस्थितीत माहिती तंत्रज्ञान विभागाचे आस्थापनेवर खालीलप्रमाणे पदे रिक्त असून प्रस्तावीत सेवाप्रवेश नियमात खालीलप्रमाणे शैक्षणिक पात्रता, वेतनश्रेणी नमूद केलेली आहे.

| अ.नं. | पदनाम | मंजुर वेतनश्रेणी अधिक ग्रेड पे | प्रस्तावीत शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| ०१ | सिस्टीम ॲडमिनीस्ट्रेटर | ९३००-३४८०० + ४६०० | 1) B.E. Computer / Electronics / I.T.<br>2) Microsoft certified professional (MCP)<br>3) ITIL Certification<br>4) Experience minimum 5 years as a Network Engineer in Sansthan. |
| ०२ | डेटाबेस ॲडमिनीस्ट्रेटर | ९३००-३४८०० + ४६०० | 1) B.E. Computer / Electronics / I.T.<br>2) Oracle / RDBMS Certified.<br>3) Experience minimum 5 years as a Network Engineer in Sansthan. |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३ | नेटवर्क इंजिनिअर | ९३००-३४८००+४४०० | 1) B.E.Computer / Electronics / I.T. / M.Sc./ MCM<br>2) CCNA / CCNP Certification.<br>3) Experience minimum 3 years as a Technical Assistant in Sansthan. |
| ०४ | हार्डवेअर इंजिनिअर | ९३००-३४८००+४२०० | 1) B.E.Electronics / I.T. OR 3 year Diploma in Electronics engineering / DETE / M.Sc. / B.Sc. Electronics.<br>2) Experience minimum 3 years as a Technical Assistant in Sansthan. |
| ०५ | सॉफ्टवेअर प्रोग्रॅमर | ९३००-३४८००+४२०० | 1) B.E. Electronics/ I.T./Computer/ MCM/MCS/ BCS and Microsoft / Java / Oracle international level certification.<br>2) Experience minimum 3 years as a Technical Assistant in Sansthan. |

श्री.राहुल गलांडे यांनी धारण केलेली शैक्षणिक पात्रता व त्यांना सध्यस्थितीत मिळत असलेले वेतन विचारात घेता, त्यांचे पदनाम प्रोग्रॅमिंग ॲण्ड आय.टी.सुपरवायझर ऐवजी सिस्टीम ॲडमिनिस्ट्रेटर असा बदल केल्यास संस्थानवर कोणताही आर्थिक भार पडणार नाही.

यापुर्वी जा.नं.एसएसएस/वशी-०१/३१९/२०१३ दि.२६/०४/२०१३ तसेच जा.क्र.एसएसएस/वशी-०१/१८९१/ २०१४ दि.०५/०८/२०१४ चे आदेशान्वये ८ कर्मचा-यांचे पदनाम मंजुर आकृतीबंधाप्रमाणे करणेत आलेले आहे.

सबब, प्रस्तावीत सेवाप्रवेश नियम, बिंदु नामावली नोंदवही तयार करणेसाठी प्रशासकीय कारणास्तव उपरोक्त अ.नं.१ मध्ये नमुद केलेप्रमाणे श्री.धन्नाराम आण्णाराम पुरोहीत यांचे पदनाम सहाआचारी ऐवजी आचारी असे करणेस तसेच अ.नं.२ मध्ये नमुद केलेप्रमाणे श्रीराहुल वामन गलांडे योचे पदनाम प्रोग्रॅमिंगॲण्ड आय.टी.सुपरवायझर ऐवजी सिस्टीम ॲडमिनिस्ट्रेटर असा बदल करणेच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८११** **यावर सविस्तर चचा्र होऊन, प्रस्तावीत सेवाप्रवेश नियम, बिंदु नामावली नोंदवही तयार करणेसाठी प्रशासकीय कारणास्तव श्री.धन्नाराम आण्णाराम पुरोहीत यांचे पदनामामध्ये सहाय्यक आचारी ऐवजी आचारी व श्री.राहुल वामन गलांडे यांचे पदनामामध्ये प्रोग्रॅमिंग ॲण्डआय.टी.सुपरवायझर ऐवजी सिस्टीम ॲडमिनिस्ट्रेटर असा बदल करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**पुरवणी**

**विषय नं.०३** **कार्यालयासाठी संस्थानच्या तीन रुम मिळणेबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, कोपरगाव यांचा दि.१८.१०२०१६ रोजीचा अर्ज.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, कोपरगाव यांनी दि.१८/१०/२०१६ रोजीचे पत्राने, “महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग कोपरगाव मार्फत शिर्डी संस्थानकरीता नळ पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उदभव धरुन) राबविण्यात येणार आहे. त्याकरीता योजनेच्या दैनंदिन कामाकरीता शिर्डी येथे कार्यालय असणे गरजेचे असल्यामुळे आपले अधिका-या सोबत समन्वय राहिल व काम चांगले प्रकारे करता येईल. त्याकरीता संस्थान मार्फत तीन रुम तात्पुरत्या स्वरुपात कार्यालयाकरीता मिळावे.” अशी विनंती करण्यात आलेली आहे.

तसेच अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, अहमदनगर यांनी दि.२०/१०/२०१६ रोजीचे पत्राने, “उपविभाग कोपरगाव हे सध्या कोपरगाव नगरपालिका इमारतीत अस्तित्वात असून सध्यस्थितीत कोपरगाव नगरपालिका इमारतीचे नुतनीकरण करण्यात येणर आहे. त्यासाठी कोपरगाव नगरपालिकेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, कोपरगाव यांना सदरची जागा रिक्त करुन देणेबाबत कळविले आहे. त्याअनुषंगाने सदर उपविभाग यांना कार्यालयीन कामकाजाकरीता नविन जागेची अत्यंत आवश्यकता आहे. तसेच शिर्डी संस्थानकरीता नळ पाणी पुरवठा योजनेस (निळवंडे धरण उदभव) प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून सदर योजनेचे काम हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग यांचे मार्फतच करण्यात येणार आहे. सदर योजनेची पहाणी

व क्षेत्रिय तपासणी करीता सदर कार्यालय शिर्डी येथे ठेवल्यास कामकाजाच्या दृष्टीने आपल्या अधिका-यासोबत समन्वयासाठी योग्य राहील व सदरच योजनेच्या कामाबाबत त्वरीत कार्यवाही करणे शक्य होईल व कामाची गुणवत्ता उत्तम राखण्यासाठी सुध्दा मदत होईल.

तरी उपरोक्त वस्तुस्थिती व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग कोपरगाव यांना सध्या कार्यालयाची अत्यंत निकट लक्षात घेवून सदर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग कोपरगाव कार्यालयास कार्यालयीन कामकाजाकरीता त्वरीत तीन रुम उपलब्ध करुन देण्यात याव्यात ही विनंती."असे कळविलेले आहे.

**(ब)** संस्थान अधिनियम २००४, कलम १७ समितीची 'कर्तव्य व अधिकार' या शिर्षाखाली पोटकलम (३) मध्ये, "विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पुर्वमंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही, किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यसंक्रमित करण्यात येणार नाही." अशी तरतूद आहे. याचाच अर्थ उक्त प्रयोजनासाठी संस्थान व्यवस्थापन मा.शासनाच्या पुर्वमंजूरीने केवळ वापर तत्वावर अशा खोल्या/ जागा शासकीय यंत्रणेस भाडेतत्वावर उपलब्ध करुन देऊ शकते. यापुर्वी अशा प्रकारे राज्य गुप्तवार्ता, उपविभाग शिर्डी व एस.आय.बी.नाशिक, शाखा शिर्डीचे कार्यालयासाठी संस्थानच्या रुम महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडील दरानुसार निश्चित केलेल्या दरानुसार भाडे रक्कम व होणारा विद्युत आकार दरमहा संस्थानकडे जमा करणेची अटीवर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत व सदर केलेल्या कार्यावहीस कार्योत्तर मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव मा.शासनाकडे सादर केलेला आहे. तथापी, त्यास मा.शासनाकडून अद्यापपावेतो कार्योत्तर मान्यता मिळालेली नाही.

तसेच मध्यंतरीचे काळात संस्थानकडून जा.क्र.एसएसएस/ साप्रशा-आस्था/६७६४२०१६ दि.०९/०३/२०१६ रोजीचे पत्राने शिर्डी व राहाता येथे कार्यरत असणा-या शासकीय अधिका-यांना संस्थान निवासस्थाने उपलब्ध करुन देणेच्या केलेल्या कार्यवाहीला कार्योतर मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्यावर मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासनाने दि.१४ जुलै,२०१६ रोजीचे पत्राने केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता दिलेली आहे. तसेच संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७(३) नुसार भविष्यात संस्थानच्या मालकीची निवासस्थाने संस्थान अधिकारी/ कर्मचारी यांच्याखेरीज अन्य कोणत्याही अधिकारी/ कर्मचारी यांना भाडेतत्वावर अथवा ११ महिन्यांच्या कराराने अथवा Leave & License तत्वावर अशा कोणत्याही स्वरुपात शासन मान्यतेशिवाय देण्यात येऊ नयेत, असे निर्देश दिलेले आहेत.

तरी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उपविभाग कोपरगाव यांचे कार्यालयासाठी संस्थानच्या तीन रुम उपलब्ध करुन देणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमध्ये असलेली खोल्यांची कमतरता पहाता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, कोपरगाव यांचे कार्यालयासाठी तीन खोल्या देणे शक्य होणार नाही, याकरीता उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**पुरवणी**

**विषय नं.०४** **शिर्डी महोत्सव- २०१६ साजरा करणेस व खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान मार्फत वर्षाचा शेवट व नवीन वर्षाची सुरुवात चांगल्यारितीने व्हावी सदरचा दिवस श्रींच्या सानिध्यात चांगल्या पद्धतीने जावा या उद्देशाने दरवर्षी ३१ डिसेंबरला भारतातून तसेच परदेशातून मोठया संख्येने साईभक्त शिर्डीत साईबाबांच्या दर्शनासाठी येत असतात. श्रींच्या दर्शनापासून कोणीही वंचीत राहू नये म्हणून मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार समाधी मंदीर भक्तांना साईबाबांचे दर्शनासाठी रात्रभर उघडे ठेवण्यात येत असते. तसेच शिर्डी महोत्सव हा उत्सव सन २००४ पासून सुरु करण्यात आलेला आहे. ३१ डिसेंबरच्या रात्री संस्थान परिसरात साईभजन,नृत्य,गायन इ.कार्यक्रमांचे आयोजीत केले जाते या कार्यक्रमासाठी विविध भागातून कलाकार कार्यक्रम सादरकरणेसाठी संस्थानकडे अर्ज करतात.

शिर्डी महोत्सव साजरा करणेसाठी संस्थानमार्फत साई भक्तांसाठी धार्मिक,सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

**अ) अंदाजपत्रक–** सन २०१५ चे शिरडी महोत्सवाकरीता झालेल्या व सन २०१६ चे शिर्डी महोत्सवासाठी अपेक्षित खर्चाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशील | श्री शिर्डी महोत्सव २०१५ | | श्री शिर्डी महोत्सव अंदाजे खर्च २०१६ |
|---|---|---|---|---|
| | | अंदाजे खर्च | प्रत्यक्ष खर्च | |
| १ | मंडप, कमानी व स्टेज खर्च (डेकोरेशन व सजावटीसह) | ३७,६००.०० | ४,४३,७७३.०० | ५,००,०००.०० |
| २ | व्हिडीओ शुटिंग खर्च(स्क्रिन – भाडे) | - | ५,४७,२००.०० | ६,००,०००.०० |
| ३ | कलाकार मानधन | ५००.०० | ९५.०० | ५०,०००.०० |
| ४ | इतर किरकोळ खर्च (क्रेन भाडे, वाहन भाडे, बोर्ड, कॅटरींग बिल,जादा कर्मचारी व इतर खर्च ) | ४,१४,९०० | ३,१३,७४५.०० | ४,००,०००.०० |
| | **एकूण खर्च** | **४,५३,०००.००** | **१३,०४,८१३.००** | **१५,५०,०००.००** |

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १५/१२/२०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र. ५८९ अन्वये शिर्डी महोत्सव- २०१५ साजरा करण्यासाठी एकुण रु.३,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली होती.

**ब) कलाकार निश्चिती–** याही वर्षी मागील वर्षाप्रमाणे शिर्डी महोत्सवासाठी दि.३१/१२/२०१६ रोजी निमंत्रीत गायकांचे व कलाकारांचे दि ३१/१२/२०१६ रोजी भजन, गायन,नृत्य इ. कार्यक्रम आयोजीत करणे,निमंत्रित कलाकार यांचे मानधन निश्चीत करावे लागणार आहेत. कार्यक्रम मिळणेबाबत आलेल्या अर्जाचा तपशिलवार तक्ता अलहिदा सादर करण्यात येईल.

**क) कार्यक्रमाचे स्थळ-** मागील वर्षी साईनगर मैदानावर निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वर्षी ही साईनगर मैदानावर निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करता येईल.

शिर्डी महोत्सव -२०१६ साजरा करणेसाठी अंदाजे रु. १५,५०,०००/- ( रु.पंधरा लाख पन्नास हजार) मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी संस्थान मार्फत शिर्डी महोत्सव -२०१६ मध्ये मागील वर्षाप्रमाणे साईनगर मैदानावर निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रमाचे आयोजन करणेस व सदरकामी येणा-या अंदाजे रु. १५,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दरवर्षाप्रमाणे याही वर्षी शिर्डी महोत्सव- २०१६ साजरा करणेस मान्यता देण्यात आली. परंतु त्यासाठी रु.१५,५०,०००/- येणारा अंदाजित खर्च खुपच जास्त वाटतो, असे समितीचे मत झाले. याकरीता शिर्डी महोत्सव- २०१६ मध्ये दि.३१.१२.२०१६ रोजी सबका मालिक एक या महानाटयाचे प्रयोग ठेवण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**पुरवणी**

**विषय नं.०५** **श्रीसंत राममारुती महाराज (समाधी स्थान कल्याण) यांचा फोटो समाधी मंदिरातील सभा मंडपात/ वस्तु संग्रहालयातील समकालीन संताच्या फोटोच्या ठिकाणी लावणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रींचे समाधी मंदिराचे सभामंडपाचे सध्या चारही बाजुने पुर्वीपासुन एकूण१३ फोटो लावण्यात आलेले आहेत. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नाही. तसेच फोटोच्या खालचे बाजुस प्रत्येकाचे नामफलक लावण्यात आलेले आहेत. त्याप्रमाणे श्रीराममारुती महाराज यांचा फोटो समाधी मंदिर अथवा म्युझियम येथे लावणेबाबत यापुर्वीही श्रीराममारुती महाराज समाधी संस्थानमार्फत विनंती अर्ज करण्यात आला होता त्यावेळी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१३ रोजीचे सभेतील विषय नं.१७, निर्णय क्र.९०६नुसार सदरहू विषय स्थगीत ठेवण्यात यावा असे ठरले असून, त्यानुसार जा.क्र.एसएसएस/ मंदिर/४११४/२०१४, दि.२९/११/२०१४ नुसार श्री शिरीष अनंत गडकरी, अध्यक्ष व विश्वस्त यांना कळविण्यात आलेले आहे.

**<u>प्रस्ताव</u>-** आता पुन्हा श्रीसाईनाथ महाराजांचे व श्रीराममारुती महाराजांचे समाधी शताब्दी-२०१८ मध्ये साजरा होणार आहे. त्यापुर्वी श्रीराममारुती महाराज यांचा फोटो समाधी मंदिर अथवा म्युझियम येथे लावणेबाबत श्रीशिरीष गडकरी, अध्यक्ष व विश्वस्त, श्रीराममारुती महाराज समाधी संस्थानमार्फत दि.२९/०८/२०१६चे अर्जान्वये विनंती करण्यात आलेली आहे. तरी त्याबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**<u>विभागाचा अभिप्राय</u>-** संस्थानचे सल्लागार व पुरातत्व तज्ञ मा.पद्मश्री.सदाशिवराव गोरक्षकर साहेब यांनी अशा सूचना केल्या आहेत की शिर्डी येथे श्रींचे दर्शनासाठी येणा-या गर्दीचे प्रमाणामध्ये दिवसें-दिवस

प्रचंड वाढत होत आहे. त्यामुळे साईभक्तांना समाधी मंदिराचे सभामंडपात लावलेले फोटो व्यवस्थित पाहता येत नाही, व त्या व्यक्तींसंबंधी व्यवस्थीत माहितीही मिळत नाही. त्यामुळे यापुढे श्रीसमाधी मंदिरात नवीन फोटो लावण्यात येऊ नयेत, साईभक्तांना त्याबाबत व्यवस्थीत माहिती मिळत नाही. संस्थानचे आर्ट गॅलरी (म्युझियम) विस्तारीकरणानंतर सर्व फोटो त्यांचे माहितीसह त्याठिकाणी लावण्यात यावे, अशी सूचना केलेली आहे. त्याचप्रमाणे सध्याचे वस्तु संग्रहालयामध्ये (म्युझियम) जागाही अपुरी असल्याने मंदिर नुतनीकरण झाल्यानंतर त्यावेळी नवीन मोठे संग्रहालय बनविण्यात येईल व त्यावेळी सर्वच साईबाबांचे सानिध्यातील व श्रीसाईसच्चरितामध्ये उल्लेख असलेले साईभक्तांचे छायाचित्र लावणेबाबत विचार होऊ शकेल. सध्या असलेल्या फोटोमध्ये नवीन फोटो लावण्याचे असल्यास इतरही बरेच साईभक्तांचे वंशज यांचा फोटो लावणेबाबत आग्रह धरतील.

सध्या समाधी मंदिराचे सभामंडपामध्ये पुर्वेकडे अंदाजे०४ -०५ फोटो लावता येईल एवढीच जागा उपलब्ध आहे परंतु, अशाच पद्धतीने समाधी मंदिराचे सभामंडपामध्ये श्रींचे समकालीन असलेले साईभक्त १) कै.गंगुबाई औरंगाबादकर, २) कै.शांताराम बळवंत नाचणे, ३) कै.वामनराव (दादा) माणकोजी पा. गोंदकर, ४) कै.हरी केशव कर्णिक, ५) कै.खुशालचंद सांड ६) कै.रावसाहेब बापूराव राघोजी बोरावके, ७) श्री नरसिंह गोपालदास महाराज, ८) प.पू.माधवनाथ महाराज, ९) कै.डॉ.आण्णासाहेब गव्हाणकर, १०) प.पू.उद्धवेश रानडे, ११) कै.निवृत्ती हनुमंतराव पागोंदकर, १२) कै.डॉ.एम.के.किर्तीकर, १३) कै.काकासाहेब दिक्षीत, १४) प.पू.स्दगुरु कम्मूबाबा १५) कै.हरी विनायक साठे, १६) कै.दगडू भाऊ गायके व १७) कै.राममारुती महाराज या सर्वांचे फोटो समाधी मंदिराचे सभामंडपामध्ये लावण्यात यावे असे त्यांचे वंशज/ संबंधीत लोकांनी विनंतीचे अर्ज ईकडील कार्यालयाकडे दिलेले आहेत. त्यावर वेळोवेळी पत्रव्यवहार करुन मा.पद्मश्री.सदाशिवराव गोरक्षकर सो. यांचे सूचनेनुसार नवीन म्युझिम (आर्ट गॅलरी) तयार झाल्यानंतर सर्वांचे माहितीसह फोटो लावता येईल असे त्या-त्या वेळी कळविण्यात आलेले आहे. परंतु, अद्याप आर्ट गॅलेरी तयार झालेली नसल्याने फोटो लावणेबाबत कार्यवाही होणे बाकी आहे.

त्याकरीता साईभक्तांना श्रींचे समकालीन व सानिध्यातील सर्वच भक्तांचेबाबत सविस्तर माहिती मिळावी याकरीता खालीलप्रमाणे नियोजन करता येईल- श्रीसाईबाबांचे समाधी शताब्दी वर्षाचे पुर्वी सन-२०१७ अखेर पर्यंत पुरातत्व तज्ञ मा.पद्मश्री सदाशिवराव गोरक्षकर साहेब यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे बांधकाम विभागामार्फत मंदिर परिसरामध्ये स्वतंत्र आर्ट गॅलरी तयार करुन त्याठिकाणी श्रीसाईसच्चरिताचे अध्याय क्रमांकाचे अनुसार उल्लेख असलेले संबंधीत समकालीन साईभक्ताचा फोटो लावुन त्यासंबंधीचे प्रसंगचित्र तयार करुन त्या फोटो खाली लावण्यात यावे. तसेच संबंधीत साईभक्तांची माहिती(नाव, गाव, साईबाबांचा सहवास-संवाद, इ.) असे तीन भाषेमध्ये लावल्यास शिर्डी येथे येणा-या साईभक्तांना दर्शनाचे व्यतिरीक्त श्रीसाईबाबांचे विषयी व त्यांचे कार्याबाबत अधिक माहिती होईल. तसेच ते शिर्डीतील एक आकर्षनीय स्थळ होईल.

तरी संस्थानमार्फत मंदिर परिसरामध्ये योग्य अशी जागा निवडुन त्याठिकाणी आर्ट गॅलरी तयार करुन श्रीसाईसच्चरितात उल्लेख असलेले सर्वच साईभक्तांचे फोटो सविस्तर माहिती व प्रसंगचित्रासह लावणेबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.८१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत मंदिर परिसरामध्ये योग्य ठिकाणी आर्ट गॅलरी तयार करुन प्रस्तावात नमुद केलेले श्री साईबाबांचे समकालिन संत व साईभक्त यांचे फोटो साईचरित्रामधील सविस्तर माहिती तसेच प्रसंगचित्रासह लावणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**पुरवणी**

**विषय नं.०६** **श्री साईबाबा संस्थानचे व्यायामशाळेकरीता नविन साहित्य खरेदी करणे व व्यायामशाळा अद्यावत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानची व्यायामशाळा सन-२००० साली सुरु झाली असून त्यांस आज रोजी १६ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यामुळे व्यायामशाळेतील साहित्य ब-याच प्रमाणात खराब झालेले आहे. तसेच व्यायामशाळेतील सभासदांची संख्या ४५० ते ५०० च्या दरम्यान आहे. तरी सध्या उपलब्ध असलेले व्यायामशाळा साहित्य अपुरे पडत आहे. जास्त कालावधी झाल्यामुळे काहि साहित्य खराब झाल्यामुळे व्यायाम साहित्य हाताळतांना जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे व्यायामशाळेकरीता नविन साहित्य खरेदी करुन मिळणेबाबत इकडील विभागामार्फत टिपणी सादर केली असता त्यावर मा.उपकार्यकारी अधिकारी सो. यांनी " पुर्वी खरेदी केलेल्या साहित्यांचा तपशिल तसेच सदर व्यायामशाळेचा किती सभासद लाभ घेतात व त्यापासुन

संस्थानला किती उत्पादन मिळते याचा तपशिल सादर करुन मा.मुख्यलेखाधिकारी यांचेमार्फत सादर करणेबाबत" सुचना केलेल्या आहे.

त्याबाबतचा खुलासा खालीलप्रमाणे आहे.

**अ) व्यायामशाळेतील सध्याचे साहित्याचा तपशिल खालीलप्रमाणे –**

| अ.नं. | पुर्वीचे साहित्याचा तपशिल | नग | खरेदी दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | स्कॉट बेंच | ०१ | २५/०६/२००२ |
| ०२ | हायपर एक्सटेंशन | ०१ | २५/०६/२००२ |
| ०३ | रोमन खुर्ची | ०१ | २५/०६/२००२ |
| ०४ | BNET OVER ROVER (T-BAR) | ०१ | २५/०६/२००२ |
| ०५ | इनोलाईन बेंच | ०१ | २५/०६/२००२ |
| ०६ | डिकलाईन बेंच | ०१ | २५/०६/२००२ |
| ०७ | हक स्वायट | ०१ | २५/०६/२००२ |
| ०८ | इनलाईन लेग प्रेस | ०१ | २५/०६/२००२ |
| ०९ | व्हरटिकल लेग प्रेस | ०१ | २५/०६/२००२ |
| १० | पुश अप स्टॅण्ड | ०१ | २५/०६/२००२ |
| ११ | प्लेन बेंच | ०१ | २५/०६/२००२ |
| १२ | पेट प्लेट एकूण वजन २९० किलो. | ३२ | २५/०६/२००२ |
| १३ | क्रॉस ओव्हर मशीन | ०१ | २६/०१/२००७ |
| १४ | बेंच-२, मॅट-१ | ०३ | २६/०१/२००७ |
| १५ | लॉक बुशिंग(बार लॉक) | १४ | २६/०१/२००७ |
| १६ | मल्टीजिम युनीट ॲण्ड स्टेशन<br>अ) चेस्ट प्रेस शोल्डर प्रेस<br>आ) लॅट पुल डाऊन<br>इ) लेग कर्ल ॲण्ड लेग एक्सेन्स<br>ई) डिपींग लेग लेझ<br>उ) ॲबडोमन बोर्ड | ०१ सेट | १९/०१/२००० |
| १७ | मॅन्युअल ट्रिड मिल | ०१ सेट | १९/०१/२००० |
| १८ | बेल्ट मॅसेंजर | ०१ सेट | १९/०१/२००० |
| १९ | एम.एस.वेट प्लेट ५०० के.जी. | ०१ सेट | १९/०१/२००० |
| २० | एम.एस.डंबेल्स ३०० के.जी. | ०१ सेट | १९/०१/२००० |
| २१ | ॲडजेस्टेबल बेंच | ०१ सेट | १९/०१/२००० |
| २२ | बार वेल बार | ०७ नग | १९/०१/२००० |
| २३ | एक्सर सायकल | ०१ नग | १९/०१/२००० |
| २४ | डंबेल्स रॅक(२०)<br>डंबेल्स रॅक (१२) | ०१ सेट<br>०१ सेट | १९/०१/२००० |
| २५ | वेट प्लेट रॅक | ०२ सेट | १९/०१/२००० |

**ब)** सध्याच्या काळात व्यायामशाळेत साधारपणे ४५० ते ५०० सभासद असून प्रति मासिक रु. ४५,०००/- ते ५०,०००/- मात्र उत्पन्न होते. जुन्या सभासदास रु.१००/- व नविन आलेल्या सभासदास सुरुवातीस रु१२०/- याप्रमाणे फी आकारण्यात येते.

सदर व्यायामशाळेचे साहित्य हे जास्त कालावधी झाल्यामुळे व दैनंदिन वापरामुळे खराब झालेले असल्याने व्यायामशाळेसाठी नविन साहित्य खरेदी करुन व्यायामशाळेची क्षमता वाढवून (नविन शेडसह) वातानुकुलित यंत्रणेसह अद्यावत करणेकामी मा.श्री. सचिन तांबे, विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान यांनीही तोंडी सुचना केलेल्या आहेत. त्यास अनुसरुन व्यायामशाळा अद्यावत करणेकामी पुर्वीच्याटिपणीत नमुद केलेल्या साहित्याच्या व्यतिरीक्त खालीलप्रमाणे नविन साहित्य खरेदी करावे लागेल.

| **अ.नं.** | **साहित्याचा तपशिल** | **नग** |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| 01 | PEC PLY / REAR DELT(JC 101) | 01 |
| 02 | VERTICAL CHEST PRESS (JC 103) | 01 |
| 03 | LAT PULL DOWN (JB201) | 01 |
| 04 | LONG PULL ROW (JB204) | 01 |
| 05 | SHOULDER PRESS (JS302) | 01 |
| 06 | BICEP CURL (JBT401) | 01 |
| 07 | LEG EXTENSION WITH R.O.M. (JL 501) | 01 |
| 08 | PRONE LEG CURL (JL503) | 01 |
| 09 | 45° LEG PRESS (JL510) | 01 |
| 10 | SEATED CALF (JL513) | 01 |
| 11 | MULTI FUNCTIONAL STATION (JMP 702) | 01 |
| 12 | SMITH MACHINE- COUNTER BALANCED (JMP707) | 01 |
| 13 | OLYMPIC FLAT BENCH (JBR801) | 02 |
| 14 | OLYMPIC INCLINE BENCH (JBR 802) | 02 |
| 15 | OLYMPIC DECLINE BENCH (JBR 803) | 02 |
| 16 | SUPER BENCH (JBR 804) | 04 |
| 17 | UTILITY BENCH (JBR 805) | 01 |
| 18 | BACK EXTENSION (JBR 808) | 01 |
| 19 | TWISTER (JBR 812) | 01 |
| 20 | DUMBBELLS-RUBBERIZED (25X4/5X4/7.5X4/10X4/12.5X4/15X2/20X2/25X2/30X2/35X2/ 40X2/45X2/50X2/55X2/60X2) | 900 |
| 21 | DUMBBELL RACK- TWIN TIER (JBR 815) | 02 |
| 22 | WEIGHT PLATES- RUBBERIZED (2.5X8/5X12/10X12/15X10/20X12) | 590 |
| 23 | OLYMPIC BARBELL (7`X3/4`X1) | 25 |
| 24 | EZ BAR (4`X1) | 04 |
| 25 | BARBELL RACK (JBR816) | 01 |
| 26 | ACCESSORIES RACK (JBR 818) | 01 |
| 27 | ACCESSORIES – HAMMER CURL BAR, STRAIGT HANDLE, EZ CURL HANDLE, V-TRICEP HANDLE, STRAP HANDLE, ROWING HANDLE, BICEP/TRICEP HANDLE, TRICEP ROPE | 01 (EACH) |
| 28 | ELECTRICAL CROSS TRAINER-E7 | 01 |
| 29 | SPINNING BIKE | 02 |
| 30 | RUBBER TILE -20 MM (500MM X 500MM) | 1500 Pcs. |

तरी उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे व्यायामशाळा वातानुकुलितसह अद्यावत करणे तसेच व्यायामशाळेकरीता नविन साहित्य विहित पध्दतीने खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. ६०,००००/- (अक्षरी रुपये साठ लाख) पर्यंत खर्च अपेक्षित असुन सदरचे साहित्य विहित पध्दतीने खरेदीस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी सदर विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानची व्यायामशाळा अद्यावत करणेसाठी बांधकाम व संरक्षण या विभागांनी आवश्यकतेनुसार सविस्तर प्रस्ताव सभेसमोर फेरसादर करणेत यावा. तसेच यामध्ये भारतीय बनावटीचे साहित्य खरेदी करणेचा समावेश करावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ संरक्षण विभागप्रमुख)

---

**पुरवणी**

**विषय नं.०७** **शहर वाहतुक नियंत्रण, शाखा-शिर्डी यांना संस्थानमार्फत (४० कर्मचारी) मनुष्यबळ पुरविणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.पोलिस निरीक्षक, शहर वाहतुक नियंत्रण शाखा शिर्डी यांना सध्या साईबाबा संस्थानकडून वहातुक नियमनासाठी एक क्रेन चालकासह एक टेम्पो ०८ कर्मचारी (दोन शिफ्टमध्ये) दुचाकी उचलणेकामी देण्यात येतात. तसेच सन २०१८ मध्ये होणा-या शताब्दी सोहळयाचे वाहतुक नियोजन व नियमन करणे सोपे जेणेकरुन शताब्दी कालावधीमध्ये साईभक्तांची गैरसोय होणार नाही व त्यांचे शिर्डी येथील वास्तव्य सुलभ होऊ शकेल. श्री साईबाबा समाधी मंदिराचेआजुबाजुस जुन प्रसादालय, पी.आर.ओ.गेट, मंदिर गेट नं.१, साईउद्यान, व्ही.आय.पी.गेट नं.२, पालखी रस्ता व्दारकामाईचे बाजुचा रस्ता गेट नं.३ कडे येणारा रस्ता याठिकाणी बरीच वाहनांची गर्दी असते. तसेच प्रसादाल, साई भक्तनिवास २०० रुम, ५०० रुम, १००० रुम याठिकाणी वहानांची फळ विक्रेत्यांची, व्यवसायिकांची फार मोठया प्रमाणावर गर्दी असते यासर्व ठिकाणी वहातुक शाखेकडे असलेले मनुष्यबळ पुरत नाही, असे कळविले आहे. सन २०१८ मध्ये असणा-या शताब्दी सोहळा सन २०१७ मध्येच सुरु होणार आहे. आपल्याकडे उपलब्ध मनुष्यबळातुन (संरक्षण विभागाकडून) ४० कर्मचारी दोन शिफ्टमध्ये प्रत्येकी २० याप्रमाणे मिळाल्यास आतापासुन त्यांना वहातुक नियमनाचे प्रशिक्षण देता येईल व शताब्दी उत्सवाच्यावेळी ते कर्मचारी प्रशिक्षीत होऊन साईभक्तांना होणारी गैरसोय दुर करु शकतात तरी आपणाकडुन ४० कर्मचारी मिळणेस मा.पोलिस निरीक्षक, शहर वाहतुक नियंत्रण, शिर्डी यांनी जा.क्र.५५२/२०१६ दि.१५/०७/२०१६ रोजीचे पत्रान्वये मागणी केलेली आहे.

शुक्रवार, दि.१५/०७/२०१६ रोजी मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब यांचे अध्यक्षतेखाली संस्थानचे (०) नंबर येथे झालेल्या मिटींगमध्ये मा.पोलिस निरीक्षक, शहर वाहतुक नियंत्रण, शिर्डी हे उपस्थित होते. त्यावेळी उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे संस्थानमार्फत शिर्डी वाहतुक नियंत्रण शाखेकरीता वाहतुक नियंत्रणासाठी दोन शिफ्टमध्ये २० कर्मचारी असे एकूण ४० कर्मचारी मिळणेबाबत चर्चा करण्यात आली. सदरच्या विषयांवरील चर्चे अंती मा.उपकार्यकारीअधिकारी साहेब यांनी मा.व्यवस्थापन समिची मान्यता मिळालेनंतर आपणांस कळविण्यात येईल, असे सांगीतले.

तरी शताब्दी सोहळा -२०१८ मध्ये होणा-या साईभक्तांच्या गर्दीच्या व वाहतुकीच्या व्यवस्थितरीत्या नियोजन होण्याकरीता मा.पोलिस निरीक्षक, शिर्डी वाहतुक नियंत्रण विभाग यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना ४० कर्मचारी (दोन शिफ्टमध्ये प्रत्येकी २० कर्मचारी याप्रमाणे) संस्थानमार्फत कंत्राटी पध्दतीने पुरविल्यास त्याकामी अंदाजे वार्षिक रु. ४२,००,०००/- (अंदाजे अक्षरी रुपये बेचाळीस लाख) मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी शहर वाहतुक नियंत्रण शाखा, शिर्डी विभागास दररोज संस्थानमार्फत ४० कंत्राटी कर्मचारी पुरविणेस व त्याकामी येणा-या वार्षिक अंदाजे रु. ४२,००,०००/- (अक्षरी रुपये बेचाळीस लाख) मात्रचे खर्चाबाबत सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शहर वाहतुक नियंत्रण शाखा, शिर्डी विभाग यांना सध्या साईबाबा संस्थानकडून वहातुक नियमनासाठी एक क्रेन चालकासह एक टेम्पो व वाहने उचलणेकामी ०८ कर्मचारी (दोन शिफ्टमध्ये) देण्यात येत आहे. सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**पुरवणी**

**विषय नं.०८** **श्री.त्र्यं.अं. खैरे, सल्लागार, सेवानिवृत्त लेखाधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांचे मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५५१ खालीलप्रमाणे झालेला आहे.

"संस्थानचे आस्थापना विषयक व बिंदू नामावली कामकाजासाठी श्री त्र्यंअं.खैरे, माजी लेखाधिकारी, महाराष्ट्र वित्त व लेखासेवा, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांची नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येत आहे. प्रस्तावित केलेप्रमाणे त्यांना प्रतिदिवस रु.३०००/- मात्र मानधन व शिर्डी भेटी दरम्यान नाशिक-शिर्डी-नाशिक प्रवास भाडे देण्यात यावे. तसेच शिर्डी येथे त्यांची निवास व भोजन व्यवस्था विनामुल्य करण्यात यावी. सदरहू काम पूर्ण करणेसाठी त्यांना ज्यास्तीत जास्त दोन महिने (६० दिवस) मुदत देण्यात यावी."

उपरोक्त निर्णयानुसार श्री त्र्यंबक अंबादास खैरे, सेवानिवृत्त लेखाधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांची जा.नं.एसएसएसबीएच/एच.आर./१२१२/२०१६ दि. १२/०९/२०१६ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकडे आस्थापना विषयक व बिंदू नामावली कामकाजासाठी दोन महिने (६० दिवस) या कालावधीसाठी व्हीजीटिंग पध्दतीने नेमणूक करण्यात आलेली आहे त्यानुसार ते दि.०३/०९/२०१६ रोजी कामावर हजर झालेले आहेत.

श्री खैरे यांनी आजपावेतो खालीलप्रमाणे भेटी दिलेल्या आहेत व त्यांनी दिलेल्या मार्गदर्शनानुसार खालीलप्रमाणे कामकाज झाले आहे.

| अ.क्र. | दिनांक | केलेले कामकाज |
|---|---|---|
| १ | दि.०३/०९/२०१६, दि.०९-१०/०९/२०१६ | श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा रुग्णालय या दोन्ही विभागांची सर्व मंजूर पदांची उपलब्ध माहितीनुसार बिंदू नामावली नोंदवही तयार करणेबाबत मार्गदर्शन केले. |
| २ | दि. १७/०९/२०१६ व दि. २३/०९/२०१६ | संस्थान आस्थापनेवरील सर्व पदांची गट-ड कर्मचारी (वर्ग-४) वगळून बिंदू नामावली नोंदवही प्रारुप स्वरुपात संगणकावर तयार करण्याचे कामकाज |
| ३ | दि. ३०/०९/२०१६ | शैक्षणिक संकूलाकडे (श्री साईबाबा इं.मि.स्कूल, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय) कार्यरत असलेल्या स्थायी पदावरील कर्मचा-यांची उपलब्ध माहितीनुसार बिंदूनामावलीचे प्रारुप स्वरुपात संगणकावर तयार करण्याचे कामकाज. |
| ४ | दि. १३/१०/२०१६ | शैक्षणिक संकूलाकडील श्री साईबाबा औ.प्र.संस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील सर्व पदांची बिंदूनामावलीचे प्रारुप स्वरुपात संगणकावर तयार करण्याचे कामकाज |
| ५ | दि.१९/१०/२०१६ | दि.१३/१०/२०१६ रोजीच्या अहवालावर मा.कार्यकारी अधिकारी व उप कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षामध्ये प्र.प्रशासकीय अधिकारी, प्र.अधीक्षक (आस्थापना), प्र.अधीक्षक (मागासवर्ग कक्ष), प्र.एच.आर.मॅनेजर (श्री साईबाबा हॉस्पीटल) चर्चा केली. |
| ६ | दि.२८/१०/२०१६ | दि.१९/१०/२०१६ रोजी चर्चेमध्ये ठरलेप्रमाणे वर्ग-४ कर्मचारी यांची पदनिहाय वर्गवारी कशी करता येईल याबाबत मार्गदर्शन केले. शैक्षणिक संकूलाकडील (श्री साईबाबा इं.मि.स्कूल) बिंदू नामावली तपासणी कामी तयार करावयाची चेक लिस्ट तयार करणेकामी मार्गदर्शन केले. |

उपरोक्तप्रमाणे श्री खैरे यांनी इकडील कार्यालयाकडे एकूण ०९ भेटी दिलेल्या आहेत. त्यात त्यांनी उपलब्ध माहितीनुसार श्री साईबाबा संस्थानचे आस्थापनेवरील सर्व पदांची (वर्ग-४ कर्मचारी वगळता) बिंदूनामावलीचे प्रारुप संगणकावर तयार करुन दिले आहे तथापी त्यांनी दिलेल्या दि.१९/१०/२०१६ रोजीचे अहवालामध्ये खालील बाबींची पूर्तता होणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

दि.०७/०८/२००९ च्या शासन निर्णयात नमूद केलेनुसार संस्थानला ..

(अ) सेवाप्रवेश नियम तयार करुन शासनाची मान्यता घेणे

(ब) पदोन्नतीचे पदे निश्चित करुन पदोन्नती व सरळसेवेचे प्रमाण निश्चित करणे

(क) पदोन्नतीची साखळी निश्चित करणे

(ड) एकाकी पदे (पदोन्नती नसलेली) निश्चित करणे आवश्यक आहे.

शासन स्तरावर बिंदूनामावली नोंदवहीची पडताळणी करणेसाठी सेवाप्रवेश नियम आणि मंजूर आकृतीबंध वर्ग-४ कर्मचारी (पदनिहाय) सेवा जेष्ठता यादी तयार करण्यात आलेली नाही. त्यामुळे मंजूर आकृतीबंधातील पदानुसार सेवा जेष्ठा यादी तयार करणे आवश्यक आहे. सदरची सेवा जेष्ठता यादी तयार करण्यात आलेली नसल्याने सदरची सेवाजेष्ठता यादी तयार करणे या बाबी आवश्यक असल्याने प्रस्तूत प्रकरणी तातडीने निर्णय घेणे आवश्यक आहे.

श्री.खैरे यांनी दि.१९/१०/२०१६ रोजी दिलेल्या अहवालातील मुद्यांची पूर्तता करणेकामी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे आदेश/ निर्देशानुसार मा.उपकार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली अधिकारी/ कर्मचारी तसेच निमंत्रित सदस्य म्हणून सल्लागार श्री खैरे अशी एकूण ०७ सदस्यांची समिती स्थापन करण्यात आली आहे. उपरोक्त दि.१९/१०/२०१६ च्या अहवालातील बाबींची पूर्तता करुन घेणे कामी मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब व श्री.खैरे, सल्लागार यांचे मार्गदर्शनानुसार करावयाच्याआहेत.

तथापी श्री.खैरे, सल्लागार यांची दोन महिने (६० दिवस) या कालावधीसाठी करण्यात आलेली नेमणूकीची मुदत दि०२/११/२०१६ रोजी संपूष्टात येत आहे. सदर दोन महिन्यांचे कालावधीमध्ये श्री खैरे यांनी आजपावेतो एकूण ०९ भेटी दिलेल्या असून त्यांचे मार्गदर्शनुसार उपरोक्त नमूद केलेप्रमाणे बिंदूनामावलीचे कामकाज झालेले आहे. त्यांना फक्त ०९ दिवसांच्या भेटीचे मानधन आदा करत आहोत.

श्री.खैरे, सल्लागार यांचे अहवालातील नमूद केलेली कामे आस्थापना व शासन मान्यतेच्या संदर्भात असल्याने सदर कामे पूर्ण होणेकामी अंदाजे आणखी०३ महिने कालावधी लागण्याची शक्यता आहे. तरी श्री खैरे यांना यापूर्वी दिलेल्यानेमणूक आदेशातील अटी-शर्ती कायम ठेवून त्यांना (याकालावधीत प्रत्यक्ष दिलेल्या भेटीचे मानधन आदा करता येईल.) तरी पुढील मुदतवाढ देणेबाबत निर्णय होणेस विंनती

**निर्णय क्र.८१७** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.त्र्यं.अं. खैरे, सल्लागार, सेवानिवृत्त लेखाधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांना पुर्वीच्या नेमणूक अटी/ शर्ती व प्रतयक्ष भेटीच्या मानधनावर ०३ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मागासवर्ग कक्ष)

---

**पुरवणी**

**विषय नं.०९** **श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांकरीता प्रशिक्षणार्थ्यांचे खर्चाने पुस्तके खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००४ महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ (भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनिमय १७ (२ ढ) मध्ये " सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील,तसेच,शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील."

महाराष्ट्र शासन खरेदी कार्यपध्दती नियम पुस्तिका दि३० आक्टोबर २०१५ रोजी पारीत केलेला असुन संस्थानला निर्णय क्र.५१४ दि.१०/११/२०१५ प्रमाणे लागू केली आहे. यातील प्रकरण ३ मधील (३) एकल स्त्रोत खरेदी (३.२.६) अ) खरेदीची वस्तू फक्त एका विशिष्ट विक्रेत्याकडे उपलब्ध असते किंवा खरेदीच्या विषयाच्या संदर्भात फक्त विशिष्ट विक्रेत्याला अधिकार असतात ज्यामुळे अन्य कोणताही किंवा बदली पर्याय उपलब्ध नसतो व अन्य कोणत्याही खरेदी पध्दतीचा अवलंब करणे शक्य नसते. (इ) खरेदी कार्यालय संशोधन, प्रयोग, अभ्यास किंवा विकास या संबंधीचा करार करण्याचा प्रयत्न करते. ज्यामुळे खरेदी विभागावर कोणताही व्यापारी परीणाम होणार नसतो.

**प्रास्ताविक:-** औ.प्र.संस्थेतील प्रशिक्षणार्थ्याच्या खर्चाने नियमीत गणवेश, शुज व केंद्र शासनाच्या चेन्नई येथील नॅशनल इन्स्ट्रक्शनल मिडीया इन्स्टिटयुट (NIMI) पुस्तकांसाठी तसेच दोन नियमित गणवेश यासाठी प्रवेशाचे वेळी अनामत रक्कम घेऊन ती लेखाशाखेत अनामत खाती ठेवुन एकत्रित खरेदी प्रक्रिया करुन पुरवविण्यात येत असत व त्यांची उर्वरीत रक्कम परत देणे किंवा अधिकची रक्कम लागल्यास त्यांचेकडून जमा घेणेस अशी पध्दती सन २००८ पासुन अवलंबलेली आहे सन २०१५ मध्ये नविन प्रवेशित प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यांकडून याकामी तसेच ऑगष्ट– २०१६ सत्रात प्रवेश घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांकडून याकामी प्रत्येकी रु. ३०००/- जमा करुन घेण्याची प्रक्रिया चालु आहे.

औ.प्र. संस्थेसाठी आवश्यक असणारे पुस्तके प्रकाशीत करणारे देशामध्ये केंद्रशासनाची एकमेव संस्था म्हणुन नॅशनल इन्स्ट्रक्शनल मिडीया इन्स्टिटयुट (NIMI) चेन्नई येथे आहे. त्यामुळे खरेदी कार्यपध्दती नियम प्रकरण ३-(३.२.६)अ) (ई) एकल स्त्रोत खरेदी नॅशनल इन्स्ट्रक्शनल मिडीया इन्स्टिटयुट (NIMI) चेन्नई यांचेकडून खरेदी करणे आवश्यक आहे. सन-२०१५ साठी प्रशिक्षणार्थ्यांची अनामत रक्कम जमा असुन मागील

वर्षी चेन्नई येथे अतिवृष्टी झाल्यामुळे पुस्तकाचे गोडावुन मध्ये पाणी जाऊन पुस्तके भिजली होती. त्यामुळे पुस्तके खरेदी करण्यात आली नाहीत. त्यामुळे मागील वर्षातील मुले III पाणी सेमिस्टरमध्ये असुन यावर्षी प्रवेश घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांसाठी I,II,III सेमिस्टरची पुस्तके खरेदी करणे आवश्यक आहे.

NIMI चेन्नई यांचेकडुन Price List मागणी करण्यात आलेली होती, त्यांनी ( Proforma Invoice) म्हणुन पाठवलेली असुन सोबत अवलोकनार्थ सादर केलेली आहे सेमिस्टर - I,II,III ची पुस्तके उपलब्ध असुन सेमिस्टर IV ची पुस्तके उपलब्ध झाल्यानंतर यादी कळविणार आहेत. तरी सध्या उपलब्ध पुस्तके सिनीयर प्रशिक्षणार्थ्यांसाठी सेमिस्टर III व ज्युनियर प्रशिक्षणार्थ्यांसाठी सेमिस्टर I,II,III ची पुस्तके खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे खरेदी करणे आवश्यक आहेत.

NIMI चेन्नई यांचेकडुन पुसतके खरेदी केल्यास रुपये- ३०,०००/- पेक्षा जास्त खरेदीवर ३०% सुट.

| Sr. No | Trade | Name of Books | Sem.-I | | | Sem.-II | | | Sem.-III | | | G.Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Nos. | Price | Amt. | Nos. | Price | Amt. | Nos. | Price | Amt. | (6+9+12) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 1 | TDF | Trade-Theory | 6 | 160 | 960.00 | 6 | 145 | 870.00 | 21 | 85 | 1785.00 | 3615.00 |
| | | Trade- Practical | 1 | 155 | 155.00 | 1 | 150 | 150.00 | 1 | 75 | 75.00 | 380.00 |
| 2 | ET | Trade-Theory | 21 | 285 | 5985.00 | 21 | 270 | 5670.00 | 40 | 250 | 10000.00 | 21655.00 |
| | | Trade- Practical | 7 | 185 | 1295.00 | 0 | 170 | 0.00 | 19 | 170 | 3230.00 | 4525.00 |
| 3 | MMV | Trade-Theory | 0 | 250 | 0.00 | 0 | 120 | 0.00 | 3 | 150 | 450.00 | 450.00 |
| | | Trade- Practical | 0 | 165 | 0.00 | 0 | 120 | 0.00 | 0 | 130 | 0.00 | 0.00 |
| 4 | FT | Trade-Theory | 0 | 165 | 0.00 | 16 | 190 | 3040.00 | 16 | 185 | 2960.00 | 6000.00 |
| | | Trade- Practical | 0 | 160 | 0.00 | 0 | 165 | 0.00 | 0 | 125 | 0.00 | 0.00 |
| 5 | RAC | Trade-Theory | 26 | 285 | 7410.00 | 26 | 280 | 7280.00 | 8 | 215 | 1720.00 | 16410.00 |
| | | Trade- Practical | 26 | 255 | 6630.00 | 0 | 250 | 0.00 | 8 | 305 | 2440.00 | 9070.00 |
| 6 | MGR | Trade-Theory | 16 | 200 | 3200.00 | 16 | 105 | 1680.00 | 16 | 90 | 1440.00 | 6320.00 |
| | | Trade- Practical | 16 | 185 | 2960.00 | 16 | 80 | 1280.00 | 16 | 80 | 1280.00 | 5520.00 |
| 7 | TR | Trade-Theory | 16 | 180 | 2880.00 | 16 | 115 | 1840.00 | 32 | 115 | 3680.00 | 8400.00 |
| | | Trade- Practical | 4 | 135 | 540.00 | 4 | 105 | 420.00 | 5 | 90 | 450.00 | 1410.00 |
| 8 | ICTSM | Trade-Theory | 13 | 320 | 4160.00 | 13 | 230 | 2990.00 | 28 | 230 | 6440.00 | 13590.00 |
| | | Trade- Practical | 13 | 230 | 2990.00 | 13 | 290 | 3770.00 | 21 | 175 | 3675.00 | 10435.00 |
| 9 | COPA | Trade-Theory | 41 | 220 | 9020.00 | 41 | 170 | 6970.00 | 0 | 0 | 0.00 | 15990.00 |
| | | Trade- Practical | 41 | 325 | 13325.00 | 41 | 220 | 9020.00 | 0 | 0 | 0.00 | 22345.00 |
| 10 | WD | Trade-Theory | 41 | 170 | 6970.00 | 42 | 125 | 5250.00 | 0 | 0 | 0.00 | 12220.00 |
| | | Trade- Practical | 15 | 155 | 2325.00 | 15 | 115 | 1725.00 | 0 | 0 | 0.00 | 4050.00 |
| 11 | MT | Trade-Theory | 0 | 0 | 0.00 | 0 | 150 | 0.00 | 0 | 0 | 0.00 | 0.00 |
| | | Trade- Practical | 0 | 0 | 0.00 | 0 | 150 | 0.00 | 0 | 0 | 0.00 | 0.00 |
| 12 | MATH | W.Cal. & Science | 251 | 85 | 21335.00 | 251 | 140 | (NA) | 0 | 0 | 0.00 | 21335.00 |
| | | W.Cal. & Science(Group-A) | 0 | 0 | 0.00 | 0 | 0 | 0.00 | 158 | 95 | 15010.00 | 15010.00 |
| | | W.Cal. & Science(Group-B) | 0 | 0 | 0.00 | 0 | 0 | 0.00 | 63 | 125 | 7875.00 | 7875.00 |
| 13 | ENG. DRAW. | Engineering Drawing | 251 | 155 | 38905.00 | 250 | 90 | 22500.00 | 0 | 0 | 0.00 | 61405.00 |
| | | Engineering Drawing(Group-A) | 0 | 0 | 0.00 | 0 | 0 | 0.00 | 236 | 115 | 27140.00 | 27140.00 |
| | | Engineering Drawing(Group-B) | 0 | 0 | 0.00 | 0 | 0 | 0.00 | 41 | 120 | 4920.00 | 4920.00 |
| | | Engineering Drawing(Group-E) | 0 | 0 | 0.00 | 0 | 0 | 0.00 | 41 | 95 | 3895.00 | 3895.00 |
| 14 | SKILL | Employability Skill | 290 | 160 | 46400.00 | 290 | 145 | 42050.00 | 0 | 0 | 0.00 | 88450.00 |
| | | | | | | | | | | | TOTAL | 392415.00 |

उपरोक्त तक्त्यात नमुद केल्या प्रमाणे रु. ३,९२,४१५/- वजा ३०% सुट रु. १,१७,७२४.५० याप्रमाणे रु.२,७४,६९१/- पर्यंत एकत्रित खरेदी आहे. त्यामुळे सर्व प्रशिक्षणार्थ्यांना किफायतशीर दराने पुस्तके उपलब्ध होऊ शकतील त्याप्रमाणे होणारी रक्कम डिमांड ड्राप्ट ने पुरवठा आदेशाने आगाऊ पाठवावे लागते तदनंतर संबंधीत संस्थेकडून पुस्तके पुरविली जातात.

प्रशिक्षणार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी निमी पुस्तके, सेप्टी शुज, व युनिफॉर्मसाठी प्रत्येकी रु. ३,०००/- जमा करुन लेखाशाखेकडे अनामत खाती जमा ठेवण्यात आलेला आहे.

**मागणी:-** औ.प्र. संस्थेसाठी आवश्यक असणारे पुस्तके प्रकाशीत करणारी देशामध्ये केंद्र शासनाची एकमेव संस्था म्हणुन नॅशनल इन्स्ट्रक्शनल मिडीया इन्स्टिटयुट (NIMI) चेन्नई येथे आहे. त्यामुळे खरेदी कार्यपध्दती नियम प्रकरण ३-(३.२.६)अ) (ई) एकल स्त्रोत खरेदी नॅशनल इन्स्ट्रक्शनल मिडीया इन्स्टिटयुट (NIMI) चेन्नई यांचेकडुन खरेदी करणे आवश्यक आहे. त्यास मान्यता असावी. तसेच Proforma Invoice प्रमाणे येणारे खर्च रु. २,७४,६९१/- डी. डी. काढुन पुरवठा आदेश देण्यास मान्यता मिळावी. तसेच ट्रान्सपोर्ट चार्जेस हे आवश्यकतेनुसार रोखीने आदा करावे लागणार असल्याने ते स्वतंत्र ॲडव्हान्स घेऊन रोखीने आदा करण्यास मान्यता मिळावी. सदरचा खर्च प्रशिक्षणार्थी जमा अनामत रक्कम मधुन आदा करता येईल.

**अनुमान :-** वरील प्रमाणे कार्यवाही करता येईल.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** तरी वरील नमुद केंल्या प्रमाणे सदरील निमी पुस्तके केंद्र शासनाची एकमेव संस्था नॅशनल इन्स्ट्रक्शनल मिडीया इन्स्टिटयुट (NIMI) चेन्नई यांचेकडुन खरेदी करणेस व येणारा खर्च रु. २,७४,६९१/- (अक्षरी रक्कम रु. दोन लाख चौ-याहत्तर हजार सहाशे एक्क्यान्नव मात्र) (वाहतुक खर्च वेगळा) व कार्यवाहीस निर्णयासाठी मा. व्यवस्थापन समिती समोर सादर.

**निर्णय क्र.८१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना त्यांच्या खर्चाने पुस्तके उपलब्ध करुन देणेसाठी नॅशनल इन्स्ट्रक्शनल मिडीया इन्स्टिटयुट (NIMI) चेन्नई यांचेकडुन प्रस्तावित पुस्तके खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्च रु.२,७४,६९१/- (वाहतुक खर्च वेगळा) मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था)

---

**पुरवणी**

**विषय नं.१०** **भारतीय विमानपत्तन प्राधिकरण केंद्राचे ६०% भोजन खर्चावरील १४.५% सर्व्हीस टॅक्स रकमेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती दि.२८/१२/२०१५ चे सभेमध्ये संस्थानचे अग्निशमन वाहन विमानतळ, हेलीपॅड व इतर ठिकाणांसाठी दर निश्चीत करणेबाबत सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदरचे विषयावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र.६५९ असा झाला आहे की, शिर्डी ऐअरपोर्ट, हेलीपॅड व इतर ठिकाणी मागणी झाल्यास संस्थानचे अग्निशमन वाहन (फोम टेंडर) संस्थान कर्मचारी, इंधन व इतर आवश्यक बाबींसह सशुल्क पुरविणेबाबत प्रस्तावातील परिशिष्ट-३ मधील अ.नं.०६/अ व ०६/क नुसार दर आकारणी करण्यात यावी तसेच शिर्डी एअरपोर्टवर संस्थानचे अग्निशमन वाहनावरील ०७ कर्मचारी यांना महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनीमार्फत ट्रेनींगसाठी पाठविणे झाल्यास कर्मचा-यांसाठी लागणारा खर्च संस्थानने करावा. याकामी येणा-या एकुण खर्चाच्या तपशिलाची सविस्तर माहिती महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी यांचेकडुन प्राप्त करुन घेण्यात यावी असे ठरले.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी यांचेकडुन प्रशिक्षणबाबत लागणा-या खर्चाची माहिती दि.२५.०२.२०१६ रोजीचे भारतीय विमानपत्तन प्राधिकरण (AAI) यांचे ई-मेल नुसार सदर प्रशिक्षणासाठी खर्चाचा सविस्तर तपशिल खालील प्रमाणे कळविला होता.

**PRORORMA INVOICE FOR BASIC TRAINING COURCE**

| Course Detail | Course fee Structure | Total fee per candidate ( in india rules ) |
|---|---|---|
| Basic Training at FTC Nev Delhi period w.e.f 14/03/2016to 2.07.2016 | Tution fee | 60,000.00 |
| | Service Tax 14.5%of Tution Fee | 8,700.00 |
| | Total Amount ( A) | 68,700.00 |
| [121+1days) Reporting one day iv in advance] | Accomodation charges for 122 days @ Rs:100 Per day | 12,200.00 |
| | Canteen Charges For 122 days @ Rs:229 | 27,938.00 |

| | | |
|---|---|---|
| | Per day per head | |
| | Total Amount (B) | 40,138.00 |
| Perhead Amount | ( A+B) | 1,08,838.00 Per **Candidate** |
| | | X 7 prrson |
| **Total Amount** | **7 Candidate** | **7,61,866.00** |

त्यानुसार कर्मचारी प्रशिक्षणकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी मा.व्यवस्थापन समिती दि.०२/०४/२०१६ चे सभेपुढे विषय क्र.०९ वरील निर्णय क्र.२५६ नुसार मान्यता घेण्यात आलेली असुन प्रशिक्षणकामी येणा-या खर्चाची रक्कम रु.७,६१,८६६/- एअरपोर्ट अ‍ॅथॉरिटी ऑफ इंडिया, न्यु दिल्ली यांचे खाते RTGS द्वारे अ‍ॅडव्हॉन्स स्वरूपात आदा करण्यात आलेली आहे. यानंतर दि.१४/०३/२०१६ ते १२/०७/२०१६ या कालावधीमध्ये फायर विभागाकडील ०७ कायम कर्मचारी यांना दिल्ली येथे पाठवुन प्रशिक्षण पुर्ण करण्यात आलेले आहे.

सदर कर्मचारी यांचे प्रशिक्षण उत्तीर्ण झालेबाबत प्रमाणपत्र आलेले नसल्याने श्री गंगा विष्णु ,असिस्टंट मॅनेजर फायर सर्व्हीसेस, फायर ट्रेनिंग सेंटर रंगपुरी, एअरपोर्ट अथॉरीटी ऑफ इंडीया, दिल्ली यांचेसमवेत चर्चा केली असता त्यांनी दि. ०७.११.२०१६ रोजी ई – मेल पाठविला असुन सदर ई – मेल भोजन खर्चाचे रक्कमेवर असलेली सर्व्हीस टॅक्सची रक्कम आपणाकडे बाकी असलेने सदर सर्व्हीस टॅक्सची रक्कम अदा केलेनंतर प्रशिक्षण प्रमाणपत्र पाठविले जातील असे सांगितलेले आहे. तरी भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांची राहिलेली सर्व्हीस टॅक्सची रक्कम अदा करणे गरजेचे आहे.

तरी मा.व्यवस्थापन समिती दि.०२.०४.२०१६ चे सभेतील निर्णय क्रं. २५६ नुसार भारतीय विमानपत्तन प्राधिकरण (AAI ) यांना प्रशिक्षणकामी रक्कम रु. ७,६१,८६६/- अदा करण्यात आलेली असुन त्यापैकी भोजन खर्च रु.२७९३८/- वरील ६० % रक्कमेस १४.५% प्रमाणे अदा करावयाची सर्व्हीस टॅक्सची रक्कम रु.२४३०/- प्रति कर्मचारी याप्रमाणे ७ कर्मचारी यांची रक्कम रु.१७०१०/- चे वाढीव खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, भारतीय विमानपत्तन प्राधिकरण केंद्राचे ६०% भोजन खर्चावरील सर्व्हीस टॅक्सची १४.५% रु.१७,०१०/- मात्र रक्कम त्यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- फायर अ‍ॅण्ड सेफ्टी विभागप्रमुख)

---

**पुरवणी**

**विषय नं.११** **श्री साई प्रसादालयात संपुर्ण दिवस मोफत भोजन योजना सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम** 2004 **मधील तरतुद:-** सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.14 (भाग-4) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील 14 (2-घ) नूसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेण्याचे. तसेच 21 (1-घ) नूसार भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं.:- संदर्भ क्रं.**2 ते 7

**प्रस्ताविक:- अ) श्री.संजय भास्करराव काळे, कोपरगांव यांचे विषयांकितकामी संदर्भिय अं.नं.**1 **नूसार इकडील विभागाकडे पत्र प्राप्त झालेले आहे. त्यांनी पत्रात पान क्रं.**1 **वर म्हटले आहे की,** “दि.27/04/2013 रोजी झालेल्या व्यवस्थापन समिती सभेत विषय नं.15 (आयत्या वेळेचा) व निर्णय क्रं.428 प्रमाणे आपण संस्थानने मोफत प्रसादभोजन चालू करण्याचे संकल्पनेवर चर्चा केली. सदर सभेत व्यवस्थापन समिती भोजन पुरवणेसाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबींवर चर्चा करुन हया निर्णया पर्यंत पोहचली कि सर्व दिवस मोफत प्रसादभोजन देण्यात हरकत नाही. सदरचे प्रसादभोजन मोफत दिल्यास अंदाजे 9.96 कोटी रुपयांची प्राप्त होणारी रक्कम बंद होणार. सदरहु बाब मेजर फायानान्शीयल असल्याने मा.उच्च न्यायालय याची परवानगी घ्यावी असे ठरले. संस्थानने आज अखेर मा.उच्च न्यायालयात मोफत प्रसादभोजनाचा प्रस्ताव सादर केलेला नाही. ही खेदाची बाब.”

**तसेच पान क्रं.**2 **वर म्हटले आहे की-** “शेतकरी संपला, बाजार पेठ संपली. हया वर्षी शेतकऱ्याने दिवाळी केली नाही. गरीब शेतकरी, शेतमजुराला काम नाही, अन्न धान्य नाही. यामुळे दि.27/04/2013 रोजी प्रलंबीत ठेवलेला मोफत प्रसादभोजनाचा निर्णय संस्थानने त्वरीत अमलात आणावा.”यापुर्वी याबाबत असे म्हटले आहे.

ब) साईभक्तांना विनामुल्य मोफत प्रसादभोजन सुरु करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत वेळोवेळी चर्चा व निर्णय झालेले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

1) संदर्भिय अं.नं.2 मा.व्यवस्थापन (त्रिसदस्य) समिती दि.12/06/2012 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.446 नूसार साईभक्तांसाठी मोफत प्रसादभोजन व्यवस्था सुरु करणेबाबत खालीलप्रमाणे सुचना झालेल्या आहेत. हा निर्णय आर्थिकदृष्टया अत्यंत महत्वाचा असल्याने या बाबत सर्व बाबींचा सर्वांगीण दृष्टया सांगोपांग विचार करुन प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.

2) त्यानूसार सदरचा प्रस्ताव संदर्भिय अ.नं.3 ने मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती दि.08/10/2012 रोजीचे सभेपुढे सादर केला असता निर्णय क्रं.831 अन्वये - सदरहु विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली मात्र याबाबत सर्व माहीती तपशीलासह सविस्तर प्रस्ताव तयार करुन तो पुढील सभेपुढे सादर करावा असे, ठरले.

त्यानूसार सदरचा प्रस्ताव पुन्हा संदर्भिय अ.नं.4 नूसार मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती दि.27/04/2013 रोजीचे सभेपुढे सादर केला असता निर्णय क्रं.428 नूसार- या विषयावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा संस्थानचे अन्नदान निधीमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. अन्नदान निधीमध्ये जमा होणारा निधी त्याच कारणासाठी खर्च होणे आवश्यक आहे. हा खर्च न केल्यास व ही रक्कम वाढीव प्रमाणात शिल्लक राहील्यास त्यावर टॅक्सेस लागण्याची शक्यता आहे. संस्थानने सुरु केलेल्या अन्नदान योजनेतून सद्य परिस्थितीत 125 ते 150 दिवस दानशूर साईभक्तांनी दिलेल्या देणगीमधून मोफत प्रसाद भोजन देण्यात येत आहे व या योजनेला भक्तांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असल्यामुळे साईभक्तांतर्फे भविष्यात जास्त दिवस मोफत प्रसादभोजन प्रसादालयामध्ये दिले जाईल असे वाटते. एक दिवशी प्रसादालयामध्ये सरासरी 30,000 साईभक्त प्रसादभोजन घेतात. यावरुन उर्वरीत 200 ते 240 दिवसही मोफत प्रसादभोजन दिल्यास प्रती साईभक्तांकडून रु.10/- याप्रमाणे वार्षिक अंदाजे रु.6 ते 7 कोटी मात्र येणारा संस्थानचा निधी बंद होईल. सन 2012-2013 या आर्थिक वर्षामध्ये प्रसादालयामध्ये साईभक्तांनी रु.10/- प्रती व्यक्ती याप्रमाणे सशुल्क प्रसादभोजन घेवून रु.9.96 कोटी जमा झालेले आहेत. हा निधी बंद होईल परंतू या बंद होणाऱ्या निधीची भरपाई मा.उच्च न्यायालयाने मान्यता दिल्यास संस्थानचे जनसंपर्क कार्यालयामार्फत देण्यात येणारे व्ही.आय.पी.दर्शन पास ऑनलाईन दर्शन सुविधेसारखे विनाशिफारस सर्वांसाठी देणगी आकारुन सुरु केल्यास येणाऱ्या अपेक्षीत रु.11 कोटी मात्र रक्कमेमधून करता येईल.

मोफत प्रसादभोजन योजना सुरु केल्यास अधिनियमातील तरतुदींची अधिकाधीक उद्दीष्ट पुर्ती होईल प्रसादालयामध्ये दक्षिणा पेट्टयांची संख्या वाढविल्यास संस्थानचे उत्पादनात भर पडेल व दर्रोजन प्रसादभोजन मोफत केल्यास सध्याची मोफत प्रसादभोजन योजनेऐवजी ठराविक दिवशी मोफत प्रसादभोजनासाठी देणगी देणाऱ्या दानशूर भक्तांची नांवे त्या ठराविक दिवशी प्रसादालयामध्ये दर्शविता येईल यामधून अनेक साईभक्तांना प्रेरणा मिळेल. तसेच व्ही.आय.पी.भोजनाचा दर आहे तोच ठेवण्यात येवून यामधूनही काही प्रमाणात निधी संस्थानला मिळणार आहे. सर्व दिवस मोफत प्रसादभोजन दिल्यास भक्तांना समाधान मिळेल व भारतातच नाही तर संपुर्ण जगामध्ये साईबाबा संस्थानचा नावलौकीक होईल.

मोफत प्रसादभोजन दिल्यास रु.10/- मात्र माफ होत आहेत म्हणून परिसरातील नागरीक प्रवास करुन अथवा प्रवासासाठी पैसे खर्च करुन मोफत प्रसादभोजनासाठी प्रसादालयामध्ये येतील आणि गर्दी वाढेल व प्रसादालयाची क्षमता वाढवावी लागेल असे वाटत नाही. या योजनेचा लाभ हा दुरवरुन बाबांचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांनाच होईल. यावरुन प्रसादालय विभाग प्रमुख व मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्तावामध्ये नमूद केलेल्या अभिप्रायामध्ये तथ्य वाटत नाही.

तसेच श्रींचे दर्शन घेऊन मंदिरामधून बाहेर येताना प्रत्येक साईभक्तांस बाबांचा प्रसाद म्हणून एक लाडू प्रसाद पाकीट, मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळाल्यास देण्याचा विचार आहे. त्यामुळे भक्तांना लाडू प्रसाद घेण्यासाठी पुन्हा रांगेमध्ये उभे राहण्याची आवश्यकता राहणार नाही व त्यांचा वेळी वाचेल आणि लाडू विक्री काऊंटर बंद करणेत येवून तेथील कर्मचारी इतरत्र वापरता येतील

साईभक्तांना विनामुल्य लाडू प्रसाद दिल्यास अंदाजे रु.18 कोटी मात्र व विनामुल्य प्रसादभोजन दिल्यास अंदाजे 9.96 कोटी मात्र ही संस्थानला प्राप्त होणारी रक्कम बंद होवून तो भार संस्थानला सहन करावा लागणार आहे. सदरहु बाब मेजर फायनान्शीयल असल्याने याकामी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे मार्गदर्शन घेणेसाठी, विनामुल्य प्रसादभोजन व विनामुल्य लाडू प्रसाद पाकीट दिल्यास संस्थानला वार्षिक किती खर्च येईल. यांच्या आकडेवारीसह सविस्तर प्रस्ताव सादर करुन, तो पुढील सभेपुढे सादर करणेत यावा असे ठरले.

3) त्यानूसार सदरचा प्रस्ताव संदर्भिय अ.नं.5 ने मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती दि.21/06/2013 रोजीचे सभेपुढे सादर केला असता त्यावर निर्णय क्रं.436 अन्वये - सदरहु विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

4) संदर्भिय अं.नं.5 नूसार मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती दि.26/07/2013 रोजीचे सभेत विषयांकितकामी फेर प्रस्ताव सादर करणेत आला. त्यानूसार निर्णय क्रं.538 अन्वये यावर सविस्तर

5) **चर्चा होऊन,** श्री साई प्रसादालयामार्फत ज्या गरीब व्यक्तींकडे प्रसादभोजनासाठी पैसे नाहीत, असे गरीब गरजू व्यक्ती, परिसरातील अंध, अपंग, मुकबधीर, मतीमंद शाळेतील मुले, वारकरी संप्रदायाचे शिक्षण घेणारे विद्यार्थी, वृध्दाश्रम, श्री साईबाबा/श्री साईनाथ रुग्णालयातील रुग्ण यांना मोफत प्रसादभोजन देण्यात येत आहे.

तसेच, देणगीदार साईभक्तांचे इच्छेनूसार सन2008 पासून साईभक्तांसाठी मोफत प्रसादभोजन योजना सुरु असून या योजनेमध्ये मोफत भोजन देणाऱ्या साईभक्तांचे संख्येमध्ये दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे उदा. 2008-2009 - 23 दिवस, 2009-10- 42 दिवस, 2010-2011- 65 दिवस, 2011-2012- 138 दिवस, 2012-2013 - 184 दिवस. सन 2013-14 मध्ये याचा विचार करता, श्री साई प्रसादालयामध्ये संस्थानमार्फत साईभक्तांना मोफत प्रसादभोजन देणेऐवजी, मोफत प्रसादभोजनासाठी देणगी देणाऱ्या देणगीदार साईभक्तांमध्ये वाढ होवून वर्षातील जास्तीत-जास्त दिवस सामान्य साईभक्तांना मोफत प्रसादभोजन मिळेल यासाठी देणगीदार साईभक्तांना प्रोत्साहीत करावे. मोफत प्रसादभोजन योजनेबाबतची माहीती व या योजनेमध्ये दान देणाऱ्या भक्तांची नावे प्रसादालय व मंदिर परिसरामध्ये फलक उभारुन किंवा डिस्प्ले बोर्डद्वारे प्रदर्शित करणेत यावी, असे ठरले.

6) त्यानूसार सदरचा प्रस्ताव संदर्भिय अ.नं.7 ने मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती दि.16/02/2016 रोजीचे सभेपुढे सादर केला असता, त्यावर निर्णय क्रं.113 अन्वये - यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साई प्रसादालयात संपुर्ण दिवस मोफत प्रसादभोजन योजना सुरु करणेकामी श्री संजय काळे यांनी त्यांचे पत्रामध्ये उल्लेख केलेल्या दि.27/04/2013 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.428 तसेच व्यवस्थापन समिती सभेमध्ये यापुर्वी वेळावेळी झालेल्या निर्णयांसह सविस्तर प्रस्ताव फेरसादर करणेत यावा.

7) संदर्भिय क्रं.8 नूसार सदरचा प्रस्ताव नव्याने नियुक्त मा.व्यवस्थापन समिती दि.31/08/2016 रोजीचे सभेपुढे सादर केला असता, त्यावर निर्णय क्रं.596 अन्वये - यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे अन्नदान निधीच्या बाबतीतील सर्व अनुशंगीकमाहीती सभेसमोर सादर करणेत यावी, असे ठरले.

अशाप्रकारे ब) मध्ये नमूद करणेत आलेल्या अंनं.**2** ते **7** नूसार मा.व्यवस्थापन समिती सभेत साईभक्तांना विनामुल्य प्रसादभोजन व्यवस्था सुरु करणेबाबतचे विषयावर चर्चा झालेली आहे

**क)** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.27/04/2013 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.428 नूसार साईभक्तांना दर्शन रांगेत मोफत लाडू प्रसाद देणेबाबतचा प्रस्ताव मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे मान्यतेसाठी पाठविणेत आलेला होता. त्यास मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांनी मान्यताही दिलेली आहे. त्यानूसार 50 ग्रॅम वजनाचे प्रत्येकी दोन लाडूचे एक पाकीट दर्शनरांगेमध्ये प्रत्येकी दि.15 ऑगस्ट -2013 रोजीपासून साईभक्तांना मोफत देण्यात येत आहेत. लाडूचे मोफत पाकीट वाटप व खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| **कालावधी** | **लाडू पाकीटे वाटप संख्या** | **प्रत्यक्ष उत्पादन खर्च** |
|---|---|---|
| माहे.ऑगस्ट-2013 ते जुलै-2014 | 1,84,82,400 | रु.24,47,86,974/- |
| माहे.ऑगस्ट-2014 ते जुलै-2015 | 1,74,80,650 | रु.21,24,01,229/- |

मोफत लाडू/बुंदी वाटपबाबत संस्थानला कुठलाही निधी/फंड मिळत नाही. मोफत लाडू/बुंदी वाटप करणेत येणाऱ्या खर्चाची रक्कम ही अन्नदान निधीत मिळणाऱ्या रक्कमेमधून करणेत येते त्यामुळे दर्शनरांगेत मोफत वाटप करणेत येणाऱ्या लाडू/बुंदी पाकीटाचा संस्थानवर अंदाजे वार्षिक रु.24 ते 25 कोटी इतक्या रकमेचा बोजा पडत आहे. त्यामुळे भक्तांना विनामुल्य प्रसादभोजन देणे आर्थिक दृष्टीने अडचणीचे आहे असे इकडील कार्यालयाचे मत आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभेच्या मान्यतेने सन 2007-2008 पासून देणगीदार साईभक्तांचे इच्छेनूसार साईभक्तांसाठी मोफत प्रसादभोजन योजना सुरु झालेली आहे सदर योजनेमध्ये सन 2007-2008 पासून आजपावेतो खालीलप्रमाणे रक्कम जमा झालेली असून ज्या-त्या वर्षात जमा तारखेनूसार खर्च होत आहे.

| | |
|---|---|
| सन 2007-2008 | रु.20,29,600/- |
| सन 2008-2009 | रु.31,93,515/- |
| सन 2009-2010 | रु.1,02,31,004/- |
| सन 2010-2011 | रु.1,60,44,191/- |

| | |
|---|---|
| सन 2011-2012 | रु.3,22,20,135/- |
| सन 2012-2013 | रु.4,33,61,344/- |
| सन 2013-2014 | रु.5,38,46,887/- |
| सन 2014-2015 | रु.7,42,48,986/- |
| सन 2015-2016 | रु.8,19,15,465/- |

वरील आकडेवारी पाहता उपरोक्त मोफत प्रसादभोजन योजनेत दरवर्षी 30 ते 35 टक्क्यांनी वाढ झालेली दिसून येत आहे. 01 एप्रिल-2015 ते 31 मार्च 2016 अखेर या वित्तीय वर्षात 679 देणगीदार साईभक्तांनी 301 दिवसांसाठी मोफत प्रसादभोजन योजनेअंतर्गत भक्तांना विनामुल्य प्रसादभोजन देणेसाठी रक्कम रु.8,19,15,465/- इतकी रक्कम जमा केलेली आहे. या वर्षामध्ये एकूण 1,31,83,589 इतक्या साईभक्तांनी प्रसादभोजनाचा लाभ घेतलेला असून दैनंदीन सरासरी 36,119 इतके भक्त दर्रोज प्रसादभोजन घेत होते. म्हणजेच वर्षामध्ये जवळपास सरासरी 226 दिवस भक्तांच्या देणगीतून मोफत प्रसादभोजन सुरु होते म्हणजेच सध्य स्थितीत 62% भोजन हे मोफतच देण्यात येत आहे व भविष्यात ती वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. वरील तक्त्याचा विचार करता आजपावेतो मोफत प्रसादभोजन योजनेमध्ये मिळालेल्या देणगीत वाढच झालेली आहे. त्यामुळे श्री काळे यांचे पत्रातील मोफत योजना ही संकल्पना भक्तांच्या देणगीतून मोठया प्रमाणात चालू आहे.
तसेच 'साईभक्तांना विनामुल्य प्रसादभोजन' सुरु केल्यास मोफत प्रसादभोजन योजना ही भक्तांचे इच्छेनूसार सुरु झालेली योजना असल्यामुळे सदर योजनेमध्ये येणारी देणगी बंद होण्याचा धोका असून भक्तांच्या भावना दुखावल्या जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर योजनेत मिळणारा निधी हा मोठया स्वरुपात मिळत आहेत. त्याचा विनीयोग चांगल्या कार्यासाठी होत आहे. तसेच सध्या साईभक्तांना पुरविणेत येणारी प्रसादभोजन व्यवस्था प्रौढ व्यक्तीस रु.10/- या अत्यल्प दरात पुरविणेत येते. प्रसादभोजनाचे प्रती ताटास अंदाजे रु.24/- ते 25/- इतका खर्च येतो. म्हणजेच प्रसादभोजनाचे प्रती ताटामागे रु.14/- ते 15/- इतकी चारीटी संस्थान देत आहे. तसेच कॅन्टीन विभागामार्फत भक्तांना पुरविणेत येणारा चहा- रु.2/-, कॉफी- रु.2/-, व दुध- रु.3/- या अत्यल्प दरात विक्री करणेत येत असून यामध्ये देखील संस्थान चहाचे प्रती कपास रु.0.91 पैसे, कॉफी प्रती कप रु.1.33 पैसे व दुधास प्रती कपी रु.1.34 पैसे याप्रमाणे चारिटी देत आहे. भक्तांना पुरविणेत येणाऱ्या प्रसादभोजनाचा खर्च, चहा, कॉफी, दुध व दर्शन रांगेत मोफत लाडू/बुंदी प्रसाद हा सर्व खर्च अन्नदान फंडात जमा होणाऱ्या रक्कमेमधूनच करणेत येतो. त्यामुळे श्री काळे यांची मागणीही फारशी रास्त नाही असे या कार्यालयाचे नम्र मत आहे.
साईभक्तांना विनामुल्य प्रसादभोजन व्यवस्था सुरु केल्यास बाबांचे प्रसादाचे महत्व कमी होवून शिरडीमध्ये बेरोजगारी, पाकीटमारी, गुंडगिरी प्रवृत्ती वाढून परिसरातील लोकांची काम करण्याची तयारी राहणार नाही. तसेच मोफत प्रसादभोजन योजना ही साईभक्तांचे इच्छेनूसार सुरु करणेत आलेली योजना आहे भक्तांना विनामुल्य प्रसादभोजन सुरु केल्यास सदर योजनेत भक्त देणगी देण्याची शाश्वती नाही. त्यामुळे संस्थानला विनाकारण साधारण: **9** ते **10** कोटीच्या वार्षिक नुकसान होणे नाकारता येत नाही.

**मागणी:-** प्रस्तावित केलेप्रमाणे साईभक्तांना विनामुल्य प्रसादभोजन देणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेत साधारणत: पाच वेळेस सादर करणेत आलेला आहे. सदर बाब आर्थिक दृष्टया अत्यंत महत्वाची असल्याने संस्थानमार्फत साईभक्तांना मोफत प्रसादभोजन देणेऐवजी, मोफत प्रसादभोजनासाठी देणगी देणाऱ्या देणगीदार साईभक्तांमध्ये वाढ होऊन वर्षातील जास्तीत-जास्त दिवस सामान्य साईभक्तांना मोफत प्रसादभोजन मिळेल यासाठी देणगीदार साईभक्तांना प्रोत्साहीत करावे.

या योजनेमध्ये दान देणाऱ्या भक्तांची नांवे प्रसादालय व मंदिर परिसरामध्ये फलक उभारुन डिस्प्ले बोर्डद्वारे प्रदर्शित करणेत यावे, असे निर्णय घेतलेले आहे. सदर निर्णयान्वये श्री साई प्रसादालयात देणगीदार भक्तांचे डिस्प्ले बोर्ड बनिवणेत येत असून त्यास उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे.

सदर देणगीमधूनच 62% प्रसादभोजन हे मोफत दिले जात आहे. त्यात वाढ होऊन संपुर्ण वर्षभर प्रसादभोजन मोफत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे संदर्भिय अंन.1 नूसार विषयांकितकामी प्राप्त झालेला श्री संजय भास्करराव काळे कोपरगांव यांच्या अर्जातील छावणी बाबतचा विषय यापुर्वी बांधकाम विभागाकडून चालू होता व पुर्वी छावण्या केल्याही होत्या त्याची सर्व कार्यवाही बांधकाम विभागामार्फत चालू होती त्यामुळे याबाबतची कार्यवाही बांधकाम विभागामार्फत होणेस मान्यता असावी.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** उपरोक्त प्रास्तविक व मागणीनूसार साईभक्तांना विनामुल्य प्रसादभोजन व्यवस्था सुरु करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीने सदरचा प्रस्ताव मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे पाठविणेत यावा असा कोणताही निर्णय झालेला नाही. त्यामुळे विषयांकित कामी असलेले अर्जदार श्री संजय भास्करराव काळे, कोपरगांव यांचे अर्जात विनामुल्य्य प्रसादभोजन सुरु करणेबाबत, जे त्यांनी अर्जात म्हटले आहे, त्यामध्ये स्पष्टता वाटत नाही.

श्री काळे यांचे विनंती अर्जानूसार, "चालू वर्षी दुष्काळ पडलेला आहे, खरीप हंगाम मोकळा गेलेला आहे, शेतात पीक आले नाही, शेतकऱ्याने दिवाळी केली नाही, शेतमजुराला काम नाही याकरीता संस्थानने मोफत प्रसादभोजनाचा निर्णय त्वरीत अंमलात आणावा." असे म्हटले आहे. परंतू सध्याचे परिस्थितीचा विचार करता संस्थानमध्ये भक्तांना सकाळी अल्पोपहारसाठी पुरविणेत येणार अन्नपाकीट फक्त रु.4/- मध्ये देवून त्यामागे रु.6/- चरिटी देण्यात येत आहे. प्रसादभोजन हे फक्त रु.10/- म्हणजेच प्रती ताटामागे रु.14/- ते 15/- चारीटी देण्यात येत आहेत. तसेच चहा, कॉफी व दुध व दर्शन रांगेतील मोफत बुंदी प्रसाद हे देखील चारिटी देवून पुरविणेत येत आहे.

अशाप्रकारे साईभक्तांना पुरविणेत येणाऱ्या महत्वाच्या सुविधा उदा.अल्पोपहार, प्रसादभोजन, चहा, कॉफी व दुध व दर्शन रांगेत मोफत बुंदी प्रसाद या सर्व सुविधा चारिटी देवून पुरविणेत येत आहे

दुष्काळी परिस्थिती ही चिरकाल टिकत नसते, परंतू संस्थानमध्ये एकदा सुरु झालेली योजना ही पुन्हा बंद करणे संस्थानचे दृष्टीने अत्यंत महत्वाची बाब असून सदर निर्णय हा धोरणात्मक असल्यामुळे तसेच सदर बाब मेजर फायनान्शीयल असल्याने विनामुल्य प्रसादभोजन दिल्यास संस्थानला वार्षिक किती खर्च येईल याची लेखाशाखा विभागामार्फत सविस्तर आकडेवारी घ्यावी लागेल असे नम्र मत आहे. तसेच संदर्भिय अ.नं.8 नूसार मा.व्यवस्थापन समिती दि.31/08/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.596 नूसार संस्थानचे अन्नदान निधीच्या बाबतीतील सर्व अनुशंगीक माहीती सभेसमोर सादर करणेत यावी, असे ठरले आहे.

त्यानूसार उपरोक्त प्रस्तावाबाबत मुख्यलेखाधिकारी, लेखाशाखा विभाग यांनी ''अन्नदान फंडात मागील वर्षी रु.५० कोटी जमा झालेले आहेत. प्रसादभोजन मोफत दिल्यास व वार्षिक १०% वाढ गृहीत धरली तर सन २०१७-१८ मध्ये साधारणपणे ४५-४८ कोटी खर्च अपेक्षीत आहे. मात्र सन २०१५-१६ मध्ये प्रसादालयास Free भोजनसाठीजमा झालेली रक्कम वजा जाता फक्त रु.३८.०० कोटी जादा खर्च झालेला आहे. मोफत प्रसादभोजन द्यावयाचे झाल्यास भविष्यात खर्च वाढणार असल्याने उत्पन्न वाढीसाठी उपाययोजना करणे आवश्यक राहील. उत्पन्न वाढीचा वेग सध्याप्रमाणे (अन्नदान फंड) म्हणजे १८-१९% राहील्यास मोफत प्रसादभोजन देणे उचित होईल.'' असा अभिप्राय दिलेला आहे.

त्यामुळे उपरोक्त विषयांकित बाबतचा प्रस्ताव हा महत्वाचा, आर्थिक व धोरणात्मक असल्याने सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८२०** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, मा.त्रीसदस्य समितीच्या दि.१४.०६.२०१६ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.३४३ अन्वये श्रींचे समाधी शताब्दी महोत्सव कालावधीमध्ये दि.०१.१०.२०१७ ते दि.१८.१०.२०१८ पर्यंत देणगीदार साईभक्तांचे देणगीतून मोफत अन्नदान वर्ष म्हणून घोषित करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच अन्नदान फंडामधील शिल्लक निधी व दिवसेंदिवस मोफत भोजन योजनेमध्ये साईभक्तांची वाढती देणगी या बाबींचा विचार करता, नवीन वर्षाची साईभक्तांना भेट देणेसाठी दि.०१ जानेवारी, २०१७ पासून प्रायोगिक तत्वावर संपुर्ण दिवस मोफत प्रसाद भोजना चालू करणेत यावी. सदरहू योजना प्रथमत: दि.३०.०९.२०१७ पर्यंत सुरु ठेवणेत यावी व या योजनेस भक्तांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाल्यास समाधी शताब्दी वर्षानंतरही मोफत प्रसाद भोजन योजना चालू ठेवण्यात यावी. परंतु या योजनेचा लाभ जनरल भोजनहॉलमध्ये प्रसादभोजन घेणाऱ्या भक्तांनाच राहील. व्ही.आय.पी. व व्ही.आय.पी. प्रसादभोजनासाठी पुर्वीप्रमाणेच शुल्क आकारणेत यावे.**

(कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख/ मुख्यलेखाधिकारी)

---

**पुरवणी**

**विषय नं.१२** **श्री साई दैनंदिनी सन २०१७ डिलक्स प्रकारात प्रकाशित करुन विक्री करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम तरतुद–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम नं खालील ठ मध्ये १७. .प्रमाणे तरतुद आहे

श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रस्ताविक:-** उपरोक्त संदर्भीय विषयानुसार मे. टॅको व्हिजन प्रा.लि., मुंबई, मे. साईग्रेस फाउंडेशन, मुंबई व मे. इमेज क्रियेशन, मुंबई यांनी श्री साईबाबा संस्थानव्दारे डिलक्स प्रकारात विशिष्ट कागदावर बाबांच्या मुख्यपृष्टावर ३डि फोटोसह संस्थानव्दारे छपाई करुन प्रकाशित करावे असे पत्र दिलेले आहे. सदर प्रकाशनांचे वेळेत छपाई करुन संस्थानला पुरवठा देण्यात येईल असेही पत्रात नमूद केलेले आहे.

**प्रस्ताव:-** मे.टॅको व्हिजन प्रा.लि. मुंबई, मे.साईग्रेस फाउंडेशन, मुंबई व मे.इमेज क्रियेशन, मुंबई हे साईभक्त निविदाकार असून संस्थानचे कॅलेंडर्स डिलक्स प्रकारात खरेदीच्या विहित पध्दतीने छपाई करुन संस्थानला पुरवठा करत असतात. श्री साई दैनंदिनी डिलक्स सन-२०१७ आवृत्ती प्रकाशित करणेबाबत त्यांचा प्रस्तावाची संकल्पना काही नवीन प्रकाशने साईभक्तांना उपलब्ध करुन देणे योग्य आहे.

सन २०१७ ची डिलक्स डायरी छपाईकामी दहा हजार नगासाठी मे. टॅको व्हिजन, मुंबई यांनी अंदाजे रुपये ५००/-, मे. साईग्रेस फाउंडेशन, मुंबई यांनी अंदाजे रुपये ६२५/- व मे. इमेज क्रियेशन,मुंबई यांनी अंदाजे रुपये ५७०/- असे अंदाजे दर दिलेले आहेत. प्राप्त दरांची सरासरी किंमत रुपये. ५६५/- आहे व नवीन प्रकाशन असल्याने मागील छपाई दर उपलब्ध नाही.

छपाईचा तपशिल खालील प्रमाणे सादर केलेला आहे.

| अ.नं. | छपाई तपशिल | साईज | नग संख्या | अंदाजे खरेदी किंमत रुपये. |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई डिलक्स डायरी-२०१७ | ७"X ९.७५"<br>**कव्हर पेजवर थ्रीडी स्टीकर सह** | १०,००० | ५६५/- |
| | | | एकूण रक्कम रुपये. | ५०,६५,०००/- |

संस्थानव्दारे सालाबादाप्रमाणे दरवर्षी श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका- ०४ प्रकारात श्री साईभक्तांना उपलब्ध करुन देण्यात येतात. सदरची कार्यवाही विहित पध्दतीने वर्तमान पत्रात ई- निविदा सूचना जाहिरात प्रसिध्द करुन निविदेंची मागणी करण्यात येते. सदर कार्यवाहीसाठी निविदा मागविणे, छाननी करणे व कार्यादेश देणेकामी साधारणत: ०३ महिन्यांचा कालावधी अपेक्षीत असतो. कार्यादेश दिल्यांनतर प्रुफचेक करणे अंतीम छपाई करणे यासाठी ०२ महिन्यांचा कालावधी आवश्यक असतो.

**विभागाची मागणी/ अभिप्राय:-** श्री साई दैनंदिनी डिलक्स आवृत्ती छपाईची सर्व प्रक्रिया पुर्ण होणेकामी साधारणत: ०३ ते ०४ महिन्याचा कालावधी लागेल. डिलक्स डायरी माहे फेब्रुवारी-२०१७ शेवटच्या आठवडयामध्ये विक्रीसाठी उपलब्ध होईल. माहे २६ जानेवारी नंतर डायरी विक्रीस साईभक्तांचा प्रतिसाद कमी असतो तसेच अंदाजीत सदर डायरीची किंमत रु.५६५/- पर्यंत राहिल असे प्रस्तावित आहे.

सबब श्री साई दैनंदिनी डिलक्स आवृत्ती -२०१७ साठीच्या छपाई करुन घेण्यास, यासाठी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ५०,६५,०००/- (अक्षरी रुपये पन्नास लाख पासष्ट हजार मात्र) व विहीत पध्दतीने छपाईकामी वर्तमानपत्रात/ संस्थान संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्याच्या येणा-या खर्चास, ई-निविदेची प्रक्रिया राबविणेकामी सदर विषय मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रथमत: ५०० नग श्री साई दैनंदिनी सन- २०१७ डिलक्स प्रकारात प्रकाशित करणेत याव्यात, त्यासाठी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदरहू दैनंदिनीमध्ये प्रत्येक पानावर श्री साईबाबांनी केलेली रुग्णसेवा/ अन्नदान या आशयाच्या साईचरित्रामधील ओव्या छापणेत याव्यात, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**पुरवणी**

**विषय नं.१३** **सिंहस्थ कुंभमेळयाच्या धर्तीवर साईभक्तांना श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवात कॉफी टेबल बुक उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम तरतुद–** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम नं खालील ठ मध्ये १७. . .प्रमाणे तरतुद आहे

श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रस्ताविकः-** उपरोक्त संदर्भीय विषयानुसार सिंहस्थकुंभमेळयाच्या धर्तीवर श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवात कॉफी टेबल बुक साईभक्तांना उपलब्ध करुन देणेबाबत मे.दैनिक दिव्य मराठी वृत्तसमूहाचे औरंगाबाद कार्यालयाने व मे. टॅको व्हिजन प्रा.लि., मुंबई यांनी सुचविलेआहे. सदर पत्रावर सादर करावे असे मा. कार्यकारी अधिकारी यांनी निर्देश दिलेले आहेत

**प्रस्तावः-** मे.दैनिक दिव्य मराठी वृत्तसमूहाचे औरंगाबाद कार्यालयाने सिंहस्थकुंभमेळा,नाशिक येथे त्यांनी आयोजित केलेल्या कॉफी टेबल बुक तयार केले होते. त्याच्या प्रतिसादाबद्दल संस्थानचे लक्ष वेधले आहे. याचधर्तीवर त्यांचा **"शिर्डी के साई"** या विषयावर कार्यक्रम करण्याचा त्यांचा मानस आहे.

मे.टॅको व्हिजन प्रा.लि. मुंबई हे साईभक्त निविदाकार असून त्यांनीही कॉफी टेबल बुक तयार केलेले आहे.त्यांनी अंदाजे छपाई दर रुपये. २००० /-, इमेज क्रीएशन, मुंबई यांनी अंदाजे दर रुपये२३००/- व साईग्रेस फौंडेशन, मुंबई यांनी अंदाजे दर रुपये२४३०/- कळविला आहे. व दिव्य मराठी, औरंगाबाद यांनी पुस्तकांचा छपाई दर कळविलेला नाही. अंदाजे दरांची सरासरी दर रुपये२२४०/- इतका आलेला आहे. सदर कॉफी टेबल बुक संस्थानमार्फत छपाई करावयाची असल्यास अंदाजे खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे सादर करीत आहोत.

| अ.नं. | तपशिल | अंदाजे छपाई संख्या | अंदाजे खरेदी किंमत रुपये. प्रती नग | एकूण अंदाजे खर्च रुपये. |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा कॉफी टेबल बुक<br>१४.७५"X ११.२५" – Close/३०.५००" X११.२५ Open<br>(कव्हर+जाकेट+ इनर पेपर-१६० पाने ) | ५,००० | २२४०/- | १,१२,००,०००/- |

**(अक्षरी रुपये. एक कोटी बारा लाख मात्र.)**

**विभागाचा मागणी/अभिप्राय स्पष्ट मतः-** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवात नवीन संकल्पना कॉफी टेबल बुक सिंहस्थकुंभमेळयाच्या धर्तीवर देणगीदार साईभक्तांना उपलब्ध करुन देता येईल.

प्रथम नमुना पुस्तके निवडून नंतर साधारणतः ५००० नग पुस्तके विहीत पध्दतीने छपाईकामी अंदाजे खर्च रुपये १,१२,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी बारा लाख मात्रचे) व वर्तमानपत्रात/संस्थान संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्याच्या येणा-या योग्य त्या खर्चास, ई-निविदेची प्रक्रिया राबविता येईल. किंवा कॉफीटेबल या पुस्तकांची अंदाजे किंमत जास्तअसल्याने ते बुकस्टॉलवर सामान्य साईभक्त विकत घेणार नाही. शिर्डी भेटीत महत्वाच्या/ अतिमहत्वाच्या मान्यवरांना सादरीकरणसाठी (Presentation) काही मिनिटे/ तास उक्त पुस्तकांचा उपयोग होणार आहे. सदर खरेदी प्रक्रिया खर्चाक आहे. मुंबईतील मुद्रणालये त्यांच्या व्यवसाय वाढीसाठी पत्रे पाठवून प्रस्ताव सादर करीत असतात. मान्यवरांना सादरीकरणसाठी (Presentation) ५० नग कॉफीटेबल बुक विहित पध्दतीने खरेदी करुन उपलब्ध करता येतील असे नम्र मत आहे.

सदर विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेनुसार सिंहस्थ कुंभमेळयाच्या धर्तीवर साईभक्तांना श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवात कॉफी टेबल बुक उपलब्ध करुन देणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच कॉफी टेबल बुक तयार करणेकामी आवश्यक असलेले फोटो संस्थानमार्फत देण्यात यावे व फोटोंची निवड होईपर्यंत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**पुरवणी**

**विषय नं.१४** **साठा संपत आलेली संस्थान प्रकाशित प्रकाशने पुर्नमुद्रण विहित पध्दतीने ई-निविदा मागवून करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ नुसार मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत कलम नं.१७ (२) ठ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे

''श्रीसाईबाबांचे जीवन त्यांचे कार्य,त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार- प्रसार करील आणि श्री साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील''

उपरोक्त तरतुदीनुसार पपू.श्री साईबाबांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबत प्रचार-प्रसार होणेसाठी श्री साईबाबा सस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत संस्थान प्रकाशित साई सतचरित्र, पुस्तके, फोटो व ऑडीओ/व्हीडीओ सीडीचे पुनरमुद्रणकरून साईभक्तांना माफक किंमतीने विक्री केली जाते.

सर्व साधारण एक वर्ष पुरेल एवढया प्रतींची छपाई केली जाते. वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणे, ई-निविदा मागिवणे, प्राप्त सिलबंद निविदा मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडणे, छाननी करणे व कार्यादेश देणे अशा कामासाठी ३ ते ४ कालावधी लागतो त्यामुळे ३ ते ६ महिने पुरेल एवढा साठा शिल्लक राहिल्यानंतर छपाईची कार्यवाही चालू करण्यात येते. अनेक साईमंदिरात साईभक्त समेलने आयोजित केली जातात.त्यामुळे ठराविक प्रकाशनांची अचानक मागणी वाढते.

सन २०१७-२०१८ या कालावधीमध्ये शिर्डी येथे होणा-या श्री साई समाधी शताब्दी महोत्सावात श्री साईभक्तांचे संख्येत लक्षणीय वाढ होणार आहे. तसेच शताब्दी वर्षात परराज्यात होणा-या आयोजीत साईभक्त संमेलनात वेगवेगळया भाषेतील पुस्तकांचे स्टॉल लावण्यात येतात त्याठिकाणी मोठया प्रमाणात पुस्तकांची मागणी विचारात घेता, साईभक्तांची प्रकाशने खरेदी करण्यासाठी मोठया संख्येने वाढ होणार असल्याने सदर बाबींचा विचार करुन प्रकाशने छपाई संख्येत वाढ करण्यात आलेली आहेत व प्रकाशने विभागामार्फत संस्थान परिसरात नवीन ०४ पुस्तकालय साईभकतांच्या सेवेसाठी उपलब्ध करण्यात आलेली आहे.

पुनरमुद्रण करावयाची पुस्तके/फोटो शिल्लक साठा,अंदाजेकिती महिने साठा पुरेल व प्रस्तावित छपाई खर्चाबाबत अंदाजे किंमत (Estimated Cost) मुंबईतील ०३ मुद्रणालयाकडील मे. टॅको व्हिजन प्रा.लि. मुंबई, साईग्रेस फोंडेशन, मुंबई व इमेज क्रीयेएशन, मुंबई यांच्याकडून घेऊन त्यांची सरासरी करुन अंदाजे किंमत घेण्यात आलेली आहे. सदरचा परिशिष्ट खालील प्रमाणे.

| अं.नं. | छपाई तपशिल | भाषा | वार्षिक विक्री | शिल्लक स्टॉक | दरमहा सरासरी विक्री | किती महिने पुरेल | नवीन छपाई संख्या | मागिल छपाई दर | अंदाजे छपाई दर | अंदाजे छपाई एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई सच्चरित पोथी आवत्ती ३५ वी | मराठी | ५०३३२ | ३०००० | ५००० | ०६ | ३०००० | ८०.०० | ९०/- | २७,००,०००.०० |
| ०२ | श्री साई सतचरित्र आवत्ती २६ वी | इंग्रजी | ४२००० | २१००० | ४००० | ०६ | ५०००० | ३३.२४ | ५५/- | २७,५०,०००.०० |
| ०३ | श्री साई सतचरित्र आवत्ती २७ वर | तेलगू | ८२८१५ | ४०००० | ९००० | ०४ | १००००० | ४५.२५ | ६०/- | ६०,००,०००.०० |
| ०४ | श्री साई सतचरित्र आवत्ती २० वी | तामिळ | ६०००० | ४०००० | ५००० | ०६ | १००००० | ५२.७२ | ७५/- | ७५,००,०००.०० |
| ०५ | श्री सॉ ईसच्चरित पोथी आवत्ती २० वी | हिंदी | १२००० | २५०० | १००० | ०२ | १०००० | ९४.९५ | १२०/- | १२०००००.०० |
| ०६ | श्री साईबाबांचे आवतार व कार्य आवत्ती- २०वी | मराठी | २३६० | ४१ | ३०० | ०० | १०००० | १७.२० | २०/- | २०००००.०० |
| ०७ | श्री साईनाथ सगुणोपासना आवत्ती-५४ वी | मराठी | ६६२०७ | ५३०५२ | ६००० | ०६ | १००००० | ३.६० | ५/- | ५०००००.०० |
| ०८ | श्री साई सगुणोपासना (पॅकेट-साईज) आरती आवत्ती ०२ वी | तेलगू | ४५००० | ४०००० | ७००० | ०५ | ५०००० | ६.३७ | १०/- | ५०००००.०० |
| ०९ | श्री साई स्तवन मंजरी आवत्ती ३९ वी | मराठी | १५०००० | १५०००० | २०००० | ०६ | १५०००० | २.१५ | ३/- | ४५००००.०० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | मुलांचे साईबाबा आवृत्ती क्र.१३वी | मराठी | १२००० | ७००० | १००० | ०६ | ७००० | ५.५६ | १०- | ७००००.०० |
| ११ | मुलांचे साईबाबा आवृत्ती क्र.५ वी | इंग्रजी | २५००० | ०० | ०० | ०० | २५००० | ०८.१५ | १०/- | २५००००.०० |
| १२ | मुलांचे साईबाबा आवृत्ती क्र.१२ वी | तेलगू | ५०००० | १८००० | ४१६६ | ०४ | ५०००० | ८.५१ | १२/- | ६०००००.०० |
| १३ | मुलांचे साईबाबा आवृत्ती क्र.९ वी | तामिळ | २०००० | ४५०० | १६६६ | ०३ | २०००० | ६.९० | १०/- | २०००००.०० |
| १४ | मातृसाई आवृत्ती क्र.६ वी | तेलगू | २०००० | ५००० | १६६७ | ०३ | १५००० | ३४.०० | ४५/- | ६७५०००.०० |
| १५ | खापर्डे डायरी आवृत्ती क्र.१० वी | तामिळ | १०००० | ५००० | २००० | ०६ | १०००० | १६.६५ | २०/- | २०००००.०० |
| १६ | एक फकीर की पाठशाला आवृत्ती क्र.०७ वी | हिंदी | २०००० | ०० | २००० | ०० | २०००० | २८.०० | ९०/- | १८०००००.०० |
| १७ | सचित्र साईबाबा आवृत्ती क्र. १२ वी | मराठी/ इंग्रजी | २०००० | १०००० | ४००० | ०३ | २०००० | ६.०६ | १०/- | २०००००.०० |
| १८ | श्री साईं चे सत्चरित्र आवृत्ती क्र.०६ वी | तेलगू | ८००० | १०४९५ | ७६६ | ०८ | २०००० | ११३.२० | १५०/- | ३००००००.०० |
| १९ | श्री साईनाथ स्तवनमंजीरी आवृत्ती क्र.०५ वी | कन्नड | १०००० | १८६२ | १००० | ०२ | २५००० | ४.०० | ७/- | १७५०००.०० |
| २० | श्री साईचरित्र आवृत्ती क्र.७ वी | बंगाली | ४००० | ७९९ | ५०० | ०२ | १५००० | ५७.३९ | ७०/- | १०५००००.०० |
| २१ | श्री साईचरित्र पोथी आवृत्ती क्र.०८ | तेलगू | ५६०० | ११६१ | ५०० | ०२ | २०००० | १००.९४ | १२०/- | २४०००००.०० |
| २२ | श्री साईचरित्र आवृत्ती क्र.०४ | ओडिया | ८००० | ८७२४ | १००० | ०६ | १५००० | ४५.४५ | ६०/- | ९०००००.०० |
| २३ | श्री साई सर्मथचरित्र आवृत्ती क्र.०६ वी | इंग्रजी | ३५०० | ११०१ | ३०० | ०४ | १०००० | ११४.३२ | १७५/- | १७५००००.०० |
| २४ | साई की और मेरा पहला कदम आवृत्ती क्र.०४थी | हिंदी | ६००० | १२०४ | ५०० | ०२ | २०००० | ९०.३४ | १७५/- | ३५०००००.०० |
| २५ | श्री साईनाथ स्तवनमंजीरी आवृत्ती क्र.०५ वी | बंगाली | १११६ | ३७ | २०० | ०० | १०००० | ४.८५ | १०/- | १०००००.०० |
| २५ | श्री साई सतचरित्र- पोथी डिलक्स आवृत्ती क्र.०१ | मराठी | नवीन छपाई | - | - | - | १०००० | - | ३००/- | ३००००००.०० |
| २६ | श्री साई सगुणोपासना- आवृत्ती क्र.१० वी | बंगाली | ७००० | ५००० | ९०० | ०५ | १०००० | ६.९१ | १०/- | १०००००.०० |
| २७ | श्री साईचरित्र आवृत्ती क्र.०३ | मल्याळम | ७००० | ४४११ | ६०० | ०७ | ५००० | ५१.६० | ८०/- | ४०००००.०० |
| २८ | श्री साई सगुणोपासना- आवृत्ती क्र.१० वी | हिंदी | ६०००० | ४०००० | ५००० | ०८ | ५०००० | ८.६४ | १०/- | ५०००००.०० |
| २९ | श्री साई सगुणोपासना- आवृत्ती क्र.०३ री | गुजराती | ९००० | ४५०० | १२५० | ०३ | १५००० | १३.४० | १०/- | १५००००.०० |
| ३० | श्री साई सगुणोपासना- आवृत्ती क्र.१० वी | तामिळ | ४०००० | ३५०० | ३३३३ | ०१ | ५०००० | १७.४० | १०/- | ५०००००.०० |
| ३१ | श्री साई सगुणोपासना- आवृत्ती क्र.१८ वी | इंग्रजी | १०००० | ४५०० | १२५० | ०४ | १०००० | १७.४० | १०/- | १०००००.०० |
| ३२ | श्री साई सगुणोपासना- आवृत्ती क्र.०३ री | ओडिया | १०००० | ५००० | १५०० | ०६ | १०००० | ५.५८ | १०/- | १०००००.०० |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३३ | श्री साईनाथ स्तवनमंजीरी आवृत्ती क्र.०१ | पंजाबी | नवीन छपाई | - | - | - | ५००० | - | १०/- | ५००००.०० |
| | | | | | | | | | एकूण रुपये. | ४,३५,७०,००० |

**फोटो छपाई परिशिष्ट**

| अं.नं. | छपाई तपशिल | आकार | वार्षिक विक्री | शिल्लक स्टॉक | दरमहा सरासरी विक्री | किती महिने पुरेल | नवीन छपाई संख्या | मागिल छपाई दर | अंदाजे छपाई दर | अंदाजे छपाई एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | व्दारकामाईत बसलेले बाबा | १४X२० | १५४४४ | ७१३ | २००० | ०० | ५०००० | ३.२२ | ७/- | ३५००००.०० |
| ०२ | दगडावर बसलेले बाबा | २०X२८ | २०००० | ०२ | २००० | ०० | ५०००० | ६.३० | १२/- | ६०००००.०० |
| ०३ | दगडावर बसलेले बाबा थ्रीडी फोटो | २.५X३.५ | ३०००० | १७०१ | ३००० | ०० | २००००० | ३.८० | ५/- | १०००००.०० |
| | | | | | | | | एकूण रु. | | १९,५०,०००.०० |

| अं.नं. | छपाईकामाचा तपशिल | अंदाजे छपाई खर्च |
|---|---|---|
| ०१ | पुस्तके छपाईकामाचा तपशिल | ४,३५,७०,०००.०० |
| ०२ | फोटो छपाईकामाचा तपशिल | १९,५०,०००.०० |
| | एकूण रक्कम रुपये. | ४,५५,२०,०००.०० |

प्रस्तावित छपाईकामी विहित पध्दतीनुसार वर्तमानपत्रात शासकीय दराने जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागवून, निम्नतम दराने निविदाकारांना छपाई कार्यादेश देणेत येतील याकामी अंदाजे रु ४,५५,२०,०००/- (अक्षरी रु. चार कोटी पंचावन्न लाख वीस हजार रुपये.) मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च पुस्तके/ फोटो व दैनंदिनी/दिनदर्शिका वार्षिक छपाईच्या अंदाजपत्रीय खर्च रु.०७ कोटीमधून करता येईल.

उपरोक्त पुस्तके/फोटो छपाईकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ४,५५,२०,०००/- खर्चास व वर्तमानपत्रात शासकीय दराने देण्यात येणा-या ई- निविदा सूचना जाहिरात प्रसिध्दीचा योग्य त्या खर्चास मान्यता मिळणकामी सदर विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर

**निर्णय क्र.८२३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेली, साठा संपत आलेली संस्थान प्रकाशित प्रकाशने पुर्नमुद्रण करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, संस्थान प्रकाशित प्रकाशनांवर मुळ किंमत व सवलतीच्या दराची किंमत छापणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**पुरवणी**

**विषय नं.१५** **श्री गजानन महाराज, शेगाव संस्थानचे धर्तीवर श्री साईबाबा संस्थानमध्ये खोबरा लाडु सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.३०/०९/२०१६ रोजी “श्रीं” चे पुण्यतिथी उत्सव-२०१६ चे आढावा बैठकीमध्ये मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी श्री गजानन महाराज संस्थान, शेगाव या ठिकाणी भक्तांना वाटप करण्यात येत असलेल्या खोबरा लाडुचे धर्तीवर श्री साईबाबा संस्थानमध्ये खोबरा लाडु सुरु करावयाचे प्रस्तावित आहे असे सुचित केलेनुसार श्री गजानन महाराज संस्थान, शेगाव या ठिकाणी भक्तांना वाटप करण्यात येत असलेल्या खोबरा लाडुबाबत दुरध्वनीवरुन संपर्क करुन सविस्तर माहिती घेतली. त्याचा अहवाल पुढीलप्रमाणे –

खोबरा किस लाडु तयार करणेकामी लागणारे कच्चे मटेरीयलचा खर्च पुढीलप्रमाणे –

| अ.नं. | तपशिल | लागणारे मटेरीयल | क्विंटलचा दर रु. | होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | साखर | १०० किलो | ३९०१/- | ३९०१.०० |
| २ | खोबरा किस | १०० किलो | ११५००/- | ११५००.०० |
| ३ | हिरवी विलायची | २०० ग्रॅम | ९५००/- | १९०.०० |
| ४ | जायफळ | ४०० ग्रॅम | ७९१००/- | ३१६.४० |
| ५ | जिलेबी रंग | २०० ग्रॅम | १४३००/- | ०२८.६० |
| ६ | पेपर रोल पॅकींग | २.५०० किलो | १२३००/- | ३०७.५० |
| | | | एकुण - | १६२४३.५० |

एका दिवसासाठी ४० ग्रॅम वजनाचे सरासरी ६५०० नग लाडु तयार करण्यात येतात. मशिनव्दारे एका तासात ४००० नग लाडु तयार करुन पॅकींग केले जाते.

४० ग्रॅम वजनाचे सरासरी ६५०० नग लाडु तयार करण्यासाठी लागणारे उपरोक्त मटेरियल खरेदीसाठी संस्थानचे मंजुर खरेदी दरानुसार मटेरियलसाठी रु. १६,२४३.५०, + विद्युत आकार व घसारा यासाठी ५ % रु.८१२.१७ + मनुष्यबळासाठी रु. ५६६.६६ असे मिळून सरासरी रु. १७,६२२.३३ पर्यंत खर्च येतो.

म्हणजेच ४० ग्रॅम वजनाच्या एका खोबरा लाडूची किंमत सरासरी रु. ०२.७१ इतकी येते.श्री गजानन महाराज संस्थान, शेगाव येथे भक्तांना प्रसादरुपी ०१ नग लाडूचे पाकीट मोफत वाटप करण्यात येतात. तसेच देणगीदार भक्तांना ०२ नग लाडुचे पाकीट देणगी काऊंटरवर मोफत वाटप करण्यात येतात.

संस्थानचे लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामार्फत मोतीचूर लाडू तयार करण्यात येतात त्यासाठी लागणारे कच्चे मटेरीयलचा खर्च खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशिल | लागणारे मटेरीयल | क्विंटलचा दर रु. | होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | साखर | १०० किलो | ३९०१/- | ३९०१.०० |
| २ | हरबरा दाळ | ६५ किलो | ७६००/- | ४९४०.०० |
| ३ | गावरान तुप | ७५ किलो | ३५४००/- | २६५५०.०० |
| ४ | काजु पाकळी | ०२ किलो | ६९३००/- | १३८६.०० |
| ५ | खिसमिस | ०२ किलो | १६३००/- | ३२६.०० |
| ६ | हिरवी विलायची | ५०० ग्रॅम | ९५०००/- | ४७५.०० |
| ७ | जिलेबी रंग | ५० ग्रॅम | १४३००/- | ०७.१५ |
| ८ | पेपर पिशवी | ०६ किलो | १२९००/- | ७७४.०० |
| | | | एकुण | ३८३५९.१५ |

सदरचे मटेरीयल पासुन ५१०० नग मोतीचुर लाडु तयार करण्यात येतात. ठेकेदार यांचेकडील मनुष्यबळाव्दारे (हाताने वळवुन पॅकींग करणे) लाडु तयार करुन ०३ नगाचे एक लाडु पाकीट याप्रमाणे पाकीटे पॅकींग करण्यात येतात व सदरचे तयार लाडु पाकीटे कॅन्टीन विभागामार्फत लाडु विक्री काऊंटरवर रु.२०/- प्रती पाकीट यांप्रमाणे मोतीचुर लाडु विक्री करण्यात येत आहेत. ठेकेदारी मजुरी, विद्युत आकार घसारा ५ % धरुन ०१ नग मोतीचुर लाडु निर्मितीसाठी रु०८.१० पैसे इतका खर्च येत असुन, ०३ नगाचे ०१ पाकीटासाठी रु.२४.३० पैसे प्रती पाकीट इतका खर्च येत आहे.

०१ क्विंटल मोतीचुर लाडु तयार करणेसाठी लागणारे मटेरीयलसाठी सरासरी अंदाजे रुपये३८३५९/- इतका खर्च येतो.

तरी श्री गजानन महाराज संस्थान, शेगांव यांचे धर्तीवर श्री साईबाबा संस्थानमध्ये खोबरा लाडू निर्मिती करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे निणयार्थ सादर.

**निर्णय क्र.८२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेनुसार श्री गजानन महाराज, शेगाव संस्थानचे धर्तीवर श्री साईबाबा संस्थानमध्ये प्रायोगिक तत्वावर खोबरा लाडू तयार करणेत येऊन साईभक्तांसाठी ना नफा ना तोटा या तत्वार उपलब्ध करुन देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू व बर्फी प्रसाद विभाग)

---

**पुरवणी**

**विषय नं.१६** **संगणक प्रिंटेड रुम बुकिंग पावती छपाई करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी २००४ मधील २१ (१) (ग) " भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे " व (२) पोट-कलम (१) (ख) " भक्तांना राहण्यासाठी व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे. "

**प्रास्ताविक:-** साईभक्तांच्या निवासासाठी एकूण १२ इमारती मधून १५३६ खोल्या असून, यामध्ये ११५२ खोल्या विना वातानुकूलीत आहे, तर ३८४ खोल्या वातानुकूलीत आहे. खोल्यांसाठी कमी सेवाआकार आकारला जात असल्याने साईभक्त या विभागाला पसंती देतात.

साईभक्तांना खोलीवाटप करणेकामी प्रथम साईभक्त नाव नोंदणी रजिस्टरमध्ये नाव व पत्ता लिहून घेतला जातो. त्यानंतर त्यांना भक्त नाव नोंदणी फॉर्म देऊन त्यावर साईभक्तांचा संपर्ण पत्ता, नाव, वय व

नातेसंबंध लिहून घेतले जाते फॉर्म भरुन घेतल्यानंतर रुम बुकिंग काऊंटर रुमची बुकिंग करुन संगणक प्रणाली मधून साईभक्तांना रुम बुकिंग केल्याची पावती देणेत येते. तसेच ऑनलाईन रुम बुकिंग देणेकरीता व रुमची मुदतवाढ देणेकरीता रुम बुकिंग पावतीचा वापर करणेत येतो.

**मागणी:-** महिन्याला ४५ ते ५० हजार रुम बुकिंग पावत्यांचा वापर होतो. सध्याला विभागाकडे ३ ते ४ चार महिने पुरेल इतका स्टॉक शिल्लक असुन, पुढील कालावधीसाठी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे रुम बुकिंग पावती छपाई करावी लागेल.

संस्थानचे खरेदी विभागामार्फत मे.साईराकेश पेपर टेक, नाशिक यांचेकडुन दि०९/०३/२०१६ रोजीचे कार्यादेशामध्ये नमुद केल्याप्रमाणे संगणक रुम बुकिंग पावती प्रति नग रु०.४३२ पैसे प्रमाणे छपाई करुन घेण्यात आलेली आहे. सदर छपाई करुन सहा महिन्यापेक्षा जादा कालावधी झालेला असल्याने महाराष्ट्र शासनाच्या पुनर्प्रत्ययी आदेशानुसार उपरोक्त झालेल्या दि.०९/०३/२०१६ रोजीच्या कार्यादेशाप्रमाणे खरेदी करता येणार नाही. याकरीता नवीन दरपत्रके मागणी करुन संगणक प्रिंटेड रुम बुकिंग पावती छपाई करुन घ्यावी लागेल.

| तपशील | कागदाचे वर्णन | मागणी नग |
|---|---|---|
| संगणक प्रिंटेड रुमबुकिंग पावती | संगणक प्रिंटेड रुम बुकिंग पावर्त, कंटीन्युअस टिएनपीएल, ७५ जीएसएम, रंगीत मोनोग्राफसह, पाठपोट छपाई साईज ६" X ८" X २" नंबरींगसह | ५,४०,००० |

सन २०१६-१७ या वर्षासाठी रु.४,५०,०००/- इतक्या रक्कमेचे स्टेशनरी बजेट मंजुर असुन, त्यापैकी रक्कम रु.४,०३,१४०/- शिल्लक आहे. सदर छपाईचा खर्च शिल्लक रक्कमेतुन करता येईल.

**संस्थान अधिनियम/ठराव नुसार अनुमान:-**मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन कार्यवाही करता येईल.

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय:-**विभागामार्फत विहीत पध्दतीने दरपत्रके मागणी करुन संगणक प्रिंटेड रुम बुकिंग पावती छपाई करणेस व त्याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास विभागाकरीता आवश्यक असलेल्या संगणक प्रिंटेड रुम बुकिंग पावत्या विहीत पध्दतीने कोटेशन मागवून छपाई करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**पुरवणी**

**विषय नं.१७** **समाधी शताब्दी वर्षानिमित्त संपुर्णशिर्डी दर्शन बस सेवेच्या परवानगी विषयी.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद-** १) - २१ चा (१) चा (ग) – भक्तांनादेवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे

२) (१क) पोट कलम (१) च्या तरतुदीनां अधिन राहुन विश्वस्तव्यवस्थेस राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तीच्या अधिन राहुन भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक, विमानतळ आणि तत्सम पायाभुत सुविधा यांसारख्यापायाभुत सविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहाय्यक अनुदान देता येईल.

**मा.व्यवस्थापन समिती ठराव –** निरंक.

**प्रस्तावना–** संदर्भिय पत्राने श्री दिलीप भास्करराव वाकचौरे प्रोप्रा.हॉटेल के.बीज.ग्रॅन्ड, शिर्डी यांनी मी दिलीप भास्करराव वाकचौरे (V.P. of Lions club of Shirdi) मागिल चार ते पाच वर्षापासुन हॉटेल व्यवसायामध्ये कार्यरत आहे व आमच्या सेवेतुन साईभक्त आनंदी आहेत. परंतु मागील काही वर्षापासुन साईभक्तांचा शिर्डीमधील ओघ कमी झालेला आढळतोय. तरीही आम्ही यावर उपाय म्हणुन संपुर्ण शिर्डी दर्शन हा उपक्रम राबविण्याचे योजले आहेत हया उपक्रमाअंतर्गत आम्ही साईभक्तांसाठी बस सेवा सुरु करत आहोत. या बस सेवेअंतर्गत आम्ही साईभक्तांना शिर्डी परिसरातील प्राचिन मंदिरांचे दर्शन करवत आहोत. या सेवेमुळे साईभक्तांना शिर्डीत अधिक वेळ थांबण्याचे कारण मिळेल व शिर्डी परिसराचा विकास होण्यास मदत मिळेल.

तरीही कृपया आपण संपुर्ण शिर्डी दर्शन बसला भक्तनिवासाच्या आवारात काही वेळासाठी उभी करण्याची परवानगी दयावी अश विनंती केली आहे.

**विभागाची मागणी –** पत्रकर्त्याचा उद्देश निश्चितच चांगला आहे, परंतु कार्य तथा उपक्रम व्यक्तीगत आहे या उपक्रमातुन प्राप्त निधीशी संस्थानचा संबंध येणार नाही.

**छाननी करुन अनुमान–** महाराष्ट्र शासनाचे संमत संदर्भ क्र०२ चे अधिनियमामध्ये बस वाहनतळ, रेल्वे स्थानक, विमानतळ आणि तत्सम पायाभुत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकीय विभागांना शासकीय महामंडळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहाय्यक अनुदान देतायेईल अशी तरतुद आहे. परंतु खाजगी व्यवसायीक, व्यक्ती किंवा व्यक्ती समुदाय संचलित वाहनांसाठी संस्थान मालकीच्या जागेत वाहनतळ उपलब्ध करुन देणे किंवा त्याकामी संस्थान जागेच्या वापर आदी बाबत तरतुद नाही.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय–** प्रस्तुत शिर्डी दर्शन बस उपक्रमाचे परीचालक हे खाजगी हॉटेल चालक असुन मागील चार ते पाच वर्षापासुन ते या क्षेत्रामध्येकार्यरत आहेत. सदरचा उपक्रम हा त्यांचा सर्वस्वी खाजगी स्वरुपाचा आहे व सशुल्क आहे प्रवासादरम्यान दुर्देवाने काही अघटीत घटना घडल्यास त्याचे उत्तरदायित्व सुध्दा श्री वाकचौरे यांचेच आहे परंतु आपले भक्तनिवासांचे आवारात सदर बस काही वेळासाठी (प्रवासी बसमध्ये घेण्याचे उद्देशाने) उभी केल्यास साईभक्तांचे मनात सदर उपक्रम श्री साईबाबा संस्थान अंतर्गत असल्याचा समज निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशा अघटीत घटना घडल्यास त्याचा थोडा तरी मन:स्ताप प्रशासनास होण्याची शक्यता निर्माण होऊ शकते कारण आपले निवासांतील भक्तगण सुध्दा सदर बसमध्ये असतील.

शिर्डी परिसरातील सुमारे १०० किलो मिटर परीघामध्ये अनेक एतिहासीक धार्मिकस्थळे जसे श्री घृष्णेश्वर ज्यार्तिलिंग, वेरुळ, श्री त्र्यंबकेश्वर ज्योर्तिलिंग, त्र्यंबकेश्वर, शनि शिंगणापुर देवस्थान, शिंगणापुर, नासिक आहेत. त्याठिकाणी सुध्दा श्री क्षेत्र शिर्डी येथे येणारे साईभक्त दर्शन हेतु खाजगी वाहनातुन जात असतात पर्यायाने असे वाहन चालक, मालक सुध्दा याबाबत मागणी करु शकतात.

याबाबींचा विचार करता तसेच प्रस्तुतचा उपक्रम पुर्णपणे खाजगी स्वरुपाचा असल्याने व अधिनियमामध्ये अशा प्रकारची तरतुद नसल्याने श्री वाकचौरे यांची मागणी नियमात बसत नाही परंतु सदरबाबत धोरणात्मक निर्णयासाठी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संपुर्ण शिर्डी दर्शन बस सेवेचा उपक्रम पुर्णपणे खाजगी स्वरुपाचा असून त्यामुळे भक्तांमध्ये गैरसमज निर्माण होईल तसेच अर्जदारास संस्थान परिसरामध्ये याकामी परवानगी दिल्यास इतर स्थानिकही अशीच मागणी करतील या बाबींचा विचार करता समाधी शताब्दी वर्षानिमित्त संपुर्ण शिर्डी दर्शन बस सेवेस परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

**पुरवणी**

**विषय नं.१८** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ ची माहिती साईभक्तांना सहज तथा सुलभतेने समजावी याकरीता दृकश्राव्य स्वरुपात दहा मिनिटांची बहुभाषीय चलचित्र (फिल्म) तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम २१(१) मधील पोटकलम (ग) नुसार "भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडणेसाठी सोयी व सुविधा पुरविणे" अशी तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५८६ अन्वये शताब्दी महोत्सवाकरीता शिर्डी व परिसरात उपलब्ध करावयाच्या सोयी व सुविधांबाबत सल्लागार टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स लि, मुंबई यांनी तयार केलेला प्रकल्प अहवाल (Draft DPR) शासनास सादर करणेस मान्यता देण्यात आली.

**प्रस्तावना:-** श्री क्षेत्र शिर्डी, ता. राहाता, जिल्हा. अहमदनगर येथील थोर संत श्री साईबाबा यांच्या महासमाधीस सन २०१८ मध्ये १०० वर्षे पूर्ण होणार आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात

येणार आहे. समाधी शतक महोत्सवी वर्षानिमित्त शिर्डी मध्ये येणा-या साईभक्तांना सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली कृती आराखडा समिती गठीत करण्यात आली असून या समितीला सादर करावयाचा प्रारुप कृती आराखडा अंतिम करण्यासाठी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती गठीत करण्यात आली आहे. सदर उपसमितीची द्वितीय बैठक दि.०६/१०/२०१६ रोजी मा.मुख्य सचिव, समिती कक्ष, मंत्रालय, मुंबई येथे पार पडली.

सदरहू सभेत खालील निर्णय क्र.५ संमत झाला आहे.

"केंद्र शासनास सादर करावयाचा दिर्घ मुदतीचा प्रस्ताव श्री साईबाबा संस्थान, राज्य शासन व केंद्र सरकार असा वेगवेगळा न करता एकत्रित स्वरुपात करण्यात यावा. कृती आराखडा तसेच शताब्दी महोत्सवाची माहिती सहज तथा सुलभतेने समजावी याकरीता दृकश्राव्य स्वरुपात दहा मिनिटांची बहुभाषीय चलचित्र (फिल्म) तयार करण्यात यावी." असे ठरले.

**प्रस्ताव:-** केंद्र सरकारकडे प्रस्ताव सादर करतांना शिर्डी व श्री साईबाबा संस्थानबद्दल तसेच शताब्दी महोत्सव कालावधीत करावयाच्या विविध विकास कामे व नियोजनाबद्दल माहिती व्हावी यासाठी १० ते १२ मिनिटांची बहुभाषीय चलचित्र (फिल्म) किंवा walk through बनविणेबाबत शासनाचे उपसमितीचे बैठकीत निर्णय झाला आहे. सदरहू काम करणेसाठी अंदाजे रु.२ लक्ष मात्र खर्च अपेक्षीत आहे.

सदरहूकामी walk through बनविणेसाठी बांधकाम विभाग, प्रकाशने विभाग व जनसंपर्क विभागाचे समन्वयाने माहिती एकत्रित करुन कथानक (Script) तयार करुन घेता येईल. यासाठी प्रसिध्द कला दिग्दर्शक श्री नितीन देसाई, आयकॉनिक चंद्रकांत प्रॉडक्शन्स प्रा. लि., मुंबई यांचे मार्गदर्शन घेता येईल.

तरी याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.२ लक्ष मात्रचे खर्चास व विहीत पध्दतीने कोटेशन्स मागविणेसाठी मान्यता मिळणेचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८२७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**पुरवणी**

**विषय नं.१९** **शिर्डी येथे विमानतळ उभारणेकामी अर्थसहाय्य करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम 2004 मधील तरतुद:** (2004 चा महा. 14) याच्या कलम 21 च्या पोट-कलम (1क) अन्वये, भक्तांच्या सोयीसाठी बस, वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यासारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:**

01. निर्णय क्रमांक 130, दिनांक 17 फेब्रुवारी, 2007 अन्वये **"..**मौजे काकडी (शिर्डी) विमानतळ विकसीत करणेसाठी अर्थसहाय्य करणेचे प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, MADC ज्या ठिकाणी विमानतळाची जागा निश्चित करेल त्या ठिकाणी विमानतळ प्रकल्प उभारणीसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत विहीत पध्दतीने शासनाची मान्यता घेऊन योग्य ती आर्थिक मदत करण्यात येईल असे कळविण्यात यावे, असे ठरले.**"**

02. निर्णय क्रमांक 23, दिनांक 03 जानेवारी, 2009 अन्वये **"..**मौजे काकडी (शिर्डी) विमानतळ विकसीत करणेसाठी अर्थसहाय्य देणेचे प्रस्तावास तत्वत: मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना शिर्डी येथील विमानतळ विकसित करणेसाठी रक्कम रुपये 50 कोटी मात्र इतका निधी उपलब्ध करुन देण्यासाठी काय अटी असतील तसेच कोणत्या पध्दतीने निधी उपलब्ध करुन द्यावा याबाबत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेशी चर्चा करुन अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले."

03. निर्णय क्रमांक 309, दिनांक 23 मे, 2014 अन्वये **"..**शिर्डी येथे विमानतळ उभारणेकामी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित**,** मुंबई यांना उर्वरीत रु५ कोटी मात्र रक्कम देणेसाठी संस्थान वकीलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन**,** मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाची मान्यता प्राप्त झालेनंतर त्यांना अर्थसहाय्य करावे**,** असे ठरले. "

**प्रस्ताविक:** उपरोक्त प्रमाणे झालेले निर्णयानुसार शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत आला. त्यास अनुसरुन महाराष्ट्र शासनाने उपरोक्त अधिनियम 2004 चे तरतुदीनुसार विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील No.SSV-011/C.R.44/ Desk- XVI . दि.24 जून, 2011 रोजीचे आदेशान्वये,

महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना पुढील अटी व शर्तींच्याअधिनतेने रु.50 कोटी ( रु.50 कोटी) इतक्या मर्यादेपर्यंत सहाय्यक अनुदान देण्यास, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेला प्राधिकार व परवानगी दिली आहे.

01. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित मंजूर रकमेचा विनियोग केवळ शिर्डी येथील विमानतळ विकसित करण्यासाठी करील.
02. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित अशा अनुदानाचा स्वतंत्र हिशोब ठेवील आणि त्याचा वापर इतर कोणत्याही प्रयोजनांसाठी करणार नाही.
03. उक्त कंपनी, सहाय्यक अनुदानाचा विनियोग केल्यापासून तीन महिन्यांच्या आत, राज्य शासनाला आणि विश्वस्तव्यवस्थेला, विनियोग प्रमाणपत्र तीन प्रतीत सादर करील.
04. शासनमान्य लेखापरिक्षकांचा, अनुदानाच्या विनियोगाबाबतचा लेखापरिक्षण अहवाल राज्य शासनाला आणि विश्वस्तव्यवस्थेला सादर करण्यात येईल.
05. विमानतळाचा विकास केल्यानंतर, उक्त कंपनी, किमान 1,000 चौरस फुट इतकी जागा माहितीकेंद्र, प्रसिध्दी केंद्र, इत्यादी उभारण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेला मोफत देईल.
06. राज्य शासन वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा इतर अटी व शर्ती, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मर्यादित यांना व विश्वस्तव्यवस्थेला बंधनकारक असतील.

उपरोक्त शासन आदेशानुसार महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांना आजअखेर एकुण रुपये 45 कोटी इतके सहाय्यक अनुदान देण्यात आले आहे. उर्वरीत रु.5 कोटी निधी देणेबाबत मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे विधी विभागामार्फत सिव्हील ॲप्लीकेशन नं. 6852/2015 दि.22/06/2015 अन्वये प्रस्ताव सादर करणेत आला होता.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.16/08/2016 रोजीचे सभेतील निर्णयानुसार मा. उच्च न्यायालयात दाखल केलेले सिव्हील ॲप्लीकेशन मागे (Withdraw) घेण्यात आले असलेबाबत विधी विभाग यांनी त्यांचेकडील दि.08/09/2016 रोजीचे पत्रान्वये कळविले असून, त्यामध्ये विषयांकीत कामाचा समावेश आहे.

शासनाचे उपरोक्त अट क्र.5 मध्ये नमूद केलेनुसार संस्थानला माहिती केंद्र, प्रसिध्द केंद्र इत्यादी उभारण्यासाठी 1000 चौरस फुट जागा मिळणार आहे. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांनी वेळोवेळी आयोजित केलेल्या बैठकीचेवेळी व्हि. आय. पी. पास वितरण व्यवस्था व इतर सुविधा उपलब्ध करणेबाबत संस्थानकडे मागणी केली आहे. सदर सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी शासनाने देऊ केलेली 1000 चौरस फुट जागा अपुरी पडणार असल्याने, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांचेकडे 2000 चौरस फुट जागेची मागणी करता येईल.

**प्रस्ताव:** तरी शिर्डी येथे विमानतळ उभारणेकामी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित**,** मुंबई यांना उर्वरीत रु.**5** कोटी इतके सहाय्यक अनुदान देणे. तसेच साईभक्तांचे सोयीसाठी माहिती केंद्र, प्रसिध्द केंद्र इत्यादी तसेच व्हि. आय. पी. पास वितरण व्यवस्था काऊंटर व संस्थान प्रकाशीत प्रकाशने व सी. डी. विक्री काऊंटर इ. सोयी-सुविधा विमानतळावर उपलब्ध करणेसाठी 1000 चौरस फुट जागे ऐवजी 2000 चौरस फुट जागेची मागणी करणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथील (काकडी) विमानतळावर साईभक्तांचे सोयीसाठी माहिती केंद्र, प्रसिध्द केंद्र इत्यादी तसेच व्हि. आय. पी. पास वितरण व्यवस्था काऊंटर, संस्थान प्रकाशीत प्रकाशने व सी. डी. विक्री काऊंटर इ. सोयी सुविधा उपलब्ध करणेसाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांचेकडे २००० चौ.फुट जागेची मागणी करण्यात यावी. परंतु त्यांना रु५/- कोटी सहाय्यक अनुदान देणेचे तुर्त स्थगित ठेवणेत यावे, असे ठरले.**

**तसेच या विमानतळावर येणाऱ्या सर्व एअरलाईन्सच्या बोर्डीग पासवर व्हीआय.पी.दर्शनाचा पास उपलब्ध करुन देण्यात यावा व पासची एकत्रित रक्कम एअरलाईन्स कंपनीकडून घेण्यात यावी,**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ जनसंपर्क अधिकारी/ मुख्यलेखाधिकारी)

---

**पुरवणी**

**विषय नं.२०** **समाधी मंदिरास लावलेल्या बुटी वाडा पाटीबाबत.**

**प्रस्ताव-** मंदीर विभागाने श्री. सुभाष ग. बुटी, नागपूर यांचे यांचे दि२६/०९/२०१६ रोजीचे पत्रातील विनंतीच्या अनुषंगाने सदरचे पत्र पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी इकडील विभागाकडे पाठविले आहे.

*श्री. सुभाष ग. बुटी, नागपूर यांनी दि.२६/०९/२०१६ रोजी मा. अध्यक्ष सो. यांना अग्रेषित केलेल्या पत्रात, "मी सुभाष गणपतराव बुटीआमचे आजोबा श्रीमंत कै. गोपाळराव मुकूंदराव बुटी आपणास माझी नम्र विनंती आहे की, मंदीर "समाधी मंदीर" ज्या ठिकाणी कडूनिबांचे झाड आहे त्या भागात दरवाज्याजवळ "बुटी वाडा" असे संगमरवरी दगडावर "बुटी वाडा" अशी पाटी होती. परंन्तु काही दिवसांनी आम्ही पाहिले कि ती पाटी तिथे नव्हती. तरी आमची विनंती आहे कि त्यावर आपण लक्ष देऊन पाटी लावण्याची व्यवस्था करावी." सोबत चरक ब्राम्हणांचा इतिहास या ग्रंथातील पान नं २१५ व २७७ या पानांच्या छायांकित प्रती जोडलेल्या आहेत.*

तथापी याबाबत नमूद करण्यात येते की, समाधी मंदीराच्या कोणत्याही भितींस "बुटी वाडा" अशी संगमरवरी दगडावर पाटी लावलेली इकडील विभागाच्या पाहणीत नाही.

परंतु श्री साईबाबा समाधी मंदीर सभामंडपाचे पूर्वेकडील भिंतीसबाहेरील बाजूने मोठया दरवाजाचे डाव्या बाजूस खालील आशयाची पाटी लावलेली आहे.

**श्रींचे समाधिमंदिर- बुटीवाडा**

कै. श्रीमंत गोपाळराव मुकुंदराव बुटी राहणार नागपूर यांनी हा वाडा स्वखर्चाने सन १९१७-१८ मध्यें बांधला. विजया दशमी शके १८४०, मंगळवार या दिवशी अपराह्ण व्यापिनी एकादशीस (दि.१५ ऑक्टोबर इ. स. १८१८, ता. ९ मुहर्रम हि. सन १९२५) दुपारीं तीन वाजण्याचे सुमारास श्री साईबाबांनी व्दारकामाईत देह ठेवला. तेथून तो समारंभपूर्वक आणून त्यांच्या इच्छेनुसार या वाडयांत ठेवण्यांत आला. श्री साईबाबांचे ३४ व्या पुण्यतिथीचे उत्सव प्रसंगी (इ.स. १९५२) संस्थान व्यवस्थापक समितीतर्फे श्री संत पारनेरकर महाराज यांचे हस्ते या मंदीरावर सुवर्णकळस बसविण्यात आला व ३६ व्या पुण्यतिथीचे उत्सवसमयीं (इ.स.१९५४) श्री साईबाबांच्या संगमरवरी पूर्णाकृति मुर्तीची विधीयुक्तस्थापना संस्थान व्यवस्थापक समितीमार्फत करण्यांत आली.

तरी समाधी मंदिरास लिंब वृक्षाचे बाजूने "बुटी वाडा" अशी पाटी लावणेबाबत श्री सुभाष ग. बुटी यांनी केलेल्या विनंतीबाबत निर्णय होणेकरीता सदरहु प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.८२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कै.श्रीमंत गोपाळराव मुकुंदराव बुटी नागपूर यांनी हा वाडा स्वखर्चाने सन १९१७-१८ मध्यें बांधलेला असून तो संस्थानकडे वर्ग केलेला आहे त्यामुळे सदरहू वाडयास प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे पाटी लावणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**पुरवणी**

**विषय नं.२१** **मंदिर परिसरातील देणगी कार्यालय क्र.१ येथे बसविणेकामी ACP Sheet मध्ये बॅकलीट बोर्ड तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

अधिनियमाचे कलम – १७ मधील पोटकलम (१) मध्ये भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावना:-** मंदिर परिसरातील देणगी कार्यालय क्र. १ चे विस्तारीकरण व इंटेरियरचे काम पूर्ण करणेत आले असून, सदर कार्यालयाचे ठिकाणी साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी देणगी कार्यालय (Donation Office) या मजकुराचा बोर्ड ACP Sheet मध्ये फ्रेमसह बॅकलीट स्वरुपाचा तयार करुन बसविता येईल. त्यामुळे इच्छुक देणगीदार भक्तांना देणगी कार्यालय लगेच दिसून येईल तसेच बॅकलीट बोर्डमुळे रात्रीच्यावेळीही अक्षरे ठळकपणे दिसून येतिल.

**प्रस्ताव:-** सदरहू बोर्ड तयार करुन घेणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | बोर्डचा तपशिल | परिमाण/ एकक | एकूण अंदाजे खर्च रक्कम रु. |
|---|---|---|---|
| ०१ | देणगी कार्यालय ( Donation Office) या मजकुराचा बॉक्स टाईप बॅकलीट बोर्ड तयार करणे. त्यासाठी ACP Sheet मध्ये लेटर कटींग करुन White Acrylic Sheet बसविणे. स्क्वेअर पाईपमध्ये फ्रेम बॉक्स तयार करुन सर्व बाजूस ACP Sheet बसविणे. बॉक्समध्ये बॅकलीट करीता योग्य क्षमता व संख्येचे LED Lights बसविणे. | ०१ नग | ७०,०००/- |
| | | **एकूण रक्कम रु.** | **७०,०००/-** |

**विभागाचा शेरा:-** वर नमूद केलेप्रमाणे देणगी कार्यालय क्र. १ (Donation Office) येथे साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी ACP Sheet मध्ये फ्रेमसह बोर्ड तयार करुन बसविणेकामी येणारे अपेक्षित खर्चास व याकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरातील देणगी कार्यालय क्र.१ येथे** साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी **ACP Sheet मध्ये बॅकलीट बोर्ड तयार करुन बसविणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**पुरवणी**

**विषय नं.२२** **माहिती तंत्रज्ञान विभागाचे तांत्रिक पदांबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:** कलम १७ (१) नुसार.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं. :** मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०९/१०/२०१६ रोजीचे सभेतील विषय क्रं.१२.

**प्रास्ताविक:** सन 2006 मध्ये संस्थानचे आकृतीबंधांची कार्यवाही चालु झाली त्यानुसार 2009 पर्यंत त्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. त्याप्रमाणे मंजुरआकृतीबंधानुसारमाहिती तंत्रज्ञान विभागास एकत्रित 21 पदास मान्यता मिळालेली आहे. परंतु सद्यस्थितीत माहिती तंत्रज्ञान विभागाकडे 03 तांत्रिक कर्मचारी उपलब्ध आहे. त्यांची मंजुरआकृतीबंधानुसारपदस्थापना प्रलंबीत आहे.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात वेळोवेळी तंत्रज्ञानात बदल होत असतात शिवाय संस्थानची अंगीकृत ट्रस्ट असल्यामुळे शासनाच्याही नियमावलीचे काटेकोरपणे पालन करावे लागते. यामुळे बराचसा वेळ हा कागदपत्रे, टिपण्या इत्यादी कामात निघुन जातो. यामुळे विविध प्रकल्प राबवितांना अडचणी येतात. शिवाय गुणवत्ता राखणे हे काम जिकीरीचे होते. सहाजिकच कुठल्याही तांत्रिक विभागाची गुणवत्ता अपेक्षीत असल्यास, तेथील तांत्रिक कर्मचारीही उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. शासनाचा आकृतीबंध 2006 च्या आऊटसोर्सिंगव्दारे लागणाऱ्या कर्मचाऱ्यासाठी बनविण्यात आला होता. परंतु मनुष्यबळच मंजुर आकृतीबंधानुसार घेतले नसल्याने, अपेक्षेनुसार तात्काळ कामे होण्यास अडचणी येतात यामुळे सहाजीकच वरिष्ठाचे नाराजीला सामोरे जावे लागते.
दि. 01/10/2016 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे स्थानिक उप-समितीचे बैठकीमध्ये यावर चर्चा झालेली आहे आवश्यक पदांचा अहवाल सादर करावा असे निर्देशित केले आहे. तरी मंजुरआकृतीबंधानुसार खालील प्रमाणे पदे भरण्यासंदर्भात निर्णय होणे अपेक्षित आहे.

| अ. नं. | पदनाम | पात्रता | कामाचे स्वरुप | पद संख्या | मासिक एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Network Engineer<br>नेटवर्क इंजिनियर | B.E. Computer /Electronics/IT and CCNA Certification<br>Experience minimum 3 years | • Interact with numerous computer in a multi-layered client server environment.<br>• Ensure desktop computers interconnect seamlessly with diverse systems including associated validation systems, email servers, application servers, and administrative systems Diagnose and quickly resolve a wide range of Windows applications and networking problems to help.<br>• Minimize downtime Troubleshooting network connectivity in a LAN/WAN environment.<br>• Requesting and coordinating vendor support.<br>• Develop trends by | 1 | Rs. 25,000/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | monitoring and analyzing problems and support requests.<br>• Darshan pass Trilok system Network 24 x 7<br>• Old work maintaince & support.<br>• All fiber cable network & cat-6 work. | | |
| 2 | Hardware Engineer<br>हार्डवेअर इंजिनियर | B.E. Computer / Electronics/ IT / OR 3 year Diploma in Electronics / DETE / M.Sc. Electronics<br>Experience minimum 3 years | • Support and update assigned support service requests. Handle daily technical support activities on desktop support, data server management. Setup desktop computers and peripherals and test network connections. Install and test desktop software applications and internet browsers.<br>• Test computers to ensure proper functioning of computer systems.<br>• Extend computer support remotely & physical for systems' software and hardware.<br>• Setup computers and install software for various applications and programs. Interact with staff on desktop problems and their resolution. Maintain computer peripheral devices like scanner.<br>• UPS and resolve associated problems & UPS batteries support. | 1 | Rs. 25,000/- |
| 3 | Software Programmer<br>सॉफटवेअर प्रोग्रामर | B.E. Electronics/IT/computer/ MCM/MCS and Java international Level certification<br>Experience Minimum 3 years in software development at large Scale. | • Validated codes of 37 software modules as per the requirements Development of software modules as per the requirements Development and automation and execution of Unit and Functional Tests Modify existing software to correct errors or to upgrade interfaces and improve performance.<br>• release notes to install product releases and fixes.<br>• Execute test scripts and cases and initiate modifications if necessary.<br>• Provide daily test statuses on progress and issues.<br>• Troubleshoot | 1 | Rs. 25,000/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | environment, data, code and requirements problems currently 38 models. | | |
| 4 | Technical Assistant (Hardware)<br>तांत्रिक सहाय्यक हार्डवेअर | 3 years- DETE (B.T.E. recognized) BCS/B.Sc. (Electronics) With A+ certification.<br>Experience minimum 3 years similar capacity | • Oversee and update assigned support service requests.<br>• Handle daily technical support activities on desktop support, data network and server management.<br>• Setup desktop computers and peripherals and test network connections. Install and test desktop software applications and internet browsers.<br>• Maintain computer peripheral devices like printers and resolve associated problems. Work as per divistion hard work Engg & network Engg. | 4 | Rs. 14,000/- |
| 5 | Technical Assistant (Software)<br>तांत्रिक सहाय्यक सॉफटवेअर | DCE (B.T.E. recognized)/ BCS/ B.Sc. (Computer)<br>Experience minimum 3 years similar in capacity | • Oversee and update assigned software support service requests.<br>• Handle daily technical software support activities on desktop support, data network and server management.<br>• Install and test software applications and internet browsers.<br>• Setup & Install software for various applications and programs. | 2 | Rs. 14,000/- |
| 6 | Website Operator<br>वेबसाईट ऑपरेटर | Post Graduate from any recognized University<br>Experience minimum 5 years in internet, bulk mail, internet search, and website functional support | • Functional Support to website<br>• Photo & Tender uploading.<br>• E-mail & What's up support to Sai devotee. | 2 | Rs. 11,000/- |

**मागणी:** प्रस्ताविकेमध्ये नमुद केलेप्रमाणे तांत्रिक पदांसदर्भात तांत्रिक कर्मचारी पुरविणाऱ्या एजन्सीव्दारे, 2 वर्षाकरीता उपलब्ध करता येईल यासाठी निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :** प्रशासकीय

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:** उपरोक्त विंवेचनानुसारमाहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील तंत्रज्ञानाचे बदल व दिवसें-दिवस वाढत असलेला तांत्रिक कामाचा आवाका याबाबत विचार करुन सदरील पदांबाबत निर्णय घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.८३१** **संस्थानचे माहिती तंत्रज्ञान विभाग व श्री साईबाबा हॉस्पिटल या ठिकाणी जवळपास १० ते १५ वर्षापासुन प्रस्तावात नमुद केलेली शैक्षणिक पात्रता असलेले कर्मचारी आज ना उद्या आपल्याला या पदावर कायम करतील या आशेने कंत्राटी पध्दतीने विनातक्रार काम करत आहेत, त्यांचा प्राधान्याने विचार व्हावा, अशी माहिती सदस्यांनी सभेस दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, माहिती तंत्रज्ञान विभागाच्या मंजुर आकृतीबंधातील शैक्षणिक पात्रता असलेले व आजतागायत संस्थानमध्ये (माहिती तंत्रज्ञान विभाग व श्री साईबाबा हॉस्पिटल) कंत्राटी पध्दतीने काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांवर अन्याय होऊ नये, याकरीता या कर्मचाऱ्यांचा प्राधान्याने विचार करणेत येऊन, त्यांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार प्रस्तावित पदांवर/ एकत्रित मानधनावर कंत्राटी पध्दतीने कंत्राटदारामार्फत घेण्यात यावे व इतर उर्वरित पदांवर प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आऊटसोर्स पध्दतीने कर्मचारी घेण्यात यावे.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख/ प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**पुरवणी**

**विषय नं.२३** **संस्थानचे ई-मेल सेवेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद :** 17 (1) नुसार.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.- दिनांक 07/11/2009 रोजीचे सभेतील निर्णय क्र.799.

**प्रास्ताविक:** दिवसें-दिवस कामचा वर्कलोड व गतीमानता यासाठी साधारणत: सन 2006 चे दरम्यान ई-मेल सेवा संस्थानमध्ये सुरु करण्यात आली होती सहाजीकच ई-मेल सेवेचा वापर पाहीजे तितक्या स्वरुपात सुरु नव्हता परंतु, सर्व तांत्रिक विभाग व मा. कार्यकारी अधिकारी सो, उप-कार्यकारी अधिकारी सो., यांचे वापरात ई-मेल सेवा घेण्यात आलेल्या होत्या.

परंतु, ई-मेलचा दिवसें-दिवस वापर अधीक-अधीक वाढवीणेकामी मा.अध्यक्ष सो., यांनी विभागप्रमुखांचे बैठकीमध्ये निर्देश दिलेले आहे. तसेच नुकत्याच निघालेल्या परिपत्रकानुसारही दैनदिन कामाचा ईमेल प्रत्येक विभाग व प्रशासकीय अधिकारी यांनी मा. अध्यक्ष सो., मा. उप-अध्यक्ष सो., मा. कार्यकारी अधिकारी सो., व उप-कार्यकारी अधिकारी सो., यांना पाठविण्याचे निर्देशित आहे या अनुषंगाने सर्व विभागांना ईमेल आयडी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. एकत्रित ई-मेलची संख्या 132 इतकी आहे. तसेच काही विभागप्रमुख व प्रशासकीय अधिकारी सो., यांचे मोबाईलवर ई-मेलचा Setup करुन दिलेला आहे. एकदरीतच ई-मेल वापराचे सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

ई-मेल सर्व्हर हा श्री राहुल कुरकुरे, पुणे यांनी साधारणत: गेल्या दहा वर्षापासुन घेतलेला आहे व सदर ई-मेलचा सर्व्हर व तांत्रिक Support विनामुल्य स्वरुपात देत आहे. परंतु सध्याच्या ईमेल सर्व्हरमध्ये अडचणी उद्भवतात तसेच Spam mail Automatic send होत असुन याबाबतचा सारासार विचार करता, Google हया नामांकित संस्थेमार्फत ई मेल सर्व्हर उपलब्ध होऊ शकतो याबाबत श्री राहुल कुरकुरे, पुणे यांचेशी संपर्क केला असता त्यांनी खालीलप्रमाणे माहिती दिलेली आहे. ती पुढीलप्रमाणे.

**Google Apps for work यामध्ये-**

1) E-mail as per your company name
2) To calendar services
3) Per user 30 GB Storage for Mail & Drive (for Storage)
4) Guaranteed up time 99.9%
5) Automatic Backup
6) Spam protection & Industry- Leading Security

त्यांची Host India.Net कंपनी Google Authorize Reseller आहे त्यांचा खालीलप्रमाणे प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

**For 100 Email Users**

| **Sr. No.** | **Description** | **Quantity** | **Unit Price[Per year]** | **Total Price [Per year]** |
|---|---|---|---|---|
| 1 | Google Apps for Work | 100 Users | Rs 1,500 per License | Rs 1,50,000 |
| 2 | Google Apps Vault | 100 Users | Rs 1,500 per License | Rs 1,50,000 |
| 3 | Professional Services 24x7x365 Customer Care | 100 Users | Rs 250 per License NIL | Rs 0 |

उपरोक्त प्रमाणे Technical Support (24x7x365 Customer Care) प्रति User 250 रु. आहे. परंतु ते संस्थानकडुन घेणार नाहीत व Google Apps Vault ची आवश्यकता सध्या वाटत नाही.

**मागणी:** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे साईसंस्थानला ईमेल सेवेसाठी Google ची सेवा घेणेकामी 100 ई-मेल Users करीता संस्थानचे विहित पध्दतीने निविदा मागविता येईल त्यासाठी रक्कम रुपये 1,50,000/- + टॅक्स मात्रचा खर्च अपेक्षित आहे. तरी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेस्तव सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक कायदेशीर तसेच अर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** तांत्रिक.

**विभागाचा अभिप्राय:** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे 100 ई-मेल Users करीता संस्थानचे विहित पध्दतीने निविदा मागविता येईल त्यासाठी रक्कम रुपये 1,50,000/- + टॅक्स मात्रचा खर्च अपेक्षित आहे. तरी सदरचा प्रस्ताव निविदा प्रक्रीयाद्वारे घेण्यासाठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.८३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या संस्थानची अधिकृत संकेतस्थळ (Website) नुतणीकरण करणे प्रस्तावित असून सदरहू ई-मेल सेवेचा त्यामध्ये समावेश करणेत यावा, असे ठरले. तसेच याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**पुरवणी**

**विषय नं.२४** **मा.उच्च न्यायालयामधून मागे (Withdraw) घेतलेला सिव्हील अर्ज क्र.५८११/ २०१४ बाबत.**

**प्रस्ताव-** मा. उच्च न्यायालयाने जनहित याचीका क्र. १८/२०११, मध्ये दि. १३/०३/२०१२, रोजी चे आदेशाने संस्थानचा कारभार, मा. त्रिसदस्य समितीने पहावा असा आदेश केलेला होता, तसेच मा. उच्च न्यायालयाचे जनहित याचीका क्र.१८/२०११ मधील, दि.१३/३/२०१२, व जनहित याचीका क्र. २७/२०१२ मधील, दि.३०/३/२०१२, व सिव्हील अर्ज क्र.१२०५६/२०१२ मध्ये दि.१६/१०/२०१२, रोजीचे आदेशाने "Shall not take any major financial decision of whatsoever nature;" असे निर्देश दिलेले होते.

प्रस्तुतचे निर्देशास अनुसरुन, मा.त्रिसदस्य समितीचे वेळोवेळी झालेल्या निर्णयानुसार खर्चास/ कामास, मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेणेकामी सिव्हील अर्ज तयार करुन, मा. उच्च न्यायालयात दाखल करण्यात येते होते, परंतू सदरचे सिव्हील अर्जास, मंजूरी मिळणेकामी बराच कालावधी लागत असल्यामे व कामकाजास विलंब होत असल्याने, मा.त्रिसदस्य समितीचे दि. १२/०४/२०१४ रोजीचे सभेत आयत्या वेळचा विषय नं. १ विश्वस्तांच्या सुचनांबाबत निर्णय क्र. २८९ मा. विश्वस्तांनी, सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या, त्या मान्य करण्यात आल्या –

"मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडील पी.आय.एल. २७/२०१२ मध्ये मेजर फायनान्शीयल कामी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांची पुर्वमान्यता घेण्यात यावी, असा आदेश झालेला आहे. परंतू त्यामध्ये मेजर फायनान्शीयल म्हणजे नेमकी किती रक्कम, याचा उल्लेख नाही.

मा. त्रिसदस्य समितीमार्फत तात्पुरते धोरण म्हणून, रु. १० लाख मात्र पर्यंतचे प्रस्तावास मान्यता देऊन संस्थानची कामे करुन घेतली जात आहेत, त्यापुढील रकमेचे खर्चाकरीताचे प्रस्ताव मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडे पाठविले जातात. असे प्रस्तावास त्यांची मान्यता घ्यावी लागते व त्यानंतर कार्यवाही करावी लागते. या सर्व प्रक्रियेसाठी बराचसा कालावधी लागतो. याकरीता मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडे संस्थान विकलामार्फत अर्ज दाखल करुन मेजर फायनान्शील म्हणजे नेमकी किती रक्कम ती मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचेकडून निश्चीत करुन घेण्यात यावी." असा निर्णय झाला होता.

प्रस्तुतचे निर्णयास अनुसरुन मा. उच्च न्यायालयात, सिव्हील अर्जा क्र. ५८११/२०१४, दाखल करण्यता आला होता, शासनाने दि.२८/७/२०१६ रोजीच्या आदेशाने, संस्थानचा कारभार पहाणेकामी, मा. व्यवस्थापन समितीची नेमणूक केली, त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे, दि.१६/८/२०१६, रोजीचे सभेतील मा.उच्च न्यायालयात दाखल केलेले सिव्हील अर्ज, मागे घेण्याबाबत, विषय सादर करण्यता आला होता, त्यावर निणर्य क्र. ५६६ अन्वये, मा.उच्च न्यायालयात दाखल केलेले सिव्हील अर्ज मागे(Withdraw) घेणेबाबत निर्णय झालेला आहे, त्यानुसार, दि.८/९/२०१६ रोजी मा. उच्च न्यायालयातून सिव्हील अर्ज क्र. ५८११/२०१४, मागे (Withdraw) घेतला आहे, मा. उच्च न्यायालयातून मागे घेतलेल्या विषयी, पुन्हा मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे, विषय सादर करुन, त्यावर निर्णय घेण्याबाबत व्यवस्थापन समितीचा निर्णय झालेला आहे.

मा.कोर्टास विनंती करुन रु. १, कोटी पर्यंतचा खर्च, मा. त्रिसदस्य समितीचे मान्यतेने करणेबाबतचा विषय, हा मा. त्रिसदस्य समिती पुरताच मर्यादीत असल्याने, आताचे मा. व्यवस्थापन मंडळास खर्चाचे संदर्भात कुठलेली निर्बंध नाही, त्यामुळे मा. त्रिसदस्य समितीचे दि. १२/०४/२०१४, रोजीचे सभेतील निर्णय क्र. २८९ निरस्त करणेचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापनाचे काम शासन नियुक्त व्यवस्थापन समिती पहात असल्यामुळे मा.त्रिसदस्य समितीचे दि.१२/०४/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२८९ निरस्त करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**पुरवणी**

**विषय नं.२५** **शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना दोन फिरते शौचालय कायम स्वरुपी देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **महाराष्ट्र शासन अधिनियमतरतुद २००४-** महाराष्ट्र शासन अधिनियम १७ मधील २००४-(४) मध्ये विश्वस्तव्यवस्थे मध्ये विहित केलेले पन्नास हजार रुपयापेक्षा अधिक किंमतीचे कोणतेही जडजवाहीर दागिणे व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पुर्वमंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडुन विकण्यात येणार नाही तारण म्हणुन ठेवता येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रमीत करता येणार नाही.

**प्रास्तविक-** रोजीचे मा २०१५/०८/२०.दि.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रनुसार २६७., सिंहस्थ कुंभमेळाचे कालावधीत श्रींचे दर्शनार्थ होणा २०१५ --या गर्दीत शिर्डी शहरात साईभक्तांचे सोयीसाठी बांधकाम विभागामार्फत न्यु साई फायबर्स, मिरज, जिन सांगली यांचेकडून प्रती मोबाईल टॉयलेट व्हॅ. ३.रु,९०,००० नग १० याप्रमाणे एकुण -/(एकुण किंमत रु३९.,००,०००-/) सिक्स सिटर मोबाईल टॉयलेट व्हॅन खरेदी करण्यात आलेल्या आहेतमोबाईल १० कुंभमेळा संपलेनंतर सदरबांधकाम विभागामार्फत सिंहस्थ . त आलेली ला नोंद घेण्याकची नोंद डेडस्टॉ असुन त्यांत आलेल्यान वाहन विभागाकडे वर्ग करण्याटॉयलेट व्हॅ सदर मोबाईल टॉय .आहेलेट व्हॅनची श्री साईबाबा शताब्दी उत्सवा करीता आवश्यकता भासणार आहे .

धिकारीमुख्या, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी जा २०१६/२६३८/०६.टेबल क्र/.पं.न.क्र. दि.०७येचे पत्रान्व २०१६/१०/,"*शिर्डी शहरातील बसस्थानक एसर्कीग व समर्थ पेढ्ढेपोचे पा .टी.रोल पंपासमोरील शेळके वस्तीवरील नागरीक उघडया वरील शौचालयास बसणाया नागरीका करीता - तरी सदर ठिकाणी फिरते शौचालय .उघडयावर शौचास जात आहेत अशा ठिकाणी दुर्गंधी पसरलेली आहे .क आहेठेवणे आवश्य तरी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी कडील फिरते शौचालय नग (दोन) रुपी मिळणेस विनंती आहेफिरते शौचालय कायम स्व"* अशी मागणी केलेली आहे.

**मागणी-** शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे मागणीनुसार दोन नग फिरते शौचालय कायम स्वरुपी द्यावयचे झाल्यासमहाराष्ट्र शासन अधिनियम (४) १७ मधील २००४-तरतुदीनुसार मा तेनुतरपन समितीचे मान्यवस्थाव्य. प्रथम छाननी समितीची व तदनंतरमहाराष्ट्र शासनाची मान्यता घ्यावी लागेल.

तरी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना दोन नग फिरते शौचालय कायम स्वरुपी देणे बाबतचा प्रस्ताव मापन समितीचे सभेपुढे निर्णयव्यस्थाव्य.ार्थ सादर.

**निर्णय क्र.८३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कुंभमेळयाच्या कालावधीमध्ये साईभक्तांच्या सोयीसाठी खरेदी करण्यात आलेली फिरते शौचालये संस्थानकडे पडूनच असल्यामुळे शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांच्या मागणीप्रमाणे त्यांना दोन फिरते शौचालय देण्यास हरकत नाही, असे समितीचे मत झाले. परंतु त्याकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या परवानगीसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**पुरवणी**

**विषय नं.२६** **शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवण्यासाठी कायमस्वरुपी प्रदर्शनाकरीता जागा मिळणेबाबत श्री.अभिजित शिंदे, रा.श्रीरामपूर यांनी मा.बाबासाहेब पुरंदरे, पुणे यांचेमार्फत दि.०५.०३.२०१६ रोजीचा मा.ना. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य मुंबई यांना सादर केलेला अर्ज.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(३) अन्वये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने

असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही. विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही.

**प्रस्ताव–** श्री.अभिजित देविदास शिंदे,रा.श्रीरामपूर यांना शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवण्यासाठी संस्थानची वापरास देण्यासाठीची जागा निश्चित करणे

**प्रस्तावना-** श्री.अभिजित देविदास शिंदे, रा.श्रीरामपूर यांनी उपरोक्त विषयाकामी संस्थान मालकीचे मौजे निमगाव-को-हाळे येथील गट नं.८० व ८५ पैकी मधील साई प्रसादालय इमारतीतील पहील्या मजल्यावरील आय.टी.विभागाशेजारी असलेला हॉल अंदाजे दक्षिणोत्तर रुंदी ६० फूट व पूर्व-पश्चिम लांबी १२० फूट असे साधारणत क्षेत्रफळ ७२०० चौ.फूट ची वापरासाठी मागणी केलेली आहे. सदर ठिकाणी ते शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शन ठेवणार असून त्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील घटनाक्रम कलाकारांना सोबत घेवून करणार आहेत तसेच संबंधीत ऐतिहासिक वस्तू,प्रतिकृती,छोटया मूर्ती,तोफा व जून्या वस्तूंच्या प्रतिकृती,दागिने प्रतिकृती,पुस्तके विक्री इ.करणार आहेत. याबाबतची सविस्तर टिपणी दि.१४/०६/२०१६ रोजी सादर करणेत आलेली असून त्यात सदर जागा अर्जदार यांना वापरास देणेसंदर्भात संस्थानचे साई प्रसादालय विभाग, आय.टी.विभाग, बांधकाम विभाग व संरक्षण विभाग यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविणेलेले आहेत.

| अ.नं. | विभागाचे नाव | अभिप्राय पत्र क्रं.व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | साई प्रसादालय विभाग | दि.०८/०६/२०१६ | १) श्री साईबाबांचे येवू घातलेल्य सन २०१८ चे शताब्दी वर्षाकरीता श्रीं चा प्रसाद घेण्यासाठी मोठया प्रमाणात भाविकांची गर्दी अपेक्षित आहे.त्यामुळे प्रसाद भोजनाचा हॉल व विशेष बैठक व्यवस्था कक्ष अपुरा पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.भविष्यात भक्तांची गैरसोय होवू नये म्हणून व पर्यायी व्यवस्था म्हणून प्रसाद भोजनासाठी उपरोक्त हॉलचा वापर करता येवू शकेल.<br>सध्यस्थितीत प्रसादालयाकडील आवश्यक असलेली भांडी, ट्रॉली, मशिनरी व प्रसाद भोजन बनविणे कामी आवश्यक असणारे साहीत्य तसेच संपूर्ण प्रसादालयाचा डेडस्टॉक (जंगम मालमत्ता) इतरत्र जागा नसल्यामुळे तेथे ठेवण्यात आलेला आहे.<br>२) प्रसादालय विभागामध्ये श्रीं चे प्रसाद भोजन घेणा-या भक्तांची संख्या ही दैनंदिन सरासरी ३५००० ते ४०००० अशी असून गर्दीचे काळात(श्रीं चे तीनही उत्सव,नाताळ,उन्हाळयाच्या सुटया,सलग सरकारी सुटया) त्यात मोठया प्रमाणात वाढ होत असते. बाहेर पडण्याचे मार्गाजवळच हा हॉल असल्यामुळे तेथे सुरक्षेच्या दृष्टीने गर्दीचे नियोजन करणे अतिशय महत्वाचे राहील. |
| २ | आय.टी.विभाग | एसएसएसटी/आयटी/८६/२०१६ दि.०८/०६/२०१६ | आयटी विभागातील सध्या असलेली उपलब्ध जागा पुरेशी आहे व भाडेतत्वावर दिल्यास माहीती तंत्रज्ञान विभागाचे उपकरणावर काहीही परिणाम होणार नाही. परंतु मोठया आवाजावर मज्जाव करण्यात यावा. तसेच सुरक्षेच्या दृष्टीने सुरक्षा रक्षकाची मुख्य प्रवेशद्वारावर नेमणूक करुन बाहेरील व्यक्तीस मज्जाव करता येईल. परंतु गर्दीचे नियोजनाची जबाबदारी व आयटी विभागाचे साहीत्यांची जबाबदारी संरक्षण विभागावर राहील. |
| ३ | बांधकाम विभाग | एसएसएसटी/बांधकाम/८०/२०१६ दि.१४/०६/२०१६ | सदरहू हॉल (आय.टी.विभागाचे हॉलसह) हा भविष्यातील साईभक्तांची वाढती गर्दी विचारात घेवून अतिरिक्त विस्तारीत प्रसाद भोजन व्यवस्थेसाठी वापरणेची मूळ संकल्पना आहे. प्रसादालयातील आय.टी.विभागाचे शेजारील हॉल प्रसादालयातील साहीत्य ठेवणेसाठी वापरात आहे. प्रसादालयाने हॉल उपलब्ध करुन दिल्यास प्रदर्शनरुपी वस्तू ठेवणेसाठी देता येईल. प्रसाद भोजन हॉल व्यवस्थेत भविष्यात विस्तार करण्यासाठी हॉलची आवश्यकता पडेल. दरम्यान होणारे गर्दीचे नियोजन करुन व्यवस्थापन करता येईल.तसेच जड/ जास्त |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | वजनाच्या वस्तू सोडून इतर वस्तू ठेवता येतील. तथापि जास्त वजनाच्या वस्तू ठेवायच्या असल्यास स्ट्रक्चरलर इंजिनियर यांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. |
| ४ | संरक्षण विभाग | जा.नं.२१७ दि.०९/०६/२०१६ | श्री साई प्रसादालयात साईभक्तांचे भोजन झाल्यानंतर सर्व साईभक्त प्रसादालय हॉलचे उत्तर बाजूने आय.टी. विभागाचे प्रवेशद्वार आहे. या ठिकाणाहून बाहेर पडून प्रसादालयाच्या पश्चिम बाजूकडून बाहेर येतात. तसेच या ठिकाणी जवळच प्रसाद भोजन घेणेसाठी येणारे साईभक्तांसाठी वेटींग हॉल (रेलिंग) असून गर्दीचे वेळी या ठिकाणी साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी असते. प्रसादालयाचे उत्तर बाजूस बुंदी किचन,गॅस टॅंक व बायोगॅस प्रकल्प आहे. आय.टी.विभागाकडे जाणेसाठी एकच जिना असून तो या गर्दीचे ठिकाणी आहे. आय.टी.विभागाचे शेजारील हॉल प्रदर्शनाकरीता देणे झाल्यास प्रसादालयाची गर्दी व प्रदर्शन पाहाणेसाठी येणारे भक्तांची गर्दी एकाच ठिकाणी होणार आहे. सुरक्षेच्या दृष्टीने एकाच ठिकाणी जादा गर्दी होवू देणे ही बाब योग्य होणार नाही.अर्जदार यांनी जादा दिवसांकरीता हॉलची मागणी केलेली आहे. श्रीं चे शताब्दी वर्ष २०१७ मध्ये सुरु होत असून यावेळी शिर्डी मध्ये साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे. यावेळी श्री साई प्रसादालयामध्ये प्रसाद भोजनाकरीता होणारी गर्दी व प्रदर्शन पाहणेकरीता येणारे भक्तांची गर्दी मोठया प्रमाणात होणार असल्याने जागेअभावी साईभक्तांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होईल, असे नम्र मत आहे. |

त्या अनुषंगाने प्रस्तुतची जागा अर्जदार यांना कायमस्वरुपी भाडेतत्वावर देणे उचित होणार नाही, असेबाबत इकडील पत्र जा.नं.एसएसएस/मालमत्ता/१५६४/२०१६ दि.०२/०७/२०१६ अन्वये मा.कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई यांना अलाहीदा कळविणेत आलेलेआहे.

इकडील उपरोक्त पत्राचे अनुषंगाने माकार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.सासंवि२०१६/१४२५/प्र.क्र.१७४/का.१६ दि.२६/१०/२०१६ अन्वये संस्थान व्यवस्थापन समितीचे दि.०६/०५/२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयाप्रमाणे शिवकालीन कलादालन व प्रदर्शन मांडण्यासाठी श्री.अभिजित देविदास शिंदे, श्रीरामपूर यांना संस्थानची जागा करार करुन केवळ ११ महीन्यांसाठी भाडेतत्वावर देण्यात यावी, असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

प्रस्तुत पत्रात नमूद केलेल्या मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०५/२०१६ रोजीच्या बैठकीतील निर्णय क्रं.२८७ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होवून, शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवण्यासाठी प्रदर्शनाकरीता जागा देणेकामी,जागेची निश्चिती करणेत येवून विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची परवानगी घेण्यात यावी व महाराष्ट्र शासनाची परवानगी मिळालेनंतर ११ महिन्याचे कराराने परवानगी मिळणेसाठी संस्थान वकीलामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये अर्ज दाखल करणेत यावा," असे ठरले.

**विभागाचे अभिप्राय-** उपरोक्त निर्णयाप्रमाणे अर्जदार यांना उक्त प्रदर्शनाकरीता जागा वापरास देणेकामी जागेची निश्चिती करणे आवश्यक आहे. तसेच निश्चित झालेल्या जागेचे दरमहा भाडे प्रमाणपत्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून प्राप्त करुन घेता येईल व त्याप्रमाणे अर्जदार यांचेबरोबर ११ महीन्यांसाठीचा भाडेतत्वावरील करारनामा करुन घेता येईल व त्यात संस्थानच्या पॅनलवरील वकीलांच्या सल्ल्याने सर्वसामान्यत: खालीलप्रमाणे अटी व शर्ती टाकता येतील.

१) सदर ठिकाणी शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील घटनाक्रम कलाकारांना सोबत घेवून इतिहास प्रदर्शन करणे व शिवाजी महाराजांच्या संबंधीत ऐतिहासिक वस्तूप्रतिकृती, छोटया मूर्ती, तोफा व जून्या वस्तूंच्या प्रतिकृती, दागिने प्रतिकृती, पुस्तके विक्री करणे इ.व्यतिरिक्त अन्य कारणासाठी सदरची जागा वापरता येणार नाही.

२) उक्त जागेतील बांधकामात कोणताही फेरबदल करता येणार नाही अथवा रंगकामात फेरबदल करता येणार नाही.

३) उक्त जागेतील बांधकामाची नासधूस होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल. इमारतीचे नुकसान झाल्यास त्याची होणारी नुकसान भरपाई अर्जदार भाडेकरुकडून वसूल करण्यात येईल.

४) शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग ठरविल त्याप्रमाणे उक्त जागेचे दरमहा भाडे आकारण्यात येईल.

५) मीटर रिडींगप्रमाणे होणारे विद्युत बीलाची रक्कम अर्जदार भाडेकरु यांना संस्थानला अदा करावी लागेल.

६) अर्जदार भाडेकरु यांचे प्रकल्पापासून कोणत्याही साईभक्तास दुखापत होणार नाहीइजा पोहोचणार नाही अथवा कोणतीही हानी होणार नाही,याची दक्षता अर्जदार भाडेकरु यांना घ्यावी लागेल. तशी हानी पोहोचल्यास,इजा झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार भाडेकरु यांची राहील.

७) उक्त प्रदर्शनातील शस्त्र सांभाळण्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार भाडेकरु यांची राहील.

८) प्रदर्शनासाठी आवश्यक असणा-या कायद्याखालील सर्व शासकीय परवानगी घेण्याची जबाबदारी अर्जदार भाडेकरु यांचेवर बंधनकारक राहील.

९) सदर प्रदर्शनाचे तिकीट दर संस्थानने ठरवून दिलेप्रमाणे आकारणे अर्जदार भाडेकरु यांना बंधनकारक राहील.

१०) प्रदर्शनात ठेवण्यात आलेल्या ऐतिहासिक वस्तूंची सत्यता संस्थानने पडताळणी केलेली नाही. यावर काही कायदेशीर अगर सामाजिक हरकती अगर कायदेशीर दावे उपस्थित झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार भाडेकरु यांची राहील. याबाबत संस्थान कोणत्याही बाबतीत जबाबदार असणार नाही.

तरी उपरोक्त दि.०६/०५/२०१६ रोजीच्या बैठकीतील निर्णय क्रं.२८७ प्रमाणे अर्जदार यांना प्रदर्शनासाठी ११ महीन्यांचे भाडेकरारावर देणेसाठीची जागा निश्चिती करणे व सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निश्चित केलेल्या भाडेदराप्रमाणे भाडे आकारणेकामीचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८३५** **आजचे सभेत अर्जदार श्री.अभिजित देविदास शिंदे, रा.श्रीरामपूर यांना बोलविणेत आले होते, सभेने त्यांचेबरोबर या विषयावर चर्चा केली व त्यांचा आशय समजुन घेतला श्री.शिंदे यांनी सभेसमोर सांगितले की, शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवणेसाठी आवश्यक फर्निचर व इतर अनुशंगीक बाबी तयार करणेत खर्चिक आहे, त्यामुळे कमीत-कमी ५ वर्षासाठी जागा मिळावी.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या अटी/शर्तीवर श्री.अभिजीत शिंदे, यांना शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवणेकामी तुर्त ११ महिने कालावधीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निश्चित केलेल्या भाडेदराप्रमाणे भाडे व मिटर रिडींगप्रमाणे विद्युत बील आकारणेत येऊन लिव्ह अॅण्ड लायसेन्स तत्वावर प्रसादालयावरील हॉलची जागा उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच त्यांच्या पुर्ण सेटअपची उभारणी झाल्यानंतर भाडे सुरु करण्यात यावे.**

**श्री.शिंदे यांच्या मागणीनुसार त्यांना ११-११ महिन्यांच्या कराराने पाच वर्षासाठी जागा उपलब्ध करुन देणेकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेबरोबर पत्रव्यवहार करणेत यावा व संस्थानच्या नियोजित साईसृष्टी प्रकल्पामध्ये शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवणेबाबतचा समावेश करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**पुरवणी**

**विषय नं.२७** **महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादीत (महाटेक्स), मुंबई यांचे साईबाबा संस्थानच्या जागेमधील जागा संस्थेच्या दुकानासाठी भाडेतत्वावर उपलब्ध करुन देणेबाबतचे पत्र क्र.जी.ए/९४९ दि.१६/०९/२०१६**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७(३) अन्वये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्व

मंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही.

**प्रस्ताव –**महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादीत (महाटेक्स),मुंबई यांना संस्थानचे मालकीचे नवीन भक्तनिवासस्थान (५०० रुम) च्या दक्षिणेकडील गाळा संस्थेच्या दुकानासाठी भाडेतत्वावर उपलब्ध करुन देणे..

**प्रस्तावना -** महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादीत (महाटेक्स),मुंबई या हातमाग शिखर संस्थेची स्थापना सन १९७७ मध्ये महाराष्ट्र राज्यातील हातमाग धंदयाच्या वाढीस प्रोत्साहन देणेकरीता महाराष्ट्र शासनाच्या पुढाकाराने झाली आहे. राज्यातील जास्तीत जास्त हातमाग सहकारी क्षेत्राखाली आणून उत्पादनामध्ये वाढ करणे,उत्पादनात विविधता, नाविन्य, आकर्षकता व दर्जेदारपणा आणणे व उत्पादीत मालाच्या विक्रीस मदत व मार्गदर्शन करणे तसेच हातमाग धंद्याच्या वाढीच्या अनुषंगाने इतर कामे हाती घेणे ही उद्दिष्टे आहेत. सध्यस्थितीला राज्यातील ५१५ हातमाग सहकारी संस्था महाटेक्सच्या सभासद आहेत. महासंघ हातमाग संस्थांनी उत्पादीत केलेल्या उत्पादनांना किरकोळ,घाऊक व प्रदर्शन या तीन माध्यमातून बाजारपेठ उपलब्ध करुन देत आहे. संस्थेची महाराष्ट्रामध्ये दोन व महाराष्ट्राबाहेर तीन अशी एकूण पाच किरकोळ विक्री केंद्र चालू आहेत. सभासद हातमाग विणकर सहकारी संस्थांनी उत्पादन केलेल्या मालाला बाजारपेठ मिळवून देणे ही महासंघाची जबाबदारी असल्याकारणाने महासंघाने राज्यामध्ये नवीन दुकाने उघडण्याचे ठरविले आहे. सध्या महासंघ, वरील पाच दुकानांद्वारे किरकोळविक्री करीत आहे. तसेच शासकीय/निमशासकीय संस्थांना कापड पुरवठा व प्रदर्शने आयोजित करुन सभासद संस्थांचा माल विकण्याचे काम मोठया प्रमाणात करत आहे. महासंघाला आपले देवस्थानाचे ठिकाणी संस्थेच्या दुकानासाठी जागा उपलब्धझालेस संस्थेच्या किरकोळ विक्री दुकानाच्या संख्येत वाढ होणार आहे व गरीब विणकारांनी तयार केलेल्या हातमाग उत्पादनाच्या विक्रीत वाढ होवून विणकरांना रोजगार प्राप्त होणार आहे. तसेच त्यांना आर्थिक लाभ होवून त्यांचा चरितार्थ चालविण्यास मदत होणार आहे. सबब, संस्थेच्या विनंती सहानुभूतीपूर्क विचार करुन हातमाग उत्पादनांची विक्री करणेसाठी किमान भाडे आकारुन संस्थानचे शिर्डी येथील नवीन भक्तनिवास या ठिकाणची मोक्याची जागा संस्थेच्या दुकानासाठी उपलब्ध करुन देणेबद्दल मा.कार्यकारी संचालक तथा उपसचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.जीए/९४९ दि.१६/०९/२०१६ अन्वये इकडेस विनंती केलेली आहे.

**विभागाचा अभिप्राय-** उक्त पत्रातील विनंतीप्रमाणे उक्त संस्थेला श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या मालकीचे नवीन भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील दक्षिण बाजूकडील उपलब्ध असलेल्या गाळयांपैकी एक गाळा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दरमहा जी भाडे रक्कम निश्चित होईल त्या रकमेवर व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील आकार वेगळा आकारुन ११ महीन्यांच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर देता येईल.

सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८३६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र राज्य हातमाग सहकारी महासंघ मर्यादीत (महाटेक्स), मुंबई यांना त्यांच्या संस्थेच्या दुकानासाठी संस्थानची जागा उपलब्ध करुन दिल्यास इतरही संस्था जागेची मागणी करतील, याकरीता उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**पुरवणी**

**विषय नं.२८** **महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे संगणकीय आगाऊ आरक्षण केंद्रासाठी संस्थान मालकीचे शिर्डी येथील सेवाधाम इमारतीमधील वापरास देवू केलेली जागा विनामुल्य वापरास मिळणेबाबत आगार व्यवस्थापक, रा.प. कोपरगाव यांचे दि.१२.०९.२०१६ व दि.०१.१०.२०१६ रोजीचे पत्र.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद -** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित केलेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,असे नमूद आहे.

**प्रस्ताव -** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे संगणकीय आगावू आरक्षण केंद्रासाठी संस्थान मालकीचे सेवाधाम इमारतीमधील वापरास देवू केलेली जागा विनामुल्य वापरास मिळणेबाबतच्या आगार व्यवस्थापक, रा.प.कोपरगाव यांचे विनंती अर्जावर निर्णय घेणे

**प्रस्तावना-** श्री साईबाबा मंदिर परिसर शिर्डी येथे लाडू विक्री केंद्राशेजारी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे संगणकीय आगावू आरक्षण केंद्र सुरु करण्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांची परवानगी मिळणेबाबत मा.विभाग नियंत्रक,राज्य परिवहन,अहमदनगर व आगार व्यवस्थापक,रा.प.कोपरगाव यांचे विनंती संदर्भात माव्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्यास अनुसरुन विषय नं.३३ निर्णय क्रं.५४२ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

मा.विभाग नियंत्रक,राज्य परिवहन,अहमदनगर व आगार व्यवस्थापक,रा.प.कोपरगाव यांचे विनंती नुसार त्यांना संगणकीय आगावू तिकीट आरक्षण केंद्र सुरु करणेसाठी सद्यस्थितीत सेवाधाम इमारतीमध्ये जागा उपलब्ध करुन देण्यात यावी.

सदर निर्णयाप्रमाणे इकडील पत्र क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/२८६०/२०१६ दि.०७/०९/२०१६ अन्वये मा.विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,विभागीय कार्यालय,सर्जेपूरा,कोठला रोड, अहमदनगर यांना उक्त जागेची पाहाणी करुन तसे या कार्यालयास कळवावे व तद्नंतर प्रचलित बाजारभावाप्रमाणे भाडे आकारणी करुन घेवून ११ महीन्यांच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर जागा देण्यात येईल, असेबाबत कळविणेत आले.

त्यास अनुसरुन त्यांनी त्यांचेकडील उपरोक्त संदर्भ अ.नं.१ अन्वये सदर आगावू तिकीट आरक्षण काऊंटरसाठी देण्यात आलेली जागा आगाराचे ताब्यात देण्यात यावी, असे इकडेस कळविलेले आहे.

तसेच उपरोक्त संदर्भ अ.नं.२ अन्वये सदरची जागा भाविकांचे आगावू तिकीट आरक्षणाकरीता वापरण्यात येणार असल्याने भाविकांचे सोयीसाठी त्रास कमी होणे या दृष्टीने सेवाभावी वृत्तीने सदर कामकाज चालणार असल्याने सदर उपलब्ध करुन देण्यात आलेली जागा रा.प.महामंडळास विनामुल्य पध्दतीने देवून रा.प.महामंडळास सहकार्य करावे, असेबाबत नमूद केलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय-** रा.प.महामंडळाचे उपरोक्त पत्रावरुन, त्यांना तिकीट आरक्षणकरीता वापरासाठी देवू केलेली जागा विनामुल्य वापरासाठी मिळावी अशी त्यांची विनंती आहे. अशा प्रकारे रा.प.महामंडळास जागा विनामुल्य वापरास दिल्यास इतर संस्थादेखील विनामुल्य जागा वापरास मिळणेकामीची मागणी करण्याची शक्यता नाकारता येत नाही. उदा.रेल्वे विभाग, विमानतळ प्राधिकरण इ.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित केलेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,असे नमूद आहे.

आगार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,कोपरगाव यांनी संस्थानकडून आगावू तिकीट आरक्षण केंद्र सुरु करणेसाठी जागा विनामुल्य दयावी, अशी मागणी केलेली आहे. तथापि त्यांचे मागणीप्रमाणे जागा विनामुल्य वापरास देणे उचित होणार नाही, असे नम्र मत आहे. तरी शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून उक्तजागेचे मासिक भाडे निश्चित करुन घेवून त्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास ११ महीन्यांच्या कराराने भाडेतत्वावर व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन देण्याबाबतच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे संगणकीय आगाऊ आरक्षण केंद्रासाठी संस्थान मालकीचे शिर्डी येथील सेवाधाम इमारतीमधील जागा वापरास देणेस मान्यता देण्यात आली. परंतु याकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी. तसेच सदरहू जागा विनामुल्य देणे उचित होणार नाही, याकरीता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेकडून संस्थान नियमानुसार भाडे आकारणी करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

पुरवणी

**विषय नं.२९** **सिंडिकेट बँक, शाखा शिर्डी येथे संस्थानचे बचत खाते उघडणे व त्यांचेकडून संस्थानला सेवा घेणेबाबत.**

**निर्णय क्र.८३८** सदरहू विषयावर उपरोक्त निर्णय क्र.७९९ अन्वये चर्चा होऊन, निर्णय झालेला असल्यामुळे याठिकाणी रद्द करणेत आला.

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**पुरवणी**

**विषय नं.३०** **रेल्वे स्टेशन साईनगर शिर्डी येथे रेल्वे पोलिस कार्यालयासाठी आवश्यक सामुग्री मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** रेल्वेस्टेशन साईनगर शिर्डी सुरू होऊन ०८ वर्ष झाली आहेत. रेल्वे स्टेशनवर, पोलीस चौकी नसल्याने रेल्वेने येणा-या साईभक्तांचे प्रवासात सामान चोरी झाले अथवा त्यांचे सोबत काही अनुचित घटना घडली तर त्यांना तक्रार करण्यासाठी थेट रेल्वे पोलीस स्टेशन मनमाड येथे जावे लागते. रेल्वेने येणाऱ्या साईभक्तांसाठी रेल्वे प्रशासनाने शिर्डी येथील साईनगर रेल्वे स्टेशनवर एक खोली उपलब्ध करून दिलेली आहे. या चौकीत कोणत्याही प्रकारचे सामुग्री उपलब्ध नाही. तक्रारदार यांना बसण्यासाठी कोणत्याही प्रकारची सुविधा नसल्याने, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचेमार्फत तक्रारदार यांना बसण्यासाठी ०४ नग खुर्च्या अथवा १ मोठा बाक १ टेबल व १ कपाट मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

**<u>अर्थ साहाय्य साठी अधिनियमातील तरतुद-</u>**

**१)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतुद आहे.

२) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम २१ (१क) पोटकलम १ च्या तरतुदीस अधीन राहुन विश्वस्तव्यस्थेस राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अटी शर्तीच्या अधीन राहून, भक्तांना पायाभुत सुविधा पुरविणे किंवा त्यामध्ये वाढवण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल मात्र त्यास छाननी समितीची मान्यता घेणे आवश्यक राहील.

**<u>विभागाचा अभिप्राय</u>:-**

**अ)** आर्थिक अनुदान देणेसाठी अधिनियमातील कलम २१ (२) चे तरतुदीनुसार अनुदानाचे प्रस्तावास प्रथम छाननी समितीची शिफारस घेणे आवश्यक आहे. सन २०१२ मध्ये मागील छाननी समितीची मुदत संपलेली आहे व शासनाने अद्याप नविन छाननी समिती शासनाने नियुक्त केलेली नाही. त्यामुळे अनुदानाचे प्रस्तावांना छाननी समितीची शिफारस घेता येणार नाही.

**ब)** सन २०१८ मध्ये "श्रीं" चा पुण्यतिथी शताब्दी महोत्सव असल्याने त्यासाठी मोठया प्रमाणात साईभक्तांची गर्दी होण्याचा अंदाज आहे. त्यादृष्टीने येणा-या भक्तांना मुलभुत सुविधा पुरविणेकामी मोठा निधी लागणार आहे.

**क)** सध्या संस्थानच्या निधीतुन करावयाच्या विविध कामांचे प्रस्ताव व त्यांची अंदाजे किंमत ३१८६/- कोटीची मोठया निधीची कामे प्रस्तावित आहे.

**ड)** दररोज शासकीय/ निमशासकीय कार्यालयाकडुन, नोंदणीकृत संस्थांचे, वैयक्तीकरित्या, वेगवेगळया कारणासाठी अनेक प्रकारचे अनुदान मागणी प्रस्ताव येत असतात. त्यामध्ये एकाच प्रस्तावाचा विचार करता येणार नाही.

**ई)** संस्थानचा पैसा सरकारी कामासाठी वापरु नये या संदर्भात काही पत्र आलेले असून याबाबत शासनाकडे पत्रव्यवहार केलेला आहे.

तरीही विशेषबाब म्हणून त्यांना १ मोठा बाक, १ टेबल व १ कपाट अनुदान म्हणून द्यावयाचे असल्यास एकूण रक्कम रु.१२९००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

सदर विषयास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळाल्यास, छाननी समिती समोर ठेवण्यात येईल व त्यानंतर विधी व न्याय विभाग यांची मान्यता घेऊन अनुदान देता येईल.तरी सदर प्रस्तावास मान्यता मिळणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.८३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांच्या सोयी-सुविधेसाठी साईनगर रेल्वे स्टेशन येथे संस्थानचे माहिती केंद्र उभारणीसाठी साईनगर, रेल्वे स्टेशन यांचेकडे जागेची मागणी करणेत यावी. ते संस्थानच्या माहिती केंद्रासाठी जागा देण्यास तयार असतील तरच रेल्वे पोलिस कार्यालयासाठी आवश्यक सामुग्री देणेकामी छाननी समिती व महाराष्ट्र शासन यांच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**पुरवणी**

**विषय नं.३१** **कॅश ॲवार्ड व फ्लॅट मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** राहूरीसारख्या ग्रामीण भागात शार्दूल गागरेचा जन्म व शिक्षण झाले. आईवडीलांनी त्याची आवड जोपासली. मुळचा भारतीय खेळ असलेल्या बुद्धीबळाला भारताला अत्युच्च स्थानी नेण्याचे महान ध्येय शार्दूलने बाळगले शहरी भागातील खेळाडूप्रमाणे कुठलीही सुविधा नसतांनाहीवयाच्या १८ व्या वर्षापर्यंत जगातील २० प्रमुख देशात आपल्या कौशल्याची प्रचीती दिली. व सतत सात आठ वर्ष त्याने आशियाई व जागतिक स्पर्धेचे नेतृत्व केले.

नुकताच ग्रँड मास्टहा बुध्दीबळातील जगातील सर्वोच्च किताब त्याने मिळवला. ग्रामीण भागातील पहिला ग्रँडमास्ट अहमदनगर जिल्हयातून निर्माण झाला. ग्रँडमास्ट हा किताब ऑलंपिक मेडल इतकाच उच्च दर्जाचा आहे. कारण त्यासाठी १२ ते १४ वर्ष खडतर मेहनत करावी लागते, शिवाय आंतरराष्ट्रीय ओपन स्पर्धा खेळून हा किताब प्राप्त करावा लागतो.

तरी शिर्डी संस्थान कडून माझा गौरव करून मला १ कोटी कॅश ॲवार्ड देणेबाबत विनंती केली आहे

**<u>अर्थ साहाय्य करणेबाबत संस्थान अधिनियमात खालीलप्रमाणे तरतुद आहे.</u>**

**१)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतुद आहे

**२)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिडी अधिनियम २००४ कलम २१ (२) पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यांतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्यही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल.

(एक) राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तीसांठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अनुदान देण्याची तरतुद आहे."

**<u>अभिप्राय-</u>**

**अ)** श्री साईबाबा महाशताब्दी सोहळा सन २०१७-१८ मध्ये साजरा करावायाचा असल्याने त्यासाठी मोठया प्रमाणात साईभक्तांची गर्दी होण्याचा अंदाज आहे. त्यादृष्टीने येणा-या भक्तांना मुलभुत सुविधा पुरविणे कामी मोठा निधी लागणार आहे.

**ब)** आर्थिक अनुदान देणेसाठी अधिनियमातील कलम २१(२) चे तरतुदीनुसार, अनुदानाचे प्रस्तावास प्रथम छाननी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतु सन २०१२मध्ये मागील छाननी समितीची मुदत संपलेली आहे व शासनाने अद्याप नविन छाननी समिती नियुक्त केलेली नाही. त्यामुळे अनुदानाचे प्रस्तावांना छाननी समितीची शिफारस घेता येणार नाही.

**क)** संस्थान अधिनियमात वैयक्तीक कारणासाठी आर्थिक अनुदान देणेबाबत स्पष्ट तरतुद नाही. तसेच दररोज शासकीय/ निमशासकीय कार्यालयांकडून, नोंदणीकृत संस्थांचे, वैयक्तीकरित्या, वेगवेगळया कारणासाठी अर्ज येत असतात. त्यामध्ये एकाच प्रस्तावाचा विचार करता येणार नाही. तथापि यापुर्वी एक विशेष बाब म्हणून २००९-१० या आर्थिक वर्षात श्री शार्दूल गागरे व शाल्मली गागरे या भावंडांना बुद्धीबळासाठी ६ लाख रुपये अनुदान दिलेले आहे. एकाच खेळाडूस अशाप्रकारे एवढया मोठया स्वरुपात पुनःपुन्हा मदत केल्यास इतरही खेळाडू अशी मागणी करतील व त्यांना मदत नाकारल्यास लेखी उत्तर देणे अवघड होईल असे नम्र मत आहे.

सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर

**निर्णय क्र.८४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, यापुर्वी सन २००९-१० या आर्थिक वर्षात श्री.शार्दूल गागरे व शाल्मली गागरे या भावंडांना बुद्धीबळ खेळासाठी संस्थानमार्फत आर्थिक अनुदान देण्यात आलेले आहे यामुळे पुन्हा अनुदान देणे उचित होणार नाही, सबब सदरहू प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**पुरवणी**

**विषय नं.३२** **संस्थानला पुरवित असलेल्या दुधाचे दरामध्ये शासननिर्णयाप्रमाणे प्रतिलिटर रु.२/- प्रमाणे दुध दरवाढीचे मागणीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांनी दि२९.०९.२०१६ रोजीचे पत्राने दूध दर वाढ मिळणेबाबत मा.उपाध्यक्ष महोदय यांना विनंती केली आहे सदर पत्रातील त्यांची मागणी पुढीलप्रमाणे आहे. "आम्ही आपणास गेली १० ते १२ वर्षांपासून राजहंस दूधाचा व राजहंस अॅक्वाचा पुरवठा करत आहोत. आम्हांला दरवर्षी टेंडर कमी दराने मिळत असते कारण आम्ही बाबांसाठी सेवाभावी काम करत असतो. तरी आम्ही साईबाबा संस्थानला २०१६ ते २०१७ च्या टेंडरमध्ये २८.५० पैसे दूध दर प्रती लिटरप्रमाणे दिलेला आहे तरी साईबाबा संस्थानला दिलेल्या दुधात कुठल्याही प्रकारचा नफा ठेवून काम करत नाही. तरी देखील दि.१/७/२०१६ तारखेला शासनाने शेतक-यांच्या हितासाठी निर्णय म्हणून २ रुपये प्रतीलिटर दूध दरवाढ केली होती तो जी.आर.नं.एमएलक२०१३/ प्र.क्र.९८/पदुम८ असा आहे. तरी देखील आम्हांला शासनाने दूध दूरवाढ केलेली असल्याने २ रु दूध दरवाढ दयावी ही नम्र विनंती"

सदर पत्रावर मा.उपाध्यक्ष महोदय यांनी "दि.०१.१०.२०१६ रोजीचे सभेसमोर सादर करावे असे निर्देश दिलेले आहेत." तसेच मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांनीही "दि.०१.१०.२०१६ रोजीचे सभेत सादर करावे" असे निर्देश दिलेले आहेत. तथापि सदरचे पत्र दि.०३.१०.२०१६ रोजी खरेदी विभागाकडे प्राप्त झालेले आहे.

**सदर प्रकरणाबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे-**

संस्थानने मे.गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह.दूध उत्पादक संघ, कोपरगांव व श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांना दि११ जून, २०१६ ते ३१ मार्च, २०१७ या कालावधीसाठी १४,७८,००० टोन्ड दूध रु.२८.५० पैसे प्रतीलिटर दराने पुरविण्यासाठी समप्रमाणात विभागून वार्षिक पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत.

श्री.साईप्रसादालय, लाडू निर्मिती विभाग, कॅन्टीन व मंदिर विभागाकरीता सन २०१६-२०१७ करीता किराणामाल व अनुषंगिक साहित्य खरेदीकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२.०२.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२२ अन्वये रक्कम रु.५२,६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली होती. तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सदर खर्चास मान्यता मिळणेकामी सिव्हिल अॅप्लीकेशन नं. ३४८९/२०१६ सादर केले होते. त्यास मा.उच्च न्यायालयाचे दि.०४.०४.२०१६ रोजीचे निर्देशान्वये मान्यता मिळालेली होती. यामध्ये दूध १४,७८,००० लिटर वार्षिक खरेदीसाठी अंदाजे येणारे रक्कम रु.४,८७,७४,०००/- मात्रचे खर्चाचा समावेश आहे.

मा.उच्च न्यायालयाचे मान्यतेनंतर याकामी महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर किराणा माल व अनुषंगिक साहित्यासाठी दि.२१.०४.२०१६ ते दि.१२.०५.२०१६ या कालावधीत ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. सदर निविदेमध्ये टोन्ड गाय दूधवार्षिक खरेदीबाबत खालीलप्रमाणे अटी/शर्तीचा समावेश होता.

**ई-निविदा अटी-शर्ती क्रं.३७ – टोन्ड गाय दूध–**

अ) गाय दूध होमीजीनाईज्डव पाश्चराईज्ड (३.५% फॅट, ८.५ एसएनएफ)गुणप्रतीचे, १/२ लिटर पॉलीथीन पॅकिंगमध्ये पुरविणे बंधनकारक आहे त्यापेक्षा कमी गुणप्रतीचे दूध पुरविल्यास मा.दुग्धविकास मंत्रालय, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक एमएलके१०९९/प्रक्र३२१/पदुम८ दि.२७/१२/२००० मधील दूध खरेदीबाबतच्या मार्गदर्शनानुसार प्रत्येक ०.१ कमी फॅटसाठी रु.०.३५ पैसे कपात करणेत येईल.

आ) गाय दूध दिवसातून दोन वेळेस गरजेनुसार पोहोच करावे लागेल. तसेच गर्दीचेवेळी जास्त दूधाची मागणी केल्यास ते पुरविणे आपणावर बंधनकारक राहील

इ) मान्य झालेल्या प्रतीचे व ब्रॅन्डचेच ५०० मिली पॅकमध्ये दूध पुरवावे लागेल

ई) मागणी करण्यात आलेले दर हे पूर्ण वर्षासाठी असल्याने कृषकाळ व पृष्टकाळाचे वेगवेगळे दर दिले जाणार नाहीत. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मिळणार नाही/मागता येणार नाही. मंजूर दरामध्येच पूर्ण कालावधीत दूधाचा पुरवठा करणे पुरवठाधारकांवर बंधनकारक राहील.

उ) गाय दूध खरेदीसाठी उत्पादक संस्थेच्या (Manufacturer)/ अधिकृत वितरकांच्या निविदा स्वीकारण्यात येतील.

सदर ई-निविदा सन २०१६-१७ कमर्शियल बीड दि.२७/५/२०१६ रोजी उघडण्यात आले होते. यामध्ये टोन्ड गाय दूधासाठी चार निविदाधारकांनी भाग घेतला होता त्याचा तपशील खालीलप्रमाणे –

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव | दर प्रती लिटर |
|---|---|---|
| १. | मे. एस.आर.थोरात मिल्क, संगमनेर | रु.३०.०० पैसे |
| **२.** | **मे. श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगाव** | **रु.२८.५० पैसे** |
| ३. | मे. महेश सप्लायर्स, कोपरगाव | रु.२९.९० पैसे |
| **४.** | **मे. गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह.दुध उत्पा.संघ, कोपरगाव** | **रु.२८.५० पैसे** |

यामध्ये अधोरेखित अ.क्रं.२ व ४ यांचे टोन्ड गाय दूध पुरविण्यासाठीचे दर इतर निविदाधारकांच्या तुलनेत तुलनात्मकदृष्टया कमी असल्यामुळे, किराणा माल व अनुषंगिक साहित्य याबाबतचा एकत्रित प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीची अंतिम मान्यता मिळण्यासाठी चक्रिय पध्दतीने सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास दि.१०/६/२०१६ रोजी मान्यता मिळाली होती.

वरील मान्यतेस अनुसरुन टोन्ड गाय दूध होमोजीनाईज्ड व पाश्चराईज्ड, १/२ लिटर पॉलीथीन पॅकिंग ३.५ फॅट व ८.५ एसएनएफ गुणप्रतीचे खरेदीकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील न्युनतम दर समान असल्याने मे.गोदावरी खोरे ना.प.पा.तालुका सहकारी दूध उत्पादक संघ, कोपरगांव व स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांना वार्षिक दूध पुरवठा करणेकामी समप्रमाणात विभागून खालील तपशीलाप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत.

**अ) मे. गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह.दुध उत्पा.संघ, कोपरगाव**

| अ.नं. | मालाचा तपशिल | मागणी | दर प्रती लिटर | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | टोन्ड गाय दूध (पाश्चराईज्ड, होमोनाईज्ड) ३.५ फॅट ८.५ **SNF** ५०० मिली पॅकिंग दिवसातून दोन वेळेस | ७,३९,००० लिटर | रु.२८.५०पैसे | २,१०,६१,५००/- |

**ब) मे. श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगाव**

| अ.नं. | मालाचा तपशिल | मागणी | दर प्रती लिटर | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १. | टोन्ड गाय दूध (पाश्चराईज्ड, होमोनाईज्ड) ३.५ फॅट ८.५ **SNF** ५०० मिली पॅकिंग दिवसातून दोन वेळेस | ७,३९,००० लिटर | रु.२८.५०पैसे | २,१०,६१,५००/- |

सदर पुरवठा आदेशातही अट क्रं. ५ "दूधाचे दरामध्ये पुरवठा कालावधीत अगर संस्थानची पुढील वर्षाची निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत कुठलीही दरवाढ मिळणार नाही. या पुरवठ्यापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही." अशी अट घालण्यात आलेली आहे.

तसेच मे.गोदावरी खोरे ना.प.पा.तालुका सहकारी दूध उत्पादक संघ, कोपरगांव व स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांचेशी झालेले करारनाम्यातही खालीलप्रमाणे अटींचा समावेश आहे.

**अट क्रं.६-** कराराचे मुदतीत पार्टी नं.२ यांनी मंजूर झालेल्या दराने टोन्ड गाय दूधाचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागण्याचा अधिकार पार्टी नं.२ यांना असणार नाही. पार्टी नं.२ यांनी टोन्ड दूध पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा पुरवठा न केल्यास पार्टी नं.१ यांना बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन दूध खरेदी करावे लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पार्टी नं.२ यांचेकडून वसूल केली जाईल त्याबाबतही पार्टी नं.२ ची तक्रार चालणार नाही.

**अट क्रं.१३-** दूधाची निविदा मंजूर दर हे निविदा कालावधीसाठी असल्याने कृषकाळ व पृष्टकाळाचे वेगवेगळे दर दिले जाणार नाहीत. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मिळणार नाही/मागता येणार नाही. मंजूर दरामध्येच पूर्ण कालावधीत दूधाचा पुरवठा करणे पुरवठाधारकांवर बंधनकारक राहील

**अट क्रं.१५-** उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार पार्टी नं.१ संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. पार्टी नं.२ निविदाधारकाची कोणतीही अट/अटी पार्टी नं.१ संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

संस्थानने ई-निविदा प्रक्रियेद्वारे प्राप्त झालेल्या ई-निविदेतील न्यूनतम दर समान असल्यामुळे विभागून पुरवठा आदेश दिलेला आहे व त्यानुसार मे.गोदावरी खोरे ना.प.पा.तालुका सहकारी दूध उत्पादक संघ, कोपरगांव व स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांचेकडून प्रती लिटर रु२८.५० पैसे प्रमाणे दि.११ जून, २०१६ पासून संस्थानला टोन्ड गाय दूध पुरवठा नियमित चालू आहे

शासन निर्णयामध्ये शासकीय ग्रामीण दूध योजनेमार्फत, गाय/टोण्ड दूध ३.५/८.५ गुणप्रतीसाठी विक्री दर रु.३२/- वरुन रु.३४/- असा दि.१/७/२०१६ पासून सुधारित केलेला आहे. संस्थानही टोन्ड गाय दूध ३.५/८.५ गुणप्रतीचेच खरेदी करीत आहे.

संस्थानची दूधाची वार्षिक मागणी १४,७८,००० लिटर आहे. यामध्ये ३ महिन्यांसाठी वापरण्यात आलेले ३,०१,४२६ लिटर दूध वजा जाता उर्वरित ११,७६,५७४ लिटर दूधासाठी रु.२/- प्रमाणे शासन निर्णयानुसार दूध दरवाढ दयावयाची झाल्यास अंदाजे एकूण रक्कम रु.२३,५३,१४८/- संस्थानला अतिरिक्त खर्च येईल. यामध्ये मागणी कमी-जास्त झाल्यास फरकाची रक्कमही कमी-जास्त होईल.

वरील नमूद वस्तूस्थिती विचारात घेता, मे.गोदावरी खोरे ना.प.पा.तालुका सहकारी दूध उत्पादक संघ, कोपरगांव व स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांना ११ जून २०१६ ते ३१ मार्च २०१७ या कालावधीत संस्थानने टोन्ड गाय ३.५/८.५ गुणप्रतीचे दूध पुरविणेसाठी प्रती लिटर रु.२८.५० पैसेप्रमाणे दिलेल्या पुरवठा आदेशातील दि.१/७/२०१६ ते ३१ मार्च, २०१७ या कालावधीसाठी संस्थानकडून खरेदी केल्या जाणा-या दूधाचे दरामध्ये प्रती लिटर रु.२/- ने दरवाढ मागणीबाबतचा प्रस्ताव दि.२९/७/२०१६ चे टिपणीद्वारे सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर संस्थान व गोदावरी खोरे ना.प.पा.तालुका सहकारी दूध उत्पादक संघ, आणि संस्थान व मे.स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांच्यामध्ये झालेल्या करारनाम्यातील अट क्रं.१३ खालीलप्रमाणे होती.

**अट क्रं.१३-** दूधाची निविदा मंजूर दर हे निविदा कालावधीसाठी असल्याने कृषकाळ व पृष्टकाळाचे वेगवेगळे दर दिले जाणार नाहीत. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मिळणार नाही/मागता येणार नाही. मंजूर दरामध्येच पूर्ण कालावधीत दूधाचा पुरवठा करणे पुरवठाधारकांवर बंधनकारक राहील.

वरील अट क्रं.१३ विचारात घेता, प्रतीलिटर २/- प्रमाणे दूधाचे दरामध्येदरवाढ देणे उचित होणार नाही असे निर्देश खरेदी विभागाकडील टिपणीवर दि.२०/८/२०१६ रोजी झाले होते.

वरील निर्देशास अनुसरुन, मे.गोदावरी खोरे ना.प.पा.तालुका सहकारी दूध उत्पादक संघ, कोपरगांव व स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांना दूध दरवाढ देता येत नाही असे दि.२२.०९.२०१६ रोजीचे पत्रांद्वारे कळविण्यात आलेले आहे.

तथापि श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांनी शासनाचे जीआर.प्रमाणे रु.२/- प्रमाणे दूध दरवाढीची मागणी मा.उपाध्यक्षमहोदयांकडे दि.२९/९/२०१६ चे पत्राने पुन्हा केलेली आहे.

सदर पत्रावर नमूद निर्देशांप्रमाणे श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव व मे.गोदावरी खोरे ना.प.पा. तालुका सहकारी दूध उत्पादक संघ, कोपरगांव यांचा संस्थानला पुरवित असलेल्या दूधाचे दरामध्ये प्रतीलिटर रु.२/- प्रमाणे दि.१/७/२०१६ पासून दूध दरवाढ मागणीबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.८४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला दुधाचा पुरवठा करणारे ठेकेदारश्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव व मे.गोदावरी खोरे ना.प.पा. तालुका सहकारी दूध उत्पादक संघ, कोपरगांव यांचेबरोबरील करारनाम्यामध्ये शासन निर्णयानुसार वेळोवेळी दुध दरवाढ त्यांना देणेबाबतची कोणतीही तरतूद आढळून येत नाही, याकरीता त्यांना शासन निर्णयाप्रमाणे दुध दरवाढ देता येणार नाही. तसेच निविदा प्रक्रियेमधील मंजुर निम्नतम दराप्रमाणे त्यांनी दुध पुरवठा करणेस असमर्थतता दर्शविल्यास याकामी नव्याने ई-निविदा प्रसिध्द करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**पुरवणी**

**विषय नं.३३** **(अ) जादा वैद्यकीय बिलाचा परतावा अदा करणेस मंजूरीमिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **<u>व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –</u> १)** जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०८/०२/२००९ निर्णय क्र. ७५ अन्वये रु. १०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक–** खालील संस्थान कर्मचा-यांची रु. १०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. १०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

**मागणी –**

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेतलेले** | | | | | | | |
| १ | रुक्साना साजिद खान विभाग- साईनाथ रुग्णालय, हुद्दा- परिचारीका | स्वतः | Hypertension | डॉ.मनोहर शिंदे | साईबाबा हॉस्पीटल | ४४५२.०० | ४४५२.०० | |
| २ | प्रदिप विश्वनाथ त्रिभुवन विभाग-साईनाथ हॉस्पिटल,हुद्दा-मदतनीस | स्वतः व पत्नी | Skin disease | डॉ.पोरवाल व डॉ.कांबळे | साईनाथ हॉस्पीटल | ३३७२.०० | ३३७२.०० | |
| ३ | अशोक नामदेव झुरंगे विभाग-भांडार,हुद्दा-अधिक्षक | मुलांकरीता | Psychitric Treatment | डॉ.टिंगरे | साईबाबा हॉस्पीटल | ७३२.०० | ७३२.०० | |
| ४ | संगिता संजय थोरात विभाग-साईबाबा हॉस्पिटल, हुद्दा- परिचारीका | पती,सासु व मुलगी | Blood Presure | डॉ.इंगळे | साईबाबा हॉस्पीटल | ६५६९.०० | ६४८२.०० | संस्थानच्या औषध भांडारात औषधे उपलब्ध नसलेमुळे बाहेरुन विकत घेतली आहे. |
| ५ | सतिश गोंविद कासार विभाग-लेखाशाखा,हुद्दा-वरिष्ठ लेखापाल | पत्नी | Left lobe Effusion | डॉ.वाघ | साईबाबा हॉस्पीटल | २८८७.०० | २८८७.०० | |
| ६ | किशोर साहेबराव गवळी विभाग – आय.टी.,हुद्दा – प्र.आय.टी.विभाग प्रमख | मुलगी , वडिल व मुलगा | Fracture | डॉ.संजय खुराणा | साईबाबा हॉस्पीटल | ११६६२.०० | ११४४१.०० | |
| ७ | मंदा संजय थोरात विभाग-साईबाबा हॉस्पिटल, हुद्दा- सहा.अधिसेविका | मुली व मुलाकरीता | Skin disease | डॉ.खुराणा डॉ.कांबळे | साईबाबा हॉस्पीटल | २४९०.०० | २४९०.०० | |
| ८ | अंजली बाळासाहेब तांबे विभाग-साईबाबा हॉस्पिटल हुद्दा-लॅब टेक्नीशियन | स्वंतः, पती व सासु | Blood Presure, diabetes | डॉ.कांबळे | साईबाबा हॉस्पीटल | २४७०.०० | १८५५.०० | |
| ९ | कल्पना रघुनाथ मुसमाडे विभाग-साईनाथ रुग्णालय हुद्दा-परिचारीका | स्वंतः | Genral Illness | डॉ.साबळे डॉ.सोनटक्के | साईनाथ हॉस्पीटल | ३४६.०० | ३४६.०० | |
| | | | | | **एकूण** | **३४९८** | **३४०५७.००** | |
| | **ब – संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते** | | | | | | | |
| १० | सुरेखा राजु गायकवाड विभाग- साईनाथ रुग्णालय ,हुद्दा-परीचारीका | पती | Cancer | डॉ.राम नाईक | प्रवरा मेडिकल व टाटा मेमोरियल | २४०४६.०० | १५७६९.०० | अ.नं.१० ते १३ करीता सदरचे उपचार हे संस्थानच्या रुग्णालयात होत नसलेमुळे संस्थानच्या मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पाठविणेत आले आहे. |
| ११ | अनिता बबन कडुस विभाग- साईनाथ रुग्णालय, हुद्दा-परीचारीका | पती | Pemphigus Vulgairis for 3 rd Rituximab infusion | डॉ.भागवत | दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, मुंबई | १५९५९२.०० | १४६२७२.०० | |
| १२ | जगनाथ देवराम डांगे विभाग- साईबाबा रुग्णालय,हुद्दा-डायलेसीस टेक्नी. | स्वतः | Cancer | डॉ.कुलकर्णी / डॉ.जोशी | टाटा मेमोरियल हॉस्पी. मुंबई | ११३३६१.०० | ११३३६१.०० | |
| १३ | भाग्यश्री प्रविण गांधी विभाग–साईबाबा हॉस्पिटल,हुद्दा – परिचारका | सासु | Diabetes mellitus with osteoarthritis | डॉ.जपे | दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल, मुंबई | ४५८५०६.०० | ४४३५१०.०० | |
| | | | | | **एकूण** | **७५५५०५.००** | **७१८९१२.००** | |
| | | | | | **अ + ब एकूण** | **७९०४८५.००** | **७५२९६९.००** | |

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु. ७५२९६९/- इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** नियमावली प्रमाणे छाननी केली असुन काही औषधे भांडार विभागात उपलब्ध नव्हती तसेच रुग्णालयात उपचार होत नसल्यामुळे रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले.तसेच सदर ठिकाणी फोनद्वारे चौकशी करुन उपचार घेतलेले खात्री करुन घेतली व सदर पडताळणी करुन घेतले.सदर प्रस्ताव मा.त्रिदस्य समितीची पुर्वमान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस मान्यता असावी.

निर्णयास्तव सविनय सादर.

---

**पुरवणी**

**विषय नं.३३** **(ब) जादा वैद्यकीय बिलाचा परतावा अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. – १)** जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०८/०२/२००९ निर्णय क्र. ७५ अन्वये रु. १०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक –** खालील संस्थान कर्मचा-यांची रु. १०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. १०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

**मागणी –**

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ. संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेतलेले** | | | | | | | |
| १ | श्री.दिपक सुर्यकांत लोखंडे, विभाग-लेखाशाखा हुद्दा- लिपीक टंकलेखक | आई | Diabetes & Blood pressure | डॉ.जाधवर | साईबाबा हॉस्पिटल | ५०६८.०० | ५०६८.०० | संस्थानच्या औषध भांडारात औषधे उपलब्ध नसलेमुळे बाहेरुन विकत घेतली आहे. |
| २ | डॉ.आशिष राधेशाम आग्रवाल विभाग-श्री साईबाबा हॉस्पिटल हुद्दा-सर्जन | वडिल | Portal vein Thrombosis | डॉ. आग्रवाल | साईबाबा हॉस्पिटल | १८६७४.०० | १८६७४.०० | |
| ३ | डॉ.संतोष बब्रुवन सरवसे विभाग-श्री साईबाबा हॉस्पिटल हुद्दा-भुलतज्ञ | स्वतः | Heart Tretment | डॉ.शिंदे | साईबाबा हॉस्पिटल | १९३६०.०० | १९३६०.०० | |
| ४ | श्री.प्रदिप विश्वनाथ त्रिभुवण विभाग-लेखाशाखा हुद्दा-वरिष्ठ लेखापाल | स्वतः | Heart Attack | डॉ.मोरे | साईबाबा हॉस्पिटल | १९०००.०० | १९०००.०० | |
| | | | | | **एकूण** | **६२१०२.००** | **६२१०२.००** | |
| | **ब – संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते** | | | | | | | |
| ५ | श्री.रुथ निलेश श्रीवास्तव विभाग-श्री साईबाबा हॉस्पिटल हुद्दा-परिचारीका | पती | Polycystic Kidney HT, with CKD | डॉ.जाधवर | सहयाद्री हॉस्पिटल, नाशिक | ९१०००.०० | ८१९००.०० | |
| ६ | शंकुतला शंकर मोहिते विभाग-श्री साईनाथ रुग्णालय हुद्दा-परिचारीका | आई | Ca | डॉ.नितीन ताठे | प्रवरा हॉस्पीटल लोणी | ६०४३.०० | ५९९३.०० | |
| | | | | | **एकुण** | **९७०४३.००** | **८७८९३.००** | |

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **क-संस्थानचे मान्य यादीत नसलेले व रेफर न केलेले हॉस्पिटल परंतु निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार घेतले.** | | | | | | | |
| ७ | श्री.अशोक रंभाजी औटी विभाग-प्रशासन शाखा हुद्दा – प्र.प्रशासकिय अधिकारी | आई | अपघात | डॉ.प्रभास पाटील | साकार हॉस्पिटल , अहमदनगर | २८५४०.०० | १५७६०.०० | |
| | | | | | **एकुण** | **२८५४०.००** | **१५७६०.००** | |
| | **अ + ब+ क एकूण** | | | | | **१८७६८५/-** | **१६५७५५/-** | |

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारीएकूण रक्कम रु.१६५७५५/- इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** नियमावली प्रमाणे छाननी केली असुन काही औषधे औषध भांडार विभागात उपलब्ध नव्हती तसेच रुग्णालयात उपचार होत नसल्यामुळे रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले व निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार घेतले.तसेच सदर ठिकाणी फोनद्वारे चौकशी करुन उपचार घेतलेले खात्री करुन घेतली व सदर पडताळणी करुन घेतले. सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीची पुर्वमान्यता घेऊन समितीने मान्य केलेली देय होणारी रक्कम अदा करणेस हरकत नाही.

तरी वरील प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून निर्णय होणेस विनंती

**निर्णय क्र.८४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील अ व ब प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन- १९९९ अन्वये छाननी केली असून त्यांची सत्यता पडताळून पाहीलेली असल्यामुळे उपरोक्त तक्त्यामधील कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कमत्यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**पुरवणी**

**विषय नं.३४** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील एम.आर.आय., सिटी स्कॅन व एक्स-रे विभागासाठी लेझर कॅमेरा फिल्म्स खरेदीकामी मे.सिध्दी मेडीकल डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे सन २०१२-१३ या वर्षाचे वार्षिक औषधे खरेदीमध्ये M/s. Fujifilm India Pvt. Ltd.,Mumbai यांचेकडून CR Capsula System Model XL II – १ No. & Laser Camera (Model Dry Pix 7000 Three Tray) - 2 No. अंदाजे किंमत 17,00,000/- देणगी स्विकारुन पुढील तीन वर्षाकरीता त्यासाठी लागणा-या फिल्म्स निश्चित केलेल्या दरानूसार खरेदी करण्यास तसेच मशिनचा व कॅमेराचा ३ वर्षाचा वॉरंटी कालावधी संपलेनंतर दरवर्षी४% CMC Charges on equipment value अधिक Services tax वेगळा at actual स्विकारुन सदरची नविन १ नग CR Capsula System Model XL II व एक नग Laser Camera (Model Dry Pix 7000 Three Tray) श्री साईनाथ रुग्णालयामध्ये बसविण्यात येऊन एक नग Laser Camera (Model Dry Pix 7000 Three Tray) श्री साईबाबा रुग्णालयात सी.टी.स्कॅन व एमआरआय मशिनला बसविण्यात आले. सदरचे प्रस्तावास दि.२५/०८/२०१२ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र.७२० अन्वये मान्यता मिळालेली होती. त्यानुसार M/s.Fujifilm India Pvt. Ltd.,Mumbai यांना इकडील पत्र क्र.७१२० दि.२६/११/२०१२ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला होता. पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार त्यांचेकडून करारनामा करुन घेण्यात आलेला होता. सदर पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार त्यांचे पुरवठा आदेशाचा कालावधी दि.२६/११/२०१५ रोजी संपणार आहे.

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे दैनंदिन वापरासाठी सन २०१५-१६ या वर्षाकरिता लागणा-या औषधे, सर्जिकल साहित्य व इतर खरेदीकामी दि.३०/०१/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र.२६ अन्वये एकूण रुक्कम रु.५५,७३,३६,३९२/- इतक्या रक्कमेस मान्यता मिळालेली असून सदर प्रस्तावास मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची सिव्हिल ॲप्लीकेशन नंबर ३४९५ दि.१३/०३/२०१५ अन्वये ई-निविदा मागवून खरेदीस मान्यता मिळालेली होती. त्यानूसार वर्तमान पत्रात जाहीरात देवून तसेच थेट उत्पादक कंपन्याना पत्र पाठवून त्यांचेकडून हॉस्पिटल दर मागविण्यात आले होते त्यामध्ये एम.आर.आय.,

सी.टी.स्कॅन न व एक्स-रे साठी लागणारे फिल्म्ससाठी सन २०१५-१६ या वर्षाचे वार्षिक औषधे खरेदीमध्ये तीन निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले आहेत, त्याचा तपशील खालील प्रमाणे –

| Sr. No. | Item Description | Qty. | Rate per in Rs. (Incl. of all Taxes) | Rate Per In Rs. (After Discount) | Make | Brand Name | Technical Description | packing | Generic & Branded |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **A)** | **DI-HL FILMS 35 / 43CM 100 FILMS PACKET. ( 14" X 17") DEMAND IN PKT.** | | | | | | | | |
| 1 | Uma Marketing Agencies | 1000 | 8500.00 | 7400.00 Rate Per Film **-74.00** | AGFA Healthcare | DI-HL | DDI Technology Thermal film | 1X100 Film | Branded |
| 2 | FujiFilm India Pvt Ltd, | 1000 | 9239.39 | 8777.42 Rate Per Film **-87.77** | FujiFilm | DIHL | Dry Laser Film | 100 Films/Pkt | Branded |
| 3 | Siddhi Medical Distr., Aurangabad | 1000 | 9878.75 | 9878.75 Rate Per Film **-79.03** | Carestream | DVB | DVB Laser Film | 125. Films/Pkt | Branded |
| **B)** | **DI-HL FILMS 100 FILMS PACKET. ( 11" X 14") DEMAND IN PKT.** | | | | | | | | |
| 1 | FujiFilm India Pvt Ltd, | 20 | 8818.19 | 8377.28 Rate Per Films - 55.85 | FujiFilm | DI-HL | Dry Laser Film | 150 Films/Pkt | Branded |
| 2 | Siddhi Medical Distr., Aurangabad | 50 | 6388.72 | 6388.72 Rate Per Film – ५१.१० | Carestream | DVB | DVB | 125 Film/Pkt | Branded |
| **C)** | **DI-HL FILMS 100 FILMS PACKET. ( 08" X 10") DEMAND IN PKT.** | | | | | | | | |
| 1 | FujiFilm India Pvt Ltd, | 200 | 4500.00 | 4275.00 Rate Per Film – 28.50 | Fuji Film | DI-HL | Dry Laser Film | 150 Films/Pkt | Branded |
| 2 | Siddhi Medical Distr., Aurangabad | 300 | 3292.44 | 3292.44 Rate Per Film - 26.34 | Carestream | DVB | DVB | 125 Film/Pkt | Branded |

उपरोक्त निविदा धारकांनी आणखी काही नविन सवलती देखील दिलेल्या आहेत त्याचा तपशील खालील प्रमाणे –

| निविदा धारकाचे नाव | देऊ केलेल्या सवलती |
|---|---|
| Uma Marketing Agencies | AGFA Drystar AXYS Printer on Permanent Demo Basis CMC Free |
| Fuji Film India Pvt Ltd, | DP Plus Printer free of cost, Free of cost CMC to our existing CR and Printers Installed at Sainath Hospital and Saibaba Hospital for next 5 year, Free service Including Maintenance and spare parts (CMC Including Consumables like Cassettes / Screen /Computers) |
| Siddhi Medical Distr., Aurangabad | Vita Flex CR System, Dryview 6950 Three tray printer 2 Nos for Demo Purpose & Maintenance of the equipment including parts Free till the supply of films. |

उपरोक्त दरामध्ये Fuji Film कंपनीपेक्षा इतर कंपन्याचे दर हे कमी आलेले आहे तसेच त्यांनी काही नविन सवलती देखील दिलेल्या आहेत.

DVB Film 8x10 व 11x14 करिता M/s.Fuji Film India Pvt.Ltd., Mumbai व M/s.Siddhi Medical Distributors, Aurangabad या दोन पुरवठाधारकांना तसेच DVB Film 14x17 करिता M/s.Fujifilm India Pvt.Ltd.,Mumbai या एकमेव पुरवठाधारकांला तीन महिने कालावधीसाठी पुरवठा आदेश देण्यात आलेला होता.

Fuji Film कंपनीबरोबर झालेल्या करारानुसार दि.२६/११/२०१५ पर्यंत संस्थानला सदरील फिल्म्स, M/s. Fuji Film India Pvt.Ltd., यांचेकडून खरेदी करणे बंधनकारक असल्यामुळे तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी श्री. राजेंद्र जाधव साहेब यांनी तोंडी आदेश दिलेले होते की, M/s.Fuji Film India Pvt.Ltd., या कंपनीचा पुरवठा आदेशाचा कालावधी संपण्यापूर्वी उपरोक्त प्रस्तावावर योग्य निर्णय होण्याकरिता उपरोक्त विषय हा मा.त्रिसदस्य समिती सभेपुढे ठेवण्यात यावा.

तसेच सदर निर्णय होईपर्यंत M/s. Fuji Film India Pvt.Ltd., यांचेकडून फिल्म्सखरेदी कराव्या लागणार आहे, जेणेकरुन रुग्णांची गैरसोय होऊ नये.

वरील प्राप्त तुलनात्मक दरांचे तक्त्यात M/s. Uma Marketing Agencies, हयांचे DVB Film 14x17 करीता निम्नत्तम दर आहेत, परंतु सदर DVB Film हया Thermal Film आहेत, तसेच त्यांनी DVB Film 8x10 व 11x14 करिता दर दिलेले नाहीत. परंतु M/s. Fuji Film India Pvt.Ltd., व M/s.Siddhi Medical Distributors, Aurangabad यांनी तीनही प्रकारच्या फिल्म्सकरीता दर दिलेले आहेत. संस्थान रुग्णालयाकरीता तीनही प्रकारच्या फिल्म्स घेणे आवश्यक असून जर तीनही फिल्म्सची कंपनी (Make) व एकच पुरवठाधारक असल्यास एकच प्रकारच्या मशिन्स वापरता येतील अन्यथा वेगवेगळया कंपनीच्या फिल्म्सकरीता (Make) वेगवेगळया मशिन्स वापराव्या लागतील. त्यामुळे तुलनात्मक तक्त्यातील उपरोक्त दोन पुरवठाधारकांपैकी निम्नत्तम दराने M/s.Siddhi Medical Distributors, Aurangabad यांचेकडून तीनही प्रकारच्या फिल्म्स खरेदी करता येतील.

सोबत M/s.Siddhi Medical Distributors, Aurangabad यांनी Vita Flex CR System, Dryview 6950 Three Tray Printer 2 Nos for Demo Purpose & Maintenance of the equipment including parts Free till the supply of films अशी सवलत देऊ केलेली आहे. तसेच श्री साईबाबा हॉस्पिटलमधील रेडीओलॉजी विभागाचे रेडीओलॉजीस्ट डॉ.व्यवहारे यांनी Kodak / Carestream या कंपनीचे फिल्म्सची Quality चांगल्या दर्जाची असून यापुर्वी देखील Kodak / Carestream या कंपनीचे फिल्म्स वापरण्यात आलेल्या असून Kodak / Carestream या कंपनीचे फिल्म्सची खरेदी करण्यास हरकत नाही अशी शिफारस केलेली आहे.

त्यानुसार एम.आर.आय., सी.टी.स्कॅन न व एक्स-रे साठी लागणारे फिल्म्स सन २०१५-१६ या वर्षाचे वार्षिक औषधे खरेदीमधील M/s.Siddhi Medical Distributors, Aurangabad यांचे प्राप्त दरानुसार खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु.१,०६,६५,०१२/- चे खर्चास तसेच त्यांना पुरवठा आदेश देणेकामीचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा.त्रिसदस्य समिती सभेपुढे ठेवण्यास मान्यता मिळणेकामी दि. १३/०१/२०१६ रोजी मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांचेकडे सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचेबरोबर समक्ष चर्चा केलेली असून त्यांनी सदर खरेदीमधील DI-HL FILMS 35/43CM 100 FILMS PACKET (14" X 17") करीता M/s. Uma Marketing Agenices, यांचे दर निम्नत्तम(L1) असल्यामुळे आपणास व्दितीय क्रमांकाचे पुरवठाधारकाकडून सदर फिल्म्सखरेदी करता येणार नाही, त्यामुळे M/s. Siddhi Medical Distributors, Aurangabad हयांचेकडून L1 पेक्षा कमी दरात फिल्म्स घेण्यात याव्यात जेणेकरुन सर्व फिल्म्स हया एकाच पुरवठाधारकाकडून खरेदी करण्यात येतील. त्यानुसार M/s.Siddhi Medical Distributors, Aurangabad यांनी दि.२२/०२/२०१६ रोजीचे ई-मेल व्दारे त्यांनी DI-HL FILMS 35 / 43CM 100 FILMS PACKET( 14" X 17") या फिल्म्सचे निविदेमध्ये देऊ केलेल्या दरावर आणखी सुट देऊ केलेली आहे, तसेच दि.०४/०४/२०१६ रोजीचे ई-मेल व्दारे Vita Flex CR System with 6 Cassettes (2 Nos. each of 8x10, 10x12 & 14x17) अशी सवतल देऊ केलेली आहे. त्यानुसार M/s.Siddhi Medical Distributors, Aurangabad यांनी दिलेले नवीन दर खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Item Description | Qty. | Rate per in Rs. (Incl. of all Taxes) | Rate Per In Rs. (After Discount) | Make | Brand Name | Technical Description | Pack-ing | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **A)** | **DI-HL FILMS 35 / 43CM 100 FILMS PACKET. ( 14" X 17") DEMAND IN PKT.** | | | | | | | | |
| | Siddhi Medical Distr., Aurangabad | 1000 | 9878.75 | 9243.75 Rate Per Film **-73.95** | Care stream | DVB | DVB Laser Film | 125. Films/ Pkt | **92,43,750.00** |

| Sr. No. | Item Description | Qty. | Rate per in Rs. (Incl. of all Taxes) | Rate Per In Rs. (After Discount) | Make | Brand Name | Technical Description | Packing | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| **B)** | **DI-HL FILMS 100 FILMS PACKET. ( 11" X 14") DEMAND IN PKT.** | | | | | | | | |
| | Siddhi Medical Distr., Aurangabad | 20 | 6388.72 | 6388.72 Rate Per Film – **51.10** | Care stream | DVB | DVB | 125 Film/ Pkt | **1,27,774.40** |
| **C)** | **DI-HL FILMS 100 FILMS PACKET. ( 08" X 10") DEMAND IN PKT.** | | | | | | | | |
| | Siddhi Medical Distr., Aurangabad | 200 | 3292.44 | 3292.44 Rate Per Film – **26.34** | Care stream | DVB | DVB | 125 Film/ Pkt | **6,58,488.00** |
| | | | | | | | **Total Amt.in Rs.** | | **1,00,30,012.40** |

तरी सन २०१५-१६ या वर्षाचे वार्षिक औषधे खरेदीमधील वरीलप्रमाणे एम.आर.आय., सी.टी.स्कॅन व एक्स-रे साठी लागणारे फिल्म्स सन २०१६-१७ या वर्षातील औषधे/सर्जिकल साहित्य खरेदी होईपर्यंत M/s.Siddhi Medical Distributors, Aurangabad यांचे दरानुसार खरेदीस व याकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु.१,००,३०,०१२/- चे खर्चास तसेच त्यांना पुरवठा आदेश देणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.८४३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील एम.आर.आय., सिटी स्कॅन व एक्स-रे विभागासाठी लेझर कॅमेरा फिल्म्स खरेदीकामी नवीन कार्यपध्दतीप्रमाणे नव्याने ई-निविदा मागविणेत याव्यात. तसेच सदरहू ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मागील मंजुर दराने एम.आर.आय., सिटी स्कॅन व एक्स-रे विभागासाठी लेझर कॅमेरा फिल्म्स खरेदी करणेत याव्या, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१** **दिनांक ०७.११.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.८४४** दिनांक ०७.११.२०१६ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

०१ **रविवार दि.११.१२.२०१६ रोजीच्या जागतिक श्री साईमंदिर विश्वस्त परिषद कार्यक्रमाबाबत.**

दि.१८.१०.२०१६ रोजीचे उपसमिती सभेतील निर्णय. रविवार दि.११.१२.२०१६ होणा-या जागतिक साईमंदिर परिषद कार्यक्रमासाठी निमंत्रीत देशविदेशातील श्री साई मंदिरातील विश्वस्त व प्रतिनिधी यांना चैनसह बॅग देणेकामी १५०० ते २००० पर्यंतचे संख्या अपेक्षित आहे.

संस्थानमार्फत बॅगमध्ये पॅड व पेन तसेच श्री साई दैनंदिनी सन-२०१७ त्यावर शताब्दी लोगो असलेले साहित्य मान्यवरांना देण्याचे आहे

दि.१८.१०.२०१६ रोजी उपसमितीची सभा झाली त्यामध्ये खालील वर्णनाची बॅग व पॅड, पेन यांची निवड करण्यात आलेली आहे.

| अ.नं. | खरेदी तपशिल | वर्णन | संख्या | अंदाजे किंमत रुपये. प्रती नग |
|---|---|---|---|---|
| ०१ | चैनसह बॅग साईज २५X४०X३ से.मी. | चॉकलेटी रंगात, मुखपृष्ठावर वरील मुद्रण मराठी व इंग्रजी भाषेत मजकूर (श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी जागतीक साईमंदिर विश्वस्त परिषद असे मुद्रीत, आतमध्ये नोट पॅड पेनसह, शताब्दी लोगो प्रिंट केलेले.) | २००० | १४५/- |

उपरोक्त प्रमाणे अंदाजे रक्कम रुपये.२,९०,०००/- (अक्षरी रुपये. दोन लाख नव्वद हजार मात्र.) अपेक्षीत आहे.

खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती.

१) श्री साई दैनंदिनी सन-२०१७ एकूण नग-२००० सप्रेम भेट देणेस व येणारा खर्च प्रकाशने विभाग खाती खर्ची टाकणेस मान्यता असावी.

२) खरेदीकामी प्रकाशने विभाग वाचनालय देखभाल खाती रु.२,९०,०००/- अंदाजपत्रकीय तरतुद असावी.

सदर खरेदी तातडीची असल्याने तत्संबंधीत निविदाकारांनकडून दरपत्रकांची मागणी करणेस व येणाऱ्या खर्चास तसेच, प्राप्त दरपत्रके उघडणे, निम्नत्तम दरधारकांना कार्यादेश देणेकामी विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.११.१२.२०१६ रोजी जागतिक साईमंदिर परिषद कार्यक्रमासाठी उपस्थित राहणाऱ्या देशविदेशातील श्री साई मंदिरांचे विश्वस्त व प्रतिनिधी यांना प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थानमार्फत श्री साई दैनंदिनी सन-२०१७ व शताब्दी लोगो असलेल्या इतर साहित्यांसहीत द्यावयाच्या बॅगेचा नमुना समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे यांचेकडून अंतीम करुन घेण्यात यावा व त्या नमुन्याप्रमाणे बॅग खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

०२ **जागतिक साईमंदिर संमेलनानिमित्त साईभजन संध्या कार्यक्रम आयोजित करणेबाबत.**

श्री साईबाबांची १०० वा पुण्यतिथी उत्सव संपूर्ण जगभर साजरा करावयाचा मानस आहे या अनुषंगाने जगभरातील सर्व साई मंदिरांचे मान्यवरांचे चर्चासत्र शिर्डी येथे दि.११ डिसेंबर २०१६ रोजी साजरे करावयाचे मा.व्यवस्थापन समितीने ठरविले आहे. चर्चासत्र दिवसभरात दोन सत्रामध्ये चालणार आहे. या चर्चासाठी आलेल्या मान्यवरांचे समोर सायंकाळी श्री साईबाबांच्याभजनी गीतांचा कार्यक्रम होणे आवश्यक आहे.

भजन संध्यासाठी प्रख्यात गायक सुखींदर सिंग,हरिहर सिंग, अनुराधा पौरवाल व श्री.अनुप जलोटा यांना संपर्क केला असता, श्री सुखींदर सिंग यांनी त्यांचे खर्चाचे अंदाजपत्रक किमान १५ लाखाच्या पुढे असल्याचे दुरध्वनीवरुन कळविले आहे. तसेच श्री.अनुप जलोटा यांना संपर्क केला असता त्यांनी सांगितले की माझे अंदाजपत्रक किमान ६ लाखाच्या पुढे असते, परंतु श्री साईबाबांचा भजन संध्येचा कार्यक्रम असल्याने व आपण मला शिर्डी येथे येण्यास निमंत्रण देत असल्याने मी स्वतः काहीही घेणार नाही. परंतु माझ्यासोबत असलेले म्युझिशियनसह गायक यांना त्यांचे मानधन म्हणून रुपये२,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख) मात्र द्यावे लागतील तसेच मुंबईवरुन शिर्डी येथे कलाकारांचा संच व साहित्यआणणे व मुंबई येथे पोहच करणेसाठी दोन गाड्या किंवा त्यांचे होणारे भाडे द्यावे लागेल. तसेच शिर्डी येथे आम्हाला राहण्यासाठी चांगल्या वातानुकुलीत ५ खोल्या देण्यात याव्यात.

श्री.अनुप जलोटा हे प्रख्यात गायक (भजनसम्राट) आहे. त्यांनी श्री साईबाबांवर अनेक भजने गायले आहे. त्यांचा कार्यक्रम साई मंदिर परिषदेमध्ये दि.११ डिसेंबर २०१६ रोजी सायंकाळी आयोजित करणे ही संस्थानसाठी व निमंत्रित मंदिर प्रतिनिधींना एक चांगलीच पर्वणी ठरेल, त्यासाठी श्री.अनुप जलोटा यांना भजन संध्याचे निमंत्रण द्यावे तसेच रु.२,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख) मात्र मानधन देवून मुंबई ते शिर्डी व शिर्डी ते मुंबई असे दोन ट्रॅव्हल्सच्या गाड्यांचे प्रत्यक्षात येणारे भाडे आदा करावे लागेल. तसेच त्यांना दि.११ डिसेंबर २०१६ रोजी शिर्डी येथे व्दारावती निवासस्थान येथे ०५ वातानुकुलीत खोल्या विनामुल्य द्याव्या लागतील.

तरी सदरचे विषयावर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, जागतिक साईमंदिर संमेलनानिमित्त भजनसम्राट श्री.अनुप जलोटा यांचा साईभजन संध्या कार्यक्रम आयोजित करणेत यावा. यासाठी श्री.अनुप जलोटा यांना येणे-जाणेकामी येणारे प्रत्यक्ष भाडे व रु.२,००,०००/- मात्र मानधन देण्यात येऊन, शिर्डी येथे त्यांची निवास, भोजन, दर्शन व्यवस्था विनामुल्य करण्यात यावी. तसेच मानधनापैकी रु.१,००,०००/- मात्र रक्कम त्यांना आगाऊ देणेत यावी.**

**याचवेळी अशीही चर्चा करणेत आली की, जागतिक साईमंदिर संमेलनाच्या मंडपामध्ये मान्यवरांची बैठक व्यवस्था होऊन, संमेलन सुरु होईपर्यंत सकाळी ०८ ते १० या कालावधीमध्ये साईभक्त गायक श्री.शैलेंद्र भारती यांचा साईभजनसंध्या कार्यक्रम आयोजित करण्यात यावा. त्यासाठी श्री.शैलेंद्र भारती यांचेबरोबर मानधनाबाबत बोलणी करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५/ जनसंपर्क अधिकारी/ सहा.शिक्षक, कनिष्ठ महाविद्यालय)

---

०३ **बॅचेस व ओळखपत्र खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतूद-** २१(ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे या अधिनियम व तरतुदी नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थे मार्फत भक्तांची निवासव्यवस्था व सुविधा करण्यात येते.

**प्रस्तावीक-** सन २०१७-१८ या समाधी शताब्दी वर्षात आयोजीत करावयाचे कार्यक्रम उपक्रम याबाबत देश-विदेशातील साई मंदिराचे अधिकारी/ पदाधिकारी यांच्या सुचना-वजा-प्रस्ताव प्राप्त करुन घेणेसाठी तसेच या साई मंदिराच्या व्यवस्थापनांनी या शताब्दी वर्षात आयोजीत करावयाचे कार्यक्रम/उपक्रम याबाबत व्यापक सविस्तर चर्चा करणेसाठी दि.०४ डिसेंबर २०१६ रोजी शिर्डी येथे चर्चासत्राचे आयोजन करणेत आले आहे.

जा.नं.एसएसएस/ पीआरओ/ २४८३/२०१६ दि.३०/०९/२०१६ चे परिपत्रकान्वये चर्चासत्रासाठी उपस्थित राहणारे मा.व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष/ उपाध्यक्ष/ सदस्य तसेच संस्थान व्यवस्थापनाचे अधिकारी/ पदाधिकारी यांचेसह देश-विदेशातील साई मंदिराचे प्रतिनिधी यांना ओळखपत्र व बॅचेस साईप्रसाद निवासस्थान विभागामार्फत उपलब्ध करुन देणे बाबत कळविणेत आले आहे.

दि.०९/१०/२०१६ रोजीची मा.व्यवस्थापन समिती सभा विषय नं.१९ व निर्णय क्र.७५१ चे निर्णयान्वये ५० नग बॅचेस व २५०० नग ओळखपत्र खरेदी करणेस/ तयार करुन घेणेस व त्याकामी येणा-या रक्कम रुपये १,०८,०००/- (अक्षरी रु. एक लाख, आठ हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

बॅचेस व ओळखपत्र खरेदी/ तयार करुन घेणेकरिता साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील दि.१९/१०/२०१६ रोजीची मंजुर टिपणीअन्वये परिसरातील नामांकीत १२ पुरवठाधारक यांचेकडून कोटेशन मागविणेत आलेले आहे. त्यापैकी खालील तपशीलप्रमाणे ०९ कोटेशन दि.२४/१०/२०१६ अखेर मुदतीत प्राप्त झालेले आहेत.

**बॅचेससाठी**

| अ.नं. | कोटेशन धारकाचे नाव,गाव | प्र.शाखा, आ.नंबर व दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | कल्पक कलाकार, अ.नगर | १३४१८, दि.२०/१०/२०१६ | बंद पाकीट |
| ०२ | संजिवनी आर्ट व कापडी बॅचेस, अ.नगर | १३४१९, दि.२०/१०/२०१६ | बंद पाकीट |
| ०३ | कल्याणी लेडिज टेलर्स, अ.नगर | १३४२०, दि.२०/१०/२०१६ | बंद पाकीट |
| ०४ | राहुल फर्निशिंग, कोपरगाव | १३६३१, दि.२२/१०/२०१६ | बंद पाकीट |
| ०५ | अनिल कर्टन्स, कोपरगाव | १३६३२, इि.२२/१०/२०१६ | बंद पाकिट |
| ०६ | साई कलेक्शन, कोपरगाव | १३६३३, दि.२२/१०/२०१६ | बंद पाकिट |

**आयकार्ड / ओळखपत्रासाठी**

| अ.नं. | कोटेशन धारकाचे नाव,गाव | प्र.शाखा, आ.नंबर व दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | सतिष के.ठाणगे, कोपरगाव | १३५५१, दि.२२/१०/२०१६ | बंद पाकीट |
| ०२ | इंडिया आयकार्ड, कोपरगांव | १३५५२, दि.२२/१०/२०१६ | बंद पाकिट |
| ०३ | शिवम आयकार्ड, येवला | १३५५३, दि.२२/१०/२०१६ | बंद पाकिट |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित कोटेशनधारकांसमक्ष उघडणेत येऊन त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला

**बॅचेससाठी आलेले दर-**

| अ.नं. | कोटेशन धारकाचे नाव,गाव | कोटेशन मधील सर्वसमावेशक प्रति नग मुळ दर रु. |
|---|---|---|
| ०१ | कल्पक कलाकार, अ.नगर | १०६.२५ |
| ०२ | संजिवनी आर्ट व कापडी बॅचेस, अ.नगर | १३५.०० |

| | | |
|---|---|---|
| ०३ | कल्याणी लेडिज टेलर्स, अ.नगर | १४०.०० |
| ०४ | राहुल फर्निशिंग, कोपरगाव | ४५.०० |
| ०५ | अनिल कर्टन्स, कोपरगाव | **४०.००** |
| ०६ | साई कलेक्शन, कोपरगाव | ५०.०० |

**आयकार्ड / ओळखपत्रासाठी आलेले दर-**

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव | कोटेशन मधील सर्वसमावेशक प्रति नग मुळ दर रु. |
|---|---|---|
| ०१ | शिवम आयकार्ड, येवला | ५०/- |
| ०२ | इंडिया आयकार्ड, कोपरगांव | ४०/- |
| ०३ | मयुरी आयकार्डस, कोपरगांव (सतिष ठाणगे) | **३०/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, जागतिक साईमंदिर परिषद कार्यक्रमासाठी उपस्थित राहणाऱ्या देशविदेशातील श्री साई मंदिरातील विश्वस्त व प्रतिनिधी यांना बॅचेस व ओळखपत्र खरेदीकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबधीतांनाकार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान)

---

०४ **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव- २०१७-१८ चे अनुशंगाने श्री क्षेत्र शिर्डी येथे देश-विदेशातील साई मंदिरांचे चर्चासत्र समारंभासाठी डोम मंडप व अनुषंगीक व्यवस्था करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदांचे कमर्शियल बीड उघडून निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्थापाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववायाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ड)श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**मा.व्यवस्थापन समिती निर्णय:-**

दि.०९/१०/२०१६ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेत याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय क्र.७४९ संमत करण्यात आलेला आहे. "....यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास येथील पार्किंगमध्ये सन २०१७-१८ श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने देश-विदेशातील साई मंदिरांचे चर्चासत्र आयोजित करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था करणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली."

**प्रस्तावना:-** थोर संत श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होणार आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षामध्ये शिर्डीत येणा-या भाविकांसाठी सोयीसुविधा उभारणे तसेच संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करुन साईचरीत्रावर आधारीत वेगवेगळे इव्हेन्ट तयार करुन त्याचे सादरीकरण करणे, जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्येभक्तीमय वातावरण राहील, अशाप्रकारे श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल या दृष्टीने प्रयत्न करणेत येत आहेत.याबाबत मा.उपसमितीचे दि.१६ सप्टेंबर, २०१६

रोजीचे सभेत सन २०१७-१८ या समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनाबाबत देश-विदेशातील साई मंदिरांचे अधिकारी/पदाधिकारी यांच्या सूचना-वजा-प्रस्ताव प्राप्त करुन घेणेसाठी तसेच या साई मंदिरांच्या व्यवस्थापनांनी या शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे कार्यक्रम/उपक्रम याबाबत व्यापक सविस्तर चर्चा करणेसाठी शिर्डी येथे चर्चासत्र आयोजित करणेचा निर्णय घेणेत आलेला आहे.

त्यानुसार जनसंपर्क विभागाने दि.३०/०९/२०१६ रोजीचे कार्यालयीन आदेशान्वये बांधकाम विभागासह शताब्दी कक्षास चर्चासत्रासाठी उपस्थित राहणा-या देश-विदेशातील साई मंदिराचे अंदाजे १०००-१२०० अधिकारी /पदाधिका-यांची बैठक व्यवस्था होईल एवढया आकारमानाचा सर्व सुविधांनी युक्तअसलेला हॉल पहाणी करुन मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने आरक्षित करणे अथवा आवश्यकतेनुसार वॉटरप्रुफ सुशोभित मंडप उभारणेबाबत कार्यवाही करणेबाबत कळविलेले आहे.

त्यानुसार सदर कामासाठी मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार इकडील विभागामार्फत ई-निविदा फॉर्म तयार करुन त्यानुसार दि.२१/१०/२०१६ रोजी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदरहू कामाची ई-निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली होती. निविदा प्रक्रियेच्या तारखांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **तपशिल** | **दिनांक व वेळ** |
|---|---|---|
| १ | ई-निविदा प्रकाशित करणे दिनांकः | दि.२१/१०/२०१६ |
| २ | ई-निविदा डाऊनलोड करणे सुरुवात दिनांक | दि. २१/१०/२०१६ सकाळी ११.०० वाजेपासून |
| ३ | ई-निविदा डाऊनलोड करणे अंतिम दिनांकः | दि. ०२/११/२०१६ सांय ०५.०० वाजेपर्यंत |
| ४ | ई-निविदा अपलोड करणे सुरुवात दिनांकः | दि. २१/१०/२०१६ सकाळी १२.०० वाजेपासून |
| ५ | ई-निविदा अपलोड करणे अंतिम दिनांकः | दि. ०२/११/२०१६ सायं ०५.०० वाजेपर्यंत |
| ६ | निविदा पुर्व बैठक दिनांक व वेळ | दि. २४/१०/२०१६ सकाळी ११.०० वाजता |
| ७ | तांत्रिक लिफाफा (हार्ड कॉपी) सादर करणेचा दिनांक | दि. ०३/११/२०१६ सांय. ०५.०० वाजेपर्यंत |
| ८ | तांत्रिक लिफाफा (टेक्नीकल बीड) उघडण्याचा दिनांक | दि.०४/११/२०१६ सकाळी ११.०० वाजता (शक्य झाल्यास) |

उपरोक्त नमुद तारखांनुसार लिफाफा क्र१ (Technical Bid), दि.०४/११/२०१६ रोजी मा.प्रशासकीय अधिकारी यांचेसमोर उघडण्यात आले असून यामध्ये १० ठेकेदारांनी ई-निविदा अपलोड केलेल्या आहेत. सदर ई-निविदांची तांत्रीक छाननी करण्यात आली असुन, छाननी अहवालानुसार खालील ०६ ठेकेदार पात्र होत आहेत.

१. काळे ॲण्ड सन्स, पुणे

२. दिपक डेकोरेटर्स, सुरत (गुजरात)

३. कला साधना (किशोर पवार), नाशिक

४. आर एम बी इव्हेंट मॅनेजमेंट प्रा. लि. मुंबई

५. शगुन इव्हेंट ॲण्ड मार्केटींग सर्व्हीसेस, नागपूर

६. कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर

तरी वर नमुद केलेल्या पात्र ०६ निविदांचा लिफाफा क्र.०२ (Commercial Bid) आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालील प्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| **अ.नं.** | **निविदाधारकाचे नाव** | **निविदेमधील एकत्रित मुळ दर रु.** |
|---|---|---|
| १ | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर | **१०,०३,२००/-** |
| २ | कला साधना (किशोर पवार), नाशिक | १०,९०,६७५/- |
| ३ | दिपक डेकोरेटर्स, सुरत (गुजरात) | १०,३१,५००/- |
| ४ | आर एम बी इव्हेंट मॅनेजमेंट प्रा. लि. मुंबई | १०,६२,१५१/- |
| ५ | शगुन इव्हेंट ॲण्ड मार्केटींग सर्व्हीसेस, नागपूर | १३,८७,०८५/- |
| ६ | काळे ॲण्ड सन्स, पुणे | १३,०५,४००/- |

**शिर्डी येथे आयोजित करण्यात येत असलेल्या जागतिक साई मंदिर परिषद समारंभासाठी डोम मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर यांचे रु.१०,०३,२००/- मात्र निम्नतम दर आलेले आहेत. तसेच त्यांनी साईबाबांची सेवा म्हणून या दरामध्ये आणखी ५% सवलत देण्याचे कळविले आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथे आयोजित करण्यात येत असलेल्या जागतिक साई मंदिर परिषद समारंभासाठी डोम मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामीचे निम्नतम दरधारक कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर यांचेकडून लेखी स्वरुपात अंतीम दर घ्यावेत व त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०५ **Time base कार्यप्रणालीचे जुने प्रसादालय येथे काऊंटर समोर कलर कोटेड पत्र्याचे शेड उभारणेकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-**

अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयः-**

दि.०९/१०/२०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.७४६ खालीलप्रमाणे संमत करण्यात आलेला आहे.

*" प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे दर्शन रांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणालीसाठी काऊंटर व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. "*

**प्रस्तावनाः-** शिर्डी येथे श्रींचे दर्शनासाठी येणा-या भक्तांचे संख्येत दिवसेंदिवस मोठया प्रमाणात वाढ होत आहे. साईभक्तांचे दर्शन सहज व सुलभ व्हावे यासाठी तिरुपती देवस्थानचे धर्तीवर Time base दर्शन प्रणाली सुरु करणेकामी संगणक विभागामार्फत कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

सदर कार्यप्रणालीसाठी काऊंटर तयार करणे व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी दि०९/१०/२०१६ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.७४६ अन्वये रक्कम रु.११,१३,४८९/- मात्रचे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस मान्यता देणेत आलेली आहे. त्यापैकी सदरहू कामातील कार्यप्रणालीचे जुने प्रसादालय येथील काऊंटर समोर कलर कोटेड पत्र्याचे शेड उभारणी कामी रक्कम रु.१,८५,६२२/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

त्यानुसार कलर कोटेड पत्र्याचे शेड उभारणी कामी इकडील जा.क्र.३७६६/२०१६ दि.१७/१०/२०१६ रोजीचे पत्रान्वये कोटेशन मागविण्यात आले असून, याकामी प्राप्त झालेले सिलबंद कोटेशनचा तपशिल खालील प्रमाणे आहेत.

| अ.नं. | पुरवठाराचे नांव/ गांव | आवक क्र / दिनांक |
|---|---|---|
| १ | एस जी गायकवाड, राहाता | १३६४१/२१-१०-२०१६ |
| २ | अनिल गंगाधर जाधव, संगमनेर | १३६५७/२२-१०-२०१६ |
| ३ | आदिय ॲण्ड अरसलान कंस्ट्रक्शन, लोणी | १३६५६/२२-१०-२०१६ |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले ०३ सिलबंद कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित कोटेशनधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | पुरवठाराचे नांव/ गांव | कोटेशनमधील एकत्रित मुळ दर रु. |
|---|---|---|
| १ | एस जी गायकवाड, राहाता | **१,९७,५८०.००** |
| २ | अनिल गंगाधर जाधव, संगमनेर | २,३८,७८९.५० |
| ३ | आदिय ॲण्ड अरसलान कंस्ट्रक्शन, लोणी | २,०२,०२५.०० |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, Time base कार्यप्रणालीसाठी जुने प्रसादालय येथे काऊंटर समोर कलर कोटेड पत्र्याचे शेड उभारणेकामी एस.जी.गायकवाड, राहाता यांचे रु.१,९७,५८०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०६ **Time base कार्यप्रणालीसाठी काऊंटर तयार करणेकामी ॲल्युमिनिअम पार्टीशनमध्ये केबीन तयार करणेसाठी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-**

अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणें"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयः-**

दि.०९/१०/२०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.७४६ खालीलप्रमाणे संमत करण्यात आलेला आहे.

*"प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे दर्शन रांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणालीसाठी काऊंटर व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.*

**प्रस्तावना :-** शिर्डी येथे श्रींचे दर्शनासाठी येणा-या भक्तांचे संख्येत दिवसेंदिवस मोठया प्रमाणात वाढ होत आहे. साईभक्तांचे दर्शन सहज व सुलभ व्हावे यासाठी तिरुपती देवस्थानचे धर्तीवर Time base दर्शन प्रणाली सुरु करणेकामी संगणक विभागामार्फत कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

सदर कार्यप्रणालीसाठी काऊंटर तयार करणे व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी दि.०९/१०/२०१६ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेत उपरोक्तप्रमाणे निर्णय क्र.७४६ अन्वये रक्कम रु.११,१३,४८९/- मात्रचे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस मान्यता देणेत आलेली आहे. त्यापैकी सदरहू कामातील ॲल्यमिनीअम पार्टीशनमध्ये केबीन तयार करणेकामी रक्कम रु.२,९९,७४५/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

त्यानुसार ॲल्यमिनीअम पार्टीशनमध्ये केबीन तयार करणेकामी इकडील जा.क्र.३७६७/२०१६ दि.१७/१०/२०१६ रोजीचे पत्रान्वये कोटेशन मागविण्यात आले असून, याकामी प्राप्त झालेले सिलबंद कोटेशनचा तपशिल खालील प्रमाणे आहेत.

| अ.नं. | पुरवठाराचे नांव/ गांव | आवक क्र / दिनांक |
|---|---|---|
| १ | रविंद्र रबर प्रोडक्ट & फॅब्रिकेशन, श्रीरामपुर. | १३३९४/ २०-१०-२०१६ |
| २ | मारुती ग्लास, श्रीरामपूर | १३३९५/ २०-१०-२०१६ |
| ३ | के.के. ट्रेडींग कार्पोरेशन, श्रीरामपूर | १३३९६/ २०-१०-२०१६ |
| ४ | महेंद्रा इंजिनिअर वर्कस, श्रीरामपूर | १३४०६/ २०-१०-२०१६ |
| ५ | यशश्री अल्युमिनिअम ॲण्ड ग्लास सेंटर, कोपरगांव | १३७३७/ २४-१०-२०१६ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले ०५ सिलबंद कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित कोटेशनधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | पुरवठाराचे नांव/ गांव | कोटेशनमधील एकत्रित मुळ दर रु. |
|---|---|---|
| १ | रविंद्र रबर प्रोडक्ट & फॅब्रिकेशन, श्रीरामपुर. | ३,४३,२६८.९४ |
| २ | मारुती ग्लास, श्रीरामपूर | **२,६४,१०६.६५** |
| ३ | के. के. ट्रेडींग कार्पोरेशन, श्रीरामपूर | २,८३,९३२.९० |
| ४ | महेंद्रा इंजिनिअर वर्कस, श्रीरामपूर | ३,७२,५०९.९२ |
| ५ | यशश्री अल्युमिनिअम ॲण्ड ग्लास सेंटर, कोपरगांव | २,९९,१६९.२९ |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, Time base कार्यप्रणालीसाठी काऊंटर तयार करणेकामी ॲल्युमिनिअम पार्टीशनमध्ये केबीन तयार करणेसाठी मारुती ग्लास, श्रीरामपूर यांचे रु.२,६४,१०६.६५ मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०७ **Time base कार्यप्रणालीसाठी काऊंटर तयार करणेकामी काऊंटर वरील कर्मचाऱ्यांच्या बैठक व्यवस्थेसाठी रिव्हॉल्वींग चेअर खरेदी करणेकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-**

दि.०९/१०/२०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.७४६ खालीलप्रमाणे संमत करण्यात आलेला आहे.

*" प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे दर्शन रांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणालीसाठी काऊंटर व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. "*

**प्रस्तावना:-** शिर्डी येथे श्रींचे दर्शनासाठी येणा-या भक्तांचे संख्येत दिवसेंदिवस मोठया प्रमाणात वाढ होत आहे. साईभक्तांचे दर्शन सहज व सुलभ व्हावे यासाठी तिरुपती देवस्थानचे धर्तीवर Time base दर्शन प्रणाली सुरु करणेकामी संगणक विभागामार्फत कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

सदर कार्यप्रणालीसाठी काऊंटर तयार करणे व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी दि०९/१०/२०१६ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.७४६ अन्वये रक्कम रु.११,१३,४८९/- मात्रचे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस मान्यता देणेत आलेली आहे. त्यापैकी सदरहू कामातील काऊंटर वरील कर्मचा-यांचे बैठक व्यवस्थेसाठी रिव्हालविंग चेअर खरेदी करणेकामी रक्कम रु.१,२०,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

त्यानुसार बैठक व्यवस्थेसाठी रिव्हालविंग चेअर खरेदी करणेकामी इकडील जा.क्र.३७६५/२०१६ दि.१७/१०/२०१६ रोजीचे पत्रान्वये कोटेशन मागविण्यात आले असून, याकामी प्राप्त झालेले सिलबंद कोटेशनचा तपशिल खालील प्रमाणे आहेत.

| अ.नं. | पुरवठाराचे नांव/ गांव | आवक क्र / दिनांक |
|---|---|---|
| १ | श्रध्दा ट्रेडर्स, अ.नगर | १३३९७/२०-१०-२०१६ |
| २ | रोहन एन्टरप्रायजेस्, अ.नगर | १३३९८/२०-१०-२०१६ |
| ३ | खंडेलवाल स्टील फर्निचर, अ.नगर | १३३९९/२०/१०/२०१६ |
| ४ | दि सनरचना मेकर्स, नवी मुंबई | ई- मेल द्वारे प्राप्त २०-१०-२०१६ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले ०४ सिलबंद कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित कोटेशनधारकांसमक्ष उघडणेत येऊन त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | पुरवठाराचे नांव/ गांव | कोटेशनमधील एकत्रित मुळ दर रु. |
|---|---|---|
| १ | श्रध्दा ट्रेडर्स, अ.नगर | २,३७,८०५.२० |
| २ | रोहन एन्टरप्रायजेस्, अ.नगर | २,००,५४४.०० |
| ३ | खंडेलवाल स्टील फर्निचर, अ.नगर | २,०४,२४०.०० |
| ४ | दि सनरचना मेकर्स, नवी मुंबई | **१,९७,६०८.००** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, Time base कार्यप्रणालीचे काऊंटर वरील कर्मचाऱ्यांच्या बैठक व्यवस्थेसाठी रिव्हॉल्वींग चेअर खरेदी करणेकामी दि सनरचना मेकर्स, नवी मुंबई यांचे एकत्रित रु.१,९७,६०८/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०८ **Time base कार्यप्रणालीसाठी दर्शन पास देणे व पास तपासणी करणेकरीता टेबल्स खरेदीसाठी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-**

अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-**

दि.०९/१०/२०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.७४६ खालीलप्रमाणे संमत करण्यात आलेला आहे.

*" प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे दर्शन रांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणालीसाठी काऊंटर व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. "*

**प्रस्तावना:-** शिर्डी येथे श्रींचे दर्शनासाठी येणा-या भक्तांचे संख्येत दिवसेंदिवस मोठया प्रमाणात वाढ होत आहे. साईभक्तांचे दर्शन सहज व सुलभ व्हावे यासाठी तिरुपती देवस्थानचे धर्तीवर Time base दर्शन प्रणाली सुरु करणेकामी संगणक विभागामार्फत कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

सदर कार्यप्रणालीसाठी काऊंटर तयार करणे व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी दि०९/१०/२०१६ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.७४६ अन्वये रक्कम रु.११,१३,४८९/- मात्रचे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस मान्यता देणेत आलेली आहे. त्यापैकी सदरहू कामातील दर्शन पास देणे व पास तपासणी करणेकरीता टेबल्स खरेदीसाठी रक्कम रु.२,६४,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.
त्यानुसार टेबल्स खरेदीसाठी इकडील जा.क्र.३७७०/२०१६ दि.१७/१०/२०१६ रोजीचे पत्रान्वये कोटेशन मागविण्यात आले असून, याकामी प्राप्त झालेले सिलबंद कोटेशनचा तपशिल खालील प्रमाणे आहेत.

| अ.नं. | पुरवठाराचे नांव/ गांव | आवक क्र / दिनांक |
|---|---|---|
| १ | श्रध्दा ट्रेडर्स, अ.नगर | १३४०१/२०-१०-२०१६ |
| २ | रोहन एन्टरप्रायजेस, अ.नगर | १३४०२/२०-१०-२०१६ |
| ३ | खंडेलवाल स्टील फर्निचर, अ.नगर | १३४००/२०/१०/२०१६ |
| ४ | दि सनरचना मेकर्स, नवी मुंबई | ई- मेल द्वारे प्राप्त २४-१०-२०१६ |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले ०४ सिलबंद कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित कोटेशनधारकांसमक्ष उघडणेत येऊन त्यामधील मुळ दरांचे खालील प्रमाणे तुलनात्मक तयार करणेत आला

| अ.नं. | पुरवठाराचे नांव/ गांव | कोटेशनमधील एकत्रित मुळ दर रु. |
|---|---|---|
| १ | श्रध्दा ट्रेडर्स, अ.नगर | ३,९७,८१७.५० |
| २ | रोहन एन्टरप्रायजेस, अ.नगर | ३,०३,१२०.०० |
| ३ | खंडेलवाल स्टील फर्निचर, अ.नगर | ३,०९,३००.०० |
| ४ | दि सनरचना मेकर्स, नवी मुंबई | **२,९६,०९९.००** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, Time base कार्यप्रणालीमध्ये दर्शन पास देणे व पास तपासणी करणेकरीता टेबल्स खरेदी करणेकामी दि सनरचना मेकर्स, नवी मुंबई यांचे एकत्रित रु.२,९६,०९९/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०९ **साईनिवास अतिथीगृह येथे मा.अध्यक्ष महोदय यांचे कक्षात बैठक व्यवस्था करणेकामी प्राप्त झालेले कोटेशन उघडणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-**

अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-**

दि.१९/०९/२०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.६६० खालीलप्रमाणे संमत करण्यात आलेला आहे.

*" साईनिवास अतिथीगृह येथील मा.अध्यक्ष महोदय यांचे कक्षात बैठक व्यवस्था करणेकामी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे फर्निचर खरेदीकरणेस व त्याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली. "*

**प्रस्तावना:-** साईनिवास अतिथीगृह येथे मा.अध्यक्ष महोदय यांचे कक्षात बैठक व्यवस्था करणेकामी फर्निचर खरेदी करणेसाठी उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार रक्कम रु.८८,०००/- मात्रचे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागवून मटेरिअल खरेदी करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार इकडील जा.नं.३६२९/२०१६ दि.०८/१०/२०१६ रोजीचे कोटेशन पत्राद्वारे कोटेशन मागविण्यात आले असून प्राप्त कोटेशनचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | पुरवठाराचे नांव/ गांव | आवक क्र / दिनांक |
|---|---|---|
| ०१ | वूड प्लानेट, ठाणे | १२८०६/१२.१०.२०१६ ई-मेल द्वारे प्राप्त |
| ०२ | रोहन एंटरप्रायजेस लिमिटेड, अहमदनगर | १३४०५/२०.१०.२०१६ |
| ०३ | डुरीयन इंडस्ट्रिज लिमिटेड, मुंबई (पुणे शो-रुम) | ई-मेल द्वारे प्राप्त |
| ०४ | डुरीयन इंडस्ट्रिज लिमिटेड, मुंबई | ई-मेल द्वारे प्राप्त |
| ०५ | खंडेलवाल स्टील फर्निचर, अहमदनगर | १३४०३/२०.१०.२०१६ |
| ०६ | मे. श्रध्दा ट्रेडर्स, अहदमनगर | १३४०४/२०.१०.२०१६ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले ०६ कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित कोटेशनधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | तपशील | वूड प्लानेट, ठाणे | रोहन एंटरप्रायजेस लिमिटेड, अहमदनगर | डुरीयन इंडस्ट्रिज लिमिटेड, मुंबई (पुणे शो-रुम) | डुरीयन इंडस्ट्रिज लिमिटेड, मुंबई | खंडेलवाल स्टील फर्निचर, अहमदनगर | मे. श्रध्दा ट्रेडर्स, अहदमनगर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कोटेशन्समधील मुळ एकत्रित दर रु. | | | | | |
| ०१ | Godrej make Trident Senior Main Desk OR | --- | **३४,९९२/-** | --- | --- | ३६,४२०/- | ४२,१३१/- |
| | Durian make Directors Desk: MIKE/ 30467/B OR | ४६,१२५/- | --- | ४३,२९०/- | --- | --- | --- |
| | Durian make Directors Desk: Dff/ 60901 | ३८,०२५/- | --- | --- | --- | --- | --- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | Godrej make Kareena High Back Chair OR | --- | **१५,५३९/-** | --- | --- | १६,७३०/- | २०,२२५.७० |
| | Durian make Directors Chair: Pioneer-Hb OR | २०,९२५/- | --- | --- | --- | --- | --- |
| | Durian make Directors Chair: Herald | २९,२५०/- | --- | २५,३५०/- | २९,४७२.२५ | --- | --- |
| ०३ | Godrej make Premier Visitor Chair with Arms. OR | --- | **४,९२७/-** | --- | --- | ५,३५०/- | ६,५८३/- |
| | Durian make waiting area Chair: Spark. OR | ३,७५०/- | --- | ३,२५०/- (Transport Extra) | --- | --- | --- |
| | Durian make waiting area Chair: Anjis/32002 | ५,०२५/- | --- | --- | ५६४२.९२ | --- | --- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनिवास अतिथीगृह येथे मा.अध्यक्ष महोदय यांचे कक्षात बैठक व्यवस्थेकामीचे फर्निचर आकर्षक असावे, असे समितीचे मत झाले. डुरीयन कंपनीचे फर्निचर दिसायला आकर्षक आहेत, परंतु त्यासाठी फक्त दोनच कोटेशन्स आलेले आहेत. यामुळे सदरहू कोटेशन प्रक्रिया रद्द करणेत येऊन, डयुरीयन कंपनीचे फर्निचर खरेदी करणेकामी नव्याने कोटेशन्स मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**१० संस्थान परिसरात तयार करण्यात येत असलेल्या शौचालयांस पाणी पुरवठा जोडून देणेकामी आवश्यक प्लंबींग साहित्य खरेदी करणेसाठी प्राप्त झालेली दरपत्रके उघडणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधील तरतूद:-**

| अ.नं. | कलम/तरतुद क्रमांक | कलम/ तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |
| ०४ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग | १ (त्र) | भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे. |

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/०६/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्रं.३४१ पुढीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे **"**..यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरात तयार करणेत येत असलेल्या शौचालयासाठी पाणी पुरवठा जोडून देणेसाठी प्रस्तावात नमुद केलेले आवश्यक प्लंबींग मटेरियल विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.२,२८,७७०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**"**

**प्रस्तावना:-** संस्थान परिसरात तयार करणेत येत असलेल्या शौचालयासाठी पाणी पुरवठा जोडून देणेसाठी आवश्यक प्लंबींग साहित्य खरेदी करणेसाठी अंदाजे रु.२,२८,७७०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचे साहित्य विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु.२,२८,७७०/- मात्रचे खर्चास मा. त्रिसदस्यीय समितीची मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित करण्यात आलेले होते.

**प्रस्ताव:-** याकामी खालीलप्रमाणे दरपत्रके (कोटेशन) प्राप्त झालेली आहेत.

| अ.नं. | नांव | प्रशासनशाखा आवक नं. / दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | न्यु पिपाडा मशिनरी स्टोअर्स, साकुरी (राहाता) | ११३१०, दि.२३/०९/२०१६. | बंद कोटेशन |
| ०२ | अनुराधा ॲग्रो सर्व्हिस, लोणी खु. | ११३११, दि.२३/०९/२०१६. | बंद कोटेशन |
| ०३ | भक्ती मार्केटिंग, साकुरी (राहाता) | ११३२२, दि.२३/०९/२०१६. | बंद कोटेशन |
| ०४ | श्री साई ॲग्रो एजन्सी, लोणी बु. | ११३२४, दि.२४/०९/२०१६. | बंद कोटेशन |

संस्थान परिसरात तयार करणेत येत असलेल्या शौचालयासाठी पाणी पुरवठा जोडून देणेसाठी आवश्यक प्लंबींग साहित्य खरेदी करणेसाठी ०४ दरपत्रके (कोटेशन) प्राप्त झालेले आहेत.

सदरहू कामी प्राप्त ०४ कोटेशन आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित कोटेशनधारकांसमक्ष उघडणेत येऊन त्यामधील मुळ दरांचे खालील प्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | साहित्य (मटेरियल) तपशिल | परिमाण/ एकक | न्युपिपाडा मशिनरी स्टोअर्स, साकुरी (राहाता) 01 | अनुराधा ॲग्रो सर्व्हिस, लोणी खु. 02 | भक्ती मार्केटिंग, साकुरी (राहाता) 03 | श्री साई ॲग्रो एजन्सी, लोणी बु. 04 |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | 1.1/2" जी.आय.पाईप-सी क्लास. **झेनिथ/जिंदाल कं.** | 1400 फुट | 85.00 प्रती फुट | दर नमुद नाहीत. | **80.18** प्रती फुट | 258.00 प्रती मिटर+वॅट |
| 02 | 1.1/2" जी.आय.एलबो-हेवी. | 45 नग. | 58.00 प्रती नग. | **48.65** प्रती नग. | 89.67 प्रती नग | 55.00 प्रती नग+वॅट |
| 03 | 1.1/2" जी.आय.युनियन-हेवी. | 20 नग. | 107.00 प्रती नग. | **88.25** प्रती नग. | 163.52 प्रती नग | 105.00 प्रती नग+वॅट |
| 04 | 1.1/2" जी.आय.टी-हेवी. | 20 नग. | 75.00 प्रती नग. | **61.50** प्रती नग. | 110.77 प्रती नग | 72.00 प्रती नग+वॅट |
| 05 | 1.1/2" जी.आय.सॉकेट-हेवी. | 60 नग. | 40.00 प्रती नग. | **33.00** प्रती नग. | 58.02 प्रती नग | 42.00 प्रती नग+वॅट |
| 06 | 1/2" जी.आय.सॉकेट-हेवी. | 200 नग. | 09.50 प्रती नग. | **8.50** प्रती नग. | 15.82 प्रती नग | 11.50 प्रती नग+वॅट |
| 07 | 1/2" जी.आय.एलबो-हेवी. | 250 नग. | 10.50 प्रती नग. | **09.10** प्रती नग. | 17.93 प्रती नग | 12.50 प्रती नग+वॅट |
| 08 | 1/2" जी.आय.युनियन-हेवी. | 50 नग. | 30.00 प्रती नग. | **25.00** प्रती नग. | 47.47 प्रती नग | 31.00 प्रती नग+वॅट |
| 09 | 1.1/2" पट्टीव्हॉल (पितळी)- क्लास-1, **लिडर कंपनी.** | 15 नग. | 1300.00 प्रती नग. | **992.00** प्रती नग. | 1584.00 प्रती नग | दर नमुद नाहीत. |
| 10 | 2" पट्टीव्हॉल (पितळी)- क्लास-1, **लिडर कंपनी.** | 10 नग. | 1875.00 प्रती नग. | **1822.00** प्रती नग. | 2334.00 प्रती नग | दर नमुद नाहीत. |
| 11 | 1/2" पट्टीव्हॉल (पितळी)- क्लास-1, **लिडर कंपनी.** | 30 नग. | 250.00 प्रती नग. | **205.00** प्रती नग. | 306.00 प्रती नग | दर नमुद नाहीत. |
| 12 | 1" पट्टीव्हॉल (पितळी)- क्लास-1, **लिडर कंपनी.** | 30 नग. | 530.00 प्रती नग. | **468.00** प्रती नग. | 655.00 प्रती नग | दर नमुद नाहीत. |
| 13 | होलटाईट (200 ग्रॅम पॅकिंग) | 03 किलो. | 80.00 प्रती पॅक. | **47.00** प्रती पॅक. | 74.00 प्रती नग | दर नमुद नाहीत. |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरात तयार करण्यात येत असलेल्या शौचालयांस पाणी पुरवठा जोडून देणेकामी आवश्यक प्लंबींग साहित्य खरेदी करणेसाठी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरखीत केलेले प्रति फुट/ नग निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**११ साईभक्तांच्या सुविधेसाठी खोल्यांमध्ये ठेवण्यात येणारे प्लॅस्टीक साहित्य खरेदीकामी आलेली दरपत्रके उघडून त्यावर निर्णय होणेबाबत.**

**अधिनियमः-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी २००४ मधील २१ (१) (ग) " भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे " व (२) पोट-कलम (१) (ख) "भक्तांना राहण्यासाठी व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे."

**प्रस्ताविकः-** खोल्यांमध्ये ठेवण्यात येणारे प्लॅस्टिक साहीत्य खरेदी करणेकामी प्रशासकीय मान्यता घेवुन येणा-या खर्चाची मान्यता घेणेकामी सदरचा विषय दि.०९/१०/२०१६ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात आला होता. मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.७३७ नुसार विभागामार्फत दरपत्रके मागणी करुन प्लॅस्टिक साहीत्य खरेदी करणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

प्लॅस्टिक साहीत्य खरेदी करणेकामी पुरवठाधारकांना दरपत्रक मागणीपत्र त्यांचे पत्यावर पोस्टव्दारे व ई-मेलवर पाठवुन त्यांचेकडुन बंद पाकीटात दरपत्रकाची मागणी करण्यात आली होती. दरपत्रके सादर करण्याची अंतिम दिनांक २४/१०/२०१६ वार सोमवार वेळ सायं.०५ वाजे पर्यंतची ठेवण्यात आलेली होती.

**मागणीः-** खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आठ पुरवठा धारकांकडुन दरपत्रके मुदतीच्याआत आलेली असुन ती मा.स्थानिक उपसमितीचे सभे समोर उघडता येतील.

| अ.नं. | पुरवठाधारकांची नावे | प्राप्त कोटेशन स्थिती | सा.प्र.शा.आवक नंबर | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | मे.महालक्ष्मी ट्रेडर्स, श्रीरामपुर | बंद पाकीट | १३२८७ | १९/१०/२०१६ |
| २ | मे.राधाकृष्ण ट्रेडर्स, श्रीरामपुर | बंद पाकीट | १३२८८ | १९/१०/२०१६ |
| ३ | मे. साई एंटरप्रायजेस, श्रीरामपुर | बंद पाकीट | १३२८९ | १९/१०/२०१६ |
| ४ | मे.कौशल प्लॅस्टिक इंडस्ट्रीज, नाशिक | बंद पाकीट | १३४२४ | २०/१०/२०१६ |
| ५ | मे.सेलो वर्ल्ड/प्लास्टोटेक, मुंबई | बंद पाकीट | १३५३४ | २१/१०/२०१६ |
| ६ | मे.दिपक एजन्सीज्, नाशिक | बंद पाकीट | १३५३५ | २१/१०/२०१६ |
| ७ | मे.आर.टी. कराचीवाला | बंद पाकीट | १३७३९ | २४/१०/२०१६ |
| ८ | मे.श्री स्वामी समर्थ एजन्सी, कोपरगाव | बंद पाकीट | १३७४० | २४/१०/२०१६ |

**संस्थान अधिनियम/ ठराव नुसार अनुमानः-** मा.स्थानिक उपसमितीचे निर्णयानुसार कार्यवाही करता येईल.

उपरोक्त तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे मुदतीत आलेली ०८ कोटेशन आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उपस्थित कोटेशन धारकांसमक्ष उघडणेत येऊन त्यामधील मुळ दरांचे खालील प्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला

| **अ.नं.** | **पुरवठाधारकांची नावे** | **प्लॅस्टीक जग २ लिटर १२०० नग** | **प्लॅस्टीक मग १ लिटर २१०० नग** | **प्लॅस्टीक जग ११ लिटर १४५० नग** |
|---|---|---|---|---|
| | | **कोटेशनमधील मुळ दर रु.** | | |
| १ | मे.महालक्ष्मी ट्रेडर्स, श्रीरामपुर | ७१/- | ३१/- | १५९/- |
| २ | मे.राधाकृष्ण ट्रेडर्स, श्रीरामपुर | ७०/- | ३२/-<br>२८/- | १४०/-<br>११५/- |
| ३ | मे. साई एंटरप्रायजेस, श्रीरामपुर | ६५/- | २८/-<br>२५/- | १३०/-<br>१०९/- |
| ४ | मे.कौशल प्लॅस्टिक इंडस्ट्रीज, नाशिक | ५५/-<br>४५/- (१.५ लि.) | १२/- | ६५/- |
| ५ | मे.सेलो वर्ल्ड/ प्लास्टोटेक, मुंबई | ४८.५५ | १९.८६ | ८०.३८ |
| ६ | मे.दिपक एजन्सीज्, नाशिक | ५०/- | २१/- | ८४/- |
| ७ | मे.आर.टी. कराचीवाला | --- | २८/- | २१६/- |
| ८ | मे.श्री स्वामी समर्थ एजन्सी, कोपरगाव | --- | ३५/- | ११०/-<br>१३५/- |

**साईभक्तांच्या सुविधेसाठी खोल्यांमध्ये ठेवण्यात येणारे प्लॅस्टीक साहित्य खरेदीकामी प्राप्त झालेली कोटेशन्स आजचे सभेत उघडणेत आली. परंतु याचवेळी समिती सदस्य मा.श्री.प्रताप भोसले यांनी निलकमल कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे साईभक्त असून ते संस्थानसाठी आवश्यक असलेले प्लास्टीक साहित्य देणगी स्वरुपात देऊ शकतील, याकरीता कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचेबरोबर बोलणी करावी, अशी माहिती सभेस दिली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान निवासस्थानांसाठी आवश्यक असणारे प्लास्टीक साहित्य देणगी स्वरुपात मिळविणेसाठी कार्यकारी अधिकारी यांनी निलकमल कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेबरोबर संपर्क करावा. तसेच तातडीची गरज असल्यामुळे ०३ दिवसामध्ये सदरहू साहित्य देणगी स्वरुपात प्राप्त न झाल्यास उपरोक्त तक्त्यामधील निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

१२ **लॉकर व कॉट वस्तुंवर जेट प्रिंटींगद्वारे नंबरींग करणे कामासाठी आलेली दरपत्रके उघडणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

अधिनियमातील विनियम २१ (१) (ख) मध्ये भक्तांना राहण्याकरीता व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे अशी तरतुद आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव:-** दि.०७/०८/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.४७५ अन्वये- यावर सविस्तर चर्चा होऊन साईआश्रम धर्मशाळा विभागाकडील हॉल मधील लॉकर्स व कॉटला जेट प्रिटींगव्दारे नंबरींग करणेत यावे. त्यासाठी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.

**प्रस्ताविक:-** देणगीदार साईभक्त श्री. के व्ही रमणी, शिरडी साई ट्रस्ट, तामिळनाडु यांनी ६०० कपाट (प्रति कपाट ६ लॉकर याप्रमाणे X ६०० कपाटात एकुण लॉकर संख्या ३६००) रुपये ५८,२०,०००/- किमंतीचे देणगी स्वरुपात देत आहेत. आजमितीस २६० नग कपाट प्राप्त झालेली आहे.

तथापी साईभक्तांना आपले जवळील सामान सेवाआकार पावतीवरील असलेल्या त्याच नंबरचे लॉकरमध्ये ठेवता येईल. तसेच त्याच नंबरचा आरामासाठी पलंग(कॉट) आरक्षित करता येईल यासाठी लॉकर्स व कॉटला जेट प्रिटींग व्दारे नंबरींग करणे आवश्यक आहे.

यासाठी दि.०७/०८/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.४७५ अन्वये लॉकर्स व कॉटला जेट प्रिंटींग व्दारे कलर नंबरींग (२ इंच) करावयाचे कामासाठी स्थानिक पेंटरकडुन दरपत्रके मागविणेस व याकामी रु.८६,४००/- (अक्षरी रुपये– शेहांशी हजार चारशे मात्र) खर्चास मंजुरी मिळालेली आहे

तेव्हा स्थानिक पेंटर यांना जा.नं. एसएसएस/ वशी- साई धर्मशाळा/ ३२२२ /२०१६ दि. २२/०९/२०१६ दरपत्रक मागणी पत्रान्वये दि.३०/०९/२०१६ रोजी अखेर पर्यत दरपत्रके देण्याबाबत कळविलेले होते. खालील तक्त्यात दर्शविलेली दरपत्रके मुदतीत दि.२९/०९/२०१६ रोजी प्राप्त झालेली आहेत-

| अ.नं | फर्मचे नाव | प्राप्त कोटेशन स्थिती | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मे. साईश आर्ट शिर्डी. | बंद पाकिट | ११७४९ / दि.२९/०९/२०१६ |
| २ | मे. सोमवंशी एम. जी, राहाता | बंद पाकिट | ११७५० / दि.२९/०९/२०१६ |
| ३ | मे. चित्रलेखा आर्ट, अस्तगाव | बंद पाकिट | ११७४८ / दि.२९/०९/२०१६ |
| ४ | मे. कल्याणी ग्राफिक्स, शिर्डी | बंद पाकिट | ११७४७ / दि.२९/०९/२०१६ |

मागणी- लॉकर व कॉट वस्तुंवर जेट प्रिटींगव्दारे नंबरींगचे कामासाठी प्राप्त झालेल्या न्युनतम दरपत्रकधारकास कार्यादेश देणे बाबतचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेस्तव सादर.

उपरोक्त मुदतीत प्राप्त झालेली ०४ कोटेशन आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित कोटेशनधारकांसमक्ष उघडणेत येऊन त्यामधील मुळ दरांचे खालील प्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला

| अ.नं | फर्मचे नाव | लॉकरसाठी नंबरींग | कॉटसाठी नंबरींग |
|---|---|---|---|
| | | कोटेशनमधील एकत्रित मुळ दर रु. | |
| १ | मे. सोमवंशी एम. जी, राहाता | **३७,४४०/-** | **३७,४४०/-** |
| २ | मे. साईश आर्ट शिर्डी. | ५७,६००/- | ५७,६००/- |
| ३ | मे. चित्रलेखा आर्ट, अस्तगाव | ४८,९६०/- | ४८,९६०/- |
| ४ | मे. कल्याणी ग्राफिक्स, शिर्डी | ५१,८४०/- | ५१,८४०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, लॉकर व कॉट वस्तुंवर जेट प्रिंटींगद्वारे नंबरींग करणे कामासाठी मे.सोमवंशी एम.जी., राहाता यांचे उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले एकत्रित निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साई धर्मशाळा)

---

१३ **श्री साईप्रसादालयातील प्रसादभोजन ताटे बफींग करणेकामी प्राप्त दरपत्रक उघडणेस मान्यता मिळणेबाबत.**

अधिनियम **2004** मधील तरतुद**:-** सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.14 (भाग-4) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील 14 (2 घ) नूसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते उपाययोजना हाती घेण्याचे. तसेच 21 (1 घ) नूसार भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

प्रस्ताविक:- श्री साई प्रसादालयात दैनंदीन सरासरी 35,000 ते 40,000 साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेतात. भक्तांना प्रसाद भोजन घेणेकामी स्टेस्टील धातूची मजबुत अशी 25,000 नग ताटे तयार करुन घेण्यात आलेले आहेत. सततच्या वापरामुळे सदरचे ताटांना कप्प्यांचे बाजुने पिवळसर डाग आलेले आहेत. सदरचे डाग हे भांडी मशिनमधून अथवा मनुष्यबळाकरवी स्वच्छ केलेतरी देखील निघत नाहीत. त्यामुळे ताटे खराब असलेबाबत भक्तांच्या तक्रारी येत आहेत. करीता प्रसादभोजनकामी असलेली स्टे.स्टील ताटे बफींग करणे आवश्यक आहे. बफींग केलेनंतर ताटांना पुर्णपणे चकाकी येईल व भक्तांच्यातक्रारी देखील येणार नाहीत असे नम्र मत आहे.

करीता, सततच्या वापरामुळे खराब झालेली अंदाजे 9,500 नग ताटांना मोठयाप्रमाणात पिवळसर डाग आहे. तयामुळे सदरची 9,500 नग ताटे ही तातडीने बफींग करावी लागणार आहे. सदरची ताटे बफींग करणेकामी अंदाजे रक्कम रु.2,85,000/- (अक्षरी रक्कम रु. दोन लाख पंच्याएशी हजार मात्र) पर्यंतच्या खर्चास मा.व्यवस्थापन समिती दि.07/08/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.462 नूसार मान्यता मिळालेली आहे. त्यानूसार उपरोक्त संदर्भिय अं.नं.2 चे पत्राद्वारे ताटे बफींग करणाऱ्या 6 एजन्सीकडून दि.20/09/2016 अखेरपर्यंत दरपत्रक मागविणेत आलेले होते. तयापैकी खालील तीन एजन्सींनी विहीत वेळेत दरपत्रक सादर केलेले आहे.

1. पवन इंडस्ट्रीज, कोपरगांव
2. राजलमी इंडस्ट्रीज, कोल्हापूर
3. अशोक बफींग वर्क्स, कुंभार गल्ली, श्रीरामपूर

मागणी:- ताटे बफींग करणाऱ्या उपरोक्त तीन एजन्सीकडून दरपत्रक प्राप्त झालेले आहे. प्राप्त दरपत्रक उघडून निम्नतम पुरवठादार यांचेकडून प्रसादभोजनाचीताटे बफींग करुन घेता येईल. सदर दरपत्रक मा.व्यवस्थापन उपसमिती सभेपुढे उघडून निर्णय घेता येईल.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान- तांत्रिक

श्री साई प्रसादालयातील जेवणाची ताटे बफींग करणेकरीता प्राप्त झालेले ०३ कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित कोटेशनधारकांसमक्ष उघडणेत येऊन त्यामधील मुळ दरांचे खालील प्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | कोटेशन धारकाचे नाव | कोटेशनमधील प्रति नग मुळ दर रु. |
|---|---|---|
| १ | पवन इंडस्ट्रीज, कोपरगांव | ४२/- |
| २ | राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापूर | ५५/- |
| ३ | अशोक बफींग वर्क्स, कुंभार गल्ली, श्रीरामपूर | **३८/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील प्रसादभोजन ताटे बफींग करणेकामी प्राप्त झालेले दर खुपच जास्त असल्यामुळे सदरहु काम तुर्त स्थगीत ठेवणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

१४ **निवासस्थानमधील साईभक्तांना पुरविणेत येणारे साहित्य खरेदी करणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद:-** २१ (ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**प्रस्ताविक:-** या अधिनियम व तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थे मार्फत भक्तांची निवासव्यवस्था व सुविधा अनुषंगिक पुरविण्यात येते. त्या अनुषंगाने व्दारावती भक्तनिवास इमारत दि.१५/०८/२००९ पासुन साईभक्तांच्या निवासासाठी सुरु करण्यात आलेली आहे. श्री साईबाबा संस्थानचे व्दारावती भक्तनिवास विभागाकडे असणा-या ८० ए.सी.व २३६ नॉन ए.सी. अशा एकुण ३१६ खोल्या साईभक्तांच्या निवासासाठी वापरात आहे.

व्दारावती भक्तनिवास विभागामध्ये भक्तांची गर्दी वर्षभर कायम असते. व्दारावती विभागातील खोल्या ९० % ऑनलाईन बुकींगव्दारे साईभक्तांसाठी उपलब्ध करुन दिलेल्या आहे. तसेच १० % खोल्या देणगीदार साईभक्तांना तसेच जनसंपर्क कार्यालयामार्फत व्ही. आय. पी. यांचेसाठी देण्यात येत असतात. तसेच शिल्लक असलेल्या खोल्या प्रत्यक्ष काऊंटरवर आलेल्या साईभक्तांना देण्यात येतात. व्दारावती भक्तनिवास इमारतीमधील खोल्या १०० % (पुर्ण क्षमतेने) दररोज खोल्या साईभक्तांना निवासासाठी देण्यात येतात. भक्तांच्या सततच्या वापरामुळे वस्तुंची तुटफुट व खराब होऊन वापरास अयोग्य झालेल्या आहेत.

यापुर्वी सन २००९-२०१४ मध्ये खरेदी केलेल्या प्लॅस्टिक बादली, मग, ट्रे, आंघोळीचा स्टुल, डस्टबीन, आरसे, बाथमॅट, डोअरमॅट, स्टील जग, स्टिल ग्लास, कुलुपे (लिंक कंपनी), रबर मॅट इ.वस्तुंचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | खरेदी केलेल्या मालाचे/ वस्तुचे वर्णन | खरेदी कालावधी दिनांक | प्रति नग दर रुपये / पैसे | खरेदी नग | वस्तु वापरुन झालेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | प्लॅस्टिक बादली अनब्रेकेबल (१७ लि) | १२/०३/२००९ | ११७/- | ४०० नग | ७ वर्षे |
| ०२ | प्लॅस्टिक बादली (०३ लि) | १२/०३/२००९ | ४१.६०/- | ४०० नग | ७ वर्षे |
| ०३ | प्लॅस्टिक मग | १२/०३/२००९ | ११.५३/- | ५०० नग | ७ वर्षे |
| ०४ | रफ ॲण्ड डफ आंघोळ स्टुल जम्बो | १२/०३/२००९ | ११४.७२/- | ३५० नग | ७ वर्षे |
| ०५ | स्विंग पॉलीकिंग डस्टबीन झाकनासह | १२/०३/२००९ | ११४.७५/- | ३५० नग | ७ वर्षे |
| ०६ | आरसे | १०/०२/२०१४ | ३४०/- | ५० नग | ३ वर्षे |
| ०७ | सेलो प्लॅस्टिक ट्रे | २३/०४/२०१४ | १२९/- | ३५० नग | ३ वर्षे |
| ०८ | बाथमॅट (पायपुसणी)<br>०१ फुट रुंद × १.५ फुट लांब | १२/०२/२०११ | ७०/- | ४०० नग | ६ वर्षे |
| ०९ | डोअरमॅट (कापडी पायपुसणी)<br>०२ फुट रुंद × ०१.६ फुट लांब | २८/०३/२०१३ | ७०/- | ६३२ नग | ४ वर्षे |
| १० | स्टील जग | २३/१२/२०१३ | १७९.५५/- | ३५० नग | ३ वर्षे |
| ११ | स्टील ग्लास | २५/०२/२०११ | ३०/- | ७५० नग | ६ वर्षे |
| १२ | कुलुपे (लिंक कंपनी) ATOOT-50<br>(डबल लॉक) | १८/०३/२००९<br>१०/१०/२०११ | ११७.७५/-<br>१६५/- | ४०० नग<br>१४० नग | ७ वर्षे<br>५ वर्षे |

**विभागाची मागणी:-** विभागाचे पुढील कालावधीसाठी सध्या स्टोअरमध्ये वस्तुंचा साठा शिल्लक नसल्याने नविन वस्तु खरेदी करणे आवश्यक आहे.

**छाननी करुन अनुमान:-** महाराष्ट्र शासनाने पारीत केलेल्या अधिनियम व मा. व्यवस्थापन समितीचा समंत ठरावानुसार वस्तु खरेदी करता येईल**.**

**विभागाचे स्पष्ट मत:-** नविन वस्तु खरेदी करावयाच्या प्लॅस्टिक बादली, मग, ट्रे, प्लॅस्टिक आंघोळीचा स्टुल, डस्टबीन, ग्लास, सिरॅमिका जग, आरसे, बाथमॅट, डोअरमॅट, कुलुपे, रबर मॅट इ.वस्तु खालील तपशिलात नमुद केलेप्रमाणे आजच्या बाजार भावानुसार अंदाजे रुपये – ९,४०,२५०/- (अक्षरी रुपये – नऊ लाख, चाळीस हजार, दोनशे, पन्नास मात्र) खर्च अपेक्षित आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | नविन खरेदी करावयाचे मालाचे / वस्तुचे वर्णन | क्षमता | कंपनीचे नाव | मागणी नग/ संख्या |
|---|---|---|---|---|
| ०१ | प्लॅस्टिक बादली अनब्रेकेबल (१७ लि ) | १७ लि. | नामांकित कंपनी | ४०० |
| ०२ | प्लॅस्टिक बादली अनब्रेकेबल ( ०३ लि ) | ०३ लि. | नामांकित कंपनी | ४०० |
| ०३ | प्लॅस्टिक मग अनब्रेकेबल ( ०१ लि.) | ०१ लि. | नामांकित कंपनी | ५०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०४ | प्लॅस्टिक आंघोळीचा स्टुल जम्बो अनब्रेकेबल<br>१३ इंच लांब× १३ इंच रुंद× ८ इंच उंच | - | नामांकित कंपनी | ३५० |
| ०५ | प्लॅस्टिक डस्टबीन झाकनासह अनब्रेकेबल<br>१० इंच लांब× १० इंच रुंद× १७ इंच उंच | - | नामांकित कंपनी | ३५० |
| ०६ | प्लॅस्टिक ट्रे अनब्रेकेबल<br>१५ इंच लांब× ११ इंच रुंद× १ इंच उंच | - | नामांकित कंपनी | ३५० |
| ०७ | बाथमॅट ( पायपुसणी )<br>०१ फुट रुंद × १.६ फुट लांब | १ फुट X<br>१.६ फुट | नामांकित कंपनी | ५०० |
| ०८ | डोअरमॅट ( कापडी पायपुसणी )<br>०२ फुट रुंद × ०१.६ फुट लांब | २ फुट X<br>१.६ फुट | नामांकित कंपनी | ५०० |
| ०९ | कुलुपे (डबल लॉक) | ०६ लिव्हर<br>०३ चावीसह | नामांकित कंपनी | ३५० |
| १० | गेटसमोरील पायरी खालील रबरी मॅट<br>३९ इंच रुंद × ५५ इंच लांब | - | नामांकित कंपनी | ४० |
| ११ | प्लॅस्टिक खुर्ची एसी रुमसाठी अनब्रेकेबल<br>२१ इंच लांब× १६ इंच रुंद× ३० इंच उंच | - | नामांकित कंपनी | १८० |
| १२ | प्लॅस्टिका फ्रेम अनब्रेकेबल आरसे | २४" X १८" | नामांकित कंपनी | ३५० |
| १३ | सिरॅमिका जग | १.५ लिटर | नामांकित कंपनी | ३५० |
| १४ | स्टील ग्लास | २५० मि लि | नामांकित कंपनी | ४०० |

उपरोक्त तपशिलाप्रमाणे प्लॅस्टिक बादली, ट्रे, मग, आंघोळीचा स्टुल, डस्टबीन, सिरॅमिका जग, स्टील ग्लास, आरसे, बाथमॅट, डोअरमॅट, कुलुपे (लिंक कंपनी), रबर मॅट इ.वस्तु खरेदी करावे लागणार आहे. जेणेकरुन भक्तांची उपरोक्त वस्तु अभावी गैरसोय होणार नाही. सदरच्या खर्चाची तरतुद सन २०१६-२०१७ च्या अंदाज पत्रकात करण्यात आली नव्हती. परंतु सदरच्या वस्तु खरेदी करणे गरजेचे असल्याने सन २०१६-१७ च्या सुधारित अंदाजपत्रकात तरतुद करता येईल. येणारा खर्च हा भक्तोपयोगी सेवा सुविधा प्रदान करण्यासाठीचा असल्याने त्यास शासनाची मान्यता घेणे आवश्यक नाही.

१) जनसंपर्क विभागामार्फत वर्तमानपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करणेस.
२) सदरील वस्तु खरेदी विभागामार्फत ई-टेंडर पध्दतीने खरेदी करणेस.

उपरोक्त तपशिलात नमुद केलेप्रमाणे साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे खर्चास मान्यता मिळणेस, तसेच वस्तु खरेदीच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती निवासस्थानमधील साईभक्तांना पुरविणेत येणारे साहित्य खरेदीकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, व्दारावती भक्तनिवास)

---

१५ **श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी या नावाचा मराठी व इंग्रजी भाषेतील डिस्प्ले बोर्ड बसविणेसाठी प्राप्त झालेली कोटेशन्स उघडून निर्णय होणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०७-०८-२०१६ चे सभेतील विषय नं.४५ निर्णय क्र.४९० अन्वये श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी या नावाचा मराठी व इंग्रजी भाषेतील डिस्प्ले बोर्ड बसविणेसाठी शासन निर्णयानुसार विहीत पध्दतीने बाहेरील कोटेशनधारकांना पत्र पाठवुन कोटेशन मागविणेस् येणा-या खर्चास, कामास व संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन कोटेशन मागविणेकामी येणा-या रक्कम रुपये २,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली होती.

त्यानुसार जा.नं.एसएसएस/ विद्युत/ ३१२९/ २०१६ दिनांक १७-०९-२०१६ अन्वये १० कोटेशनधारकांना कोटेशन पत्र पाठविण्यात आली होती. तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात देण्यात आलेली होती. कोटेशन विक्री दि.१९-०९-२०१६ ते दि.०३-१०-२०१६ अखेर ठेवण्यात आलेली होती. मे.साई आर्टस्, कोपरगांव, मे.साईश प्रिंटर्स, शिर्डी व मे.कल्याणी ग्राफिक्स, राहाता यांचे कोटेशन दि.०६-१०-२०१६ रोजी

सामान्य प्रशासन विभागातून प्राप्त झाले होते. त्यानुसार प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून निर्णय होणेबाबत विद्युत विभागामार्फत दि.०७-१०-२०१६ रोजी टिपणी सादर करण्यात आली होती. सदर टिपणीवर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांची दि१४-१०-२०१६ रोजी मंजुरीची स्वाक्षरी झालेली आहे

परंतू मे.ए.एस.बी.ॲडस इंडिया प्रा.लि., गुरगांव, हरियाणा यांचे कोटेशन दि.०५-१०-२०१६ रोजी श्री साईबाबा हॉस्पीटल येथील प्रशासन विभागास प्राप्त झालेले होते. श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी सदरचे कोटेशन तातडीने विद्युत विभागास न पाठविता दिनांक१३-१०-२०१६ रोजी विद्युत विभागास पाठविलेले आहे. त्यानुसार पुर्वी सामान्य प्रशासन विभाग प्राप्त झालेले तीन कोटेशन्स तसेच श्री साईबाबा हॉस्पीटल यांचेकडून प्राप्त झालेले एक कोटेशन असे एकुण चार सिलबंद जमा झालेल्या कोटेशन्सचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कोटेशनधारकाचे नांव | शेरा |
|---|---|---|
| ०१) | मे.साई आर्टस्, कोपरगांव | कोटेशन बंद पाकीट-०२ |
| ०२) | मे.साईश प्रिंटर्स, शिर्डी | कोटेशन बंद पाकीट-०२ |
| ०३) | मे.कल्याणी ग्राफिक्स, राहाता | कोटेशन बंद पाकीट-०२ |
| ०४) | मे.ए.एस.बी.ॲडस इंडिया प्रा.लि., गुरगांव, हरियाणा | कोटेशन बंद पाकीट-०२ |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी या नावाचा मराठी व इंग्रजी भाषेतील डिस्प्ले बोर्ड बसविणेसाठी प्राप्त झालेली चार कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमितीसमोर, उपस्थित कोटेशनधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळदरांचा खालील प्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.क्र. | कोटेशनधारकाचे नांव | कोटेशनमधील मुळदर रु. |
|---|---|---|
| ०१) | मे.साई आर्टस्, कोपरगांव | २,६८,०००/- |
| ०२) | मे.साईश प्रिंटर्स, शिर्डी | २,९४,०००/- |
| ०३) | मे.कल्याणी ग्राफिक्स, राहाता | **२,३५,०००/-** |
| ०४) | मे.ए.एस.बी.ॲडस इंडिया प्रा.लि., गुरगांव, हरियाणा | २,४५,२००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी या नावाचा मराठी व इंग्रजी भाषेतील डिस्प्ले बोर्ड बसविणेसाठी मे.कल्याणी ग्राफिक्स, राहाता यांचे रु.२,३५,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**१६ श्री साईबाबा संस्थानमधील सर्व वॉटर कुलर यंत्रणेचे वार्षिक कॉम्प्रेंसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी प्राप्त ई-निविदांचे कमर्शियल बीड उघडणेबाबत.**

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.६.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३४९ अन्वये श्री साईबाबा संस्थानमधील सर्व वॉटर कुलर यंत्रणेचे सन २०१६-२०१७ वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकामी विहीत पध्दतीने महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदा नोटीस अपलोड करुन, ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये ४,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. या मान्यतेनुसार महाराष्ट्र शासनाचे वेबसाईटवर निविदा दिनांक १४/९/२०१६ रोजी अपलोड करण्यात आली होती. ई-निविदा ऑनलाईन डाऊन लोंडीगसाठी २९/९/२०१६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपासून उपलब्ध करण्यात आली होती. तसेच निविदा संस्थानकडे ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दिनांक२६/९/२०१६ रोजी दुपारी सांयकाळी५.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आलेली होती. त्यानुसार खालील चार निविदाधारकांच्याई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

१. क्लासीक कुल एअरकंडीशनींग, मुंबई
२. श्री वेंकटेश्वरा ट्रंन्की प्रोजेक्ट सोल्युशन प्रा. लि., पुणे
३. कैलास रेफ्रिजेरेशन वर्क्स, मुंबई
४. ए.जे. एन्टरप्राईजेस, मुंबई

उपरोक्त प्राप्त ४ ई निविदेतील तांत्रिक निविदा(Technical Bid) दिनांक ०७/१०/२०१६ रोजी मा . तीलत्या .उघडणेत आलेले आहे प्रशासकिय अधिकारी यांचे समक्षVAT, PAN नंबर, कंपनीचा वार्षिक उलाढाल, सध्या काम करत असलेल्या कामाची यादी पुरवठा आदेशासह, कंपनी रजिस्टेशन सर्टिफिकेटस, टेडर

फी व ई.डी.रकमेचा डि .डी.एम., अंडर टेकींग सर्टिफिकेट इत्यादी बाबी चेक केलेल्या असून उपरोक्त चारही तांत्रिक निविदा पात्र आहेक नंतर पात्र निविदाधारकांचे कमर्शियल बीड उघडणे आवश्यतांत्रिक निविदा उघडल्या . .आहे

श्री साईबाबा संस्थानमधील सर्व वॉटर कुलर यंत्रणेचे दिनांक १.११.२०१६ ते ३१.१०.२०१७ चे कालावधीकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकामी प्राप्त व पात्र चार निविदा आजचे स्थानिक उपसमितीसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन त्यामधील मुळ दरांचे खालील प्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | **निविदेमधील एकत्रित मुळ दर रु.** |
|---|---|---|
| १ | ए.जे. एन्टरप्राईजेस, मुंबई | ३,६५,४५०/- |
| २ | श्री वेंकटेश्वरा ट्रंन्की प्रोजेक्ट सोल्युशन प्रा. लि., पुणे | ३,६७,७८९/- |
| ३ | कैलास रेफ्रिजेरेशन वर्क्स, मुंबई | **३,३८,४६०/-** |
| ४ | क्लासीक कुल एअरकंडीशनींग, मुंबई | ३,८३,४००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानमधील सर्व वॉटर कुलर यंत्रणेचे वार्षिक कॉम्प्रेंसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी कैलास रेफ्रिजेरेशन वर्क्स, मुंबई यांचे रु. ३,३८,४६०/- निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

१७ **टेलीफोन विभागातील अद्यावत दुरध्वनी (EPABX) यंत्रणेसाठी तांत्रिक सल्लागार (Technical Consultant) यांची नेमणूक करणेकामीच्या Commercial ई-निविदा मा.उपसमितीचे सभेपुढे उघडून त्यातील निम्नतम दरधारक सल्लागारास याकामी नेमणूकीचा कार्यादेश देणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधिल तरतूद:-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-(१) अन्वये समितीकडुन विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करणेबाबत तरतूद आहे त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनासाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/११/२०१५ रोजीचे सभेतील विषय क्र.४१, निर्णय क्र.५५९

**प्रास्ताविक:-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८/११/२०१५ रोजीचे सभेतील विषय क्र.४१ निर्णय क्र.५५९ अन्वये टेलीफोन विभागातील अद्यावत दुरध्वनी (EPABX) यंत्रणा उभारणेसाठी तांत्रिक सल्लागार (Technical Consultant) यांची नेमणूक करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणा-या एकत्रित अंदाजे रक्कम रु.९,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.त्यानुसार महाराष्ट्र शासनाचे अधिकृत ई-निविदा संकेतस्थळावर व्दितिय वेळेस विषयांकित कामी निविदा प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार सिलबंद तांत्रिक ई-निविदांची हार्ड कॉपी स्विकारणेची अंतिम दि२६/०९/२०१६ अखेर ठेवण्यात आलेली असुन सदर कामी एकुण तिन ऑन लाईन तांत्रिक निविदा व त्यांची हार्ड कॉपी संस्थानचे आवक विभागामार्फत प्राप्त झालेल्या आहेत.

सदरच्या ऑन लाईन प्राप्त तांत्रिक ई-निविदा दि.०३/१०/२०१६ रोजीचे परिपत्रकानुसार दि.०५/१०/२०१६ रोजी सकाळी ११.०० वा.साईनिवास अतिथीगृहातील सभागृहात मा.प्रशासकिय अधिकारी यांचे पुर्वपरवानगीने खरेदी समितीचे प्रतिनिधींचे उपस्थितीत उघडण्यात आलेल्या असुन सदर सल्लागारांच्या तांत्रिक ई-निविदेतील कागदपत्रांची पडताळणी लेखाशाखा विभागाचे प्रतिनिधी व संस्थानचे तांत्रिक सल्लागार श्री.विजय नायडु यांनी केलेली असुन सदर ऑनलाईन जमा झालेल्याखालील निविदांधारकांच्याकमर्शियल ई-निविदा मा.व्यवस्थापन समितीचे उप-समितीसमोर उघडुन त्यातील निम्नत्तम दरधारक सल्लागारास याकामी नेमणुकीबाबत कार्यादेश देणेकामी प्रस्ताव मा.उपसमितीचे सभेपुढे मान्यतेस्तव सादर करता येईल.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | प्रशासन आवक नं.व दिनांक |
| --- | --- | --- |
| ०१) | श्रीजी नेटवर्क सोल्युशन्स, सांगली | ११११९७ / २२-०९-२०१६ |
| ०२) | वितराग कॉम्प्युटर्स प्रा.लि.,सांगली | ११११९८ / २२-०९-२०१६ |
| ०३) | डीएसजी कन्सलटंटस प्रा.लि.,मुंबई | ११४७२ / २६-०९-२०१६ |

**मागणी:-** उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे टेलीफोन विभागातील अद्यावत दुरध्वनी (EPABX) यंत्रणेसाठी तांत्रिक सल्लागार (Technical Consultant) यांची नेमणूक करणेकामी प्राप्त झालेल्या निविदांधारकांच्या कमर्शियल ई-निविदा मा.व्यवस्थापन समितीचे उप-समितीसमोर उघडुन त्यातील निम्नत्तम दरधारक सल्लागारास याकामी नेमणुकीबाबत कार्यादेश देणेकामी प्रस्तप्त मा.उपसमितीचे सभेपुढे मान्यतेस्तव सादर करता येईल, असे, नम्र मत आहे.

उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे टेलीफोन विभागातील अद्यावत दुरध्वनी (EPABX) यंत्रणेसाठी तांत्रिक सल्लागार (Technical Consultant) यांची नेमणूक करणेकामी प्राप्त झालेल्या ०३ ई-निविदा आजचे स्थानिक उपसमितीसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन त्यामधील मुळ दरांचे खालील प्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | ई-निविदेमधील मुळ दर रु. |
| --- | --- | --- |
| ०१) | श्रीजी नेटवर्क सोल्युशन्स, सांगली | १०,००,०००/- |
| ०२) | वितराग कॉम्प्युटर्स प्रा.लि.,सांगली | ८,५०,०००/- |
| ०३) | डीएसजी कन्सलटंटस प्रा.लि.,मुंबई | **५,६३,५००/-** |

**टेलीफोन विभागातील अद्यावत दुरध्वनी (EPABX) यंत्रणेसाठी तांत्रिक सल्लागार (Technical Consultant) यांची नेमणूक करणेकामी प्राप्त झालेले दर बाजारभावापेक्षा फारच जास्त वाटतात. याकरीता उपसमितीने निम्नतमधारक डीएसजी कन्सलटंटस प्रा.लि., मुंबई यांचे प्रतिनिधींबरोबर दर कमी करणेबाबत चर्चा केली असता, त्यांनी ई-निविदेमध्ये दिलेल्या मुळ दरांवर १०% कमी दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, डीएसजी कन्सलटंटस प्रा.लि., मुंबई यांचेकडून लेखी स्वरुपात अंतिम दर घेणेत येऊन, सदरहूकामी त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- ध्वनिक्षेपण व टेलिफोन विभागप्रमुख)

---

**१८ संस्थानचे कॅन्टीन विभागाकरीता पेपर कप खरेदीकामी ऑनलाईन प्राप्त झालेल्या ई-निविदेचे Online Commercial Bid उघडणेबाबत.**

संस्थानचे कॅन्टीन विभागाकरीता पेपरकप खरेदीकामी महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेत स्थळावर दि.३०.०८.२०१६ ते दि.२०.०९.२०१६ या कालावधीत ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली होती. तांत्रीक निविदा (Technical Bid) स्विकारणेचा कालावधी दि.२१.०९.२०१६ ते दि.२२.०९.२०१६ असा ठेवण्यात आलेला होता. निविदा जाहिरातीमध्ये तांत्रिक निविदा उघडणेची तारीख दि.२३.०९.२०१६ अशी नमुद करण्यात आलेली होती.

पेपरकपसाठी दि.२२.०९.२०१६ रोजी ऑनलाईन ४ निविदा प्राप्त झाल्याचा आयटी विभागाने ई-निविदा website व्दारे प्राप्त अहवाल दिला होता.

मुदतीअंती ईनिविदेतील Technical Bid दि.२६.०९.२०१६ रोजी Digital Signature चे तांत्रिक अडचणीमुळे दुपारी०१.०० वा. चे दरम्यान उघडले असता एकूण चार निविदाधारकांनी खालीलप्रमाणे Online तांत्रिक निविदा सादर केलेल्या आहेत.

१. मे.श्री चिंतामणी इंडस्ट्रिज, औरंगाबाद
२. मे.मारुति इको प्रॉडक्ट्स प्रा.लि., सुरत
३. मे.सुयोग नेचर केअर, जयपुर
४. मे.एम.एस.इंडस्ट्रिज, हिसार (हरियाणा)

वरील तांत्रीक निविदा समितीचे सदर बैठकीत उपस्थित सदस्यांसमोर उघडून निविदाधारकांचे कागदपत्रांची छाननी केली असता वरील अ.क्रं. १ ते ४ निविदाधारकांच्या ई-निविदा तांत्रिकदृष्ट्यापात्र ठरल्या आहेत.

उपरोक्त प्राप्त चार ई-निविदा आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन त्यामधील मुळ दरांचा खालील प्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | ई-निविदाधारकांचे नांव | ई-निविदेमधील मुळ दर प्रति नग रु. |
|---|---|---|
| १ | मे.श्री चिंतामणी इंडस्ट्रिज, औरंगाबाद | ०.३६८९ |
| २ | मे.एम.एस.इंडस्ट्रिज, हिसार (हरियाणा) | ०.३६९८ |
| ३ | मे.सुयोग नेचर केअर, जयपुर | ०.३४ |
| ४ | मे.मारुति इको प्रॉडक्ट्स प्रा.लि., सुरत | ०.३६५ |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे कॅन्टीन विभागाकरीता पेपर कप खरेदीकामी मे.सुयोग नेचर केअर, जयपुर यांचे प्रति नग रु.०.३४ मात्र निम्नतम दर स्विकारणेत यावे, परंतु ते पुरवठा करणाऱ्या पेपरकपचा नमुना प्रयोगशाळेकडून तपासणी करुन घेण्यात यावा व प्रयोगशाळेचा अहवाल आपल्या मागणीनुसार असल्यास त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

१९ **रविवार दि.११.१२.२०१६ रोजी आयोजीत जागतिक श्री साईमंदिर परिषद कार्यक्रमासाठी निमंत्रीतांना चैनसह बॅग देणे आहे, सदर साहित्य खरेदीकामाचे दरपत्रके उघडणे बाबत.**

मा.उपसमितीचे दि.१८.१०.२०१६ चे सभेत रविवार दि.११.१२.२०१६ रोजी आयोजीत जागतिक श्री साईमंदिर परिषद कार्यक्रमासाठी निमंत्रीतांना चैनसह बॅग देणेबाबत ठरले आहे.

रविवार दि.११.१२.२०१६ रोजी होणा-या साईमंदिर कार्यक्रमासाठी निमंत्रीत देशविदेशातील श्री साईमंदिर विश्वस्त व प्रतिनिधी यांना चैनसह बॅग देणेकामी २००० नग पर्यंतचे संख्या अपेक्षीत आहे.

संस्थानव्दारे बॅगमध्ये पॅड व पेन तसेच श्री साई दैनंदिनी सन-२०१७ त्यावर शताब्दी लोगो असलेले साहित्य मान्यवरांना देण्याचे आहे.

दि.१८.१०.२०१६ रोजी उपसमितीची सभेमध्ये बॅग, पॅड व पेन यांची निवड करण्यात आलेली आहे. सदर निवड प्रमाणे दादर मुंबई कार्यालयाच्या मदतीने बृन्हमुंबई परिसरातून संबंधीत बॅग निर्मीती व पुरवठा करणारे निविदाकरांनकडून सिलबंद दरपत्रकांची मागणी करण्यात आली आहे त्याचा तपशिल खालील प्रमाणे..

| अं.नं. | प्राप्त निविदाकारांचे सिलबंद दरपत्रकांची तपशिल | दादर, मुंबई कार्यालय आवक क्र. दि. |
|---|---|---|
| ०१ | Classic Stationers Co. Goregaon, Mumbai | ५७५ / २१.१०.२०१६ |
| ०२ | Guru Chaaya Enterprises, Kandivali] Mumbai | ५७६ / २१.१०.२०१६ |
| ०३ | Mehul Stationers & Zerox, Goregaon, Mumbai | ५७७ / २१.१०.२०१६ |
| ०४ | Parmeshwar Stationers, Andheri, Mumbai | ५७८ / २१.१०.२०१६ |
| ०५ | Mital Stationers & Printers, Bandra, Mumbai | ५७९ / २१.१०.२०१६ |
| ०६ | Laxmitol Enterrprises, Andheri, Mumbai | ५८० / २१.१०.२०१६ |
| ०७ | Digvijay Printing , Malad Mumbai | ५८१/ २१.१०.२०१६ |

उपरोक्तप्रमाणे ०७ निविदा आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अं.नं. | निविदाकारांचे नाव | निविदेमधील व्हॅटसह मुळ दर प्रति नग रु. |
|---|---|---|
| ०१ | Classic Stationers Co. Goregaon, Mumbai | **१५२.६४** |
| ०२ | Guru Chaaya Enterprises, Kandivali] Mumbai | १६१.१२ |
| ०३ | Mehul Stationers & Zerox, Goregaon, Mumbai | २०३.०० |
| ०४ | Parmeshwar Stationers, Andheri, Mumbai | १८०.२० |
| ०५ | Mital Stationers & Printers, Bandra, Mumbai | २०३.५२ |
| ०६ | Laxmitol Enterrprises, Andheri, Mumbai | २००.३४ |
| ०७ | Digvijay Printing , Malad Mumbai | अपात्र |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे बॅग खरेदी करणेकामी क्लासिक स्टेशनरीज् कंपनी, गोरेगाव यांचे व्हॅटसह प्रति नग रु.१५२.६४ मात्र दर निम्नतम आलेले आहेत. परंतु सदरहू बॅगच्या नमुन्याची पाहणी करुन मा.कार्यकारी अधिकारी यांनी या दरामध्ये आणखी सवलत मिळणेसाठी क्लासिक स्टेशनरीज् कंपनी, गोरेगाव यांचेबरोबर चचाᅳ करावी व त्यांचेकडून लेखी स्वरुपात अंतीम दर घेण्यात येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

२० **साईआश्रम भक्तनिवासस्थान येथील लगेज ट्रॉली दुरुस्तीकरीता व्हील व ब्रॅकेट खरेदी करणेकामी प्राप्त कोटेशन उघडणेस मान्यता मिळणेबाबत.**

मा. व्यवस्थापन समितीने दिनांक १९.९.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६५१ अन्वये साईआश्रम भक्तनिवासस्थान येथील लगेज ट्रॉली दुरुस्तीकरीता ४ इंच रबरी व्हील व मुव्हेबल ब्रॅकेट खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये ६७,२००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. जा.नं.एसएसएस/ मेकॅनिकल/ ३७०५/२०१६ दिनांक १४.१०.२०१६ अन्वये ८ पुरवठाधारक यांचेकडून कोटेशन मागविणेकरीता पत्रे पाठविण्यात आली होती. कोटेशन पाठविण्याची अंतिम मुदत दिनांक ३१.१०.२०१६ अशी देणेत आलेली होती. या मुदतीत खालील तपशीलाप्रमाणे ३ पुरवठादार यांचेकडून बंद पाकीटामध्ये कोटेशन्सप्राप्त झालेली आहेत:

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | आवक क्रमांक | दिनांक |
|---|---|---|---|
| १. | एक्सेल ट्रेडींग कंपनी, मुंबई | १३८१४ | २५.१०.२०१६ |
| २. | अशियन सेल्स कॉर्पो. नाशिक | १४२३७ | ३१.१०.२०१६ |
| ३. | युनियन ट्रेडिंग, नाशिक | १४२३८ | ३१.१०.२०१६ |

उपरोक्त तपशीलाप्रमाणे ३ दरपत्रकधारक यांचेकडून लगेच ट्रॉली रबरी व्हिल व मोव्हेबल ब्रॉकेट खरेदी कामांकरीता कोटेशन्स प्राप्त झालेली आहेत.

रबरी व्हिल व मोव्हेबल ब्रॅकेट खरेदी कामी प्राप्त ०३ कोटेशन्स आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित कोटेशनधारकांसमक्ष उघडणेत येऊन त्यामधील मुळ दरांचे खालील प्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | कोटेशनमधील एकत्रित मुळ दर रु. |
|---|---|---|
| १. | एक्सेल ट्रेडींग कंपनी, मुंबई | **८२,०८०/-** |
| २. | अशियन सेल्स कॉर्पो. नाशिक | १,५७,६२९/- |
| ३. | युनियन ट्रेडिंग, नाशिक | १,५४,३६०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवासस्थान येथील लगेज ट्रॉली दुरुस्तीकरीता व्हील व ब्रॅकेट खरेदी करणेकामी एक्सेल ट्रेडींग कंपनी, मुंबई यांचे एकत्रित रु.८२,०८०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

२१ **साईभक्तांसाठी दर्शनरांग व्यवस्थापन(Time Base) कार्यप्रणाली काऊंटर करीता अल्युमिनियम कॅबीन करीता ग्रील तयार करणेकामी प्राप्त दरपत्रके उघडणेस मान्यता मिळणेबाबत.**

शिर्डी येथे श्रींचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांसाठी तिरूपती देवस्थानचे धर्तीवर Time Base दर्शन प्रणाली सुरू करणेकामी संगणक विभागामार्फत कार्यवाही सुरू करणेत आली आहे सदर सिस्टीमनुसार साईभक्तांना पास वितरणासाठी काऊंटर सुरू करावयाचे आहे. याकामी काऊंटर तयार करणे व अनुषंगीक कामाकरीता बांधकाम विभागामार्फत एकत्रित रक्कम रु.११,१३,४८९/- मात्रचे खर्चास दिनांक ९.१०.२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता घेणेत आलेली आहे. सदरच्या निर्णयान्वये मेकॅनिकल विभागामार्फत जुने प्रसादालय, साईआश्रम, धर्मशाळा, शिर्डी बसस्थानक येथील अल्युमिनियम कॅबीनचे छताकरीता स्टेनलेस स्टिलचे १२ एम एम स्क्वेअर पाईपमध्ये ग्रील विहीत पद्धतीने कोटेशन मागावून तयार करून बसविणेकामी व येणारे अंदाजे २,०६,३२२/- पर्यंतच्या खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा. नं.

एसएसएस/ वशि/ मेकॅनिकल/ ४६१६/२०१६ अन्वये सात फ्रॅब्रिकेटर्स यांचेकडून दरपत्रक मागविणेत आलेले होते. त्यापैकी खालील ४ फॅब्रिकेटर्स यांचेकडून बंद पाकीटामध्ये कोटेशन्सप्राप्त झालेली आहेत :

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | आवक क्रमांक | दिनांक |
|---|---|---|---|
| १. | अपुर्वा इंजिनिअरींगवर्क्स, औरंगाबाद | १४७०९ | ५.११.२०१६ |
| २. | सुपर फॅब्रीकेशन ॲन्ड फर्निचर, साकुरी | १४७०७ | ५.११.२०१६ |
| ३. | अरीहंत इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद | १४७०८ | ५.११.२०१६ |
| ४. | सुपर ॲग्रो इंडस्ट्रीज, साकुरी | १४७०६ | ५.११.२०१६ |

उपरोक्त तपशीलाप्रमाणे ४ फॅब्रिकेटर्स यांचेकडूनस्टेनलेस स्टिलचे १२ एम एम स्क्वेअर पाईपमध्ये ग्रील तयार करून बसविणेकामी कोटेशन्स प्राप्त झालेली आहेत.

स्टेनलेस स्टिलचे १२ एम एम स्क्वेअर पाईपमध्ये ग्रील तयार करून बसविणेकामी प्राप्त ०४ कोटेशन्स उघडून निर्णय होणेस विनंती.

**यावर सविस्त चर्चा होऊन, साईभक्तांसाठी दर्शनरांग व्यवस्थापन (Time Base) कार्यप्रणाली काऊंटरसाठी अल्युमिनियम कॅबीन करणेकरीता आवश्यक असणारे ग्रील खरेदीकामी त्यांचे अंदाजे मुल्य कसे ठरविण्यात आले, याबाबतच्या तपशीलासह सदरहूकामीचे अंदाजपत्रक तयार करणेत यावे व फेरप्रस्ताव उपसमिती समितीसमोर मान्यतेसाठी सादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

२२ **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षाकरीता दि.११ डिसेबर-२०१६ रोजी होणाऱ्या चर्चासत्रा करीता प्रसादभोजन व्यवस्थेकामी व्ही.व्ही.आय.पी. वाढपी केटरर्स, बुफे स्टॉल वगैरे सुविधाबाबत.**

श्री क्षेत्र शिर्डी चे आराध्य श्री साईबाबा यांचे महानिर्वाण सन-२०१८ मध्ये एक शतक पुर्ण होत आहे. त्यानिमित्त संस्थान व्यवस्थापनामार्फत सन २०१७-२०१८ हे वर्ष श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करण्याचे प्रयोजन आहे. या शतक महोत्सवी श्री क्षेत्र शिर्डीस येणा-या साईभक्तांसाठी मुलभूत सेवा सुविधांसह या वर्षात आयोजित करावयाचे विविध स्तरावरुन नियोजन सुरु आहे.

त्या अनुषंगाने, सन २०१७-२०१८ या समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे कार्यक्रम, उपक्रम याबाबत देश-विदेशातील साई मंदिराचे अधिकारी/पदाधिकारी यांच्या सुचना-वजा प्रस्ताव प्राप्त करुन घेणेसाठी ०१ दिवसाचे (राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय पातळीवरील) चर्चासत्र रविवार दि.११ डिंसेबर,२०१६ रोजी शिर्डी येथे आयोजित करणेचे ठरलेले आहे.

संदर्भिय अ.नं.३ नूसार उपरोक्त चर्चासत्रासाठी उपस्थित राहाणा-या साई मंदिराचे अधिकारी/ पदाधिकारी अल्पोपहार, भोजन व्यवस्था श्री साई प्रसादालयामार्फत मोफत करावयाची आहे. याबाबत मा.का.अ.साहेब यांचे समवेत विभागीय अधिक्षक सभेत पदार्थाबाबत निश्चिती करुन घेवून त्यानुसार पदार्थ देण्यात यावेत असे आदेश वजा सुचना करण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त दिवशी चर्चासत्रासाठी येणा-या राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय पातळीवरील साईभक्तांना अल्पोपहार व प्रसादभोजनकामी कोणकोणते अन्नपदार्थ दयावेत याबाबत निश्चिती करुन मिळणेबाबत प्रसादालय विभागाकडून दिनांक ०७/१०/२०१६ रोजी टिपणी करण्यात आलेली होती.

सदर टिपणीवर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी त्यावर श्री गोंदकर दि.१८/१०/२०१६ रोजीचे उपसमिती बैठकीत ठरविलेला मेनू सादर करावा असे आदेश वजा सूचना झालेल्याआहेत. त्याबाबत प्रशासकीय अधिकारी साहेब यांनी सदर कार्यक्रमांसाठी कोणते अन्नपदार्थ असावेत याबाबत सूची दिलेली आहे. ती पुढील प्रमाणे असून सदर अन्नपदार्थ हे बाहेरुन बनवून घ्यावेत अशा सूचनाही केलेल्या आहेत.

**<u>अल्पोपहार व्यवस्थेकामी पदार्थ</u> -** १) इडली २) मेंदु वडा ३) सांबर ४) खोबरा चटणी
४) उपमा ५) पोहे ६) शिरा,

**<u>सकाळचे जेवण</u> -** १) मटर पनीर २) बटाटा चटणी ३) कांदाभजी ४) सिताफळ रबडी,
५) जिलेबी ६) पापड ७) चटणी ८) सलाड ९) डाळ भात
१०) व्हेज बिरयानी, ११) चपाती,साधीपुरी,

**<u>रात्रीचे जेवण</u> -** १) डाळ २) भात ३) मुगदाळ खिचडी ४) कढी ५) लाडु ६) चपाती
७) मिक्स भाजी ८)पिठले ९) पापड १०)चटणी ११) सलाड

देश-विदेशातील साईमंदिराचे अधिकारी/पदाधिकारी यांची अल्पोपहार व भोजन व्यवस्था साईआश्रम भाग-१ या ठिकाणी असून स्वयंसेवी पध्दतीने भोजनप्रसाद व्यवस्था करावी लागणार आहे. सदर चर्चासत्रकामी साधारणत: २५०० ते ३००० हजार भक्तगण येतील असा प्राथमिक अंदाज असून त्याकामी अल्पोपहार व प्रसादभोजन (ठरवलेले मेनू) तयार करणेसाठी लागणारा गॅस, भांडी व आचारी यांचे एक स्वतंत्र दरपत्रक व सर्व्हीस देणेकामी लागणारे व्ही.व्ही.आय.पी वाढपी व बुफे स्टॉल याकामी स्वतंत्र दरपत्रक मागविता येईल. अशी सुचना मा. व्यवस्थापन उपसमितीच्या सभेत करणेत आलेली आहेत. त्यानूसार तयार करण्यात आलेले पदार्थ वितरीत करणे व बुफे स्टॉल लावून आकर्षक सजावट करणे, राऊंड टेबल लावणे व व्ही.व्ही.आय.पी.वाढपी सर्व्हीस देणेसाठी ठेवणे. याकामी नामांकित केटरर्सकडुन दरपत्रक मागविणेस व त्याकामी अंदाजे रक्कम रु.२,९५,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख पंच्यान्नव हजार) खर्च अपेक्षित आहे.

तरी श्रींचे शताब्दी महोत्सव निमित्त दि.११/१२/२०१६ रोजी देश-विदेशातील साई मंदिराचे अधिकारी/पदाधिकारी यांचेकरीता अल्पोपहार व प्रसादभोजनकामी तयार केलेले पदार्थ वितरीत करणे, बुफे स्टॉल लावून आकर्षक सजावट करणे, राऊंड टेबल लावणे व सर्व्हीस देणेसाठी बुफे स्टॉल लावून व्ही.व्ही.आय.पी. वाढपी ठेवणे. याकामी उच्च प्रतिचे केटरर्सकडून दरपत्रक मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२,९५,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख पंच्यान्नव हजार) चे खर्चास खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे जागतीक साईमंदिर परिषदेसाठी येणाऱ्या देश-विदेशातील साई मंदिराचे अधिकारी/पदाधिकारी यांचेकरीता अल्पोपहार, प्रसादभोजन वितरीत करणे, बुफे स्टॉल लावून आकर्षक सजावट करणे, राऊंड टेबल लावणे व इतर अनुषंगीक कामे करुन घेणेसाठी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

२३ **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्ष करीता दि.११ डिसेबर-२०१६ रोजी होणा-या चर्चासत्रा करीता प्रसादभोजन व्यवस्थेबाबत.**

श्री क्षेत्र शिर्डी चे आराध्य श्री साईबाबा यांचे महानिर्वाण सन-२०१८ मध्ये एक शतक पुर्ण होत आहे. त्यानिमित्त संस्थान व्यवस्थापनामार्फत सन २०१७-२०१८ हे वर्ष श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करण्याचे प्रयोजन आहे .या शतक महोत्सवी श्री क्षेत्र शिर्डीस येणा-या साईभक्तांसाठी मुलभूत सेवा सुविधांसह या वर्षात आयोजित करावयाचे विविध स्तरावरुन नियोजन सुरु आहे.

त्या अनुषंगाने, सन २०१७-२०१८ या समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे कार्यक्रम, उपक्रम याबाबत देश-विदेशातील साई मंदिराचे अधिकारी/पदाधिकारी यांच्या सुचना-वजा प्रस्ताव प्राप्त करुन घेणेसाठी ०१ दिवसाचे (राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय पातळीवरील) चर्चासत्र रविवार दि.११ डिंसेबर,२०१६ रोजी शिर्डी येथे आयोजित करणेचे ठरलेले आहे.

संदर्भिय अ.नं.३ नूसार उपरोक्त चर्चासत्रासाठी उपस्थित राहाणा-या साई मंदिराचे अधिकारी/पदाधिकारी अल्पोपहार,भोजन व्यवस्था श्री साई प्रसादालयामार्फत मोफत करावयाची आहे. याबाबत मा.का.अ. साहेब यांचे समवेत विभागीय अधिक्षक सभेत पदार्थाबाबत निश्चिती करुन घेवून त्यानुसार पदार्थ देण्यात यावेत असे आदेश वजा सुचना करण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त दिवशी चर्चासत्रासाठी येणा-या राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय पातळीवरील साईभक्तांना अल्पोपहार व प्रसादभोजनकामी कोणकोणते अन्नपदार्थ दयावेत याबाबत निश्चिती करुन मिळणेबाबत प्रसादालय विभागाकडून दिनांक ०७/१०/२०१६ रोजी टिपणी करण्यात आलेली होती.

सदर टिपणीवर मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी त्यावर श्री गोंदकर दि.१८/१०/२०१६ रोजीचे उपसमिती बैठकीत ठरविलेला मेनू सादर करावा असे आदेश वजा सूचना झालेल्याआहेत. त्याबाबत प्रशासकीय अधिकारी साहेब यांनी सदर कार्यक्रमांसाठी कोणते अन्नपदार्थ असावेत याबाबत सूची दिलेली आहे. ती पुढील प्रमाणे असून सदर अन्नपदार्थ हे बाहेरुन बनवून घ्यावेत अशा सूचनाही केलेल्या आहेत.

**<u>अल्पोपहार व्यवस्थेकामी पदार्थ</u> -** १) इडली २) मेंदु वडा ३) सांबर ४) खोबरा चटणी
४) उपमा ५) पोहे ६) शिरा,

**<u>सकाळचे जेवण</u> -** १) मटर पनीर २) बटाटा चटणी ३) कांदाभजी ४) सिताफळ रबडी, ५) जिलेबी ६) पापड
७) चटणी ८) सलाड ९) डाळ भात १०) व्हेज बिरयानी ११) चपाती, साधीपुरी,
**<u>रात्रीचे जेवण</u> -** १) डाळ २) भात ३) मुगदाळ खिचडी ४) कढी ५) लाडु ६) चपाती
७) मिक्स भाजी ८)पिठले ९) पापड १०)चटणी ११) सलाड

देश-विदेशातील साईमंदिराचे अधिकारी/पदाधिकारी यांची अल्पोपहार व भोजनव्यवस्था साईआश्रम भाग-१ या ठिकाणी असून स्वयंसेवी पध्दतीने भोजनप्रसाद व्यवस्था करावी लागणार आहे. सदर चर्चासत्रकामी साधारणत: २५०० ते ३००० हजार भक्तगण येतील असा प्राथमिक अंदाज असून त्याकामी अल्पोपहार व प्रसादभोजन (ठरवलेले मेनू) तयार करणेसाठी लागणारा गॅस, भांडी व आचारी यांचे स्वतंत्र दरपत्रक मागविता येईल. अशी सुचना मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत करणेत आलेली आहेत. तसेच उपरोक्तप्रमाणे पदार्थ तयार करणेकामी करणेकामी नामांकित केटरर्सकडुन दरपत्रक मागवून अल्पोपहार व भोजनाची सुविधा पुरविता येईल त्याकामी अंदाजे रक्कम रु.२,९५,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख पंच्यान्नव हजार) खर्च अपेक्षित आहे.

तरी श्रींचे शताब्दी महोत्सव निमित्त दि.११/१२/२०१६ रोजी देश-विदेशातील साई मंदिराचे अधिकारी/ पदाधिकारी यांचे अल्पोपहार, प्रसादभोजन पदार्थ तयार करणेकामी (गॅस, भांडी व आचारी) उच्च प्रतिचे केटरर्सकडून दरपत्रक मागविणेस व त्याकामी अंदाजे रक्कम रु.२,९५,०००/- खर्च अपेक्षीत आहे. उपरोक्त खर्चास मान्याता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे जागतिक साईमंदिर परिषदेसाठी येणाऱ्या देश-विदेशातील साई मंदिराचे अधिकारी/पदाधिकारी यांचेकरीता अल्पोपहार व प्रसादभोजन तयार करणेकामी नामांकित केटरर्सची नेमणूक करणेसाठी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

२४ **श्री साईबाबा समाधी महाशताब्दी वर्षा निमित्त आयोजीत कार्यक्रमाच्या ठिकाणी फुलांची सजावट करणेबाबत.**

श्री साईबाबा समाधी महाशताब्दी वर्ष ऑक्टोंबर 2017 ते ऑक्टोंबर 2018 या कालावधी साजरा करण्यात येणार आहे. त्यामुळे श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्त नियोजन करणेसाठी 4 डिसेंबर 2016 रोजी कार्यक्रम आयोजीत करण्यात आलेला आहे. सदर कार्यक्रमासाठी श्री साईबाबा मंदिराचे देशातील, विदेशातील महत्त्वाचे व्यक्ती तसेच संस्थानचे मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व विश्वस्त, कार्यकारी अधिकारी, उप कार्यकारी अधिकारी, सर्व प्रशासकिय अधिकारी, सर्व प्र.अधिक्षक/ विभाग प्रमुख उपस्थित असणार आहे. त्यामुळे सदर कार्यक्रमाच्या ठिकाणी फुलांची सजावट करुन सुशोभीकरण करावयाचे आहे. तसेच आलेल्या मान्यवरांच्या सत्कारासाठी बुके खरेदी करावयाची आहेत.

श्री साईबाबा समाधी महाशताब्दी वर्षानिमित्ताने दि.4 डिसेंबर 2016 रोजी आयोजीत कार्यक्रमाच्या ठिकाणी बुके खरेदी करणेकामी व फुलांची सजावट करणेकामीसाधारणत: अंदाजे रु.2,00,000/- (दोन लाख) मात्र खर्च अपेक्षीत आहे. तरी याकामी परिसरातील फुलसजावट करणारे कारागीर यांचेकडुन विहीत पध्दतीने कोटेशन घेऊन न्युनत्तम दराने सदर कार्यक्रमाच्या ठिकाणी फुलांची सजावट करता येईल किंवा जर कोणी साईभक्तांनी देणगी स्वरुपात फुलांची सजावट करुन देणेस तयार असल्यास त्यांना फुल सजावटीसाठी परवानगी देता येईल

श्री साईबाबा समाधी महाशताब्दी वर्षानिमित्ताने दि.4 डिसेंबर 2016 रोजी आयोजीत कार्यक्रमाच्या ठिकाणी मान्यवरांच्या सत्कारासाठी बुके खरेदी करणे व फुलांची सजावट करणेकामी परिसरातील फुलसजावटदारांकडुन कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु2,00,000/- (दोन लाख) मात्र खर्चास किंवा साईभक्तांनी फुलांची सजावट देणगी स्वरुपात करुन दिल्यास त्यांचेकडुन फुल सजावट करुन घेता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथे होणाऱ्या जागतिक साईमंदिर परिषद कार्यक्रमाच्या ठिकाणी देणगी स्वरुपात फुलांची सजावट करुन मिळणेकामी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात येऊन देणगीदार साईभक्तांना अवाहन करण्यात यावे. विशीष्ठ कालावधीमध्ये देगणीदार साईभक्तांचा प्रतिसाद न मिळालयास याकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

२५ **श्री विरभद्र महाराज, शिर्डी (बिरोबा बन) येथील कुस्ती हगामासाठी रक्कम देणेबाबत.**

श्री विरभद्र यात्रा कमिटी,शिर्डी (बिरेगांव बन ) यांनी दि.२५/१०/२०१६ रोजीचे अर्जान्वये श्री.सर्जेराव भाऊराव काटकर (श्री.विरभद्र यात्रा कमिटी, बिरेगांव बन, शिर्डी ) यांनी कळविले आहे की, "सालाबाद्रप्रमाणे श्री विरभद्र यात्रा दि. १३/१०/२०१६ ते दिं.१५/११/२०१६ या कालावधीत काच मंदिर बिरेगांव बन, शिर्डी येथे साजरी होणार आहे. मागील वर्षी आपल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडून यात्रेतील कुस्ती हगामाकरीता रु.७५०००/- रक्कम देण्यात आली होती. त्याबद्दल आम्ही ग्रामस्थ आपले आभारी आहोत.

तरी मागील वर्षीप्रमाणे याही वर्षी आपलेकडून विरभद्र यात्रा निमित्त दि. १५/११/२०१६ रोजी होणा-या कुस्ती हगामाकरीता रु. १,२५,०००/- रक्कम मिळावी ही विनंती.

दि.१७/११/२००४ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.११९ नुसार एक विशेष बाब म्हणून विरभद्र यात्रा बन, शिर्डी यांना दि.२६/११/२०१४ रोजी होणा-या कुस्त्यांच्या हगाम्यासाठी रु.२५ हजार रक्कम श्री.रामनवमी उत्सवाप्रमाणे संस्थान प्रतिनिधी नेमून देण्यात यावी, असे ठरल्याप्रमाणे रक्कम देणेत आली होती. तसेच त्यानंतर दरवर्षी मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार खालीलप्रमाणे रक्कम मंजूर करुन वाटणेत आलेली आहे.

| अ.नं. | सभेची तारीख व निर्णय क्र. | मंजुर रक्कम | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|
| १ | दि.१७/११/२००४, निर्णय क्र.११९ | २५,०००-०० | २४,४९९-०० |
| २ | दि.५/११/२००५, निर्णय क्र.७१२ | ५०,०००-०० | ४८,१५२-०० |
| ३ | दि.१४/१०/२००६, निर्णय क्र.८६६ | ५०,०००-०० | ४३,५३३-०० |
| ४ | दि.१८/११/२००७, निर्णय क्र.७८२ | ५०,०००-०० | ४९,०२०-०० |
| ५ | दि.३/१/२००८, निर्णय क्र.०४(१९) | ७५,०००-०० | ६४,०८०-०० |
| ६ | दि.७/११/२००९, निर्णय क्र.८६७ | ७५,०००-०० | ६९,५७०-०० |
| ७ | दि.२१/१०/२०१०, निर्णय क्र.९२३ | ७५,०००-०० | ७२,०८०-०० |
| ८ | दि.१४/१/२०१२, निर्णय क्र.१३१ | ७५,०००-०० | ७०,२७०-०० |
| ९ | दि.३०/११/२०१२, निर्णय क्र.९४८ | ७५,०००-०० | ७०,२७०.०० |
| १० | दि.२७/१०/२०१३, निर्णय क्र.८७२ | ७५,०००-०० | ७०,२७०-०० |
| ११ | दि.०६/११/२०१४, निर्णय क्र.९३७ | ७५.०००-०० | ६८,४९०-०० |
| १२ | दि.२७/१०/२०१५, निर्णय क्र.४२७ | ७५.०००-०० | ७२,६९०-०० |

दिनांक २७/१०/२०१५ रोजीचे व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.४२७ नुसार मागील वर्षी सदर कामी रु.७५,०००/- मात्रची आर्थिक मदत संस्थानमार्फत देण्यात आली होती. त्यापैकी रु.७२,६९०/- इतकी रक्कम बिदागी म्हणून वाटली असून उर्वरीत रक्कम लेखाशाखेत जमा-नांवे करण्यात आलेली होती.

श्री.विरभद्र यात्रा कमिटी, बिरेगांव बन, शिर्डी यात्रेनिमित्ताने कुस्ती हगामासाठी रु.१,२५,०००/- मागणी केलेली आहे. श्री.रामनवमी उत्सव प्रथेप्रमाणे संस्थानचा प्रतिनिधी (लेखाशाखेतील कर्मचारी) नियुक्त करुन विजयी पहिलवानांना बिदागी म्हणून रक्कम अदा करुन उर्वरीत रक्कम लेखाशाखेकडे जमा नावे करता येईल.

तरी सदरचे विषयावर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

२६ **सन २०१६-१७- माहे नोव्हेंबर, २०१६ करीता बिस्किटे खरेदी करणेबाबत.**

सन २०१६-१७ चे किराणा माल व अनुषंगिक साहित्य खरेदीसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे Circulatory Agenda व्दारे सादर केलेले प्रस्तावात संस्थानला बिस्कीटे पुरविणेसाठी फक्त एका निविदाधारकाने प्रतिसाद दिला होता. परंतु तो तांत्रिकदृष्ट्याअपात्र ठरला होता, त्यामुळे त्याकामी फेर ई-निविदा प्रक्रिया करण्याचे व तूर्त मागील निविदाधारकाकडून १ महिना आवश्यक असलेली बिस्कीटे खरेदी करण्याचे निर्देश दि.१०/६/२०१६ रोजी झाले होते.

त्यास अनुसरुन बिस्किटे खरेदीकामी महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेत स्थळावर दि.२३.०६.२०१६ ते दि.०५.०७.२०१६ या कालावधीत दुस-यांदा फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली होती. तसेच तांत्रीक निविदा व नमुने (Technical Bid) स्विकारणेचा कालावधी दि.०६.०७.२०१६ ते दि.०७.०७.२०१६ असा

ठेवण्यात आलेला होता. सदर ई निविदेमध्ये बिस्किटासाठी २ ई-निविदा प्राप्त झाल्यामुळे, त्यास मा.प्रशासकीय अधिकारी यांचे पूर्व मान्यतेने पुन्हा ७ दिवसांची म्हणजेच दि.१२/७/२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. याकामी दोनच निविदा प्राप्त झाल्या होत्या. प्रथम एकत्रित निविदा, दुसऱ्यांदा फेरनिविदा व तिसऱ्यांदा ७ दिवसांची मुदतवाढ दिल्यामुळे याकामी आलेल्या दोन ई-निविदांच्या तांत्रिक निविदा दि.२५.०७.२०१६ रोजी उघडण्यात आल्या होत्या.

सदर दोन्हीही निविदा तांत्रीक दृष्ट्या पात्र ठरल्यामुळे या दोन ई-निविदांचे कमर्शियल बीड दि.२२.०८.२०१६ रोजीचे मा.उपसमितीचे सभेत उघडणेकामी प्रस्ताव सादर केला असता, दोनच निविदा असल्याने सदर खरेदी प्रक्रिया रद्द करुन पुन्हा ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी तसेच यामध्ये श्री. रामदेव बाबा यांचे पतंजली बिस्कीट शिर्डी येथे संस्थानचे कॅन्टीनवर उपलब्ध करण्यासाठी त्यांचेशी संपर्क करणेत यावा, असा निर्णय झालेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.९/१०/२०१६ चे सभेतील निर्णय क्रं.७४१ नुसार ऑक्टोबर-२०१६ महिन्यासाठी खालीलप्रमाणे बिस्कीटे मागील पुरवठादार मे.अग्रवाल एजन्सीज, साकुरी यांचेकडून खरेदी करणेबाबत निर्णय झाला होता.

| अ.नं. | मालाचे नांव | कंपनी | मागणी | दर प्रती पुडा (रुपयांमध्ये) | एकूण रक्कम (रुपयांमध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | बिस्किटे ग्लुकोज लहान | पारले | ५८,५०० पुडे | ३.७८ | २,२१,१३०.०० |
| २ | बिस्किटे ग्लुकोज मोठा | पारले | ५,००० पुडे | ७.५६ | ३७,८००.०० |
| ३ | बिस्किटे नमकिन लहान | पारले | २५,००० पुडे | ३.७० | ९२,५००.०० |
| ४ | बिस्किटे स्नॅक्स लहान | पारले | ४१,७०० पुडे | ३.७० | १,५४,२९०.०० |
| ५ | बिस्किटे मारी लहान | पारले | १६,७०० पुडे | ३.७० | ६१,७९०.०० |
| | | | | **एकुण रक्कम रु.** | **५,६७,५१०.००** |
| **रुपये पाच लाख सदुसष्ट हजार पाचशे दहा मात्र** | | | | | |

वरील निर्णयास अनुसरुन इकडील जा.नं.एसएसएसटी/वशी-खरेदी/३७८५/२०१६ दि.१७.१०.२०१६ अन्वये मे.अग्रवाल एजन्सीज, यांना वरीलप्रमाणे बिस्कीटे खरेदी करणेबाबत पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

तसेच याकामी महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेतस्थळावर दिनांक २६.०९.२०१६ ते दिनांक १८.१०.२०१६ या कालावधीत पुन्हा ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. तसेच तांत्रीक निविदा व नमुने (Technical Bid) स्विकारणेचा कालावधी दि.१७.१०.२०१६ ते दि.१८.१०.२०१६ असा ठेवण्यात आलेला होता.

सदर ई निविदेमध्ये बिस्किटासाठी दोनच ई-निविदा प्राप्त झाल्यामुळे, त्यास मा.प्रशासकीय अधिकारी यांचे पूर्व मान्यतेने पुन्हा ०७ दिवसांची म्हणजेच दि.२२.१०.२०१६ पर्यंत सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

सदर मुदतवाढ दिल्यानंतरही दिनांक २२.१०.२०१६ अखेर सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत दोनच ई-निविदा प्राप्त झाल्याने मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०७.०८.२०१६ चे सभेतील निर्णय क्र.५०९ ला अनुसरुन पुन्हा ०७ दिवसांची म्हणजेच दिनांक २९.१०.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

सदर निविदेची मुदत संपलेनंतर, ई-निविदा प्रक्रियेकामी ०३ निविदा प्राप्त होणे, त्यानंतर तांत्रिक निविदा उघडणे, यामध्ये ०३ निविदाकार पात्र ठरलेनंतर मा.उप समिती सभेत कमर्शियल बीड उघडणे, त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचा अंतिम निर्णय होणे वगैरे प्रक्रियेसाठी वेळ लागणार आहे

तसेच मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार सदर बिस्किटांमधूनच दर्शन रांगेतील साईभक्तांना मोफत बिस्कीट वाटप सध्या चालू आहे. तसेच दिवाळीच्या सुटीचीही गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ऑक्टोबर २०१६ या महिन्यात वरीलप्रमाणे खरेदी केलेले परिमाणाचे दुप्पट बिस्कीटे खरेदी करावीत असे मत आहे.

माहे नोव्हेंबर २०१६ महिन्यासाठी आवश्यक असणारे परिमाणाचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | मालाचे नांव | कंपनी | मागणी | दर प्रती पुडा (रुपयांमध्ये) | एकूण रक्कम (रुपयांमध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | बिस्किटे ग्लुकोज लहान | पारले | १,१७,००० पुडे | ३.७८ | ४,४२,२६०.०० |
| २ | बिस्किटे ग्लुकोज मोठा | पारले | १०,००० पुडे | ७.५६ | ७५,६००.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | बिस्किटे नमकिन लहान | पारले | ५०,००० पुडे | ३.७० | १,८५,०००.०० |
| ४ | बिस्किटे स्नॅक्स लहान | पारले | ८३,४०० पुडे | ३.७० | ३,०८,५८०.०० |
| ५ | बिस्किटे मारी लहान | पारले | ३३,४०० पुडे | ३.७० | १,२३,५८०.०० |
| | **एकुण रक्कम रु.** | | | | **११,३५,०२०.००** |
| **रुपये अकरा लाख पस्तीस हजार वीस मात्र** | | | | | |

तरी उपरोक्तप्रमाणे नोव्हेंबर-२०१६ महिन्याकरीता कॅन्टीनमार्फत साईभक्तांना बिस्कीटे पुरविणेची सेवा देण्यात अडचण निर्माण होऊ नये म्हणून वरील नमूद तपशीलाप्रमाणे रक्कम रु.११,३५,०२०/- (रु.अकरा लाख पस्तीस हजार वीस) मात्रची बिस्किटे मागील पुरवठाधारक मे.अग्रवाल एजन्सीज, साकुरी यांचेकडून नमूद मंजुर ई निविदा दराने सदरची बिस्किटे खरेदीकामी सदरचा विषय मा. स्थानिक उपसमितीचे सभेपुढे सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानसाठी आवश्यक असलेल्या बिस्कीटांची नवीन खरेदी प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत साईभक्तांना बिस्कीटे पुरविणेकामी अडचण येऊ नये, याकरीता मे.अग्रवाल एजन्सीज, साकुरी यांचेकडून मागील मंजूर दराने एक महिना कालावधीसाठी आवश्यक असलेली बिस्कीटे खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

२७ **लिक्वीडसोप खरेदीकामी मागविण्यात आलेले दरपत्रके मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत उघडणे बाबत.**

सन- २००४ मधील महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापित केलेले अध्यादेश व विनियम १७(१)मधील कलमानुसार साईभक्तांना आवश्यक त्या सेवा व सुविधा उपलब्ध करुन देणेची तरतूद करणेत आलेली आहे.

कॅन्टीन विभागाकडे साईभक्तांनसाठी दैनंदिन चहा, कॉफी, दुध तयार करुन त्याची अल्पदरात कॅन्टीनचे विविध काऊंटरवर विक्री करणेत येते चहा कॉफी,दुध तयार करणेसाठी मोठे पातेले वापरण्यात येतात.सदरची पातेले सततच्या वापरांमुळे खराब होतातपातेले स्वच्छ राहावेत याकरीता लिक्वीडचा वापर करणेत येतो.४०० लिटर लिक्वीड खरेदीकामी रु.१०.०००/- पर्यतचे अपेक्षीत खर्चास कॅन्टीन विभागाकडील दि.०७/१०/१६ चे टिपणी अन्वये मान्यता घेणेत आलेली आहे.याकामी स्थानिक पुरवठाधारकांकडून सिलबंद पाकीटातुन दरपत्रके मागविली असून खालील पुरवठाधारकांनी दरपत्रकेसादर केलेली आहेत.

०१) मनोज सप्लायर्स,गोधंवणी रोड, श्रीरामपूर
०२) साई प्रॉडक्टस लोणकर वस्ती, कोपरगाव
०३) साई सेल्स कार्पोरेशन, संगमनेर

उपरोक्तप्रमाणे आलेले ०३ कोटेशन आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित कोटेशनधारकांसमक्ष उघडणेत येऊन त्यामधील मूळ दरांचा खालील प्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव | कोटेशनमधील मुळ दर प्रति लिटर रु. |
|---|---|---|
| १ | मनोज सप्लायर्स, गोधंवणी रोड, श्रीरामपूर | ३६/- |
| २ | साई सेल्स कार्पोरेशन, संगमनेर | ४०/- |
| ३ | साई प्रॉडक्टस, लोणकर वस्ती, कोपरगाव | **३०/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, लिक्वीडसोप खरेदीकामी साई प्रॉडक्टस, लोणकर वस्ती, कोपरगाव यांचे प्रति लिटर रु.३०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

२८ **सन २०१७-१८ श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने देश-विदेशातील साई मंदिरांचे श्री क्षेत्र शिर्डी येथे चर्चासत्र कार्यक्रमाचे ठिकाणी जेवणाकरीता स्वतंत्र मंडप व्यवस्था करणेबाबत.**

थोर संत श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर,२०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होणार आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षामध्ये शिर्डीत येणा-या भाविकांसाठी सोयीसुविधा उभारणे तसेच संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करुन साईचरीत्रावर आधारीत वेगवेगळे इव्हेन्ट तयार करुन त्याचे सादरीकरण करणे, जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहील, अशाप्रकारे श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल या दृष्टीने प्रयत्न करणेत येत आहेत.

याबाबत मा.उपसमितीचे दि.१६ सप्टेंबर, २०१६ रोजीचे सभेत सन २०१७-१८ या समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनाबाबत देश-विदेशातील साई मंदिरांचे अधिकारी/ पदाधिकारी यांच्या सूचना-वजा-प्रस्ताव प्राप्त करुन घेणेसाठी तसेच या साई मंदिरांच्याव्यवस्थापनांनी या शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे कार्यक्रम/ उपक्रम याबाबत व्यापक सविस्तर चर्चा करणेसाठी शिर्डी येथे चर्चासत्र आयोजित करणेचा निर्णय घेणेत आलेला आहे.

सदर दि.११/१२/२०१६ रोजीचे कार्यक्रमाबाबत साईआश्रम भक्तनिवास परिसरात २००० अधिकारी/ पदाधिका-यांची मंडप टाकून बैठक व्यवस्था करणे तसेच इतर अनुषंगीक व्यवस्था करणेबाबतची ई-निविदा कार्यवाही करणेत आली आहे. दि.१८/१०/२०१६ रोजीचे मा. उपसमितीचे सभेत जेवणाकरीता स्वतंत्र मंडप व्यवस्था करणेचे ठरले आहे. त्यानुसार साई आश्रम भक्तनिवास येथे मुख्य कार्यक्रमाचे मंडपाचे शेजारी जेवणाकरीता स्वतंत्र मंडप व्यवस्था करणेसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | व्यवस्थेचा तपशिल | साईज | परिमाण/ एकक | दर/ चौ.फुट | रक्कम (रू.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | **जेवणाकरीता मंडप व्यवस्था:-** प्लास्टीक ताडपत्रीचे वॉटरप्रुफ छत असलेला मंडप, आतिल बाजूस सुशोभित कापड, मध्यवर्ती ठिकाणी १५' उंची व बाजूस १२' उंची असलेला मंडप, तसेच मंडपाचा मधला गाळा ६०' रुंदीचा असणे आवश्यक, साईडला व बाजूस सफेद कनात, संपूर्ण मंडपात लाल रंगाचे पी.व्ही.सी. मॅटींग बिछायत इ. (लोखंडी पाईप/ कैची स्ट्रक्चर इ. सह). | ९०'X १५०' | १३५०० चौ. फुट | १२/- | १,६२,०००/- |
| | | २५'X १००' | २५०० चौ. फुट | १२/- | ३०,०००/- |
| २ | **किचनकरीता मंडप व्यवस्था:-** पत्र्याचे छत असलेला मंडप, मध्यवर्ती ठिकाणी १७' ते १८' उंची व दोन्ही बाजूस १२' ते १४' उंची असलेला मंडप, साईडला व बाजूस कनात इ. (लोखंडी पाईप व लाकडी बल्ली स्ट्रक्चर इ. सह). | ३०'X ७५' | २२५० चौ. फुट | १५/- | ३३,७५०/- |
| ३ | **विद्युत व्यवस्था करणे:-** कार्यस्थळावर ८५ वॅट सी.एफ.एल. वायरींग सह- २० नग, सिलिंग फॅन वायरींग सह- २० नग, ५/१५ ॲम्पियर पॉवर पॉईंट वायरींग सह १० नग, २५० वॅट मेटल हॅलॅईड फीटींग वायरींग सह- ०४ नग, अर्थिंग (शेडकरीता तसेच सप्लायकरीता)- ०१ नग, ६३ ॲम्पियर मेनस्वीच मेन सप्लायकरीता- ०१ नग, ३२ ॲम्पियर मेनस्वीच सप्लायकरीता- ०१ नग, आऊटगोईंग मेन सप्लाय बोर्ड- ०१ नग, ५/१५ ॲम्पियर पॉवर पॉईंट एक्सटेंशन बोर्ड– ०१ नग. | --- | --- | --- | ६०,०००/- |
| | **एकूण खर्च रक्कम रुपये:-** | | | | **२,८५,७५०/-** |

सदर व्यवस्थेसाठी उपरोक्तप्रमाणे रक्कम रु.२,८५,७५०/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

**प्रस्ताव:** तरी उपरोक्त नमूद रक्कम रु.२,८५,७५०/- मात्रचे अपेक्षित खर्चास व सदरहु व्यवस्था करणेसाठी मंडप ठेकेदार यांचेकडून दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री क्षेत्र शिर्डी येथे होणाऱ्या जागतिक साईमंदिर परिषद या कार्यक्रमाचे ठिकाणी उपस्थितांच्या नाष्टा व जेवणाकरीता स्वतंत्र मंडप व्यवस्था करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन्स मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

२९ **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षाकरीता दि.११ डिसेंबर, २०१६ रोजी होणाऱ्या चर्चासत्राकरीता देशविदेशातील आलेल्या अधिकारी/ पदाधिकारी यांचे अल्पोपहार व भोजन व्यवस्थेकामी लागणारा किराणा माल व भाजीपाला खरेदी विभागामार्फत खरेदी करुन मिळणेबाबत.**

श्री क्षेत्र शिर्डी चे आराध्य श्री साईबाबा यांचे महानिर्वाण सन-२०१८ मध्ये एक शतक पुर्ण होत आहे. त्यानिमित्त संस्थान व्यवस्थापनामार्फत सन-२०१७-२०१८ हे वर्ष श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरा करण्याचे प्रयोजन आहे. या शतक महोत्सवी श्री क्षेत्र शिर्डीस येणा-या साईभक्तांसाठी मुलभुत सेवा सुविधांसह या वर्षात आयोजित करावयाचे विविध स्तावरुन नियोजन सुरु आहे.

त्या अनुषंगाने सन २०१७-२०१८ या समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे कार्यक्रम ,उपक्रम याबाबत देश-विदेशातील साई मंदिराचे अधिकारी/ पदाधिकारी यांच्या सुचना वजा प्रस्ताव प्राप्त करुन घेणेसाठी ०१ दिवसाचे (राष्ट्रीय -आंतरराष्ट्रीय पातळीवरील) चर्चासत्र रविवार दि.११ डिसेंबर रोजी शिर्डी येथे आयोजित करणेचे ठरलेले आहे.

चर्चासत्रासाठी उपस्थीत राहणा-या साई मंदीराचे अधिकारी/पदाधिकारी (२५०० ते ३००० व्यक्ती) यांची अल्पोपहार व भोजन व्यवस्था श्री साई प्रसादालयामार्फत मोफत करावयाची असल्याने त्याकामी आवश्यक लागणारा किराणा माल व भाजीपाला खरेदी विभागामार्फत खरेदी करावा लागणार आहे. अल्पोपहार, सकाळचे जेवण व रात्रीचे जेवण तयार करणेकामी उच्च प्रतीचे केटरर्सकडून दरपत्रक मागविणेत येणार आहेत.

**अ) अल्पोपहार देणेकामी– इटली, मेंदुवडा, सांबर, खोबरा चटणी, उपमा, पोहे, शिरा** इत्यादी पदार्थ द्यावयाचे आहेत. सदर पदार्थ तयार करुन देणेकामी खालील किराणा माल व भाजीपाला आवश्यक आहेत.

| अ.नं. | मालाचा तपशिल | किलोमध्ये | अ.नं. | मालाचा तपशिल | किलोमध्ये |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | इटली रवा | ५० | १४ | मोहरी | ०१ |
| ०२ | उडीददाळ | ८० | १५ | जिरा | ०२ |
| ०३ | बेसन पीठ | १० | १६ | हळद पावडर | ०२ |
| ०४ | तुरदाळ | ३० | १७ | मिरची पावडर | ०३ |
| ०५ | रवा | ८० | १८ | धनेपावडर | ०३ |
| ०६ | पोहे | ७० | १९ | मेथी बी | ०२ |
| ०७ | वन.तुप | ३० | २० | सांबर मसाला | ०३ |
| ०८ | काजू | ०५ | २१ | गुळ | १० |
| ०९ | खिसमिस | ०५ | २२ | साखर | ४० |
| १० | शेगादांणे | १० | २३ | मीठ बारीक | ३० |
| ११ | खोबर | ३० | २४ | अखंड मिरची लाल | ०१ |
| १२ | दाळया | ३० | २५ | चिंच | १० |
| १३ | गोडतेल | ४५ | | | |

| अल्पोपहार पदार्थ बनविणेकामी लागणारा भाजीपाला | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.नं. | मालाचा तपशिल | किलोमध्ये | अ.नं. | मालाचा तपशिल | किलोमध्ये |
| ०१ | कांदा | १०० | ०७ | प्लावर | १० |
| ०२ | हिरवी मिरची | १० | ०८ | कोहळे | ०३ नग |
| ०३ | डांगर | ०५ | ०९ | कडीपत्ता | २० जुडी |
| ०४ | वांगे | २० | १० | कोथंबीर | ५० जुडी |
| ०५ | शेवगा शेंगा | १० | ११ | टोमॅटो | १५ |
| ०६ | भेंडी | १५ | | | |

**ब) सकाळचे जेवण देणेकामी- जिलेबी, सिताफळ रबडी, मटर पनीर भाजी, बटाटा चटणी, कांदा भजी, व्हेज बिरयाणी, भात, दाळ, चपाती, साधी पुरी, चटणी, पापड, लोणचे, सलाड,** इत्यादी पदार्थ द्यावयाचे आहेत. सदर पदार्थ तयार करुन देणेकामी खालील किराणा माल व भाजीपाला आवश्यक आहेत.

| अ.नं. | मालाचा तपशिल | किलोमध्ये | अ.नं. | मालाचा तपशिल | किलोमध्ये |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | मैदा | ५० | २४ | गोडतेल जमेनी | १२ डबे |
| ०२ | साखर | १०० | २५ | लिज्जत पापड | ३० |
| ०३ | दु ध(म्हशीचे) | १३०० ली. | २६ | मोहरी | ०२ |
| ०४ | सिताफळ पल | ५० | २७ | जिरा | ०३ |
| ०५ | साखर | १५० | २८ | हिंग | ०१ |
| ०६ | सिताफळ इसेन | २ बाटली | २९ | हळद पावडर | ०३ |
| ०७ | विलायची | ०१ | ३० | मिरची पावडर | ०५ |
| ०८ | काजू | ०५ | ३१ | धनेपावडर | ०५ |
| ०९ | बदाम | ०३ | ३२ | मगज बी | १० |
| १० | खवा | ५० | ३३ | काजू कनी | १० |
| ११ | पीस्ता | ०३ | ३४ | सफेद तिळ | ०७ |
| १२ | वनस्पती तुप | ५० | ३५ | खसखस | ०५ |
| १३ | विलायची | ०१ | ३६ | खोबरा किस | १० |
| १४ | केसरी रंग | ०१ | ३७ | शेगादांणे | ५० |
| १५ | खंबीर | ०५ | ३८ | ओवा | ०३ |
| १६ | केसर | १० ग्रॅम | ३९ | एव्हरेष्ठ मसाला | ०५ |
| १७ | पनीर | ६० | ४० | प्रविण चटपट मसाला | ०५ |
| १८ | ग्रिन पीस | ४० | ४१ | कच्चा मसाला | ०३ |
| १९ | हिरा बेसन | ५० | ४२ | बारीक मीठ | ५० |
| २० | तांदूळ बासमती अखंड | २०० | ४३ | कोथमिरे मसाला | ०५ |
| २१ | तुरदाळ | ५० | ४४ | अंबारी चटपट मसाला | ०५ |
| २२ | मुगदाळ | २० | ४५ | खाता सोडा | ०२ |
| २३ | गहू आटा | ३०० | ४६ | गावरान तुप | ३० |

| सकाळचे जेवणातील पदार्थ बनविणेकामी लागणारा भाजीपाला | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.नं. | मालाचा तपशिल | किलोमध्ये | अ.नं. | मालाचा तपशिल | किलोमध्ये |
| ०१ | कांदा | २०० | ०८ | गाजर | १०० |
| ०२ | लसून | १० | ०९ | सिमला मिरची | २५ |
| ०३ | आद्रक | ०५ | १० | काकडी | १०० |
| ०४ | हिरवी मिरची | ३० | ११ | बिट | २० |
| ०५ | टोमॅटो | १०० | १२ | बटाटा | २०० |
| ०६ | बिनस | ३० | १३ | कढीपत्ता | ५० जुडी |
| ०७ | प्लॉवर | ५० | १४ | कोथिंबीर | १५० जुडी |

**क) रात्रीचे जेवण देणेकामी- मोतीचूर लाडू, मिक्स भाजी, पीठले, दाळ, भात, मुगदाळ खिचडी, कढी, चपाती, पापड, चटणी, लोणचे, पापड, सलाड** इत्यादी पदार्थ द्यावयाचे आहेत. सदर पदार्थ तयार करुन देणेकामी खालील किराणा माल व भाजीपाला आवश्यक आहेत.

| अ.नं. | मालाचा तपशिल | किलोमध्ये | अ.नं. | मालाचा तपशिल | किलोमध्ये |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साखर | २०० | १७ | लिज्जत पापड | ३० |
| ०२ | हरबरा दाळ | १२५ | १८ | मोहरी | ०१ |
| ०३ | वनस्पती तुप | १२५ | १९ | जिरा | ०२ |
| ०४ | काजू | ३० | २० | हिंग | ०१ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०५ | खिसमिस | ३० | २१ | हळद पावडर | ०२ |
| ०६ | विलायची | ०१ | २२ | धनेपावडर | ०५ |
| ०७ | पीवळा रंग | ०१ | २३ | एव्हरेष्ठ मसाला | ०५ |
| ०८ | तांदूळ बासमती अंखड | २०० | २४ | प्रविण चटपट मसाला | ०५ |
| ०९ | मुगदाळ | ३० | २५ | कच्चा मसाला | ०२ |
| १० | तुरदाळ | ५० | २६ | शेगांदाणे | ५० |
| ११ | गहू आटा | ३०० | २७ | मगज बी | १० |
| १२ | दही | ९० | २८ | काजू कनी | १० |
| १३ | बेसनपीठ | २० | २९ | सफेद तिळ | ०७ |
| १४ | ग्रिन पीस | ३० | ३० | खसखस | ०५ |
| १५ | गोडतेल जमेनी | ०९ डबे | ३१ | मिठ | ५० |
| १६ | गावरान तुप | ३० | ३२ | मेथी बी | ०१ |

| **रात्रीचे जेवणातील पदार्थ बनविणेकामी लागणारा भाजीपाला** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **अ.नं.** | **मालाचा तपशिल** | **किलोमध्ये** | **अ.नं.** | **मालाचा तपशिल** | **किलोमध्ये** |
| ०१ | कांदा | ५० | ०८ | गाजर | १०० |
| ०२ | लसून | १० | ०९ | बटाटा | ५० |
| ०३ | आद्रक | ०५ | १० | काकडी | १०० |
| ०४ | हिरवी मिरची | २० | ११ | टोमॅटो | ५० |
| ०५ | वांगे | ३० | १२ | बिट | २० |
| ०६ | प्लावर | ५० | १३ | कढीपत्ता | ३० जुडी |
| ०७ | ब्रिन्स | ३० | १४ | कोंथबिर | ५० जुडी |

दि.११ डिसेंबर,२०१६ रोजी चर्चासत्रासाठी उपस्थीत राहणा-या साई मंदीराचे अधिकारी/पदाधिकारी यांची अल्पोपहार, सकाळचे जेवण व रात्रीचे जेवणाची व्यवस्था करणेकामी वरीलप्रमाणे लागणारा किराणा माल, भाजीपाला तसेच दुध(म्हशीचे) खरेदी विभागामार्फत खरेदी करुन, चर्चासत्रकामी उपस्थित मान्यवरांना जेवण बनविणेकामी प्रसादालयास पुरवठा करणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे खरेदी विभागामार्फत खरेदी करणेत येणारा किराणा माल, भाजीपाला तसेच दुध खरेदीकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ५,६९,०००/- (अक्षरी रक्कम रु.पाच लाख एकोणसत्तर हजार मात्र) चे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.स्थानिक उपसमिती सभेपुढे निर्णयास्तव सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन दि.११ डिसेंबर, २०१६ रोजी शिर्डी येथे होणाऱ्या चर्चासत्राकरीता देशविदेशातील येणाऱ्या अधिकारी/ पदाधिकारी यांचे अल्पोपहार व भोजन व्यवस्थेकामी लागणारा किराणा माल व भाजीपाला विहीत पध्दतीने खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख/ प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

३० **मा.सदस्यांच्या सुचनांबाबत.**

**आजचे स्थानिक उपसमिती सभेमध्ये विविध चर्चेच्या अनुषंगाने मा.सदस्यांनी खालीलप्रमाणे सुचना दिल्या, त्या मान्य करणेत आल्या.**

**(१)** शिर्डी येथे आयोजित करण्यात येणाऱ्या जागतीक साईमंदिर परिषदेमध्ये नाव नोंदणी करणेसाठी दिनांक १० नोव्हेंबर, २०१६ ही अंतिम तारीख ठेवण्यात आलेली होती. परंतु अद्याप बऱ्याचशा साईमंदिर विश्वस्तांची नाव नोंदणी झालेली दिसत नाही. याकरीता दिनांक २५ नोव्हेंबर, २०१६ ही नाव नोंदणीची अंतिम तारीख ठेवण्यात यावी. (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी, माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख/ सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**(२)** रु.५ लाख व त्यापेक्षा अधिक रकमेची देणगी देणाऱ्या साईभक्तांना वर्षामधुन एकवेळ त्यांचे मागणीप्रमाणे विनामुल्य आरती/ दर्शन करुन देण्यात यावे. (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**(३)** संस्थानचा प्रशासकीय खर्च भागविणेसाठी स्वतंत्र राखीव निधीची (Corpus fund) तरतुद करण्यात यावी. जेणे करुन या निधीच्या व्याजाच्या रकमेमधुन कर्मचाऱ्यांचे वेतन व इतर प्रशासकीय खर्च भागविता येईल.

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**(४)** जागतिक साईमंदिर परिषद या कार्यक्रमाचा खर्च CSR मधुन होणसाठी प्रयत्न करावे. तसेच मा.ना.गुलाबराव पाटील, सहकार राज्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांना या कार्यक्रमासाठी आमंत्रित करणेत यावे.

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी, मुख्यलेखाधिकारी, वशी-०५)

---

**(५)** सर्व समिती सदस्यांना प्रत्येक ०३ महिन्याला संस्थान लेखापरिक्षण अहवाल पुरविणेत यावा.

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**(६)** शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवण्यासाठी कायमस्वरुपी प्रदर्शनाकरीता जागा मिळणेबाबतच्या प्रस्तावास महाराष्ट्र शासनाने मंजुरी दिलेली असून त्याबाबतचा प्रस्ताव तात्काळ व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेत यावा.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**(७)** खरेदी बाबतचे प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करतेवेळेस त्यामधील वस्तु /साहित्य/ इतर कामे यांचे अंदाजीत मुल्य कशाच्या आधारे ठरविले आहे. याचा उल्लेख प्रस्तावामध्ये करणेत यावा. तसेच कोटेशन/ निविदा उघडतेवेळी संबधीत कोटेशन/ निविदाधारकांना सभेसमोर बोलविण्यात यावे.

(कार्यवाही- सर्व विभागप्रमुख)

---

**(८)** दिनांक ११ डिसेंबर, २०१६ रोजी शिर्डी येथे होणाऱ्या जागतिक साई मंदिर परिषदेच्या अनुशंगाने करावयाच्या कामाबाबतचे कोटेशन्स/ निविदा एक विशेष बाब म्हूणन संबंधीत विभागांनी मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे तसेच मा.श्री.सचिन तांबे या स्थानिक विश्वस्तांसमोर उघडून तात्काळ कामे करुन घेण्यात यावीत व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल कार्योत्तर मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा.

(कार्यवाही- सर्व विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **श्रींचे मुर्ती खरेदी करुन यु.एस.ए. येथे पाठविणेबाबत.**

**प्रस्ताव-** अ) मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले, विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी दि.०७/११/२०१६ रोजीचे पत्रान्वये असे कळविले आहे की,

"...दि.१७/११/२०१६ रोजी मिनिआपोलिस मिनेसोटा यु.एस.ए. येथे साईमिलन असर अमेरिका आहे. कृपया माझ्या पुढील पत्त्यावर २० नग मुर्ती व २० शाली व उदी पाकिटे पाठवावीत.

PRATAP BHOSALE, 1785, PLEASANT st Lauderdale MN-55113 USA

ब) त्यानसुार सदर पत्रावर मा.वरिष्ठ अधिकारी यांनी, "मंदिर विभागाने आजच तात्काळ कार्यवाही करणेत यावी" असा अभिप्राय वजा शेरा दिला आहे. त्यानुसार मंदिर विभागामार्फत दि०७/११/२०१६ रोजीचे मंजुरी नुसार श्रींचे०३ नंबर मुर्ती१६ नग व ०४ नंबर ०४ नग असे एकुण २० नग मुर्त्या मंजुर दराने खरेदी करणेस व २० शॉल व इतर साहित्य तसेच सदरहू साहित्य मा.विश्वस्त यांनी दिलेल्या ठिकाणी (यु.एस.ए. अमेरिका) येथे पाठविणेकामी येणा-या वाहतूक खर्चासाठी रु.१०,०००/- इतका ॲडव्हान्स घेतला होता.

**तसेच,** दि.०८/११/२०१६ रोजी पुनचः श्री.प्रताप सखाहारी भोसले, विश्वस्त यांनी दि.०९/११/२०१६ रोजीचे श्री.गमे साहेब यांना दुरध्वनीवरुन दिलेले सुचनेवरुन श्रींचे ०३ नंबर मुर्ती१५ नग व ०४ नंबर ०५ नग असे एकुण-२० नग मुर्ती तसेच त्याबरोबर २० शॉल व इतर साहित्य पाठविणेकामी येणा-या खर्चापोटी रु.२३०००/- इतका ॲडव्हान्स मिळणेकामी टिपणी सादर करुन घेणेत आलेला आहे.

त्यानुसार दि.०७/११/२०१६ रोजीचा ॲडव्हान्स रु.१०,०००/- व दि.०९/११/२०१६ रोजी ॲडव्हान्स रु.२३०००/- असे एकुण रक्कम रु.३३०००/- इतकी आगाऊ म्हणून घेण्यात आलेली आहे. तसेच दोन्ही वेळेस सदरील साहित्य पुणे येथे संस्थान वाहनाने पाठविणेस मान्यता मिळाली होती.

क) (१) वर नमुद केलेप्रमाणे मा.विश्वस्तांचे पत्रानुसार श्रींच्या मुर्ती खरेदीकामी खालीलप्रमाणे खर्च आलेला आहे.

| अ.क्र. | तपशील | संख्या | दर प्रती नग | एकुण रु. |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०३ नंबर मुर्ती(७.५ इंच) | ३१ | ९०/- | २७९०.०० |
| ०२ | ०४ नंबर मुर्ती(९ इंच) | ०९ | १४०/- | १२६०.०० |
| | | | **एकुण रु.** | **४०५०.००** |

(२) सदरील साहित्य यु.एस.ए. येथे पाठविणेकारीता पॅकींग व फॉरवर्डीग करणेकामी (UNIQUE AIR EXPRESS,PUNE यांचे मार्फत) दिनांक ०८/११/२०१६ रोजी रु.१५४५०/- + दि.१०/११/२०१६ रोजी (रु. १३५६०/-+५४२०/-) खर्च रु.१८९८०/- मात्र खर्च आलेला आहे, असा एकुण रु.३४४३०/- असा (०१ मुर्ती खरेदीकामी रु.४०५०/- व +०२ पॅकींग व फॉरवडींग करणेकामी ३४,४३०/-) दोन्ही मिळून रु.३८,४८०/-(अक्षरी रु.अडोतीस हजार चारशे ऐंशी मात्र) इतका खर्च आलेला आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे श्रींच्या ०३ नंबर मुर्ती ३१ नग व ०४ नंबर मुर्ती ०९ नग संस्थानचे मंजुर दराने खरेदी करणेस तसेच सदर मुर्ती व इतर साहित्य संस्थान वाहनाने पाठवुन पुणे पॅकींग करुन युएस.ए. येथे फॉरवर्डीग करणेकामी आलेल्या एकुण खर्च रु.३८,४८०/- (अक्षरी रु.अडोतीस हजार चारशे ऐंशी मात्र) मात्रचे खर्चाचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

तरी उपरोक्त प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८४५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, अधिनियमातील तरतूदीनुसार श्री सईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार व प्रसार करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्रींच्या मुर्त्या व इतर साहित्य पॅकींग करुन यु.एस.ए. येथे पाठविणेकामी आलेल्या रु.३८,४८०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **अग्निशमन केंद्र अधिकारी पदाबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** मा.उप समिती दि.०७/११/२०१६ रोजीचे सभेत विश्वस्त, मा.श्री.प्रताप भोसले साहेब यांनी फायर अॅण्ड सेफ्टी अधिकारी हे पद तातडीने भरणेचे निर्देश दिलेले आहेत. फायर अॅण्ड सेफ्टी अधिकारी या पदाबाबतची माहिती खालीलप्रमाणे-

शासनाने दि.०७/०८/२००९ रोजी मान्यता दिलेल्या आकृतीबंधातील फायर अॅण्ड सेफ्टी अधिकारी हे कंत्राटी पध्दतीने भरणेकामी मा.त्रिसदस्य समिती व मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेने दि.२१/०७/२०१४ व दि.०५/०९/२०१४ रोजी वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द करुन अर्ज मागविणेत आलेले होते. परंतु जाहीरातीत नमुद केलेली शैक्षणिक पात्रता एकाही उमेदवाराकडे नसल्याने पुढील कार्यवाही करता आलेली नाही, अशी वस्तुस्थिती आहे.

सन २०१५ मध्ये संस्थानला मिनी टेंडर व फोम टेंडर असे दोन अग्निशमन वाहने देणगी स्वरुपात मिळालेले असून ते वापरासाठी कार्यान्वीत करणेत आलेले आहेत. मंजुर आकृतीबंधात फायर अॅण्ड सेफ्टी विभागासाठी त्रोटक स्वरुपाची पदे मंजुर असल्याने सुधारीत आकृतीबंध तयार करणेकामी शासनाचे अग्निशमन सल्लागार यांचे कार्यालय, महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग, सांताक्रूझ-पूर्व, मुंबई-४०० ०९८ यांना दि.२६/११/२०१५ रोजी पत्र देऊन शासन नियमाप्रमाणे सुधारीत आकृतीबंधाची मागणी करणेत आलेली होती. त्यानुसार अग्निशमन सल्लागार यांनी जा.क्र.मअसे/२०१५/३२-एफ/१९७९ दि.३१/१२/२०१५ नुसार सुधारीत आकृतीबंधाचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

सदरचा सुधारीत आकृतीबंध मा.त्रिसदस्य समिती दि.०६/०५/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२९९ चे मान्यतेने मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/१६५७/२०१६ दि.०६ जुलै, २०१६ नुसार मान्यतेसाठी सादर करणेत आलेला असून त्यास आजअखेर मान्यता मिळालेली नाही.

शासन मान्यतेसाठी सादर केलेल्या सुधारीत आकृतीबंधात अग्निशमन केंद्र अधिकारी या पदासाठी खालीलप्रमाणे शैक्षणिक पात्रता नमुद केलेली आहे.

| अ.नं. | पदनाम व वेतनश्रेणी | सरळसेवा भरतीसाठी शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| ०१ | अग्निशिमन केंद्र अधिकारी<br>वेतनबॅ ण्ड९३००-३४८०० | **अ)** १) कोणत्याही मान्यताप्राप्त शाखेचा पदवीधर असावा.<br>२) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचा स्टेशन ऑफिसर |

| | | |
|---|---|---|
| | अधिक ग्रेड पे ४४०० | ॲण्ड इन्स्ट्रक्टर पाठयक्रम (अग्निशमन अभियांत्रिकी मधील पदविका) उत्तीर्ण असावा. किंवा<br>महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, महाराष्ट्र शासन यांचा १ वर्ष कालावधीचा उप स्थानक अधिकारी व अग्नि प्रतिबंधक अधिकारी हा पाठयक्रम पूर्ण केलेला असावा. किंवा<br>दि इन्स्टीटयुट ऑफ फायर इंजिनिअर्स (यु.के.) किंवा (इंडिया) या संस्थेकडून ग्रेड आय पदवी प्राप्त केलेली असावी.<br>३) मराठीचे ज्ञान असणे आवश्यक (लिहीणे, वाचणे व बोलणे)<br>४) एमएससीआयटी परीक्षा पास असावा.<br>ब) अनुभव – शासकीय / निमशासकीय संस्थांमधील / महानगरपालिका / नगरपालिका / विशेष नियोजन प्राधिकरणाच्या अग्निशमन सेवेतील उप अग्निशमन अधिकारी या पदावर किमान ५ वर्षे कार्य केल्याचा अनुभव असावा.<br>क) वयोमर्यादाः- १) सरळसेवेच्या उमेदवाराचे वय ४० वर्षापेक्षा जास्त असू नये. २) शासकीय / निमशासकीय अग्निशमन सेवेमध्ये कार्यरत असणा-या उमेदवारास वयाची अट लागू राहणार नाही.<br>ड) किमान शारिरीक पात्रताः-<br>१) उंची १६५ से.मी. २) छाती साधारण ८१ से.मी. फुगवून ५ सेमी जास्त.<br>३) वजन ५० कि.ग्रॅ. ४) दृष्टी – चांगली. |

**ब)** आता, मा.व्यवस्थापन समितीचे विश्वस्त, मा.श्री.प्रतापराव भोसले साहेब यांनी शासन मान्यतेसाठी पाठविलेल्या सुधारीत आकृतीबंधातील अग्निशमन केंद्र अधिकारी हे पद तातडीने भरणेकामी वर्तमान पत्रात जाहीरात देऊन तात्काळ कार्यवाही करावी असे मा.उपसमिती दि.०७/११/२०१६ रोजीचे सभेत व तसेच दि.१५/११/२०१६ रोजी सायं.५ वाजता भ्रमणध्वनीवरुन निर्देश दिलेले आहेत. तसेच सदर पदासाठी पुढीलप्रमाणे शैक्षणिक पात्रता नमूद करावी असे संस्थानचे फायर ॲण्ड सेफ्टी सल्लागार यांनी निर्देश दिलेले आहेत.

१) कुठल्याही शाखेचा पदवीधर २) राष्ट्रीय अग्निशमन महाविद्यालय, नागपूर सब ऑफिसर कोर्स ३) राज्य किंवा केंद्र शासनाचा १० ते १५ वर्ष अग्निशमन केंद्र अधिकारी या कामाचा अनुभव ४) माजी सैनिकास प्राधान्य अशी पात्रता निश्चित करणेबाबत सूचित केले आहे

**क)** शासनाने दि.०७/०८/२००९ रोजी मान्यता दिलेल्या आकृतीबंधात नव्याने पद भरतीबाबत खालीलप्रमाणे अटी-शर्ती नमुद केलेल्या आहेत.

अट-शर्त क्र.०१ - समितीने पदनिहाय सेवाप्रवेश नियम तयार करावेत व त्यास शासन मान्यता घ्यावी. तसेच सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना सेवाप्रवेश नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.

अट-शर्त क्र.०६ – समितीला आकृतीबंधाबाहेर जाऊन पद भरती करता येणार नाही.

अट-शर्त क्र.०७– समितीला कोणत्याही पदाचे पदनाम अथवा वेतनश्रेणी शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय बदलता येणार नाही.

उपरोक्त अटी-शर्ती विचारात घेता, फायर ॲण्ड सेफ्टी विभागाचे सुधारीत आकृतीबंधास शासनाची मान्यता मिळालेनंतर अग्निशमन केंद्र अधिकारी हे पद भरणे उचित राहील, असे मत आहे.

तथापि, मा.व्यवस्थापन समितीचे विश्वस्त, मा.श्री.प्रतापराव भोसले साहेब यांनी दिलेल्या निर्देशानुसार अग्निशमन केंद्र अधिकारी हे पद तातडीने भरणेकामी वर्तमान पत्रात जाहीरात देतांना यापुर्वी शासनास मान्यतेसाठी सादर केलेल्या सुधारीत आकृतीबंधात नमुद केलेली शैक्षणिक पात्रता निश्चित करावी किंवा उपरोक्त **"ब"** मध्ये नमुद केलेप्रमाणे संस्थानचे फायर ॲण्ड सेफ्टी सल्लागार यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे शैक्षणिक पात्रता निश्चित करावी, याबाबत पुढील आदेश होणेस विनंती. तसेच सदर पदाची शैक्षणिक पात्रता निश्चित झालेनंतर वर्तमान पत्रात जाहीरात देता येईल. सदरचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८४६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, यापुर्वी शासनास मान्यतेसाठी सादर केलेल्या सुधारीत आकृतीबंधात नमुद केलेली शैक्षणिक पात्रता निश्चित झालेनंतर अग्निशमन केंद्र अधिकारी पद भरणेकामी जाहिरात प्रसिध्द करणेत यावी, परंतु तोपर्यंत काही अनुचित प्रकार घडू नये याकरीता या पदास शासन मान्यता प्राप्त होईपर्यंत कंत्राटी पध्दतीने अग्निशमन केंद्र अधिकारी भरणेसाठी तात्काळ जाहिरात प्रसिध्द करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी ही पदे सरळसेवेने भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.मुंबई उच्च न्यायालयाचे दि.०४ मार्च, २०१६ चा निर्णय व मा.व्यवस्थापन समिती दि.३१/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६१५ नुसार विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी ही पदे सरळसेवेने भरणेकामी आलेल्या अर्जांवर कार्यवाही करणे, भरती प्रक्रिया राबविणे यासाठी नव्याने नियुक्त व्यवस्थापन समितीला स्वतंत्र समिती नेमता येईल काय? याबाबत जा.नं.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ २९९४/ २०१६ दि.०२/०९/२०१६ चे पत्रान्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांना कळविणेत आले होते. त्यावर शासनाने शासन पत्र क्र.सासंवि-२०१६/१४२५/प्र.क्र.१७४/का.१६ विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दि.२५ ऑक्टोबर, २०१६ अन्वये खालीलप्रमाणे कळविलेले आहे.

"प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या दि.०४/०३/२०१६ रोजीच्या आदेशानुसार संस्थान आस्थापनेवरील विधि अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी ही पदे प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीद्वारे आणि न्यायालयीन आदेशामध्ये नमूद कार्यपध्दतीचे तंतोतंत पालन करुन भरणे आवश्यक आहे," असे नमूद केले आहे.

विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी ही पदे सरळसेवेने भरणेकामी मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि०४ मार्च, २०१६ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारीत केलेला आहे.

This is as application seeking permission to fill in the posts of Law Officer, Labour Officer and Junior Labour Officer. It is submitted that, the Law Officer and Labour Officer have retired, all these three posts are sanctioned posts.

2. Mr.Talekar, learned counsel for non-applicants submits that, the Law Officer should be experienced person and the selection committee be constituted of experts.

3. The Principal District Judge shall be the Chairman of the Committee in selection process of the Law Officer, Labour Officer and Junior Labour Officer. It will be open for the Principal District Judge to take assistance of other experts, if he so desires. The qualification for all these posts should be as per Rules. The advertisement shall be published in a newspaper having wide circulation, inviting applications for the said posts. The Selection Committee shall decide about the process of selection. The efforts should be made to get the best talent.

विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी या पदासाठी आलेल्या अर्जांवर पुढील कार्यवाही करणेसाठी मा.उच्च न्यायालयाने सदरहू पदांचे निवड प्रक्रियेत मा.प्रधान जिल्हा व सत्र न्यायधीश समितीचे अध्यक्ष असतील व ते इतर तज्ज्ञ व्यक्तींची मदत घेतील, असा आदेश आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, शासनाने दि.२५ ऑक्टोबर, २०१६ रोजी दिलेल्या अभिप्रायानुसार यापुर्वी मा.उच्च न्यायालयाकडील दि.०४ मार्च, २०१६ चे निर्णयाप्रमाणे विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी ही पदे सरळसेवेने भरणेची कार्यवाही मा.प्रधान जिल्हा व सत्र न्यायशीध, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली व न्यायालयीन आदेशामध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करणेचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८४७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.२५ ऑक्टोबर, २०१६ रोजी महाराष्ट्र शासनाने दिलेल्या अभिप्रायानुसार, मा.उच्च न्यायालयाच्या दि.०४ मार्च, २०१६ रोजीचे आदेशाप्रमाणे विधी अधिकारी, कामगार अधिकारी व कनिष्ठ कामगार अधिकारी ही पदे सरळसेवेने भरणेकामी न्यायालयीन आदेशामध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार मा.प्रधान जिल्हा व सत्र न्यायधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **श्री.शैलेंद्र भारती यांना अनुप जलोटा यांचे प्रमाणेच मानधन व येणे-जाणेकामी प्रवास भाडयाची रक्कम अदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांची १०० वा पुण्यतिथी उत्सव संपूर्ण जगभर साजरा करावयाचा मानस आहे या अनुषंगाने जगभरातील सर्व साई मंदिरांचे मान्यवरांचे चर्चासत्र शिर्डी येथे दि.११ डिसेंबर २०१६ रोजी साजरे करावयाचे मा.व्यवस्थापन समितीने ठरविले आहे. चर्चासत्र दिवसभरात दोन सत्रामध्ये चालणार आहे. या चर्चासाठी आलेल्या मान्यवरांचे समोर सायंकाळी श्री साईबाबांच्याभजनी गीतांचा कार्यक्रम होणार आहे.

मा.स्थानिक उपसमितीचे दि.०७.११.२०१६ चे सभेत श्री. अनुप जलोटा (भजनसम्राट) यांचा दि.११ डिसेंबर २०१६ रोजी जागतीक साईमंदिर संमेलनात सायंकाळी भजन संध्याकार्यक्रम आयोजित करणेत यावा. यासाठी श्री. अनुप जलोटा यांना येणेजाणेकामी येणारे प्रत्यक्ष भाडे व रु.२,००,०००/- मात्र मानधन देण्यात येऊन, शिर्डी येथे त्याची निवास, भोजन, दर्शन व्यवस्था विनामुल्य करण्यात यावी. तसेच मानधनापैकी रु.१,००,०००/- मात्र रक्कम त्यांना आगाऊ देणेत यावी.

याचवेळी अशीही चर्चा करणेत आली की, जागतिक साईमंदिर संमेलनाच्या मंडपामध्ये मान्यवरांची बैठक व्यवस्था होऊन, संमेलन सुरु होईपर्यंत सकाळी ८.०० ते १०.०० या कालावधीमध्ये साईभक्त गायक श्री. शैलेंद्र भारती यांचा साईभजनसंध्या कार्यक्रम आयोजित करण्यात यावा. त्यासाठी श्री. शैलेंद्र भारती यांचेबरोबर मानधनाबाबत बोलणी करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे.

दि.२३.११.२०१६ रोजी साईभक्त गायक श्री.शैलेंद्र भारती यांचेशी दुरध्वनीवरुन चर्चा केली असता, त्यांनी रु.२,५०,०००/- मानधन व येण्याजाण्याचे भाडे, राहण्याची विनामुल्य व्यवस्था करण्यात यावी असे सांगितले. परंतु त्यांना सांगितले की श्री. अनुप जलोटा (भजनसम्राट) यांना ज्याप्रमाणे मानधन ठरले आहे. त्याप्रमाणे आपणास मानधन रु.२,००,०००/- व येण्या-जाण्याचे भाडे आदा करण्यात येईल व राहण्याची व जेवणाची व्यवस्था विनामुल्य करण्यात येईल, असे त्यांना सांगीतले असता त्यास त्यांनी सहमती दर्शविली आहे.

तरी साईभक्त गायक श्री. शैलेंद्र भारती यांना श्री. अनुप जलोटा (भजनसम्राट) यांचेप्रमाणे येणे-जाणेकामी येणारे प्रत्यक्ष भाडे व रु.२,००,०००/- मात्र मानधन अदा करणेस व शिर्डी येथे त्याची निवास, भोजन, दर्शन व्यवस्था विनामुल्य करणेस मान्यतेसाठी सादर .

**निर्णय क्र.८४८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जागतिक साईमंदिर संमेलनाच्या मंडपामध्ये मान्यवरांची बैठक व्यवस्था होऊन, संमेलन सुरु होईपर्यंत सकाळी ८.०० ते १०.०० या कालावधीमध्ये श्री.शैलेंद्र भारती यांचा साईभजनाचा कार्यक्रम आयोजित करणेत करणेस मान्यता देण्यात आली. श्री.शैलेंद्र भारती यांना एकत्रित रु.२,००,०००/- मात्र मानधन देण्यात येऊन शिर्डी येथे निवास, भोजन व दर्शन व्यवस्था विनामुल्य करणेत यावी.**

**याचवेळी अशीही चर्चा करणेत आली की, सदरहू चर्चासत्रामध्ये दुपारी स्नेहभोजनाच्या वेळेस शिर्डी येथील स्थानिक कलाकार श्री.पारस जैन यांचा साईभजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात यावा, यासाठी श्री.पारस जैन यांचे मानधनाबाबत त्यांच्याशी संपर्क करणेत येऊन चर्चा करावी, असे ठरले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **सन- २०१७ मधील संस्थानमार्फत साजऱ्या होणाऱ्या उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका छपाई करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ-१)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम-२०१४ मधील कलम १९ मध्ये 'भक्तमंडळ' या शीर्षाखाली खालीलप्रमाणे तरतूद करणेत आलेली आहे-

१) समारंभ, उत्सव, पूजा इत्यादींची शिफारस करण्यासाठी,आश्रयदाते,आजीव सदस्य,सर्वसामान्य सदस्य, सन्मान्य सदस्य, सहयोगी सदस्य आणि संस्था सदस्य (संलग्न) यांचा समावेश असलेले एक भक्त मंडळ असेल, सदस्यत्वाचा प्रत्येक प्रकारासाठी वर्गणीचा दर विनियमांव्दारे निर्धारित करुन दिल्याप्रमाणे असेल.

२) कोणत्याही व्यक्तीस, मग तिची जात,धर्म अथवा लिंग कोणतेही असेल तरी, भक्त मंडळांचे सदस्यत्व देण्यात येईल. परंतु, अशा व्यक्तीने वयाची अठरा वर्षे पुर्ण केली असली पाहिजेत व ती श्री साईबाबांचा भक्त असली पाहिजे.

३) भक्त मंडळाच्या सदस्यांचे अधिकार, विशेषाधिकार आणि कर्तव्य विनियमांव्दारे निर्धारित करुन दिल्याप्रमाणे असतील, समिती, भक्त मंडळाच्या सदस्यत्वासाठी अर्ज करणा-या अर्जदाराने पूर्ण करावयाच्या अटी व शर्ती देखील विनियमांव्दारे निर्धारित करुन देईल.

**(अ-२)** उपरोक्त परिछेद (अ-१) मध्ये नमुद केलेप्रमाणे संस्थान व्यवस्थापनाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,(शिर्डी) भक्त मंडळ विनियम,२०१३ पारित केलेले आहेत. या विनियमातील कलम (४) भक्त मंडळाच्या सभासदांचे हक्क आणि विशेषाधिकार या मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे

१) भक्त मंडळांच्या सभासदांना संस्थानच्या तीन उत्सवाचे, म्हणजे रामनवमी , गुरुपौर्णिमा आणि साईबाबांची पुण्यतिथी या उत्सवांचे निमंत्रण पाठविण्यात येईल. असे निमंत्रण डाकेने, एक्सप्रेस कुरीयरने,फॅक्स,ई-मेल व्दारा किंवा इलेक्ट्रॉनीक संपर्काच्या इतर पध्दतीने पाठविण्यात येईल.

२) वर उल्लेख केलेल्या तिन अधिकृत उत्सवानंतर प्रत्येक सभासद डाकेने 'उदी प्रसाद' प्राप्त होण्यास पात्र असेल.

३) हे विनियम लागू होण्यापूवीचे आश्रयदाते आणि आजिव सभासदांचे सर्व हक्क आणि विशेषाधिकार पुढे चालू राहतील

**(अ-३)** मा. शासनाने सन २००४ चा अधिनियम पारित करणेपूर्वी संस्थानचा कारभार मा.धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे देखरेखीत मादिवाणी न्यायालय,मुंबई यांनी टिपणी दावा क्र ३४५७/६० दि.१८/१०/१९८२ अन्वये मंजूर केलेल्यायोजनेनुसार (Scheme)चालत असे या (Scheme) मध्ये भक्तमंडळ बाबत खालील प्रमाणे तरतूद आहे

(i) Invitations to Members to attend the three utsavas of shirdi Viz Ramnavami , Guru pournima and Punyatithi of Shri Saibaba Shall be extended by Publishing the same in English and Marathi newspapers having wide circulution personal invitation shall be in the discretion of the Executive Officer to extend personal invitations to ordinary members.

(V) Every member shall be entitled to receive the 'Udiprasad' at his address by post after each of the three official festivals without payments of any charges.

उपरोक्त परिछेद अ(१)(२)(३) मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार सन २०१६ अखेर संस्थान व्यवस्थापना मार्फत साज-या करणेत आलेल्या श्री रामनवमी,श्री गुरुपौर्णिमा, श्रीपुण्यतिथी (विजयादशमी) उत्सवांच्या निमंत्रणपत्रिका व उदीप्रसाद भक्तमंडळ सभासदांना पोष्टाव्दारे पाठविणेत आलेल्या आहेत. तसेच व्यवस्थापनामार्फत देणगीदार भक्त, मा.मंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, मान्यवर अधिकारी व शिर्डी ग्रामस्थ यांना निमंत्रण पाठविण्यात येते. माहे नोव्हेंबर-२०१६ अखेर १,८०,००० इतके संस्थान भक्तमंडळाचे सभासद संख्या आहे.

सन-२०१६ मध्ये साजरा करण्यात आलेल्या तीनही उत्सवांच्या पत्रिका छपाई कामी रु.९,१८,०००/- मात्र खर्च आलेला आहे.

**प्रस्ताव-** प्रत्येक उत्सवापूर्वी निमंत्रण पत्रिका छपाईकामी दरपत्रके मागविणेस मान्यता घेऊन टिपणी सादर करणे, निमंत्रणपत्रिकेचा मसुदा मान्य करुन घेणे, छपाई (प्रेस) धारक यांचे कडून दरपत्रक मागविणे तुलनात्मक तक्ता तयार करणे, निम्नतम दरधारकास छपाई कामी कार्यादेश देणे, सर्व निमंत्रण पत्रिकांना घडया घालणे,पाकीटावर पत्ते प्रिंट करणे, पाकिटे चिटकविणे, फ्रॅंकिग करणे, पत्रिकांची राज्याच्या नावानुसार विभागणी करुन पोष्टात टाकणे इ.कामे करावे लागतात. तसेच निमंत्रण पत्रिका निमंत्रकांना वेळेत पोहच होणे आवश्यक आहे. या भक्तमंडळाचे सभासद संपुर्ण देशविदेशात आहेत. या मध्ये कर्नाटक, आंध्रप्रदेश, तामिळनाडू या राज्यात हजारो सभासद संख्या आहेत.

संस्थान मार्फत छपाई करण्यात येणा-या पत्रिका हया आर्ट पेपरवर (90 GSM) या कागदाच्या प्रकारावर छपाई करणेत येतात.

उपरोक्त परिछेदांत विवेचन केल्यानुसार, सन-२०१७ मध्ये साज-या होणा-या तीनही उत्सवांसाठी पत्रिका छपाई करुन घेणेसाठी अंदाजे रु.१२ लाख मात्र इतका खर्च येईल.

सन-२०१७ साठी पत्रिका छपाई करणेसाठी काढण्यात येणा-या निविदा दरपत्रकांमध्ये पुढील बाबी विचारात घेता येतील. या मध्ये पत्रिका, पाकीट छपाई करणे,पत्रिकेची घडी घालून पत्रिका पाकीटात भरुन देणे.

पाकीटांना गमटेप वापरणे. या मुद्दयांचा समावेश करता येईल यामुळे आमंत्रितांना वेळेत पत्रिका पोहच होण्यास मदत होईल व वेळ वाचेल असे नम्र मत आहे.

तरी सन-२०१७ मधील संस्थान मार्फत साज-या करण्यात येणा-या तीनही उत्सवासाठी पत्रिका व पाकीटे छपाई करणेसाठी वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन,विहीत पध्दतीने ई-निविदा अंतिम निर्णय घेणेकामी, तसेच याकामी रक्कम रु.१२,००,०००/- (रु.बारा लाख) मात्रचे खर्चास मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.८४९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन- २०१७ मध्ये संस्थानमार्फत साजरे करण्यात येणाऱ्या तीनही उत्सवांसाठी आवश्यक असलेल्या निमंत्रण पत्रिका व त्यासाठीची पाकीटे छपाई करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७** **लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचेमार्फत पुरविणेत येणाऱ्या कंत्राटी अकुशल, कुशल व सुरक्षा कामगारांचे माहे जानेवारी, २०१६ ते माहे ऑक्टोबर, २०१६ या कालावधीतील गैरहजेरीबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान विविध विभागांना मे. मॉडर्न व्ही. आर. सिक्युरीटी फोर्स (इंडिया)प्रा. लि., पुणे ,मे जयभवानी एंटरप्रायजेस, प्रा. लि. पुणे यांचेमार्फत कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार व संरक्षण विभागास कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेत येत आहे सदर लेबर व सिक्युरीटी एजन्सीमार्फत संस्थानचे मागणी व आवश्यकतेप्रमाणे पुरविणेत येणाऱ्या कंत्राटी अकुशल , कुशल कामगार व कंत्राटी सुरक्षा कर्मचारी यांची हजेरी पत्रकाप्रमाणे पटसंख्या तसेच कंत्राटी अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचारी यांचे माहे जानेवारी-२०१६ ते माहे. ऑक्टोंबर-२०१६ या कालावधीतील गैरहजर दिवसांची टक्केवारी बाबत तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. नं | लेबर व सुरक्षा एजन्सीचे नांव | माहे- ऑक्टोंबर-२०१६ या महिन्यातील कंत्राटी | माहे-जानेवारी -२०१६ ते माहे-ऑक्टोंबर -२०१६ या कालावधीतील गैरहजर असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांची टक्केवारी निहाय संख्या | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ३१ ते ४० % | ४१ ते ५० % | ५१ ते ६० % | ६१ ते ७० % | ७१ ते ८० % | ८१ ते ९० % | ९१ ते १०० % | एकुण |
| १ | **मे.मॉडर्न व्ही.आर. सिक्युरिटी फोर्स लि. पुणे (लेबर कॉन्ट्रॅक्टर)** (संस्थानचे सर्व संबधीत विभाग) | ८३१ | ३३ | १७ | १६ | ८ | ३ | ३ | ०० | ८० |
| २ | **मे.जय भवानी एन्टरप्रायजेस,लि. पुणे (लेबर कॉन्ट्रॅक्टर)** (शै.संकुल, रुग्णालये, निवासस्थाने) | ९१३ | ४५ | २७ | १५ | १० | ६ | ५ | १५ | **१२३** |
| ३ | **मे.मॉडर्न व्ही.आर. सिक्युरिटी फोर्स लि.,पुणे (सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर)** (रुग्णालय, व्दारावती, भक्तनिवासस्थान, मंदिर प्रवेशव्दार ) | ४२१ | २७ | १५ | ५ | ३ | १ | ०० | ०० | **५१** |
| ४ | **मे.जय भवानी एन्टरप्रायजेस,लि. पुणे (सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर)** (वाहन विभाग, श्री साईबाबा भक्तनिवास्थान, श्री साई धर्मशाळा) | ४४४ | १३ | १२ | ९ | ६ | ३ | ०० | ०० | **४३** |
| | **एकूण** | **२६०९** | **११८** | **७१** | **४५** | **२७** | **१३** | **८** | **१५** | **२९७** |
| | | | ११८ | १८९ | २३४ | २६१ | २७४ | २८२ | | |

कंत्राटी अकुशल, कुशल व सुरक्षा कर्मचाऱ्यांचे माहे जानेवारी -२०१६ ते माहे ऑक्टांबर- २०१६ या कालावधीत गैरहजर दिवसांची टक्केवारीचे प्रमाण बघितले असता, त्यापैकी सदर कालावधीत ३१% व त्यापेक्षा जास्त दिवस गैरहजर राहिलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना कामावरुन बंद करावयाचे झाल्यास, सदर कंत्राटी कर्मचा-यांची एकुण संख्या २९७ इतकी येते.

उपरोक्त प्रमाणे मे. मॉडर्न व्ही. आर. सिक्युरीटी फोर्स लि. पुणे यांचेकडील ८३१ कंत्राटी अकुशल, कुशल कर्मचा-यांपैकी ८० व मे. जय भवानी एन्टरप्रायजेस, पुणे यांचेकडील ९१३ कंत्राटी अकुशल, कुशल कर्मचा-यांपैकी १२३ कंत्राटी कर्मचारी माहे जानेवारी-२०१६ ते माहे- ऑक्टोंबर-२०१६ या कालावधीत ३१% किंवा त्यापेक्षा जास्त दिवस कामावरुन गैरहजर/अनुपस्थित राहिले आहेत. त्याचप्रमाणे मे. मॉडर्न व्ही. आर. सिक्युरीटी फोर्स लि. पुणे सिक्युरीटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचेकडील ४२१ कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांपैकी ५१ व मे. जय भवानी एन्टरप्रायचेस, पुणे सिक्युरीटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचेकडील ४४४ कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांपैकी ४३ कंत्राटी सुरक्षा कर्मचारी माहे जानेवारी-२०१६ ते माहे- ऑक्टोंबर-२०१६ या कालावधीत ३१% किंवा त्यापेक्षा जास्त दिवस कामावरुन गैरहजर / अनुपस्थित राहीले आहेत.

सबब, उपरोक्त प्रमाणे लेबर कॅान्ट्रॅक्टर यांचेकडील २०३ अकुशल, कुशल कंत्राटी कामगार व सिक्युरिटी कॉन्टॅक्टर यांचेकडील ९४ कंत्राटी सुरक्षा सुरक्षा कर्मचारीअसे एकुण -२९७ कंत्राटी अकुशल व सुरक्षा कर्मचारी माहे जानेवारी-२०१६ ते माहे ऑक्टोंबर-२०१६ या कालावधीत ३१% किंवा त्यापेक्षा जास्त दिवस कामावरुन गैरहजर/ अनुउपस्थित राहिले आहेत. उपरोक्त कंत्राटी कर्मचारी यापुर्वी देखील अनेक वेळा कामावरुन गैरहजर/ अनुपस्थित राहीले आहेत. त्यांना कामावर घेऊन वेळोवेळी सुधारणेची संधी देऊन देखील त्यांचे वर्तनात सुधारणा होत नाही. तरी उपरोक्त तक्त्यात माहे जानेवारी- २०१६ ते माहे. ऑक्टोंबर- २०१६ या कालावधीत ३१% व त्यापेक्षा जास्त दिवस कामावरुन गैरहजर/ अनुपस्थित राहिलेल्या एकूण २९७ कंत्राटी अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचाऱ्यांना ठेकेदारामार्फत कामावरुन कायम स्वरुपी बंद (कमी) करणेस व तसे संबंधीत लेबर व सिक्युरीटी कॉन्ट्रॅक्टर यांना तोंडी कळविणेबाबत उपरोक्त प्रस्तावर निर्णय होणेस विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचेमार्फत पुरविणेत येणारे अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचारी कोणतीही पुर्वसुचना न देता गैरहजर राहतात व त्यामुळे संस्थानच्या दैनंदिन कामकाजामध्ये अडचण निर्माण होते, याकरीता आजारी किंवा गंभीर कारणाने गैरहजर राहिलेले कंत्राटी कर्मचारी वगळता माहे जानेवारी- २०१६ ते माहे ऑक्टोंबर- २०१६ या कालावधीत ३१% व त्यापेक्षा जास्त दिवस/ वारंवार गैरहजर/ अनुपस्थित असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना त्वरीत कामावरुन कमी करणेबाबत संबंधीत ठेकेदारास कळविणेत यावे. तसेच संस्थान कामाची गैरसोय होऊ नये याकरीता नवीन पात्र कंत्राटी कर्मचारी कामावर घेण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८** **श्री.मोहन एकनाथ उपासनी, (बडतर्फ) वरीष्ठ लिपीक, यांनी कामावर पुर्ववत हजर करुन घेऊन दया दाखविणेबाबत दिलेले पत्र.**

**प्रस्ताव-** श्री.मोहन एकनाथ उपासनी, वरिष्ठ लिपीक, प्रशासन शाखा, हे दि.१४-०६-१९८९ पासून संस्थान सेवेत कार्यरत होते. श्री.उपासनी हे दि.१३-११-२००७, रोजी सकाळी ७.३० वाजेपासून कॅश काऊंटींग हॉल येथे कॅश काऊंटींगसाठी हजर होते. सदर दिवशी सकाळी ८.४५ वाजेच्या दरम्यान श्री. उपासणी हे बाथरुमचे कारणांसाठी कॅश काऊंटींग हॉल मधून बाहेर जात असतांना तेथील सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्यांची तपासणी केली. त्यावेळी श्री.उपासणी यांचे रुमालातुन प्रथम एक हजाराची एक नोट व रुमाल झटकल्यानंतर एक हजार रुपायाच्या १९ नोटा खाली पडल्या. सदर रुपये एक हजाराच्या २० नोटांचा रितसर पंचनामा करुन, शिरडी पोलीस स्टेशन, शिरडी येथे श्री. उपासणी यांचे विरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली होती. सदर गैरशिस्त वर्तनाबाबत श्री. उपासणी यांना दि.१३-११-२००७ रोजीचे आदेशान्वये खातेचौकशीकामी सेवा निलंबीत करण्यात येऊन, त्यांना जा.नं. एसएसएसए/वशी-७ए/३४२१/२००७ दि.२०-१२-२००७ अन्वये आरोपपत्र देण्यात आले होते. सदर आरोप पत्राची खातेनिहाय चौकशी ॲडव्होकेट श्री.बी.वाय. काळवाघे चौकशी अधिकारी यांनी पुर्ण करुन, त्यांचा दि.११-०५-२००९ रोजीचा खाते चौकशी निष्कर्ष अहवाल संसथानला सादर केला होता. त्यात श्री. उपरसणी यांच्या विरुध्द ठेवण्यात आलेल्या आरोप पत्रातील आरोप खाते चौकशीत सिद्ध झाले असून श्री.उपासणी हे दोषी आहेत असा चौकशी अधिकारी यांनी निष्कर्ष काढला होता. म्हणून सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे दि.१७-०५-२००९ रोजीचे सभेमध्ये सादर करणेत आला होता. सदर सभेतील निर्णय क्र. ४६५ नुसार श्री.उपासणी यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१६१६/२००९ दि.१८-०५-२००९ अन्वये संस्थान सेवेतून बडतर्फ (Dismiss) का करण्यात येऊ नये? अशी सेकंड शोकॉज नोटीस बजावण्यात आली होती.

उपरोक्त सेकंड शोकॉज नोटिसी संदर्भात श्रीउपासणी यांनी संस्थान विरुद्ध मा.कामगार न्यायालय, अहमदनगर येथे तक्रार (यु.एल.पी.) क्र.३०/२००९ ही कोर्ट केस दाखल केली आहे. मा. कामगार न्यायालय, अहमदनगर यांनी निशाणी-२ मनाई हुकूमाचे अर्जावर सुनावणी घेवून उभयपक्षांचे म्हणने विचारात घेऊन, दि.३०-१२-२००९ रोजी आदेश देवून श्रीउपासणी यांचा मनाई हुकमाचा अर्ज डिसमिस करुन निकाली काढला आहे त्यानंतर श्री उपासनी यांना जानं.एसएसएस/वशी-७ए/४६२८/२००९ दि.३१-१२-२००९ रोजीचे आदेशान्वये संस्थान सेवेतून दि०१-०१-२०१० पासून कायम स्वरुपी बडतर्फ (डिसमिस) करणेत आलेले आहे.

मा.२ रे कामगार न्यायालय, अहमदनगर यांनी तक्रार(यु.एल.पी.) क्र.३०/२००९ मध्ये विभागीय चौकशी निष्कर्षा संदर्भात दि.१२-०४-२०१२ रोजी प्राथमिक मुद्दयावर आदेश देवून" तक्रारदार श्री. उपासनी, यांचेसदर्भांत केलेली खाते चौकशी कायदेशीर, योग्य व नैसर्गिक न्यायतत्वानुसार झाल्याचे जाहीर केले आहे." मा.कामगार न्यायालयाने तक्रार(यु.एल.पी.) क्र.३०/२००९ मधील खाते चौकशी संदर्भातील प्राथमिक मुद्दयावर दि.१२-०४-२०१२ रोजी दिलेला आदेश बेकायदेशीर ठरवून रद्द व्हावा तसेच तक्रारदाराबाबतची चौकशी बेकायदेशीर, अयोग्य, नैसर्गिक न्यायाविरुद्ध असल्याचे जाहीर करुन मिळावे. या मागणीसाठी श्री.उपासणी यांनी संस्थान विरुद्ध मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर येथे दि.३०-०४-२०१२ रोजी रिव्हीजन (यु.एल.पी.) क्र.११७/२०१२ चा अर्ज दाखल केला होता. तथापि, सदरचा रिव्हीजन अर्ज मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर यांनी दि.३०-०४-२०१२ रोजी मेंन्टेनेबल नसल्यामुळे तो रजिस्टर्ड करुन घेतला नाही. म्हणून श्री.उपासनी यांनी संस्थान विरुद्ध मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्रमांक ४६९३/ २०१२ ही कोर्ट केस दि.०९-०५-२०१४ रोजी दाखल केली होती. या रिट पिटीशन निकाली काढण्यात आली असून केस विचारार्थ लेबर कोर्टामध्ये वर्ग करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे श्री. उपासनी यांनी तक्रार (यु.एल.पी) क्र.३०/२००९ मध्ये मा.कामगार न्यायालय, अहमदनगर येथे दि.२६-०४-२०१२ रोजीचा निशाणी क्र.यु-३६ चा अर्ज दाखल केला होता. सदरचा दुरुस्ती अर्ज मा.कामगार न्यायालय, अहमदनगर यांनी दि.०७-०६-२०१२ रोजी आदेश देवून रद्द करुन निकाली काढला आहे. सदर आदेशा संदर्भांत श्री.उपासनी यांनी संस्थान विरुद्ध मा.औद्योगिक, न्यायालाय , अहमदनगर येथे रिव्हीजन (यु.एल.पी.) क्र.५८/२०१२ दाखल केले होते त्यावर मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर यांनी दि.११-०७-२०१२ रोजी आदेश देवून रिव्हीजन, ॲप्लिकेशन डिसमीस केलेले आहे. त्या संदर्भांत श्री.उपासनी यांनी संस्थान विरुद्ध मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यंथे रिट पिटीशन क्रंमाक६५९१/२०१२ ही कोर्ट केस दाखल केली होती. सदर रिट पिटीशन मध्ये मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि२९-०९-२०१५ रोजी खालीलप्रमाणे निकाल दिलेला आहे.

A. This petition is partly allowed
B. The impugned order dated 7.6.2012, passed by the Labour Court below Exhibit U-36 and the judgment of the Industrial Court dated 11.7.2012, delivered in Revision (ULP) No.58/2012, on account of being perverse, are quashed and set aside.
C. Application Exhibit U-36 stands allowed.
D. The petitioner shall carry out the amendment within four weeks from today.
E. The respondent is at liberty to file on additional written statement so as to confront the contentions set out in the amended complaint.
F. The issue Nos.1 and 2, already decided by the labour Court by its Part 1 judgment shall preclude the petitioner from seeking reopening of the said two issues. In short, the petitioner shall prosecute his complaint to the remaining issues with regard to the proportionality of the punishment.
G. In the event the petitioner succeeds before the Labour Court or any superior Court, he shall be deprived of all service benefits incidental and consequential thereto for the period 1.1.2000 till 26.4.2012, save and except continuity of service.

यानुसार सदरची केस लेबर कोर्टामध्ये वर्ग करण्यात आली आहे.

**सध्या श्री.उपासनी यांनी संस्थान विरुद्ध दाखल केलेली तक्रार (यु.एल.पी.) क्र. ३०/ २००९ ही कोर्ट केस मा.कामगार न्यायालय, अहमदनगर, येथे न्यायप्रविष्ठ असून, प्रलंबीत आहे.**

आता उपरोक्त संदर्भिय क्र.१ चे पत्रान्वये श्री उपासनी यांनी "मी, मोहन एकनाथ उपासनी, वरिष्ठ लिपीक (सेवानिलंबित) विनंती पुर्वक अर्ज करतो की, मी साईबाबा संस्थानमध्ये १४ जून १९८९ पासून लिपीक व सदनंतर बढतीने वरिष्ठ लिपीक पदावर काम करीत आहे. मी संस्थानच्या मंदिर, साईनाथ रुग्णालय, नंतर साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, पगार बील विभाग इ. विभागात नोव्हेंबर २००७ पर्यंत कोणत्याही प्रकारची गैरवर्तणुक न करता काम केले आहे. माझी पर्सनल फाईल व सेवापुस्तक निष्कलंक आहे. दि.१३.११.२००७ चे कथित गैरवर्तनाबद्दल मला संस्थानने निलंबित केले, व माझ्यावर फौजदारी दाखल केली. मला औद्योगिक न्यायालयाने कामावर हजर करुन घेण्याचे आदेश केले, स्टे ऑर्डर दिली तथापी संस्थानने मला हजर करुन घेतले नाही, माझ्यावर सुडभावनेने, पुर्वग्रहदुषित मनात भाव ठेवून कोर्टाचे आदेशाची(कोर्टात केस पेंडीग असतांनाही) १.१.२०१० पासून ते आजतागायत वेतन न अदा केल्यामुळे माझ्यावर उपासमारीची वेळ आली आहे. १.१.२०१० पगार न देऊन मला झालेली शिक्षा ही खूप मोठी शिक्षा असुन मला त्यात माफी करावी. माझ्याप्रमाणे सन २००९ मध्ये संस्थानचे सेम कलम २२ डी, व २२ एल. लागू केलेल्या गैरवर्तन केलेल्या रामदास शंकर सोनवणे यांना मात्र संस्थानने पोलीस केस न करता, खाते चौकशीत तेही दोषी असतांना त्यांना पुन्हा कामावर हजर करुन घेतले. माझ्याबाबत मात्र भेदभाव पुर्ण, पुर्वग्रह दुषित दृष्टीकोन ठेवून अन्याय करण्यात आला आहे. मी लेबर व इंडस्ट्रियल कोर्टात दाखल केलेली संस्थान विरोधात केस केली. मला संस्थानच्या विरोधात कोणत्याही न्यायालयात जावायचे नाही. मला नोकरी शिवाय घर चालविणेचे दुसरे साधन नाही मुले शिकत असून त्यांचे पालनपोषणाची जबाबदारी माझ्यावर आहे. त्यांचे भविष्य अंधारमय होईल. मी विनंती पुर्वक सांगू इच्छितो की, मला मागील देय असलेले (बॅक वेजेस) दिले नाही तरी मला ते मान्य आहे. माझी नेमणुक मात्र सध्या मी वरीष्ठ लिपीक पदावर असल्यामुळे त्याच पदावर करण्यात यावी ही नम्र विनंती आहे. संस्थान विरुद्ध दाखल केलेली केस मी विनाविलंब मागे घेण्यास तयार आहे. मात्र मला श्री साईबाबा संस्थानमध्ये पुर्ववत कामावर हजर करुन घेऊन श्री साईं ची सेवा करण्याची संधी देण्यात यावी.

आपण दयावंत होऊन माझ्या अर्जाचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन माझी सन१९८९ पासूनची आजपर्यंत झालेली प्रामाणिक व निष्कलंक सेवा विचारात घेऊन माझे कुटूंब उध्वस्त होण्यापासून वाचवावे ही अतिशय कळकळीची नम्र विनंती आहे. आपण मला एकवेळ पदरात घेऊन माफ करावे अशी मी दयायाचना करीत आहे." असे म्हटलेले आहे.

श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिरडी यांनी त्यांचे संदर्भिय क्र.२ जा.नं.२३ दि.०१-०९-२०१६ रोजीचे पत्रान्वये संस्थानमधील बडतर्फ कर्मचारी श्री. मोहन एकनाथ उपासनी यांचे तात्पुरते निलंबन रद्द करुन पुर्ववत कामावर घेणेबाबत पत्र दिले आहे त्यात त्यांनी " वरील विषयास अनुसरुन आपणास विनंती करण्यात येते की, श्री मोहन एकनाथ उपासनी, वरिष्ठ लिपीक, प्रशासन शाखा पगारबील सेक्शन (सध्या तात्पुरते निलंबित) हे संस्थान सेवेत जुन १९८९ पासुन अतिशय प्रमाणिकपणे नम्रपणे संस्थानच्या विविध विभागात ( मंदिर, श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईबाबा इंग्लिश मे.स्कुल ) या विभागात जबाबदारीने व प्रामाणिक पणे काम केलेले असून ते प्रशासन शाखेकडे पगारबिल विभागात पगारपत्रक बनविण्याचे काम ते करीत होते. दि.१३/११/२०१६ रोजी संस्थानचे कॅश काऊंटिंगचे सकाळी साधारणतः ८.४५ चे वाजता दुदैवाने म्हणा किंवा त्यांच्या प्राब्धाचा भोग त्यांचेकडून संभ्रमित अवस्थेत, भांबावलेल्या मनःस्थितीत त्यांच्या हातून कळत नकळत चुक घडून त्यांचेवर कॅश काऊंटींगमधील पैसे घेतल्याचा आरोप झाला असुन त्यांना त्यावेळी तात्पुरते सेवानिलंबीत करुन त्यांची खातेचौकशी सुरु करण्यात आली होती. श्री उपासनी यांचे आस्थम्याचा/दम्याचा त्रास व पर्यायाने होणा-या सर्दीचा त्रास होत असल्याने त्यांना सिपला कं.नी चे इनहेलर २४ तास वापरावे लागते. कॅश काऊंटीग हॉल तळघरात असुन तेथे मोकळी खेळती हवा नसल्याने एक ते दिड तासाने श्वास घेण्यास अडचण त्यांना जाणवू लागल्याने त्यांनी कॅशकाऊंटींग हॉल मध्ये पाणि पिण्यासाठी ते गेले व त्यांना बाथरुमला जाणे असल्याने व सर्दीचा त्रास असल्याने कॅश काऊंटीग हॉलमधीलच खाली पडलेला रुमाल घेवून हात नाक पुसत ते बाहेर आले रुमाल हातात तसाच राहिला. तथापी डयुटीवरील वॉचमन यांनी चेकींग केल्यानंतर ते बाहेर जाणेसाठी वरील चारपाच पाय-या चढून वर आले नंतर रुमालात पैसे असावे हे नंतर त्यांचे लक्षात आले. श्री उपासनी यांचा चोरी करण्याचा कोणताही उद्देश नसुन त्यांचे हातुन कळत नकळत चुक झाली त्यांचा संस्थान सेवेचा विचार करता आपण त्यांना माफ करुन त्यांना पुर्ववत संस्थान सेवेत घेऊन तात्पुरते सेवानिलंबन आदेश रद्द करावे ही आपणास नम्र विनंती आहे. श्री उपासनी यांना कोणतेही चरितार्थाचे साधन नसुन त्यांचेवर अवलंबुन त्यांचे कुटूंबावर आर्थिक, मानसिक सामाजिक मोठया संकटातुन ते आज पर्यंत चालत आले श्री मोहन उपासनी यांचे चुकीची त्यांना माफी देऊन संस्थान सेवेत पुर्ववत कामावर घेण्यात यावे. अशी आपणास नम्र विनंती करीत आहेत. " असे म्हटले आहे.

तसेच श्री उपासनी यांचे संदर्भिय क्र ३ चे विनंती पत्रावर मा. विश्वस्त, सौ.अनिताताई जगताप, नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांची स्वाक्षरी असून सदर पत्रावर मा.कार्यकारी अधिकारी यांनी " सदर विषय व्य. मं. पुढे चर्चेस ठेवण्यात यावा " असा अभिप्राय लिहीलेला आहे.

तसेच श्री उपासनी यांचे संदर्भिय क्र ४ चे विनंती पत्रावर मा. विश्वस्त, श्री. सचिन तांबे यांनी सदर पत्रावर मा.कार्यकारी अधिकारी यांनी " सदर विषय व्य. मं. पुढे चर्चेस ठेवणे " असा अभिप्राय लिहीलेला आहे.
श्री. उपासनी यांना पुर्ववत कामावर रुजू करुन घेणेबाबत यापुर्वी तीन वेळेस खालीलप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

1. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७-०८-२०१० रोजी झालेल्या सभेत सादर करणेत आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होवून, निर्णय क्र.६५४ अन्वये "श्री.मोहन एकनाथ उपासनी यांनी आर्थिक गैरव्यवहार केला असल्याने त्यांचे बडतर्फीबाबत फेरविचार करणेत येऊ नये" असा निर्णय पारीत झालेला आहे.
2. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४-०९-२०११ रोजीचे सभेमध्ये विषय नं. ५८ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आला होता. "त्यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.मोहन एकनाथ उपासनी यांनी कॅश काऊंटीगमधील पैसे चोरुन आर्थिक गैरव्यवहार केला असल्याने त्यांचे बडतर्फीबाबत फेरविचार करणेत येऊ नये. तसेच श्री उपासनी यांचेबाबत प्रस्ताव ०२ वेळा मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवणेत आलेला असून समितीने तो अमान्य केलेला असल्यामुळे श्री.उपासनी यांचेबाबत कोणीही शिफारस केली तरी पुन्हा फेर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करण्यात येऊ नये, असे ठरले." असा निर्णय, निर्णय क्र. ७३१ अन्वये पारित झालेला आहे.
3. मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२-०६-२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र.४८९ अन्वये "श्री.मोहन एकनाथ उपासनी, बडतर्फ वरिष्ठ लिपीक, प्रशासन शाखा यांना पुर्ववत कामावर घेणेबाबतचा प्रस्ताव अमान्य करणेत आला, तसेच अशाप्रकारे पुर्वी अमान्य झालेले व सदर प्रस्ताव यापुढे सभेसमोर सादर करणेत येऊ नये" असा निर्णय पारित झालेला आहे.

श्री मोहन एकनाथ उपसनी, बडतर्फ वरिष्ठ लिपीक, प्रशासन शाखा यांचेविरुद्ध सदर प्रकरणाबाबत दाखल केलेल्या नियमित फौजदारी प्रकरण क्रमांक ८९/२००८ वर मा.न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, राहता यांच्या न्यायालयाने दि.३०-०७-२०१६ रोजी निकाल दिला असून त्यानुसार आरोपीने, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे नोकरीस असतांना दि.१३-११-२००७ रोजी सकाळी ८.४५ वाजता अगर त्या सुमारास श्री.साईबाबा समाधी मंदिर परिसरात दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणी करत असतांना अप्रमाणिकपणे २०,०००/- रुपये घेऊन जाण्याच्या उद्देशाने तशी ती घेता यावी, यासाठी स्थानभ्रष्ट करुन चोरी केल्याचे, अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे. त्यावर मा.न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, राहाता यांनी दि.३०-०७-२०१५ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिला आहे.

आदेश

1. **आरोपीस भारतीय दंड संहितेच्या कलम ३८१ अन्वये दंडनीय अपराधाकरीता फौजदारी व्यवहार संहितेच्या कलम २४८(२) अन्वये दोषी ठरविण्यात येते आणि त्यासाठी त्यांनी तीन महिने साधा कारावास आणि एक हजार रुपये दंड सोसावा, दंड न भरल्यास आरोपीने दहा दिवस साधा कारावास सोसावा.**
2. आरोपीने त्याचे स्वबंधपत्र आणि जामीनपत्र स्वाधीन करावे.
3. अपिल करण्याच्या अवधीनंतर, जप्त मुद्देमाल रुमाल (आर्टिकल 'ब') नष्ट करण्यात यावा आणि जप्त केलेली रक्कम ही श्री.साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडेच राहिल.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** सबब, श्री.मोहन एकनाथ उपासनी, बडतर्फ वरिष्ठ लिपीक, प्रशासन शाखा यांनी संस्थानचे दक्षिणा पेटी माजणीचे वेळी चोरी केल्याचे सिद्ध झाल्याने त्यांना तिन महिने कारावास व एक हजार रुपये दंडाची शिक्षा झालेली आहे. तसेच श्री.उपासनी यांना कामावर हजर करुन घेणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीने तीन वेळा अमान्य केला असून याबाबत पुन्हा फेर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करण्यात येऊ नये असा निर्णय झालेला आहे.

तरी श्री.मोहन उपासनी यांचा संस्थानमध्ये कामावर पुर्ववत हजर करुन घेवून दया दाखविणेबाबत दि.१६-०८-२०१६ रोजीचा अर्ज व श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, यांचे दि.०१-०९-२०१६ रोजीचे पत्र याचा सहानुभूतीपुर्वक विचार करुन उपासनींचे पत्रावर दिलेल्याअभिप्रायानुसार सदर प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय तूर्त स्थगित ठेवण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०९** **खाते चौकशी अधिकारी श्री.जे.एल. देशपांडे सो. पुणे यांचे मानधनाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.जे एल. देशपांडे सो. निवृत्त जिल्हा न्यायाधिश, पुणे यांनी संदर्भीय अर्ज इकडील कार्यालयास सादर केलेला आहे. त्यात त्यांनी "श्री संस्थानचे कार्यकारी मंडळाचे ठरावाप्रमाणे आमची डॉ.बजाज व डॉ. वर्मा यांच्या वरील दोषारोपांसंबंधात चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक झाली असुन चौकशीचे कामकाज चालु असुन व्यसस्थापनाचा पुरावा नोंदविणेचे भाग पूर्ण झाले असुन आरोपीत वैद्यकिय अधिकाऱ्यांचा पुरावा नोंदणे बाकी आहे. दरम्यान कार्यकारी मंडळाचे ठरावाप्रमाणे आम्हाला मानधन रु.७५००/- व प्रवासभत्ता व अनुषंगीक खर्च रु.५०००/- अदा करण्यात येतो. चौकशी दरम्यान आम्हाला दि.१४.०८.२०१६ रोजीचे बैटकी पर्यंत त्यानंतरचे चौकशीकामी झालेल्या बैठकीचे मानधन अथवा प्रवासभत्ता अदा करणेत आला नाही.

वरील संदर्भीय आपले पत्र दि.१७.०९.२०१६ रोजीचे आज आम्हाला प्राप्त झाले, त्यामध्ये मानधन रु.१२५००/- असे नमुद केलेले आहे परंतु ठरावाप्रमाणे रु.७५००/- मानधन असुन रु.५०००/- प्रवासभत्ता व अनुषंगीक खर्च याबाबत आहे

अरोपीत वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांचे पुराव्याच्या कामी आजच ४० साक्षीदारांची यादी दाखल केली आहे. त्यानंतर दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐकण्यात येईल व चौकशी अहवाल तयार करण्यात येईल चौकशी कामी १००० पेक्षा जास्त कागदपत्र दाखल करण्यात आले आहे. तसेच साक्षीदारांचे टंखलिखीत जबाब जवळपास १५० पृष्ठांचे आहे. यावरुन दहा तारखेच्या मर्यादेमध्ये चौकशी पूर्ण होणे दुरापास्तदिसते. तरी देखील कालमर्यादा घालण्याचे कार्यकारी मंडळाने ठरविले असल्यास हि मर्यादा आम्हाला पत्र मिळालेपासुन समजण्यात यावी व त्यातही प्रवाभत्ता अनुदान रु.५०००/- यावर मर्यादा नसावी व ठरावाप्रमाणे ती मर्यादा चौकशी अहवाल सादर करेपर्यंत कायम करावी. अन्यथा आमची आर्थिक कुचंबणा होऊन अन्याय होईल." असे नमूद केले आहे.

डॉ.हरिष हुकूमचंद बजाज व डॉ गौरव सरदारीलाल वर्मा हे संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये ह्रदयरोगतज्ञ या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी कॅथलॅबमध्ये पेशंटसाठी वापरण्यात येणारे स्टेंट, बलून व इतर साहित्याचा वापर करणेकरीता बेकायदेशिररित्या विविध कंपन्यांकडून पैसे घेतलेले आहेत. तसेच रुग्णांच्या प्रोसिजर्स व औषधोपचारामध्ये अनियमितता, निष्काळजीपणा केलेला आहे. अशा व इतर अनेक तक्रारी आलेल्या असल्याने याबाबत खाते चौकशी करणेकामी खाते चौकशी अधिकारी नेमणेबाबत दि. ०५.०५.२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर विषय सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र-१४८ खालील प्रमाणे झाला आहे. "चौकशी अधिकारी यांना खातेनिहाय चौकशीच्या प्रत्येक तारखेस रक्कम रु.५,०००/- मात्र प्रवास भत्ता व आहार भत्ता तसेच इतर खर्च म्हणून देण्यात यावेत, चौकशी अधिकारी यांना सदरहु चौकशी लवकारात लवकर पूर्ण करावी अशी विनंती करण्यात यावी व मानधनापोटी प्रत्येक तारखेस रक्कम रु ७,५००/- मात्र देण्यात यावेत. परंतू पुढे असे ठरले की, त्याना मानधनापोटी जास्तीत जास्त २० तारखांचे प्रत्येकी रु ७,५००/- प्रमाणे एकंदर रु १,५०,०००/- मात्र पेक्षा जास्त मानधन दिले जाणार नाही. २० ताराखांपेक्षा जास्त तारखा चौकशी कामी पडल्यास त्यानंतरच्या प्रत्येक तारखेस त्यांना फक्त प्रवास भत्ता व आहार भत्ता व इतर खर्चापोटी रु.५,०००/- मात्र देण्यात येतील. मा. त्रीसदस्यीय समितीने पुढे असेही ठरविले की, चौकशी अधिकारी म्हणून निवृत्तसरकारी अधिकारी किंवा निवृत्त जिल्हा न्यायाधीशांची नेमणूक करावी व त्यांचेकडे प्रथम उपरोक्त मानधन व खर्च देण्यास संस्थान तयार आहे, असे सांगून ते चौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास इच्छुक आहेत काय, अशी विचारणा करावी व इच्छुक असल्यास संबधिताकडून तसे लेखी पत्र घेण्यात यावे.

त्याचप्रमाणे सहाय्यक तज्ञ म्हणून डॉ. अनिरुध्द वि. धर्माधिकारी, ह्रदयरोग तज्ञ, नाशिक यांची नेमणूक करण्यात यावी, असे दि २६.०४.२०१५ चे सभेमध्ये निर्णय क्र.१४० अन्वये ठरवण्यात आलेले आहे. चौकशी अधिकारी यांनी सहायकांची जेव्हा आवश्यकता भासेल तेव्हाच त्यांना पाचारण करावे व त्यांनी भाग घेतलेल्या चौकशीच्या प्रत्येक तारखेस तज्ञ सहाय्यकास वरील प्रमाणे प्रत्येक तारखेस रु. ५,०००/- मात्र प्रवास खर्च, आहार भत्ता व इतर खर्चापोटी आणि मानधन म्हणून रु ७,५००/- मात्र देण्यात यावे. डॉ धर्माधिकारी, नासिक यांना तसे कळवावे व त्यांनी सहमती दर्शविल्यास त्याचे लेखी संमती पत्र घ्यावे. जर ते अनुच्छुक असतील तर दुसऱ्या तज्ञ सहाय्याची नेमणूक करण्यात यावी, असे एकमताने ठरले.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे जा.नं.एसएसएस/वशी ७ए/१२०२/२०१५ दि.३०.०५.२०१५ अन्वये मा.श्री. जे.एल. देशपांडे सो, सेवा निवृत्त जिल्हा प्रधान न्यायाधिश, पुणे यांना पत्र पाठवून कळविणेत आले होते

त्यावर मा.श्री जे. एल. देशपांडे सो, पुणे यांनी दि०५.०६.२०१५ रोजीचे पत्राने असे कळविले आहे की, मानधन प्रतिदिन रु.७,५००/- व प्रवासखर्च व इतर खर्च रु.५,०००/- देणेचा निर्णय व्यवस्थापन समितीने घेतलेला आहे. परंतु त्याची एकुण मर्यादा रु.१,५०,०००/- ठरविली आहे. दैनंदिन मानधन व प्रवासखर्च व इतर सर्व खर्च तरतूद योग्य आहे. परंतू चौकशीचे सत्रांची संख्या वाढल्याने किंवा खाते चौकशीचा अपेक्षेपेक्षा अधिक विस्तार झालेस,रु. १,५०,०००/- ची कमाल मर्यादा रु.२,००,०००/- ठरविणे योग्य राहील. अशी अपेक्षा आहे. किंवा व्यवस्थापन समितीने भविष्यात त्याबद्दल योग्य तो विचार करावा. तसेच चौकशीकामी आवश्यक कक्ष, कर्मचारी वर्ग व संगणक/ स्टेशनरी संस्थानकडून पुरविणेत यावी वरील दोनही विनंतीस अधिन राहुन चौकशीकामी चौकशी अधिकारी म्हणून काम करण्यास संमती देत आहे

त्याचप्रमाणे मा. जे. एल. देशपांडे सो. यांनी संमती दिल्याप्रमाणे त्यांचे नेमणूकीस तसेच त्यांनी केलेल्या वाढीव रक्कम रु.५०,०००/- मानधनाबाबत व त्यांनी मागणी केलेल्या आवश्यक कक्ष, कर्मचारी वर्ग व संगणक/ स्टेशनरी याबाबी त्यांना पुरविता येतील. बाबत दि.१६.०६.२०१५ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर आयत्या वेळचा विषय क्र. ०५ सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र. १९२ असा पारित झाला की, उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, मा. श्री. जे. एल. देशपांडे, निवृत्त जिल्हा न्यायाधिश, पुणे यांनी केलेली विनंती मान्य करण्यात येवून, सदरहूकामी त्यांना तात्काळ नेमणूक आदेश देण्यात यावा. तसेच त्यांनी मागणी केलेला आवश्यक कक्ष, कर्मचारी वर्ग व संगणक स्टेशनरी, याबाबी पुरविणेस व सदरहु चौकशीकामी येणा-या रु.५०,०००/- मात्र वाढीस खर्चास मान्यता देण्यात आली.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे इकडील जा.नं. एसएसएस /वशी ७बी/८७०/२०१५ दि.२३.६.२०१५ अन्वये पत्र देवून मा.जे.एल. देशपांडे सो. पुणे यांना खाते चौकशी अधिकारी म्हणून नियुक्तीबाबत पत्र देण्यात आले असून त्यात मानधन भत्ता वाढवून मिळणेबाबतची विनंती मान्यकरणेत येत असलेबाबत कळविले आहे.

डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांचे खाते चौकशी संस्थानचे श्री साईप्रसाद अतिथीगृह येथे सुरु आहे खाते चौकशीत आत्तापर्यंत व्यवस्थापना मार्फत०५ साक्षीदार तपासले असुन आरोपीत वैद्यकीय अधिकारी यांनी पुराव्याच्या कामी ४० साक्षीदारांची यादी दाखल केली असुन त्यापैकी दि.०३.११.२०१६ पर्यंत १४ साक्षीदार तपासले असुन आणखी २६ साक्षीदार तपासणी बाकी आहे.

चौकशीकामी दि. २३.१०.२०१६ पर्यंत एकुण ५३ तारखा झाल्या असुन त्यातील ५१ तारखांचे मानधन रु.३,८२,५००/- व प्रवास व इतर खर्चापोटी रु.१,८५,०००/- असे एकुण रु.५,६७,५००/- (अक्षरी रु. पाच लाख सदुसष्ठहजार पाचशे मात्र) श्री. जे. एल. देशपांडे सो. पुणे यांना लेखाशाखेमार्फत अदा करणेत आले आहे

मा.श्री.जे.एल. देशपांडे सो. सेवा निवृत्त जिल्हा प्रधान न्यायाधिश, पुणे यांनी त्यांचे दि. १२.०६.२०१६ रोजी सादर केलेल्या अर्जावर मा. व्यवस्थापन समितीचे दि.१६.०८.२०१६ रोजीचे सभेत विषय क्र.१० सदर केला होता, त्यावर निर्णय क्र. ५१९ असा पारित केला आहे की, खाते चौकशी अधिकारी श्री. जे. एल. देशपांडे पुणे यांचे मानधनाबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास तत्कालीन त्रिसदस्य समितीचे अध्यक्ष व सदस्य यांची नोंद घेत असतांना समितीने चक्रीय पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली होती. त्यांची नोंद घेत

असतांना समितीने असे ठरविले की, मा. श्री. जे. एल. देशपांडे साहेब, निवृत्त प्रमुख जिल्हा न्यायाधिश, पुणे यांना डॉ बजाज व डॉ. वर्मा यांचे खाते चौकशीकामी पुढील जास्तीत जास्त १० बैठकीमध्येच चौकशी पुर्ण करुन चौकशी अहवाल सादर करावा, अशी विनंती करणेत यावी, असे ठरले.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत-** उपरोक्त निर्णयास अनुसरुन जा. नं. एसएसएस/वशी ७ए/३१४१/ २०१६ दि.१७.०९.२०१६ अन्वये मा.श्री.जे.एल. देशपांडे साहेब, पुणे यांना पुढील जास्तीत जास्त १० बैठकीमध्येच चौकशी पुर्णकरुन चौकशी अहवाल सादर करावा, अशी विनंती करणेत आली आहे. १० तारखांची चौकशी बैठकांची मर्यादा संपली असुन आरापीत वैद्यकीय अधिकरी यांचेकडील४०पैकी २६ साक्षीदार तपासण बाकी आहेत. त्यानंतर दोन्ही पक्षांकडील अंतीम युक्तीवाद व चौकशी अहवाल बनविण्याचे काम अद्याप बाकी आहे. चौकशी अधिकारी श्री.जे.एल. देशपांडे सो. यांना यापुर्वी खाते चौकशी पूर्ण होईपर्यंत रु.०२ लाखची मर्यादा घालण्यात आली होती. डॉ.बजाज व डॉ.वर्मा यांचे खाते चौकशी व्याप्ती मोठी असल्याने व चौकशीचे कामकाज क्लिष्ट असुन दोघांचे चौकशी वेगवेळी करावी लागते त्यामुळे मा. त्रीसदस्य समितीने रु.०२ लाखाची मर्यादा रद्द करुन खाते चौकशी पूर्ण होईपर्यंत प्रत्येक बैठकीस रु.७,५००/- मानधन व रु.५,०००/- प्रवास भत्ता व इतर

खर्चापोटी देणेचे ठरले होते. त्याप्रमाणे त्यांना आतापर्यंत ५१ तारखांचे मानधन व प्रवासभत्ता अदा करणेत आला आहे.

सबब, मा.श्री.जे.एल. देशपांडे सो., सेवा निवृत्त जिल्हा प्रधान न्यायाधिश, पुणे यांचे दि१८.०९.२०१६ रोजीचे अर्जावर निर्णय होणेकामी सविनय सादर.

**निर्णय क्र.८५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मा.श्री.जे.एल. देशपांडे सो., सेवा निवृत्त जिल्हा प्रधान न्यायाधिश, पुणे यांचे विनंती पत्राचा विचार करता, त्यांना डॉ.बजाज व डॉ.वर्मा यांच्या खाते चौकशीचे कामकाज पुर्ण करणेसाठी यापुढे जास्तीत्जास्त १० बैठकांसाठी पुर्वीचेच अटी/ शती व मानधनावर मुदतवाढ देणेत यावी, असे ठरले.**

**तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकडील निलंबीत डॉक्टर्स/ इतर स्टाफ यांची यादी सर्व मा.सदस्यांना देण्यात यावी, अशा सुचना दिल्या.** (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **श्री साईबाबा संस्थान परिसरात प्लॅस्टिक बंदीबाबत.**

**प्रस्ताव-** मा. अध्यक्ष महोदय यांनी शिर्डी संस्थान परिसरात प्लॅस्टीक बंदीचा प्रस्ताव सादर करणे बाबत सुचना केलेल्या होत्या. त्यानुसार सदर प्रस्तावाबाबत प्रशासकिय मान्यता घेऊन श्रींचे दर्शनासाठी ज्या प्रमाणे मोबाईल, कॅमेरा इलेक्ट्रॉनिक वस्तू, मोठया स्वरुपात बॅगा मंदिर परिरात आणण्यास सक्तमनाई करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे मंदिर व मंदिर परिसरात प्लास्टीक पिशव्यापासून होणारे प्रदूषणव दृषपरिणामास आळा बसविणेकामी प्लॅस्टीक पिशव्यादेखील मंदिर परिसरात आणण्यास सक्त मनाई करणे आवश्यक असल्याने त्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करणेबाबत प्रशासकिय मंजुरीघेण्यात आलेली आहे.

1. चारही महाव्दारातून येणारे साईभक्तांना प्लास्टीक पिशवी आत घेवुन जाण्यास सुरक्षा रक्षाकामार्फत मनाई करण्यात येते.

2. चारही महाव्दार व प्रवेशव्दार,संस्थान परिसर ,निवासस्थान परिसर येथे मंदिर व मंदिर परिसरात प्लास्टीक पिशव्या आत घेउनजाण्यास सक्त मनाई आहे. याआशयाचे मराठी,इंग्रजी,व हिंदी भाषेमध्ये सुचना फलक बांधकाम विभागामार्फत लावणेबाबत कार्यवाही चालु आहे.

3. प्लास्टीक पिशव्या पुर्णत. बंदी होणेसाठी मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांना जा.नं.एसएसएस वशी संरक्षण/३३८३/२०१६ दि.३०.१०.२०१६ रोजी पत्र देऊन त्याचे मार्फत शिर्डी शहरातील दुकाने,किरकोळ विक्रेते यांचे कडेस प्लास्टीक पिशव्या विक्रीस राहणार नाही.यासाठी दंवडी देवुन लोकजागृती करणेबाबतची कार्यवाही करणेस कळविलेले आहे.

तदनंतर नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत शिडी, तथा मा.विश्वस्त यांचे दि.22.09.2016 रोजीचे पत्रात त्यांनी शिर्डी शहर प्लॅस्टिक मुक्त करणेसाठी श्री साईबाबा मंदिराकडे येण्यासाठी जी प्रवेशद्वार आहेत त्याठिकाणी आपले कर्मचाऱ्यांकडून भक्तांना मंदिर परिसरात प्रवेश करता प्लस्टिक पिशव्या घेऊन येण्यास मज्जाव करणेबाबतचा विषय येणाऱ्या बोर्ड मिटींगमध्ये घेवून याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, असे कळविलेले आहे.

तरी सदरच्या विषयावर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८५३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर व मंदिर परिसरात प्लास्टीक पिशव्यापासून होणारे प्रदूषण व दृषपरिणामास टाळणेसाठी मंदिर परिसराचे प्रवेशद्वारावर प्लास्टीक पिशव्यांना बंदी करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **गेट नं.३ चे ठिकाणी दर्शनार्थ होणाऱ्या गर्दीबाबत व तेथील नियमावलीबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीचे सभेमध्ये मा.विश्वस्तांनी "एक वर्षापेक्षा कमी वयाच्या मुल असलेल्या माता व त्यांचे कुटूंबीय तसेच जेष्ठ नागरीक व त्यांचेबरोबर एक व्यक्ती यांना एक वेळा विनापास व्ही.आय.पी.गेटने दर्शनासाठी सोडण्यात यावे." अशा सुचना दिलेल्या आहेत.

मा.विश्वस्तांच्या निर्देशानुसार गेट नं.०३ (अंध, अपंग गेट) ने अंध, अपंग, ६० वर्षाचे पुढील वयस्क्र साईभक्त व ०१ वर्षाचे आतील लहान मुलांच्यासोबत त्यांचे कुटुंबीय यांना मोफत सोडणेबाबतची कार्यवाही सुरु करण्यात आलेली असल्याने उक्त साईभक्तांची सदर गेट नं.०३ मधुन श्रीं चे दर्शनासाठी मोठया प्रमाणात गर्दी होत आहे.

गेट नं.०३ येथे आरतीचे वेळेत मोठया प्रमाणात साईभक्तांची दर्शनासाठी लांब रांग लागते. त्यामध्ये अंध, अपंग, वयोवृध्द् साईभक्तांना तर सोडण्यात येतेच परंतु ज्या साईभक्तांकडे लहान मुले आहेत त्यांचे घरातील आलेले सर्व सदस्यांना (इतर नातेवाईकांसह) सोडावे लागते. सदरचे गेटवर एकच सुरक्षा कर्मचारीची नेमुणुक करण्यात येत असल्यामुळे सदरचे गेटवर सर्व साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होऊन गोंधळ होतो. तसेच वयोवृध्द् भक्तांबरोबर आपण एक व्यक्तीस जाण्याची परवानगी देत असुन त्यांचे बरोबर असणारे इतर साईभक्तही तेथुन दर्शनास जाण्यासाठी सदर ठिकाणी असलेल्या सुरक्षा कर्मचारी व लिपीक यांचेशी वाद घालतात. त्यामुळे सदर ठिकाणी नियमित अशा घटनांना सामोरे जावे लागत असल्यामुळे तेथील काम करणारे कर्मचा-यांचे संतुलन बिघडून काम करतांना मानसिक त्रास होतो. कारण तेथे लहान मुलांबरोबरएवढे साईभक्त येतात की त्यांना सदर ठिकाणी काम करणे अत्यंत जिकरीचे होत आहे.

तसेच सदर गेटचे बाहेरील बाजुस भिकारी, पॉलीशवाले एजंट , इतर उपद्रवी इसम साईभक्तांना चुकीचे मार्गदर्शन करुन सदर गेटवर गर्दी करतात. काही भिकारी, फासेपारधी लोकं त्यांचेकडील लहान मुलांना चांगल्या प्रकारचे कपडे परीधान करुन सदर मुलास साईभक्तांकडे देऊन साईभक्तांना दर्शनासाठी सोडतात व त्यांचेकडुन त्याबाबतचे पैसे उकळण्याचे प्रकार निदर्शनास आलेले आहे. अशा उपद्रवी लोकांकडुन सदर गेटवर एक प्रकारचा धंदाच सुरु केल्याचेही निदर्शनास आले आहे. अशाप्रकारामुळे सदर गेटवर अतिशय मोठया प्रमाणात साईभक्तांची गर्दी वाढत असल्यामुळे तेथे गर्दी नियंत्रणात आणणे फार जिकरीचे होत आहे.

**नम्र मत:-** सदर गेटने अंध, अपंग तसेच वयोवृध्द् साईभक्तांबरोबर फक्त एकच व्यक्ती सोडल्यास तसेच १ वर्षाचे आतील बालक असल्यास त्यांचे कुटूंब म्हणजे फक्त आई वडील त्यांचेकडील इतर लहान मुले यांनाच सदरचे गेटने सोडल्यास इतर साईभक्तांची सदरचे गेटवर गर्दी होणार नाही व सर्व साईभक्तांना दर्शन घेणे सोयीस्कर होईल, तसेच सदरचे गेटवर मोठया अक्षरात 'अंध, अपंग, जेष्ठ नागरीक तसेच एक वर्षाचे आतील बालक असलेले कुटुंब यांना मोफत दर्शनासाठी सोडण्यात येते' अशा आशयाचा फलकही लावण्यात यावा, जेणेकरुन कोणत्याही साईभक्तांची अशा उपद्रवी इसमांकडून फसवणुक होणार नाही, असे नम्र मत आहे.

तरी सदर गेट नं.०३ ने अंध, अपंग व वयोवृध्द् व्यक्तीबरोबर एक व्यक्ती यांना दर्शनासाठी सोडतांना तसेच एक वर्षाचे आतील मुल असलेल्या माता व त्यांचे कुटुंब म्हणजे कुटुंबातील किती सदस्यांना व कोणाकोणाला दर्शनासाठी सोडण्यात यावे याबाबत सविस्तर चर्चा होऊन आदेशास्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.८५४** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, गेट नं.३ येथे अतिप्रमाणात होणाऱ्या गर्दीवर नियंत्रण ठेवणेसाठी या गेटमधून पुर्वीप्रमाणेच अंध, अपंग, दुसऱ्यावर अवलंबीत असलेले व अतिवयोवृध्द यांचेबरोबर फक्त एक व्यक्ती यांनाच विनापास दर्शनासाठी प्रवेश देण्यात यावा. जेष्ठ नागरीकास सहाय्यकाची आवश्यकता नाही, असे दिसून आल्यास फक्त त्यांनाच विनापास दर्शनासाठी प्रवेश देण्यात यावा, सोबतची व्यक्ती दर्शनासाठी सोडण्यात येऊ नये, तसेच एक वर्षाच्या आतील मुलाची माता व पिता यांना मुलाबरोबर दर्शनासाठी विनापास प्रवेश देण्यता यावा. याची जबाबदारी तेथे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याची राहील. या आशयाचा फलक गेट नं.३ येथे लावण्यात यावा व या निर्णयाची अंमलबजावणी काटेखोरपणे करणेत यावी.**

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख/ जनसंपर्क अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१२** **श्री गजानन महाराज संस्थान, श्री क्षेत्र शेगाव यांच्या धर्तीवर संस्थानद्वारे देणगीदार साईभक्तांना थ्रीडी प्रकारात विविध आकारात फोटो भेट देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम तरतुद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम १७ 'ठ' मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे

श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

**प्रस्ताविक:-** उपरोक्त संदर्भीय विषयानुसार श्री गजानन महाराज श्री क्षेत्र शेगांव तर्फे देणगीदार साईभक्तांना विविध आकारातील थ्रीडी पॉकेट साईज व थ्रीडी अक्रोलिक फ्रेमसह फोटो भेट देण्यात येतात व त्यांचा पुरवठा मे. टॅको व्हिजन प्रा.लि. मुंबई यांच्याकडून करण्यात येतो. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व्दारे देणगीदार साईभक्तांना विविध आकारातील थ्रीडी पॅकेट साईज फोटो व थ्रीडी अक्रोलिक फ्रेमसह

देण्यात यावेत अशी इच्छा मे. टॅको व्हिजन प्रा.लि. मुंबई यांनी पत्रात व्यक्त केलेली आहे. सदर पत्रावर मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर करावे असे निर्देश वजा शेरा दिलेले आहे

**प्रस्ताव:-** मे.टॅको व्हिजन प्रा.लि. मुंबई हे साईभक्त निविदाकार असून संस्थानचे कॅलेंडर्स डिलक्स प्रकारात खरेदीच्या विहित पध्दतीने छपाई करुन संस्थानला पुरवठा करत असतात. संस्थानतर्फे देणगीदार श्री साईभक्तांना थ्रीडी फोटो भेट देण्याची संकल्पना चांगली आहे. त्यासाठी पुस्तके/फोटो विक्री कक्षात उपलब्ध असलेले व नवीन प्रकारात त्यांनी वेगवेगळया आकारात फोटोंचा प्रस्ताव खालील प्रमाणे सादर केलेला आहे.

| अ.नं. | साईज<br>सर्व थ्रीडी प्रकारात फोटो | टॅको व्हिजन प्रा.लि. मुंबई | साईग्रेस फौंडेशन, मुंबई | इमेज क्रिऐशन, मुंबई | सरासरी छपाई दर | मागील छपाई दर रुपये. पै. | स्टोअर विभागात शिल्लक नग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | २.५"X ३.५" (पॉकेट साईज) थ्रीडी | ४.५० | ४/- | ५/- | ४.५० | ३.८७ | ४,९०,००० |
| ०२ | ६"X९" (L स्टॅंडसह) थ्रीडी | १५०/- | १८३/- | १७५/- | १७०/- | नवीन छपाई | ०० |
| ०३ | ५"X७" (L स्टॅंडसह) थ्रीडी | १००/- | १२७/- | १२२/- | ११५/- | १४०/- | १४०७ |
| ०४ | ४"X६" (L स्टॅंडसह) थ्रीडी | ७५/- | ९२/- | ९२/- | ८५/- | नवीन छपाई | ०० |
| ०५ | ८"X११" (फोटो फ्रेम) थ्रीडी | १९२/- | २२४/- | २१९/- | २१०/- | २४०/- | १७८९ |
| ०६ | १०"X१५" (फोटो फ्रेम) थ्रीडी | ४००/- | ४६७/- | ४५०/- | ४४०/- | नवीन छपाई | ०० |
| ०७ | १२"X१७" (फोटो फ्रेम) थ्रीडी | ६००/- | ७५२/- | ७४१/- | ७००/- | ३९५/- | १७२१ |
| ०८ | १९"X२७" (फोटो फ्रेम) थ्रीडी | २०००/- | २६३०/- | २४८५/- | २३७०/- | नवीन छपाई | ०० |

उपरोक्त तक्त्यातील साठा शिल्लक असे थ्रीडी फोटो वगळता नवीन नमुने थ्रीडी फोटो छपाईसाठी व ०३ मुद्रणालयाकडील उक्त तक्त्यात अ.नं.२,४,६ व ८ अंदाजे दरांची सरासरी किंमतीचा तपशिल असलेले नवीन छपाईकामी नवीन तक्त्यातील तपशिल खालील प्रमाणे सादर करीत आहोत.

| अ. नं. | श्री साईबाबा थ्रीडी अक्रोलिक फोटो | साईज | सरासरी अंदाजे छपाई दर | फोटो छपाई संख्या | अंदाजे खरेदी किंमत रुपये. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा थ्रीडी अक्रोलिक फोटो | ६"X९" (L स्टॅंडसह) | १७०/- | १५००० | २५,५०,०००/- |
| ०२ | श्री साईबाबा थ्रीडी अक्रोलिक फोटो | ४"X६" (L स्टॅंडसह) | ८५/- | ५०००० | ४२,५०,०००/- |
| ०३ | श्री साईबाबा थ्रीडी अक्रोलिक फोटो | १०"X१५" (फोटो फ्रेम) | ४४०/- | ५००० | २२,००,०००/- |
| ०४ | श्री साईबाबा थ्रीडी अक्रोलिक फोटो | १९"X२७" (फोटो फ्रेम) | २३७०/- | ३००० | ७१,१०,०००/- |
| | | | | एकूण रु. | **१,६१,१०,०००/-** |

(अक्षरी रुपये. एक कोटी एकसष्ट लाख दहा हजार मात्र.)

**विभागाचा मागणी/ अभिप्राय/ स्पष्ट मत:-** श्री गजानन महाराज श्री क्षेत्र शेगांव यांच्या धर्तीवर श्री साईबाबा संस्थानतर्फे देणगीदार साईभक्तांना श्री साईबाबा- थ्रीडी फोटो विविध आकारात व थ्रीडी अक्रोलिक फोटो उपरोक्त साईजमध्ये देणगी काऊंटवर देणगीदार साईभक्तांना भेट देता येईल परंतू देणगीदार साईभक्तांना संस्थानव्दारे सेवार्थ आरती, दर्शन व प्रसादभोजनाची व्यवस्था केली जाते. देणगीदार साईभक्त स्वेच्छा देणगी देत असतात ते कोणत्याही अपेक्षेने देणगी देत असल्याचे भासवत नाही. फक्त उदी-प्रसाद व श्री साई आशिर्वादाची अपेक्षा करतात. श्री क्षेत्र शेगांव व श्री क्षेत्र शिर्डी यांची तुलनेत शिर्डी येथे येणाऱ्या भक्तांचा ओघ जास्त प्रमाणात आहे. गुप्तदान-दाते देखील मोठया प्रमाणात आहेत. यासर्व बाबींचा विचार करता सदर प्रस्ताव खर्चीक वाटतो असे नम्र मत आहे.

सदर फोटो खरेदीकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये १,६१,१०,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी एकसष्ट लाख शंभर मात्र) खर्चास व विहीत पध्दतीने खरेदीकामी वर्तमानपत्रात/ संस्थान संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेकामी येणा-या योग्य त्या खर्चास तसेच ई-निविदेची मागणी करणेकामी सदर विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर

**निर्णय क्र.८५५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे थ्रीडी फोटो छपाई करुन साईभक्तांना विक्रीसाठी उपलब्ध करुन देणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच रु.२५,०००/- मात्र किंवा त्यापेक्षा अधिक रकमेची/ वस्तुंची देणगी देणाऱ्या साईभक्तास ५"X७" (L स्टॅंडसह) थ्रीडी फोटो प्रसाद रुपाने देण्यात यावा व इतर फोटोंची विक्री करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्त दि.११.१२.२०१६ रोजी चर्चासत्रकामी येणाऱ्या साईभक्तांची अल्पोपहार व प्रसादभोजनकामी अन्नपदार्थ तयार करणे व वितरीत करणेकामी न्युनतम दरपत्रकधारकास देण्यात आलेल्या कार्यादेशास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.११ डिसेंबर २०१६ रोजी देश विदेशातील साई मंदिराचे अधिकारी/ पदाधिकारी चर्चासत्रासाठी उपस्थीत राहणार असून त्यांचे अल्पोपहार व भोजन व्यवस्थेकामी जेवण तयार करणे व सर्व्हीस देणेकामी अशी दोन वेगवेगळी कामे करुन घेणेसाठी येणा-या खर्चास मा.व्यवस्थापन समिती दि.०७/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णयानूसार मान्यता घेण्यात आलेली आहे.

नुसार अन्नपदार्थ तयार करणे व वितरीत करणेकामी नामंकित केटरर्सकडून व्हिीत मुदतीत कोटेशन मागविणेत आलेले होते. त्यानुसार विहीत मुदततित प्राप्त झालेले एकूण ०५ दरपत्रक उघडणेबाबत व निम्नतम केटरर्सधारक यांना पुरवठा आदेश देणेबाबतची टिपणी मा्व्यवस्थापन उपसमिती सभेपुढे दि.१६/११/२०१६ रोजी सभाकामकाज विभागाकडे पाठविणेत आलेली आहे. परंतु उपसमितीचे मिटींगसाठी काही कालावधी लागणार असल्यामुळे तातडीची बाब ,कामाची निकड व गरज लक्षात घेता, दि.१८/११/२०१६ रोजी मा.स्थानिक विश्वस्त श्री सचिन तांबे व उपकार्यकारी अधिकारी श्री.आहेर साहेब, सर्व प्रशासकीय अधिकारी, मुख्य लेखाधिकारी यांचे उपस्थीतीत प्राप्त दरपत्रके प्रचलीत पध्दतीने उघडणेत आलेली आहे. सदर दरपत्रकाचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कोटेशन धारकाचे नाव | अन्न पदार्थ तयार करणे सर्व करासह दर | अन्न पदार्थ वितरण करणे सर्व करासह दर | चर्चा वाटाघाटी अन्वये अन्नपदार्थ तयार करणेकामी सर्व करासह मंजूर दर | चर्चा वाटाघाटी अन्वये अन्नपदार्थ वितरण करणेकामी सर्व करासह मंजूर दर |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | अन्नपुर्णा केटरर्स, औरंगाबाद | ३,३६,५४७.८० +५०००० ट्रान्सपोर्ट खर्च | ३,३६,७७६ +५०००० ट्रान्सपोर्ट खर्च | | |
| ०२ | लोढा केटरर्स, कोपरगाव | २,४५,०००/- एकत्रीत | ३,४३,०००/- +३०००/ प्रती PRO | | |
| ०३ | जयेश केटरर्स, अहमदनगर | ३,००,०००/- | ३,६०,०००/- | | |
| ०४ | महाराजा केटरर्स, श्रीरामपुर | १,५०,०००/- | ३,००,०००/- | **१,५०,०००/- सर्व करासह** | **२,७५,०००/- सर्व करासह** |
| ०५ | श्री साई केटरर्स, श्रीरामपूर | ४,२०,०००/- | ३,३०,०००/- | | |

वरील दरपत्रकाच्या तुलनात्मक तकत्यानुसार न्युनतम दरपत्रक धारक श्री महाराजा केटरर्स ,श्रीरामपूर यांना संदर्भिय अनं.४ दि १८/११/२०१६ चे मंजुर टिपणीनुसार कार्यादेश देणेत आलेला आहे

तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्ष करीता दि. ११ डिसेंबर २०१६ रोजी चर्चासत्र कामी येणा-या साईभक्तांची अल्पोपहार व प्रसादभोजनकामी अन्नपदार्थ तयार करणे व वितरीत करणेकामी आलेल्य निविदा उघडून केलेली कार्यवाही व न्युनतम दरपत्रक धारकास देण्यात आलेल्या कार्यादेशास कार्योत्तर मान्यता मिळणेसाठी सदर विषय मा.व्यवस्थापन समितीपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षानिमित्त दि. ११ डिसेंबर २०१६ रोजी चर्चासत्रासाठी येणाऱ्या साईभक्तांची अल्पोपहार व प्रसादभोजनकामी अन्नपदार्थ तयार करणे व वितरीत करणेकामी राबविणेत आलेल्या निविदाप्रक्रियेचे अवलोकन करणेत येऊन, त्यामधील निम्नतम दरधारकास सदरहूकामीचा कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४** **मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार गावरान तुपाचे नमुने वेगवेगळया ३-४ प्रयोगशाळेकडून तपासणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.१९.०९.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६८७ नुसार "संस्थानमार्फत साईभक्तांना विक्री करण्यात येत असलेल्या लाडू प्रसादाचा वास येत असलेमुळे त्यासाठी वापरण्यात येत असलेल्या गावरान तुपाच्या दर्जाबाबत शंका उपस्थित केली, त्यामुळे सध्या संस्थानला प्राप्त होणा-या गावरान तुपाचे नमुने वेगवेगळ्या ३-४ प्रयोगशाळेमध्ये तपासणीसाठी पाठविणेत यावे", असे ठरलेले आहे.

वरील निर्णयानुसार कार्यवाही करणेकामी भांडार विभागात नुकत्याच प्राप्त झालेल्या बॅच नं. I 16/19-1 Dtd. 19.09.2016 व I 16/24-1 Dtd. 24.09.2016 या दोन बॅचचे नमुने विहित मान्यता घेऊन तपासणीसाठी

१) रिजनल ॲगमार्क लॅबोरेटरी, मुंबई (Central Government Lab)
२) जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, नासिक, (शासकीय प्रयोगशाळा)
३) जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, अ.नगर, (शासकीय प्रयोगशाळा)
४) फुड हायजिन ॲन्ड हेल्थ लॅबोरेटरी, पुणे (NABL Lab),
५) अश्वमेध इंजिनिअर्स ॲण्डकन्सलटंटस को.सो.लि., नासिक (NABL Lab)

या ५ प्रयोगशाळेंकडे, याशिवाय संस्थानचे श्री साई प्रसादालयामध्ये कार्यान्वीत असलेल्या प्रयोगशाळेकडेही तपासणीसाठी पाठविणेत आलेले होते. फुड हायजिन ॲन्ड हेल्थ लॅबोरेटरी, पुणे व रिजनल ॲगमार्क लॅबोरेटरी, मुंबई यांचेकडे उपरोक्तनमुने तपासणीसाठी पाठविताना I 16/19-1 या बॅच करीता A व I 16/24-1 या बॅच करीता B असे नविन कोडींग करणेत आलेले होते.

वरील सर्व प्रयोगशाळांकडून उपरोक्त दोन्ही बॅचचे नमुने तपासणी अहवाल प्राप्त झालेले आहेत. त्यात सदरचे नमुने अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, नियम व नियमन २०११, नुसार प्रमाणीत (मानवी खाण्यास योग्य) आहे, असे शेरे मारलेले आहेत. उपरोक्त तपासणी अहवालाचे आधारे सदरचे गावरान तुपाचा पुरवठा संस्थानचे विविध विभागांना त्यांचे आवश्यकतेनुसार करणेत आलेला आहे

उपरोक्त प्रमाणे प्राप्त तपासणी अहवालांचा तपशिल खालीलप्रमाणे.

1 **Government of India**

**Regional Agmark Laboratory, Mumbai**

Analytical Report of Ghee

| Sr. No. | Parameter Tested | Specification for Ghee | | | Value Obtained | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **Special Grade** | **General Grade** | **FSSA-2006 Rules & Regulation 2011** | **Batch No. A** (I16/19-1 Dt.19.09.2016 | **Batch No. B** (I16/24-1 Dt.24.09.2016 ) |
| 01 | Moisture % (Max) | 0.30 (max) | 0.30 (max) | 0.5 (max) | 0.12 | 0.10 |
| 02 | Free Fatty Acid% as oleic acid (max) | 1.4 (max) | 2.5 (max) | 3.0 (max) | 0.99 | 0.76 |
| 03 | Reichert Meissle Value (min)<br>A. Areas other than cotton tract<br>B. Cotton Tract area | 28.0 (min) | 28.0 (min) | A. 26 (min)<br>B. 21 (min) | 33.11 | 32.89 |
| 04 | Polenske Value | 1.0 to 2.0 | 1.0 to 2.0 | - | 1.70 | 1.50 |

| Sr. No. | Parameter Tested | Specification for Ghee | | | Value Obtained | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **Special Grade** | **General Grade** | **FSSA-2006 Rules & Regulation 2011** | **Batch No. A** (I16/19-1 Dt.19.09.2016 | **Batch No. B** (I16/24-1 Dt.24.09.2016 ) |
| 05 | Butyco Refractometer reading at 40°C<br>A. Areas other than cotton tract area<br>B. Cotton Tract Area | 40.0 to 43.0 | 40.0 to 43.0 | A. 40.0 to 43.0<br>B. 41.5 to 45.0 | 42.0 | 42.2 |
| 06 | Boudouins Test | Negative | Negative | - | Negative | Negative |
| 07 | Aroma (min)<br>Flavour (min) | 5/10(Min)<br>10/20 (Min) | 5/10(Min)<br>10/20 (Min) | - | 6/15<br>15/20 | 6/16<br>15/20 |

Remark- The sample submitted by the party **Conforms** to Agmark specification

**2 Government of Maharashtra**

**District Public Health Laboratory, Nashik**

Result of Examination

| Sr. No. | Parameter | Result Batch No. I16/19-1, Dt. 19.09.2016 | Result Batch No. I16/24-1, Dt. 24.09.2016 |
|---|---|---|---|
| 01 | Physical Observation | Faint yellow coloured semi solid sample free from off odour | Faint yellow coloured semi solid sample free from off odour |
| 02 | Butyro-refractometer Reading at 40°C | 42.2 | 42.0 |
| 03 | Moisture % | 0.41 | 0.43 |
| 04 | Reichert Value | 26.95 | 26.73 |
| 05 | Free fatty value oleic acid % | 0.61 | 0.66 |
| 06 | Specific Tests<br>1) Kries test for Rancidity<br>2) Baudouin test for sesame oil<br>3) Halphens test for cotton seed oil<br>4) Mineral oil test<br>5) Castor oil test<br>6) Bactrological test | Negative | Negative |

**Remarks-** The above sample of Ghee **Conforms** as per F.S.&S. (Food products and additives) Regulations 2011.

**3 Government of Maharashtra**

**District Public Health Laboratory, Ahmednagar**

Analysis Report

| Sr. No. | Quality Charact | Name of Test Method used | Prescribed standards as per A. 2.1.10(2) FSS (Food Products standards & Food Additives) Regulations, 2011 | Result Batch No. I16/19-1, Dt. 19.09.2016 | Result Batch No. I16/24-1, Dt. 24.09.2016 |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Butyro-Refractometer Reading at 40°C | DGHS Manual method 2005 | 40.0 to 43.0 for areas other than cotton tract | 41.2 | 41.0 |
| 02 | Moisture % by wt. | DGHS Manual method 2005 | Not more than 0.5% by mass | 0.054% | 0.046% |
| 03 | Free fatty Acids as oleic acid | DGHS Manual method 2005 | Not more than 0.3% by mass | 0.79% | 0.56% |
| 04 | Reichert M.Value | DGHS Manual method 2005 | Not Less than 26 | 28.61 | 29.49 |
| 05 | Test for colour | DGHS Manual method 2005 | Shall be free from added colouring metter | Synthetic food colour not detected | Synthetic food colour not detected |
| 06 | Baudouin Test | DGHS Manual method 2005 | Shall be Negative | Negative | Negative |

**Report/ Remarks –**I am of the opinion that the above sample is within norms as per provision of Food Safety & Standards (Food Products & Food Additive) Regulations 2011

**4 Food Hygiene & Health Laboratory, Pune**

(NABL Lab)

Testing Report

| Sr. No. | Test Done | Test Method | Limits as per FSSAI | Result Batch No. A (I16/19-1, Dt.19.09.2016) | Result Batch No. B (I16/24-1, Dt.24.09.2016) |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Moisture | IS 548(P-1) 1964 (RA.2009) | Not more than 0.5% | 0.21 | 0.23 |
| 02 | Butyro Refractometer Reading 40°C | | 40-43 | 42.2 | 42.3 |
| 03 | Reichert Meissl Value | | Not less than 26 | 28.05 | 29.92 |
| 04 | Free Fatty Acid | | Not more than 3.0% | 0.82 | 0.70 |
| 05 | Baudouin Test | IS 548(p-2)1976 (RA.2009) | Negative | Negative | Negative |
| 06 | Mineral Oil Test | | Negative | Negative | Negative |
| 07 | Colour | Physically | - | Light Yellow | Light Yellow |
| 08 | Flavor | Sensory | - | Normal | Normal |
| 09 | Odour | Sensory | - | Pleasant | Pleasant |
| 10 | Added colour Matter | DGHS Manual 2 | Absent | Absent | Absent |

**Remarks-** Based upon the above analysis done sample **conforms** to FSSAI norms.

**5 Ashwamedh Engineers & Consultants CSL, Nashik**

(NABL Lab)

Food Analysis Report

| Sr. No. | Parameter | Method | Limits as per FSSR, 2011 Chapter-2 2.1.10(2) | Result Batch No. I16/19-1, Dt.19.09.16 | Result Batch No. I16/24-1, Dt.24.09.16 |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Colour | Visual Method | - | Yellowish | Yellowish |
| 02 | Odour | Organoleptic Method | Free from off Flavour | Free from off Flavour | Absent |
| 03 | Taste | Organoleptic Method | - | Pleasant | Pleasant |
| 04 | Added Colour | DGHS Lab, Manual 2 (106).2005 | Free from Added colouring matter | Absent | Absent |
| 05 | Butyro Refractometer Reading at 40°C | IS 548 (Part I):1964, Reaffirmed 2006, Edition 2.5 (1996-07) | 40 to 43 | 42.3 | 40.9 |
| 06 | Reichert Value | IS 548 (Part I):1964, Reaffirmed 2006, Edition 2.5 (1996-07) | Min. 26 | 29.9 | 28.9 |
| 07 | Free fatty acid (as Oleic Acid) | IS 548 (Part I):1964, Reaffirmed 2006, Edition 2.5 (1996-07) | Max 0.5 | 0.17 | 0.20 |
| 08 | Moisture | DGHS Lab. Manual (2.1.4.11.12.15.16).2005 | Max 0.5 | 0.12 | 0.15 |
| 09 | Baudouin test (for sesame oil) | DGHS Lab. Manual 2 (15).2005 | Negative | Negative | Negative |
| 10 | Rancidity (Based on kries test) | DGHS Lab. Manual 2 (37).2005 | For From Rancidity | Free from Rancidity | Absent |

**Remarks-** The analysed food sample complies with Food Safety and Standards (Food Products Standards and Food Additives) Regulations,2011 (for which limits have been mentioned ) with respect to the parameters tested.

**6 Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi**

**Sai Prasadalaya Quality Assurance Laboratory**

RESULT OF EXAMINATION OF SAMPLE

| Sr. No. | Parameters | Method | Limits as per FSSAI | Result Batch No. I16/19-1, Dt. 19.09.2016 | Result Batch No. I16/24-1, Dt. 24.09.2016 |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Appearance | Visual Method | - | Yellow Color | Yellow Color Liq.for |
| 02 | Butyro Refractometer Reading @ 40°C | D.G.H.S. Lab Manual 2 (05) 2005 | Between 40 to 43.0 | 41.2 | 41.0 |
| 03 | Reichert-Meissl Value | D.G.H.S. Lab Manual 2 (13) 2005 | Minimum 26.0 | 29.13 | 29.44 |
| 04 | FFA as Oleic acid | D.G.H.S. Lab Manual 2 (11) 2005 | Maximum 3.0% | 0.44 % | 0.35 % |
| 05 | Moisture | D.G.H.S. Lab Manual 2 (03) 2005 | Maximum 0.5 % | 0.17 % | 0.16 % |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 06 | Test for Baudouin | D.G.H.S. Lab Manual 2 (15) 2005 | Negative | Negative | Negative |
| 07 | Test for Rancidity (Kries Test) | D.G.H.S. Lab Manual 2 (37) 2005 | Negative | Negative | Negative |
| 08 | Added Colour | D.G.H.S. Lab Manual 2 (07) 2005 | Negative | - | - |

**Opinion:-** The above sample of Pure Ghee **Conforms** as per Food Safety & Standards Act.2006 & Rules & Regulations 2011 with respect to the parameters tested.

तरी वरील तपशिलाप्रमाणे सर्व प्रयोगशाळांचे तपासणी अहवाल मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र.८५७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, लाडू प्रसाद बनविणेसाठी वापरण्यात येणाऱ्या गावरान तुपाचे वेगवेगळया प्रयोगशाळेकडून प्राप्त झालेल्या तपासणी अहवालाचे अवलोकन करण्यात आले. प्रयोगशाळांनी गावरान तुप वापरण्यायोग्य असलेबाबत अहवालामध्ये नमुद केले आहे, परंतु तरीही लाडू प्रसादाचा उग्र वास येतो, अशा तक्रारी येत आहेत, याकरीता गावरान तुप पुरवठा करणाऱ्या ठेकेदारास या आशयाची नोटीस देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, भांडार विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्त दि.११.१२.२०१६ रोजी आयोजित कार्यक्रमाच्या ठिकाणी फुलांची सजावट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा समाधी महाशताब्दी वर्ष ऑक्टोंबर 2017 ते ऑक्टोंबर 2018 (विजयादशमी) अखेर या कालावधी साजरा करण्यात येणार आहे. त्यामुळे श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्त करावयाच्या कामाचे नियोजन करणेसाठी 11 डिसेंबर 2016 रोजी देशातील व परदेशातील साईमंदिरांचे अधिकारी/ पदाधिकारी यांचे चर्चासत्र आयोजीत करण्यात आलेले आहे. दि.07/11/2016 रोजीच्या मा. उपसमिती सभेत श्री साईबाबा समाधी महाशताब्दी वर्षा निमित्त करावयाच्या कामाचे नियोजनासाठी दि.11/12/2016 रोजीच्या आयोजीत कार्यक्रमाच्या ठिकाणी फुलांची सजावट करणे, आलेल्या मान्यवरांच्या सत्कारासाठी बुके व स्वागतासाठी फुले खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. 2,00,000/- (दोन लाख) मात्रचे खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यामध्ये कोटेशन / निवीदा एक विशेष बाब म्हणुन संबंधीत विभागांनी स्थानिक विश्वस्तांसमोर कोटेशन उघडुन तात्काळ कामे करुन घेण्यात यावीत व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल कार्यात्तर मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा असे ठरले आहे.

त्यानुसार फुल सजावट करणारे परिसरातील कारागीर यांचेकडुन दरपत्रके मागविण्यात आलेले असुन प्राप्त झालेले दरपत्रके दि.18/11/2016 रोजी स्थानिक विश्वस्त यांचेसमोर उघडण्यात आलेली आहे. उघडण्यात आलेल्या दरपत्रकांचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र | पार्टीचे नाव | आवक नंबर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|
| 01 | द्वारकामाई फ्लॉवर डेकोरेशन, शिर्डी | 14962 | 77,000/- |
| 02 | त्र्यंबकेश्वर फ्लॉवर, लोणी | 14992 | 95,000/- |
| 03 | त्र्यंबकेश्वर पुष्पालय, लोणी | 14993 | 1,19,000/- |
| **04** | श्री साई फलॉवर डेकोरेशन, पुणे | **14994** | **65,000/-** |

तरी उपरोक्त प्रमाणे उघडण्यात आलेल्या दरपत्रकात अ.क्र 04 श्री साई फलॉवर डेकोरेशन, पुणे यांचे दर रु.65,000/- (पासष्ठ हजार) मात्र सर्वात न्युनत्तम असल्याने श्री साईबाबा समाधी महाशताब्दी वर्षा निमित्त दि.11/12/2016 रोजीच्या आयोजीत कार्यक्रमाच्या ठिकाणी फुलांची सजावट करणे तसेच मान्यवरांच्या सत्कारासाठी बुके व स्वागतासाठी फुले उपलब्ध करुन देणेचे काम श्री साई फलॉवर डेकोरेशन, पुणे यांचेकडुन करुन घेणेकामी कार्यादेश देण्यात आलेला आहे.

तरी सदरचा प्रस्ताव कार्यात्तर मंजुरीसाठी सादर

**निर्णय क्र.८५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्त दि.११.१२.२०१६ रोजी आयोजित कार्यक्रमाच्या ठिकाणी फुलांची सजावट करणेकामी राबविणेत आलेल्या निविदा प्रक्रियेचे अवलोकन करणेत आले व या प्रक्रियेमधील निम्नतमदरधारकास कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६** **संस्थानच्या वतीने गोशाळा सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.24 नोव्हेंबर 2016 रोजी मा. अध्यक्ष महोदय यांनी मा.कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी यांना मुंबई येथील बैठकीत अ.नं 2 अन्वये, संस्थानमार्फत गोशाळा सुरु करणेबाबत अभ्यासपुर्ण प्रस्ताव तयार करुन व्यवस्थापन समितीपुढे ठेवणेबाबत सुचविलेले आहे

संस्थानमार्फत गोशाळा चालु केल्यास धुणीसाठी गोवऱ्या मिळतील तसेच दुध उपलब्ध होईलआज रोजी संस्थानसाठी साधारणत: दररोज अंदाजे 4 ते 4.5 हजार लिटर दुध लागते तसेच धुणीसाठी अंदाजे दररोज 600 ते 700 किलो गवरी लागते.

त्यानुसार-

***संस्थान मार्फत गोशाळा सुरु केल्यास खालीलप्रमाणे कामे करावी लागतील.**

1) जागा शोधणे 2) कंपाऊंड घालणे, 3) शेड टाक्या गव्हाण, यांचे बांधकाम करणे 4) कर्मचारी नेमणे, 5) चारा खरेदी करणे 6) पाण्याची सोय करणे 7) विजेची सोय करणे 8) औषधे खरेदी करणे 09) वैद्यकीय अधिकारी यांची नेमणूक करणे 10) तज्ञ सल्लागार नेमणे 11) कर / बिले भरणे. 12) गायीच्या विविध प्रकरच्या नोंदी घेणे 13) विमा काढणे 14) दुध दुधातील घटकांची तपासणी करुन अहवाल सादर करणे व त्यानुसार कार्यवाही करणे. 15) खतांची विक्री करणे. 16) रिकामे पोते, औषधांचे डब्बे विक्री करणे. 17) जमा खर्च ठेवणे 18) आवक जावक माल

उपरोक्त गोशाळा तयार करणेसाठीची कामे ही नियमात बसुन करावे लागेल.

**गोशाळेपासून संस्थानला मिळणारे घटक/ फायदे:-**

01) धुणीसाठी गोवऱ्या मिळतील, 02) चहासाठी दुध मिळेल

संस्थानमार्फत सध्या प्रायोगिक तत्वावर गोशाळा सुरु करता येईल त्यामध्ये जातीवंत संकरीत गायी कृषी विद्यापीठाकडुन, डेअरी प्रकल्प यांचेकडुन खरेदी कराव्या लागतील. गायींच्या देखभाल करणेकामी वैद्यकिय अधिकारी तसेच तांत्रीक सल्लागारांची नेमणुक करावी लागेल.

संस्थानमार्फत सध्या प्रायोगीक तत्वावर गोशाळा सुरु करणेसाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी व अन्य चांगले नियोजित डेअरी प्रकल्प यांची पाहणी करुन त्यांचे मार्गदर्शनाखाली गोशाळेची उभारणी करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या वतीने गोशाळा सुरु करणेस व त्यासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली. तसेच संस्थानच्या गोशाळेमध्ये गावरान गायांचा समावेश करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **गुरुस्थान निंबवृक्षापासुनटिश्युकल्चरपध्दतीने रोपे तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांचे समाधी मंदिराचे जवळ श्री गुरुस्थान मंदिरालगतच पुरातन निंबवृक्ष आहे.सदर निंबवृक्ष बाबांच्या काळापासुन असल्याने त्याची महती सर्वदुर पसरलेली आहे श्री साई सच्चचरित्रात या वृक्षाचे महत्व सांगितलेले असल्याने व वृक्षाची पाने गोड असल्याने या वृक्षास धार्मिक दृष्टीने महत्व प्राप्त झालेले आहे.

मा. अध्यक्ष महोदय, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांनी गुरुस्थान निंबवृक्षापासुन टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेकामी श्री अशोक जैन (जैन इरिगेशन, जळगाव) यांचे मार्गदर्शन घेणेकामी गुरुस्थान निंबवृक्षाची माहिती देणेबाबत निर्देश दिलेले आहे

सध्या गुरुस्थान निंबवृक्षापासुन टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेबाबत के. एफ. बायोप्लॅन्ट, पुणे यांना गुरुस्थान निंबवृक्षाची कोवळी पाने, फांद्या पुरविण्यात आलेल्या असुन त्यांचेमार्फत सदर निंबवृक्षाची टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेबाबत कार्यवाही चालु आहे

गुरुस्थान निंबवृक्षाच्या एका फांदीचीपाने गोड असल्याने त्यापासुन टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करुन साईभक्तांना वाटप करता येईल. त्याकरीता अशोक जैन (जैन इरिगेशन, जळगाव) यांचेकडुन टिश्युकल्चरसाठी येणाऱ्या खर्चाबाबत माहिती घेऊन आवश्यक ती निंबवृक्षाची कोवळी पाने फांद्या उपलब्ध करुन देता येईल. तसेच त्यांचेकडुन टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करुन घेता येईल

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, गुरुस्थान निंबवृक्षाच्या एका फांदीची पाने गोड असल्यानेत्यांची कोवळी पाने, फांद्या साईभक्तांना उपलब्ध करुन देणेसाठी या निंबवृक्षाची टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८** **शिर्डी शहरातील रस्त्यालगत वृक्षारोपन व सौंदर्यीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा समाधी महाशताब्दी वर्ष ऑक्टोंबर 2017 ते ऑक्टोंबर 2018 (विजयादशमी) अखेर या कालावधीत साजरा करण्यात येणार आहे. तरी सदर वर्षात मोठ्या प्रमाणात साईभक्त शिर्डीत येण्याची शक्यता आहे. शिर्डीमध्ये रस्त्यांच्या कडेला झाडांची संख्या कमी असल्याने श्री साईबाबा समाधी महाशताब्दी वर्षानिमित्त शिर्डीतील रस्त्यालगत वृक्षारोपन व सौदर्यीकरण करणेबाबत साई सेवा फाऊंडेशन, शिर्डी यांचा SSF/58/2016. दि.15/11/2016 अन्वये, प्रस्ताव आलेला आहे. सदर प्रस्तावात त्यांनी संस्थाने सदर वृक्षांचे संगोपणची जबाबदारी स्विकारावी, शिर्डीतील सर्व रस्त्यावर वृक्षारोपनासाठी आवश्यक त्या प्रशिक्षीत मजुरांच्या खर्चाची व्यवस्था करावी तसेच वृक्षारोपन व सौदर्यीकरणाचे काम साईबाबा संस्थानच्या सहकार्याने साई सेवा फाऊंडेशन शिर्डी यांच्या माध्यमातुन व्हावे वृक्षारोपनासाठी आवश्यक त्या शासकिय, निमशासकिय परवानगी घेणेसाठी साई सेवा फाऊंडेशनला संस्थानने सहकार्य करावे तसेच श्री साईबाबा संस्थानच्या परिसरात, रुग्नालय परिसरात, भक्तनिवास परिसरात वृक्ष लागवड करुन सौदर्यीकरण करावे असे सुचविलेले आहे

वृक्षारोपनासाठी आवश्यक ती मदत, तंत्रज्ञ, व शक्य असेल ते वृक्ष विना मोबदला साई संस्थानला देऊ तसेच श्री साईबाबा संस्थानने सदरची योजना स्वतः राबवावी व सदर कार्यात आम्ही विनामोबदला शक्य ती मदत करण्यास तयार आहे असे कळविलेले आहे. शिर्डीत वृक्षारोपन व सौदर्यीकरण लवकरात लवकर व्हावे अशी पत्राद्वारे विनंती केलेली आहे.

यापुर्वी ही स्वच्छ शिर्डी अभियान अंतर्गत ग्रीन शिर्डी क्लीन शिर्डी यांनी शिर्डी शहरातील एकुण20 रस्त्यांच्या कडेला वृक्षारोपन व सौदर्यीकरण करणेकामी श्री साईबाबा संस्थानने सहकार्य करणेकामी कळविलेले होते. शिर्डी शहरातील रस्त्याचे वृक्षारोपन व सौदर्यीकरणाच्या आलेल्या प्रस्तावात, रोपे खरेदी, खड्डे, खते, औषधे यासाठी लागणारा, (वृक्षारोपन व या झाडांचा एका वर्षाचा देखभाल व संगोपन खर्च) असा एकुण रु.1,18,45,920/- (एक कोटी अठरा लाख पंचेचाळीस हजार नऊशे विस) एवढा खर्च संस्थानने संबंधीत नर्सरी व ठेकेदार यांना करावा असा प्रस्ताव स्वच्छ शिर्डी अभियान मार्फत संस्थानला प्राप्त झालेला होता.

त्यानुसार शिर्डी शहरातील रस्त्यंच्या कडेला वृक्षारोपन करणेकामी संस्थानने खर्च करावयाचा किंवा नाही याबाबत निर्णय होणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. दि. 27/10/2015 रोजीच्या मा. व्यस्थापन समिती सभेतील निर्णय क्रं.422 अन्वये, यावर चर्चा होऊन सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासनाची व उच्च न्यायालयाची मान्यता घ्यावी असे ठरले आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाची मान्यात घेणेकामी पत्रव्यवहार करणेत आलेला होता. तसेच मा. उच्च न्यायालयाची परवानगी घेणेकामी विधी विभागामार्फत सिव्हील ॲप्लीकेशन मा. कोर्टात दाखल करण्यात आलेले होते.

महाराष्ट्र शासनाचे क्र.सासंवि-1016/1057/प्र.क.08/का.16 दि.1 जुन 2016 रोजीच्या पत्रान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी अधिनियम,2004 मध्ये वृक्षारोपनाच्या प्रयोजनाकरीता निधी उपलब्ध करुन देण्याची तरतुद नसल्याने शिर्डी शहरातील रस्त्यांच्या कडेला शोभेची झाडे लावणेबाबतचा प्रस्ताव अमान्य करण्यात आल्यामुळे तसेच सदर खर्चास शासनाने मंजुरी न दिल्याने सदरचे सिव्हील ॲप्लीकेशन मा.उच्च न्यायालयातुन मागे घेण्यात आलेले आहे.

तरी साईसेवा फाऊंडेशन, शिर्डी यांच्या आलेल्या प्रस्तावाचा विचार करता महाराष्ट्र शासनाचे पत्रानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, 2004 मध्ये वृक्षारोपनाच्या प्रयोजनाकरीता निधी

उपलब्ध करुन देण्याची तरतुद नसल्याने संदर्भाधीन प्रस्ताव अमान्य करण्यात आलेला आहे, असे कळविलेले आहे.

साई सेवा फाऊंडेशन, शिर्डी यांनी प्रस्तावात नमुद केलेल्या रस्त्यांच्या कडेला संस्थानमार्फत झाडे पुरविता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी शहरातील रस्त्यांचे सौंदर्यीकरणासाठी, या रस्त्यांलगत साई सेवा फाऊंडेशन, शिर्डी यांनी वृक्षारोपन करावे व त्यांचे संगोपन श्री साईबाबा संस्थानमार्फत करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

-----

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९** **साईआश्रम भक्तनिवास इमारतीच्या पेस्ट कंट्रोलचे कामाबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद:-** १७ (१) राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजाअर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**मा.व्यवस्थापन मंडळाचा ठराव:-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/०२/२०१४ रोजी झालेल्या सभेतील निणर्य क्र.१६५

**प्रस्तावना:-** साईभक्तांना किटकांचा त्रास होऊ नये म्हणून मा.व्यवस्थसपन समितीचे दि.१५/०२/२०१४ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र.१६५ नुसार मे.जी.टी.पेस्ट कंट्रोल प्रा.लि., पुणे यांना जा.नं.११८९/ २०१४ दि.०९/०६/२०१४ रोजी कार्यादेश देण्यात आला.

मे.जी.टी.पेस्ट.कंट्रोल.प्रा.लि.पुणे हे करत असलेल्या सुमार व असमाधानकारक कामामुळे किटकांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला असून, वारंवार फेर औषध फवारणी करुनही किटकांचा बंदोबस्त न झाल्याने तसेच याबाबत अनेक साईभक्तांच्या तक्रारी येत असल्याने, वेळोवेळी पर्यवेक्षक व पदाधिकारी यांनी केलेल्या समक्ष पाहाणी तथा सूचनेनुसार मेजी.टी.पेस्ट.कंट्रोल.प्रा.लि.पुणे यांचे काम बंद करुन साईधर्मशाळा विभागाकडील निम्नतम दरधारक मे.स्टर्लिग पेस्ट कंट्रोल.प्रा.लि.ठाणे यांचेकडून पुढील कामे करुन घेणेस मा.व्यवस्थापन मंडळाकडे प्रस्ताव सादर केला आहे.

दि.१६/११/२०१६ रोजी मे.स्टर्लिग प्रस्ट कंट्रोल.प्रा.लि.ठाणे यांना साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) विभागातील पेस्ट कंट्रोलची कामे मंजूर दराने करुन देण्याचे काम सुरु केले आहे. साईप्रसाद व व्दारावती भक्तनिवास या ठिकाणचे पेस्ट कंट्रोलचे काम करणे बाकी आहे. तसेच त्यांना साई धर्मशाळेकडीलही काम करावे लागते.

दि.११/१२/२०१६ रोजी देश-विदेशातील साई मंदिराचे प्रतिनिधींचे चर्चासत्र साईआश्रम भक्तनिवास येथे आयोजित केले आहे. इकडील खोल्यांमध्ये असणा-या किटकांचे प्रादुर्भावावर दि.१६/११/२०१६ रोजी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षेमध्ये चर्चा झाली त्यामध्ये..

१. साईआश्रम भक्तनिवास इमारतीमधील ८० % खोल्यांमध्ये किटकांचा मोठ्याप्रमाणात प्रादुर्भाव असलेबाबत,
२. प्रचलित पेस्ट कंट्रोल ठेकेदार मे.जी.टी.पेस्ट.कंट्रोल.प्रा.लि.पुणे यांचे असमाधानकारक कामाबाबत,
३. मे.जी.टी.पेस्ट.कंट्रोल.प्रा.लि.पुणे यांचे काम तुर्त बंद करणे व निम्नतम ठेकेदार यांना काम देणेबाबत,
४. साई धर्मशाळा विभागाकडील निम्नतम ठेकेदार मे.स्टर्लिग पेस्ट कंट्रोल.प्रा.लि, ठाणे यांनी साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) विभागातील खोल्यांमधील काम सुरु केल्याने तसेच त्यांना उर्वरित निवासस्थानांच्या ठिकाणी पेस्ट कंट्रोल करुन देणे असलेबाबत.
५. वेळ कमी असल्याने व काम करणे अगत्याचे असल्याने तातडीने साईधर्मशाळा विभागाकडील निम्नतम दरधारक ठेकेदार मे.स्टर्लिंग पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस.प्रा.लि,ठाणे यांचे मंजूर दराने व आहे त्याच अटी/शर्ती कायम ठेऊन काम करुन घ्यावे किंवा कसे याबाबत चर्चा झाली.

सदर चर्चेमध्ये कामाची तातडी, कमी असलेली वेळ, येणारे मान्यवर, संस्थानचे नाव लौकीक यांचा विचार करता. उपलब्ध पेस्ट कंट्रोल ठेकेदार मे.स्टर्लिंग पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस.प्रा.लि,ठाणे यांचेकडून त्यांचे दि.१८/०४/२०१६ रोजीचे मंजूर दराने व आहे त्याच अटी/शर्ती कायम ठेऊन प्रभावी किटकनाशक औषध

फवारणी करुन घ्यावी व येणा-या प्रतिनिधींना किटकांचा त्रास होणार नाही याची दक्षता/ खबरदारी घेणेबाबत निर्देश देण्यात आले.

यासाठी श्री.दिपक गुणाजी वाकुडे प्रतिनिधी मे.स्टर्लिंग पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस.प्रा.लि,ठाणे यांना दि.१६/११/२०१६ रोजी समक्ष पाचारण करुन त्यांना सदरचे कामाबाबत संपूर्ण माहिती दिली, अटी/शर्तीबाबत अवगत केले त्यांनी प्रस्तुत कामी आवश्यक ती अर्हतता धारण केली किंवा कसे याबाबत विचारणा केली. त्यांनी आपणास आवश्यक किटकनाशक औषध फवारणी रु.०.६३ पैसे मात्र या मंजूर दराने आहे त्याच अटी/शर्तीस अनुसरुन काम करुन देण्याचे मान्य केले व त्यांचे संमती पत्र सादर केले. व आवश्यक ती सर्व कागदपत्रे साईधर्मशाळेकडील निविदा प्रपत्रासोबत सादर केली असल्याचे सांगितले.

**छाननीनुसार अनुमान:-** महाराष्ट्र शासनाने संमत केलेला अधिनियम २००४ तथा मा.व्यवस्थापन समितीचा मान्य निर्णय व निर्णयार्थ सादर प्रस्ताव, कामाची तातडी याचा विचार करता सदरबाबत कार्यवाही करता येईल.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय:-** दि.११/१२/२०१६ रोजी साईआश्रम भक्तनिवास येतील सर्व खोल्या देश विदेशातील साई मंदिर प्रतिनिधींचे निवासासाठी मोफत देण्यात येणार आहे. येणा-या मान्यवरांना किटकांचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी प्रस्तावीत टिपणीमधील ०१ ते ०५ बाबींचा विचार करता खास बाब म्हणून साईधर्मशाळेकडील निम्नतम ठेकेदार मे.स्टर्लिग पेस्ट कंट्रोल.प्रा.लि.ठाणे यांचेकडून त्यांचे मंजूर दर रु **०.६३ /-** या निम्नतम दराने आहे त्याच अटी/शर्तीस आधिन ठेवुन काम करुन घ्यावे लागेल त्यासाठी खालील प्रमाणे खर्च आपेक्षित आहे.

| १२ इमारतीमधील खोल्या, टॉयलेट, बाथरुम व स्टोअर रुम यांचे एकूण क्षेत्रफळ **३,४९,७३५** चौ.फुट एका इमारतीचे क्षेत्रफळ | | इमारती संख्या | पेस्ट कंट्रोल करणे इमारतीनिहाय विशेष बाब म्हणून एक फवारणी (सर्व समावेशक करासह) प्रती चौरस फुटाप्रमाणे **रु.०.६३** पैसे प्रमाणे करणे |
|---|---|---|---|
| एका इमारतीसाठी I.W.C. | २८,९०८.७२ चौ.फुट | ०५ | **१५,१७७.०७** |
| एका इमारतीसाठी E.W.C. | २९,२७९.९२ चौ.फुट | ०७ | **२१,५२०.७४** |
| R-Block मधील टॉयलेट | २३२.३२ चौ.फुट | ०१ | २४.३९ |
| | | | **एकूण= ३६,७२२.२०** |
| | | | **पुर्णाकिंत रक्कम ३६,७२२** |

तरी सदरचे प्रस्तावात नमुद प्रमाणे-

खास बाब व तातडी म्हणून इकडील इमारतीचे सर्व खोल्यांमध्ये मे.स्टर्लिंग पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस प्रा.लि., ठाणे यांचे कडून एकप्रभावी किटकनाशक औषध फवारणी करुन घेणेस व येणा-या पुर्णांकीत खर्च रक्कम रु.४०,०००/- (अक्षरी रु.चाळीस हजार) मात्रचे खर्चास, दि.१८/११/२०१६ रोजीचे मंजूर टिपणीन्वये मान्यता प्राप्त आहे. कामाची तातडी, कमी असलेला वेळ, किटकांचा वाढलेला प्रादुर्भाव यामुळे साईभक्तांना होणारा त्रास याचा विचार करता, मे.स्टर्लिंग पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस प्रा.लि., ठाणे यांचेकडून तातडीने काम करुन घेणेकामी रितसर कार्यादेश जा.नं.एसएसएस/वशी-साईआश्रम भक्तनिवास/ ४३९३/ २०१६ दि.२१/११/२०१६ रोजी पारित केला असून, प्रस्तुतचे काम तातडीने दि.२२/११/२०१६ पासून करुन घेण्यात येत आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभे समोर कार्योत्तर मंजूरीसाठी सादर

**निर्णय क्र.८६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास इमारतीच्या पेस्ट कंट्रोल कामाबाबतच्या उपरोक्त प्रस्तावाचे अवलोकन करणेत येऊन, त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२०** **निळवंडे धरणाचे डाव्या कालव्याच्या कामासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत रु.५००/- कोटी निधी उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

| अ.नं. | कलम/ तरतुद क्रमांक | कलम/ तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | २१ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ (क) | (१ क) पोटकलम (१) च्या तरतुदीस अधीन राहून, विश्वस्तव्यवस्थेस, राज्यशासनाच्या पूर्व मंजुरीने आणि राज्य शासनाकडुन राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाव्दारे विनिर्दिष्ट करण्यो येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तीच्या अधीन राहून, भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यांसारख्यापायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकिय विभागांना, शासकिय महामंडळांना, शासकिय कंपन्यांना किंवा शासकिय उपक्रमांना सहाय्यक अनुदान देता येईल. |

**प्रस्तावना:-** तात्कालीन कृषी व पणन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी तात्कालीन मुख्यमंत्री महोदांना अग्रेषित दि.२०/०८/२०१२ व दि.०८/०४/२०१३ रोजीचे पत्राची प्रत संस्थान कार्यालयास प्राप्त झालेली होती. सदरचे पत्रात निळवंडे धरणांतून पाणी आरक्षण ठेवण्यासोटी निळवंडे धरणांचे डाव्या कालव्याच्या कामांसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत रु.५०० कोटी निधी राज्यशासनास उपलब्ध करुन देणेस विनंती करण्यात आलेली होती. सदरहु प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.११/०९/२०१४ रोजीचे सभेत निर्णयार्थ सादर करणेत आलेला होता.

**मा.व्यवस्थापन समिती सभा निर्णय:-** सदरहू प्रकरणी मा.व्यवस्थापन समितीचे दि.११/०९/२०१४ रोजीचे सभेत खालीप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे

*आयत्या वेळचा विषय नं.०१, निर्णय क्रं.७९३*- *"यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.नामदार राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री, कृषी व पणन- महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि०८/०४/२०१३ रोजी दिलेल्या पत्रास अनुलक्षून आता चर्चेअंती मात्र असे ठरविण्यात आले की, मंत्री महोदयांनी मागणी केलेला निधी किंवा त्यापैकी निधी शासन दरबारी परवानगीसाठी मागणी करणे उचित होणार असल्याने तसा प्रस्ताव शासनास दाखल करावा व शासन मान्यतेनंतर निधी टप्प्याटप्प्याने, उसनवारीने, ठराविक मुदतीत देता येऊ शकेल असे मान्य झाल्यास मा.उच्च न्यायालयाचे परवानगीसाठी तसा प्रस्ताव दाखल करावा."*

मा.व्यवस्थापन समितीचे दि.११/०९/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७९३ अनुसरुन जा.क्रं.एसएसएस/ वशी/ पाणी पुरवठा/२८६७/२०१४, दि.१२/०९/२०१४ अन्वये सदरहू प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. याविषयी शासनाकडुन अदयापपर्यंत अंतिम मान्यता/निर्णय प्राप्त नाही.

**प्रस्ताव:-** निळवंडे धरणाच्या डाव्या कालव्याच्या कामासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडून रु५०० कोटी निधी उपलब्ध होणेबाबत गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचे जा.क्र.गोमपाविम/ तां-५/७३०२, दि.२०/०८/२०१६ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास दि.३१/०८/२०१६ रोजी प्राप्त झालेले आहे. त्यासोबत मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली दि.१९/०३/२०१५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त जोडलेले आहे. बैठकीच्या इतिवृत्तातील मुद्दा क्रं.२ च्या अनुषंगाने रु५०० कोटी संस्थानमार्फत उपलब्ध करणेबाबत चर्चा झालेली असून त्याअनुषंगाने प्रस्ताव गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद कार्यालयास उपलब्ध करुन देण्याची विनंती करण्यात आलेली आहे व त्यानुसार प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी शासनास पाठविणे शक्य होईल, असे नमुद आहे.

तसेच, महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचेकडील क्रं.सासंवि-२०१४/६११/प्र.क्रं.८८/का.१६, दि.०३/११/२०१६ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झालेले आहे. सदरचे पत्रात नमुद केलेप्रमाणे निळवंडे धरणांतून पाणी आरक्षण ठेवण्यासोटी संस्थानने डाव्या कालव्यांच्या कामासाठी रुपये पाचशे कोटी इतका निधी शासनास उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव नवनियुक्त व्यवस्थापन समितीचा अभिप्राय प्राप्त करुन घेऊन प्रस्ताव शासनास फेरसादर करण्यात यावा असे कळविलेले आहे.

निळवंडे धरणाचे डाव्या कालव्याच्या कामासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत रु.५०० कोटी निधी उपलब्ध होणेबाबत गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचे जा.क्र.गोमपाविम/ तां-५/७३०२, दि.२०/०८/२०१६ रोजीचे पत्रात सदरचा निधी परत करण्याचा बोलीवर देण्यात यावा असा स्पष्ट उल्लेख नाही. सदरहू प्रस्ताव संस्थानकडुन प्रस्ताव उपलब्ध करुन देणेबाबत विनंती करण्यात आलेली आहे.

तसेच निळवंडे धरणाचे डाव्या कालव्याच्या कामासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत रु.५०० कोटी निधी देणेबाबतचे प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.११/०९/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७९३ अनुसरुन सदरहू प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. यावर शासनाकडुन निळवंडे धरणाचे डाव्या कालव्याचे कामांसाठी संस्थानने निधी उपलब्ध करुन दयावा अथवा परत करण्याचा बोलीवर देण्यात यावा अशा असा आदेश प्राप्त नाही.

**विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय:-** गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचे दि.२०/०८/२०१६ रोजीचे पत्रास अनुसरुन निळवंडे धरणाच्या डाव्या कालव्याच्या कामासाठी श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांचेकडुन रु५०० कोटी निधी उपलब्ध करुन देणेबाबत केलेल्या मागणीबाबत व महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांचेकडील क्रं.सासंवि-२०१४/६११/प्र.क्रं.८८/का.१६,दि.०३/११/२०१६ रोजीचे पत्रानुसार सदरचा प्रस्ताव नवनियुक्त व्यवस्थापन समितीचा अभिप्राय प्राप्त करुन घेऊन शासनास फेरसादर करणेबाबत दिलेल्या निर्देशानुसार प्रस्तुत प्रकरणी निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर करावा लागेल.

तरी निळवंडे धरणाच्या डाव्या कालव्याच्या कामासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडून रु५०० कोटी निधी उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ फेरसादर.

**निर्णय क्र.८६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानमार्फत दर्शनरांगेतील साईभक्तांसाठी चहा, कॉफी, दुध, बिस्कीटे व प्रसादालयामधील प्रसाद भोजन मोफत पुरविणेत येत आहे तसेच संस्थानमार्फत धर्मदाय रुग्णालय चालविले जाते व बाहेरील रुग्णालयातील रुग्णांना गंभीर आजारांसाठी वैद्यकिय आर्थिक अनुदानही पुरविणेत येत आहे. तसेच श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे करावयाचे असून समाधी शताब्दी वर्षामध्ये श्री क्षेत्र शिर्डी येथे मोठया प्रमाणात साईभक्त येतील, या साईभक्तांना सोयी-सुविधा पुरविणेसाठी मोठया स्वरुपाचे विविध प्रकल्प राबवावयाचे आहेत, त्यासाठी संस्थानकडे निधी अपुरा असून याकामी संस्थानने शासनाकडे निधीची मागणी केलेली आहे व शासनाने संस्थानला निधी पुरविणे अभिप्रेत आहे. या बाबींमुळे पाण्याला प्राधान्य असूनही निळवंडे धरणाच्या डाव्या कालव्याच्या कामासाठी संस्थानमार्फत निधी उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही, असे शासनास कळविणेत यावे.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२१** **Setup Box (डीश) वरील श्रींचे ऑनलाईन दर्शन-तथा-आरती सुविधेची निवड प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत Tata Communications Ltd., Mumbai यांचेमार्फत चालु ठेवणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुद :** कलम 21 (1) ग नुसार.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:** मा.व्य.समितीचे दि. 08/10/2013 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 710.

प्रस्ताविक: मा. व्यवस्थापन समितीचे दि.08/10/2013 रोजीचे सभेतील निर्णयानुसार डीटीएच टि व्ही. व्दारे लाईव्ह दर्शन सुविधा पुरविणेकामी Tata Communications Ltd., Mumbai यांचे तिन वर्षासाठीचे दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले. तसेच त्यांच्या या सेवेबाबतचा करारनाम्याचा मसुदा तज्ञ कायदेशीर सल्लागाराकडुन तयार करुन घेण्यात यावा, यासाठी येणाऱ्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. त्यानुसार त्यांना जा नं. एसएसएसटी/आयटी/4475/2013 दिनांक 01/01/2014 रोजी अन्वये कार्यादेश देण्यात आला आहे.

कार्यादेशाप्रमाणे Tata Communications Ltd., Mumbai यांचा कालावधी दि.13/11/16 रोजी संपुष्टात येत आहे

त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि.08/10/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 331 अन्वये श्रींचे ऑनलाईन D2H (डिश), टिव्ही चॅनेल, वेबसाईट व मोबाईल वरील दर्शन सुविधा पुरविणेकामी फेर ईनिविदा दि.18/08/2016 ते दि.10/09/2016 या कालावधीत मागविण्यात आल्या होत्या. सदरच्या ई-निविदामधील Technical Bid दि.21/10/2016 रोजी मा.प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांचे उपस्थितीत उघडण्यात येऊन त्यामध्ये खालीलप्रमाणे ई-निविदा प्राप्त झालेल्या आहे.

| अ.नं. | पुरवठाधारक | तपशिल | दिनांक व आवक नं. |
|---|---|---|---|
| 1 | Shemaroo Entertainment Ltd, Mumbai | DTH Platforms | 31/08/2016 No. 9922 |
| 2 | Tata Communications Limited, Mumbai | DTH Platforms | 13/09/2016 No. 10647 |
| 3 | Tata Communications Limited, Mumbai | Tv Channel | 13/09/2016 No. 10646 |
| 4 | Associated Broadcasting co.Pvt. Ltd, Hyderabad | Tv Channel | 20/09/2016 No. 11126 |
| 5 | Shemaroo Entertainment Ltd, Mumbai | Mobile & Internet | 31/08/2016 No. 9921 |
| 6 | Tata Communications Limited, Mumbai | Mobile & Internet | 13/09/2016 No. 10645 |

विषयाकींत प्रकरणी प्रत्येकी कमीत-कमी तिन ई-निविदा प्राप्त होणे अपेक्षित होते परंतु, उपरोक्त तपशिलानुसार प्रत्येकी दोनच ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्यामुळे पुनश्च तृतिय वेळेस ई-निविदा मागवाव्यालागणार आहे. निविदा प्रकाशित करणेसाठी मान्यता घेण्यात आलेली आहे. व ई-निविदेची कार्यवाही सुरू करणेत आली आहे

दि. 03/11/2016 रोजीचे ई-मेलनुसार Tata Communications Ltd., Mumbai यांनी पुर्वीच्या कार्यादेशातील शेवटच्या वर्षाचे (रक्कम रु. 1,90,00,000/-) दराप्रमाणे दर देणेस तयारी दर्शविलेली आहे.

तरी, डीटीएच टि.व्ही. व्दारे लाईव्ह दर्शन सुविधा पुरविणेकामी पुढील निवड प्रक्रिया पुर्ण होऊन नविन पुरवठाधारकास कार्यादेश देईपर्यंत Tata Communications Ltd., Mumbai यांना डीटीएच टिव्ही. व्दारे लाईव्ह दर्शन सुविधेचे सिग्नल पुर्वीच्या कार्यादेशातील दराप्रमाणे मुदतवाढ देणेकामी सदरचा प्रस्ताव मा व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.८६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डीटीएच टि.व्ही. व्दारे लाईव्ह दर्शन सुविधा पुरविणेकामी पुढील निवड प्रक्रिया पुर्ण होऊन नविन पुरवठाधारकास कार्यादेश देईपर्यंत** Tata Communications Ltd., Mumbai **यांना डीटीएच टिव्ही. व्दारे लाईव्ह दर्शन सुविधेचे सिग्नल पुरविणेकामी पुर्वीच्या कार्यादेशातील अटी/शती व दराप्रमाणे मुदतवाढ देण्यात यावी.**

**सदरहू लाईव्ह दर्शन चालू असताना वेगवेगळया कलाकारांची भजने ऐकविणेत यावी व डिस्प्लेवर छोटया पट्टीमध्ये संस्थानच्या वेगवेगळया प्रकल्पाची माहिती प्रकाशित करणे बंधनकारक करणेत यावे. तसेच आरत्या व दर्शन यांचे स्थानिक व राष्ट्रीय पातळीवरील चॅनेल्सकडून वेगवेगळे दर मागविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२२** **साईभक्तांना मार्गदर्शनाकरीता संस्थानचे संकेतस्थळ www.sai.org.in ही वेबसाईट अद्ययावतीकरण व मोबाईल ॲप्लीकेशन विकसीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.** 1) मा.व्य.समितीचे दिनांक 19/09/2016 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.656.

**प्रास्ताविक:** श्री साईबाबा संस्थानची www.shrisaibabasansthan.org ही अधिकृत वेबसाईट माहे 1999 पासून कार्यान्वीत करण्यात आली आहे. वेबसाईटमध्ये वेळोवळी बदल करुन ती सध्या इंग्रजी, मराठी व हिंदी अशा मुख्य तीन भाषेमधून प्रसारित करण्यात येत आहे संस्थान प्रकाशीत सर्व भाषेतील पुस्तकांचे डिजीटलायझेशन करुन ते वेबसाईटवर प्रकाशीत करण्यात आले आहेत. संस्थानचे प्रकाशीत होणारे सर्व साईलीला अंक वेबसाईटवर अपलोड केले जातात. त्याचप्रमाणे संस्थानचे माहे- जून, सन 1923 पासूनचे साईलीला अंक वेबसाईटवर अपलोड केली आहे. संस्थानच्या विविध उपक्रमांची अद्यावत माहिती वेबसाईटवर देण्यात येते. श्रींचे मुळ छायाचित्रांसहीत विविध प्रासंगीक छायाचित्रे प्रसारित करण्यात येत आहेत. तसेच संस्थानचे विविध विभागांच्या निविदा, सांख्याकी माहितीही वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आलेली आहे. संस्थानची विकसीत केलेली वेबसाईट ही साधारणतः 18 वर्षापुर्वी विकसीत केलेली आहे. तसेच साईटेक

प्रकल्पाअंतर्गत साईभक्तांना सेवा पुरविणेकामी (रुम बुकींग, दर्शन/आरती व देणगी) इत्यादी सेवा स्वतंत्र देण्यासाठी www.online.sai.org.in ही वेबसाईट जुलै, 2011 पासुन उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**अ]** सद्यस्थितीत कार्यान्वीत असलेले www.sai.org.in हे संकेतस्थळ नविन टेक्नॉलॉजी वापरुन नुतनिकरण करणे आवश्यक आहे. त्यामुळे साईभक्तांना अधिकाधिक सुविधा पुरविणे सोईचे होईल त्यामध्ये प्रामुख्याने RTI, Resolution, E-library, E-Recruitment, Feedback form, Multilingual इ. बाबींचा समावेश आहे.

**ब]** सध्या Android Based Mobile धारकांची प्रंचड स्वरुपात वाढ झालेली आहे (मोबाईल ॲप्लीकेश) जास्त वापरात आहे. या अनुषंगाने संस्थानचेही मोबाईल ॲप्लीकेशन विकसीत करता येईल यामुळे अधिकाधिक साईभक्तांपर्यंत संस्थान व संस्थानमधील उपक्रमांची माहिती पोहचवता येईल.

संस्थानकडे सध्या सदर प्रकल्पासाठी DPR बनविणे, RFP, Technical evaluation, Security and system implementation साठी सल्लागाराची आवश्यकता आहे याकामी सल्लागार नेमण्यासाठी खालीलप्रमाणे दोन पर्याय उपलब्ध करण्यात आलेले होते.

**पर्याय क्रं. 01-** श्री रतीष तावडे यांनी विनामुल्य सेवा देणेसाठी संस्थानच्या दि. 01/11/2014 ते दि. 21/11/2014 रोजीच्या जाहिरातीप्रमाणे प्रस्ताव सादर केला होता. परंतु, शासनाचे नियमानुसार कोणत्याही व्यक्तीची सल्लागार म्हणुन नेमणुक करतांनी शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यानुसार जा. नं. 1879/ 2016 दि. 16/07/2016 रोजीचे पत्रान्वये शासनास कळविलेले आहे. तसेच श्री विजय नायडु यांना तांत्रिक सल्लागार म्हणुन दि. 01/04/2014 ते दि. 31/03/2019 या कालावधीसाठी नेमण्यात आलेले आहे. तरी वेबसाईट व मोबाईल ॲप्ससाठी या दोघांचा एक तांत्रिक सल्लागार पॅनल तयार करुन सदरचा प्रकल्प त्यांचे मार्गदर्शनाखाली राबविता येईल.

**पर्याय क्रं. 02-** आयटी विभागामार्फत सदर प्रकल्पासाठी ई-निविदा राबवुन नामांकित कन्सल्टन्सी कंपनीचे प्रस्ताव मागवावे लागणार आहे. तद्नंतर त्यांची नेमणुक करुन त्यांचेमार्फत DPR, RFP Tender प्रक्रिया राबवता येईल यामुळे सहजिकच नुतनिकृत वेबसाईट व Mobile apps साई भक्तांसाठी उपलब्ध करणेस उशिर होऊ शकतो.

याप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 19/09/2016 रोजीचे सभेसमोर विषय नं.19 अन्वये सल्लागार संदर्भात प्रस्ताव मांडण्यात आला होता, त्यावर निर्णय क्रं. 656 ने खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तव चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानच्या www.sai.org.in या अधिकृत संकेतस्थळाचे अद्यावतीकरण तसेच मोबाईल ॲप्स विकसित करणेसाठी ई-निविदा प्रक्रिया राबविणेत येऊन, नांमाकित कन्सल्टन्सी कंपनीचे प्रस्ताव मागविण्यात यावे असे ठरले."

त्यानुसार इकडील विभागाने जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेसाठी प्रस्तावित केलेले होते. परंतु नांमाकित कंपन्यांचे प्रात्यक्षीक पाहिल्यावर नविन वेबसाईट, मोबाईल ॲप्सची अद्यावत संकल्पना व तंत्रज्ञान याची माहिती होऊ शकते. यासाठी खालील कंपन्यांचे प्रतिनिधींनी दि. 11/11/2016 रोजी मा.अध्यक्ष सो., यांचे समोर नुतनिकृत वेबसाईट व मोबाईल ॲप्ससाठी त्यांच्यासंकल्पना मांडण्यात आलेल्या आहेत.

| Sr. No. | Company Name |
|---|---|
| 01 | Cygnet Infotech |
| 02 | Pinnacle Teleservices Pvt.Ltd |
| 03 | Inkawipe Consulting LLp |
| 04 | Hungama Digital Services |

त्यावर वेबसाईट नुतनिकरण व मोबाईल ॲप्सकरीता 05 वर्षाच्या दुरुस्ती देखभालीसह साधारणपणे 45 ते 50 लाखापर्यंत खर्च अपेक्षीत आहे. सल्लागाराची निविदा प्रक्रिया चालु असलेबाबत इकडील विभागाने सद्यस्थिती सांगण्यात आली होती. त्यावर सल्लागार न नेमता थेट वेबसाईट नुतनिकरण व मोबाईल ॲप्स विकसित करणेकामीचे थेट निविदा मागविण्यात याव्या, असे सुचित केले आहे.

**मागणी:** प्रास्ताविकेमध्ये नमुद केलेप्रमाणे वेबसाईट नुतनिकरण व मोबाईल ॲप्लीकेशन हे विकसीत करणे व 05 वर्षाच्या दुरुस्ती देखभालीसह एकत्रीत अंदाजे रक्कम रु.45,00,000/- + टॅक्स मात्र खर्च अपेक्षीत आहे, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे वेबसाईट नुतनिकरण व मोबाईल ॲप्लीकेशन हे विकसीत करणे व 05 वर्षाच्या दुरुस्ती देखभालीसह एकत्रीत अंदाजे रक्कम रु.45,00,000/- + टॅक्स मात्र अपेक्षीत असुन सदरच्या खर्चास मान्यता घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.८६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे संस्थानच्या अधिकृत वेबसाईटचे नुतनीकरण तसेच मोबाईल ॲप्लीकेशन विकसीत करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

**ई-निविदेमध्ये संबंधीत कंपनीची वार्षिक उलाढाल कमीत्कमी रु.३० ते ४० लाख मात्र असावी व ३० ते ४० वेबसाईटचे अद्ययावतीकरण/ नुतणीकरण (Dynamic webportale with cloud technology, at least 4-5 website should have more than 1 lakh pages and having audio/ video compatibility an social media plugins on all web pages) करणेचा अनुभव असावा, या अटींचा समावेश करणेत यावा. तसेच बीएसएनएल कंपनीसही ई-निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होणेबाबत कळविणेत यावे, असे ठरले.**

**तसेच काही व्यक्ती अनधिकृतपणे संस्थानच्या नामसाधर्म्य असलेल्या खोटया वेबसाईटस्, फेसबुक, ट्विटर तयार करुन साईभक्तांची फसवणूक करतात, अशा तक्रारी येत आहेत. याकरीता त्यांची यादी करणेत येऊन, ती समिती सदस्यांना पुरविणेत यावीव अशा व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करणेत यावी, अशा सुचना केल्या.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२३** **दर्शन रांगेत साईभक्तांना शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणेकरीता वॉटर कुलर खरेदी करणे व आर.ओ. प्लँटची उभारणी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.अध्यक्ष महोदय यांनी दिनांक ९ आक्टोबर, २०१६ रोजी मा.कार्यकारी अधिकारी व मा.उप-कार्यकारी अधिकारी यांचे समवेत मंदिर परिसरात व संस्थानचे इतर विभागामध्ये झालेल्या राऊंडमधील तसेच मा.व्यवस्थापन समितीचे बैठकीमध्ये दिलेल्या सूचनांनुसार जा.नं. एसएसएस/वशी-काअ/२६३७/२०१६ दिनांक १४.१०.२०१६ रोजीचे परिपत्रकातील अ.नं. २ नुसार संस्थानमध्ये (दर्शन रांगेत) आर.ओ. प्लॅन्ट कार्यान्वित करणेबाबत प्रस्ताव सादर करावा तसेच अ.नं. ११ नुसार दर्शन रांगेतील वॉटर कुलर यंत्रण बदलविणे बाबत निर्देश दिलेले आहे.

उपरोक्त निर्देशानुसार इकडील विभागामार्फत दर्शन रांगेत प्रत्यक्ष पहाणी केली असता खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल

**(अ)** शांतीनिवास व भक्तीनिवास येथील दर्शन रांगेतील साईभक्तांना शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करणेकामी १२० लिटर क्षमतेचे ६ नग वॉटर कुलर बसविणेत आलेले आहेत. सदरच्या वॉटर कुलरची क्षमता साईभक्तांचे संख्येचे तुलनेत कमी पडते याकरीता खालील तपशीलाप्रमाणे अतिरिक्त वॉटर कुलर बसविता येतील:

| अ.नं. | ठिकाण | संख्या | अ.नं. | ठिकाण | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | शांतीनिवास इमारत तळमजला | २ | ३. | भक्तीनिवास इमारत दुसरा मजला | १ |
| २. | शांतीनिवास इमारत पहिला मजला | २ | ४. | भक्तीनिवास इमारत तिसरा मजला | १ |
| | | | | **एकूण:** | ६ |

उपरोक्तप्रमाणे शांतीनिवास व भक्तीनिवास इमारत दर्शन रांगेत ६ नग वॉटर कुलर वाढविता येतील. मात्र सदरचे आवश्यक वॉटर कुलर इकडील विभागाकडे उपलब्ध नसल्याने नविन खरेदी करावे लागतील. नुकतेच श्री साई प्रसादालयामध्ये वॉटर कुलर बसविणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागवून, निम्नतम दरधारक मे. कुलब्रीज, पुणे यांना एका वॉटर कुलर करीता रुपये४४,१५०/- मात्रचे दरानुसार कार्यादेश देण्यात आला आहे. या रकमेत ५% वाढ करुन खालील तपशीलाप्रमाणे वॉटर कुलर खरेदीकामी अंदाजे खर्च अपेक्षित आहे :

| अ.नं. | तपशील | संख्या | अंदाजे दर | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| 1. | वॉटर कुलर<br>क्षमता – १२० लिटर कुलींग/ तास<br>कंपनी – व्होल्टाज | ६ नग | ४६,३५०/- | २,७८,१००/- |

उपरोक्तप्रमाणे १२० लिटर कुलींग/ तास तसेच १२० लिटर स्टोरेज क्षमतेचे ६ नग वॉटर कुलर खरेदीकामी अंदाजे रुपये २,७८,१००/- मात्रचा अपेक्षित खर्च येणार आहे.

**(ब)** दर्शन रांगेतील साईभक्तांना थंड पाणी उपलब्ध होणेकरीता सध्या ६ नग वॉटर कुलर बसविण्यात आलेले आहेत. यापैकी ४ वॉटर कुलरला ३५ लिटर/तास क्षमतेचे आर.ओ. प्लॅन्ट बसविणेत आलेले आहेत. या प्लॅटची पाणी शुध्दीकरण्याची क्षमता कमी व वापर जास्त असलेने त्यांचा वारंवार मेटेंनन्स करावा लागतो. त्याकरीता अतिरीक्त नविन वॉटर कुलर बसविलेनंतर दर्शन रांगेतील सर्व वॉटर कुलरकरीता एक मोठा नविन आर.ओ. प्लॅन्ट असणे आवश्यक आहे, जेणेकरुन सर्वच वॉटर कुलरला त्याचा पुरवठा करुन साईभक्तांना शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करता येईल. तसेच मंदिर परिसरातील साईभक्तांना पिण्याचे पाण्याकरीता शनीगेट शेजारील वॉटर कुलर तसेच गेट नं. २ व गेट नं. ३ या ठिकाणी ठेवलेल्या वॉटर कुलर या ठिकाणीही आर.ओ. वॉटरचा पुरवठा करता येईल. याकरीता शांतीनिवास व भक्तीनिवास इमारतीचे टेरेसवर १००० लिटर / तास क्षमतेचा प्रत्येकी एक आर.ओ. प्लॅन्ट उभारणी करता येईल. तसेच त्याठिकाणी प्रत्येकी २००० लिटर क्षमतेचा एस.एस. मध्ये स्टोरेज टॅंक ठेवता येईल. १००० लिटर / तास क्षमतेचा आर.ओ. प्लॅन्ट बसविणा-या एजन्सीची इंटरनेटव्दारे माहिती घेवून त्यांचेशी संपर्क करुन कोटेशन मागविण्यात आली असता, त्यांनी आर.ओ. प्लॅन्ट व त्याअनुषंगीक आवश्यक मटेरिअलसह एका प्लॅन्टकरीता अंदाजे रुपये ३,५०,०००/- मात्रचा खर्च कळविला आहे. म्हणजेच प्रत्येकी १,००० लिटर / तास क्षमतेचे २ नग आर.ओ. प्लॅन्ट उभारणीकरीता अंदाजे रुपये ७,००,०००/- मात्रचा खर्च आपेक्षित होता. तथापि, श्री साईप्रसादालयात प्रसाद भोजन घेणा-या साईभक्तांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होणेकरीता राजु वेगसना फाऊंडेशन, सिंकदराबाद यांनी तासी २००० लिटर क्षमतेचा आर.ओ. प्लॅन्ट देणगी स्वरुपात इन्स्टॉल करुन दिलेला आहे. दिनांक २७.१०.२०१६ रोजी श्री आनंद राजु, चेअरमन, राजु वेगसना फाऊंडेशन हे शिर्डी येथे श्री साईच्या दर्शनाकरीता आले असता

प्रस्तावीत प्रकल्पाबाबत त्यांना सांगितले असता त्यांनी दोन्ही आर. ओ. प्लॅन्ट देणगी स्वरुपात देणेस सहमती दर्शविली आहे. मात्र आर. ओ. प्लॅन्ट ते कुलर सर्व प्लॅबींग कामे संस्थानमार्फत करुन देणेस सांगितले आहे. त्यानुसार इकडिल जा. नं. एसएसएस/वशि/मेकॅनिकल/ ४०९०/२०१६ दिनांक ४/११/२०१६ रोजीचे अन्वये आर. ओ. प्लॅन्ट देणगी स्वरुपात बसवून देणेबाबत पत्र देण्यात आलेले आहे.

**(क)** आर.ओ. प्लॅन्ट उभारणीनंतर, प्लॅन्ट ते वॉटर कुलरपर्यंत नविन पाईप लाईन कनेक्शन करावे लागणार आहेत. याकामी पुरवठा विभागाकडील कर्मचारी यांचे सोबत प्रत्यक्ष पहाणी केली असता, सर्व पाईप लाईन कनेक्शन करणेकामी आवश्यक मटेरियल खरेदीकरीता अंदाजे रुपये २,२५,०००/- मात्रचा खर्च अपेक्षित असल्याचे, पाणी पुरवठा विभागाने कळविले आहे.

उपरोक्त **'अ'** व **'क'** कामी खालीलप्रमाणे एकत्रित खर्च अपेक्षित आहे :

| **क्र.** | **कामाचा तपशील** | **अपेक्षित रक्कम रुपये** |
|---|---|---|
| अ) | वॉटर कुलर ६ नग खरेदी करणे | २,७८,१००/- |
| क) | आर.ओ. प्लॅन्ट ते वॉटर कुलर पर्यत पाईप लाईन करणे | २,२५,०००/- |
| | **एकूण :** | **५,०३,१००/-** |

वरीलप्रमाणे दर्शन लाईनमध्ये साईभक्तांना शुध्द पाणी पिण्यासाठी मिळणेकरीता करावयाच्या कार्यवाहीस रुपये ५,०३,१००/- मात्रचा अपेक्षित खर्च येणार आहे. त्यातील वॉटर कुलर विहीत पद्धतीने खरेदी करुन बसविणेचे काम मेकॅनिकल विभागामार्फत तसेच आर.ओ. प्लॅन्ट ते वॉटर कुलरपर्यंत पाईप लाईन करणेकरीता विहीत पद्धतीने मटेरिलय खरेदी करुन पाईप लाईन तयार करणेची कामे पाणी पुरवठा विभागामार्फत करण्यात येतील.

तरी, शांतीनिवास व भक्तनिवास इमारत दर्शन रांगेत साईभक्तांना शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणेकरीता १००० लिटर्स/ तास क्षमतेचे २ नग आर.ओ. प्लॅन्टची देणगी स्वरुपात स्विकारुन, त्याची उभारणी करणे तसेच नविन ६ नग वॉटर कुलर विहीत पध्दतीने खरेदी करणे व आर.ओ. प्लॅन्ट ते वॉटर कुलरपर्यत पाईप लाईन टाकणेकरीता आवश्यक मटेरिअल खरेदी करणे या कामांसाठी येणा-या अंदाजे अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दर्शन रांगेत साईभक्तांना शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणेकरीता वॉटर कुलर खरेदी करणे व आर.ओ. प्लँटची उभारणी करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२४** **शांतिनिवास व भक्तनिवास इमारतीमधील दर्शन हॉल वातानुकुलीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** जा.नं. एसएसएस/वशी-का.अ./२८१४/२०१६ दिनांक ०७/१०/२०१६ रोजीचे परिपत्रकान्वये दिनांक २३ व २४ आक्टोबर, २०१६ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांनी मा.कार्यकारी अधिकारी साहेब व मा. उप-कार्यकारी अधिकारी यांचेसमवेत मंदिर परिसरात घेतलेल्या राऊंडमध्ये दर्शनरांग वातानुकूलीत करणेसाठी त्वरीत प्रस्ताव सादर करावा असे निर्देश दिलेचे कळविले आहे.

शांतीनिवास व भक्तनिवास इमारतीतील दर्शन रांगेत साईभक्तांना उषणतेचा त्रास होऊ नये याकरीता मेकॅनिकल विभागामार्फत एकूण 30 नग जम्बो एअरकुलर ठेवणेत आलेले आहेत. तसेच भुयारी मार्ग सभा मंडप नंदी गाभारा व समाधी मंदिर या ठिकाणी देणगीदार साईभक्त यांचेमार्फत सेंट्रल ए.सी.प्लॅन्ट देणगी स्वरुपात बसवुन कार्यरत करणेत आलेले आहे.

मा.अध्यक्ष महोदय यांचे निर्देशानुसार शांतीनिवास व भक्तनिवास इमारतीतील वातानूकूलीत करावयाचे हॉलचे क्षेत्रफळ व हॉल पुर्ण क्षमतेने भरल्यानंतर त्यातील साईभक्तांची संख्या यांचा तपशील खालीलप्रमाणे :

| **अ.नं.** | **तपशील** | **क्षेत्रफळ (स्क्वेअर फुट)** | **अंदाजे भक्तांची संख्या** |
|---|---|---|---|
| १. | शांतीनिवास इमारत तळमजला - हॉल नं. १ | ८,५३४ | १,५०० |
| २. | शांतीनिवास इमारत पहिला मजला- हॉल नं. ३ | ५,३९६ | १,००० |
| ३. | भक्तनिवास इमारत तळमजला - हॉल नं. २ | ८,५३४ | १,५०० |
| ४. | भक्तनिवास इमारत पहिला मजला – हॉल नं. ४ | ५,३९६ | १,००० |
| | **एकूण :** | **२८,८६०** | **५,०००** |

उपरोक्तप्रमाणे चारही दर्शन हॉलमध्ये अंदाजे ५,००० साईभक्तांची संख्या असते. गर्दीचे प्रमाण वाढलेनंतर किंवा आरतीचे वेळी दर्शन लाईन बंद झालेनंतर रांगेतील भक्तांना उष्णतेचा तसेच सफोकेशनचा त्रास होतो. त्यामुळे साईभक्तांचे सुविधेकरीता चारही दर्शन हॉल वातानुकूलीत करणे आवश्यक आहे. दर्शन हॉल वातानुकूलीत करणेसाठी किती क्षमतेची यंत्रणा असावी याकरीता मेकॅनिकल विभागामार्फत हिट लोड काढणेत आलेला असून, त्यानुसार या चारही हॉलचे क्षेत्रफळ व त्यामधील भक्तांचे संख्येचा विचार करता खालील क्षमतेची ए.सी. यंत्रणा उभारणी करणे आवश्यक आहे :

| **अ.नं.** | **तपशील** | **आवश्यक क्षमता (TR मध्ये)** |
|---|---|---|
| १. | शांतीनिवास इमारत तळमजला - हॉल नं. १ | १२८ |
| २. | शांतीनिवास इमारत पहिला मजला- हॉल नं. ३ | १२८ |
| ३. | भक्तनिवास इमारत तळमजला - हॉल नं. २ | ९७ |
| ४. | भक्तनिवास इमारत पहिला मजला – हॉल नं. ४ | ९७ |
| | **एकूण :** | **४५०** |

उपरोक्तप्रमाणे चारही दर्शन हॉल वातानुकूलीत करणेसाठी ४५० टन क्षमतेची ए.सी. यंत्रणा उभारणी करावी लागणार आहे. सदरची यंत्रणा उभारणी करावी लागणार आहे. याकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे. :

अ) **मेकॅनिकल विभागाकडील कामे-** ए.सी. मशीनरी, इन्स्टोलेशन टेस्टींग व कमीशनींग, रेफ्रिजरंट पाईपींग, इलेक्ट्रीकल केबल (इनडोअर व आऊटडोअर युनिट दरम्यान), इन्सुलेटर ड्रेन पाईपींग, डक्टींग, डॅम्पर, ग्रील इत्यादीसह ए.सी. यंत्रणा बसविणेकामी अपेक्षित खर्च :

| **अ.नं.** | **एकूण क्षमता** | **दर प्रती टन** | **अपेक्षित खर्च** |
|---|---|---|---|
| १. | ४५० TR | ४५,०००/- | २,०२,५०,०००/- |

अक्षरी रुपये – दोन कोटी, दोन लाख, पन्नास हजार मात्र

उपरोक्तप्रमाणे चारही दर्शन हॉल वातानुकूलीत करणेसाठी आवश्यक मशीनरी खरेदी करुन बसविणेसाठी रुपये २,०२,५०,०००/- मात्रचा खर्च अपेक्षित असून, ए.सी. यंत्रणेचे तपशीलवार सर्व कामे ए.सी. कन्सल्टंन्ट यांचेकडून तपासून त्यानुसार कामे करुन घ्यावे लागणार आहे.

ब) **बांधकाम विभागाकडील कामे** - सध्या एअर व्हेल्टीलेशनकरीता चारही हॉलचे दोन्ही बाजुस खिडक्या आहेत. तसेच सिलींगला मोठया आकाराचे डक्ट आहेत. हॉल वातानुकूलीत करणेपूर्वी हॉल बंदीस्त करणे आवश्यक आहे. त्यासाठी बांधकाम विभागाने येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे कळविलेला आहे :

| अ.नं. | तपशील | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| १ | खिडक्यांना ॲल्युनिमियम स्लायडींग विंडो बसविणे, इमर्जन्सी डोअर ॲल्युनिमियम डोअर तयार करणे, सिलींग डक्ट, फॉल सिलींग करणे, काही ठिकाणी अल्युमिनियम पार्टेशियन करणे, फॉल सिलींगकरीता फॅब्रिकेशन करणे इत्यादी | 27,00,000/- |

अक्षरी रुपये – सत्तावीस लाख मात्र

क) **विदयुत विभागाकडील कामे**– वातानुकूलीत यंत्रणा बसविणेपुर्वी सदर यंत्रणेकरीता लागणारा विदयुत लोड उपलब्धतेबाबत विदयुत विभागास विचारणा केली असता, त्यांनी दिनांक २५/११/२०१६ रोजीचे पत्रान्वये "मंदिर परिसर सबस्टेशनच्या सध्याच्या मंजूर लोड५०० केव्हीए (४८१ केडब्लयु) इतका आहे. मंदिरामधील नव्याने उभारण्यात आलेल्या वातानुकूलीत यंत्रणेकरीता जादा १०० केव्हीए इतका विदयुतभार महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून वाढवून घेण्याची कार्यवाही चालू आहे. शांतीनिवास व भक्तनिवास दर्शनलाईन वातालुकूलीत करणेकरीता यंत्रणेचा वाढीव लोड लागणार असल्याचे कळविले आहे. नविन वातानुकूलीत यंत्रणेचा वाढीव लोड जादा असल्याने सध्याच्या विदयुत संच मांडणीवर चालणार नसल्याने वाढीव लोडकरीता १२०० केव्हीए क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर १०१० X २ केव्हीए क्षमतेचे जनरेटर सेट, सी.टी/पी.टी.संच, मिटरींग क्युबिकल तसेच पॅनेल बोर्ड नविन बसवून केबल वर्क करावे लागेल. सदरील नविन जनरेटर जुन्या जनरेटर सेटच्या जागेवर बसविता येणार नसल्याने जनरेटर सेट व पॅनेलकरीता नविन रुमचे बांधकाम करावे लागेल. याकामी रुपये २ कोटी इतका अपेक्षित खर्च आहे. तसेच रुपये २५,९२,०००/- इतका मासिक बीलाचा अपेक्षित खर्च आहे. त्याचप्रमाणे त्यासाठी लागणारे विदयुत संचाचे तपशील सर्व कामे इलेक्ट्रीकल कन्सल्टंट यांचेकडून तपासून घेऊन त्याचे अंदाजपत्रक तयार करुन त्यानुसार काम करुन घ्यावे लागणार आहे " असे कळविलेले आहे.

उपरोक्त **'अ'**, **'ब'** व **'क'** मध्ये नमूद केलेनुसार शांतीनिवास व भक्तनिवास इमारतीतील चारही दर्शन हॉल वातानुकूलीत करावयाचे झाल्यास अपेक्षित खर्चाचा समरी तक्ता खालीलप्रमाणे आहे :

| अ.क्र. | तपशील | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| अ | ए.सी. मशीनरी, इन्स्टोलेशन टेस्टींग व कमीशनींग, रेफ्रिजरंट पाईपींग, इलेक्ट्रीकल केबल (इनडोअर व आऊटडोअर युनिट दरम्यान), इन्सुलेटर ड्रेन पाईपींग, डक्टींग, डॅम्पर, ग्रील इत्यादीसह ए.सी. यंत्रणा बसविणे. | २,०२,५०,०००/- |
| ब | चारही दर्शन हॉल बंदीस्त करणे | २७,००,०००/- |
| क | विदयुत पुरवठा करणेकामी उपाययोजन | २,००,००,०००/- |
| | **एकूण खर्च रुपये :** | **४,२९,५०,०००/-** |

वर नमूद केलेप्रमाणे दर्शन हॉल वातानुकूलीत करणेकामी एकूण रुपये४,२९,५०,०००/- (अक्षरी रुपये चार कोटी, एकोणतीस लाख, पन्नास हजार) मात्रचा खर्च अपेक्षित आहे. उपरोक्त कामांचे स्वरूप भिन्न असून, सदरील कामे वेगवेगळ्या एजन्सीमार्फत करावी लागतील. तसेच सदरहु कामांपैकी अक्र **'अ'** मधील कामे मेकॅनिकल विभागामार्फत, **'ब'** मधील कामे बांधकाम विभागामार्फत तसेच **'क'** मधील कामे विदयुत विभागामार्फत विहीत पध्दतीने करता येईल.

तरी वरीलप्रमाणे शांतीनिवास व भक्तनिवास इमारतीतील चारही दर्शन हॉल वातानुकूलीत करणेसाठी तसेच त्यासाठी येणा-या अपेक्षित खर्चास, करावयाचे कार्यवाहीस मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शांतिनिवास व भक्तनिवास इमारतीमधील** चारही **दर्शन हॉल वातानुकुलीत करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यातआली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख/ बांधकाम विभागप्रमुख/ विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२५** **गुरुस्थानजवळील धुनीवर धुर व झळाया बाहेर जाणेसाठी एक्झॉस्ट सिस्टम बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** दिनांक २३ व २४ आक्टोबर २०१६ रोजी मा. अध्यक्ष महोदय यांनी मा. कार्यकारी अधिकारी व मा. उप-कार्यकारी अधिकारी यांचे समवेत मंदिर परिसरात घेतलेल्या राऊंडमध्ये गुरुस्थान जवळील धुनीवर धुर व झळाया बाहेर जाणेसाठी चिमणी बसविणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

गुरुस्थान समोरील धुनीत साईभक्त मोठया प्रमाणात धुप, लोभान व अगरबत्ती प्रज्वलीत करुन जाळतात. धुप व अगरबत्ती संपूर्ण दिवसभर जाळत असल्यामे त्यापासून निघणारा धुरामुळे सभोवती व त्यांच्यावर येणा-या निंबवृक्षाच्या महत्वाच्या व पवित्र फांदीवर होत असून, त्यामुळे कोवळी पाने टिकत नाही. तसेच इतर फांदयानाही त्याचा प्रादुर्भाव होत आहे

धुनी जवळील धुर व झळाया बाहेर जाणेसाठी चिमणी बसविलेस धुनी जवळील धुर व झळायाचा त्रास काही प्रमाणात कमी होईल, मात्र धुराचा व उष्णतेचा त्रास निंबवृक्षास अधिक होईल. यासाठी धुनीवर एक्झॉस्ट सिस्टम यंत्रणा बसवून, त्यास ड्राय स्क्रबर युनिट बसविता येईल. ड्राय स्क्रबर युनिटमुळे धुर व वास काढला जाऊन, फक्त हवा बाहेर फेकली जाईल व धुरामुळे होणारे प्रदुषण कामी होईल. याबाबत एक्झॉस्ट सिस्टम बसविणा-या एजन्सीजकडे तसेच मार्केटमध्ये स्पेअरपार्टचे दर याची माहिती घेतली असता गुरुस्थान धुनीवर एक्झॉस्ट सिस्टम बसविणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| 1 | Exhaust Air Unit (AHU) 1500 CPM, Make – Adventex / Zeco | 50,000/- |
| 2. | Exhaust Air Scrubber (Electrostatic Type) – Rdy Air/ESP | 1,00,000/- |
| 3. | Air Distribution (Ducting, Canvas Connection, Sys., Volume Control) | 40,000/- |
| 4. | Electric Panel & Other Electric Work | 20,000/- |
| 5. | Fabrication Work | 10,000/- |
| | **Total :** | **2,20,000/-** |

अक्षरी रुपये **दोन लाख, वीस हजार** मात्र

उपरोक्तप्रमाणे धुनीवरील धुर व झळाया बाहेर जाणेसाठी तसेच धुप व अगरबत्तीया पासून होणारी प्रदुषण कमी होणेकरीता धुनीवर एक्झॉस्ट सिस्टम बसविणेकरीता २,२०,०००/- मात्रचा खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च इकडील विभागाकडील अंदाजपत्रक २०१६-२०७ मधील *'मटेरिअल खरेदी खर्च'* या शिर्षाखाली शिल्लक असणा-या रुपये ३,९६,२१,६३९/- मात्रचे रकमेतून व विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून करता येईल. या कामास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी गुरुस्थान धुनीवरील धुर व झळाया बाहेर जाणेसाठी तसेच धुप व अगरबत्तीयापासून होणारे प्रदुषण कमी करणेसाठी धुनीवर एक्झॉस्ट सिस्टम यंत्रणा बसविणेस व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, गुरुस्थानजवळील धुनीवर धुर व झळाया बाहेर जाणेसाठी एक्झॉस्ट सिस्टम बसविणेकामीचा खर्च खुपच जास्त वाटतो, याकरीता तेथील प्रत्यक्ष पाहणी करुन निर्णय घेतला जाईल, असे ठरले.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२६** **श्री साईभक्तांचे सुविधेकरीता चप्पल स्टॅन्ड तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद** : कलम १४(२)(घ) – भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे.

**प्रस्तावना:** दिनांक १ व २ सप्टेंबर, २०१६ रोजी मा. अध्यक्ष साहेब यांचेसमवेत मंदिर परिसरात व संस्थानचे इतर विभागांची पाहणी केली, या पहाणीत त्यांनी गेट न. १ व २ या ठिकाणी श्री साईभक्तांचे सुविधेकरीता चप्पल स्टॅन्ड तयार करणेबाबत निर्देश दिलेले होते. त्यानुसार दर्शन रांगेचे पश्चिम बाजुकडील गेट नं १ जवळ नगर मनमाड रोडचे फुटपाथवर पॉली कार्बोनेटचे शेडचे खाली २0 फुट X ७.५ फुट या साईजचे तसेच

पिंपळवाडी रोड दर्शन रांगेच्यापुर्व बाजुकडील१६ गुंठे जागेच्या उत्तर बाजुकडील कंपाऊंडचे भिंतीलगत३० फुट X १० फुट या साईजचे तात्पुरते चप्पल स्टॅन्ड चालू केलेले आहे. आता जा.नं. एसएसएस/का.अ. कक्ष/ २९९१/ २०१६ दिनांक १६/११/२०१६ रोजीचे परिपत्रकान्वये दिनांक १० व ११ नोव्हेंबर, २०१६ रोजी मा. अध्यक्ष साहेब यांनी मंदिर परिसरात घेतलेल्या राऊंडमध्ये गेट नं. 1 येथील चप्पल स्टॅन्ड अपुरे पडत असल्याकारणांने सदरचे चप्पल स्टॅन्ड गेट नं. १ शेजारी कंपाऊंडचे आतील बाजूने करणेबाबत तसेच दोन्ही चप्पल स्टॅन्डकरीता सुधारित प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

**मागणी**: उपरोक्त निर्देशानुसार चप्पल स्टॅण्ड बनविणेकामी गेट नं. १ चे शेजारी कंपाऊंडचे आतील बाजूने ३० फुट X १५ फुट या साईजचे पत्रा शेडची तसेच १६ गुंठे परिसरात सध्या चालू केलेल्या स्टॅण्डचे जागेवर ३० फुट X १५ फुट या साईजचे पत्रा शेड उभारणी करता येईल. सदरचे चप्पल स्टॅण्ड करतांना सिव्हिल वर्क काम तसेच कलर कोटेड पत्रे खरेदी करुन बसविण्याचे काम बांधकाम विभागामार्फत तसेच शेडकरीता स्ट्रक्चर उभारणीचे व रॅक खरेदी करुन बसविणेचे काम मेकॅनिकल विभागामार्फत करता येईल. उपरोक्त कार्यवाही करणेस मा. व्यवस्थापन समितीची तत्वत: मान्यता घेणे आवश्यक आहे.

**विभागाचा स्पष्ट मत**: मा.अध्यक्ष महोदय यांचे निर्देशानुसार गेट नं १ चे आतील बाजूने व १६ गुंठे परिसरात नव्याने चप्पल स्टॅन्ड उभारणीकरीता करावयाचे कार्यवाहीस प्रशासकीय मान्यता घेणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांच्या सुविधेससाठी गेट नं. १ जवळ व १६ गुंठे परिसरात समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे यांचे मार्गदर्शनाखाली जागेची निश्चिती करणेत येऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे चप्पल स्टॅन्डची उभारणी करणेत यावी, असे ठरले. तसेच याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२७** **मान्यवर व्यक्तींची दर्शन/ आरती व्यवस्था मोफत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद-** महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियिम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१३ चे सभेतील निर्णय क्रमांक ९०७.

**प्रस्ताविक-** मा.अध्यक्ष महोदय यांनी दिनांक १०.११.२०१६ रोजी श्री साईबाबांच्या दर्शन/ आरतीसाठी येणा-या मान्यवर साईभक्तांची दर्शन/आरतीची व्यवस्था मोफत करणेबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत मौखिक निर्देश दिलेले आहेत. मा.अध्यक्ष महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेस मान्यता असवी.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे व्ही.आय.पी. दर्शन/आरती पास पेड होण्यापुर्वी सामान्य दर्शन रांगेतून श्रींचे आरतीसाठी येणाऱ्या साईभक्तांना आरतीचा लाभ मिळत नव्हता. कारण त्यावेळी पासेस मोफत असल्याने शिफारस धारकांची संख्या जास्त होती. मात्र दर्शन/आरतीचे पासेससाठी देणगीशुल्क आकारणी सुरु झाल्यापासून सामान्य दर्शन रांगेतुन आरतीसाठी येणाऱ्या साईभक्तांना आरतीचा लाभ मिळत आहे. तथापि, कोणत्या व्यक्तींची मोफत व्यवस्था करावी याबाबत तत्कालीन मा.त्रिसदस्य समितीचे अध्यक्ष तथा प्रधान जिल्हा न्यायाधीश श्री.जयंत कुलकर्णी साहेब यांनी दिनांक१४.११.२०१३ रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

अ) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१३ चे सभेतील निर्णय क्रमांक ९०७ अन्वये बाबांच्या आरत्यासाठी खालील मान्यवरांना मोफत सोडण्यात यावे.

१) शिर्डीतील ग्रामस्थांची आरती व्यवस्था मोफत केली जाते, ती यापुढेही सुरु ठेवावी ग्रामस्थांची ओळख पटण्यासाठी त्यांचे आधारकार्ड / निवडणूक ओळखपत्र गृहीत धरण्यात यावे.

२) श्री साईबाबा संस्थानच्या विविध विभागाच्या दैंनदिन कार्यालयीन कामाकरीता येणा-या व्यक्ती तसेच उत्सव काळात येणारे मानकरी व संस्थान निमंत्रीत कलाकार.

३) श्री साईबाबा संस्थानला रु.२५०००/-किंवा त्यापेक्षा अधिक देणगी देणा-या (वस्तुरुप किंवा रोख स्वरुपात) देणगीदार भक्तांची आरतीची व्यवस्था देणगी दिलेल्या दिवशी वा त्यांचे विनंतीनुसार इतर दिवशी एकदाच मोफत करण्यात यावी.

४) श्री.के.व्ही. रमणी, अध्यक्ष व कार्यकारी विश्वस्त शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे रु. ११० कोटी मात्रचे देणगीतून साईआश्रम प्रकल्प साकारलेला आहे. त्यामुळे श्री.रमणी व त्यांच्या कुटुंबीयांचे साईप्रती योगदान लक्षात घेऊन त्यांना कायमस्वरुपी भेट देणे अगत्याचे ठरेल व साई दर्शनापेक्षा कुठलाही आनंद त्यांना भावणार नाही. म्हणुन संस्थान तर्फे श्री के.व्ही.रमणी व त्यांच्या कुटूंबीयांना तहयात मोफत निवास व दर्शन/आरती व्यवस्था करणेत यावी.

५) भारतीय गणराज्याचे मा.राष्ट्रपती, भारतीय गणराज्याचे मा.उपराष्ट्रपती, भारतीय गणराज्याचे मा.पंतप्रधान, भारतीय गणराज्याचे मा.उपपंतप्रधान, महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल, भारतीय गणराज्याचे भुतपुर्व माराष्ट्रपती व मा.उपराष्ट्रपती, भारतीय गणराज्याचे भुतपुर्व पंतप्रधान भारतीय गणराज्याचे मुख्य न्यायाधिश, लोकसभा अध्यक्ष , महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्रीमंडळातील सर्व मंत्री नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष, सर्व राज्याचे राज्यपाल, सर्व राज्यांचे मुख्यमंत्री, सर्वोच्च न्यायालयाचे सर्व न्यायाधिश, महाराष्ट्र राज्यांच्या मंत्रीमंडळातील सर्व मंत्री महाराष्ट्रराज्य विधान सभा अध्यक्ष व उपाअध्यक्ष, महाराष्ट्र राज्याच्या उच्च न्यायालयांचे मुख्य न्यायाधिश, महाराष्ट्र राज्याच्या उच्च न्यायालयांचे सर्वन्यायाधिश आदि अतिमहत्वाच्या व्यक्तींची दर्शन/आरती व्यवस्था निशुल्क राहील.

६) याच प्रमाणे शिर्डी विधानसभा व लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी, अध्यक्ष शिर्डी नगरपंचायत तसेच देशाच्या कानाकोप-यातून येणारे साधुसंत यांचीही आरतीसाठी निशुल्कव्यवस्था करणेत यावी.

७) उत्सव, जोडून येणा-या सुट्टया, राष्ट्रीय सण, जास्त गर्दीचा कालावधी आदि वेळी दर्शन/आरती पासेस बंद राहतील. याबाबतचा निर्णय घेण्यात अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांना राहील.

यावतिरिक्त दर्शन/आरतीसाठी विनाशुल्क व्यवस्था कोणत्या व्यक्तींची करावी, याबाबत प्रसंगानुरुप निर्णय घेण्याचा अधिकार पुर्णपणे त्रिसदस्यीय समितीचे अध्यक्ष, सदस्य व कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचेकडे राहील.

याचवेळी अशीही चर्चा झाली की, साईदर्शनासाठी येणारे अंध, मतिमंद व अशा प्रकारचे अपंग अथवा अतिवृध्द की जे स्वतःची देखभाल करणेस असमर्थ आहेत, अशा साईभक्तांची फक्त दर्शन व्यवस्था मोफत करणेत यावी.

आ) मा.व्यवस्थापन समतीचे दिनांक १०.०१.२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १०(१६) मध्ये मंदिरातील सोन्याच्या सिंहासनाचे देणगीदार श्री.महेश रेड्डी व त्यांचे कुटुंबिय यांची कायमस्वरुपी आरती व दर्शन व्यवस्था करणेबाबत निर्णय झालेला आहे.

इ) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २५.०९.२०१४ चे सभेतील निर्णय क्रमांक ८८१ अन्वये, महाराष्ट्र राज्यामधील मा.उच्च न्यायालयांचे सर्व न्यायाधीशांना १+३ असा ०४ व्यक्तींचा निशुल्क पास वितरीत करणेत यावा व त्यापुढील व्यक्तींसाठी नियमाप्रमाणे शुल्क आकारणेत येऊन, पास वितरीत करणेत यावा असे ठरले.

ई) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०९.१२.२०१४ चे सभेतील निर्णय क्रमांक १०४१ अन्वये मा.उच्च न्यायालयाने नेमणूक केलेल्या तदर्थ त्रिसदस्यीय समितीचे अध्यक्ष, सदस्य व उपकार्यकारी अधिकारी यांचा कार्यभार संपुष्टात आल्यानंतरही त्यांना वैयक्तीक + ४ व्यक्ती याप्रमाणे जनसंपर्क कार्यालयामार्फत प्राधान्याने संस्थानच्या प्रचलित पध्दतीने दर्शन/आरतीची व्यवस्था करणेत यावी. तसेच या निर्णयामध्ये बदल करावयाचा असल्यास मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.

उ) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १२.०३.२०१५ चे सभेतील निर्णय क्रमांक ८३ अन्वये, दर गुरुवारी पंचक्रोशीतून श्रींच्या दर्शनासाठी येणा-या साईभक्तांची मोफत दर्शन व्यवस्था करणेबाबत तसेच दर गुरुवारी रात्रौ ९.१५ वाजता होणा-या श्रींच्या पालखीसाठी नियमित येणारे भक्त, भजनी मंडळे, झांजपथके व बॅण्ड पथके यांची दर्शन व्यवस्था मोफत करण्यात यावी.

ऊ) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १६.०२.२०१६ चे सभेतील निर्णय क्रमांक १२१ अन्वये दिनांक ०१.०३.२०१६ पासून दर्शन/आरती पासेसचे देणगीशुल्क दर्शनासाठी रुपये २००/-, काकड आरतीसाठी रुपये ६००/-, माध्यान्ह, धुपारती व शेजारतीसाठी रुपये ४००/- प्रतिव्यक्ती याप्रमाणे आकारण्यात येत आहे.

ऋ) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०९.१०.२०१६ चे सभेतील निर्णय क्रमांक ७५४ अन्वये सर्वसामान्य साईभक्तांसाठी सशुल्क व्ही.आय.पी.दर्शन पास विनाशिफारस सुरु करणेत यावे. एक वर्षापेक्षा कमी वयाच्या मुल असलेल्या माता व त्यांचे कुटुंबीय तसेच जेष्ठ नागरीक व त्यांचेबरोबर एक व्यक्ती यांना एक वेळा विनापास व्ही.आय.पी.गेटने दर्शनासाठी सोडण्यात यावे.

मा.व्यवस्थापन समितीच्या सभांमध्ये वेळोवेळी झालेल्या उपरोक्त निर्णयानुसार श्री साईबाबांच्या दर्शनासाठी येणा-या साईभक्तांची दर्शन/आरतीची व्यवस्था नियमाप्रमाणे करण्यात येते. याव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तींची दर्शन/ आरतीची निशुल्क व्यवस्था करण्यात येत नाही. व्ही.आय.पी.दर्शन/आरती पासेस वितरणातून संस्थानला अंदाजे खालीलप्रमाणे उत्पन्न प्राप्त होते.

**व्ही.आय.पी.दर्शन आरती पासेस वितरणातून एक महिन्यात मिळणारे सरासरी उत्पन्न**

| अ.नं. | सशुल्क दर्शन | पासेसची संख्या | रक्कम | एकुण दिवस | प्रतिदिन सरासरी संख्या | प्रतिदिन सरासरी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | दि.०१.०४.२०१६ ते ३०.०४.२०१६ जनसंपर्क विभागामार्फत वितरीत दर्शन/ आरती पासेस | ११४६२ | १,०७,०५,८००/- | ३० | ३८२ | ३,५६,८६०/- |
| ०२ | दि.०१.०४.२०१६ ते ३०.०४.२०१६ ऑनलाईन दर्शन/आरती पासेस | ११५३६ | १,३०,३९,८००/- | ३० | ३८४ | ४,३४,६६०/- |
| | | **एकूण रक्कम** | २,३७,४५,६००/- | | | ७,९१,५२०/- |

**व्ही.आय.पी.दर्शन आरती पासेस वितरणातून एक वर्षात मिळणारे सरासरी उत्पन्न**

| अ.नं. | सशुल्क दर्शन | पासेसची संख्या | रक्कम | एकुण दिवस | प्रतिदिन सरासरी संख्या | प्रतिदिन सरासरी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | दि.०१.०९.२०१५ ते ३१.१०.२०१६ जनसंपर्क विभागामार्फत वितरीत दर्शन/आरती पासेस | २१६९६४ | १६,१३,०१,३००/- | ३६४ | ५९६ | ४,४३,१३५/- |
| ०२ | दि.०१.०९.२०१५ ते ३१.१०.२०१६ ऑनलाईन दर्शन/आरती पासेस | १९०१०७ | १७,१३,७८,५६०/- | ३६४ | ५२२ | ४,७०,८२०/- |
| | | **एकूण रक्कम** | ३३,२६,७९,८६०/- | | | ९,१३,९५५/- |

श्री साईबाबा संस्थानने सुरु केलेल्या पेड पास विरोधात श्री.मनोज सुरेश पिंगळे निर्भया फाऊंडेशन, नाशिक यांनी व्ही.आय.पी.पासेससाठी शुल्क आकारुन श्री साईबाबा संस्थान साईभक्तांमध्ये भेदभाव निर्माण करत आहे या संदर्भात मा.उच्च न्यायलयात याचिका दाखल केली होती. याबाबत संस्थानची बाजू मांडतांना श्री साईबाबांचे दर्शन/ आरतीसाठी सामान्य दर्शनरांगेतून जाणाऱ्या साईभक्तांना कोणत्याही प्रकारे शुल्क लागत नाही. सामान्य दर्शनरांगेमधून दर्शन/आरतीस जाणा-या सर्व साईभक्तांना बुंदीचा प्रसाद मोफत दिला जातो. फक्त ज्या साईभक्तांना व्ही.आय.पी.सुविधेचा लाभ घ्यावयाचा आहे त्यांचेकडूनच व्ही.आय.पी.पासेससाठी देणगीशुल्क आकारण्यात येते. या निर्णयामुळे सामान्य दर्शनरांगेतून श्री साईबाबांच्या आरतीस जाणा-या साईभक्तांना आरतीचा लाभ मोठया प्रमाणावर मिळत आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था ही धर्मदाय संस्थान असून साईभक्तांनी दिलेल्या देणगीतून श्री साईप्रसादाल, श्री साईनाथ रुग्णालय यासारखे उपक्रम संस्थानमार्फत

राबविण्यात येत आहे असे संस्थान वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्याने सदरची याचिका मा.उच्च न्यायालयाने खारीज केलेली आहे.

**मागणी –** मान्यवर व्यक्तींची दर्शन/आरती व्यवस्था मोफत करणेबाबत.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत–** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २५.०९.२०१४ चे सभेतील निर्णय क्रमांक ८८१ अन्वये, महाराष्ट्र राज्यामधील मा.उच्च न्यायालयांचे सर्व न्यायाधीशांना १+३ असा ०४ व्यक्तींचा निशुल्क पास वितरीत करणेत यावा व त्यापुढील व्यक्तींसाठी नियमाप्रमाणे शुल्क आकारणेत येऊन, पास वितरीत करणेत यावे असा निर्णय झालेला आहे. मा.व्यवस्थापन समितीचे सभांमध्ये वेळोवेळी झालेल्या वरील निर्णया व्यतिरिक्त कोणत्या मान्यवरांची (एका दिवशी एका कुटुंबातील किती व्यक्तींची किती आरत्या/दर्शनासाठी) निशुल्क व्यवस्था करावी याबाबतचा निर्णय होणेसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे विचारार्थ सादर.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८७०** **उपरोक्त प्रस्तावावर सांगोपांग चर्चा होऊन, मा.त्रीसदस्य समितीचे दिनांक १४.११.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ९०७ अन्वये ठरविणेत आलेले मान्यवर तसेच शासनामधील सर्व प्रकारचे वर्ग अ अधिकारी व समिती सदस्यांनी सुचविलेले मान्यवर यांचा मोफत दर्शन/ आरतीच्या यादीमध्ये समावेश करणेत यावा, असे ठरले.**

**तसेच विशिष्ट स्वरुपाची देणगी देणाऱ्या साईभक्तांस तहयात विनापास/ मोफत दर्शन/ आरतीसाठी प्रवेश देण्यात यावा, यासाठी मुल्य निश्चित करणेत येऊन, गोल्डन कार्डसारखी योजना राबविणेत यावी. याबाबतचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, अशा सुचना केल्या.**

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी/ मुख्यलेखाधिकारी/ संरक्षण विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२८** **श्री.हिमांग पालन, एक्झिक्युटीव्ह एडीटर, मेरीक्स मिडीया, मुंबई यांचे साई टेम्पल सम्मिट कार्यक्रमाचे वृत्त संकलन करणेसाठी उपस्थित राहणार असल्याने निवासाची व्यवस्था करणेबाबतचा मेल संदेश.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद-** महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात "समितीची कर्तव्य व अधिकारी" या शिर्षकाखाली अधिनियिम नंबर १७ (१) मध्ये "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील." अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक-** निरंक

**प्रस्ताविक –** श्री.हिमांग पालन, एक्झिक्युटीव्ह एडीटर, मेरीक्स मिडीया, मुंबई यांनी त्यांचे उपरोक्त संदर्भीय मेल संदेशात मी सध्यामेरीक्स मिडीयाकडे सिनियर जर्नालिस्ट या पदावर काम करत आहे. मी सिनियर जर्नालिस्ट म्हणून ब्लिझ, सीएनबीसी टीव्ही१८, द टाइम्स ऑफ इंडीया, इंडीयन एक्स्प्रेस, द एशियन एज व इंडीया लिंक मॅगेझिन काम करतो इंडीया लिंक हे २१ वर्षापासून लंडन येथे प्रसिध्द होणारे जुने मॅगेझिन आहे. तसेच मी www.IndiaGBnews.com येथे न्युज एडिटर आहे. इंडीया जीबी हा युरोप व युनायटेड किंग्डम येथे राहणारे भारतीय नागरीकांमध्ये नावाजलेला कार्यक्रम आहे. इंडीया लिक व इंडीया जीबीच्या लंडन येथील वाचकांसाठी मी दिनांक ११ डिसेंबर रोजी आयोजित कार्यक्रमाचे वृत्त संकलनासाठी शिर्डी येथे उपस्थित राहणार आहे. मी दिनांक १०.१२.२०१६ रोजी रात्री शिर्डीत येईल व दिनांक १२.१२.२०१६ रोजी परत जाईल. तरी माझी ०२ रात्रीसाठी निवासाची व्यवस्था करावी ही विंनती असे कळविलेले आहे. तसेच संदर्भ क्रमांक २ चे पत्राने श्री.एन.पी.जी.प्रसाद व श्री.तिरुपती रेड्डी, ई-टीव्ही हे देखील या कार्यक्रमाचे लाईव्ह कव्हरेज करणेसाठी उपस्थित राहणार असलेबाबत कळविलेले आहे.

**मागणी–** श्री.हिमांग पालन, एक्झिक्युटीव्ह एडीटर, मेरीक्स मिडीया, मुंबई यांची दर्शन/आरतीची व निवासाची मोफत व्यवस्था करणेबाबत.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत–** श्री.हिमांग पालन, एक्झिक्युटीव्ह एडीटर, मेरीक्स मिडीया, मुंबई, श्री.एन.पी.जी.प्रसाद व श्री.तिरुपती रेड्डी हे दिनांक ११ डिसेंबर रोजी शिर्डी येथे आयोजित केलेल्या साई टेम्पल सम्मिट कार्यक्रमाचे वृत्त संकलन करणेसाठी येणार आहे. तरी श्री.हिमांग पालन, एक्झिक्युटीव्ह एडीटर, मेरीक्स मिडीया, मुंबई श्री.एन.पी.जी.प्रसाद व श्री.तिरुपती रेड्डी ई-टीव्ही यांची दर्शन/आरती व निवासाची व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करावी. तसेच दिनांक ११ डिसेंबर रोजी आयोजित ग्लोबल साई टेम्पल सम्मिट कार्यक्रमाचे वृत्त संकलन करणेसाठी देशभरातून येणाऱ्या प्रिंट मिडीया व इलेक्ट्रॉनिक मिडीयाचे प्रतिनिधींची दर्शन/आरती, भोजन व निवासाची व्यवस्था व्दारावती भक्तनिवास येथे संस्थानमार्फत मोफत करावी असे मत आहे.

तरी सदर प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दिनांक ११ डिसेंबर रोजी आयोजित ग्लोबल साई टेम्पल सम्मिट कार्यक्रमाचे वृत्त संकलन करणेसाठी देशभरातून येणाऱ्या प्रिंट मिडीया व इलेक्ट्रॅनिक मिडीयाचे प्रतिनिधींचे ओळखपत्र पाहून, त्यांची दर्शन/आरती, भोजन व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करणेत यावी, तसेच त्यांची निवासव्यवस्था वेगळी करणेपेक्षा संस्थान निवासस्थानांमध्येच करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२९** **रक्कम रु.२५,०००/- व त्यापुढील रकमेची देणगी देणाऱ्या साईभक्तांस श्री साईबाबांच्या पादुका असलेली चांदीची पादुका प्रसादरुपाने भेट देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीसाईबाबांच्या दर्शनासाठी देश विदेशातून मोठया संख्येने भक्त येत असतात. त्याचप्रमाणे येणा-या भक्तांकडून संस्थानला मोठया प्रमाणात देणगी प्राप्त होत असते. प्राप्त होणा-या देणगीचा विनियोग करुन संस्थान साईभक्तांसाठी विविध उपक्रमांच्या रुपाने भक्तांना सोयी सुविधा उपलब्ध करुन देत आहे.

साईभक्तांची वाढती संख्या तसेच त्यांच्याकडून प्राप्त होणारी वाढती देणगी पाहाता, भक्तांना देणगी देताना अडचण येऊ नये म्हणून जुन्यादेणगी कार्यालयाचे नुतनीकरण करुन नवे विस्तारीत देणगी कार्यालय सुरु केले आहे. नुतनीकरण केलेल्या देणगी कार्यालयाचे उदघाटन दि. १०/११/२०१६ रोजी संस्थानचे मा.अध्यक्ष साहेब यांचे हस्ते करण्यात आले. उदघाटनप्रसंगी, मा.अध्यक्ष साहेब यांनी, जे देणगीदार भक्त संस्थानला रोख स्वरुपात तसेच, वस्तूरुपाने चेक/ डिडि मनिऑर्डर, Dr/Cr कार्डव्दारे ऑनलाईन, Forex व्दारे रक्कम रु.२५ हजार किंवा त्यापेक्षा अधिक रकमेची देणगी देतील, त्यांचा संस्थानकडून यथोचित सन्मान करुन, त्यांना श्रींच्या पादुका असलेली २० ग्रॅम वजनाची चांदीची प्रतिमा प्रसादरुपाने भेट देण्यात यावी. जेणेकरुन देणगीदार साईभक्ताच्या मनात श्रीसाईबाबांबद्दलची असलेली श्रध्दा अधिक दृढ होऊन संस्थानबाबत त्याच्या मनात आपुलकी निर्माण होईल. तसेच श्री साईबाबांच्या कार्याच्या प्रचार प्रसारास अधिक गती प्राप्त होऊन, अधिकाधिक भक्त श्री साईबाबंच्या दर्शनासाठी शिर्डीत येतील व जास्तीत जास्त देणगी संस्थानला देतील. एकूणच संस्थानच्या आर्थिक उत्पन्नात भर पडेल.

मा. अध्यक्ष साहेब यांनी व्यक्त केलेल्या मनोदयास अनुसरुन कार्यवाही करण्यासाठी संस्थानकडे सध्या उपलब्ध असलेली चांदी तसेच मागिल वर्षी संस्थानला रु.२५ हजार वा त्यापेक्षा अधिक रक्कम देणगी देणा-या भक्तांच्या संख्येचा आढावा घेतला असता, त्याचा तपशिल पुढील प्रमाणे---

१) दि. ३० नोव्हेंबर,२०१६ अखेर संस्थानकडे एकूण साधारणः ४८क्विंटल चांदीचा साठा उपलब्ध आहे.

२) माहिती तंत्रज्ञान विभागाच्या अभिप्रायानुसार मागिल वर्षी (सन २०१५-१६ मध्ये ) रु.२५ हजार वा त्यापेक्षा अधिक रक्कम, देणगी देणा-या भक्तांची संख्या साधारणः ६००० च्या जवळपास आहे.

उपरोक्त परिस्थितीचा व गतवर्षीचा रु.२५ हजार वा त्यापेक्षा जास्त देणगी देणा-या देणगीदार साईभक्तांची संख्या पाहाता देणगीदार साईभक्तांना देण्यासाठी संस्थानला मोठया प्रमाणात श्रींच्या पादुका असलेल्या प्रतिमा तयार करुन घ्यावी लागतील. त्यासाठी संस्थानकडे सध्या उपलब्ध असलेली चांदी प्रथम वितळून घेऊन, त्याचे शुध्द चांदीत रुपांतर करुन त्यापासून उपलब्ध होणा-या शुध्द चांदीच्या २० ग्रॅमच्या पादुका तयार करुन घ्याव्या लागतील. तसेच चांदी वितळून शुध्दचांदीत रुपांतर करताना त्याच्या मध्ये घट येणार आहे. संस्थानकडे सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये साधारणतः ४०० किलो चांदी देणगी स्वरूपात जमा झाली असून, रु.२५,०००/- किंवा त्यापेक्षा अधिक रक्कम देणगी स्वरुपात देणा-या भक्तांची संख्या पाहता संस्थानला प्रती वर्षी साधारणतः १२० किलो शुध्द चांदीच्या पादुका तयार कराव्यालागतील.

तरी, जे साईभक्त संस्थानला रोख, स्वरुपात, वस्तुरुपाने, चेक/डीडी, Online, मनिऑर्डर, Dr/Cr कार्डव्दारे रक्कम रु. २५,०००/- व त्यापेक्षा जास्त रक्कम देणगी देणार आहेत. त्यांना २० ग्रॅम चे चांदीची पादुका देऊन त्याचा संस्थानमार्फत गौरव करणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

एका पादुकेच्या प्रतिमेसाठी आजच्या बाजारभावानुसार प्रति प्रतिमा साधारणतः रु.१०००/- खर्च अपेक्षित असून एकूण ६०००/- प्रतिमांसाठी वार्षिक अंदाजे रक्कम रु.६०,००,०००/- खर्च येणार आहे. त्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, रक्कम रु.२५,०००/- व त्यापुढील रकमेची/ वस्तु, साहित्याची देणगी देणाऱ्या साईभक्तांस २० ग्रॅम वजनाच्या चांदीच्या श्री साई पादुका तसेच साईचरित्र ग्रंथ व एक थ्रीडी फोटो प्रसादरुपाने देण्यात यावा, असे ठरले. यासाठी विहीत पध्दतीने चांदीच्या पादुका बनविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३०** **नामको चॅरिटेबल ट्रस्ट, नाशिक यांचे कॅन्सर रुग्णसेवेसाठी व्हॅन मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** नामको चॅरिटेबल ट्रस्ट हे श्रीमती सुंदरबाई गोवर्धनदास श्यामसुख या नावाने कॅन्सर रुग्णांना सेवा पुरवित आहे. कॅन्सर संबंधी निदान व उपचारासाठी सेवा सुविधा पुरविण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणा व सुसज्ज इमारत बांधण्यात आलेली असून तज्ञामार्फत सेवा पुरविलीजात आहे. ट्रस्टचा हेतू समाजातील शेवटच्या आजारी रुग्णांस तात्काळ सेवा पुरविता यावी व त्याचा लाभ ग्रामीण भागातील गरीबातील गरीब रुग्णांस व्हावा हा उद्देश आहे. नाशिक, अहमदनगर, मालेगाव, धुळे, जळगांव आणि नंदुरबार जिल्ह्यातील गरजू रुग्णांना याचा फायदा होणार आहे त्यासाठी अत्याधुनिक कॅन्सर निदान व्हॅन मिळणेबाबत नामको चॅरिटेबल ट्रस्टने विनंती केलेली आहे. मागणीची रक्कम रु.९४,५१,६८०/- मात्र आहे.

**<u>अर्थ साहाय्य करणेबाबत संस्थान अधिनियमातील तरतुद-</u>**

**१)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ कलम १७ मधील (२)(ण) "मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल." अशी तरतुद आहे.

**२)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ कलम २१ (१क) पोटकलम १ च्या तरतुदीस अधीन राहुन विश्वस्तव्यस्थेस राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अटी शर्तींच्या अधीन राहून, भक्तांना पायाभुत सुविधा पुरविणे किंवा त्यात वाढवण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल.

कलम २१ (२) पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईलः- (एक) राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अनुदान देण्याची तरतुद आहे." मात्र **यासाठी प्रथम शासन नियुक्त छाननी समितीची शिफारस घेणेआवश्यक आहे.**

**<u>विभागाचा अभिप्राय :-</u>**

अ) आर्थिक अनुदान देणेसाठी अधिनियमातील कलम २१ (२) चे तरतुदीनुसार, अनुदानाचे प्रस्तावास प्रथम छाननी समितीची शिफारस घेणे आवश्यक आहे. सन २०१२ मध्ये मागील छाननी समितीची मुदत संपलेली आहे व शासनाने अद्याप नविन छाननी समिती शासनाने नियुक्त केलेली नाही. त्यामुळे अनुदानाचे प्रस्तावांना छाननी समितीची शिफारस घेता येणार नाही.

ब) सन २०१७-१८ मध्ये आयोजित श्री साईबाबा महासमाधी शताब्दीच्या पुर्वतयारीकरिता एकत्रित आराखडा तयार करण्यात येत असून, त्यासाठी संस्थानला तीन हजार कोटी रुपयांची आवश्यकता भासणार आहे, या अनुषंगाने संस्थानकडे सध्या उपलब्ध असणा-या निधीचा आढावा घेऊन सदर प्रयोजनाकरिता संस्थानने नियोजन करावे असे महाराष्ट्र शासनाचे पत्र प्राप्त झाले आहे.

**क)** दररोज शासकीय/ निमशासकीय कार्यालयाकडुन, नोंदणीकृत संस्थांचे, वैयक्तीकरित्या, वेगवेगळ्या कारणासाठी अनेक प्रकारचे अनुदान मागणी प्रस्ताव येत असतात. त्यामध्ये एकाच प्रस्तावाचा विचार करता येणार नाही.

**ड)** दिनांक ३१.०८.२०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन मंडळाच्या सभेतील निर्णय क्र.६३७ अन्वये ग्रामीण भागातील रुग्णांना सेवा देण्यासाठी ५०० रुग्णवाहिका घेणे प्रस्तावित आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करतांना संबंधीताच्या मागणीचा विचार करता येईल.

**इ)** संस्थानचा पैसा शिर्डीच्या विकासाव्यतिरिक्त इतर कोठेही वापरु नये या संदर्भात शिर्डी ग्रामस्थांनी संस्थानकडे पत्र व्यवहार केला असून पैसा बाहेर दिल्यास अंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

उपरोक्त अ,ब,क,ड,इ. यांचा विचार करता संस्थान मार्फत देण्यात येणा-या रुग्णवाहिका वितरणाच्या वेळी संबंधीतांच्यामागणीचा विचार करता येईल. तुर्तास त्यांची मागणी मान्य करता येणार नाही, असे नम्र मत आहे.

तरी सदर विषय मा. व्यवस्थापन मंडळाचे सभेसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.८७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान रुग्णालयांमध्ये कॅन्सर या आजारावर उपचार होत नाहीत, याकरीता संस्थान रुग्णालयाने शिफारस केलेल्या कॅन्सर आजाराचे रुग्णांना नामको चॅरिटेबल ट्रस्ट, नाशिक यांनी मोफत उपचार करावे, याबाबत नामको चॅरिटेबल ट्रस्ट, नाशिक यांचे बरोबर करार करणेत येऊन, त्यांना कॅन्सर रुग्णसेवेसाठी एक व्हॅन उपलब्ध करुन देण्यात यावी. त्यासाठी या प्रस्तावास छाननी समितीची मान्यता घेण्यात येऊन, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३१** **शांतिनिवास, भक्तनिवास इमारतीच्या तळमजला तसेच पहिला मजला येथील दर्शनलाईन हॉलमध्ये बसविणेकरीता सिलींग फॅन, एक्झॉस्ट फॅन, स्वीच बोर्ड व डिस्ट्रीब्युशन बोर्ड खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

शासन निर्णय परिच्छेद क्र. ३.२.३ – रु. ५ हजार ते रु. ३ लाखापर्यंत असेल तेंव्हा दरपत्रके मागवून खरेदी करण्याची खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे एका आर्थिक वर्षात एकाच वस्तुच्या दरपत्रकाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या खरेदीचे एकूण मूल्य रु३ लाखापेक्षा जास्त नसावे. रु.३ लाखापर्यंतची कोणत्याही वस्तूंची खरेदी DGS & D कडील दरकराराच्या आधारे करण्याची संबंधित खरेदीदार विभागांना मुभा देण्यात आली आहे

वरील अधिनियमास व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

दिनांक २३ व २४ ऑक्टोबर, २०१६ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांनी मा.कार्यकारी अधिकारी साहेब व मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब यांचे समवेत मंदिर परीसरात व संस्थानचे इतर विभागाकडे घेतलेल्या राऊंडमध्ये पुढीलप्रमाणे निर्देश दिलेले आहे.

*" दर्शनलाईन हॉलमध्ये विविध ठिकाणी लावणेत आलेले विद्युत उपकरणे, टयुब, फॅन, एक्झॉस्ट फॅन, सॉकेट इत्यादीचा कलर खराब झालेला असून पिवळसर रंग आलेला आहे त्यामुळे सदर उपकरणे दिसण्यास जुनाट वाटतात. सदर धुळ साचलेल्या उपकरणांची साफसफाई करुन गंजलेले अथवा खराब झालेले उपकरणे बदलणेत यावे तसेच काही टॉयलेटमधील एक्झॉस्ट फॅन काढलेले असून सदर ठिकाणी नवीन एक्झॉस्ट फॅन बसविणेत यावे. तसेच हॉलमध्ये केलेल्या विद्युत वायरींगला कव्हर बसविणेत यावेत."*

उपरोक्तप्रमाणे मा.अध्यक्ष महोदय यांनी दिलेल्या सुचनेनुसार मंदिर परीसरातील शांतीनिवास तसेच भक्तनिवास इमारतीच्या तळमजला तसेच पहिला मजला येथील दर्शनलाईन हॉलमधील सिलींग फॅन, एक्झॉस्ट फॅन, स्वीच बोर्ड तसेच डिस्ट्रीब्युशन बोर्ड बदलून त्याठिकाणी नवीन सिलींग फॅन एक्झॉस्ट फॅन, स्वीच बोर्ड तसेच डिस्ट्रीब्युशन बोर्ड बसवावे लागणार आहे. सरचे सिलींग फॅन, एक्झॉस्ट फॅन, स्वीच बोर्ड तसेच डिस्ट्रीब्युशन बोर्ड संस्थानचे मुख्य भांडार व विद्युत विभागाकडील सबस्टोअरला शिल्लक नसल्याने सिलींग फॅन, एक्झॉस्ट फॅन, स्वीच बोर्ड तसेच डिस्ट्रीब्युशन बोर्डची खरेदी करणे गरजेचे आहे.

सदरचे सिलींग फॅन, एक्झॉस्ट फॅन, स्वीच बोर्ड तसेच डिस्ट्रीब्युशन बोर्ड खरेदी करणेकामी येणारा खर्च **महाराष्ट्र शासनमान्य सी.एस.आर.(सन २०१३-२०१४)** प्रमाणे तयार केलेला असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | C.S.R. No. | Description | Qyt. | Rate | Amount Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 2-13-3 | Supply of regular / standard model Ceiling fan of 1200 mm. sweep complete erected in position as per specification no. FG- | 250 Nos. | 1821.75 | 4,55,437.50 |
| 02) | 2-13-14 | Supply of fresh air cum Exhaust fan of light duty 50 V A.C. 50 cycles 300mm. 1400 RPM rust proof body & blades, wire mesh, duly erected in an approved manner and marking Sr. No. and date of erection | 20 Nos. | 1379.70 | 0,27,594.00 |
| 03) | 2-13-19 | Supply of Exhaust fan heavy duty 230 V A.C. 50 cycles 450 mm. 1400 RPM complete erected in position as per specification no. FG-FN/EXF | 20 Nos. | 4962.30 | 0,99,246.00 |
| 04) | 5-4-8 | Supply of triple pole and neutral distribution board (TPNDB) with door surface/ flush mounted SPMCB of 24 ways, on iron frame / wooden board. (Horizontal type) as per specification No. SW-SWR/ MCBDB | 25 Nos | 3645.60 | 0,91,140.00 |
| 05) | 5-6-14 | Supply of RCCB + MCB, electro magnetic type with 30/100/300mA sensitivity and having capacity of 63A 4 Pole 3 phase as per specification No. SWRCCB/RCCB | 25 Nos | 3679.20 | 0,91,980.00 |
| 06) | 5-3-3 | Supply of SPMCB 6A to 32A, B- series (for lighting) in provided distribution board as per specification No. SW-SWR/MCB | 600 Nos | 145.95 | 0,87,570.00 |
| 07) | 1-8-34 | Supply of PVC Surface modular switch box with double mounting plate for 16/18 module complete duly erected in an approved manner. | 20 Nos. | 404.25 | 0,08,085.00 |
| 08) | 1-8-33 | Supply of PVC Surface modular switch box with double mounting plate for 12 module complete duly erected in an approved manner. | 60 Nos. | 365.40 | 0,21,924.00 |
| 09) | 1-8-32 | Supply of PVC Surface modular switch box with double mounting plate for 08 module complete duly erected in an approved manner. | 20 Nos. | 283.50 | 0,05,670.00 |
| 10) | 1-8-31 | Supply of PVC Surface modular switch box with double mounting plate for 06 module complete duly erected in an approved manner. | 10 Nos. | 220.50 | 0,02,205.00 |
| 11) | 1-8-30 | Supply of PVC Surface modular switch box with double mounting plate for 04 module complete duly erected in an approved manner. | 60 Nos. | 159.60 | 0,09,576.00 |
| 12) | 1-8-29 | Supply of PVC Surface modular switch box with double mounting plate for 03 module complete duly erected in an approved manner. | 100 Nos. | 133.35 | 0,13,335.00 |
| 13) | 1-8-28 | Supply of PVC Surface modular switch box with double mounting plate for 02 module complete duly erected in an approved manner. | 10 Nos. | 110.25 | 0,01,102.50 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 14) | 1-8-6 | Supply of modular type switch 16 / 20 A with indicator, ISI mark, approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 150 Nos. | 139.65 | 0,20,947.50 |
| 15) | 1-8-10 | Supply of modular type 3 pin 6A multi socket safety shutter ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 100 Nos. | 94.50 | 0,09,450.00 |
| 16) | 1-8-11 | Supply of modular type 3 pin 6 / 16A multi socket with safety shutter ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 150 Nos. | 154.35 | 0,23,152.50 |
| 17) | 1-8-1 | Supply of modular type switch 6A/ 10A ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 475 Nos. | 79.80 | 0,37,905.00 |
| 18) | 1-8-23 | Supply of modular type electronic step regulator for fan two module ISI mark approved make duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 250 Nos. | 407.40 | 1,01,850.00 |
| 19) | 1-8-25 | Supply of modular type blanking plate one module ISI mark approved make duly erected on provided plate & box. | 250 Nos. | 22.05 | 0,05,512.50 |
| 20) | 1-8-26 | Supply of modular type blanking plate two module ISI mark approved make duly erected on provided plate & box. | 225 Nos | 31.50 | 0,07,087.50 |
| 21) | 2-3-10 | Supply of Bulkhead fitting suitable for LED Lamp upto 11 w fixed on wall as per specification no. **FG-IDF/BHF** (Instead of 18/20 watt tubelight fitting) | 100 Nos | 166.95 | 0,16,695.00 |
| 22) | 2-1-29 | Supply of LED Lamp 5 to 8 watt 230 V Intergral type (Instead of 18/20 watt tubelight fitting) | 100 Nos. | 710.85 | 0,71,085.00 |
| 23) | 1-2-12 | Supply of PVC trunking (PVC casing-n-capping) of size 32 mm with accessories on wall/ceiling as per specification. | 2000 Mtr | 34.65 | 0,69,300.00 |
| 24) | Non C.S.R. | Supply of approved make, 1 x 20 watt LED Tube fitting with tubebar suitable to fixed at ceiling or wall. (Instead of 40 watt tubelight fitting) | 250 Nos. | 1050.00 | 2,62,500.00 |
| | | | | **Total Rs:-** | **15,40,350.00** |

उपरोक्तप्रमाणे शांतीनिवास तसेच भक्तनिवास इमारतीच्या तळमजला तसेच पहिला मजला येथील दर्शनलाईन हॉलमध्ये बसविणेकरीता सिलींग फॅन, एक्झॉस्ट फॅन, स्वीच बोर्ड तसेच डिस्ट्रीब्युशन बोर्ड खरेदी करणेकामी येणा-या रक्कम रुपये १५,४०,३५०/- (अक्षरी रक्कम रुपये पंधरा लाख चाळीस हजार तीनशे पन्नास मात्र) इतक्या खर्चास मान्यता मिळणेस तसेच **शासन निर्णयानुसार** सदरचे सिलींग फॅन, एक्झॉस्ट फॅन, स्वीच बोर्ड तसेच डिस्ट्रीब्युशन बोर्ड खरेदी करणेकामी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन व संस्थानचे वेबसाईटवर ही जाहीरात अपलोड करुन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८७४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शांतीनिवास, भक्तनिवास इमारतीचा तळमजला, पहिला मजला येथील दर्शनरांगेच्या हॉलमध्ये बसविणेकरीता सिलींग फॅन, एक्झॉस्ट फॅन, स्वीच बोर्ड तसेच डिस्ट्रीब्युशन बोर्ड विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३२** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील औषध दुकान भाडे तत्वावर चालविणेस देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत श्री साईनाथ व श्री साईबाबा असे दोन धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येते. सदरचे दोन्ही रुग्णालयात शिर्डी व शिर्डी परिसरातील तसेच श्रींच्या दर्शनासाठी येणारे भक्त रुग्णालयातअसणा-या सुविधांचा फायदा घेत असतात. श्री साईबाबा रुग्णालयात विविध प्रकारच्या अद्यावत सुविधा रुग्णांचे सोईसाठी उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत.

त्यामध्ये प्रामुख्याने सी. टी. स्कॅन, एम. एम. आय., डायलेसिस, अॅन्जीओग्राफी, अॅन्जीओप्लास्टी, हृदय शस्त्रक्रिया, एन्डोस्कोपी, इत्यादी सुविधा उपलब्ध आहे. श्री साईबाबा रुग्णालयात उपचार घेणा-या रुग्णांना जी औषधे संस्थानच्या औषध भांडारात उपलब्ध असतील ती वापरण्यात येतात तर जी औषधे संस्थानचे औषध भांडारात उपलब्ध नसतील ती रुग्णांना बाहेरुन विकत आणावी लागतात. परंतु बाहेरील खाजगी दुकानदार हे रुग्णांना वाजवीपेक्षा जास्त दर आकारण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच बाहेरील खाजगी दुकान हे24 तास चालू नसतात त्यामुळे रात्रीच्या वेळेस उपचारासाठी दाखल होणा-या रुग्णास औषधांची गरज भासल्यास ती मिळू शकत नाही.

याकरिता संस्थानचे व्यवस्थापन समितीने दि.०७/०७/२००८ चे सभेतील निर्णय क्र.५८१ अन्वये श्री साईबाबा रुग्णालयाचे आवारात २४ तास औषधे दुकान५ वर्षाकरिता भाडे तत्वावर चालविण्यास देण्याचा निर्णय घेतलेला होता. कारण महाराष्ट्र राज्य अन्न व औषध प्रशासन यांचे नियमानुसार औषध दुकान चालविण्याचा परवाना मिळविणेकामी कमीत – कमी ५ वर्षाचा कालावधी आवश्यक आहे.

मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१०/०१/२०१० रोजीचे सभेत अपोलो हॉस्पिटल एंटरप्राईजेस, चेन्नई यांनी सदरचे औषध दुकान चालविण्यास दिलेले आहे. तसेच दुकान चालवणेकामी येणारा खर्च वजा जाता सर्व नफा संस्थानला देणगी म्हणून देऊ असा प्रस्ताव अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस यांनी दिला होता. त्यावर चर्चा होऊन निर्णय क्र.१९२ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला होता.

"अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस, चेन्नई यांनी आजचे सभेत साईबाबा रुग्णालयात रिटेल मेडिकल स्टोअर चालविणेकामी प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावात त्यांनी रिटेल मेडिकल स्टोअर चालविण्यासाठी येणारा खर्च व मेन्टेनन्स खर्च इत्यादी वजा जाता राहिलेला नफा संस्थानला देणगी म्हणून देण्यात येईल अशी विनंती केलेली होती. यावर चर्चा होऊन, याकामी अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस, चेन्नई यांना रिटेल मेडिकल स्टोअर चालविण्यासाठी येणारा खर्च व मेंन्टेनन्स चार्ज देण्यात येऊन दुकान चालविण्यास देण्यात यावे तसेच याबाबत वैद्यकीय संचालक यांनी अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस् चेन्नई यांचेशी विहित पध्दतीने याबाबत करारनामा करुन घेण्यात यावा, याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी असे ठरले."

त्यानुसार मे. अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस यांना इकडील पत्र क्र. ४८९० दि. १८/०३/२०१० अन्वये कार्याआदेश देण्यात येऊन झालेला खर्च वजा जाता होणा-या नफ्याची रक्कम संस्थानला जमा करणेबाबत ठरलेले होते.

सदर अटीमध्ये जर दरमहा नफा खर्च वजा जाता रु.२७५०००/- पेक्षा कमी झाला तर त्यांना कमीत – कमी रु.२,७५,०००/- देणे बंधनकारक राहील असे ठरले होते. त्यानुसार दुकान कार्यान्वित झाल्यापासून रु.२,७५,०००/- पेक्षा जास्त नफा झालेला आहे व तो त्यांनी संस्थानमध्ये वेळोवेळी जमा केलेला आहे. (रक्कम रु. ४,९६,७७,९४०/-)

सदर दुकान चालविणेकामी लागणारा परवाना मिळणेबाबत अन्नव औषध प्रशासनाच्या नियमानुसार कमीत – कमी ५ वर्षाचा भाडे करार आवश्यक असतो. त्यानुसार त्यांना ५ वर्षाकरिता भाडे तत्वावर औषध दुकान चालविण्यास देण्यात आलेले आहे. करार नाम्यानुसार त्यांनी दुकान दि०१/०४/२०१० पासून कार्यान्वित करणेबाबत ठरलेले होते. परंतु, प्रत्यक्षात दि.०९/०५/२०१० पासून सदर दुकान कार्यान्वित झालेले आहे

संस्थानकडून इकडील पत्र क्र. १२८६६ दि. ०१/०९/२००८ अन्वये शासनाकडे ५ वर्षाकरिता भाडे तत्वावर औषध दुकान चालविण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर दि. २७/०१/२०१० रोजी मंत्रालयात झालेल्या बैठकीत सदर औषध दुकान भाडे तत्वावर चालविण्यास मान्यता मिळालेली होती तसेच महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. सासंवि/२००९/१९६/प्र.क्र.१०/का.१६ दि. १३/११/२०१३ चे पत्रान्वये मान्यतेबाबत खालील प्रमाणे आदेश प्राप्त झालेला आहे.

"याबाबत आपणांस असे कळविण्याचे मला निर्देश आहेत की, श्री साईबाबा रुग्णालयात भाडेतत्वावर देण्यात आलेल्या औषध दुकानाचा करार संपुष्टात आल्यानंतर पुन्हा करारास मुदतवाढ न देता संस्थानमार्फत औषध दुकान चालविण्याच्या पर्यायाचा विचार करण्यात यावा किंवा संस्थानमार्फत औषध दुकान चालविणे शक्य नसल्याने दुकान भाडेतत्वावर चालविण्यास देताना जाहिर निविदा प्रक्रिया राबवून जास्तीत– जास्त दराने दुकान भाडेतत्वावर देण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी."

तसेच श्री साईबाबा रुग्णालयात चालविण्यात येत असलेल्या नियम व अटीनुसार श्री साईनाथ रुग्णालयात देखील सदर दुकानाचे विस्तारीत कक्ष (Extension counter) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०५/१२/२०१० निर्णय क्र.९५८ अन्वये चालविण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार इकडील पत्र क्र. ५६८६ दि. २३/१२/२०१० अन्वये दि. ०१/०१/२०११ पासून पुढील५ वर्षाकरिता दुकान चालविण्यास देण्यात आलेले होते. परंतु, प्रत्यक्षात दि.०१/१२/२०११ पासून कार्यान्वित झालेले आहे. सदर दुकानाचा कालावधी देखील करारनाम्यानुसार दि.३१/१२/२०१५ अखेर संपुष्टात येत आहे. त्यामुळे दोन्हीही रुग्णालयातील दुकानांसाठी सारखीच प्रक्रिया करावी लागणार असल्यामुळे एकाच वेळेस मान्यता व निविदा इत्यादी कार्यवाही करणे योग्य होईल.

तथापि संस्थानच्या दोन्ही रुग्णालयाकरिता औषध दुकान चालविणेस संस्थानने मे.अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस, चेन्नई यांना परवानगी दिली होती. सदरची मुदत दि.३१/०३/२०१५ रोजी संपत येणार होती, त्यामुळे रुग्णांच्या सोईच्या दृष्टीने सदर औषध दुकान चालविणेकामी निविदा प्रक्रिया करणेसाठी बराच कालावधी लागणार असल्यामुळे दि.१६/०४/२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र.१२९ अन्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात औषध दुकान भाडे तत्वावर चालविणेस देणेकामी विहित पध्दतीने निविदा प्रक्रिया पूर्ण करुन नवीन औषध दुकान चालविणेकामीचा आदेश होईपावेतो मे.अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस, चेन्नई यांना मागील अटी व शर्तीनुसार मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

त्यानुसार श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात औषध दुकान भाडे तत्वावर चालविणेस देणेकामीचा प्रस्ताव दि.२०/११/२०१४ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता, त्यावर निर्णय क्र.१००६ अन्वये प्रस्तावितकामी संस्थान वकीलमार्फत अर्ज करण्यात येऊन मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले त्यानुसार मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची सिव्हील ॲप्लीकेशन नं.३५०१/२०१५ दि.२२/०६/२०१५ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

तसेच इकडील पत्र क्र.१९ दि.०६/०४/२०१५ रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात औषध दुकान भाडे तत्वावर चालविणेस देणेस मंजुरी मिळणेकामीचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात आला होता. त्यास अनुसरुन मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, यांनी त्यांचेकडील पत्र क्र. सासंवि- १०१५/८२३/प्र.क्र.१४८/का.१६ दि.१५/०२/२०१५ अन्वये मान्यता दिलेली आहे.

वरील मान्यतेनुसार दि.१६/०९/२०१५ ते ०६/१०/२०१५ या कालावधीत ई-निविदा प्रक्रिया करण्याचे प्रस्तावास मान्यता घेण्यात आली होती. परंतु अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस यांचे विशेष लेखपरिक्षण करणेसाठी मे.शिंदे चव्हाण गांधी ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंट, लातुर यांना नेमण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी दि.२६/०५/२०१६ रोजी लेखापरिक्षण अहवाल संस्थानकडे सादर केलेला असून त्यावर दि.१४/०७/२०१६ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय होणेकामी ठेवण्यात आला होता, त्यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र.४२३ अन्वये मे. अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस लि., चेन्नई (फार्मसी डिव्हीजन) यांना सदर अहवालाची एक प्रत देऊन त्याबाबतचा अनुपालन (त्रुटी-पुर्तता) अहवाल मागविणेत यावा व त्यांचेकडून सदरहू रक्कम वसुल करुन घेण्यात यावी. तसेच मे. अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस लि., चेन्नई (फार्मसी डिव्हीजन) यांचा काळया यादीत समावेश करण्यात येऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालय येथे औषध दुकान चालविणेकामी तातडीने ई-प्रक्रिया राबविणेत यावी असे ठरले.

त्यास अनुसरुन औषध भांडार विभागाकडील दि०९/०८/२०१६ रोजीचे मंजुर टिपणीन्वये औषध दुकान चालविणेस देणेकामी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस मान्यता घेण्यात आलेली आहे.

**श्री साईबाबा संस्थानने श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात रिटेल मेडीकल स्टोअर चालविण्यासंदर्भात येणाऱ्या अडचणीबाबत–**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी मे.अपोलो हॉस्पिटल एंटरप्रायजेस लि., चेन्नई यांचे जागेवरती मेडीकल चालु करावे असे सुचविलेले आहे परंतु सध्याऔषध भांडार विभागात कमी फार्मासिस्टमध्ये काम चालु आहे, तसेच कान्ट्रॅक्ट पध्दतीने फार्मासिस्ट घेतल्यास केंव्हाही काम सोडून जाऊ शकतात, त्यामुळे

अनुभवी फार्मासिस्ट मिळणे जिकरीचे होते. सदर औषध दुकान २४ तास चालविण्याचे झाल्यास श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ३२ फार्मासिस्ट व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये १० ते १५ फार्मासिस्टची आवश्यकता राहील.

सध्याची संस्थानची खरेदी पध्दत ही वार्षिक खरेदी (Annual E-Tender) पध्दत असून ई-निविदा मागवून संस्थान औषधे खरेदी करत असते. शासनाचे दि.३० ऑक्टोबर २०१५ चे आदेशान्वये खरेदी नियमावलीनुसार खरेदीची कार्यवाही संस्थानला बंधनकारक आहे, त्यामध्ये रु.५ हजारच्या पुढे खरेदी करावयाची झाल्यास कोटेशन मागवावे लागता व सदर प्रकियेकरीता साधारणतः एक हे दिड महिन्याचा कालावधी जातो, म्हणजेच औषध दुकानात तातडीने आवश्यक असणारे औषधे हे देखील हयाच पध्दतीने खरेदी करावे लागतील.

किरकोळ व्यापार करताना (Retail Medical Store) औषध खरेदीमध्ये विविध प्रकारचे ब्रॅन्ड ठेवणे तसेच ते मुक्त बाजारपेठेतून खरेदी करावे लागतात. त्याचे Payment हे आठ दिवसात संबंधितास देणे भाग असते. परंतु सध्याची संस्थानची कार्यप्रणाली / देय रक्कम ही प्रशासकीय कामकाजानुसारच चालते, त्यास साधारणतः एक महिन्याचा कालावधी लागतो. या औषधांची निविदा प्रक्रिया करता येत नाही कंपनीने दिलेल्या स्टॉकीस्ट दराने औषधे खरेदी करावे लागतात. परंतु संस्थानची खरेदी पध्दत ही निविदा प्रक्रियेने चालते. त्यामुळे औषधे उपलब्धतेमध्ये अडचणी येऊ शकतात.

तसेच संस्थानमध्ये ब-याच प्रमाणात गरीब व गरजु रुग्णांसाठी चॅरीटी करावी लागते. तसेच संस्थानमार्फत औषध दुकान चालु केल्यास गरीब व गरजु रुग्णांसाठी पुन्हा औषधांमध्ये चॅरीटी करावी लागेल, त्यामुळे संस्थानचा तोटा आणखी वाढेल.

संस्थानमार्फत दोन्ही रुग्णालयात औषध दुकान चालु करावयाचे झाल्यास तातडीने औषधे उपलब्ध करणेचे दृष्टीने खरेदीची प्रक्रिया बदलावी लागेल. त्यामुळे शासनाने संस्थानकरीता ठरवून दिलेल्या नियमावलीप्रमाणे औषधे खरेदी करता येणार नाही.

यापूर्वी संस्थानतर्फे सदरचे औषध दुकान ३ महिन्यांचे कालावधीसाठी चालवून नंतर ते बंद करण्यात आले होते, कारण औषध दुकानातून जी औषधे विक्री केली जातील त्याचे छापील बिले रुग्णांना देणे बंधनकारक आहे व त्यावर संस्थानचा Sale Tax No. टाकणे अनिवार्य आहे. परंतु, संस्थान ही धर्मदाय संस्था असल्यामुळे संस्थानचे नावाने Sale Tax No. घेतला तर संस्थानमार्फत जेथे जेथे साहित्य विक्री करण्यात येते त्या सर्वांवर संस्थानला विक्रीकर भरावा लागेल. त्यामुळे सदरचे दुकान बंद करण्यात आले होते. त्यामुळे संस्थानतर्फे औषध दुकान तांत्रिकदृष्ट्याचालविता येऊ शकत नाही.

सदर प्रस्तावावर महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागामार्फत श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी आणि श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी येथील औषध दुकान भाडे तत्वावर चालविण्यास देण्याकरीता ई निविदा मागविण्याच्या संदर्भाधीन पत्राव्दारे आपण सादर केलेल्या प्रस्तावास शासन मान्यता प्रदान करत असून प्रस्तुत प्रकरणी विहित पध्दतीने ई-निविदा मागविण्याची कार्यवाही करण्यात यावी, असे पत्रान्वये कळविलेले आहे. त्यानुसार औषध दुकान हे भाडे तत्वावर चालविण्यास दयावे लागणार आहे.

परंतु १) औषध दुकान हे भाडेतत्वावर देणेपुर्वी संबंधित निविदाधारकांकडून सहा महिन्याचे भाडे डिपॉझीट म्हणून घेण्यात यावे व २) त्यांचेकडून Life Saving Drug करीता व Surgical Items करीता MRP वर पेशंटला किंती प्रमाणात Discount घेण्यात यावे, त्यानुसार सदर बाबत योग्य तो निर्णय होणेचा व ई–निविदा मागविणेच्या प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील औषध दुकान भाडे तत्वावर चालविणेस देणेकामी उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली. परंतु निविदा मागवितेवेळी त्यामध्ये संबंधीत कंपनीकडून सहा महिन्यांचे भाडे डिपॉझीट म्हणून घेण्यात येईल तसेच नामांकित औषधांवर १२.५%, लाईफ सेव्हींग औषधांवर २५% व सर्जिकल साहित्यांवर ४०% सुट देऊन विक्री करावी, या अटींचा समावेश करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३३** **श्री साईबाबा हॉस्पिटलकडील सन २०१६-१७ मधील औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे दैनंदिन वापरण्यासाठी सन २०१६ – २०१७ या वर्षाकरिता लागणारे औषधे, मलम, आयुर्वेदिक औषध, कॅथलॅब, कार्डियाक व कार्डियाक ओ. टी. मटेरियल, न्युरो ओ. टी. मटेरियल इ. खरेदीकामी सर्व वॉर्ड व विभागातून मागणी घेण्यात आलेली असून सदर मागणी एकत्र करण्यात आलेली होती.

मागील वर्षाचा खप विचारात घेऊन नग संख्या विचारात घेण्यात आली व मागील वर्षाच्या दरामध्ये २०% दर वाढवून अंदाजे खर्च घेण्यात आला आहे. त्यानुसार सन २०१६ – २०१७ करिता रु. ४८, ४०, ५७, ८५३/- इतका खर्च येणार आहे.

त्यानुसार सदर प्रस्ताव दि. १०/१०/२०१६ रोजीचे मा. रुगणालय उपसमिती सभेपुढे ठेवण्यात आलेला होता. निर्णयानुसार दि १८/१०/२०१६ रोजी मा. उपकार्यकारी अधिकारी, मा. मुख्यलेखाधिकारी, मा. वैद्यकीय संचालक, मा. परचेस मॅनेजर, यांनी मुंबई येथीलDMER या संस्थेला भेट देण्यासाठी गेले असता तेथील खरेदी व्यवस्थापक, श्री. परमेश्वर कोगनुरे व फार्मासिस्ट, श्री सुरेश धळे व सहाय्यक संचालक लेखा, श्री. शिवराज असमर यांच्याशी चर्चा करुन खरेदी संबंधित माहिती व E Tender संबंधित कागदपत्रे घेण्यात आली व त्यानंतर DHS या संस्थेतील डॉ. बी. डी. पवार, श्री राणे सर, व श्री. अनिल खांडेकर यांचेकडून खरेदी संबंधित माहिती व कागदपत्रे घेण्यात आली. त्यानुसार खरेदीमध्ये जुन्या अटी व शर्तींच्या अधीन राहून पारदर्शकता येण्यासाठी खालील कार्यपध्दती सुचविण्यात आलेली आहे.

१) **Demand Committee:-** सन २०१६– २०१७ मध्ये आलेली सर्व वॉर्डची मागणी निश्चित करणेकामी Demand Committee स्थापन करावी लागेल, जेणेकरुन नगांची संख्या कमी अथवा जास्त होऊ नये, याकामी प्रत्येक विभाग प्रमुख यांचेकडून ७ दिवसांच्या आत Demand निश्चित करुन घेणेसाठी Demand Committee प्रस्तावित करण्यात आली आहे.

**त्याचा तपशिल खालील प्रमाणे :– तक्ता क्र. १.**

| Sr. No. | Demand Committee | | Sr. No | Demand Committee | |
|---|---|---|---|---|---|
| | **Doctor Name** | **Specility** | | **Doctor Name** | **Specility** |
| 1 | Dr. Narode | Medical Director | 13 | Dr. Sable R. | Paediatrician |
| 2 | Dr. Pitambare | Medical Superintend | 14 | Dr. Vyevhare | Radiologist |
| 3 | Dr. Vadgave | Medical Administrative | 15 | Dr. Sarvar | Pathologist |
| 4 | Dr. More | Cardialogist | 16 | Dr. Patil S. | Blood Bank |
| 5 | Dr. Mistry | Cardiac surgeon | 17 | Dr. Vikhe | Dentist |
| 6 | Dr. Vidya Borade | General Surgeon | 18 | Dr. Khande | Dental Surgeon |
| 7 | Dr. Deore | General Surgeon | 19 | Dr. Godage | Neuro surgeon |
| 8 | Dr. Kale | Orthopediac | 20 | Dr. Mundada – | Urologist |
| 9 | Dr. Jadhavar | Physician | 21 | Dr. Vaghulde | Nephrologist |
| 10 | Dr. Agrawal | Gynacologist | 22 | Dr.Chaudhari Ganesh | Plastic Surgeon |
| 11 | Dr. Bajaj | Opthalmologist | 23 | Dr. Survase | Anesthesia |
| 12 | Dr. Shelke | Ayurvedic | 24 | Shri. Kunal Abhale | Secretary |

२) **Specification Committee :-** Demand Committee ने मान्य केलेली मागणीचे Specification हे हॉस्पिटलमधील संबंधित डॉक्टरांकडून Check करुन घेणेसाठी Specification Committee प्रस्तावित करण्यात आली आहे.

**त्याचा तपशिल खालील प्रमाणे – तक्ता क्र. २.**

| Sr. No. | Specification Committee | | Sr. No. | Specification Committee | |
|---|---|---|---|---|---|
| | **Doctor Name** | **Specility** | | **Doctor Name** | **Specility** |
| 1 | Dr. Narode | Medical Director | 12 | Dr. Sable R. | Paediatrician |
| 2 | Dr. Pitambare | Medical Superintend | 13 | Dr. Vyevhare | Radiologist |
| 3 | Dr. Vadgave | Medical Administrative | 14 | Dr. Nyayadhish | Pathologist |
| 4 | Dr. Shinde | Cardialogist | 15 | Dr. Patil S. | Blood Bank |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5 | Dr. A. Arawal & Dr. S. Shety | Cardiac surgeon | 16 | Dr. Khande | Dental Surgeon |
| 6 | Dr. Ram Naik | General Surgeon | 17 | Dr. Godage | Neuro surgeon |
| 7 | Dr. Gaikwad | Orthopediac | 18 | Dr. Mundada | Urologist |
| 8 | Dr. Jadhavar | Physician | 19 | Dr. Vaghulde | Nephrologist |
| 9 | Dr. Mahendra Nemnath | Gynacologist | 20 | Dr. Chaudhari Ganesh | Plastic Surgeon |
| 10 | Dr. Sontakke | Opthalmologist | 21 | Dr. Tambe | Anesthesia |
| 11 | Dr. Shelke | Ayurvedic | 22 | Shri. Kunal Abhale | Secretary |

सदर समितीने Demand Committee ची Demand प्राप्त झालेनंतर ७ दिवसांत Specification तपासून आवश्यक्तेनुसार बदल सुचवावेत

३) **Pre Qualification Criteria:-** यापूर्वी E- Tender मध्ये Authorized Dealer & Distributor हे निविदा भरत होते. त्यामुळे त्यांचे मटेरियलच्या Quality व Supply करतांना फार अडचणी निर्माण होत होत्या. त्यामुळे रुग्णांची फार मोठया प्रमाणात गैरसोय होत असल्यामुळे या वर्षी निविदा प्रसिध्द करतांना जुन्याअटी व शर्तींच्या अधीन राहून खालील अटी व शर्ती टाकण्यात येतील.

**A)** Distributors/ Suppliers/ Agents/ Authorized dealers are not eligible to participate in this tender. The tenderer must have its own manufacturing facility & valid Drug manufacturing license. Loan Licenses is not eligible

The Successful bidder can appoint his territorial distributors at his own cost & at own risk at the time of supply after awarding the tender. Along with his documents namely valid drug license valid on the day of submission of Tender from Food & Drugs Administration along with list of products Licensed to be Manufacturered. Manufacturer will be solely responsible for all types of quality issues even though supplies are made by distributor.

For items manufactured outside india, the manufacture / subsidiary shall submit following documents along with tender.

i) Authority letter of the original manufacturer stating that the tendering firm is wholly owned subsidiary of manufacturer India.
ii) Valid import license in form 10 for drugs & medical devices. And IEC code for other Products / C.E. certificate
iii) Bankers certificate
iv) Bill of entries to access that the product is imported in India since last 3 years
v) Original manufacturer's certificate that the product is being used in country of origin

B) Certified copy of VAT / CST Registration Certificate & VAT / CST Clearance Certificate up to last financial year.

If registered under the Micro, Small and Medium Enterprises Development Act 2006, then Photostate copy of registration certificate.

C)Performance Certificate from concerned Food & Drugs Administration in enclosed proforma Annexure II. If the tenderer is manufacturing the same items for which tender is filled in, at various locations/ places either in, Maharashtra or outside Maharashtra, he should obtain performance certificate from the respective Food & Drugs Administration Authority for such locations where the manufacturing activities are carried out.

D) For all the medical devices which imported/ domestic medical devices also should hold license for sale of these medical device under Drug & Cosmetic Act 1940 & rules there under valid on the day of submission of tender form.

E) You have to Submit your Company Registration Certificate.

**F) Tenderer (Manufacturer) must have valid WHO GMP with product list.**

G) Tenderer shall produce Certificate from Chartered Accountant for Annual turnover of last 3 years (2014,2015,2016) in the format given in Annexure – I

**H) The Minimum Annual Turnover should be as per Table No. 5.**

**I)** शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. ३० ऑक्टोबर २०१५ ६.८ परिशिष्ट - ८ - अन्वये :-

निविदा प्रक्रियेत घेण्यात येणा-या निविदा फी व बयाणा रक्कमेबाबत :-

शासकीय विभागांच्या अखत्यारितील कार्यालयाकडून प्रसिध्द करण्यात येणा-या रुपये एक कोटी पर्यंत इतक्या किंमतीच्या निविदांसाठी निविदा शुल्क व बयाणा रक्कम उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ३०/१०/२०१५ च्या शासन निर्णयान्वये (परिच्छेद क्रमांक ३.१२.१ व परिशिष्ट – ८) निश्तिच करण्यात आली आहे.तसेच रुपये एक कोटी पेक्षा जास्त किंमतीच्या निविदांसाठी निविदा शुल्क व बयाणा रक्कम संबंधित विभागांनी निश्चित करण्याबाबत सदर शासन निर्णयान्वये सूचित करण्यात आले आहे.

**त्यांचा तपशिल खालील प्रमाणे :- तक्ता क्र. ३.**

| **Sr. No.** | **Estimated Value tender** | **Tender fees** | **Yearly increase** | **EMD** | **Yearly increase** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | UP to 5 lakhs | 1000 | 100 | 5000 | 500 |
| 2 | Above 5 lakhs to 10 lakhs | 2000 | 200 | 10000 | 1000 |
| 3 | Above 10 lakhs to 50 lakhs | 3000 | 300 | 50000 | 5000 |
| 4 | Above 50 lakhs to 1 cror | 10000 | 1000 | 100000 | 10000 |
| 5 | Above 1 cror | Respective Department to fix the Tender Form Fee | | Respective Department to fix the EMD Value | |

त्यानुसार, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. २०१५/प्र.क्र२९८/आरोग्य /८, दि. ११/०१/२०१६ अन्वये मुद्या क्र. २ मध्ये उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ३०/१०/२०१५ च्या शासन निर्णयातील उपरोक्त तरतुदीच्या अनुषंगाने खरेदीशी संबंधित विभागांना बयाणा रक्कम (EMD) निश्चित करण्यास मान्यता मिळालेली आहे. त्यास अनुसरुन रु. १ कोटीपेक्षा जास्त रक्कमेच्या निविदांचे निविदा शुल्क व बयाणा रक्कम व त्यात करावयाची वार्षिक प्रस्ताव खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

**त्याचा तपशिल खालील प्रमाणे :- तक्ता क्र. ४.**

| अ. न. | निविदेची अंदाजित किंमत (रुपये) | निविदा शुल्क (रुपये) | निविदा शुल्कात वार्षिक वाढ (रुपये) | बयाणा रक्कम (रुपये) | बयाणा रक्कमेत वार्षिक वाढ (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | १ कोटी पेक्षा जास्त ते ५ कोटी पर्यंत | १५०००/- | १५००/- | १५००००/- | १५०००/- |
| 2 | ५ कोटी पेक्षा जास्त ते १० कोटी पर्यंत | २००००- | २०००/- | २०००००/- | २००००/- |
| 3 | १० कोटी पेक्षा जास्त | २५०००/- | २५००/- | २५००००/- | २५०००/- |

त्यानुसार, शासनाने मान्य केलेल्या १ कोटींच्या पुढील निविदेसाठी निविदा शुल्क व बयाणा रक्कम आपल्याला लागू करता येईल.

**J)** सदर E– Tender प्रसिध्द करतांना जास्तीत - जास्त प्रतिसाद मिळणेकामी त्यांचे ०८ भागात Tender प्रसिध्द करता येतील. त्यासाठी निविदाधारकांचा प्रत्येक भागाकरिता मागील ०३ वर्षाचा सरासरी Annual Turnover चा तपशिल खालील प्रमाणे :-

**तक्ता क्र. ५.**

| Total Purchase Part | Medicine Details | Partwise Minimum Annual Turnover Should be as per below |
|---|---|---|
| १ | आयुर्वेदिक औषधे | ५० लाख |
| | होमोपॅथीक औषधे | |
| २ | Consignment Item | ३० कोटी |
| ३ | कॅटगट ॲण्ड सुचर्स मटेरियल | ३० कोटी |
| ४ | गोळया | ३० कोटी |
| | इंजेक्शन व आय. व्ही फ्ल्युडस् | |
| | लिक्वीड ओरल्स | |
| | मलम | |
| | आय इअर व नोझल ड्राप्स | |
| ५ | श्री साईनाथ रुग्णालयय – लॅब केमिकल्स् | २० कोटी |
| | श्री साईबाबा – लॅब केमिकल्स् | |
| | ब्लड बॅंक केमिकल्स् | |
| ६ | ओ. टी. आणि इतर सर्जिकल मटेरियल | ३० कोटी |
| | कॅथलॅब, कार्डीयाक ओ. टी. व परफ्युजनीस्ट मटेरियल व सर्जिकल साहित्य | |
| | न्युरो ऑपरेशन थिएटर विभाग सर्जिकल साहित्य | |
| ७ | डायलेसीस युनिट | ५० लाख |
| | Mescellaneous (इतर किरकोळ साहित्य) | |
| | डेंटल मेटेरियल | |
| ८ | क्ष – किरण, सि. टी. स्कॅन, एमआरआय फिल्मस् व इतर साहित्य | ३० कोटी |

यामध्ये Technical Document हे खरेदी विभाग व वित्त विभागामार्फत तपासून घेता येतील व त्यानंतरच पात्र असलेल्या निविदाधारकांचे Commercial Bid उघडण्यात येईल.

K) सदरहू ई– निविदा हया सन २०१६ – १७ या वार्षिक कालावधीकरिता काढण्यात येणार असून सदर ई– निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन पुरवठा आदेश जाणेकामी अजून अंदाजे३ ते ४ महिन्यांचा कालावधी आहे, म्हणजेच साधारणतः मार्च २०१७ अखेर पुरवठा आदेश जातील. त्यानंतर लगेचच सन २०१७ – २०१८ या वर्षात वार्षिक खरेदीकामी ई – निविदा प्रक्रिया राबवावी लागेल म्हणजेच सन २०१६ - २०१७ या वर्षात वार्षिक खरेदीमध्ये पुरवठा आदेश दिलेली औषधे प्रत्यक्षात सन २०१७ – २०१८ या वर्षात खरेदी करावी लागणार आहे. त्यामुळे सदरची निविदा ही सन २०१७– २०१८ या वर्षासाठीच्या औषध / सर्जिकल साहित्य पुरवठयासाठी असावी व आवश्यतेनुसार सन २०१८– २०१९ या आर्थिक वर्षात ०१ वर्षासाठी किंवा वर्षातील काही कालावधीसाठी पुरवठा आदेशास मुदतवाढ देणेबाबत मा व्यवस्थापन समितीने निर्णय घेतल्यास या वाढीव कालावधीसाठी मंजूर दरानेच औषधांचा पुरवठा करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

**L)** औषधांची Demand, Specification इत्यादी अंतिम झाल्यानंतर खरेदी समितीकडून निविदेच्या अटी व शर्ती अंतिम करण्यात येतील व त्यानंतर ई– निविदा प्रसिध्द करण्यात येईल. शासन निर्णयातील तरतुदीनुसार तांत्रिक निविदा व दराबाबतची निविदा खरेदी समितीसमोर उघडण्यात येतील व दराबाबतचा तुलनात्मक तक्ता निर्णयासाठी मा. व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात येईल.

तरी अ.नं. A to L प्रस्तावित मुद्यांच्याव वरील शासन निर्णयाप्रमाणे आपले संस्थानमध्ये लागू होणेचे प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.८७६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलकडील सन २०१६-१७ मधील औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदी करणेबाबत प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३४** **कार्डीओलॉजिस्ट पदावर कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सिव्हील ॲप्लीकेशन नं.२७९७/२०१४ मधील मा.मुंबई हायकोर्टाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे दि १९/०३/२०१४ रोजीचे आदेशानुसार श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजिस्ट या पदावर ०६ महिने कालावधीसाठी कंत्राटी पद्धतीने व व्हिजीटींग पद्धतीने तात्पुरती नेमणूक करणेकरीता मान्यता देण्यात आली होती. त्यास अनुसरुन दि.२३/०३/२०१४ रोजीच्या मुलाखतीद्वारे व्हिजीटींग व कंत्राटी पद्धतीने कार्डीओलॉजिस्ट पदावर तात्पुरते सहा महिन्यांसाठी ५ कार्डीओलॉजिस्टच्या नेमणूका करण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी डॉ. शितलकुमार हिरण व डॉ. विनोद विजन हे हजर झालेले नव्हते. डॉ. प्रशांत पवार व डॉ. मनोहर शिंदे यांची पूर्णवेळ इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजिस्ट या पदावर ०६ महिन्यांसाठी कंत्राटी पद्धतीने नेमणूक करण्यात आलेली होती. सदर नेमणूकांस मा त्रिसदस्य समितीचे दि. १२/०४/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २७५ नुसार कार्योत्तर मान्यता घेण्यात आलेली आहे.

उपरोक्त कार्डीओलॉजिस्ट यांची ०६ महिन्यांसाठीची नेमणूक संपुष्टात आल्याने त्यांना मा. त्रिसदस्य समिती दि. ११/०९/२०१४ चे मा. त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र. ७८५ नुसार व सिव्हील ॲप्लीकेशननं. २९०/२०१५ वरील दि. १२/०१/२०१५ रोजीचे मा. न्यायालयाचे आदेशान्वये ०१ वर्ष कालावधीसाठी किंवा डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांची चौकशी पुर्ण होईपर्यंत जे आधी घडेल त्या कालावधीपर्यंत पुर्वीच्याच अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यात आली आहे.

सिव्हील ॲप्लीकेशन नं. २९०/२०१५ मधील मा. मुंबई हायकोर्टाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे दि १२/०१/२०१५ रोजीचे आदेशानुसार ०१ वर्ष कालावधीसाठी किंवा डॉ. बजाज व डॉ. वर्मा यांची चौकशी पुर्ण होईपर्यंत जे आधी घडेल त्या कालावधीपर्यंत पूर्वीच्याच अटीशर्तीवर मुदतवाढ देण्यात आलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या कार्डीओलॉजिस्टची नेमणूक संपुष्टात येत असल्याने त्यांना पुन्हा नेमणूक देणेकामी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबादयांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेबाबत तसेच डॉ. मनोहर शिंदे (कंत्राटी) यांचे मानधन ठरविणेबाबत असे एकुण दोन प्रस्ताव दि. २७/१०/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेसमोर सादर करणेत आले होते. उपरोक्त प्रस्तावावर निर्णय क्र.३७८ व ३७९ खालीलप्रमाणे झाले आहेत.

<u>**निर्णय क्र.३७८–**</u> डॉ.मनोहर शिंदे, कार्डीओलॉजिस्ट (कंत्राटी), श्री साईबाबा हॉस्पिटल यांनी कार्डीओलॉजिस्ट डॉ.बजाज, डॉ.वर्मा यांचे पश्चात कार्डीओलॉजी विभाग सुरळीतपणे चालू ठेवण्यात संस्थानला सहकार्य केलेले असून डॉ. शिंदे यांची मागणी वाजवी वाटते व त्यांना दि. ०१/०८/२०१५ पासून रु ६१,०००/- मात्र मानधना व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देणेबाबत यापूर्वीच समितीने निर्णय घेतलेला आहे. सबब डॉ. शिंदे यांच्या दि २५/०९/२०१५ रोजीचे मागणीवर निर्णय होणेसाठी त्यांच्या कामाचे स्वरुप, पेशंटची संख्या, होणा-या शस्त्रकिया यांचा समावेश करणेत येऊन संस्थान वकीलामार्फत मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये सिव्हील अर्ज दाखल करणेत यावा.

<u>**निर्णय क्र.३७९-**</u> "प्रस्तावात नमुद केलेल्या कार्डीओलॉजिस्ट यांना त्यांची मुदत संपलेच्यातारखेपासुन पुढे एक वर्ष किंवा आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पुर्वीच्याच अटी/शर्तीस अधीन राहून पुनःर्नेमणूक देणेकामी मा मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेस मान्यता देण्यात आली."

मा. त्रिसदस्य समितीचे निर्णय क्र.३७८ नुसार डॉ.शिंदे यांचे मानधनाबाबत सिव्हील ॲप्लीकेशन नं.१६०९०/२०१५ औरंगाबाद खंडपीठामध्ये दाखल करणेत आले होते त्यावर दि. ११/१२/२०१५ रोजी मा. न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश दिला आहे.

"We allow the applicant to continue the appointment of Dr. Manohar Shinde on adhoc basis and on consolidated salary of Rs. 61,000/- plus incentives per month."

मा. त्रिसदस्य समितीचे निर्णय क्र ३७९ नुसार कार्डीओलॉजिस्ट यांना पुनःर्नेमणूक देणेकामी मा मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान वकीलामार्फत सिव्हील ॲप्लीकेशन नं. १६५२१/२०१५ दाखल करणेत आले होते. त्यावर दि. १८/१२/२०१५ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिला.

"The visiting cardiologists who are already working, their tenure has already come to an end. It is submitted that, no complaints are received as against them. As such, the applicant is permitted to continue three visiting cardiologists and two cardiologists on contract basis on the same terms and conditions."

मा.न्यायालयाचे उपरोक्त दि.११/१२/२०१५ रोजीचे आदेशानुसार डॉ.शिंदे यांना प्रतीमहा रु६१,०००/- मात्र मानधन व संस्थान नियमाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता (Incentive) देण्यात येत आहे. तसेच मा. न्यायालयाचे उपरोक्त दि. १८/१२/२०१५ रोजीचे आदेशानुसार २ कंत्राटी व ३ व्हिजीटींग कार्डीओलॉजिस्ट यांना त्यांची मुदत संपलेच्या तारखेपासून पुढे एक वर्ष किंवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पुर्वीच्याच अटी/शर्तीस अधीन राहून पुन्हा नेमणूक देणेत आली होती त्यापैकी डॉ. मनोहर शिंदे यांना कार्डीओलॉजिस्ट पदावर कंत्राटी पद्धतीने दि. ०२/११/२०१५ पासुन नेमणूक देणेत आली होती सदर नेमणूक दि ०१/११/२०१६ अखेर संपुष्टात येत आहे.

तरी, डॉ.मनोहर शिंदे, कंत्राटी कार्डीओलॉजिस्ट यांना त्यांची मुदत संपलेच्या तारखेपासून (दि. ०२/११/२०१६ पासून) पुढे एक वर्ष अथवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत नेमणूक तसेच दरमहा मासिक मानधन रु. ६१,०००/- वसंस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देणेस मान्यता असावी.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.८७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.मनोहर शिंदे, कंत्राटी कार्डीओलॉजिस्ट यांची मुदत संपुष्टात येत असलेमुळे, त्यांना मुदत संपलेच्या तारखेपासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी अथवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता व दरमहा रु.६१,०००/- मात्र एकत्रित मासिक मानधनावर मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३५** **संस्थान कर्मचाऱ्यांनी हजर तारखेपासुन वेतनश्रेणी मिळणेकामी मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या रिट पिटीशनवरील मा.न्यायालयाचे आदेशाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.अनिल गायकवाड व इतर ९ कर्मचारी श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालय यांनी हजर तारखेपासून वेतनश्रेणी मिळणेकामी मा.उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे खाली नमुद केलेप्रमाणे रिट पिटीशन्स दाखल केलेले आहेत.

| अ नं | रिट पिटीशन नंबर | पिटिशनरचे नाव | हजर होते वेळीचे पदनाम व रूग्णालय | हजर तारीख | हजर होतेवेळी दिलेले मानधन/ वेतन | आकृतीबंध मंजुर झाल्याचे वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ६२८२/२०१६ | अनिल ज गायकवाड | एक्स रे अटेंडंट, साईनाथ | २३/०९/२००६ | ४००० | ------ |
| २ | ६२८३/२०१६ | डॉ लिना श्री पाटील | डेंटीस्ट, साईबाबा | १३/०५/२००६ | १७००० | २००७ |
| ३ | ६२८४/२०१६ | डॉ संतोष ब सुरवसे | आरएमओ, साईबाबा | १०/०६/२००६ | १८००० | २००७ |
| ४ | ६२८५/२०१६ | डॉ रविंद्र ग अंत्रे | आरएमओ, साईनाथ | ११/०९/२००६ | १७००० | २००७ |
| ५ | ६२८६/२०१६ | डॉ सुनिता शं कडू | आरएमओ, साईबाबा | ०७/०९/२००६ | १७००० | २००७ |
| ६ | ६२८७/२०१६ | डॉ महेंद्र वि तांबे | आरएमओ, साईनाथ | ११/०९/२००६ | १७००० | २००७ |
| ७ | ६२८८/२०१६ | डॉ वसंत वि विखे | आरएमओ, साईबाबा | १६/०५/२००६ | १७००० | २००७ |
| ८ | ६२८९/२०१६ | डॉ सचिन व देशमुख | आरएमओ, साईबाबा | २९/०६/२००६ | १७००० | २००७ |
| ९ | ६२९०/२०१६ | डॉ राजश्री ता शिनगारे | आरएमओ, साईबाबा | ०४/०९/२००६ | १७००० | २००७ |
| १० | ६२९१/२०१६ | श्री पंकज वि कांबळे | ज्यु एक्स रे टेक्निशियन | ०६/१२/२००६ | ६५०० | २००७ |

उपरोक्त रिट पिटीशन्सवर मा उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांनी दि ०१/०८/२०१६ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत.

2. There is innocuous prayer in these petitions in as much as the petitioners have sought direction to respondent nos. 1 and 2 to decide their pending applications/ representations. In the circumstances, we direct respondent no 1 and 2 to take decision, if already not taken, on the pending applications/ representations submitted by the petitioners as expeditiously as possible; however, within six months from today, on given the above

direction and communicate the decision so taken to the petitioners within the said period. All the writ petitions stand disposed of accordingly.

3. The learned A.G.P. appearing for the respondent/ state assures this court that order will be communicated to respondent nos. 1 and 2.

सदरहु प्रकरणाचा पुर्वइतिहास व वस्तुस्थिती खालीलप्रमाणे -

श्री साईबाबा हॉस्पिटलची स्थापना सन २००५ मध्ये झालेली आहे. त्यावेळी हॉस्पिटलसाठी आकृतीबंध मंजुर नसल्याने वैद्यकीय अधिकारी व टेक्निशियन, मॅनेजर्स, स्टाफनर्स इत्यादी पदांवर तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर भरती करणेत आली होती.

श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कर्मचारी वर्गांना ठराविक मानधन देणेबाबतचा प्रस्ताव दि. ०५/११/२००५ चे मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेत आला होता त्यावर निर्णय क्र ६६७ मध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळालेनंतर संबंधितांचे हजर तारखेपासून वेतनश्रेणीवर नेमणूका देणेस व देय होणारी फरकाची रक्कम अदा करणेस मान्यता देण्यात आली.

उपरोक्त निर्णयास अनुसरून जा.नं.एसएसएस/वशी१/७५/२००५ दि. ०७/०१/२००६ अन्वये आदेश पारित करणेत आला होता.

तथापि, रूग्णालयाचे आकृतीबंधास शासनाची सन २००७ व २००९ साली मान्यता मिळाली असल्याकारणाने श्री साईबाबा संस्थानकडून दि.०५/११/२००५ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र ६६७ ची अंमलबजावणी त्यावेळी करणेत आली नाही असे दिसते.

त्यानंतर उपरोक्त निर्णय क्र. ६६७ चा आधार घेऊन डॉ. दादासाहेब कांबळे यांनी मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन ८९११/२०१३ दाखल केले होते. त्यावर मा. उच्च न्यायालयाने दि. १९/०३/२०१४ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिले होते.

“In that view of the matter writ petition is disposed off with direction to respondent to decide the representations dtd. 09/09/2012 and 23/02/2013 made by the petitioner if already not decided as expeditiously as possible however within two months from today.”

मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार डॉ. कांबळे यांचे वेतनश्रेणीबाबत निर्णय घेणेसाठी दि ०३/०८/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेत खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करणेत आला होता.

दि. १३/०६/२००७ रोजीचे मंजूर आकृतीबंधात त्वचारोग पदास मंजुरी नसलेने डॉ कांबळे यांची नेमणूक मानधनावर केलेली होती. ती त्यांनी त्यावेळेस स्वीकारलेली आहे. दि. ०७/०८/२००९ च्या आकृतीबंधात पदाचा समावेश असल्याने त्यांना०१/०४/२०१० पासून वेतनश्रेणी देणेत आलेली आहे त्याचे मागणीप्रमाणे त्यांना सुरुवातीचे नेमणूकीपासून वेतनश्रेणी व वार्षिक वेतनवाढ देता येणार नाही.

यावर मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०३/०८/२०१४ रोजीचे सभेत निर्णय क्र. ६५१ खालीलप्रमाणे झाला.

डॉ.दादासाहेब लुमा कांबळे, असो. कन्सलटंट (त्वचारोग तज्ञ) श्री साईनाथ रुग्णालय यांनी दि. ०९/०९/२०१२ व दि. २३/०२/२०१३ रोजीच्या अर्जान्वये त्यांच्या नेमणूकीचे सुरुवातीपासून वार्षिक वेतनवाढ व वेतनश्रेणी मिळणेबाबत केलेली विनंती अमान्य करणेत आली.

अशाचप्रकारे डॉ.सुभाष शामकुवर व इतर ३ यांनी रुजू झालेल्या तारखेपासून वेतनश्रेणी लागू करणेबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचेसमोर वेगवेगळे रिट पिटीशन्स दाखल केले होते. त्यामध्ये मा. न्यायालयाने दि. ३०/०६/२०१४ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिला.

Respondent No. 2 shall be decide the representation given by the petitioners with regard to pay scale expeditiously and on its own merits within a period of 4 months from today.

मा.न्यायालयाच्या आदेशानुसार सदरच्या विषयावर निर्णय घेणेसाठी दि.०६/११/२०१४ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेत खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करणेत आला.

महाराष्ट्र शासनाची आकृतीबंधास मंजूरी नसल्याने अर्जदार (डॉ. सुभाष शामकुवर, डॉ. दिपक कांदळकर, डॉ. उल्हास पवार व डॉ. सुर्यकांत पाटील) यांना वेतनश्रेणीत पगार न देता सुरुवातीस मानधन अदा

करण्यात आलेले आहे ते आदेश विनातक्रार स्विकारलेले आहेत. शासनाची आकृतीबंधास मान्यता आल्यानंतर मा. व्यवस्थापनाचे निर्णयानंतर अर्जदार यांना वेतनश्रेणीमध्ये वेतन अदा करणेत आलेले आहे त्यानंतर प्रत्येक वर्षी अर्जदारांस वार्षिक वेतनवाढी अदा करणेत आलेल्या आहेत. आकृतीबंधास शासनाची मान्यता नसलेने अर्जदारांना सुरुवातीचे रुजू तारखेपासून वेतनश्रेणीमध्येवेतन देता येणार नाही अर्जदारांवर कुठल्याही प्रकारचा अन्याय झालेला नाही तसेच अशाच प्रकारे डॉ. दादासाहेब लुमा कांबळे यांनी विनंती अर्ज व रिट पिटीशन नं ८९११/२०१३ दाखल केले होते. मा. व्य. समितीचे दि. ०३/०८/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६५१ अन्वये त्यांची मागणी अमान्य करणेत आलेली आहे.

उपरोक्त प्रस्तावावर निर्णय क्र. ९६८ खालीलप्रमाणे झाला आहे.

प्रस्तावात नमुद केलेल्या श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलकडील ४ आरएमओ यांना त्यांचे हजर तारखेपासून वेतनश्रेणी लागू करणेत यावी असे ठरले

तथापि, रुग्णालयाचे आकृतीबंधास शासनाची सन २००७ मध्ये मान्यता मिळालेली असतानासुद्धा उपरोक्त निर्णय झालेला आहे,असे दिसते.

समान मागण्या व समान मुद्दा असताना एका प्रकरणात विनंती अमान्य करण्यात आली तर दुसऱ्या प्रकरणात विनंती मान्य करण्यात आल्याने डॉ. दादासाहेब लुमा कांबळे यांनी याकामी पुनःश्च मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर रिट पिटीशन क्र १०७०८/२०१४ दाखल केले होते. सदर पिटीशन मध्ये मा. न्यायालयासमोर मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०३.०८.२०१४ रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ६५१ नुसार संस्थानने प्रतिज्ञापत्र दाखल केले होते त्यामुळे दि ०६.११.२०१४ रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ९६८ ची अंमलबजावणी स्थगित केलेली होती.

त्यानंतर डॉ.कांबळे यांनी परत विनंती अर्ज सादर केल्याने तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी यांनी दि. १०/०२/२०१५ रोजी खालीलप्रमाणे निर्देश दिले होते.

"वेतनश्रेणी अस्तित्वात आल्यापासूनच सर्वांना लागू करण्यात आली आहे. अस्तित्वात नसलेली वेतनश्रेणी पुर्वलक्षी प्रभावाने लागु करण्याचा प्रश्न उद्भवत नाही अन्य डॉक्टरांना देखील याच नियमाने वेतनश्रेणी लागू करण्यात आली असल्याने यामध्ये कोणतीही विसंगती नाही. सदरची बाब न्यायालयाच्या सविनय निदर्शनास आणण्यात यावी व्य. समितीला सध्या तसदी देण्याची आवश्यकता नाही."

दि. ०६/११/२०१४रोजीचे सभेतील निर्णय क्र. ९६८ ची अंमलबजावणी न करणेत आल्याने डॉ. शामकुवर व इतर ३ यांनी पुन्हा मा. अध्यक्ष साहेब यांचेकडे निर्णयाची अंमलबजावणी करणेसाठी अर्ज केला होता. सदरहू अर्जावर निर्णय घेण्यासाठी मा. अध्यक्ष साहेब यांनी याबाबतचा प्रस्ताव त्रिसदस्य समितीसमोर सादर करणेबाबत निर्देश दिल्याने दि.०६/११/२०१४ रोजीचे सभेमध्ये निर्णय क्र.९६८ निरस्त करणेबाबत दि.११/१०/२०१५ व दि.१८/१२/२०१५ रोजी टिपण्या सादर करणेत आल्या होत्या. त्यानंतर मात्र दि.०५/११/२००५ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ६६७ ला अनुसरुन काढणेत आलेला आदेश पारित करणेत आलेलाआहे. त्याचप्रमाणे डॉ. कांबळे यांनाही दि२९/०२/२०१६ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र. १८५ नुसार दि. १४/१०/२००५ पासून सन २००९ चे मंजूर आकृतीबंधात वैद्यकीय अधिकारी (त्वचारोग) पदासाठी असलेली मंजूर वेतनश्रेणी दि २५/०४/२०१६ च्या आदेशान्वये लागु करणेत आलेली आहे.

डॉ.कांबळे यांनी माउच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट पिटीशन क्र. १०७०८/२०१४ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. ११/०४/२०१६ रोजी डॉ. कांबळे यांना ८ आठवड्याच्या आत म्हणजे दि. ०६/०६/२०१६ पर्यंत त्यांना मॉनेटरी बेनिफिट्स (Monetary Benefits) देण्यात यावे असे निर्देश दिले आहेत. त्याप्रमाणे डॉ. कांबळे यांना दि २५/०४/२०१६ च्या आदेशान्वये वेतनश्रेणी लागु करुन व एप्रिल २०१६ चे पगारपत्रकापासून सुधारित वेतन अदा करणेत येत आहे त्यामुळे मा. उच्च न्यायालयाचे आदेशाचे पालन केलेले आहे असे नम्र मत आहे.

तथापि, रुग्णालयाचे आकृतीबंधास शासनाची सन २००७ व २००९ साली मान्यता मिळाली असल्याकारणाने दि. ०५/११/२००५ रोजी त्यावेळच्या मा.व्यवस्थापन समितीने घेतलेला निर्णय क्र. ६६७ योग्य आहे किंवा कसे याबाबत संभ्रमावस्था असल्याकारणाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेसाठी सन २००४ साली लागु झालेल्या अधिनियमातील खालील तरतुदींचा तसेच संस्थानचे मंजूर २००७ व २००९ सालचे मंजूर आकृतीबंधातील अटी-शर्ती चा विचार करणे क्रमाप्राप्तठरते.

**अधिनियमातील तरतुद नं. २८/१ –**

कार्यकारी अधिकारी किंवा समिती यांच्या कोणत्याही कार्यवाहीचे किंवा निर्णयाचे किंवा आदेशाचे अभिलेख हे अशा कार्यवाहीचा कायदेशीरपणा किंवा त्याखाली दिलेल्या निर्णयाचा अथवा आदेशाचा बिनचुकपणा, कायदेशीरपणा किंवा औचित्य याबाबत स्वतःची खात्री करुन घेण्याच्या दृष्टीने मागवून घेणे व त्यांची तपासणी करणे आवश्यक व इष्ट आहे, असे राज्य शासनास वाटल्यास, त्यास तसेच करता येईल आणि कोणत्याही बाबतीत असा कोणताही निर्णय किंवा आदेश यात फेरबदल, विलोपन किंवा प्रत्यावर्तन केले पाहिजे किंवा तो फेरविचारार्थ पाठविला पाहिजे, असे राज्य शासनास आढळून आले तर, राज्य शासनास त्याप्रमाणे आदेश काढता येईल.

**अधिनियमातील तरतुद नं. २८/२ –**

जेव्हा एखाद्या प्रकरणी पोटकलम (1) खाली राज्य शासनाने कार्यकारी अधिका-यांच्या किंवा समितीच्या कार्यवाहीचा किंवा निर्णयाचा किंवा आदेशाचा अभिलेख मागवला असेल तेव्हा, राज्य शासनास, त्या संबंधात पोटकलम (1) खाली असलेल्या आपल्या अधिकारांचा वापर करण्यात येईपर्यंत कार्यकारी अधिका-यांच्या किंवा समितीच्या अशा कोणत्याही निर्णयाची किंवा आदेशाची अंमलबजावणी स्थगित करता येईल.

परंतु, संबंधित पक्षकारांना स्पष्टीकरण देण्याची संधी देण्यात आल्याशिवाय, राज्य शासन पोटकलम (१) अन्वये कोणताही आदेश देणार नाही.

**अधिनियमातील तरतुद नं. ३०/१ –**

समितीचा कोणताही ठराव, निर्णय अथवा आदेशांची अंमलबजावणी किंवा समितीकडून किंवा समितीच्या वतीने करण्यात यावयाची असेल किंवा करण्यात येत असेल अशी कोणतीही कृती जनहिताच्या विरोधात व या अधिनियमाद्वारे वा अधिनियमान्वये किंवा त्या-त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याअन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचे उल्लंघन करणारी किंवा त्या अधिकारांपेक्षा अधिक अधिकार वापरुन करण्यात येणारी कृती आहे अथवा त्यामुळे व्यवस्थापन निधीचा दुरुपयोग वा गैरवापर होण्याची किंवा अपव्यय होण्याची शक्यता आहे, असे राज्य शासनाचे मत असेल तर, त्यास लेखी आदेशाद्वारे, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा एका किंवा अनेक कालावधींसाठी अशा ठरावाची वा आदेशाची अंमलबजावणी तहकूब करता येईल किंवा अशी कोणतीही कृती प्रतिषिद्ध करता येईल अशा आदेशाची एक प्रत राज्य शासनाकडून समितीला आणि कार्यकारी अधिका-याला तात्काळ पाठविण्यात येईल.

तसेच, श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाकडील आकृतीबंध २००७ व २००९ साली मंजुर झाला असल्याकारणाने अर्जदार डॉक्टरांना हजर तारखेपासून वेतनश्रेणी द्यावी किंवा कसे व फरक द्यावा किंवा कसे याबाबत वेतन पडताळणी विभाग, नाशिक यांचेकडे संस्थानमार्फत विचारणा केली असता त्यांनीही "जर आकृतीबंध २००७ व २००९ मध्ये मंजूर झालेला असेल तर आकृतीबंध मंजूर झालेल्यादिनांकापासून पदांचे मंजुरीप्रमाणे डॉक्टर्स यांना फरक देणे योग्यहोईल." असे सुचविले आहे.

सबब, मा.उच्च न्यायालयाने त्यांचे दि.०१/०८/२०१६ रोजीचे आदेशात दिलेले वेळेचे बंधन, अधिनियमातील तरतुदी, सन २००७ व २००९ च्या मंजूर आकृतीबंधातील अटीशर्ती व वेतन पडताळणी विभाग, नाशिक यांचे अभिप्राय तसेच मा. मुख्यलेखाधिकारी यांनी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १३ (५) मधील तरतुदीनुसार आकृतीबंध मंजूर होईपर्यंत कोणत्याही अधिकारी/ कर्मचा-यांची नेमणूक करता येत नाही याचाच अर्थ आकृतीबंध मंजुरीच्यादिनांकापासून किंवा तदनंतर नियमित नेमणूक करता येतील त्यामुळे नियमित वेतनश्रेणी सुद्धा त्याच दिनांकापासून देय होईल, असे दिलेले अभिप्राय विचारात घेता, अर्जदारांना हजर झालेचे तारखेपासून वेतनश्रेणी लागु करावी किंवा कसे याकामी विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेणेस तसेच अर्जदारांनी याकामी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रीट पिटीशन्स मध्ये दिलेल्या आदेशाबाबत (सहा महिन्याच्या मुदतीच्या आत) वस्तुस्थिती मांडण्यासाठी म्हणणे दाखल करणेकामी सदरच्या विषयावर प्राधान्याने निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.८७८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त निर्णय क्र.८०७ मध्ये झालेल्या चर्चेप्रमाणे झालेप्रमाणे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकडील प्रस्तावित श्री.अनिल गायकवाड व इतर ९ कर्मचारी यांनाही आकृतीबंध मंजुर झालेल्या तारखेपासून वेतनश्रेणी लागु करण्यात यावी, असे समितीचे मत झाले. याबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेण्यात येऊन मा.उच्च न्यायालयामध्ये वस्तुस्थिती मांडण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३६** **सौ.प्राचीता कल्पेश पाटील यांचे वैद्यकिय आर्थिक अनुदान मागणी अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** सौ.प्राचीता कल्पेश पाटील शिर्डी यांनी त्यांच्या सासुबाई सौ.नलिनी पद्माकर पाटील यांचे वैद्यकिय उपचारासाठी आर्थिक अनुदान मिळणेबाबत विनंती अर्ज केलेला असुन सदरचा अर्ज दि.१०/११/२०१६ रोजी ईकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सौ. पाटील अल्सर पोटात फुटल्याने आजारी असुन त्या बॉम्बे हॉस्पिटल अ‍ॅन्ड मेडिकल रिसर्च सेंटर मुंबई या रुग्णालयात उपचार घेत आहेत.

श्री साईबाबा संस्थानमार्फत गरीब व गरजु रुग्णांना त्यांचे वैद्यकिय उपचाराकरीता रुग्ण उपचार घेत असलेल्या रुग्णालयाचे नावे आर्थिक अनुदान देण्यात येते. वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावली प्रमाणे जे रुग्णालय व आजार नियमात बसत असतील त्यांची स्वतंत्र यादी तयार केलेली आहे. त्या यादीतीलच रुग्णालयांना व आजारांना रुग्णांचे नावे नियमावली प्रमाणे अनुदान दिले जाते.

करीता वरील रुग्ण सौ. पाटील यांनी सादर केलेले बॉम्बे हॉस्पिटल अ‍ॅन्ड मेडिकल रिसर्च सेंटर मुंबई हे रुग्णालय वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावलीप्रमाणे तयार केलेली रुग्णालयाच्या यादीत बसते परंतु त्यांचा आजार वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावलीप्रमाणे तयार केलेल्या आजारांच्या यादीत बसत नसल्याने, सदर रुग्णास अनुदान देय होत नाही.

सदर रुग्णाने उपचार घेत असलेल्या रुग्णालयाचे खर्चाचे प्रमाणपत्र सादर न करता रुग्णालयाचा प्रवेश फॉर्म व उपचाराचा एकुण झालेला खर्च यांचे बील सादर केलेले आहे.

तसेच दि.१०/११/२०१६ व दि.१६/११/२०१६ रोजी त्यांनी सादर केलेल्या कागदपत्र पुढील प्रमाणे-

| अ.नं. | अपुर्ण कागदपत्र | सादरकेलेली कागदपत्र |
|---|---|---|
| १ | रुग्णालयाचे खर्चाचे प्रमाणपत्र सादर केलेले नाही. | उत्पन्नाचे प्रतिज्ञापत्र |
| २ | अनुदान मागणी अर्जदाराचे नाव रेशनकार्ड मध्ये नाही. | रुग्णालयाचा प्रवेश फॉर्म व उपचाराचा एकुण झालेला खर्च यांचे बील |
| ३ | रुग्णालय प्रमाणपत्रावर सदर रुग्ण राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचा लाभार्थी नाही असा स्पष्ट उल्लेख नाही. | उत्पनाचे प्रमाणपत्र, रेशन कार्ड अनुदान मागणी अर्ज. |
| ४ | उत्पन्नाबाबतचे प्रतिज्ञापत्रावर तहसिलदार साहेब किंवा नोटरी हेडचा सही व शिक्का नाही, तसेच वार्षिक उत्पन्न चुकीचे सादर केलेले आहे. (२२,०००/- ऐवजी २४,०००/- असे हवे.) | शालेय शिक्षण मंत्री- महाराष्ट्र राज्य विशेष कार्य. अधीकारी डॉ. श्री. विकास नाईक . यांचे शिफारस पत्र. सौ.कल्पना अरुण दास्ताने, उपाध्यक्ष– महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चा. यांचे शिफारस पत्र. |

दि. १६/११/२०१६ रोजी मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचे स्विय. सहाय्यक यांनी दुरध्वनीवरुन सदर रुग्णाच्या प्राप्त अर्जाबाबत चौकशी करून, अर्ज अनुदान मंजुरीसाठी सादर करावा असे वरिष्ठांनी निर्देषीत केले असता. मा. कार्यकारी अधिकारी सो. यांना सदर प्रकरणाबाबत समक्ष भेट घेतले नंतर, संबंधीतांचा अनुदान मंजुरीचा प्रस्ताव पाठविणेबाबत निर्देष दिलेले आहेत.

तरी सौ.पाटील यांना त्यांचे पोटाचा अल्सर फुटलेला असलेल्या आजाराबाबत उपचारासाठी/ शस्त्रक्रियेसाठी तसेच अपुर्ण कागदपत्र असल्याने अनुदान नियमावलीप्रमाणे श्री पवार यांना वैद्यकीय आर्थिक अनुदान मिळण्यास पात्र होत नाहीत. असे प्राप्त कागदपत्रावरून दिसून येत आहे.

सौ.पाटील यांना आर्थिक मदत मंजुर करणेकामी सदरचा अर्ज मा व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणे बाबत मा.कार्यकारी अधिकारी सो. यांची दि.१७/११/२०१६ रोजी ची मंजूर टिपणी

तरी सौ.प्राचीता कल्पेश पाटील, शिर्डी यांचे वैदयकिय आर्थिक अनुदान मागणी अर्जाबाबत चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सौ.प्राचीता कल्पेश पाटील, शिर्डी यांना त्यांच्या सासुबाई सौ.नलिनी पद्माकर पाटील यांचे वैद्यकिय उपचारासाठी सहानुभूतीचे दृष्टीने एक विशेष बाब म्हणून संस्थानमार्फत रु.२५,०००/- मात्र वैदयकिय आर्थिक अनुदान देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३७** **किडणीस्टोन शिबीरासाठी मंजुररकमेत वाढ होणेबाबत.**

**प्रस्ताव-** समाजातील तळा-गाळातील गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय सेवा उपलब्ध करुन देणेचे उद्देशाने व श्रीसाईबाबांचे शिकवणुकीस अनुसरुन सन१९६४ साली श्री साईनाथ रुग्णालय रुग्णांच्या सेवेसाठी सुरु करण्यात आले आहे. या रुग्णालयात रुग्णांच्या सेवेसाठी पायाभुत उत्तम सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. प्रत्येक रुग्णास अत्यल्प दरात उपचार पुरविले जातात.

याच धरतीवर सन २००६ पासुन श्रीसाईनाथ रुग्णालयात मोफत किडणी स्टोण शिबीराचे आयोजन केले जाते. सदर शिबीरकामी अहमदाबाद येथील प्रख्यात युरोलॉजिस्ट डॉ. केतन शुक्ला व त्यांचे सहकारी टिम श्री साईनाथ रुग्णालयात श्रींच्या सेवेची संधी म्हणुन मोफत सेवा देत असतात

डॉ.केतन शुक्ला, अहमदाबाद हे श्री साईनाथ रुग्णालयात मोठया किडणी स्टोनवर शस्त्रक्रियेव्दारे २ से.मी. हुन अधिक मोठया आकाराचे स्टोनवर मोफत शस्त्रक्रिया करतात. तसेच १ ते २ आतिल आकाराचे खडयांवर लिथोट्रेपसी करावी लागते. सदर प्रक्रियेसाठी लागणारे लेझर मशिन ते अहमदाबाद वरुन व्हॅन आणतात. Sound Waves (Lithotripsy) शस्त्रक्रियेसाठी ते रु.९,०००/- इतका आकार रुग्णांकडुन घेतात. परंतु श्री साईबाबांवर असलेल्या श्रध्देमुळे सदर शस्त्रक्रियेसाठी संस्थानकडुन अल्पदार म्हणजेच रु. २,५००/- इतका खर्च आकारतात. त्यांचे वैद्यकीय सेवा योगदानातुन आतापर्यंत सन २०१० पासुन ते मागिल शिबीरात जवळपास ६८० शस्त्रक्रिया केलेल्या आहेत.

मा.व्यवस्थापन समितीच्या दि. १०/०१/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र.३३ नुसार डॉ.केतन शुक्ला, अहमदाबाद यांचे वैद्यकीय सेवा योगदानातुन प्रत्येक तीन महिन्यातुन एकदा किडणी स्टोन शिबीराचे आयोजन करणेस व याकामी प्रत्येक शिबीरातील अंदाजे ५० रुग्णांकरीता येणा-या रु. २,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली आहे. परंतु सन २०११ पासुन आज अखेरपर्यंत किडणीस्टोन शस्त्रक्रिया करणारे रुग्णांचे संख्येत प्रचंड प्रमाणात वाढ झाली असुन, त्यासाठी आवश्यक त्या मेडीकल औषधांचे किंमतीत देखील वाढ झालेली आहे

अ) श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयात किडणी स्टोनची शस्त्रक्रिया मोफत होत असलेने, महाराष्ट्राचे कानाकोप-यातुन किडणीस्टोन शस्त्रक्रियेसाठीचे रुग्ण शिबीरात दाखल होत असतात. सध्या मेडीसीन व ऑपरेशनसाठी लागणा-या इतर अनुषंगिक बाबी (Guide Wire) दरात मोठया प्रमाणत वाढ झालेली असलेने, आधीच्या रु.२,५०,०००/- मान्यतेमुळे शिबीराचे नियोजन करणे व शिबीरापोटी लागणा-या औषध व इतर साहीत्याचे खरेदी करणे अडचणीचे होते. जुलै २०१६ मध्ये घेण्यात आलेल्या शिबीरासाठी एकुण खर्च रु. ३,८०,०००/- पर्यंत झालेला आहे. करीता शिबीर खर्च रक्कमेत वाढ होणे आवश्यक आहे.

ब) उपरोक्त अ चा विचार करता शिबीराचे नियोजन निधीत वाढ करणे आवश्यक असलेने, डॉ. केतन शुक्ला यांचे वैद्यकिय सेवा योगदानातुन प्रत्येक शिबीरासाठी येणा-या रु.५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख मात्र) चे वाढीव किडणी स्टोन शिबीर खर्चाच्या प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे सभे समोर चर्चा होऊन, प्रस्तावास मंजुरी मिळणेस विनंती

**निर्णय क्र.८८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील मुद्यांचा विचार करता, किडणीस्टोन शिबीरासाठी येणाऱ्या खर्चात रु.५,००,०००/- मात्र पर्यंत वाढ करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३८** **श्री साईबाबा संस्थान रुग्णालयातील वैद्यकिय अधिकाऱ्यांची रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ च्या कलम १३(४) मधील तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था समिती यांच्या आस्थापनेवर आवश्यक कर्मचा-यांच्या आकृतीबंधास (श्री साईबाबा हॉस्पिटलकडील आकृतीबंधासहीत) शासन निर्णय क्रमांक – सासंवि-२००९/४३३/(३७/९) का. सोळा मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दि. ०७/०८/२००९ नुसार काही अटी व शर्तीच्या अधीन राहुन मंजुरी दिलेली आहे

उपरोक्त मंजूर आकृतीबंधातील तरतुदीस अनुसरुन संस्था आस्थापनेवरील विविध पदे, त्यांची शैक्षणिक पात्रता, वेतनश्रेणी, अनुभव याबाबत आवश्यक त्या दुरुस्त्या करुन मा. व्यवस्थापन समितीचे दि. १२/०६/२०१४ रोजीचे सभेतील निर्णयान्वये जा.नं.एसएसएस/वशी-०१/१४७०/२०१४ दि. २६.०६.२०१४ पत्रान्वये सेवा प्रवेश नियम (Recruitment Rule) शासनास मान्यतेसाठी सादर करणेत आलेले आहेत.

तथापि, सदरचे सेवानियम हे अधिनियमातील तरतुदीनुसार पुर्व प्रसिद्ध न करता तयार करणेत आलेले होते. सबब, दि. २७/०७/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णयानुसार मंजूर आकृतीबंधानुसार

तयार केलेले सेवाप्रवेश नियम (Recruitment Rule) अधिनियमातील तरतुदीनुसार पुर्वप्रसिद्ध करुन हरकती मागविणेत आल्या असुन सेवाप्रवेश नियम (Recruitment Rule) अंतिम करणेबाबतची कार्यवाही सामान्य प्रशासन शाखा (आस्थापना) यांचेमार्फत चालु आहे.

संस्थान रुग्णालयात येणा-या रुग्णांवर उपचाराची आवश्यकता विचारात घेता जा.नं.एसएसएस/वशी-०१/ १४७०/२०१४ दि. २६.०६.२०१४ चे पत्रान्वये कळविणेत आलेल्या सेवा प्रवेश नियमानुसार शैक्षणिक व इतर पात्रतेनुसार जाहिरात प्रसिद्ध करुन रिक्त पदांवर पदभरती करण्यात येते यासाठी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि १७ एप्रिल २०१५ रोजीचे आदेशान्वये १) डीन, गव्हर्नमेंट मेडीकल कॉलेज, २) संबंधित विषयातील तज्ञ, ३) सिव्हील सर्जन, अहमदनगर या तज्ञ व्यक्तींची निवड समिती गठीत केलेली आहे.

तथापि, उपरोक्त जा.नं.एसएसएस/वशी-०१/१४७०/२०१४ दि. २६.०६.२०१४ अन्वये शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणेत आलेल्या सेवाप्रवेश नियमात नमुद केलेली शैक्षणिक पात्रता, वेतन, अनुभव तसेच आरक्षण इत्यादी कारणांमुळे जाहिरातीस हवा तसा प्रतिसाद मिळत नाही त्यामुळे आवश्यक वैद्यकीय अधिकारी प्राप्त होत नाहीत. त्यामुळे संस्थानचा जाहिरात, मुलाखती व त्यास अनुषंगिक बाबींवर विनाकारण खर्च होत आहे तसेच वेळही वाया जात आहे. सबब, स्थायी स्वरुपात वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होत नसल्याने तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी अथवा व्हिजीटींग पद्धतीने नेमणूका देऊन वैद्यकीय अधिकारी घेतले जातात मात्र सदरचे वैद्यकीय अधिकारी हे आठवडा / पंधरवाडा/ महिन्यातील एक दिवसच येतात त्यामुळे रुग्णांवर तात्काळ उपचार होऊ शकत नाही.

रुग्णालयातील रिक्त पदांवर भरती करणेकामी मा. उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या समितीसमोर दि. २४/०५/२०१६ रोजी वैद्यकीय अधिका-यांच्या मुलाखती घेणेत आल्या होत्या मात्र शैक्षणिक पात्रता, वेतन, अनुभव व आरक्षण यामुळे ब-याच जागा रिक्त राहिल्या आहेत.

सध्या सेवाप्रवेश नियमात असलेली पात्रता, अनुभव व वेतन इत्यादींचा फेरआढावा घेऊन आवश्यक बदल केल्यास स्थायी स्वरुपात वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होऊ शकतील असे मा. डॉ. चंदनवाले, डीन, बीजेएमसी, पुणे यांनी सुचविले आहे. सदरची बाब त्यांनी मा.जिल्हाधिकारी साहेब यांचेशी दि २४/५/२०१६ रोजी समक्ष झालेल्या चर्चेत निदर्शनास आणुन दिली आहे. उपरोक्त नमुद केलेप्रमाणे फेरआढावा घेऊन आवश्यक ते बदल करणेकामी काम करणेची त्यांनी तयारी दर्शविली आहे त्यास अनुसरुन त्यांना संस्थानमार्फत पत्र देण्यात आले आहे. याकामी मा.डीन, बीजेएमसी पुणे यांचेकडून काम करुन घेणेस व सर्वसमावेशक खर्चास दि ०९/१०/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ७३० नुसार मान्यता देण्यात आलेली आहे.

मा.डीन, बीजेएमसी यांनी उपरोक्त कामकाजाची तयारी दर्शविलेनुसार संस्थानकडून त्यांना तसे पत्र देण्यात आले असुन पहिल्या टप्प्यात सध्या असलेल्या आकृतीबंधातील मंजूर पदांचे सेवाप्रवेश नियम बनवुन देत आहेत तर दुस-या टप्प्यात दोन्ही रुग्णालयातील १४५ प्रकारची पदनामांची शैक्षणिक पात्रता, वेतन संरचना अनुभव तसेच संस्थानचे रुग्णालयात असलेले विभाग व खाटांच्या (Bed) संख्येनुसार किती कर्मचारी वर्ग असावा इत्यादी ठरविणेकामी मा.डीन, बीजेएमसी, पुणे यांचेकडून अहवाल आल्यानंतर अहवाल विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडे मंजुरीसाठी पाठवावा लागेल.

तसेच संस्थानची बिंदुनामावली बनविणेकामी कर्मचा-यांकडून जातप्रवर्ग व जातवैधता प्रमाणपत्र जमा करण्याचे काम चालु आहे त्यासाठी सप्टेंबर २०१४, जून २०१५, ऑगष्ट २०१५, जानेवारी २०१६, मे २०१६ मध्ये वेळोवेळी परिपत्रकान्वये संबंधित डॉक्टरांना समज दिलेली आहे त्यानुसार एकूण ३० डॉक्टरांनी आवश्यक कागदपत्रे जमा केलेली नाहीत. तदनंतर संस्थानचे रुग्णालयातील डॉक्टरांची रिक्त पदे अनुशेषानुसार जाहिरात प्रसिद्ध करुन विहीत पद्धतीने मुलाखती घेऊन स्थायी स्वरुपात भरतीप्रक्रिया अवलंबिता येईल.

तरी, बिंदुनामावलीचे कामकाज पुर्ण होईपर्यंत बराचसा कालावधी लागणार असल्याने मा. व्यवस्थापन समितीमार्फत तज्ञ समितीचे गठन करुन अथवा मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि १७ एप्रिल २०१५ रोजीचे आदेशान्वये १) डीन, गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज, २) संबंधित विषयातील तज्ञ, ३) सिव्हील सर्जन, अहमदनगर या तज्ञ व्यक्तींच्या नेमलेल्या निवड समितीमार्फत, सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमुद केलेल्या मानधनावर आवश्यक वैद्यकीय अधिकारी यांना मा.डीन, बीजेएमसी, पुणे यांचेकडून तयार करुन मिळणा-या प्रस्तावीत सेवाप्रवेश नियमानुसार संस्थानला कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या कंत्राटदारामार्फत कंत्राटी पद्धतीने तात्पुरत्या स्वरुपात १ वर्षासाठी नेमणूक करणेस व त्याकामी येणा-या खर्चास तसेच त्यांना किरकोळ रजा व सार्वजनिक सुट्ट्या देणेस तसेच संस्थानच्या दोन्ही रुग्णालयातील डॉक्टरांचे प्रोत्साहन भत्यात भविष्यात बदल झाल्यास त्यानुसार कंत्राटदारामार्फत कंत्राटी पद्धतीने घ्यावयाच्या डॉक्टरांचे मानधनात बदल करणेस मंजुरी मिळणेबाबत मान्यता असावी.

मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.८८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.डीन, बीजेएमसी, पुणे यांनी दिलेल्या सुधारित सेवाप्रवेश नियमानुसार तसेच संस्थान आकृतीबंधातील मंजुर वेतनश्रेणी ऐवढे एकत्रित मानधनावर श्री साईबाबा संस्थान रुग्णालयातील वैद्यकिय अधिकाऱ्यांची रिक्त पदे कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने भरणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३९** **श्री साईबाबा संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयासाठी कंत्राटदारामार्फत कर्मचारी वर्ग मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईनाथ रुग्णालयात कार्यालयीन कामकाजासाठी असलेला स्थायी कर्मचारी वर्ग इतर विभागात बदली झालेने, सदर कामकाज मदतनीस वर्गातुन जे कर्मचारी ग्रॅज्युएट व कार्यालयीन कामकाज करु शकतील अशा जवळपास २० ते २५ कर्मचा-यांकडून करुन घेतले आहे त्यमुळे वॉर्डबॉय (मदतनीस) यांची संख्याकमी झाली आहे, असे वैद्यकीय अधिक्षिका, श्री साईनाथ रुग्णालय यांनी दि. १०/०९/२०१६ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

सध्याच्या मंजुर आकृतीबंध२०० खाटांसाठी आहे. जिल्हा शल्यचिकीत्सक, अहमदनगर यांचेकडील दि. २३/०५/२०१६ चे सर्टिफिकेटमध्ये नमुद केलेले रजिस्ट्रेशन नं. ११५ ला अनुसरुन साईनाथ रुग्णालयासाठी ३०० खाटांची मंजुरी प्राप्तझाली आहे. त्यास अनुसरुन सध्या ३०० बेड रुग्णसेवेसाठी वापरात आणलेले आहेत. त्याकरीता परिचारीका ७०, वॉर्डबॉय ४० व आया २० यांची आवश्यकता असलेबाबतही प्र. वैद्यकीय अधिक्षिका यांनी कळविले आहे.

श्री साईनाथ रुग्णालयाकडील मंजुर पदसंख्याव मागणी केलेली पदसंख्या खालीलप्रमाणे आहे.

| पदनाम | २००९ सालचे आकृतीबंधानुसार२०० बेडसाठी मंजुर पदसंख्या | | | सध्याची संख्या | | | ३०० बेडसंख्येनुसार प्र. वैद्यकीय अधिक्षिका यांची मागणी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्थायी | कंत्राटी | एकूण | स्थायी | कंत्राटी | एकूण | स्थायी | कंत्राटी |
| स्टाफनर्स | १०० | २५ | १२५ | ५६ | ६१ | १७७ | ० | ७० |
| वॉर्डबॉय | ४१ | १ | ४२ | ३९ | ७ | ४६ | ० | ४० |
| आया | ३७ | ७ | ४४ | ३५ | २७ | ६२ | ० | २० |
| एकुण | १७८ | ३३ | २११ | १३० | ९५ | २२५ | ० | १३० |

हॉस्पिटलचे नॉर्मनुसार आवश्यक नर्सेसची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| ३०० बेड व्यतिरीक्त नव्याने सुरु झालेले काम | वॉर्ड | बेड संख्या | रुग्णालयाचे नॉर्मनुसार आवश्यक नर्स | रजा सुट्टया सोडविणे साठी | एकुण | आकृतीबंधात मंजुर पदसंख्या | सध्या भरलेली पदे | आवश्यक पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | (४+५) ६ | ७ | ८ | (६-८) ९ |
| -------- | आयसीयु | १० | (s/n ratio १:२) ५X३ (शिफ्ट) = १५ | ०३ | १४५ | १२५ | ११७ | २८ |
| -------- | जनरल बेड | २९० | (s/n ratio १:८) ३६X३ (शिफ्ट) = १०९ | १८ | | | | |
| मोबाईल व्हॅन आठवड्यातुन ४ वेळेस | ------ | ------ | १ | ०० | ०० | -------- | ०० | ०१ |
| प्रथमोपचार केंद्र (दिक्षित वाडा) | ---------- | ------- | २ | १ | ०० | ------- | ०० | ०३ |
| एअरपोर्ट | | | ३ | ०० | ०० | ------ | ०० | ०३ |
| | | | | | | | **एकूण** | ३५ |

आकृतीबंधात मंजुर असलेल्या(२०० बेड) व सध्या वाढीव १०० बेडनुसार आवश्यक असलेल्या **वॉर्डबॉय व आयांची** संख्या खालीलप्रमाणे आहे.

| **पदनाम** | **२००९ सालचे आकृतीबंधानुसार २०० बेडसाठी मंजुर पदसंख्या** | | | **३०० बेडसंख्येनुसार एकुण आवश्यकता** | **सध्याची संख्या** | | | **३०० बेडसंख्येनुसार आताची आवश्यकता** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्थायी | कंत्राटी | एकुण | | स्थायी | कंत्राटी | एकूण | |
| १ | | | २ | ३ | | | ४ | ५(३-४) |
| वॉर्डबॉय | ४१ | १ | ४२ | ६३ | ३९ | ७ | ४६ | १७ |
| आया | ३७ | ७ | ४४ | ६६ | ३५ | २७ | ६२ | ४ |
| एकुण | ७८ | ८ | ८६ | २१ | ७४ | ३४ | १०८ | २१ |

तरी, उपरोक्त दोन्ही तक्त्यांचे अवलोकन करता श्री साईनाथ रुग्णालयासाठी आवश्यक असलेल्या ३५ परिचारीका, १७ वॉर्डबॉय व ४ आया संस्थानला कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या कंत्राटदारामार्फत कंत्राटी पद्धतीने घेणेबाबत निर्णय होणेस विनंती.

मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.८८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयाकडील अपुऱ्या कर्मचारी वर्गामुळे रुग्णांना रुग्णसेवा देणेस अडचण निर्माण होऊ नये, याकरीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सध्या संस्थानला कंत्राटी पध्दतीने कर्मचारी पुरविणाऱ्या ठेकेदारामार्फत कंत्राटी कर्मचारी कामावर घेणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४०** **संस्थानचे विविध विभागामार्फत करावयाच्या खरेदीसाठी खरेदी समितीचे कार्यपध्दतीबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासनाचे उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक-भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उदयोग-४ दि.३०.१०.२०१५ नुसार, शासनाने शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमावली लागु केली आहे.

सदर नियमावली शासननिर्णयातील अ.नं.३(५) व नियमपुस्तिकेतील परिच्छेद २.४ मध्ये नमूद केल्यानुसार, 'विधानसभेच्या कायदयाखाली स्थापित कोणतीही संस्था किंवा मंडळ किंवा महामंडळ किंवा प्राधिकरण किंवा सोसायटी किंवा न्यास किंवा स्वायत्त संस्था (नाव कोणतेही असले तरी) किंवा राज्य शासनाच्या मालकीची किंवा नियंत्रणाखाली असलेली कोणतीही संस्था,' यांनाही लागू केलेली आहे म्हणजेच संस्थानलाही ही नियमपुस्तिका या निर्णयान्वये लागू झालेली आहे.

सदर शासननिर्णयान्वये उदयोग ऊर्जा व कामगार विभागाने निर्गमित केलेले सर्व शासननिर्णय/परिपत्रके अधिक्रमित करण्यात येत असून वरील नियमपुस्तिकेला मान्यता देऊन सर्व खरेदीदार विभागांनी त्यांना लागणा-या वस्तूंची खरेदी या नियमपुस्तिकेत दिलेल्या कार्यपध्दतीनुसार करावी असेही निर्देश आहेत.

वरील बाबीचा विचार करता संस्थानसाठी सदरचे नियमावलीनुसार खरेदीचे कामकाज राबविणे बंधनकारक आहे.

तथापि याबाबत लेखाशाखेमार्फत मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०/११/२०१५ चे सभेत सदर नियमपुस्तीका लागू करण्याचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात आला होता. त्यावर खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

**निर्णय क्रं.५१२-** यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे शासनाच्या नवीन खरेदी धोरणानुसार निर्णय अंमलात आणणेस मान्यता देण्यात आली व त्यासाठी खालीलप्रमाणे खरेदी समितीची रचना करणेत येऊन, संस्थानसाठी विविध खरेदीचे अधिकार या समितीस प्रदान करणेत आले.

| | | |
|---|---|---|
| १. | कार्यकारी अधिकारी- | अध्यक्ष |
| २. | उप कार्यकारी अधिकारी- | सदस्य |
| ३. | मुख्य लेखाधिकारी, प्रशासकीय अधिकारी- | सदस्य |
| ४. | संबंधित विभागप्रमुखअधिक्षक/प्र.अधिक्षक- | सदस्य सचिव |

सदरचे निर्णयाचे अनुषंगाने जाक्र.एसएसएसटी/ वशी-साप्रशा/ आस्था/ ३९६६/ २०१६ दिनांक १९.०१.२०१६ अन्वये खरेदी समिती स्थापित करुन ही नियमपुस्तिका संस्थान खरेदी कामकाजासाठी लागू करण्याचे आदेशही पारीत झालेले आहेत.

सध्या सदर नियमावलीप्रमाणे खरेदीची कार्यवाही चालू आहे. खरेदीसाठीचे साहित्यासाठी Specifications विभागामार्फत ठरविले जातात. मात्र एखादया सामग्रीची/ उपकरणाची खरेदी करण्याचे ठरल्यानंतर विभागाची गरज लक्षात घेऊन त्यानुषंगाने निपक्षपातीपणे तांत्रिक विनिर्देश (Specification) ठरविण्यासाठी तांत्रिक समितीची स्थापना करावी लागणार आहे.

सदर तांत्रिक समितीची रचना खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

१. खरेदी ज्या विभागाशी संबधित आहे त्या विभागाचा प्रमुख- अध्यक्ष

२. संबधित विषयातील तज्ञ- (आवश्यकतेनुसार एकापेक्षा जास्त तज्ञ समितीत घेता येतील.)

३. आवश्यकतेनुसार बाहेरील तज्ञ मार्गदर्शक –

तांत्रिक समिती एखादया यंत्रसामुग्री/ उपकरणाची निविदा प्रसिध्द करण्यापुर्वी विभागाची गरज लक्षात घेऊन नि:पक्षपातीपणे तांत्रिक विनिर्देश (Specification) निश्चित करेल व खरेदीदार विभाग टिपणीव्दारे खरेदी समितीचे सदस्यांचे निदर्शनास आणून त्यांची मंजुरी घेईल.

खरेदी समितीचे कामकाजाची कार्यपध्दती खालीलप्रमाणे राहील.

तांत्रिक समितीने Specification निश्चित केल्यानंतर खरेदीदार विभाग खरेदी करावयाच्या वस्तु/ साहित्य/ यंत्रसामुग्रीची अंदाजित किंमत(Estimated Cost) निश्चित करेल. हि अंदाजित किंमत निश्चित करतांना खरेदीदार विभाग खालील बाबींचा विचार करेल.

१. शेवटची खरेदी किंमत.

२. आवश्यक तेथे व्यावसायिक अधिका-यांने केलेले मुल्यांकन.

३. एक किंवा आर्थिक संभाव्य विक्रेत्यांकडून घेण्यात आलेल्या अंदाजपत्रकातील भाव/ किंमत.

४. बाजारपेठेचे सर्वेक्षण.

५. विशिष्ट खरेदीच्या प्रस्तावाच्या संदर्भात वापरण्यात आलेली अन्य कोणतीही पध्दत.

(ब) वरीलप्रमाणे अंदाजित किंमत (Estimated Cost) निश्चित केल्यानंतर उदयोग, ऊर्जा, विभागाचे ३०.१०.२०१५ च्या शासन निर्णयातील परिशिष्ट ८ नुसार निविदेची किंमत व बयाणा रक्कम प्रस्तावात नमूद करेल. मात्र रु. १ कोटीपेक्षा जास्त रकमेची खरेदी असल्यास संबंधित विभागाने निविदा किंमत व बयाणा रक्कम निश्चित करावयाची तरतूद असल्याने ती खालीलप्रमाणे निश्चित करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| Sr. No | Estimated Value of Tender (INR) | Tender Fees (INR) | Yearly increase | EMD (INR) | Yearly increase |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Above One Crore upto Two Crores | 15,000/- | 1,500/- | 1,50,000/- | 15,000/- |
| 2 | Above Two Crores upto Three crores | 20,000/- | 2,000/- | 2,00,000/- | 20,000/- |
| 3 | Above Three crores | 25,000/- | 2,500/- | 2,50,000/- | 25,000/- |

(क) खरेदीदार विभागाकडून मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदीचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी व ई-निविदा/ दरपत्रके प्रसिध्दीसाठी मा.उपसमिती/ मा.व्यवस्थापन समितीसमोर ठेवण्यात येईल.

मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळाल्यानंतर दरपत्रके/ई-निविदा वगैरे पुढील उचित कारवाई करण्यात येईल. ई-निविदेस ३ पेक्षा कमी पुरवठादारांचा प्रतिसाद लागल्यास शासननिर्णयातील नमूद तरतुदिनुसार मुदतवाढ देणे व निविदा उघडण्याची कार्यवाही करण्यात येईल.

सर्व तांत्रिक निविदा खरेदी समितीसमोर उघडण्यात येतील. खरेदी समिती तांत्रिक निविदेतील कागदपत्रांची तपासणी करुन दराबाबतची निविदा उघडणेबाबत शासन निर्णयातील तरतूदिनुसार निर्णय घेईल.

सदयस्थितीत रु.३ लाखापर्यंतच्या किरकोळ स्वरूपाच्या खरेदीसाठीची दरपत्रके व सर्व ई-निविदा मा.स्थानिक उपसमितीसमोर उघडण्यात येतात. मात्र याबाबत कार्यपध्दती/धोरण ठरलेले नाही. तथापि तात्काळ कार्यवाही होण्याचे दृष्टीने रूपये ३ लाख पर्यंतच्या खरेदीची दरपत्रके व ई-निविदा उदयोग, ऊर्जा विभागाचे दिनांक ३०.१०.२०१५ च्या शासन निर्णयाप्रमाणे संस्थानने गठीत केलेल्या वरील खरेदी समितीसमोर उघडणे उचित राहिल.

तांत्रिक निविदेमध्ये पात्र निविदाधारकांचे दराबाबतची ऑनलाईन ई-निविदा/दरपत्रके सदर खरेदी समितीसमोर उघडण्यात येतील व ई-निविदाप्राप्त तुलनात्मक तक्ता व दरपत्रके मान्यतेसाठी मा.उपसमिती/ मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात येतील आणि मा.व्यवस्थापन समितीची अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर पुरवठादारांना पुरवठा आदेश, करारनामा, सुरक्षा अनामत इ. बाबींसाठी कार्यवाही करण्यात येईल.

तरी वर नमूद 'अ', 'ब' व 'क' मध्ये नमूद केलेप्रमाणे शासन निर्णयातील खरेदी नियमावलीतील तरतुदीप्रमाणे कार्यपध्दतीस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवसथापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विविध विभागामार्फत करावयाच्या खरेदीसाठी खरेदी समितीचे कार्यपध्दती निश्चित करणेसाठी उदयोग-ऊर्जा विभागाकडील दि.३०.१०.२०१५ रोजीच्या शासन निर्णयाच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविणेत याव्यात व त्यानंतर सदरहू प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४१** **डिसेंबर, २०१६ महिन्याकरीता गावरान तुप खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** भांडार विभागाने डिसेंबर २०१६ महिन्याकरीता गावरान तूप १३३० क्विंटलची मागणी केलेली आहे.

संस्थानने सन २०१६-१७ वर्षाकरीता गावरान तूप खरेदीकामी ई-निविदा मागविली होती. यामध्ये मे.गोविंद मिल्क अॅन्ड मिल्क प्रॉडक्टस् प्रा.लि., फलटण यांना १ महिन्यासाठी प्रायोगिक तत्वावर – १,००० क्विंटल तूपपुरविणेकामी पुरवठा आदेश दिला होता. त्याप्रमाणे त्यांनी तूपाचा पुरवठा केला होता.

सदर तूपाची लॅब तपासणी, तूप वापरणारे कंत्राटदाराकडील आचारी यांचे अभिप्राय, व्हेन्डॉर ऑडिट या सर्व बाबींचा विचार करुन जुलै-२०१६ ते मार्च-२०१७ या कालावधीकरीता ९,०५०/- क्विंटल गावरान तूप रु.३५,४००/- प्रती क्विंटल दराने खरेदी करणेस मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/७/२०१६ चे सभेसमोर प्रस्ताव सादर करणेत आला होता.

सदर प्रस्तावावर झालेले निर्णयाचे बाबतीत सभा कामकाज लिपीक व प्रशासकीय अधिकारी, खरेदी विभाग यांचेकडून दि.१५/७/२०१६ रोजी माहिती घेतली असता, सदर प्रस्ताव मंजूर झाल्याचे सांगण्यात आले होते. त्यास अनुसरुन खरेदी विभागाकडून गावरान तूपाची तातडीने गरज असलेमुळे जुलै-२०१६ ते मार्च-२०१७ या कालावधीकरीता ९,०५० क्विंटल गावरान तूप रु.३५,४००/- प्रती क्विंटल दराने एकूण रक्कम रु.३२,०३,७०,०००/- मात्रचे तूप खरेदीकामी पुरवठा आदेशही मे.गोविंद मिल्क अॅन्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि., फलटण यांना जा.नं.एसएसएसटी/वशी-खरेदी/१८६७/२०१६ दि.१६/७/२०१६ अन्वये देण्यात आलेला होता व तसा करारनामाही दि.१७/८/२०१६ रोजी करण्यात आलेला होता. तसेच सदर कंपनीची शासन खरेदी नियमावलीनुसार एकूण पुरवठा आदेशाच्या ३ टक्के रक्कम रु.९६,११,१००/- संस्थानकडे सुरक्षा अनामत म्हणून जमा आहे.

तथापि दि.१४/७/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्रं.४३० खालीलप्रमाणे झालेला आहे.

निर्णय क्रं.४३०– "यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावामध्ये नमूद केलेप्रमाणे, मे.गोविंद मिल्क अॅन्ड मिल्क प्रॉडक्ट प्रा.लि., फलटण यांचे गावरान तूपाचा तपासणी अहवाल तसेच प्रत्यक्ष तूप वापरणारे लाडू कंत्राटदार यांचेकडील आचा-यांचा अभिप्राय या बाबींचा विचार करता मे.गोविंद मिल्क अॅन्ड मिल्क प्रॉडक्ट प्रा.लि., फलटण यांचेकडून तीन महिने कालावधीसाठी आवश्यक असणारे गावरान तूप प्रती किवंटल रु.३५,४००/- मात्र या दराने खरेदी करण्यात यावे, असे ठरले".

सदर मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाबाबत मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांचेशी समक्ष चर्चा केली असता, सन २०१६-१७ चे गाईचे गावरान तूप खरेदीबाबतचे प्रकरणाची संपूर्ण वस्तुस्थिती नवीन मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यास अनुसरुन गावरान तूप खरेदी सन २०१६-१७ चे वस्तुस्थितीबाबत सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.९/१०/२०१६ चे सभेसमोर सादर करण्यात आला होता. त्यावर खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

निर्णय क्रं.७२७- 'उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, गावरान तूपाच्या खरेदीसाठी मे.गोविंद मिल्क अॅन्ड मिल्क प्रॉडक्ट प्रा.लि., फलटण यांचे मंजूर दर हे सध्याचे बाजारभावाच्या दरापेक्षा जास्त आहेत, याकरीता मे.गोविंद मिल्क अॅन्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि., फलटण यांना उर्वरित गावरान तूपाचा पुरवठा आदेश देणेपूर्वी दर कमी करणेबाबत त्यांचेबरोबर चर्चा करणेत यावी तसेच याकामी मा.व्यवस्थापन समिती सदस्य मा.श्री.प्रताप भोसले यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे.'

सदर निर्णयास अनुसरुन, इकडील जा.नं.एसएसएसटी/खरेदी/४१४९/२०१६ दि.८/११/२०१६ अन्वये मा.श्री.प्रताप भोसलेसाहेब, सदस्य यांना पत्र देण्यात येऊन मार्गदर्शन मिळणेची विनंती करण्यात आली आहे.

तथापि सध्या मा.श्री.भोसलेसाहेब हे विदेश दौ-यावर गेलेले असून ते साधारण ४-५ डिसेंबरचे दरम्यान परत येणार असल्याचे समजते.

याबाबत श्री.भोसलेसाहेब परत आलेनंतर सदर कंपनीचे पदाधिका-यांशी या विषयाबाबत चर्चा होऊन, चर्चेचा अहवाल पुन्हा मा.व्यवस्थापन समितीचे पुढील सभेसमोर निर्णयार्थ सादर करावा लागेल म्हणजेच याकामी काही अवधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सप्टेंबर २०१६ पासून बुंदीवाटपाची क्वटिटी कमी करण्यात आल्यामुळे सप्टेंबर महिन्यात ४४१.१८ क्विंटल, ऑक्टोबर महिन्यांत ४४७.६८ व नोव्हेंबर महिन्यात २५ तारखेपर्यंत ४७९.८५ क्विंटल तूप लाडू प्रसाद निर्मिती विभागाने वापरले आहे.

डिसेंबर २०१६ महिन्यामध्ये विदयार्थ्यांच्या शालेय ट्रीप्स, साईभक्तांच्या पालख्या तसेच नाताळच्या सुटयांमुळे मोठया प्रमाणावर गर्दी वाढण्याची शक्यता आहे.

सध्या दिनांक २५.११.२०१६ अखेर संस्थानचे भांडार विभागामध्ये गावरान तुपाचा ४११ क्विंटल साठा शिल्लक आहे. तसेच मे.गोविंद मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडकट्स प्रा.लि., फलटण यांचेकडून ३०० क्विंटल तुप घेणे बाकी आहे.

संस्थानकडील शिल्लक व घेणे बाकी तूप असे मिळून एकूण तूप७११ किवंटल होत आहे. सदर तूप गर्दीच्या कालावधीत अंदाजे १५ दिवस पुरेल असे वाटते.

वरील नमूद वस्तुस्थिती विचारात घेता, मा.श्री.भोसलेसाहेब यांनी मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस् प्रा.लि., फलटण यांचे पदाधिका-यांशी ते विदेश दौ-याहून परत आलेनंतर गावरान तूप दराबाबत चर्चा होऊन, त्याचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणे व पुढील निर्णय होणे याकामी काही अवधी लागण्याची शक्यता असल्यामुळे, या दरम्यान गावरान तूपाअभावी ऐनवेळी गर्दीच्या कालावधीमध्ये साईभक्तांना बुंदी व लाडू प्रसादसेवा देण्यामध्ये अडथळा येऊ नये म्हणून डिसेंबर २०१६ महिन्यामध्ये ७५० क्विंटलपर्यंत गावरान तूप आवश्यकतेनुसार प्रती क्विंटल रु३५,४००/- दराने सन २०१६-१७ साठी गावरान तूपासाठीचे न्यूनतम ई-निविदाधारक मे.गोविंद मिल्क ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस् प्रा.लि., फलटण यांचेकडून खरेदी करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.८८४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**तसेच नमुनादाखल पतंजली तूपाचे लाडू प्रसाद बनविणेत येऊन, त्याची चाचणी घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४२** **श्री साईबाबा शैक्षणिक संस्थेतील ग्रंथालयासाठी NIMI पुस्तके खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन 2004 महाराष्ट्र अधिनियम क्र.14 (भाग 4) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम 17 (2 ढ) मध्ये छ सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच,शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

महाराष्ट्र शासन खरेदी कार्यपध्दती नियम पुस्तिका दि. 30 आक्टोबर 2015 रोजी पारीत केलेला असुन संस्थानला निर्णय क्र. 514 दि.10/11/2015 प्रमाणे लागू केली आहे. यातील प्रकरण3 मधील (3) एकल स्त्रोत खरेदी (3.2.6) अ) खरेदीची वस्तू फक्त एका विशिष्ट विक्रेत्याकडे उपलब्ध असते किंवा खरेदीच्या विषयाच्या संदर्भात फक्त विशिष्ट विक्रेत्याला अधिकार असतात ज्यामुळे अन्य कोणताही किंवा बदली पर्याय उपलब्ध नसतो व अन्य कोणत्याही खरेदी पध्दतीचा अवलंब करणे शक्य नसते. (इ) खरेदी कार्यालय संशोधन, प्रयोग, अभ्यास किंवा विकास या संबंधी करार करण्याचा प्रयत्न करते ज्यामुळे खरेदी विभागावर कोणताही व्यापारी परिणाम होणार नसतो.

**प्रस्ताविक:-** औ.प्र.संस्थेसाठी आवश्यक असणारे पुस्तके प्रकाशीत करणारी देशामध्ये केंद्रशासनाची एकमेव संस्था म्हणुन नॅशनल इन्स्ट्रक्शनल मिडीया इन्स्टिटयुट (NIMI) चेन्नई येथे आहे. त्यामुळे खरेदी कार्यपध्दती नियम प्रकरण 3-(3.2.6) अ)(इ) एकल स्त्रोत खरेदी नॅशनल इन्स्ट्रक्शनल मिडीया इन्स्टिटयुट (NIMI) चेन्नई यांचेकडून खरेदी करणे आवश्यक आहे

त्यानुसार औ.प्र.संस्थेतील ग्रंथालय विभागास आवश्यक असलेली पुस्तके NIMI चेन्नई यांचेकडुन Price List मागणी करण्यात आलेली असुन त्यांचेकडे सेमीस्टरI, II, III ची पुस्तके उपलब्ध असुन सेमीस्टर IV ची पुस्तके उपलब्ध झालेनंतर यादी कळवणार आहेत तरी सध्या उपलब्ध पुस्तके ग्रंथालयात ठेवल्यास त्याचा उपयोग निदेशक व प्रशिक्षणार्थी यांना अभ्यासाठी होईल.

NIMI चेन्नई यांचेकडून पुस्तके खरेदी केल्यास रु 35,000/- पेक्षा जास्त खरेदीवर 30% सुट देतात त्यांचे कडून Proforma Invoice मागणी केली होती. त्यानुसार संदर्भीय पत्राने खर्च रक्कम तपशील प्राप्त झालेला आहे.

| Sr.No. | Trade | Name of Books | Sem.-I | | | Sem.-II | | | Sem.-III | | | G.Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Nos. | Price | Amt. | Nos. | Price | Amt. | Nos. | Price | Amt. | (6+9+12) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 1 | TDF | Trade-Theory | 3 | 160 | 480 | 3 | 145 | 435 | 3 | 85 | 12255 | 1170 |
| | | Trade- Practical | 3 | 155 | 465 | 3 | 150 | 450 | 3 | 75 | 225 | 1140 |
| 2 | ET | Trade-Theory | 3 | 285 | 855 | 3 | 270 | 810 | 3 | 250 | 750 | 2415 |
| | | Trade- Practical | 3 | 185 | 555 | 3 | 170 | 510 | 3 | 170 | 510 | 1575 |
| 3 | MMV | Trade-Theory | 3 | 250 | 750 | 3 | 120 | 360 | 3 | 150 | 450 | 1560 |
| | | Trade- Practical | 3 | 165 | 495 | 3 | 120 | 360 | 3 | 130 | 390 | 1245 |
| 4 | FT | Trade-Theory | 3 | 165 | 495 | 3 | 190 | 570 | 3 | 185 | 555 | 1620 |
| | | Trade- Practical | 3 | 160 | 480 | 3 | 165 | 495 | 3 | 125 | 375 | 1350 |
| 5 | RAC | Trade-Theory | 3 | 285 | 855 | 3 | 280 | 840 | 3 | 215 | 645 | 2340 |
| | | Trade- Practical | 3 | 255 | 765 | 3 | 250 | 750 | 3 | 305 | 915 | 2430 |
| 6 | MGR | Trade-Theory | 3 | 200 | 600 | 3 | 105 | 315 | 3 | 90 | 270 | 1185 |
| | | Trade- Practical | 3 | 185 | 555 | 3 | 80 | 240 | 3 | 80 | 240 | 1035 |
| 7 | TR | Trade-Theory | 3 | 180 | 540 | 3 | 115 | 345 | 3 | 115 | 345 | 1230 |
| | | Trade- Practical | 3 | 135 | 405 | 3 | 105 | 315 | 3 | 90 | 270 | 990 |
| 8 | ICTSM | Trade-Theory | 3 | 320 | 960 | 3 | 230 | 690 | 3 | 230 | 690 | 2340 |
| | | Trade- Practical | 3 | 230 | 690 | 3 | 290 | 870 | 3 | 175 | 525 | 2085 |
| 9 | COPA | Trade-Theory | 3 | 220 | 660 | 3 | 170 | 510 | 0 | 0 | 0 | 1170 |
| | | Trade- Practical | 3 | 325 | 975 | 3 | 220 | 660 | 0 | 0 | 0 | 1635 |
| 10 | WD | Trade-Theory | 3 | 170 | 510 | 3 | 125 | 375 | 0 | 0 | 0 | 885 |
| | | Trade- Practical | 3 | 155 | 465 | 3 | 115 | 345 | 0 | 0 | 0 | 810 |
| 11 | MT | Trade-Theory | 3 | 0 | 0 | 3 | 150 | 450 | 0 | 0 | 0 | 450 |
| | | Trade- Practical | 3 | 0 | 0 | 3 | 150 | 450 | 0 | 0 | 0 | 450 |
| 12 | MATH | W.Cal. & Science | 5 | 85 | 425 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 425 |
| | | W.Cal. & Science (Group-A) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 5 | 95 | 475 | 475 |
| | | W.Cal. & Science (Group-B) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 5 | 125 | 625 | 625 |
| 13 | ENG.DR AW. | Engineering Drawing | 3 | 155 | 465 | 3 | 90 | 270 | 0 | 0 | 0 | 735 |
| | | Engineering Drawing (Group-A) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 115 | 345 | 345 |
| | | Engineering Drawing (Group-B) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 4 | 120 | 480 | 480 |
| | | Engineering Drawing (Group-E) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 4 | 95 | 380 | 380 |
| 14 | SKILL | Employability Skill | 3 | 160 | 480 | 3 | 145 | 435 | 0 | 0 | 0 | 915 |
| 15 | Office | Craftsmen Trainig Scheme in India | 3 | 60 | 180 | | | | | | | 180 |
| | | TOTAL…… | | | | | | | | | | 35670.00 |

उपरोक्त तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे औ. प्र. संस्थेतील ग्रंथालय विभागासाठी आवश्यक असलेली पुस्तके एकुण रु35,670/- वजा 30% सुट रु 10701/- याप्रमाणे 24,969/-पर्यंत एकत्रीत खरेदी आहे. आपण मागणी पाठवल्यानंतर NIMI संस्थेकडून Profarma Invoice पाठविला जातो. त्याप्रमाणे होणारी रक्कम

डिमांड ड्राफटने पुरवठा आदेशाने अगाऊ पाठवावी लागते तदनंतर संबंधीत संस्थेकडून पुस्तके पुरविली जातात प्राप्त होणारी सर्व पुस्तके मध्यवर्ती ग्रंथालयात दाखल करुन योग्य त्या नोटींगसह विहित पध्दतीचा अवलंब करुन त्याचा सर्व संबंधितांना वापर करता येईल

**मागणी:-** औ.प्र.संस्थेसाठी ग्रंथालय विभागास आवश्यक असणारे पुस्तके प्रकाशीत करणारी देशामध्ये केंद्रशासनाची एकमेव संस्था म्हणुन नॅशनल इन्स्ट्रक्शनल मिडीया इन्स्टिटयुट(NIMI) चेन्नई येथे आहे. त्यामुळे खरेदी कार्यपध्दती नियम प्रकरण 3-(3.2.6) अ) (इ) एकल स्त्रोत खरेदी नॅशनल इन्स्ट्रक्शनल मिडीया इन्स्टिटयुट (NIMI) चेन्नई यांचेकडून खरेदी करणे आवश्यक आहे त्यास मान्यता असावी. तसेच Profarma Invoice प्रमाणे येणारे खर्च, ट्रान्सपोट खर्च वेगळा अदा करावा लागेल. तरी रु.24, 969/- चा डी.डी. काढुन पुरवठा आदेश देण्यास मान्यता मिळावी ही विनंती.

**अनुमान:-** वरीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** तरी औ.प्र. संस्थेसाठी ग्रंथालय विभागास आवश्यक पुस्तके खरेदीकामी NIMI चेन्नई यांना रक्कम रु. 24,969/-(अक्षरी रुपये चोवीस हजार नऊशे एकोणसत्तर मात्र) चा डी.डी. पाठवणेस व खर्चास तसेच वाहतुक खर्च वेगळा अदा करणेस मंजुरीस्तव कार्यवाहीस व निर्णयासाठी व्यवस्थापन समितीसमोर सादर.

**निर्णय क्र.८८५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना उपलब्ध करुन देणेसाठी ग्रंथालय विभागास आवश्यक असलेली प्रस्तावित पुस्तके नॅशनल इन्स्ट्रक्शनल मिडीया इन्स्टिटयुट (NIMI) चेन्नई यांचेकडुन खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्च रु.२४,९६९/- (वाहतुक खर्च वेगळा) मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४३** **शिर्डी विमानतळावरील प्रवाशांना बससेवा उपलब्ध करुन देणेकरीता वातानुकुलीत बस खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम- २००४ मधील तरतुद-**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिडी अधिनियम, २००४ मधील कलम १७ (१) मध्ये भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिर प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही भक्तांना धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणेची तरतूद आहे

**प्रस्तावना:-** विमानतळ प्राधिकरणाच्या मागणीप्रमाणे शिर्डी विमानतळावरील प्रवाशांना बस सेवा उपलब्ध करुन देणे करीता २ वातानुकुलीन बसेस उपलबध करुन देणेचा विषय माव्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर केला होता.

दिनांक १९/०९/२०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत आयत्या वेळेचा विषय नं.२४ व निर्णय क्र.६८९ अन्वये, शिर्डी विमानतळावरील प्रवाशांकरीता संस्थानमार्फत विमानतळ प्राधिकरणाच्या मागणीप्रमाणे ए.सी. बस उपलब्ध करुन देण्यात याव्या असे ठरले व याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

उपरोक्त कामी नवीन ए.सी. बस खरेदी करणे करीता पुरवठादारांकडे चौकशी केली असता प्रत्येक कंपनीचे त्यांचे बसचे स्पेशिफिकेशन वेग वेगळे आहे. सर्व कंपन्याचे स्पेशिफिकेशन सारखे नसलेने त्यांचे किंमती देखील वेगवेगळया आहेत.

सध्या खालील तपशिला प्रमाणे नामांकित कंपन्याच्या ३६+१ सिटर, हाय बॅक सिट सहीत एसी बस उपलब्ध आहे.

- टाटा कंपनीचे एलपी ९१२/४९, बीएस-४ मॉडेल, टाटा-४९७ टीसीआयसी ३७८७ सीसी इंजिन.
- एसएमएल कंपनीचे एस-७, बीएस-४ मॉडेल, एसएलटी ॲण्ड नुमरल ३४५५ सीसी इंजिन.
- भारतबेंझ कंपनीचे ४ डी-३४ आय, बीएस-४ मॉडेल, ३९०७ सीसी इंजिन.

**अभिप्राय:-**

१) D.G.S. and D चे दरकरारावर उपरोक्त नमुद वाहने उपलब्ध असल्यास त्यांचे पॅनलवरील दरकरारधारकासह इतर उत्पादक/ वितरक/ पुरवठादार यांचेशी वाटाघाटी करुन D.G.S. and D च्या

दरकरारापेक्षा कमी किंमतीत वाहन उपलब्ध होत असल्याचे ३ पेक्षा जास्त उत्पादक / वितरक / पुरवठादारांचे दरपत्रक घेऊन न्युनतम दराने खरेदी करता येईल.

२) खरेदी करावयाच्या बसेस फक्त एका विशिष्ट विक्रेत्याकडेच उपलब्ध असल्यास दि.३०/१०/२०१५ च्या शासन निर्णयातील नियम ३.२.६ एकल स्त्रोत खरेदी पध्दतीनुसार कार्यवाही करावी लागेल.

**मागणी:-** तरी २ ए.सी. बसेस खरेदी करीता उपरोक्त कंपन्याचे दर मागवावेत किंवा सर्व सोयी-सुविधायुक्तबस करीता एकाच कंपनीचे दर ई-टेंडरद्वारे मागवुन खरेदी प्रक्रिया राबविणे बाबत निर्णय होणे करीता सविनय सादर.

**निर्णय क्र.८८६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी विमानतळावर येणाऱ्या प्रवाशांना वातानुकुलीत बससेवा उपलब्ध करुन देणेकरीता, महाराष्ट्र विमानतळ प्राधीकरण यांचेकडून या विमानतळावर किती आसणक्षमतेची व किती विमाने येणार आहेत, याविषयीची अधिकृत माहिती संकलीत करणेत येऊन, प्रस्ताव फेरसादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४४** **शववाहीका वाहने खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम-२००४ मधील तरतुद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिडी अधिनियम, २००४ मधील कलम १७ (१)मध्ये भक्तगणाना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्धकरुन देणे तसेच कलम२१ (१) (ग) मध्ये भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही भक्तांना धार्मीक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे असे नमुद आहे.

**प्रास्ताविक-** दि.१९/०९/२०१६ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांनी मा.कार्यकारी अधिकारी साहेब व मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब यांचे समवेत घेतलेल्या राऊंडमध्ये ०२ शववाहीनी व ०१ कार्डीयाक ॲम्ब्युलन्स खरेदी करणेचा प्रस्ताव सादर करणे बाबत निर्देश दिलेले आहेत.

एक कार्डीयाक रुग्णवाहीका खरेदी कामी दि.०९/१०/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.४१, निर्णय क्र.७२८ अन्वये, यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात येऊन, नवीन कार्डीयाक रुग्णवाहीका देणगी स्वरुपात मिळणेसाठी देणगीदार साईभक्तांना आवाहन करणेत यावे. तसेच विशिष्ट कालावधीमध्ये देणगीदार साईभक्तांचा प्रतिसाद न मिळाल्यास नवीन कार्डीयाक रुग्णवाहीका खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव खरेदी उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले. त्यानुसार एक कार्डीयाक रुग्णवाहीका देणगी देणे बाबत संस्थानचे संकेतस्थळावर माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत देणगीदार साईभक्तांना आवाहन करण्यात आलेले आहे.

वाहन विभागाकडे ०३ शववाहीका वापरात असुन त्यातील ०२ शववाहीका जुन्या झाल्याने लिलाव करणेकामी प्रस्तावीत करण्यात आलेल्या असुन त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेली असुन या बाबत कार्यवाही चालु आहे. सदर वाहनांची जाहीर लिलावाने विक्री झालेनंतर ०२ शववाहीका वाहनांची आवश्यकता भासणार आहे. त्यामुळे लिलावा पुर्वी ०२ शववाहीका उपलब्ध करणे आवश्यक आहे.

सध्या वाहन विभागाकडे कार्डीयाक रुग्णवाहीका-१, मोबाईल मेडीकल व्हॅन-१ व इतर रुग्णवाहीका-८ अशा एकुण १० रुग्णवाहीका उपलब्ध आहेत. यातील फोर्स कंपनीची ट्रॅव्हलर मॉडेलची रुग्णवाहीका क्र.MH-15-EF-0596 उपलब्ध असुन सदर रुग्णवाहीकेचा वापर ३०० कि.मी. (एका बाजुस) पर्यंत शववाहीका म्हणुन करता येईल.

आणखी एक शववाहीका उपलब्ध करणे करीता एक नवीन शववाहीका वाहन खरेदी करावे लागेल. या कामी 01) Double-Defrizer, 02) Driver partition, 03) Relative Seat, 04) Driver Rest seat 05) Power Staring 06) BS-IV इंजिनसह शववाहीनी घ्यावी लागेल. या कामी अंदाजे रु.१७,००,०००/- (अक्षरी रु. सतरा लाख) पर्यंत खर्च येईल. सदरचा रुग्णवाहीका खरेदी या अंदाजपत्रकीय तरतुदीतुन करता येईल या कामी सन-२०१६-१७ करीता रु.७०,००,०००/- (अक्षरी रु. सत्तर लाख) मात्रची तरतुद करण्यात आलेली आहे.

**मागणी-** तरी उपरोक्त प्रमाणे एक सर्व सुविधायुक्तशवववाहीका वाहन खरेदी करणे कामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकरीता येणारे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानसाठी आवश्यक असलेली सर्व सुविधांयुक्त एक शववाहीका खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४५** **मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१७१/१२ मधील नियोजित बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम संस्थानचे निधीतून करणे व त्यापैकी काही क्षेत्राचा वापर संस्थानसाठी भाडेपट्टयाने करणेविषयी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेशी करावयाचे करारनाम्यासाठी मुद्रांकशुल्काबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ट) यात विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडणेसाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील,अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव -** मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१७१/१२ मधील नियोजित बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम संस्थानचे निधीतून करणे व त्यापैकी काही क्षेत्राचा वापर संस्थानसाठी भाडेपट्टयाने करणेविषयी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेशी करावयाच्या विकसन कराराचे मुद्रांक शुल्कव बांधीव क्षेत्राचा भाडेपट्टा करारनाम्याचे मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्काची होणा-या रकमेस मान्यता मिळणेबाबत व करारनामा करणेबाबत..

**प्रस्तावना -** मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१७१/१२ मधील नियोजित बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम संस्थानचे निधीतून करणेविषयी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेशी करावयाचे करारनाम्यामध्ये भविष्यात कुठलाही एकतर्फी निर्णय होवू नये याकरीता मा.अध्यक्ष महोदय व मा.कार्यकारी अधिकारी यांचे नावाचा त्यामध्ये समावेश असावा तसेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी ठरवून दिलेले रु.१/- मात्र प्रति चौ.मी.प्रती वर्ष भाडे (एकूण क्षेत्रासाठी रु.२५५४/- मात्र) हे निश्चित करणेत यावे त्यामध्ये करारनाम्याची मुदत संपेपर्यंत वाढ करता येणार नाही,याचा उल्लेख करावा,असेबाबतचा निर्णय क्रं.३०६ अन्वये दि.२३/०५/२०१४ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये संमत करणेत आलेला आहे

त्याचप्रमाणे उक्त नियोजित बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकामापैकी काही क्षेत्राचा वापर संस्थानसाठी भाडेपट्टयाने करणेकामी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेबरोबर २९ वर्षे कालावधीचा भाडेपट्टा करार करणेस तसेच त्याकामी मुद्रांक शुल्कापोटी येणा-या अंदाजे रु.१५,६१,३९९/- मात्रचे व नियमाप्रमाणे होणारी नोंदणी फी तसेच इतर अनुषंगिक खर्चास निर्णय क्रं८० अन्वये दि.१२/०३/२०१५ रोजीच्या मा.त्रिसदस्य समितीचे सभेत मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त ठरावानुसार २९ वर्षे कालावधीचा भाडेपट्टा करार करणेसाठी मुद्रांक शुल्काची रक्कम तपासून निश्चित रक्कम कळविणेकामी मा.सहजिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हधिकारी, अहमदनगर यांना दि.२४/०६/२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले होते. त्यास अनुसरुन त्यांनी त्यांचेकडील दि.२०/१०/२०१५ रोजीचे पत्रान्वये २९ वर्षांचे भाडेकराराचे प्रारुप मागविले. त्या अनुषंगाने महाराष्ट्रराज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेशी करावयाच्या करारनाम्याचे प्रारुप मुद्रांक शुल्क आकारणीकामी मा.सहजिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हधिकारी,अहमदनगर यांचेकडेस इकडील पत्र क्रं.एसएसएस/ मालमत्ता/ ५२९८/२०१५ दि.२६/१२/२०१५ अन्वये पाठविणेत आले व त्याची प्रत मा.विभाग नियंत्रक,राज्य परिवहन, अहमदनगर, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,विभागीय कार्यालय, अहमदनगर यांचेकडेस माहीतीसाठी पाठविणेत आलेली आहे.

उपरोक्त कराराचे प्रारुपच्या अनुषंगाने मासहजिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हधिकारी, अहमदनगर यांनी त्यांचेकडील अभिनिर्णय जा.क्रं.कक्ष-३/अभि.प्र.क्र.९२/१५/१६६४/१६ दि.२५/०५/२०१६ अन्वये निर्गमित केलेला आहे. त्यात त्यांनी खालीलप्रमाणे आदेश केलेले आहेत. "सादर केलेल्या करारनामा दस्तात नमूद मिळकतीचा विकसन कराराचे सन २०१५ चे मुल्यांकन रु.१३,९५,६१,५००/- यावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम चे अनुसूची१ मध्ये (अनुच्छेद ५(जी)-ए) अन्वये ४ टक्के प्रमाणे मुद्रांक शुल्क रु.५५,८२,४६०/- व दस्तात नमूद मिळकतीवरील बांधीव क्षेत्राचा भाडेपट्टा करारनाम्याचे सन २०१५ चे मुल्यांकन रु.८,०४,५१,०००/- यावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम चे अनुसूची१ मधील अनुच्छेद ३६(३) नुसार ५० टक्के दराने मुल्यांकन रु,४,०२,२५,५००/- यावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम चे अनुसूची१ मधील अनुच्छेद

३६ च्या अंतर्गत अनुच्छेद २५ नुसार मुद्रांक शुल्करु.१६,०९,०२०/- असे विकसन व भाडेपट्टा करारनाम्याचे एकूण मुद्रांक शुल्करु.७१,९१,४८०/- इतके शुल्क शासन जमा करावे. त्यानंतर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमचे कलम ३२ नुसार प्रमाणित करण्यात येईल. देय मुद्रांक शुल्कआदेशापासून ६० दिवसांचे आत शासनास जमा करावे. अन्यथा नस्ती बंद केली जाईल." असेबाबत नमूद केलेले आहे.

सदर आदेशावर संस्थानचे पॅनलवरील वकील ॲड.ए.आर.गाडेकर,जिल्हा न्यायालय, अहमदनगर यांचेमार्फत पुनर्विलोकन अर्ज क्रं९२/२०१५ चा दि.३१/०५/२०१६ रोजी सादर करणेत आला व ॲड.गाडेकर यांनी संस्थानचे वतीने उक्त अतिरिक्त मुद्रांक शुल्कबाबत आवश्यक ते लेखी युक्तिवाद,उच्च न्यायालयाचे निवाडे,महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८ मधील तरतुदीनुसार एकाच व्यवहारात एकाच मिळकतीबाबत निर्माण झालेले दोन करारनाम्यावरील आवश्यक मुद्रांक कमी करण्यासाठी आवश्यक ती बाजू मांडलेली आहे तथापि मा.जिल्हा मुद्रांक अधिकारी यांनी उक्त पुनर्विलोकन अर्जावर त्यांचेकडील Misc.Case No.1/2016 मध्ये दि.२४/०६/२०१६ रोजी पुढीलप्रमाणे आदेश पारीत केलेले आहेत.

1) Application dated 31/05/2016 submitted to this office is not accepted.
2) The order dated 25/05/2016 is final order and is binding on all concerned.
3) The applicant is directed to pay the necessary Stamp Duty as per order dated 25/05/2016
4) The Registering Authority, Rahata is directed to register the document only if it is properly stamped.

सदर आदेशाच्या अनुषंगाने संस्थान पॅनलवरील वकील ॲड.ए.आर.गाडेकर यांनी सदर अभिनिर्णयाविरुध्द उपनिरीक्षक, जनरल नोंदणी आणि उपजिल्हाधिकारी मुद्रांक, पुणे यांचेकडे अपील दाखल करणे आवश्यक आहे, असेबाबत त्यांचेकडील दि.०२/०७/२०१६ रोजीच्या पत्रान्वये इकडेस कळविलेले आहे.

प्रस्तुतबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेत विषय क्रं.३२ मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१७२/१२ मधील नियोजित बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम संस्थानचे निधीतून करणे व त्यापैकी काही क्षेत्राचा वापर संस्थानसाठी भाडेपट्टयाने करणेविषयी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेशी करावयाचे करारनाम्यासाठी मुद्रांक शुल्काबाबतचा सादर करणेत आलेला आहे. त्यावर निर्णय क्रं.५४१ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होवून असे ठरले की,मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१७१/१२ मधील नियोजित बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम संस्थानचे निधीतून करणे व त्यापैकी काही क्षेत्राचा वापर संस्थानसाठी भाडेपट्टयाने घेणेबाबत महाराष्ट्र मार्ग परिवहन महामंडळ यांचेशी करावयाचा करारनामा, या क्षेत्रातील तज्ञ ॲड.तथा सॉलीसीटर श्री.मोहन जयकर,समिती सदस्य यांचेकडून तपासून घ्यावा व त्यांचे अभिप्रायासह सदरहू प्रस्ताव समितीसमोर फेरसादर करणेत यावा.

त्यास अनुसरुन मा.श्री.मोहन जयकर,समिती सदस्य यांना इकडील दि.२९/०९/२०१६ व दि.१६/११/२०१६ रोजी अलाहीदा कळविणेत आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी सध्यस्थितीत साईबाबा संस्थान व राज्य परिवहन महामंडळ यांचेमध्ये बसस्थानक बांधणेकरीता जो करार आहे तो प्रलंबित आहे याबाबत संस्थान पदाधिकारी व राज्य परिवहन महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी दि२४/०६/२०१६ रोजी सविस्तर चर्चा केलेली आहे. तरी प्रलंबित करार लवकरात लवकर पूर्ण करणेत यावा जेणेकरुन भाविकांच्याअडीअडचणी दूर होतील व श्री साई शताब्दी वर्षामध्ये राजय परिवहन महामंडळास प्रवासी सेवेकरीता सर्व सोयी व सुविधांनी युक्तबसस्थानक उपलब्ध होईल, असेबाबत विभाग नियंत्रक,राज्य परिवहन महामंडळ,अहमदनगर यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्रं.राप/ विनिअ/ आस्था/२०६८ दि.१९/०९/२०१६ रोजीच्या पत्रान्वये इकडेस कळविलेले आहे.

दरम्यानचे काळात मा.विश्वस्तांनी संस्थान व राज्य परिवहन महामंडळ यांचेदरम्यान करावयाचा करारनामा संस्थान वकीलाच्या सल्ल्याने रजिस्टर करणेत यावा,असेबाबत निर्देश दिलेले आहेत.

प्रस्तुत प्रकरणात यापूर्वी करारनाम्याचे प्रारुप तयार करणारे संस्थानचे पॅनलवरील वकील ॲड.एस.डी. कुलकर्णी, कोपरगाव यांचे अभिप्राय घेणेत आले. त्याप्रमाणे त्यांनी त्यांचेकडील दि.२८/०७/२०१६ रोजीच्या पत्राप्रमाणे अभिप्राय सादर केले. त्यात त्यांनी "यापूर्वी विकसन करार व भाडेपट्टा याबाबत अभिप्राय दिलेले असून त्याप्रमाणे संस्थानने विकसन करार तपासून मान्य केलेला आहे. तसेच राज्य परिवहन महामंडळाचे अधिकारी यांनी सुध्दा संबंधित करारास मान्यता दिलेली आहे. मुद्रांक शुल्काबाबत जो निर्णय जॉईंट डिस्ट्रीक्ट रजिस्ट्रार,

अहमदनगर यांनी दिलेला आहे. त्यावर अपील करुन विनाकारण कालावधी व्यथित करणे योग्य होणार नाही, मुद्रांक शुल्कअधिकारी यांनी त्यांचे तारीख २४/०६/२०१६ चे निर्णयानुसार स्टॅम्पबाबत जे निश्चित केले आहे. त्यावर वाद करुन विनाकारण कालक्षय करणे योग्य होणार नाही. संबंधित अधिकाऱ्यांनी विकसन करार व भाडेपट्टा हे दोन वेगवेगळे दस्त असल्याचे विचारात घेवून स्टॅम्प डयूटी भरण्याचे कळविले आहे. तांत्रिकदृष्टया विचार केल्यास संबंधित बाब निश्चितपणे विचार करण्यासारखी आहे. हक्कास बाध न येता स्टॅम्प डयूटी भरुन दस्त नोंदणे योग्य होईल. बांधकाम जवळ-जवळ पूर्ण झालेले आहे. स्टॅम्प डयूटीचे आकारणीवर अपील करुन त्यात किती काळ जाईल,हे निश्चित सांगता येत नाही. तरी योग्य तो निर्णय घ्यावा," असेबाबत नमूद करुन त्यांनी भाडेकरारनाम्याचा मसुदा तयार करुन प्रस्तुत पत्रासोबत पाठविलेला आहे.

तेंव्हा मा.सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हधिकारी, अहमदनगर यांचेकडील दि.२५/०५/२०१६ रोजीच्याअभिनिर्णयातील आदेशाप्रमाणे उक्त मिळकतीचे विकसन कराराचे मुद्रांक शुल्क रु.५५,८२,४६०/- इतके व दस्तात नमूद मिळकतीवरील बांधीव क्षेत्राचा भाडेपट्टा करारनाम्याचे मुद्रांक शुल्क रु,१६,०९,०२०/- इतके (अंडर प्रोटेस्ट) असे विकसन व भाडेपट्टा करारनाम्याचे एकूण मुद्रांक शुल्क रु,७१,९१,४८०/- इतके शुल्क शासन जमा करता येईल. प्रस्तुत आदेशात उक्त देय मुद्रांक शुल्क आदेशापासून साठ दिवसांचे आत शासनास जमा करावे अन्यथा नस्ती बंद केली जाईल,असे नमूद केलेले आहे सदर आदेशास सहा महिन्यांचा कालावधी झालेला असलेने प्रस्तुत रकमेत अल्पशा प्रमाणात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी सदरची होणारी मुद्रांक शुल्करक्कम व नोंदणी शुल्काची होणारी रक्कम यास मान्यता मिळणेकामी व करारनामा करणेकामी प्रस्तुतचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८८८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१७१/१२ मधील नियोजित बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम संस्थानचे निधीतून करणे व त्यापैकी काही क्षेत्राचा वापर संस्थानसाठी भाडेपट्टयाने करणेविषयी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचेशी करावयाच्या करारनाम्यासाठी मुद्रांकशुल्क व नोंदणी शुल्काची रक्कम शासनास जमा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.४६** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयासाठी आवश्यक सुविधा व बेडचे संख्येत वाढ करणेसाठी सध्याचे इमारतीवर वाढीव एका मजल्याचे बांधकाम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय :** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९/०९/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक५६९ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊ, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयांमध्ये रुग्णांकरीता आवश्यक सुविधा व बेडचे संख्येत वाढ करणेसाठी सर्व्हे नं.१४८ पैकी मधील जागेत नविन इमारतीचे बांधकाम करणे प्रस्तावित असून, त्यासाठी नामांकित आर्किटेक्टची नेमणूक करणेकरीता विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेत याव्या, असे ठरले."

**प्रस्तावना:** सर्व्हे नं.१४८ पैकी मधील धर्मशाळा क्र.०१ व ०२ इमारतींमध्ये श्री साईनाथ रुग्णालय सन २००३ मध्ये सुरु करणेत आलेले आहे श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटलमध्ये रुग्णांची दिवसेंदिवस संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे त्यामुळे मुलभुत सोयीसुविधा फारच कमी पडत आहेत. याकरीता नवीन इमारत बांधणे, कॅन्टीन इमारतीत प्रशासकिय कार्यालय स्थलांतरीत करणे इत्यादी बाबत कार्यवाही सुरु आहे.

मा.अध्यक्ष महोदय यांनी दि.२३/१०/२०१६ रोजी श्री साईनाथ रुग्णालयास भेट दिली. त्यावेळी कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, डॉ. विजय पाटील , वैद्यकिय संचालक, श्री. आर. बी. आहेर, उपकार्यकारी अभियंता (बांधकाम) उपस्थीत होते. त्यावेळी श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयासाठी आवश्यक सुविधा व बेडचे संख्येत वाढ करणेसाठी नविन इमारत बांधकाम करणेकामी आर्कीटेक्ट नेमणूकीसाठी ई-निविदाऐवजी Request for Proposal मागविणेबाबत तसेच नवीन इमारत बांधणेसाठी जास्त कालावधी

लागणार असल्याने सध्या कार्यरत असलेल्या साईनाथ रुग्णालय इमारतींवर अधिक एक मजल्याचे बांधकाम केल्यास बांधकाम कमी कालावधीत पुर्ण होऊन रुग्णांना दिलासा मिळेल अशी चर्चा झाली.

**प्रस्ताव:** सध्याचे साईनाथ रुग्णालय इमारतीचे बांधकाम आराखडे निकम पाटील असोशिएटस्, श्रीरामपूर व स्ट्रक्चरल डिझाईन आर. सी. सी. कन्स्लटंट श्री. बाल्टे, साई कन्स्लटंट, अहमदनगर यांनी केले आहे. त्यामुळे तिसरा मजला वाढविणे कामाबाबत इकडील दि.२६/१०/२०१६ रोजीचे इ-मेलद्वारे आर. सी. सी. कन्स्लटंट, साई कन्स्लटंट, अहमदनगर यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आला आहे. श्री. बाल्टे, साई कन्स्लटंट, अहमदनगर यांनी दि.०३/११/२०१६ रोजीचे इ-मेलद्वारे खालीलप्रमाणे कळविले आहे.

"..I had designed abovementioned work and accordingly the drawings were prepared and sent to you. The building is constructed as per the drawings. Referring to this design and drawings it is seen that the building was designed for G+Three stories. In actual G+2 stories are constructed and there is a provision of one storey. So additional floor can be constructed.

For that roof slab is to be designed. Slab area of both buildings is @14050x2 =28100 sq.ft. and consultancy charges are Rs.5 per sq.ft. so total charges will be Rs.140000. Site visit charges will be Rs.3000."

तरी सध्याचे साईनाथ रुग्णालयाचे दोन्हीही इमारतींवर तिसरा मजला बांधकाम करणे तसेच याकामी निकम पाटील असोशिएटस्, श्रीरामपूर यांचेकडून आर्कीटेक्चरल सेवा व आर. सी. सी. कन्स्लटंट श्री. बाल्टे, साई कन्स्लटंट, अहमदनगर यांचेकडून स्ट्रक्चरल डिझाईन घेणेस अथवा नविन आर्कीटेक्ट व स्ट्रक्चरल कन्सल्टन्टची नेमणूक करणेबाबत निर्णयार्थ सविनय सादर .

**निर्णय क्र.८८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनाथ रुग्णालय इमारतीचे बांधकाम आराखडे निकम पाटील असोशिएटस्, श्रीरामपूर व स्ट्रक्चरल डिझाईन आर.सी.सी. कन्स्लटंट श्री.बाल्टे, साई कन्स्लटंट, अहमदनगर यांनी केलेले आहेत. याकरीता या रुग्णालयाच्या दोन्हीही इमारतींवर बांधकाम करणेकामी बांधकाम आराखडे निकम पाटील असोशिएटस्, श्रीरामपूर व स्ट्रक्चरल डिझाईन आर.सी.सी. कन्स्लटंट श्री. बाल्टे, साई कन्स्लटंट, अहमदनगर यांचेकडून करुन घेण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४७** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयासाठी आवश्यक सुविधा व बेडचे संख्येत वाढ करणेसाठी सर्व्हे नं.१४८ पैकी मधील जागेत नविन इमारतीचे बांधकाम करणेसाठी आर्किटेक्ट नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा.व्यवस्थापन समिती निर्णय:** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १९/०९/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५६९ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊ, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयांमध्ये रुग्णांकरीता आवश्यक सुविधा व बेडचे संख्येत वाढ करणेसाठी सर्व्हे नं.१४८ पैकी मधील जागेत नविन इमारतीचे बांधकाम करणे प्रस्तावित असून, त्यासाठी नामांकित आर्किटेक्टची नेमणूक करणेकरीता विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेत याव्या, असे ठरले."

**प्रस्ताव:** दि .रोजी मा २०१६/१०/२३.अध्यक्ष महोदय यांनी साईनाथ रुग्णालय येथे भेट दिली. त्यावेळी कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, वैद्यकिय संचालक व उपकार्यकारी अभियंता उपस्थित (बांधकाम) त वाढ करणेसाठी क सुविधा व बेडचे संख्येलयासाठी आवश्यटल व श्री साईनाथ रुग्णाश्री साईबाबा हॉस्पी .होते ) पैकी मधील जागेत १४८ .नं सर्व्हेश्री साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील जागेतनविन इमारत बांधणेकामी ( जागेची व प्रश ासकिय कार्यालये स्थलांतरीत करावयाच्या कॅन्टीन इमारतीची पाहणी करणेत आलीवेळेस त्या . निविदा ऐवजी-ची नेमणूक करणेसाठी ईवीन इमारत बांधणेसाठी आर्किटेक्टRequest for Proposal मागविण्यात यावे अशी चर्चा झाली पन समितीचे निर्णयात बदलवस्थाव्य .नुसार मात्या .करावा लागेल नदरम्या . RFP document तयार करुन घेता येईलपन समितीचे सभेपुढे सादर करणेस वस्थाव्य .व मातसा प्रस्ता . .व सादरतेस्तमान्य

तरी उपरोक्त कामासाठी आर्किटेक्टची नेमणूक करणेसाठी ई निविदा ऐवजी-Request for Proposal मागविणेबाबत निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.८९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान रुग्णालयांसाठी आवश्यक सुविधा व बेडचे संख्येत वाढ करणेकामी सर्व्हे नं.१४८ पैकी मधील जागेत नविन इमारतीचे बांधकाम करणेसाठी Request for Proposal मागविणेत येऊन, आर्किटेक्टची नेमणूक करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४८** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्त वापरासाठी संस्थान निधीतून घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी येथे श्री साईबाबा समाधीच्या दर्शनासाठी येणा-या साईभक्तांचे गर्दीत दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. वाढत्या गर्दीचे अनुषंगाने राहाता व शिर्डी परिसरातील निघणाऱ्या व जमा होणाऱ्या घनकचऱ्याची विल्हेवाट लावणेकामी संयुक्त घनकचरा प्रकल्प राबविण्यात आलाहोता. सदरहू प्रकल्प दि.२९/०७/२०१० रोजी साईटेक सायंटीफीक सिस्टीम यांचेमार्फत कार्यान्वीत करणेत आलेला होता. तथापी त्यानंतर सदरहू प्लांटमध्ये कचऱ्यावर प्रक्रिया करणेचे काम स्थानिक ग्रामस्थांच्या विरोधामुळे बंदपडल्याने संस्थानचा निघणारा कचरा हा संस्थान मालकीचे मौजे निमगांव को-हाळे हद्दीत गट नं. १८२ मध्ये खड्डे घेऊन टाकण्यात येत आहे.

शिर्डी नगरपंचायत व संस्थानकरीता नगरपंचायत मालकीचे मौजे शिंगवे येथील जमिनीत एकत्रीत घनकचरा प्रक्रीया प्रकल्प उभारणेसाठी रु.४.५२ कोटी मात्रचा निधी संस्थानमार्फत उपलब्ध करुन देणेबाबत नगरपंचायतीने प्रस्ताव सादर केला होता. याबाबत मा. उच्च न्यायालयाने दि.०८/०१/२०१६ रोजीचे आदेशाने घनकचरा प्रक्रीया प्रकल्प उभारणेसाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळ व इतर संबंधित विभागांच्या परवानगीस अधिन राहून संस्थानमार्फत विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रीया राबवून प्रकल्पासाठीची कामे पूर्ण करणेस मान्यता दिलेली आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणी शासनाचे दि.३१/०८/२०१६ रोजीच्या निर्णयानुसार शिर्डी नगरपंचायतीस रु.२,५२,८६,६११/- मात्रचा निधी उपलब्ध करुन देणेस मान्यता दिलेली आहे. तथापि, नगरपंचायत यांचेमार्फत अद्याप सदर प्रकल्पासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळ व इतर संबंधित विभागांच्या परवानग्या प्राप्त झालेल्या नाहीत.

शिर्डी नगरपंचायत यांनी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त करावयाचे विविध विकास कामांमध्ये घनकचरा प्रकल्पासाठी रु.२७.०८ कोटी इतक्या अंदाजित खर्चाचा समावेश कृती आराखडा समितीचे मान्यतेस्तव तयार करणेत आलेल्या प्रस्तावामध्ये केलेला आहे.

शिर्डी नगरपंचायत यांचे वर नमूद दोन्हीही प्रस्तावांमध्ये घनकचरा प्रक्रियेसाठी नक्की कोणते तंत्रज्ञान व मशिनरी वापरणेत येणार आहे याविषयी माहिती/ उल्लेख दिसून येत नाही. नियोजीत प्रकल्प हा कार्यक्षम व टिकाऊ होण्याचे दृष्टीने त्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान व मशिनरीचा वापर होणे अत्यावश्यक आहे.

मा.अध्यक्ष महोदय दि.१०,११ नोव्हेंबर, २०१६ रोजी शिर्डी येथे आले असता त्यांनी, श्री साईबाबासंस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्तवापरासाठी संस्थान निधीतून घनकचरा प्रक्रीयाप्रकल्प सुरु करणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेबाबत निर्देश दिले आहेत.

**प्रस्ताव–** मा. अध्यक्ष महोदय यांचेकडे या क्षेत्रातील काही तज्ञ सल्लागार/ संस्थांनी घनकचरा प्रक्रीया प्रकल्पासाठी अत्याधुनिक ज्ञान व मशिनरीबाबत माहितीचे सादरीकरण केलेले आहे. तरी त्यापैकी योग्य त्या प्रकारच्या प्रकल्पाची निवड करुन व सदर नियोजीत प्रकल्पासाठी जागा निश्चित करुन पुढील कार्यवाही करता येईल. माहितीस्तव तसेच आदेशार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.८९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्त वापरासाठी संस्थान निधीतून घनकचरा प्रक्रिया प्रकल्प राबविणेसाठी संस्थानचे हेलिपॅड शेजारील जागेची निश्चिती करण्यात आली. तसेच याठिकाणी घनकचरा प्रकल्प राबविणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४९** **श्री साईबाबा मंदिर परिसरातील फ्लोअरींगचे नुतनीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम -२००४ मधिल तरतूद:-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय:-**

1. दि.०७/०२/२०१३ रोजी झालेल्या मा.त्रिसदस्य समिती सभेत श्री साईबाबा मंदिर परिसरातील फ्लोअरींगचे नूतनीकरण करणेसाठी निर्णय क्र.१११ अन्वये, *"यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर परिसरातील फ्लोअरींचे नूतनीकरण करणेसाठी Granite Stone 3cm thk. sagaralli grey Antique Finish (Flammed and Brushed) व Granite Stone 2cm thk. leather finish याचा वापर करण्यात यावा. याकामी येणा-या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास व वर्तमानपत्रात आणि संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन विहीत पध्दतीने निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली.*

*तसेच, सदरहू निर्णयाची अंमलबजावणी करणेसाठी परवानगी मिळणेबाबत, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान वकिलामार्फत त्वरीत अर्ज सादर करणेत येऊन खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले."*

2. दि.३०/०३/२०१३ रोजी झालेल्या मा.त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र.२६५ अन्वये, *"श्री साईबाबा मंदिर परिसरातील फ्लोअरिंग नूतनीकरणाचे कामाकरिता आर्किटेक्ट म्हणून शुभंकर एन्टरप्रायजेस, पुणे यांची नेमणूक करणेत यावी तसेच, सदरहू प्रकल्पासाठी आर्किटेक्ट सेवा पुरविणेकामी त्यांना प्रकल्प अंदाजपत्रकाचे २% फी + सर्व्हिस टॅक्स देणेत यावा, असे ठरले".*

3. दि.१९/०९/२०१६ रोजी झालेल्या मा.त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र.६४२ अन्वये, *"यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरातील ५३५४ चौ.मी. जागेमधील फ्लोरींगचे नुतनीकरण करणेस व याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. परंतु अशीही चर्चा करणेत आली की, समाधी मंदिराच्या वास्तुपेक्षा फ्लोरींग उठावदार व आकर्षक नसावे, याकरीता फ्लोरींगचा रंग फिका ठेवण्यात यावा तसेच कमी नक्षीकाम असावे, त्यासाठी मंदिर परिसरामध्ये करावयाच्या फ्लोरींगसाठी या क्षेत्रातील तज्ञ सल्लागाराचा अभिप्राय घेण्यात यावा व नमुनादाखल ४X४ स्के. फुट जागेत वेगवेगळ्या प्रकारचे / नक्षीचे फ्लोरींग करणेत येऊन, त्याची चाचणी घेण्यात यावी. त्यानंतर जो नमुना पसंत पडेल त्यासाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेत याव्या, असे ठरले."*

**प्रस्तावना:-** संस्थानतर्फे श्री साईबाबा मंदिर परिसर पूनर्विकास प्रकल्पाचे बांधकाम यापुर्वी सन १९९९ मध्ये पूर्ण करणेत आले आहे त्यावेळी मंदिर परिसरात रफ शहाबाद फरशी बसविण्यात आलेली आहे. तसेच त्यामध्ये ब्लॅक कडप्पा व रेड आग्रा स्टोनमध्ये डिझाईन तयार करण्यात आलेली आहे. सदर फ्लोअरींगचे काम पूर्ण होऊन आता पंधरा वर्षांपेक्षाही अधिक कालावधी झालेला आहे काळाचे ओघात फ्लोअरिंग ब-याच ठिकाणी खराब झाली आहे. त्यास ब-याच ठिकाणी तडे गेलेले आहेत. त्यामुळे सदर फ्लोअरिंगचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे. त्यासाठी सध्याची फ्लोअरींग काढून त्याठिकाणी नविन फ्लोअरींग बसविणे गरजेचे आहे. याबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि.१९/०९/२०१६ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. त्यावर नि.क्र.६४२ वरीलप्रमाणे समंत झालेला आहे.

उपरोक्त ठरावानुसार साईनिवास अतिथीगृहा समोरील जागेत ब्लॅक बसाल्ट, व्हाईट इंजि. आर्टीफीशीयल टाईल, सागरहली ग्रे ग्रेनाईट (पॉलिशड्) सागरहली, ग्रे ग्रेनाईट (फ्लेमड्) या चार प्रकारच्या टाईल्स वापरुन फ्लोअरींगचा नमुना तयार केला आहे. यापैकी व्हाईट इंजि. आर्टीफिशीयल टाईल्स व ग्रेनाईट यांचे संयुक्त स्वरुपातील फ्लोअरींग केल्यास अंदाजे रु.१.१४२ कोटी मात्र इतका खर्च येईल.तथपी वरील ठिकाणी केलेल्या नमुन्याचे परिक्षण केले असता ग्रेनाईट हा उन्हामध्ये तुलनेने जास्त तपातो.त्यामुळे ग्रेनाईट ऐवजी व्हाईट इंजि. आर्टीफिशियल टाईल्स समवेत ब्लॅक बसाल्ट स्टोन (स्थानिक परिसरात उपलब्ध काळा दगड) वापरणे उचित होईल असे मत आहे. त्यासाठी येणारे अपेक्षित खर्चाचा तपशिल खालिलप्रमाणे आहे.

ब्लॅक बसाल्ट + व्हाईट इंजि. आर्टीफीशअल टाईल्स - एकूण क्षेत्रफळ : २९७५ चौ.मी.

ब्लॅक बसाल्ट + व्हाईट इंजि. आर्टीफीशअल टाईल्स - एकूण क्षेत्रफळ : २९७५ चौ.मी.

| Sr. No | Item | Qty/ Unit | Approx Rate | Amount (Rs.) |
|---|---|---|---|---|
| 01 | Removing old flooring | 2975 sqm | 29/- | 86,275.00 |
| 02 | Removing rich mix concrete | 74.38 cum | 375/- | 27,892.50 |
| 03 | Providing & Casting M-15 Concrete. | 74.38 cum | 4,270/- | 3,17,602.60 |
| 04 | Providing and fixing White Coloured Engineered Stone Tiles | 325 sqm | 5628/- | 18,29,100.00 |
| 05 | Providing and fixing Black Basalt Stone Flooring 10 cm thk | 2650 sqm | 3030/- | 80,29,500.00 |
| 06 | Heavy Duty Chamber Cover (60x60 cm) | 16 Nos | 1880/- | 30,080.00 |
| 07 | Heavy Duty Chamber Cover (60x45 cm) | 04 Nos | 1620/- | 6,480.00 |
| 08 | Heavy Duty Chamber Cover (560 mm dia) | 01 No | 1440/- | 1,440.00 |
| 09 | Conveying Debris outside Temple premises upto 3 kms. | 371.88 cum | 136.76 | 50858.31 |
| Total | | | | 1,03,79,228.41 |
| Add 5% Contingencies | | | | 5,18,961.42 |
| Total Amount Rs. | | | | 1,08,98,189.83 |
| **Say R/O Rs.** | | | | **1.09 Crores** |

वरीलप्रमाणे ब्लॅक बसाल्ट + व्हाईट इंजि. आर्टिफिशियल टाईल्स फ्लोरींगसाठी एकूण रक्कम रु.१.०९ कोटी मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

**प्रस्ताव:** तरी पहिल्या टप्प्यात भागश: २९७५ चौ.मी. भागामध्ये फ्लोअरींगचे कामास व त्यासाठी येणारे रु.१.०९ कोटी मात्रचे खर्चास तसेच सदर कामासाठी इकडील विभागामार्फत सविस्तर नकाशे, निविदा तयार करुन वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसर आकर्षक दिसणेसाठी तसेच साईभक्तांच्या सोयीसाठी मंदिर परिसरातील फ्लोअरींगचे नुतणीकरण करणेत यावे, असे ठरले. यासाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदरहू फ्लोअरींग नुतणीकरण करणेचे काम रात्रीच्या वेळेसच जास्त करणेत यावे, अशा सुचना दिल्या.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५०** **नगर-मनमाड रस्त्यावर स्कॉयवॉक (पादचारी पुल) उभारणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:**

०१. अधिनियमाचे कलम १७ (१) नुसार राज्य शासनाच्या कोणत्याही कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व परंपरा प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कमी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ (१) मधील खंड (ग) अन्वये, भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे

३. अधिनियमाचे कलम २१ मधिल पोट कलम (१क) अन्वये, विश्वस्तव्यवस्थेस राज्य शासनाच्या पूर्व मंजूरीने आणि राज्यशासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तीच्या अधिन राहून, भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभुत सुविधा या सारख्या पायाभुत सुविधा पुरविणेसाठी किंवा त्या वाढविण्यासाठी

शासकिय विभागांना, शासकिय महामंडळांना, शासकिय कंपन्यांना किंवा शासकिय उपक्रमांना साहाय्यक अनुदान देता येईल अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.२७/०४/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३६६ अन्वये, ".. शिर्डी शहरातील नगर-मनमाड रस्त्याखालून प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे एकुण ०५ ठिकाणी भुयारी मार्ग करणेसाठी येणाऱ्या एकुण १८.२४ कोटी मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरहू प्रस्ताव विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे मंजूरीसाठी पाठविणेत यावा असेठरले."

**प्रस्तावना**:- शिर्डी शहरातून जाणाऱ्या नगर-मनमाड राज्य मार्गाचे पूर्व बाजूस श्री साईबाबा समाधि मंदिर, भक्तनिवासस्थाने, बसस्थानक आदि परिसर असून, पश्चिम बाजूस श्री साईप्रसादालय, रुग्णालय व कर्मचारी निवासस्थाने आहेत. त्यामुळे सदरचा राज्य मार्ग ओलांडणाऱ्या साईभक्त व स्थानिक पादचाऱ्यांची संख्यामोठ्या प्रमाणावर आहे. दिवसेंदिवस वाढणारी गर्दी व वाहतूकीमुळे भक्तांसह स्थानिक नागरीकांना सदरचा राज्य मार्ग ओलांडणे अत्यंत कठिण व जिकीरीचे झालेले आहे. त्यामुळे साईभक्त तसेच शहरातील स्थानिक नागरीकांना रस्त्याने पायी येणे-जाणे सुखकर व्हावे तसेच भक्तांना व नागरीकांना वाहतुकीचा त्रास होऊ नये म्हणून तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने या राज्य मार्गावर खालील पाच ठिकाणी रस्ता ओलांडणेसाठी प्रशस्त भुयारी मार्ग (Under Pass / Subway) बनविणेबाबत निर्णय घेतलेला आहे.

१. श्री साई प्रसादालयाकडे जाणाऱ्या रस्त्यासमोर ( निमगांव शिव रस्त्याचे चौफुली जवळ)
२. जुना पिंपळवाडी रस्त्यासमोर (हॉटेल साईबाबा इंटरनॅशनल व साईप्रसाद इमारतीजवळ)
३. नविन पिंपळवाडी रस्त्यासमोर ( श्रीहरी कॉम्प्लॅक्स / कनकुरी रस्त्याचे चौफुलीजवळ)
४. शिर्डी बसस्थानकाजवळ ( श्री साईबाबा हॉस्पीटल चौफुलीजवळ)
५. श्री साईबाबा भक्त निवासस्थान ( ५०० रुम्स) प्रवेशद्वारासमोर

या प्रकल्पास मान्यता मिळणेसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे इकडील जा. क्र. २२८४/२०१३ दि.१६/०८/२०१३ अन्वये प्रस्ताव पाठविणेत आला असून अद्याप त्यास मान्यता मिळालेली नाही.

दरम्यान दि.१० व ११ नोव्हेंबर, २०१६ रोजी मा. अध्यक्ष महोदय यांनी मा. कार्यकारी अधिकारी व मा. उपकार्यकारी अधिकारी यांचे समवेत मंदिर व संस्थानचे इतर विभागाचे पाहणीचेवेळी दिलेल्या सूचनांचे अनुषंगाने दि.१६/११/२०१६ रोजीचे परिपत्रकातील अ. नं. १० अन्वये गेट नं. ०१ पासून स्कायवॉक (आकाशचाल) उभारणेसाठी येणाऱ्या खर्चाचा प्रस्ताव सादर करणेबाबत निर्देशीत करणेत आले आहे.

**प्रस्ताव:** नगर-मनमाड महामार्गाखालून भुयारी मार्गाचे बांधकाम करणे हे काम मोठ्याखर्चाचे असून प्रत्यक्ष जागेवर बांधकाम करणेसाठी जिकीरीचे आहे. या महामार्गावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक असल्याने भुयारी मार्गाचे बांधकाम चालु असतांना रस्त्याचे किमान अर्ध्या भागातील वाहतूक बद ठेवणे अडचणीचे ठरेल व त्यामुळे नागरीकांची व साईभक्तांची गैरसोय होईल. तसेच या रस्त्याकरीता शिर्डी-राहाता संयुक्त बाह्यवळण रस्त्याचे काम सध्या पुर्णत्वाचे मार्गावर आहे. बाह्यवळण रस्ता वाहतुकीसाठी खुला झाल्यानंतर शिर्डी शहरातून जाणाऱ्या नगर-मनमाड रस्त्यावरील जड वाहनांची वाहतूक कमी होईल या बाबी विचारात घेता वरीलप्रमाणे पाच ठिकाणी भुयारी मार्ग करणेऐवजी मंदिर परिसरासमोरील प्रवेशद्वार क्र ०१ व ०५ चे मधिल भागात फक्त एकाच ठिकाणी खालील तपशिलाप्रमाणे पादचारी पूल ( स्कायवॉक / फुट ओव्हर ब्रीज) उभारणीबाबत विचार करता येईल.

१. स्कायवॉकची लांबी अंदाजे ३८ मीटर.
२. स्कायवॉकची रुंदी ०४ मीटर- आर.सी.सी. स्ट्रक्चर उभारुन त्यावर स्टील स्ट्रक्चरवर पॉलीकार्बोनेट शिटचे छत.
३. जमिनीपासून साधारणतः ०७ मीटर उंची व त्यावर स्कायवॉक पदपथाची उंची ४ मीटर.
४. वरील स्वरुपातील पादचारी पुलासाठी प्राथमिक ढोबळ अदाजानुसार अपेक्षित खर्च रु१.२९ कोटी.

सदरहु रस्ता आता सिन्नर-अहमदनगर राष्ट्रीय महामार्ग क्र.१६० झालेला असून त्याची शिर्डी शहरातील लांबी ही कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प(सा.बां.) विभाग, अहमदनगर यांचे अखत्यारीत आहे. त्यामुळे विषयांकीत पादचारी पुलाचे कामासाठी संस्थानकडून निधी उपलब्ध करणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१ पोट कलम १ (क) अन्वये राज्य शासनाचे विधी व न्याय विभागाची पूर्व मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यासाठी या प्रकल्पाचे सविस्तर बांधकाम नकाशे व अंदाजपत्रक या क्षेत्रातील तज्ञ सल्लागाराकडून तयार करून जागतिक बॅंक प्रकल्प(सा. बां.) विभाग, अहमदनगर यांचे मान्यतेने स्कायवॉकची उभारणी करता येईल.

तरी वरीलप्रमाणे पाच ठिकाणी भुयारी मार्ग करणे ऐवजी एका ठिकाणी पादचारी पुल करणेसाठी संस्थानतर्फे निधी उपलब्ध करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, नगर-मनमाड रस्त्यावर स्कॉयवॉक (पादचारी पुल) ची उभारणीचे काम कमी कालावधीमध्ये होईल, साईभक्तांना होणाऱ्या अपघाताची शक्यता राहणार नाही, रस्त्यावरील ट्रॉफीकला अडचण येणार नाही तसेच चालताना श्रींचे मंदिराच्या कळसाचेही दर्शन होईल या सर्व बाबींचा विचार करता सदरहू ठिकाणी संस्थानमार्फत गेट नं.१ जवळ स्कॉयवॉकची उभारणी करणेत यावी, असे ठरले.**

**तसेच यासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५१** **सन २०१७-१८ श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने देश-विदेशातील साई मंदिरांचे श्री क्षेत्र शिर्डी येथे चर्चासत्र कार्यक्रमाचे ठिकाणी जेवणाकरीता स्वतंत्र मंडप व्यवस्था करणेकामी केलेल्या कार्यवाहीबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम येअन्व (१), राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्थापाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजाअर्चा-, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्त व्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ येअन्व (ग), भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ रुढी व प्रथांनुसार(ख), मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ . शिकवणीचा प्रचार करणेसाईबाबांच्या श्री (ड)

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय:-**

१) दि.०७/११/२०१६ रोजी झालेल्या स्थानीक उपसमिती सभेत निर्णय क्र.२८ पुढीलप्रमाणे संमत करण्यात आलेला आहे.

"....यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री क्षेत्र शिर्डी येथे होणा-या जागतिक साईमंदिर परिषद या कार्यक्रमांचे ठिकाणी उपस्थितांच्या नाष्टा व जेवणाकरीता स्वतंत्र मंडप व्यवस्था करणेकामी विहित पध्दतीने कोटेशन्स मागविणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस आहे."

२) दि.०७/११/२०१६ रोजी झालेल्या स्थानीक उपसमिती सभेत विविध चर्चेच्या अनुषंगाने मा. सदस्यांनी खालीलप्रमाणे सुचना दिलेल्या आहेत.

"....दि.११ डिसेंबर, २०१६ रोजी शिर्डी येथे होणा-या जागतिक साई मंदिर परिषदेच्या अनुषंगाने करावयाच्या कामाबाबतचे कोटेशन्स/निविदा एक विशेष बाब म्हणुन संबंधित विभागांनी मा. श्री. भाऊसाहेब वाकचौरे तसेच मा. श्री. सचिन तांबे या स्थानिक विश्वस्तांसमोर उघडुन तात्काळ कामे करुन घेण्यात यावीत व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल कार्योत्तर मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा."

प्रस्तावना:- थोर संत श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होणार आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षामध्ये शिर्डीत येणा-या भाविकांसाठी सोयीसुविधा उभारणे तसेच संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करुन साईचरीत्रावर आधारीत वेगवेगळे इव्हेन्ट तयार करुन त्याचे सादरीकरण करणे, जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहील, अशाप्रकारे श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल या दृष्टीने प्रयत्न करणेत येत आहेत.याबाबत मा. उप समितीचे दि.१६ सप्टेंबर, २०१६ रोजीचे सभेत सन २०१७-१८ या समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनाबाबत देश-विदेशातील साई मंदिरांचे अधिकारी/पदाधिकारी यांच्या सूचना-वजा-प्रस्ताव प्राप्त करुन घेणेसाठी तसेच या साई मंदिरांच्या व्यवस्थापनांनी या शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे कार्यक्रम/ उपक्रम याबाबत व्यापक सविस्तर चर्चा करणेसाठी शिर्डी येथे चर्चासत्र आयोजित करणेचा निर्णय घेणेत आलेला आहे.

दि.११/१२/२०१६ रोजीचे साई मंदिर चर्चासत्र कार्यक्रमाबाबत साईआश्रम भक्तनिवास परिसरात २००० अधिकारी/ पदाधिका-यांची मंडप टाकून बैठक व्यवस्था करणे तसेच इतर अनुषंगीक व्यवस्था करणेबाबत ठेकेदार यांना कार्यादेश देणेत येत आहे. दि.१८/१०/२०१६ रोजीचे मा. उपसमितीचे सभेत जेवणाकरीता स्वतंत्र मंडप व्यवस्था करणेचे ठरले आहे. तसेच दि.०७/११/२०१६ रोजीचे मा. स्थानिक उप समितीचे सभेत सदर व्यवस्थेसाठी येणारे रक्कम रु.२,८५,७५०/- मात्रचे खर्चास व सदरहु व्यवस्था करणेसाठी मंडप ठेकेदार यांचेकडून दरपत्रके मागविणेस मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार इकडिल जा.क्र.४२७३, दि.१५/११/२०१६ रोजीचे पत्रान्वये तातडीने दरपत्रके मागविणेत आली आहेत. सिलबंद दरपत्रके सादर करणेसाठी ठेकेदार यांना दि.१७/११/२०१६ अखेर सायं. ०५ वाजेपर्यंत मुदत देणेत आली होती. सदरचे विहीत मुदतीत खालील ठेकेदारांनी सिलबंद कोटेशन सादर केले होते.

| **अ.नं.** | **कोटेशन सादरकर्त्यांचे नांव** | **आवक नंबर/ दिनांक** |
|---|---|---|
| ०१. | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर. | १५७५१ / दि.१७.११.१६. |
| ०२. | कला साधना (किशोर पवार), नाशिक. | १५७५० / दि.१७.११.१६. |
| ०३. | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर. | १५७५३ / दि.१७.११.१६. |
| ०४. | बालाजी मंडप डेकोरेटर्स, मनमाड. | १५७५२ / दि.१७.११.१६. |
| ०५. | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर. | १५७५६ / दि.१७.११.१६. |

उपरोक्त प्राप्त ०५ सिलबंद दरपत्रके दि.१८/११/२०१६ रोजी मा. स्थानिक विश्वस्तांपुढे उघडणेत आली आहेत. त्यांचे दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

**अंदाजपत्रकीय रक्कम: रू.२,८५,७५०/-.**

| **अ.नं.** | **दरपत्रक सादरकर्त्यांचे नांव** | **दरपत्रकाची रक्कम (रू.)** | **शेरा** |
|---|---|---|---|
| ०१. | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर. | २,७५,३९५/- | -- |
| ०२. | कला साधना (किशोर पवार), नाशिक. | २,६८,१८०/- | -- |
| **०३.** | **रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर.** | **१,६२,५५०/-** | **निम्नतम** |
| ०४. | बालाजी मंडप डेकोरेटर्स, मनमाड. | २,२८,७००/- | -- |
| ०५. | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर. | ४,०८७५०/- | -- |

प्रस्ताव:- वरील विषयांकित कार्यक्रम दि.११/१२/२०१६ रोजी आयोजीत करणेत आलेला आहे. त्यामुळे उपरोक्त मंडप व्यवस्था वेळेत पुर्ण करुन घेणेसाठी ठेकेदार यांना त्वरीत कार्यादेश देणे आवश्यक आहे. तरी दि.०७/११/२०१६ रोजी झालेल्या मा. स्थानिक उपसमिती सभेतील वर नमूद निर्णयानुसार सदर काम तातडीने पूर्ण करुन घेणेसाठी निम्नतम दराचे ठेकेदार रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापुर यांना जा.नं. एसएसएसटी/ बांध/ ४५२९/ २०१६, दि.२८/११/२०१६ रोजी कार्यादेश देणेत आला आहे व त्यानुसार प्रत्यक्ष कामास सुरुवात करणेत आली आहे तरी वरीलप्रमाणे केलेल्या कार्यवाहीस व याकामी येणारे रू.१,६२,५५०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.८९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगानेदेश-विदेशातील साई मंदिरांचे श्री क्षेत्र शिर्डी येथे होणाऱ्या चर्चासत्र कार्यक्रमाचे ठिकाणी जेवणाकरीता स्वतंत्र मंडप व्यवस्था करणेकामी प्रस्तावात नमुद केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करणेत आले व निम्नतम दरधारक ठेकेदार कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले. तसेच याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५२** **मुंबई ते शिर्डी रस्त्यावर दर ३० कि.मी. अंतरावर पालखी निवारे सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोट कलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन याप्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र.–** निर्णय क्र. ७५४ (२) दि.०९/१०/२०१६

**प्रस्ताविक:** गुजरात, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, पुणे, मुंबई व महाराष्ट्रातील तसेच देशातील इतर राज्यांचे विविध भागातून संपुर्णवर्षभर श्री साईं चे दर्शनासाठी मोठया प्रमाणावर साईभक्तबाबांची पालखी घेवुन येत असतात सदरहु साईभक्तांसाठी संस्थानमार्फत उत्सवाचे वेळेस खालील ठिकाणी कापडी मंडप (कनात व बिछायतीसह), जनरेटर व लाईट व्यवस्था, पिण्याचे पाणी तसेच इतर अनुषंगिक सुविधा तात्पुत्या स्वरुपात पुरविण्यात येतात.

**०१. मुंबई ते शिर्डी मार्गावरील गावे-**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | खर्डी गोलभान | ८. | वावी |
| २. | न्यु साईकृपा हॉटेलक कसारा बायपास | ९. | पाथरे |
| ३. | लतिफवाडी पोलीस स्टेशनजवळ | १०. | पोहेगाव |
| ४. | घोटी साईप्रसाद हॉटेल (घाटनदेवी) | ११. | दुशिंगवाडी |
| ५. | सिन्नर - मुसळगाव औद्योगिक वसाहत | १२. | मलढोन फाटा |
| ६. | खोपडी –दत्त मंदिर | १३. | निमगाव को-हाळे |
| ७. | पांगरी | | |

**२. अहमदनगर ते शिर्डी मार्गावरील गावे-**

१. शिंगवेनाईक

२. गुहा

३. पिंपरीनिर्मळ

संस्थानमार्फत वरीलपैकी मुंबई ते शिर्डी मार्गावर पांढुर्ली, सिन्नर - मुसळगाव औद्योगिक वसाहत व पांगरी तसेच मनमाड ते शिर्डी मार्गावर येसगाव येथे कायमस्वरुपी पालखी निवारे बांधण्यात आले असुन त्यांचा साईभक्त वर्षभर लाभ घेत असतात.

**प्रस्ताव:** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०८२०१६ रोजीचे बैठकीत नि.क्र. ७५४ (२) खालीलप्रमाणे झाला आहे.

"..श्रींचे उत्सवादरम्यान मुंबई ते शिर्डी अशा माठया प्रमाणात पदयात्री साईभक्त श्रींच्या पालख्या घेउन येत असतात. त्यांच्या निवासव्यवस्थेसाठी मुबईपासून शिर्डीपर्यंत संस्थानमार्फत प्रत्येक ३० कि.मी. अंतरावर पालखीथांबे बनविण्यात यावेत. पालखी थांब्यांचे ठिकाणी पदयात्रींसाठी निवारा बायोटॉयलेट व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात यावे. याकामी देणगीस्वरुपात जमिनी/ जागा मिळणेसाठी संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्धी देण्यात यावी तसेच याबाबतचा सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करण्यात यावा."

त्यानुसार मुंबई ते शिर्डी रस्त्यावर वरील ठिकाणी पालखी निवारे करता येतील. याठिकाणी उपलब्ध होवू शकणा-या संभाव्य जागा निश्चित करुन उपलब्ध जागेचे लोकेशन, क्षेत्र, जवळपास उपलब्ध असलेल्या सोयीसुविधा यांचा विचार करून कायमस्वरुपी बांधकाम करून निवारा शेडची व्यवस्था करता येईल.

त्यासाठी वरीलप्रमाणे जागा अथवा जवळपासच्या जागा देणगीस्वरुपात, भाडेपट्टयाने अथवा कायमस्वरूपी खरेदीकरणेसाठी संस्थानचे संकेतस्थळावर संबंधित गांवातील मालमत्ताधारकांना आवाहन करून जागा मिळवणेबाबत मालमत्ता विभागामार्फत यथायोग्य कार्यवाही करता येईल.

तरी उपरोक्तप्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, पालखीधारक पदयात्रींना थांबणेसाठी मुंबई ते शिर्डी रस्त्यावर ज्या ठिकाणी पालखी निवारे आहेत, अशी ठिकाणे वगळता दर ३० किलोमीटर अंतरावर पालखी निवाऱ्यासाठी जागा खरेदी अथवा देणगी स्वरुपात स्विकारणेत मान्यता देण्यात आली. या पालखी निवाऱ्यांच्या ठिकाणी बायो-टॉयलेट व्यवस्था करणेत यावी. तसेच शिर्डी-सिन्नर नवीन मार्गाचे काम सुरु असून यामध्ये स्वतंत्र पालखी मार्गाची तरतूद करणेबाबत शासनास कळविणेत यावे व या मार्गावर वृक्षारोपन करता येईल का, याचीही माहिती घेण्यात यावी, असे ठरले.**(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५३** **संस्थान परिसरात साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी ए.सी.पी. शिटवर रेडीअम लेटरींगमध्ये बोर्ड तयार करुन बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे."

**प्रस्तावना:** श्रीं चे समाधि मंदिर, दर्शन रांग, निवासस्थाने, रुग्णालये, द्वारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवास (५००रुम), साई आश्रम, लाडू विक्री काऊटर, चहा कॅन्टीन, श्री साई प्रसादालय या व इतर संस्थान परिरामध्ये साईभक्तांचे मार्गदर्शन व माहितीचे विविध बोर्ड फोम, अॅक्रेलिक, एम. एस. शीट व फ्लेक्सवर तयार करुन बसविणेत आलेले आहे. सदरचे बोर्ड एकाच रंगाचे व एकाच मटेरिअलमध्ये नसलेने, बसविलेले बोर्ड दिसणेस खराब दिसतात. दि.१० व ११ नोव्हेंबर, २०१६ रोजी मा. अध्यक्ष महोदय यांनी मंदिर व परिसरामध्येमा. कार्यकारी अधिकारी व मा. उपकार्यकारी अधिकारी यांचे समवेत पाहणी केली त्यावेळी मा. अध्यक्ष महोदय यांनी संस्थान परिसरामध्ये विवीध माहिती व मार्गदर्शनासाठी बसविणेत आलेले बोर्ड हे एकाच प्रकारच्यानमून्यामध्ये तयार करुन घेणेबाबत सूचना केल्या आहेत.

**प्रस्ताव :** संस्थान परिसरामध्ये विविध ठिकाणी फ्लेक्स मटेरिअलमध्ये तयार करुन बसविणेत आलेले बोर्ड हे ऊन, वारा व पावसाने खराब झालेले आहेत. सदरचे बोर्ड एकाच नमून्यामध्ये तयार करुन घेणेसाठीचा नमूना दाखल बोर्डची पाहणी मा. अध्यक्ष महोदय यांनी केली आहे. करीता सदर नमून्यानुसार संस्थान परिसरामध्ये असलेले सध्याचे फ्लेक्स बोर्डचे ठिकाणी नवीन बोर्ड ए. सी. पी. शिटवर तयार करुन घेता येईल. सदरचे बोर्ड तयार करुन घेणेकामी स्थानिक पुरवठादार/ठेकेदार यांचेकडून ईमेलद्वारे दर मागविले आहे. त्यानुसार सदरकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | तपशिल | | बोर्डची संख्या | परिमाण / एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | ०३ ते ०४ एम. एम. जाडीचे ए. सी. पी. शिटवर निकालाईट रेडीयम लेटर कटींग करुन पेस्टींग करणे व त्यानुसार विविध आकाराचे व मसुद्याचे बोर्ड (आवश्यतेनुसार मराठी, हिंदी, इंग्रजी व तेलगू भाषेत) तयार करणे. | | | | | |
| | १. | मंदिर परिसर | ५३७ | ५९५०.०० | | |
| | २. | साई आश्रम | ५० | ५०३.४५ | | |
| | ३. | साईबाबा भक्तनिवासस्थान | १६५ | १५०३.८० | | |
| | ४. | द्वारावती भक्तनिवास | १०० | ९२३.५४ | | |
| | ५. | साई धर्मशाळा | १५ | १८१.०० | | |
| | ६. | साईबाबा हॉस्पीटल | ६३ | ८१८.६५ | | |
| | ७. | श्री साईनाथ रुग्णालय | ३१ | ३९८.११ | | |
| | ८. | साईबाबा इं. मे. स्कुल | ०६ | २९०.५२ | | |
| | ९. | कन्या विद्या मंदिर | ०५ | २६.०० | | |
| | | | एकुण चौरस फुट | १०५९५.०७ | १७०/- प्रती चौ. फुट | १८,०१,१६१.९० |
| | | | | | + ५% कन्टींनजन्सीज | ९०,०५८.१० |
| | | | | | **एकुण पुर्णांकीत अपेक्षित खर्च रुपये** | **१८,९१,२२०/-** |

तरी उपरोक्त विषयांकीत कामासाठी येणारे अंदाजे रु.१८,९१,२२०/- मात्रचे खर्चास व सदरचे बोर्ड तयार करुन घेणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरामध्ये साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी ए.सी.पी. शिटवर रेडीअम लेटरींगमध्ये बोर्ड तयार करुन बसविणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.५४** **दि.१२ डिसेंबर, २०१६ रोजी आयोजित परदेशातील साईभक्तांचे कार्यक्रमासाठी शिर्डी येथील हॉटेलमध्ये कॉन्फरन्स हॉल, नाष्टा व जेवणाची व्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी येथे दि.१२/१२/२०१६ रोजी सकाळी ०९.०० ते दुपारी ०२.०० या कालावधीत परदेशातील साईभक्तांचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी मा.उपकार्यकारी अधिकारी यांनी शिर्डीतील खाजगी हॉटेलची पहाणी करुन कोटेशन प्राप्त करणेबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार संस्थानचे जनसंपर्क

अधिकारी यांचे समवेत शिर्डीतील नामांकित हॉटेलमधील कॉन्फरन्स हॉल, डायनिंग या व्यवस्थांची पहाणी करण्यात आली व तेथील व्यवस्थापकांशी चर्चा करुन त्यांना दरपत्रके सादर करणेबाबत विनंती करणेत आली. त्यानुसार संबंधीत हॉटेल्सकडून ई-मेलद्वारे दरपत्रके प्राप्त झालेली असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | परिमाण | हॉटेलचे नांव | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | St.Laurn Meditation & Spa, Shirdi | | Sun n Sand Hotel, Shirdi | | Shraddha Inn., Shirdi | |
| | | | दर रु. प्रतिव्यक्ति | रक्कम रु. | दर रु. प्रतिव्यक्ति | रक्कम रु. | दर रु. प्रतिव्यक्ति | रक्कम |
| ०१. | सकाळचा नाष्टा (Breakfast) | एकुण १५० व्यक्तिं करिता | १५० | २२,५०० | ७३८ [६००+१३८ (२३% टॅक्स)] | १,१०,७०० | ५४९ | ८३,२५० |
| ०२. | टी, कॉफी व दुपारचे जेवण (Lunch) | | ५०० | ७५,००० | ९८४ [८००+१८४ (२३% टॅक्स)] | १,४७,६०० | ७९९ | १,१९,८५० |
| ०३. | कॉन्फरन्स हॉल | | | | १७,२५० [१५,००० + २,२५० (१५% टॅक्स)] | १७,२५० | | ३०,००० |
| ०४. | LCD with Screen | | | २३०० | | | | ४,००० |
| ०५. | P.A. System with two microphone | | | २३०० | | | | १,५०० |
| | | | | | | | | |
| | | | **एकुण :-** | **१,०२,१००** | | २,७५,५५० | | २,३८,६०० |
| | | | | **निम्नतम** | | | | |

**St.Laurn Meditation & Spa, Shirdi** यांचे सकाळचा नाष्टा (Breakfast), टी/कॉफी, दुपारचे जेवण (Lunch) व कॉन्फरन्स हॉल या सर्व सुविधा मिळून एकूण रक्कम रु.१,०२,१००/- हे दर निम्नतम आहेत. तसेच त्यांनी त्यासाठी खालीलप्रमाणे मेनू कळविलेला आहे

**<u>Breakfast Menu</u>**

**<u>Juices & Fruits</u>**

Canned Juice
Fresh Water Melon Juice
Fresh Cut Fruits (Watermelon & Papaya)

**<u>Cereals & Breakfast Roll</u>**

Cereals (Corn Flakes, Wheat Flakes, Chocos) with Hot & Cold Milk
Two Types of Breakfast Roll
White & Brown Breads with Jam/Honey/Marmalade

**<u>Continental</u>**

Slices Herbed Potato
Baked Beans

**<u>Indian & South Indian</u>**

Aloo Paratha with Curd
Palak Poori

Aloo Bhaji
Idli
Punugulu
Sambhar
Coconut & Tomato Chutney
**Tea/Coffee**

**AMT- TEA/COFFEE WITH COOKIES**

**Lunch Menu**

**Soup:-**

Cream Of Tomato
Sweet Corn Soup

**Salads:-**

Green Salad
Kachumber Salad
Idly Chhat

**Main Course:-**

Vegetable Hakka Noodles
Sliced Vegetable Manchurian Sauce
Broccoli and Mushroom Stir Fried
Bhindi Do Pyaza
Mixed Vegetable Korma
Paneer Butter Masala
Yellow Dal Tadka
Steamed Rice
Vegetable Biryani
Raita

**Desserts:-**

Fruit Custard
Gajar Halwa

तरी वर नमूद निम्नतम दरधारक St.Laurn Meditation & Spa, Shirdi यांचे प्रतिनिधींशी दर कमी करणेबाबत चर्चा होणेस व मेनू ठरविणे तसेच त्यानुसार येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८९७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.१२ डिसेंबर, २०१६ रोजी आयोजित परदेशातील साईभक्तांचे कार्यक्रम शिर्डी येथील St.Laurn Meditation & Spa या हॉटेलच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजित करणेत यावा, तसेच या कार्यक्रमासाठी येणाऱ्या मान्यवरांची नाष्टा व जेवणाची व्यवस्थाही याच हॉटेलमध्ये करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ प्र.अधिक्षक, द्वारावती भक्तनिवास)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५५** **जागतिक अपंग दिनानिमित्त अपंगांच्या जिल्हास्तरावरील क्रिडा स्पर्धा व सांस्कृतीक स्पर्धा या कार्यक्रमासाठी सशुल्क/ मोफत सुविधा मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** प्रास्तावीक– श्री साईबाबा संस्थानचे शैक्षणिक संकुलाकडील श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर या विद्यालयाकडे दि.२६/११/२०१६ रोजी (वरीलसंदर्भाचे) श्री साई-श्रध्दा ग्रामीण मुकबधीर विद्यालय (निवासी) शिर्डी यांचे पत्र प्राप्त झाले असुन, सदर पत्रात त्यांनी जागतीक अपंग दिनानिमित्त अपंगाच्या जिल्हास्तरावरील क्रिडा स्पर्धा व सांस्कृतीक स्पर्धा या कार्यक्रमासाठी सशुल्क/मोफत सुविधा मिळणे बाबत मागणी केलेली आहे.

तसेच त्यांनी सदर पत्रात नमुद केल्याप्रमाणे त्यांच्या सदर स्पर्धेचे सर्वसाधारण नियोजनच्या तारखा हया मंगळवार दि.२०/१२/२०१६ ते दि.२१/१२/२०१६ अशा दोन दिवसाच्या स्पर्धेसाठी श्री साईबाबा कन्या विद्यालय कार्यक्रम स्टेज व स्टेजसमोरील बैठक व्यवस्था तसेच तीन वर्गखोल्या विद्युत पुरवठेसह याबरोबरच इतर

विभागांकडे देखील १) वाहन विभागा शेजारील मैदान २) निवास व्यवस्था-५०० रुम ३) नाष्टा पाकीट ४) चहा पार्सल ५) भोजन ६) साईदर्शन ७) मैदाना शेजारील स्वच्छता गृह इत्यादीची मागणी केलेली आहे.

परंतु श्री साईबाबा संस्थानचे शैक्षणिक संकुलाकडील श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर या विद्यालयाकडील क्रीडा स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन तसेच शैक्षणिक संकुल वार्षिक स्नेहसंमेलना (सांस्कृतीक कार्यक्रमाचे) नियोजनाच्या तारखा खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

| अनं. | कार्यक्रमाचे नांव | कालावधी |
|---|---|---|
| १ | क्रीडा सपर्धा | सोमवार दि.०५/१२/२०१६ ते गुरुवार दि.१०/१२/२०१६ पर्यंत |
| २ | विज्ञानप्रदर्शन | शुक्रवार दि.१६/१२/२०१६ ते शनिवार दि.१७/१२/२०१६ व सोमवार दि.१९/१२/१६ ते मंगळवार दि.२०/१२/२०१६ पर्यंत |
| ३ | शैक्षणिक संकुल वार्षिक स्नेहसंमेलने (बक्षीस वितरण व सांस्कृतीक कार्यक्रम)-<br>(१) श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर<br>२) कनिष्ठ महाविद्यालय<br>३) इंग्लिश मिडीयम स्कुल ४) औद्योगिक प्र.संस्था | बुधवार दि.२१/१२/२०१६ ते शुक्रवार दि.२३/१२/२०१६ पर्यंत |

तसेच इंग्लिश मिडीयम स्कुल व औद्योगिक प्रशिक्षण संस्था या विद्यालयाकडील क्रीडा स्पर्धा माहे-डिसेंबरमध्ये घेण्यासाठी तारखांचे नियोजन सध्या चालु आहे. त्यामुळे वरील तारखांना श्री साईबाबा संस्थानचे शैक्षणिक संकुलाकडील विद्यालयाचे क्रीडा स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन तसेच शैक्षणिक संकुलातील वार्षिक स्नेहसंमेलनाचे कार्यक्रम (बक्षीस वितरण व सांस्कृतीक कार्यक्रम) असल्यामुळे श्री साई-श्रध्दा ग्रामीण मुकबधीर विद्यालय (निवासी) शिर्डी यांना मंगळवार दि.२०/१२/२०१६ ते दि.२१/१२/२०१६ अशा दोन दिवसाच्या स्पर्धेसाठी श्री साईबाबा कन्या विद्यालय कार्यक्रम स्टेज व स्टेजसमोरील बैठक व्यवस्था तसेच तीन वर्गखोल्या विद्युत पुरवठेसहदेता येणार नाहीत. तसेच यापुर्वी आपण कधी अशा सुविधा इतर विद्यालयांना पुरविलेल्यानाहित आपल्या निर्णयास्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.८९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मानवतेच्या दृष्टीकोनातून श्री साई-श्रध्दा ग्रामीण मुकबधीर विद्यालय (निवासी) शिर्डी यांना जागतिक अपंग दिनानिमित्त अपंगांच्या जिल्हास्तरावरील क्रिडा स्पर्धा व सांस्कृतीक स्पर्धा या कार्यक्रमासाठी मंगळवार दि.२०/१२/२०१६ ते दि.२१/१२/२०१६ असे दोन दिवस श्री साईबाबा कन्या विद्यालयाचे कार्यक्रम स्टेज, स्टेजसमोरील बैठक व्यवस्था, विद्युत पुरवठ्यासह तीन वर्गखोल्या विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या. तसेच स्पर्धेसाठी येणाऱ्या अपंगांची निवासव्यवस्थाही साईबाबा भक्तनिवास विभागाकडे मोफत करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्राचार्या, कन्या विद्या मंदिर/ प्र.अधिक्षक, साईबाबा भक्तनिवास)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.५६** **श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्त आयोजीत चर्चासत्राचे बंदोबस्ताकामी होमगार्ड घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. त्या दृष्टिकोनातून शिर्डीत येणा-या भाविकांसाठी सोयीसुविधा करणे तसेच संपुर्णवर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणेचे नियोजन आहे. संपुर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहील व शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल या दृष्टीने प्रयत्न करणेत येत आहेत. याबाबत मा.उपसमितीचे दि.१६/०९/२०१६ रोजीचे सभेत सन २०१७-२०१८ या समाधी शताब्दी वर्षात आयोजीत करावयाचे धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनाबाबत देश विदेशातील साई मंदिराचे अधिकारी/ पदाधिकारी यांच्या सुचना वजा प्रस्ताव प्राप्त करुन घेणेसाठी तसेच या साई मंदिरांच्याव्यवस्थापनांनी या शताब्दी वर्षात आयोजीत करावयाचे कार्यक्रम/ उपक्रम याबाबत व्यापक सविस्तर चर्चा करणेसाठी शिर्डी येथे दि.११/१२/२०१६ रोजी चर्चासत्र आयोजीत करणेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे.

याबाबत दि.१७/१०/२०१६ रोजीचे बैठकीत झालेल्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीबाबत आढावा घेणेसाठी मा.संदीप आहेर, उपकार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली शुक्रवार दि.२८/१०/२०१६ रोजी सकाळी ११.०० वा. उपकार्यकारी अधिकारी यांचे दालनात बैठक आयोजीत करणेत आलेली होती. त्यावेळी आयोजीत करण्यात येणा-या सदर चर्चासत्र कार्यक्रमाचे ठिकाणी मुख्य दरवाजासमोर फेरीवाले, रिक्षावाले, पॉलीशवाले, वाहने यांची गर्दी होणार नाही तसेच कार्यक्रमाचे दिवशी नगर-मनमाड रस्त्यावर वाहनांची गर्दी होणार नाही याबाबत उपाययोजना तसेच कार्यक्रमाचे ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून अग्निशमन गाडी तसेच सुरक्षारक्षक पथक उपलब्ध ठेऊन चोख बंदोबस्त ठेवणेबाबत सुचना करण्यात आलेल्या आहे.

तसेच दि.२३/११/२०१६ रोजीचे प्रशासकिय अधिकारी कक्षात श्री.गमे सो. यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत त्यांनी आपलेकडील मनुष्यबळ कमी पडत असलेने अशाप्रकारच्या कार्यक्रमांकरीता सुरक्षा व्यवस्था पुरविणारे खाजगी संस्था वा एजन्सींकडून सुरक्षाव्यवस्था घेणेबाबत सुचना केलेली आहे.

करीता सदर कार्यक्रमाचे नियोजनाकरीता सध्या संरक्षण विभागाकडील कायम व कंत्राटी कर्मचारी मनुष्यबळ कमी पडत असल्याने मा.महासमादेशक, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेशी दुरध्वनीव्दारे सदरचे आयोजीत चर्चासत्राचे बंदोबस्तकामी त्यांचेकडील होमगार्ड मिळणेबाबत संपर्क केला असता त्यांनी मा.जिल्हा समादेशक, अहमदनगर यांना पत्र देऊन त्याबाबतची माहिती घेण्यास सांगीतले. त्यानुसार होमगार्ड कार्यालय, अहमदनगर (श्री.जहागीरदार सो.) यांचेशी दुरध्वनीव्दारे चर्चा केली असता त्यांनी एका होमगार्डला प्रती दिनी रु.४००/- (अक्षरी रुपये चारशे) मात्र याप्रमाणे आकारण्यात येईल, असे सांगीतले.

सदरचा चर्चासत्र कार्यक्रम हा साईआश्रम-१ येथे आयोजीत करणेत आलेला असुन त्या कार्यक्रमासाठी देशविदेशातील साईभक्त येणार असल्याने, आपलेकडील उपलब्ध कायम व कंत्राटी सुरक्षा कर्मचारी यांचे व्यतिरीक्त संस्थानला सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातुन बंदोबस्तकामी होमगार्ड कार्यालय, अहमनदगर (0241-2324513) यांचेकडून एकूण ५० होमगार्ड प्रती दिनी घेणेस टिपणी ठेवुन मंजुरी घेण्यात आली आहे. त्याकरीता अहमदनगर कार्यालयातील श्री.जहागीरदार साहेब यांचेशी दुरध्वनीव्दारे झालेल्या संभाषणानुसार एका होमगार्डास प्रती दिनी रु. ४००/- याप्रमाणे ५० होमगार्डांकरीता एकूण रु. २०,०००/- (अक्षरी रुपये वीस हजार) मात्र प्रती दिनी खर्च येत असलेने एकूण २ दिवसांकरीता सदरचा खर्च हा रु. ४०,०००/- (अक्षरी रुपये चाळीस हजार) मात्र अपेक्षित आहे. त्यानुसार सदर कार्यालयांस जा.नं.एसएसएस/वशी-संरक्षण/४५१२/१६ दि.२८/११/२०१६ अन्वये पत्र देण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त आयोजीत चर्चासत्र कार्यक्रमाकरीता २ दिवस (दि.१०/१२/२०१६ ते दि.११/१२/२०१६ अखेर) होमगार्ड कार्यालय, अहमदनगर यांचेकडुन प्रती दिनी ५० होमगार्ड घेणेस व त्याकामी येणा-या (दोन दिवसांकरीता) रु. ४०,०००/- (अक्षरी रुपये चाळीस हजार) मात्रचे खर्चाबाबत सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त आयोजीत चर्चासत्र कार्यक्रमाचे बंदोबस्ताकरीता २ दिवस (दि.१०/१२/२०१६ ते दि.११/१२/२०१६ अखेर) होमगार्ड कार्यालय, अहमदनगर यांचेकडून प्रती दिनी ५० होमगार्ड घेणेस व त्याकामी येणाऱ्या (दोन दिवसांकरीता) रु.४०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५७** **साईआश्रम भक्तनिवास व द्वारावती भक्तनिवास इमारतींमधील मच्छर निर्मुलनाबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद:-** २१ चा (१) चा (ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे

**मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय:-**निरंक.

**प्रस्तावना:-** दि.११/१२/२०१६ रोजी श्रींचे सन २०१८ मधील महाशताब्दी सोहळयाचे आयोजन तथा नियोजनासाठी आवश्यक सूचना, माहिती इत्यादी साठी देश-विदेशातील साईमंदिरांचे प्रतिनिधींचे परिषदेचे आयोजन संस्थानचे वतीने साईआश्रम भक्तनिवास येथे आयोजित केले आहे.येणा-या प्रतिनिधींची निवासव्यवस्था साईआश्रम भक्तनिवास व व्दारावती भक्तनिवास येथे करण्यात येणार आहे. मा.अध्यक्ष महोदय यांनी खोलीमध्ये साईभक्तांना मच्छरांचा त्रास होऊ नये यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात असे निर्देश दिले आहे. त्यास अनुसरुन मच्छर प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा अवलंब करणेसाठी खालील प्रमाणे दोन पर्याय आहेत.

१. मच्छर प्रतिबंधक उदबत्ती वापरणे.

२. विजेवर चालणारे मच्छर प्रतिबंधात्मक किटकनाशक यंत्र वापरणे.

उपरोक्त पर्याय ०१ चा वापर सर्व साईभक्तांचे आरोग्यास सोयीस्कर होईल असे नाही कारण या क्रियेमधून धुर निर्माण होतो त्यामुळे ते अस्थमा रुग्ण, हृदयरोग रुग्ण, तसेच श्वसनाचे विकार असणारे साईभक्त यांना त्रासदायक ठरेल.

पर्याय ०२ मध्ये नमुद प्रमाणे विद्युतचलित यंत्रे सदर कामी योग्य ठरतील असे नम्र मत आहे.

**विभागाची मागणीः-** इकडील एकूण १५३६ खोल्यांसाठी ०१ या प्रमाणे १५३६ नग व व्दारावती भक्तनिवास साठी १०० नग असे १६३६ नग यंत्रे रिफिलींग कंटेनरसह खरेदी करावी लागतील.

**छाननी करुन अनूमानः-** महाराष्ट्र शासनाने संमत केलेला अधिनियम २००४ अन्वये मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने खरेदी करता येईल.

**विभागाचे स्पष्ट अभिप्रायः-** मच्छर निर्मुलनासाठी काचेच्या कंटनेरला जोडून असणा-या विद्युत यंत्राव्दारे (Mosquito remover machine) प्रत्येक खोलीमध्ये मच्छरांचे निर्मुलनासाठी लावावे लागतील. ऑनलाईन सर्च केले असता विद्युत चलित यंत्रे कंटेनरसह प्रति नग अंदाजेरु. ७२/- नमुद असलेबाबत निदर्शनास आले आहे. रिफिलींग कंटेनर खरेदी कामी स्वतंत्र प्रस्ताव यथावकाश मे.हुजूरांचे सेवेसी सादर करता येईल तथापी तातडीची खरेदी म्हणून सदर कामी खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं | तपशील | आवश्यक नग | अंदाजे किंमत | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | विद्युत चलीत मच्छर निर्मुलन यंत्रे कंटेनरसह | **१६३६ नग** | ७५ रु.प्रति नग | १,२२,७००/- |
| | एकूण अक्षरी रु. एक लाखबावीस हजार सातशे मात्र. | | | १,२२,७००/- |

तरी उपरोक्त नमुद प्रमाणे साईआश्रम भक्तनिवास व व्दारावती भक्तनिवास विभागासाठी विद्युत चलीत मच्छर निर्मुलन यंत्रे खरेदी करणेकामी १६३६ नगांसाठी अंदाजे रु१,२२,७००/- (अक्षरी रु. एक लाख बावीस हजार सातशे मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्चाची तरतुद सन २०१६-१७ चे सुधारीत अंदाजपत्रकात करता येईल.

**तरी**

तातडी तथा कमी वेळ याचा विचार करता आपणास आवश्यक साईआश्रम भक्तनिवास विभागासाठी १५३६ नग व व्दारावती भक्तनिवाससाठी १०० नग असे एकूण १६३६ नग विद्युत चलीत मच्छर निर्मुलन यंत्रे खरेदीकामी येणा-या अंदाजे रु.१,२२,७००/- अक्षरी रु.एक लाख बावीस हजार सातशे मात्रचे खर्चास तथा खरेदी, नामवंत स्थानिक व्यापारी प्रतिष्ठाणांकडून त्यांची दरपत्रके मागवून करणेकामी मान्यतेसाठी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, देश-विदेशातील साईमंदिरांच्या प्रतिनिधींचे चर्चासत्र शिर्डी येथे आयोजित केलेले असून त्यांची निवासव्यवस्था साईआश्रम भक्तनिवास व व्दारावती भक्तनिवास येथे करण्यात आलेली आहे. या ठिकाणी निवास करणाऱ्या भक्तांचे मच्छरांपासून संरक्षण व्हावे याकरीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे विद्युत चलीत मच्छर निर्मुलन यंत्रे तातडीने खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**आयत्या वेळेचा विषय नं.५८** **जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषदेच्या अनुषंगाने मुंबई येथे पत्रकार परिषदेचे आयोजन करणेबाबत**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद-** महाराष्ट्र शासनाने पुनर्घटीत केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिनियमात “समितीची कर्तव्य व अधिकारी” या शिर्षकाखाली अधिनियिम नंबर १७ (१) मध्ये “राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील.” अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०९.१०.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक६८९(२५)

**प्रस्ताविक–** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०९.१०.२०१६ चे सभेतील निर्णयाचे अनुषंगाने दिनांक ११ डिसेंबर २०१६ रोजी शिर्डी येथे आयोजित जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषदे संदर्भात मा.अध्यक्ष श्री.सुरेश हावरे साहेब दिनांक ०५ डिसेंबर २०१६ रोजी दुपारी १२.३० वाजता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण (मंत्रालयासमोर चौथा मजला), मुंबई येथे पत्रकार परिषद घेणार आहे. उपरोक्त पत्रकार परिषदेकरीता उपस्थित राहणा-या पत्रकार व मान्यवरांची भोजन तसेच पत्रकार परिषदेसाठी घेण्यात येणारा हॉल व त्यानुषंगाने येणाऱ्या सर्वसामावेशक खर्चास मान्यता असावी.

**मागणी-** जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषदेच्या अनुषंगानेदिनांक ०५ डिसेंबर २०१६ रोजी मुंबई येथे आयोजित पत्रकार परिषदेस येणा-या सर्वसामावेशक खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत-** जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषदेच्या अनुषंगाने दिनांक ०५ डिसेंबर २०१६ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण (मंत्रालयासमोर चौथा मजला), मुंबई येथे पत्रकार परिषदेसाठी हॉल, उपस्थित राहणाऱ्या पत्रकार व मान्यवरांची भोजन व्यवस्था तसेच त्यानुषंगाने येणाऱ्या सर्व सामावेशक खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.९०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषदेच्या अनुषंगाने दिनांक ०५ डिसेंबर २०१६ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण (मंत्रालयासमोर चौथा मजला), मुंबई येथे पत्रकार परिषदेसाठी हॉल, उपस्थित राहणाऱ्या पत्रकार व मान्यवरांची भोजन व्यवस्था करणेत यावी, असे ठरले. तसेच याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.५९** **जागतिक साई मंदिर विश्वस्त परिषदेच्या सत्काराकरीता छापील शॉल खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे वतीने श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ (विजयादशमी) अखेर साजरा करण्यात येणार आहे. त्या दृष्टीकोणातून शिर्डीत येणाऱ्या भाविकांसाठी सोयीसुविधा उभारणे तसेच संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे नियोजन आहे. जेणेकरुन संपुर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तिमय वातावरण राहील व शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल या दृष्टीने प्रयत्न करणेत येत आहेत. त्यानिमित्त समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनाबाबत देश-विदेशातील साई मंदिरांचे अधिकारी/पदाधिकारी यांच्या सूचना-वजा-प्रस्ताव प्राप्त करुन घेणेसाठी तसेच या मंदिरांच्या व्यवस्थापनांनी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे कार्यक्रम/ उपक्रम याबाबत व्यापक चर्चासत्र दि.११/१२/२०१६ रोजी शिर्डी येथे "जागतिक साई मंदिर परिषद-२०१६" आयोजित करण्यात आलेले आहे.

**प्रस्ताव-** संस्थानमार्फत आयोजित केलेल्या "जागतिक साई मंदिर परिषद-२०१६" करीता देशातुन तसेच विदेशातील मंदिरांचे प्रतिनीधींना बोलविण्यात आलेले आहे त्याकामी अंदाजे २०००-२५०० मंदिरांचे प्रतिनीधी साईभक्त सहभाग घेणार आहेत. त्याचप्रमाणे परिषदेकरीता विविध क्षेत्रातील मान्यवरांना निमंत्रीत करण्यात आलेले आहे. सदर निमंत्रीत करण्यात आलेल्या मान्यवरांचे सत्काराकरीता "जागतिक साई मंदिर परिषद" अशा नावाची शॉल खरेदी करणेत यावी अशी सूचना केली आहे

**विभागाचा अभिप्राय-** "जागतिक साई मंदिर परिषद-२०१६" करीता लागणा-या शॉल खरेदी करणेकामी संस्थानला पुर्वी पुरविण्यात आलेल्याशॉल पुरवठादार यांचेकडुन शॉलचा नमूना मागविण्यात आला होता. तसेच सदरचा नमूना मा.विश्वस्त श्री.सचिन तांबे साहेब यांचेकडुन तपासुन शॉलची खरेदी करण्यात यावी असे मा.अध्यक्ष महोदय यांनी सूचना केलेली आहे त्यानुसार नमूना निश्चित झाला असून त्याकामी लवकरात लवकर खरेदी करणेबाबत मा.विश्वस्त यांनी सूचना केल्या आहेत

तरी "जागतिक साई मंदिर परिषद-२०१६" करीता लागणारे छापील शॉल खरेदीकामी येणारे खर्चास मान्यता घेणेकामी व प्राप्त कोटेशन्स मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे समक्ष उघडुन न्युनतम दर धारकास पुरवठा आदेश देणेस मान्यताअसावी, ही विनंती.

**निर्णय क्र.९०२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जागतिक साई मंदिर विश्वस्त परिषदेसाठी निमंत्रीत करण्यात आलेल्या मान्यवरांचे सत्काराकरीता "जागतिक साई मंदिर परिषद" अशा नावाची शॉल खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन्स मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच तातडीची गरज असल्यामुळे प्रस्तावित शॉल्स खरेदीकामी मागविणेत आलेली कोटेशन्स मा.कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडणेत येऊन, त्यामधील निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देण्यात यावा व या कार्यवाहीचा अहवाल सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.६०** **जागतिक साई मंदिर विश्वस्त परिषदेच्या सत्काराकरीता सन्मानचिन्ह खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे वतीने श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ (विजयादशमी) अखेर साजरा करण्यात येणार आहे. त्या दृष्टीकोणातून शिर्डीत येणाऱ्या भाविकांसाठी सोयीसुविधा उभारणे तसेच संपूर्ण वर्षभर वेगवेगळ्या धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे नियोजन आहे. जेणेकरुन संपुर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहील व शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल या दृष्टीने प्रयत्न करणेत येत आहेत. त्यानिमित्त समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनाबाबत देश-विदेशातील साई मंदिरांचे अधिकारी/पदाधिकारी यांच्या सूचना-वजा-प्रस्ताव प्राप्त करुन घेणेसाठी तसेच या मंदिरांच्या व्यवस्थापनांनी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचे कार्यक्रम/ उपक्रम याबाबत व्यापक चर्चासत्र दि.११/१२/२०१६ रोजी शिर्डी येथे "जागतिक साई मंदिर परिषद-२०१६" आयोजित करण्यात आलेले आहे.

प्रस्ताव- संस्थानमार्फत आयोजित केलेल्या "जागतिक साई मंदिर परिषद-२०१६" करीता देशातुन तसेच विदेशातील मंदिरांचे प्रतिनीधींना बोलविण्यात आलेले आहे त्याकामी अंदाजे २०००-२५०० मंदिरांचे प्रतिनीधी साईभक्त सहभाग घेणार आहेत. सदर निमंत्रीत करण्यात आलेल्या प्रत्येक साईमंदिरांचे प्रतिनीधी यांना प्रत्येकी ०१ सन्मानचिन्ह देणेबाबतची कार्यवाही करणेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत श्रींच्या ३ नंबर पावडर मूर्तीचे खाली लाकडी बॉक्स असे सन्मानचिन्हाचे स्वरुप असावे असे सूचित करण्यात आलेले आहे

**विभागाचा अभिप्राय-** तरी "जागतिक साई मंदिर परिषद-२०१६" करीता लागणारे सन्मानचिन्ह खरेदी करणेकामी वेळ कमी असल्याने सध्याचे पावडर मूर्ती पुरवठादार यांचेकडुन मूर्ती खरेदी करुन त्याचे खाली लाकडी बॉक्स तयार करुन त्यावर मूर्ती बसवुन घेणेकामी स्थानिक पुरवठादार यांचेकडुन कोटेशन मागविणेस मान्यता असावी. तसेच सदर खरेदी ही रु.३,००,०००/-चे आतील असल्याने स्थानिक पुरवठादार यांचेकडुन कोटेशन मागविणेस व प्राप्त कोटेशन्स मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे समक्ष उघडुन त्यातील न्युनतम दर असलेले पुरवठादार यांचेकडुन खरेदी करणेस मान्यता असावी, ही विनंती.

तरी "जागतिक साई मंदिर परिषद-२०१६" करीता लागणारे सन्मानचिन्ह खरेदीकामी येणारे खर्चास मान्यता घेणेकामी व प्राप्त कोटेशन्स मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे समक्ष उघडुन न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेस मान्यता असावी, ही विनंती.

**निर्णय क्र.९०३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जागतिक साई मंदिर विश्वस्त परिषदेसाठी निमंत्रीत करण्यात आलेल्या मान्यवरांचे सत्काराकरीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सन्मानचिन्ह खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन्स मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच तातडीची गरज असल्यामुळे प्रस्तावित सन्मानचिन्ह खरेदीकामी मागविणेत आलेली कोटेशन्स मा.कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडणेत येऊन, त्यामधील निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देण्यात यावा व या कार्यवाहीचा अहवाल सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.६१** **मा.विश्वस्तांच्या सुचनांबाबत**

**निर्णय क्र.९०४** **मा.विश्वस्तांनी आजचे सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या, त्या मान्य करण्यातआल्या.**

(०१) पुर्वीच झालेल्या चर्चेप्रमाणे समिती सदस्य नेमणूकीबाबत ७० वर्ष वयाची अट शिथील करणे, तसेच संस्थानचा वाढता व्याप लक्षात घेता, मा.कार्यकारी अधिकारी यांना अधिनियम- २००४ मधील तरतूदीनुसार असलेले रु.२५,०००/- मात्रच्या खर्चाचे अधिकारात रु.१,००,०००/- मात्र पर्यंत वाढ करणे या व इतर बाबींसाठी

संस्थान अधिनियम- २००४ मध्ये दुरुस्तीकरणेकामी संस्थान अधिकाऱ्यांची समिती नेमावी व त्यानुसार महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा करणेत यावा. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

(०२) साईभक्तांचे दर्शन सहज व सुलभ व्हावे यासाठी उभारावयाच्या Time base दर्शन प्रणालीचे काम पहात असलेले त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडिया लि., या कंपनीच्या प्रतिनिधींना आजचे सभेत बोलविणेत आले होते. सभेने त्यांचेबरोबर चर्चा केली व दि.१२ डिसेंबर, २०१६ रोजी सर्व साईभक्तांच्या सोयीसाठी Time Base प्रणाली सुरुकरणेत येईल, असे घोषीत केले. तसेच त्रिलोक सिक्युरिटी सिस्टीम इंडिया लि. यांचेकडील अधिकारी व कर्मचारी यांना निवासासाठी संस्थानची शांतिनिकेतन इमारत उपलब्ध करुन देण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान)

---

(०३) इस्त्राईल सिक्युरिटी लि., यांचेकडून मंदिर व मंदिर परिसराचे सिक्युरिटी ऑडीट करुन घेण्यात यावे.

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

(०४) बीएसएनएल कंपनी माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील सर्व कामे करत आहे. ही कंपनी शासनाची असल्यामुळे संस्थानमधील माहिती तंत्रज्ञान विषयक बाबींसाठी या कंपनीला आमंत्रित करणेत यावे.

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

(०५) प्रसादालयामध्ये साईभक्तांना पुरविण्यात येणाऱ्या चपात्यांबाबत भक्तांकडून अभिप्राय घेण्यात यावा, आवश्यकता भासल्यास याकामी आपलेमार्फत कर्मचारी नेमावेत. (कार्यवाही- प्रसादालय विभागप्रमुख)

---

(०६) सेवानिवृत्त श्री.पेंडसे मॅडम तसेच डॉ.डांगे यांना पुन्हा सेवेत घेणेकामी चर्चेसाठी रुग्णालय उपसमिती सभेसमोर बोलविणेत यावे. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

(०७) शिर्डी नगरपंचायतीस, शिर्डी शहरामधील ज्या विकासकामांसाठी संस्थानमार्फत निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे, त्या ठिकाणी संस्थानचे नावाचा बोर्ड लावणेत यावा. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

(०८) अनेकवेळा रात्रीच्या वेळेस रुग्णांना कॉट उपलब्ध असूनही कॉट उपलब्ध नाही, असे तेथील कर्मचारी सांगतात, ही बाब गांभीर्याने घेण्यात येऊन, कार्यरत कर्मचाऱ्यांना तशा सुचना देण्यात याव्यात.

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ वैद्यकिय अधिक्षक)

---

(०९) ठिकठिकाणांहून पालखी घेऊन येणाऱ्या पदयात्रींच्या दर्शनासाठी वेगळे गेट सुरु करणेबाबतचा प्रस्ताव समितीसमोर सादर करणेत यावा. (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

(१०) संस्थानमार्फत प्रकाशित होत असलेल्या साईलिला द्वैमासिका प्रमाणेच साईसेवा द्वैमासिकही प्रकाशित करणेत यावे व साईलिला आणि साईसेवा द्वैमासिकासाठी संपादकाची नेमणूक करणेबाबतची साईलिला द्वैमासिकामध्ये प्रसिध्दी देण्यात येऊन, संपादकांचेअर्ज मागविणेत यावे.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

वरील निर्णय क्र.७५५ ते ९०४ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर रात्रौ १०.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

(बाजीराव शिंदे) (सुरेश हावरे)
कार्यकारी अधिकारी अध्यक्ष

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

*{15} 30.11.2016, Shirdi*